महाकवी गुणकीर्ती रचित


# रामायण

## भाग - १

(इ.स. १४७० मध्ये रचलेले मराठी महाकाव्य)

संशोधक व संपादक

**प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाकवी गुणकीर्ती विरचित

# रामायण

(इ.स. १४७० मध्ये रचलेले मराठी महाकाव्य)

## भाग १

संशोधक व संपादक

**प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**

प्रकाशक

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

इ. सन २०२०

एच-२७७
१

➢ **पुस्तकाचे नांव :** रामायण – भाग १

➢ **मूळ लेखक :** महाकवी गुणकीर्ती

➢ **संपादक :** प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील

➢ **प्रथमावृत्ती :** **२०२०**

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :** व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे – ४११ ००१.

➢ **किंमत :** **६१६/–**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | निवेदन | ५ |
| २. | ऋणनिर्देश | ७ |
| ३. | प्रस्तावना | ९ |
| ४. | हस्तलिखिताची मूळ आवृत्ती | ९७ |
| ५. | हस्तलिखिताचे मराठी लिप्यंतर | ४०१ |
| | प्रथम अध्याय | ४०३ |
| | द्वितीय अध्याय | ४१४ |
| | तृतीय अध्याय | ४२८ |
| | चर्तुथ अध्याय | ४४० |
| | पंचम अध्याय | ४५४ |
| | षष्ठम अध्याय | ४६९ |
| | सप्तम अध्याय | ४८१ |
| | अष्टम अध्याय | ५२१ |
| | नवम अध्याय | ५३७ |
| | दशम अध्याय | ५५९ |
| | एकादशम अध्याय | ५८६ |
| | द्वादशम अध्याय | ५९६ |
| | त्रयोदयशम अध्याय | ६१५ |
| | चतुर्दशम अध्याय | ६३५ |
| | पंचदशम अध्याम | ६५० |

# निवेदन

भारतीय भाषा आणि साहित्य समृध्द करण्यामध्ये जैन साहित्याचे फार मोठे योगदान आहे. विशेषतः प्राचीन भारतीय प्राकृत भाषा आणि लिप्यांचे संवर्धन जैन साहित्याने केले आहे. अर्धमागधी, पैशाची, शौरसेनी आणि महाराष्ट्री या प्राचीन भाषांमध्ये जैन साहित्य भारतीय साहित्य समृध्द केले आहे. तसेच इसवीसनाच्या चौथ्या पाचव्या शतकानंतर संस्कृत भाषेतही जैन साहित्य लिहिले गेले आहे. उत्तर मध्ययुगीन प्रादेशिक भाषांच्या काळातही सर्वच भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये जैन साहित्य मोठ्या प्रमाणात रचले गेले आहे. इसवीसनाच्या सातव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषांचा काळ समजला जातो. या काळातही जैन साहित्याची रचना सर्वच भाषांमध्ये झालेली आहे. मराठी साहित्याच्या पूर्व परंपरेचा शोध घेताना मराठी, महाराष्ट्री अपभ्रंश आणि महाराष्ट्री प्राकृत असा शोध घेतल्यास मराठी भाषेची जननी महाराष्ट्र ठरते. या महाराष्ट्री भाषेत भारतीय साहित्यात सर्वाधिक जैन परंपरेतील कवी लेखकांच्या रचना आहेत. म्हणूनच पिशेल या पाश्चात्य भाषा अभ्यासकाने महाराष्ट्री भाषेला 'जैन महाराष्ट्री' असे म्हटले आहे. हिच महाराष्ट्री उत्तर काळात अपभ्रंश महाराष्ट्री (मराठी) झाली आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी शोधलेल्या सर्वच हस्तलिखित प्रतीमध्ये लेखक आणि महाराष्ट्री किंवा मराष्ट्री भाषेत रचना करत असल्याचे सांगतात. अगदी एकोणिसाव्या शतकातील हस्तलिखित प्रतींमध्ये ते मराठी हा शब्द न लिहिता मराष्ट्री हाच शब्द लिहितात. यावरुन मराठी आणि महाराष्ट्रीच्या परंपरेचे नाते दृढ होताना दिसते.

मध्ययुगीन मराठी साहित्याचा ग्रांथिक इतिहास बाराव्या शतकापासून सुरु होतो. मराठी जैन साहित्याचा इतिहास चौदाशे पन्नास पासून सुरु होतो. तेराव्या शतकातील महानुभाव आणि वारकरी साहित्याच्या रचनानंतर एकनाथ पूर्वकाळात मध्यवर्ती धारेतील मराठी साहित्यात पोकळी निर्माण झालेली दिसते. नेमके याच काळात, ज्याला मराठी साहित्याचे अंधारयुग म्हटले जाते, त्या काळात जैन कवी आपली मराठीतील प्रचंड रचना करताना दिसतात. महानुभावीयांच्या गद्य साहित्य नंतर खंडित झालेली मराठी गद्याची परंपराही गुणकीर्तींच्या धर्मामृत या ग्रंथाने भरुन निघालेली दिसते. चौदाव्या शतकानंतर मराठीतील मुख्य साहित्य परंपरेच्या समांतर अशी जैन साहित्याची परंपरा दिसते. संख्येच्या दृष्टीने मोजमाप केल्यास तुकाराम, रामदासादि शिवकाळात मराठी जैन कवींची गर्दी अधिक दिसते. ही साहित्य परंपरा दुर्दैवाने आजही अप्रकाशित मठा-मंदिरामध्ये बंदिस्त आहे.

महराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने हाती घेतलेल्या या

संशोधन प्रकल्पामुळे मराठीतील फार मोठे साहित्यिक भांडार खुले होणार आहे. 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मिळ अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' या ब्रहद् संशोधन प्रकल्पांतर्गत डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन काळातील सतरा हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व संपादन केले आहे. या ग्रंथांचे मूळ हस्तलिखित शोधून त्यावर विस्तृत प्रस्तावना लिहिल्या आहेत. या १७ ग्रंथांमध्ये पंधराव्या शतकातील गुणकीर्तींचा 'रामायण' हा ग्रंथ तीन खंडात संपादित केला आहे. पुढे नामा जिनदास यांचा सोळाव्या शतकातील 'हरिवंश पुराण' व अठराव्या शतकातील 'हरीलीळाप्रकाश' हे दोन ग्रंथ तीन खंडात जैन महाभारताची कथा मांडताना दिसतात. ही दोन्ही महाकाव्ये व वैदिक रामायण आणि महाभारत काव्ये अशी तुलना करता मराठी वाचकांची अभिरुची संपन्न करणारे हे ग्रंथ आहेत. 'यशोधरचरित्र','सुदर्शनचरित', 'शीलपताका', 'हनुमंत पुराण', 'श्रीपालचरित्र', 'कर्णामृत कथा' या कथा मध्ययुगीन पंडिती वळणाच्या सुंदर आख्यान कथा आहेत. 'उपदेश रत्नमाला' व 'धर्मामृत कथा' ही दोन कथाकाव्य आहेत. भारतीय कथा परंपरेतील कथामालिका अथवा साखळी कथा या प्रकारच्या या कथा आहेत. आधुनिक मराठीतील कथासाहित्यपूर्व, ही कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'आदिपुराण', 'अष्टकर्म प्रकृती', 'सुक्तिमुक्तावली' हे ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाची मराठी भाषेत सोप्या पध्दतीने उपमा दृष्टांतांनी मांडणी करणारे ग्रंथ आहेत. या सर्वांमध्ये 'सुमतिप्रकाश' हा सोळाव्या शतकातील एक महत्त्वाचा जैन ग्रंथ आहे. कोणतेही कथानक नसलेला एकनाथकालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा वऱ्हाडी भाषेतील हा ग्रंथ मराठी साहित्यातील महत्त्वाचा दस्ताऐवज आहे.

मराठी जैन साहित्य हे विशिष्ट साहित्य असले तरी ते इथल्या मराठी माणसांनी लिहिलेले साहित्य आहे. मराठी भाषा आणि साहित्यांचे दालन समृध्द करणारी ही महाराष्ट्रीय माणसांची व साहित्याची महत्त्वाची पंरपरा आहे. या सर्व परंपरेची ओळख मराठी वाचकांना करून देण्याची संधी या संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी दिली आहे. मराठी साहित्य परंपरेचा नव्याने उलगडलेला हा इतिहास मराठी पंरपरा समृध्द करणारा ठरेल, असा विश्वास वाटतो.

**सदानंद मोरे**

अध्यक्ष

महराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ऋणनिर्देश

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मीळ व अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २१ व्या शतकात मला मान्यता दिली याचाच मला अत्यंत आनंद होत आहे. मराठीतील मौलिक ऐतिहासिक साहित्याला पुनर्जिवीत करण्याच्या माझ्या संकल्पाला त्यांनी मूर्त स्वरूप दिले त्याबद्दल मंडळाच्या प्रत्येक सदस्याचे जितके आभार मानावे तितके कमीच आहेत. अभिजात असलेली मराठी भाषा अखंडपणे कशी प्रवाहित होती हे स्पष्ट करण्यासाठी हे संशोधन निश्चितच महत्त्वाचे ठरेल.

हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी अनेक व्यक्ती आणि संस्थाचे सहकार्य लाभले. **प्रा. महावीर कंडारकर** यांनी या प्रकल्पाचे संशोधन सहाय्यक म्हणून काम पाहिले. संशोधन सहाय्याबरोबरच मार्गदर्शन, हस्तलिखिताचे वाचन आणि डी.टी.पी. करण्याचे महत्त्वाचे काम अखंड दोन वर्षे सातत्याने केल्यामुळेच हा प्रकल्प वेळेत पूर्णत्वास जाऊ शकला. या प्रकल्पाचे मूळ प्रेरणास्थान **डॉ. राजन गवस** यांची मराठीतील दुर्लक्षित असलेल्या जैन साहित्याबद्दलची आस्था या संशोधनास कारणीभूत झाली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष **मा. बाबा भांड** यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना आणि मार्गदर्शनामुळे अभ्यासास दिशा मिळाली. साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव **डॉ. मीनाक्षी पाटील** यांचा प्रकल्पाविषयीचा सकारात्मक व आश्वासक दृष्टीकोन संशोधन व संपादनास प्रेरक ठरला. संशोधन संपादनाचे कार्य चालू असताना **डॉ. रामेश्वर रोकडे** यांचे सहकार्य मोलाचे राहीले. संशोधनाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाने नियुक्त केलेले तज्ञ परिक्षक **प्रा.डॉ. महावीर शास्त्री, सोलापूर** यांनी संपूर्ण प्रकल्प बारकाईने तपासून वेळोवेळी केलेल्या सूचना व दुरूस्त्यांमुळे हे संशोधन-संपादन अधिक दर्जेदार झाले. प्रत्यक्ष दुर्मिळ हस्तलिखितांचा महाराष्ट्रभर धांडोळा घेताना मला सहाय्य करणारे व तांत्रिक सहकार्य करणारे माझे मित्र **सचिन पाटील, राहुल मगदूम, विनोद पाटील, दिपक पाटील व माझी पत्नी प्रा. सौ. सुजाता पाटील** यांनी मोलाची साथ दिली. त्यामुळे हस्तलिखितांचे फोटो, झेरॉक्स, सूची करण्याचे काम सहज शक्य झाले. जैन साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक **डॉ. विद्याधर जोहरापूरकर,** नागपूर आणि भंडारकर इन्स्टिट्यूट, पुणे येथील **डॉ. कमलकुमार जैन** यांच्याबरोबर झालेल्या चर्चा संशोधनास पूरक ठरल्या. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी याचे महत्व जाणून त्याकरिता निवेदन लिहून प्रकल्प अग्रेषित केला. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करीत आहे.

मध्ययुगीन काळातील दुर्मिळ जैन साहित्यातील मराठी हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी अनेक संस्थानी आणि व्यक्तींनी मोलाचे सहकार्य केले. कारंजा लाड, जि.वाशिम येथील महावीर ब्रह्मचर्याश्रम मंदिरातील हस्तलिखिते **श्री. भारत भोरे** यांनी उपलब्ध करुन दिली. तसेच कारंजा येथील सेनगण मंदिराचे ट्रस्टी व बालात्कारगण मंदिराचे ट्रस्टी यांनी हस्तलिखिते पाहण्यास दिली. श्री काष्ठासंघ आदिनाथ मंदिर-अंजनगाव सुर्जी, सैतवाल मंदिर-अंजनगाव सुर्जी, परतवाडा जैन मंदिर, मुक्तगिरी मंदिर ट्रस्ट, आदिनाथ मंदिर-भातुकली, जि. अमरावती, रामटेक मंदिर हस्तलिखित संग्रह-नागपूर येथील बघेरवाल मोठे मंदिर येथील हस्तलिखित संग्रह, सैतवाल मंदिर हस्तलिखित संग्रह, महावीर मंदिर, जिंतूर, जि. परभणी, भांडारकर इन्स्टिटट्यूट, पुणे येथील हस्तलिखित संग्रह, प्रा. डॉ. विद्याधर जोहरापूरकर संग्रह, जीवराज ग्रंथमाला-सोलापूर येथील हस्तलिखित संग्रह, आदिनाथ मंदिर-सोलापूर हस्तलिखित संग्रह, हिंगोली येथील **श्री. शशिकांत दोडल** यांचे घरी असलेले हस्तलिखित संग्रह, औरंगाबाद-पैठण येथील चिमणापंडितांचे हस्तलिखित संग्रह या सर्व विदर्भ आणि मराठवाड्यातील मंदिर व संस्थांनी हस्तलिखिते दाखविण्याचे व फोटोकॉपी घेण्यास सहकार्य केले. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील **स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन महाराज** यांनी लक्ष्मीसेन मठातील हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. तसेच नांदणी येथील जिनसेन मठातील हस्तलिखिते **प्रा. आप्पासाहेब भगाटे** यांनी उपलब्ध करुन दिली. बाहुबली येथील अनेकान्त शोधपीठामधील हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी **डॉ. नेमिनाथ शास्त्री** यांनी महत्वाचे सहकार्य केले. भोसे-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी, बेडग जैन मंदिर-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. कर्नाटकातील शांतिगिरी कुप्पानवाडी कोथळी व राजस्थान मधील अपभ्रंश ॲकडमी, जयपूर तसेच गणिवर्य श्री वैराग्यरति विजयजी महाराज, श्रुतभवन संशोधन केंद्र, पुणे यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली या सर्व संस्थांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार व ऋण व्यक्त करतो. श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी व महावीर महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी यांचेही ऋण व्यक्त करतो.

ग्रंथास अंतिम प्रारुप देण्यासाठी जैनबोधक प्रकाशन संस्थेद्वारे **श्री. सुरेश लामकाने** तसेच उत्तम मुद्रणासाठी महाराष्ट्र शासनाचे **फोटो झिंको प्रेस-पुणे** च्या सर्व सदस्यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

**- प्रा.डॉ. गोमटेश्वर पाटील**

प्रोफेसर, मराठी विभाग-महावीर कॉलेज, कोल्हापूर.

महाकवी गुणकीर्ती विरचित

# रामायण

## संपादकीय प्रस्तावना

### रचनाकार गुणकीर्ती

मराठी जैन साहित्यातील एक उद्‌भट व विद्वान कवी म्हणून गुणकीर्तीचा उल्लेख करावा लागेल. पंधराव्या शतकात होऊन गेलेल्या या कवीच्या नावावर अनेक रचना सापडतात. 'धर्मामृत', 'पद्मपुराण' (रामायण), 'रुक्मिणीहरण', 'रामचंद्र फाग', 'गवळणी, रास', 'नेमिनाथ विवाह', 'नेमिनाथ पाळणा', 'नेमिनाथ दीक्षा', 'धंदागीत' याखेरीज 'रत्नकरंड श्रावकाचार' या संस्कृत आचारग्रंथावरील मराठी टीका (ही टीका गुणकीर्तीच्या नावावर असल्याचा उल्लेखही अभ्यासकांनी केला आहे.) इसवी सनाच्या तेराव्या शतकानंतर सोळाव्या शतकापर्यंत मराठी जैन साहित्याचे अंधारयुग आहे असे म्हटले जाते, पण नेमक्या याच कालामध्ये या कवीच्या अत्यंत महत्त्वाच्या विपुल रचना पाहावयास मिळतात. इतकेच नव्हे, तर महानुभावी गद्य परंपरेनंतर पुढे फादर स्टीफन यांच्या ख्रिस्त पुराणाच्या प्रस्तावनेपर्यंत मराठीत गद्यरचना नसल्याचेही मराठी वाङ्मयेतिहासकार सांगतात. पण नेमक्या याच कालात गुणकीर्ती यांचा अत्यंत महत्त्वपूर्ण असा धर्मामृत हा गद्यग्रंथ पाहावयास मिळतो. गुणकीर्तीचा हा पहिला व महत्त्वाचा ग्रंथ आहे. गृहस्थांच्या काही धर्माचरणाविषयी कथन करणारा हा ग्रंथ आहे. संस्कृतमध्ये स्वामी समंतभद्र यांनी श्रावकांच्या आचाराविषयी रत्नकरंड श्रावकाचार हा ग्रंथ लिहिला आहे. त्याच्या आधारे धर्मामृत या ग्रंथाची रचना झाली आहे. धर्माचे स्वरूप काय? गुरुस्वरूप कसे परमेश्वर कोण व कसा? देवता कोण? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे गुरु-शिष्य संवादरूपाने या ग्रंथात ग्रथित केली आहेत. या ग्रंथाचे नाव 'धर्मतत्त्वसार' असेही असले पाहिजे. या ग्रंथात जैन तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. जैन तत्त्वज्ञान आणि आचारज्ञान यांची प्रश्नोत्तर स्वरूपात मांडणी केली गेली आहे. ग्रंथात श्रावकाच्या त्रेपन क्रिया, बारा व्रते, अकरा प्रतिमा, चार तपे, सहा कर्मे, ध्यानविचार आणि भूगोल यांची माहिती मिळते. जैन तत्त्वज्ञान-आचारासोबतच वैश्विक परंपरेतील अनेक संदर्भ यात पाहावयास मिळतात. 'धर्मामृत' या नावाने अनेक ग्रंथ जैन साहित्यात लिहिले गेले आहेत. नयसेन यांचा कानडी

ग्रंथ बाराव्या शतकात गद्य-पद्यरूपाने लिहिला गेला आहे. तेराव्या शतकात आशाधर पंडितांनी संस्कृतात एक धर्मामृत ग्रंथ लिहिला असून मराठीतही भानुकीर्ती यांचे शिष्य दयासागर यांनी 'धर्मामृतकथा' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. यामध्ये सम्यग्दर्शनाच्या आठ अंगांमध्ये प्रसिद्ध झालेल्या व्यक्तींच्या कथा आल्या आहेत.

गुणकीर्ती यांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'पद्मपुराण' किंवा 'रामायण'. हा विस्तृत आणि दीर्घ ग्रंथ त्रेचाळीस अध्यायांमध्ये (प्रस्तुत प्रतीत ४४ अध्याय) व्याप्त आहे. या ग्रंथातील ओवीसंख्या १५-१६ हजार असून २६ अध्याय गुणकीर्ती यांनी रचलेले आहेत. पुढे हा ग्रंथ खंडित झाला म्हणून मध्येच एक अध्याय रत्नकीर्ती या कवीने लिहिला असून पुढील आठ अध्याय ब्रह्मचिंतामणी या कवीने, तर पुढचे आठ अध्याय ब्रह्मपुण्यसागर या कवीने पूर्ण केले आहेत. असा हा बृहद् ग्रंथ कुणा एका कवीच्या हातून पूर्ण झाला नसून गुणकीर्तीने लिहिलेल्या याच रामायणाचे पूर्व रामायण आणि उत्तर रामायण असे दोन भाग झाले आहेत. मूळचा हा ग्रंथ सकलकीर्ती व भुवनकीर्ती यांचे शिष्य ब्रह्मजिनदास यांच्या गुजराथी 'रामायणरास' या ग्रंथावरून हा मराठी ग्रंथ लिहिला असल्याचे कवी नमूद करतो.

पद्मपुराणाचा कर्ता गुणकीर्ती यांची गुरुपरंपरा, स्थलकालनिश्चिती यांविषयी पुढे माहिती देण्यात आली आहे. या ग्रंथाची कथावस्तू व ही जैन रामकथा कशी होती याविषयी सविस्तर चर्चा पुढे करण्यात आली आहे. ग्रंथातील अध्याय लहान-मोठे असून पूर्वरामायणात युद्धकथेपर्यंतची वर्णने आली असून ती गुणकीर्ती यांनी लिहिली आहेत. राम-लक्ष्मण, सीतेचा वनविहार, या विहारात येणाऱ्या उपकथा गुणकीर्तींनी अत्यंत सुंदर रीतीने महाकाव्याचा बाज न बदलता लिहिल्या आहेत. वनोपवनांची वर्णने, व्यक्तिस्थलांची वर्णनेसुद्धा गुणकीर्तीने सुंदरपरीने केली आहेत. परंतु नंतर ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागर यांनी ही कथा केवळ निरूपणरीतीने उरकली आहे. उत्तररामायणातील प्रसंगांमध्ये रामायणातील अनेक पात्रांच्या कथांचा विस्तार केला असल्याने हा ग्रंथ पुढे पाल्हाळिक बनला आहे.

या गुणकीर्तींच्या नावावर 'अनुप्रेक्षा' हा एक ग्रंथ पाहावयास मिळतो. द्वादश अनुप्रेक्षा किंवा 'पद्मपुराणातील अनुप्रेक्षा' या नावाने हा ग्रंथ असून वैराग्य निर्माण होऊन ते दृढ होण्यासाठी ज्या बारा भावनांचे चिंतन साधूंनी किंवा गृहस्थांनी करावयाचे असते त्या या अनुप्रेक्षा होत. प्राकृतमध्ये कुमारस्वामी यांनी कार्तिकेयानुप्रेक्षा या नावाने तसेच कुंदकुंद

आचार्यांनी 'बारा अनुप्रेक्षा' (बारस अणुवेक्खा) ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांच्या आधारानेच गुणकीर्तीने हा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे. या बारा अनुप्रेक्षांच्या चिंतनाने वैराग्यभावना दृढ होते. अशा या बारा भावनांना जैन धर्मात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय जैन साहित्यपरंपरेत या बारा भावनांचे चिंतन, विश्लेषण व टीका अनेक जैन विद्वानांनी व मुनींनी आपल्या प्रवचनांतून केल्या आहेत. हा केवळ ३४५ ओवीसंख्या असलेला एक लघुग्रंथ आहे. डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी या ग्रंथाचा रचनाकाल शके १५१४ म्हणजे इसवी सन १५९२ असा असावा असे मत व्यक्त केले आहे. भगवान वृषभदेवांना वैराग्य प्राप्त व्हावे म्हणून इंद्राने एक युक्ती केली. नीलांजना नावाची एक अप्सरा वृषभदेवांच्या राजसभेत नर्तकी म्हणून पाठविली. तिचे आयुष्य अत्यंत अल्प उरले होते, त्यामुळे नृत्य करता करताच तिचा मृत्यू झाला. इंद्राने कुणालाही न कळता तिच्या स्थानी एका अन्य अप्सरेची योजना केली. वृषभदेवांना मात्र हा बदल कळून आला व परिणामतः त्यांना वैराग्य प्राप्त झाले. अशी ही महापुराणातील घटनेची पार्श्वभूमी घेऊन हे काव्य लिहिले आहे. अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुची, आस्रव, संवर, निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ व धर्म अशा एकेका अनुप्रेक्षेस अनुलक्षून गुणकीर्तीने वैराग्यभावना आळविली आहे. ही रचना फारच विचारपरिप्लुत, प्रासादिक व रसाळ आहे. या रचनेची भाषा साधी पण मधुर व हृदयस्पर्शी परिणामकारक आहे.

'रुक्मिणीहरण' ही गुणकीर्तीची आणखी एक रचना. रुक्मिणीविवाह हा या काव्याचा विषय. मुळातच रुक्मिणीहरणाचा अत्यंत नाटकीय, रोचक, रसाळ आणि हृदयस्पर्शी आहे. त्यामुळे संस्कृत-प्राकृतच नव्हे, तर जैन-अजैन-महानुभावी कवींनीही या प्रसंगास केंद्रीभूत करून अनेक रसाळ रचना केल्या आहेत. मराठी साहित्यात सुमारे तीसहून अधिक रुक्मिणी स्वयवराच्या कथारचना केल्या आहेत. एकनाथपूर्व काळात लिहिले गेलेले गुणकीर्तीचे हे काव्य आहे. इसवी सन १६५५ च्या हस्तलिखित प्रतीमध्ये उपलब्ध झालेले हे काव्य गवळणी भासाच्या खाटांचे चौसष्ट कडव्यांचे आहे. प्रत्येक कडव्यानंतर आठ चरणांचा एक चढावा काव्यामध्ये आला आहे. रुक्मिणीविवाह, रुक्मिणी-सत्यभामा यांचा विवाद, प्रद्युम्न व सत्यभामा यांच्यातील संघर्ष हा भाग या काव्यात आला आहे. काव्याच्या आरंभीच कवीने आपला उल्लेख गुणकीर्ती जायस्वाल असा केला आहे -

जैसवाल कुलपति। मुनि उपजले गुणकीर्ती।।
केली हे ओवी माये।।

गुणकीर्ती गुजराती भाषेचा जाणकार असल्याने प्रस्तुत काव्याच्या भाषेवर गुजराती भाषेची छाप स्पष्टपणे जाणवते.

'रामचंद्र फाग' ही एक लघु रचना गुणकीर्तीच्या नावावर उपलब्ध होते. परंतु हे गुजराती काव्य असून फाल्गुन महिन्यात वसंतोत्सवाच्या निमित्ताने सामूहिक रूपाने नृत्यगीत करण्याच्या दृष्टीने गुजरातीमध्ये अशा प्रकारच्या फाग रचनांची निर्मिती होत असल्याचे दिसते. फाग म्हणजे मधुऋतूत्सव. वसंत ऋतूमध्ये असे फाग आजही गुजरातेत होत असतात. हे केवळ ९१ कडव्यांचे हे अत्यंत रसाळ काव्य आहे. स्त्रियांनी गावयाचे हे काव्य असून या काव्यात गुजरी, तेलंगणी, कानडी स्त्रियांची वर्णने केली गेली आहेत.

नेमिनाथ विषयक काव्ये हा जैन कवींच्या व गुणकीर्तीतच्याही आवडीचा विषय. 'नेमिनाथ पाळणा', 'नेमिनाथ विवाह', 'नेमिनाथ जिनदीक्षा' अशी तीन लघुकाव्ये गुणकीर्तीच्या नावावर आढळतात. नेमिनाथ पाळणामध्ये गुणकीर्तीने नेमिनाथ भगवंतांच्या जन्मोत्सवाचे रसाळ वर्णन केले आहे. प्राचीन मराठी संत साहित्यात पाळणा, टिपरी, फुगडी व बाललीलांचे वर्णन करणारी काव्ये आलेली आहेत. स्वतः एकनाथांनी पाळणा हा काव्यप्रकार हाताळला आहे. शिवादेवी आणि समुद्रविजय यांच्या उदरी नेमिनाथांचा जन्म झाला. स्वर्गातील देवी-देवतांनी तन्निमित्त जन्मोत्सव साजरा केला. या जन्मोत्सवाचे वर्णन प्रस्तुत काव्यात झाले आहे.

'नेमिनाथ विवाह' हे केवळ ४४ कडव्यांचे काव्य गुणकीर्तीनी लिहिले आहे. नेमिनाथांचा विवाह निश्चित झाल्यानंतर विवाहानिमित्त जूनागडकडे वरयात्रा निघाली असताना वाटेतच नेमिनांथांना वैराग्य उत्पन्न होण्याचा प्रसंग या काव्यात ग्रथित झाला आहे. नेमिनाथांच्या विवाहप्रसंगाचे वर्णन करणारी अनेक काव्ये मराठी जैन साहित्यात मिळतात. नेमिनाथ भवांतर, नेमिनाथ संवाद अशी काव्ये चिमणा पंडित, सटवा, मणीचंद्र यांनी व अन्य कवींनीही नेमिनाथ विवाहविषयक काव्ये लिहिली आहेत. आपल्या विवाहाच्या निमित्ताने अतिथींच्या आतिथ्यासाठी अनेक प्राण्यांची हत्या होणार हे पाहून नेमिनाथांच्या मनात करुणाजन्य वैराग्य उत्पन्न होते आणि अर्ध्या वाटेतूनच, विवाहमंडपात जाण्याऐवजी गिरनार पर्वताकडे तपश्चर्येसाठी निघून जातात. हा वृत्तांत राजमतीस कळताच ती अत्यंत व्याकूळ होते आणि नेमिनाथांच्या पाठोपाठ तीही तपश्चर्येसाठी निघून जाते.

'नेमिनाथ जिनदीक्षा' हेही याच प्रसंगावर आधारित काव्य आहे. विवाहमंडपात जाण्याऐवजी नेमिनाथ दिगंबरी दीक्षा ग्रहण करतात आणि तपश्चरण करतात. अशा ह्या तपश्चर्येचे वर्णन करणारे हे ६५ कडव्यांचे काव्य गुणकीर्ती यांनी रचले आहे.

'गौळणीभास' या प्रकारात आणखी काही काव्यरचना केल्याचे गुणकीर्तींनी नमूद करून ठेवले आहे. 'धंदागीत' नावाचे केवळ ६ कडव्यांचे एक छोटेखानी काव्य गुणकीर्तींनी रचले आहे -

धंदा कीजे परत्राचा। जिणे टाकी पैलु पारु।।
गुणकीर्ती मुनिवरु। म्हणे वो तुम्ही तारा संसारु।।
सुखाचे सोइरे अवघी वो जव्हा पुरवी आस।
एह वचन साच संसार धंदा।।५।।

असे कवी परोपरीने सांगत आहे.

'रत्नकरंड श्रावकाचार' ही गुणकीर्तींची आणखी एक महत्त्वपूर्ण रचना. ही रचना गुणकीर्तीची असल्याचे मत डॉ. विद्याधर जोहरापूरकर यांनी मांडले आहे, परंतु या ग्रंथाच्या लेखनाविषयी अभ्यासकांमध्ये एकमत नाही. रत्नकरंड श्रावकाचार हा श्रावकांच्या आचाराचे स्वरूप सांगणारा मूळ ग्रंथ इ. स. च्या दुसऱ्या शतकामध्ये उद्‌भट जैन आचार्य समंतभद्र यांनी संस्कृतात लिहिला. जैन धर्मीयांमध्ये हा ग्रंथ अत्यंत लोकप्रिय आहे. या ग्रंथाच्या आधारे त्यावरील टीकास्वरूपाने हा ग्रंथ मराठीत लिहिला गेला असावा. ग्रंथकर्त्याने ग्रंथात कुठेही आपला उल्लेख केला असल्याचे आढळत नाही, मात्र या ग्रंथाची भाषा गुणकीर्तींच्या अन्य ग्रंथाच्या भाषेशी समानता बाळगीत असल्याने हा ग्रंथ गुणकीर्तींचा असावा, असा तर्क अभ्यासकांनी मांडला आहे.

१५ व्या शतकातील महत्त्वाचा ग्रंथकार म्हणून गुणकीर्तींचा उल्लेख करायला हवा. एकनाथपूर्व कालातील मराठी साहित्यामध्ये या कवीची नोंद घेतली पाहिजे. असा हा लेखक आहे. रामायणासारखा विशाल ग्रंथ, धर्मामृतसारखा गद्य ग्रंथ, रुक्मिणीहरणासारखे आख्यानकाव्य, रामचंद्र फाग सारखे महोत्सव गीतकाव्य, पाळणागीत, भवांतर कथा, गौळणी भास अशी मराठी साहित्याला अपरिचित असलेली काव्ये व त्यांच्या रचना म्हणजे मराठी साहित्याची आभूषणेच मानली जायला हवीत. मराठी साहित्यातील खंडित गद्य परंपरेचा दुवा म्हणून गुणकीर्तींचा धर्मामृत ग्रंथ पाहिला गेला पाहिजे. मराठी-हिंदी, मराठी-उर्दू-फारसी यांचे नातेसंबंध मध्ययुगीन मराठीमध्ये आपणास वारंवार पाहायला मिळतात. तद्वतच मराठी-गुजराथी या साहित्यांना जोडणारा सेतू असलेला हा लेखक व त्याची परंपरा मराठी साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

## गुणकीर्तींच्या समकालीन मराठी साहित्य

## इ. स. १४५० ते १५५० या कालखंडातील जैन साहित्य

जैन साहित्याचे संशोधन आणि हस्तलिखितांचे संशोधन यांना मर्यादा असल्याने सध्या तरी दोनच संशोधकांनी मराठी जैन साहित्याचा अल्पसा खोदला आहे. त्यांमध्ये डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी एकूण ५४ जैन ग्रंथांचा परिचय करून दिला आहे, तर डॉ. जोहरापूरकर याच्यापुढे जाऊन ६४ ग्रंथरचनांचा परिचय करून दिला आहे. या दोन संशोधकांच्या संशोधनाच्या आधारे मराठी वाङ्मयाच्या इतिहासात जैन ग्रंथकारांच्या नोंदी घेतलेल्या आहेत. याशिवाय सन्मति मासिकाच्या -- १९५५ च्या लेखामध्ये जैन साहित्याच्या इतिहासाविषयी उल्लेख आलेला आहे. तसेच महाराष्ट्र साहित्यपत्रिका -- १९५६ च्या नियतकालिकामध्ये मध्ययुगीन काळातील २० जैन कवींचा उल्लेख आलेला आहे. या सर्व उपलब्ध संशोधनाच्या आधारे मध्ययुगीन मराठी जैन साहित्याच्या इतिहासातील पहिल्या टप्प्यात म्हणजेच इ. स. १४५० ते १५५० या काळातील पहिला कवी म्हणून गुणदास या कवीचा उल्लेख संशोधकांनी केला आहे. गुणदासाच्या नावावर पाच रचनांची नोंद आहे. यातील सर्वात महत्त्वाची रचना म्हणजे 'श्रेणिकचरित्र' ही होय. ३००० ओवीसंख्या असलेला हा ग्रंथ आहे. याखेरीज 'रामचंद्र हळदुली' ही ३० पद्यांची कविता, 'गाऱ्हाणे' ही ६ पद्यांची रचना, 'क्षमागीत' आणि 'विंचूगीत' या अनुक्रमे ६ व ५ पद्यांच्या रचना गुणदासाच्या नावावर संशोधकांनी नोंदल्या आहेत. गुणदासानंतर गुणकीर्ती या कवीची विपुल रचना जैन साहित्यात आढळते. जैन साहित्याचे साक्षेपी संशोधक डॉ. जोहरापूरकरांच्या मते गुणदास हेच कवी मुनिदीक्षा घेतल्यानंतर गुणकीर्ती या नावाने लेखन करतात. इ. स. १४७० च्या दरम्यान या कवीची 'पद्मपुराण' ही बृहद् रचना उपलब्ध होते. १५००० ओव्यांची ही जैन रामायणाची रचना तीन कवींनी पूर्ण केली आहे. यांपैकी पहिले २८ अध्याय गुणकीर्ती यांनी, त्यानंतर दोनशे वर्षांनी ब्रह्मचिंतामणी कवीने ७ अध्याय व नंतर पुण्यसागर या कवीने आठ अध्याय जोडून हा ग्रंथ पुरा केल्याचे सांगितले जाते. या पद्मपुराणाचे पूर्व रामायण व उत्तर रामायण असे दोन भाग एकत्रित रीत्या लिहिले गेले आहेत. मराठी गद्याच्या रचनेतही गुणकीर्तींचे योगदान महत्त्वाचे आहे. धर्मामृत नावाचा एक महत्त्वाचा ग्रंथ गुणकीर्तींच्या नावावर उपलब्ध आहे आणि तो गद्यात आहे. जैन तत्त्वज्ञानाची आणि आचारधर्माची माहिती सांगणारा हा महत्त्वाचा गद्यग्रंथ आहे. याशिवाय गुणकीर्ती याच्या नावावर नेमिनाथ पाळणा, नेमिनाथ विवाह, नेमिनाथ जिनदीक्षा,

रुक्मिणीहरण, रामचंद्र फाग, धंदागीत अशा रचनाही आढळतात. गुणकीर्तीच्या नावावर काही गुजराथी रचनाही आढळतात.

यानंतर जिनदास या पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धातील कवीच्या नावावर 'हरिवंशपुराण' ही एकमेव ११००० ओव्यांची बृहद् रचना उपलब्ध आहे. ५५ अध्यायांतील या विशाल ग्रंथामध्ये श्रीकृष्ण, बलराम आणि नेमिनाथ यांच्या संबंधी महाभारताची कथा आहे. अत्यंत विद्वत्तापूर्ण व काव्यगुणांनी नटलेला हा ग्रंथ १५ व्या शतकातील मराठी साहित्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

मेघराज हा १६ व्या शतकातील प्रारंभीचा कवी. 'जसोधररास' ही प्राचीन काळापासून जैन कवींना आवडणारी कथा मेघराजाने मराठीत आणली आहे. ही कथा अनेक जैन कवींनी लिहिली आहे. 'पार्श्वनाथ भवांतर', 'कृष्णगीत', 'गोम्मटस्वामी गीत' इत्यादी रचनाही मेघराजाने रचल्या आहेत. 'शांतिनाथ चरित' आणि 'तीर्थवंदना' या दोन गुजराथी रचनाही मेघराजाने केल्या आहेत.

मेघराजानंतर या कवीच्या समकालीन काव्यरचना करणाऱ्या कामराज या कवीने 'सुदर्शनचरित' हे चरितकाव्य लिहिले असून 'चैतन्यफाग', 'धर्मफाग' या रचनाही केल्या आहेत. यानंतर पंडित सूरिजन या कवीने याच कवीच्या नावावर 'परमहंसकथा' ही एकमेव रचन या काळात आहे. या रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे हे एक आध्यात्मिक रूपक काव्य आहे. इ. स. १५४० च्या सुमारास नागो आया या कवीने पाच अध्यायांचे व २२२ ओव्यांचे 'यशोधर चरित' हे काव्य लिहिले आहे.

याच काळातील भट्टारक परंपरेशी संबंधित नसलेला कवी म्हणून कवींद्रसेवकाचे नाव घ्यावे लागेल. या कवीच्या स्थळाचा व गुरुपरंपरेचा उल्लेख मिळत नसल्याने हा कवी भट्टारक परंपरेशी संबंधित नाही. या कवीने रचलेला 'सुमतिप्रकाश' हा २१ अध्यायांचा ग्रंथ तत्कालीन समाजरचनेवर प्रकाश टाकणारा आहे. समाजामध्ये व्याप्त अंधश्रद्धा, हिंसा व अनेक जोग्या-बैराग्याचा झालेला सुळसुळाट यांचे वर्णन या ग्रंथात मिळते. या ग्रंथामुळे तुकारामपूर्व मराठीतील अभंगरचनांची व बोलींची माहिती मिळण्यास मदत होते. याशिवाय या कवीचे ५४५ अभंगही तत्कालीन समाजदर्शनाचे व भाषेचे दस्तऐवज म्हणून पाहता येतील. इ. स. १५४८ मध्ये या कवीने सुमतिप्रकाश ही रचना पूर्ण केल्याचे म्हटले आहे. मराठी जैन साहित्याच्या पहिल्याच शतकात इतक्या विपुल आणि विविध रचना झालेल्या आढळतात. १३ व्या शतकात ज्याप्रमाणे मराठी साहित्यात मराठी ग्रंथनिर्मितीची लाट

उसळली त्याचप्रमाणे इ. स. १४५० ते १५५० हे मराठी जैन साहित्याचे पहिले शतक महत्त्वाचे आहे.

**जैन साहित्याचे पहिले शतक व मराठीची वाङ्मयधारा**

इ. स. च्या १३१८ ला यादव राजवटीचा पाडाव, इ. स. १३४७ च्या सुमारास बहामनी राज्याची स्थापना, याचबरोबर वारकरी संप्रदायाची नामदेव व चोखामेळ्यानंतर ओसरलेली स्थिती, नागदेवाच्या पश्चात् महानुभावियांची झालेली वाताहत या घटनांमुळे मराठी वाङ्मयात तमोयुग पसरल्याचे अनेक अभ्यासकांनी म्हटले आहे. भास्करभट्ट बोरीकर हे महानुभाव पंथाचे तिसरे आचार्य. यांच्या काळात नारोव्यासांनी लिहिलेला 'ऋद्धिपूरवर्णन' हा ग्रंथ (१३६३), 'स्थानपोथी' (१३५३) हे ग्रंथ महानुभावियांच्या ठिकाणांची माहिती देणारा ग्रंथ, याशिवाय पं. भीष्माचार्य यांच्या नावे असलेले काही व्याकरणग्रंथ अशी तुरळक ग्रंथरचना मराठीत या काळात झाल्याचे उल्लेख वाङ्मयेतिहासात येतात. नाथपंथीयांचा 'सिद्धान्तरहस्य', मुकुंदराज नावाच्या कवीचा 'योगविवेकमार्तंड' (१४२८) या ग्रंथांचा उल्लेखही ह. श्री. शेणोलीकरांनी केला आहे. १५ व्या शतकाच्या प्रारंभीच्या या ग्रंथांनंतर महाराष्ट्रात उदयास आलेल्या नागेश संप्रदायाचा रचनांचा उल्लेख येतो. वडवाळसिद्ध नागेशांचा शिष्य अज्ञान या कवीचा 'वरदनागेश' (१४३०) यासह अन्य काही रचना आढळतात. बहिरापिसा जातवेद याची 'गीतगीता', वैष्णवपंथी चोंभा कवीचे 'उखाहरण' नामा पाठकाचे 'अश्वमेघ', कान्हो त्रिमलदासाचे 'पाताळकांड रामायण', निर्मळ पाठककृत 'पंचोपाख्यान' या ग्रंथांच्या कालाचा उल्लेख नसला तरी १५ व्या शतकाच्या प्रारंभीचे हे ग्रंथ असल्याचे अभ्यासकांनी मानले आहेत.

धामधुमीचा आणि वाताहतीचा काळ आणि मराठी साहित्य अशी मराठी साहित्याची या काळातील स्थिती असताना पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी जैन कवींची रचना महत्त्वाची मानली पाहिजे. वर उल्लेख केलेला इ. स. १४५० ते १५५० हा मराठी जैन साहित्याचा सुवर्णकाळ म्हटला पाहिजे. प्रादेशिक दृष्ट्या विदर्भात लिहिणारे हे कवी मध्य महाराष्ट्र आणि दक्षिणपश्चिम महाराष्ट्रापासून दूर होते. मराठी साहित्याचा इतिहास मात्र या काळातील विदर्भातील साहित्याला वगळून लिहिलेला दिसतो. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ प्रांतात गुजराथी परंपरेतून वाढीस लागलेले मराठी जैन साहित्य प्रचंड ताकदीचे व विपुल प्रमाणात निर्माण होताना दिसते.

वारकरी संप्रदायातील कान्होपात्रेचे अभंग व भानुदासाच्या काही रचना वगळता

१५ व्या शतकात मराठीतील मध्यवर्ती वाङ्मयधारेत अन्य कोणत्याही रचना आढळत नाहीत. १५ व्या शतकात ऐन मुसलमानी राजवटीच्या काळात दत्त संप्रदायाने (श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंह सरस्वती) आपले कार्य पश्चिम महाराष्ट्रात व उत्तर कर्नाटकात सुरू केल्याचे दिसते, परंतु या संप्रदायाची साहित्यरचना 'गुरुचरित्राच्या' रूपाने (१५५८) १६ व्या शतकात सुरू झाल्याचे दिसते. त्यामुळे वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांनी याला तमोयुग म्हटले आहे, तो मराठी साहित्याच्या पोकळीचा काळ म्हटला गेला आहे. अशा काळात आपल्या प्रतिभेने हे शतक प्रकाशित करणाऱ्या जैन कवींची नोंद मराठी वाङ्मयाच्या इतिहासाने का न घ्यावी हे आश्चर्य आहे. पुढे दासोपंतांची रचना (१५५१) सुरू होईपर्यंत लाखभर ओव्यांची रचना व मराठी गद्याची रचना जैन कवींनी या काळात करून ठेवली आहे. महाराष्ट्राचा साद्यंत इतिहास लिहिणाऱ्या वि. का. राजवाडे यांनी एकनाथपूर्व महाराष्ट्राचे केलेले वर्णन मराठीच्या अभ्यासकांना ज्ञात आहेच. राजवाडे यांनी महाराष्ट्राच्या पडझडीचे, इस्लामी राजवटीच्या प्रभावाचे अत्यंत रोचक वर्णन करून एकनाथ हेच महाराष्ट्राचे पुनरुज्जीवन करतील अशी वर्णने केली आहेत. अशा साक्षेपी इतिहासकारांनेही हे मराठीतील साहित्य दुर्लक्षित करावे याचे आश्चर्य वाटते.

## जैन रामकथेची परंपरा

भारतामध्ये सुमारे ४००० वर्षांपासून रामकथा प्रचलित आहे. रामकथेचा प्रथम आविष्कार अक्षररूपाने वाल्मीकिविरचित रामायणामध्ये झाला आहे असे म्हटले आहे. अभ्यासकांनी रामकथेचे विविध पैलू उजेडात आणले आहेत. प्रादेशिक, वांशिक, धार्मिक परंपरा व मान्यतांनुसार रामकथेचे पैलू बदलताना दिसतात. केवळ भारतातच नव्हे तर आसपासच्या ब्रह्मदेश, चीन, जपान, इंडोनेशिया, लंका, जावा, सुमात्रा वगैरे देशात रामकथेचा प्रभाव दिसून येतो. जावा, सुमात्रा, मलेशिया, इंडोनेशिया मध्ये आजही रामकथेवर आधारित नृत्यनाट्ये होत असतात.

वैदिक परंपरेमध्ये' वाल्मीकिरामायण' हे सर्वात प्राचीन रामकाव्य आहे. पण वाल्मीकीने ज्या व्यवस्थित पद्धतीने सुमारे २३००० श्लोकांमध्ये (मूळ रामायणाच्या श्लोकसंख्येविषयी मतांतरे आहेत.) रामकथा मांडली आहे, तिची बीजे तत्कालीन समाजामध्ये प्रचलित लोककथांमध्ये असली पाहिजेत. वाल्मीकी रामायणापूर्वी आदिवासी समाजामध्ये प्रचलित रामकथा, दक्षिण भारतातील विभिन्न भाषांमध्ये व प्रदेशांमध्ये

रामकथा बीजरूपाने प्रचलित होत्याच. वाल्मीकीने त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला असला पाहिजे.

प्राचीन भारतामध्ये ही रामकथा वैदिक, जैन व बौद्ध या तीन धर्मसंप्रदायांमध्ये प्रचलित होती आणि लोकमानसावर त्यांचा पुरेसा प्रभावही होता. जैन व बौद्ध धर्मीयांनी या कथांचा उपयोग आपले धर्म व तत्त्वज्ञानाचा प्रसार-प्रचार करण्यासाठी केला आहे. असे करीत असताना त्यांनी साहित्यनिर्मितीच्या परंपराही निर्माण केल्या आहेत. इ. स. पूर्व ५०० ते ६०० या कालखंडात आर्य-अनार्य, वैदिक-अवैदिक यांच्या संघर्षातून महान उलथापालथी आणि क्रांत्या घडल्या आहेत. महावीर आणि बुद्ध या दोन क्रांतिकारकांनी वैदिक परंपरेविरुद्ध आपले तत्त्वज्ञान लोकाभिमुख बनविले. या तत्त्वज्ञानात्मक साहित्याबरोबरच निर्माण झालेल्या कथा वा ललित साहित्यामध्ये जैन व बौद्ध रामायणाची बीजे सापडतात. अर्थातच वैदिक महाकाव्यांतील त्रुटी, चमत्कार, हिंसाचार व अतिमानवी आचार यांचा विरोध करीत असताना बौद्ध व जैन रामायण-महाभारताच्या कथानकांच्या दिशा बदलल्याचे स्पष्टतया जाणवते. त्यामुळे प्राचीन रामायणाच्या तीन दिशा भारतीय साहित्यपरंपरेत अधोरेखित कराव्या लागतात. यांमध्ये वैदिक रामायण, जैन रामायण व बौद्ध रामकथा होत. वैदिक रामायणाची कथा तर सर्वांनाच ज्ञात आहे. या रामायणातील सात कांडे व त्यांतही बालकांड व उत्तरकांड यांमध्ये बरीच प्रक्षिप्त कथानके असण्याची शक्यता आहे. रामायणातील सुग्रीव, हनुमान, जटायू, शबरी, जांबुवंत इ. उपकथानके अशी वैदिक रामायणाची परंपरा दिसते. पुढे भवभूतीची उत्तररामचरित व महावीरचरित ही नाटके, भासाचे प्रतिमा नाटक, कालिदासाचे रघुवंश महाकाव्य, वैदिक पद्मपुराण आणि १८ पुराणांमध्ये येणारी उपकथानके अशी भारतीय परंपरेतील रामायणांची व्याप्ती दिसते.

## बौद्ध रामकथा

बौद्ध परंपरेत जातक कथांमध्ये बौद्ध रामकथेची बीजे दिसून येतात. विष्णूच्या दहा अवतारांमध्ये नववा अवतार म्हणून बुद्धाचा समावेश झाल्यानंतर राम आणि बुद्ध यांची नाळ बौद्ध रामकथेच्या द्वारे जोडण्याचा प्रयत्न झाला आहे. बौद्धांच्या त्रिपिटकांमध्ये बुद्धचरित्राचे आणि बौद्ध कथांचे संकलन झालेले दिसते. जातक कथांमध्ये 'दशरथ जातक' इसवी सनाच्या पहिल्या शतकामध्ये लिहिले गेले आहे. यातील रामकथा पुढे पाचव्या शतकातील जातकामध्येही आली आहे. पाली भाषेतील या जातक कथेत ही

रामकथा आढळते. 'अनामक जातकम्' या तिसऱ्या शतकातील जातक कथेत रामायणातील कोणत्याही पात्राचा उल्लेख न येता ही रामकथा येते. या कथेत रामाच्या सावत्र मातेच्या हट्टामुळे नव्हे, तर मामाने केलेल्या स्वारीमुळे राम राज्यत्याग करतो. बौद्ध परंपरा ही अहिंसक असल्याने यात वालीच्या हत्येचा उल्लेख नाही. पुढे पाचव्या शतकातील दशरथ कथानकम् मध्ये रामकथा आलेली आहे. 'दशरथ जातकाची' कथा 'अनामक जातकम्' आणि 'दशरथ कथानकम्' या तीनही कथांमध्ये रामकथा वेगवेगळ्या कथानकांतून आलेली आहे. बौद्ध कथेतील काही जातकांमध्ये रामकथा तर येते, पण तेथे रामायणातील पात्रांचा उल्लेख मात्र नाही. बौद्ध रामायण हा गुंतागुंतीचा विषय असल्याने तो एक स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरू शकेल.

## जैन रामायणे

जैन परंपरेमध्ये बौद्ध परंपरेपेक्षा अनेकपटीने विस्तृत असे रामकथेचे दालन आहे. जैन साहित्यातील प्रथमानुयोग परंपरेत त्रेसष्ट शलाकापुरुषांच्या कथा येतात. यांमध्ये २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ बलदेव, ९ वासुदेव अथवा नारायण आणि ९ प्रतिवासुदेव अथवा प्रतिनारायणांच्या कथा येतात. जैन कालगणनेनुसार निश्चयकाल अनंतानंत असून प्रत्येक दहा कोडाकोडी सागर वर्षांचा एक उत्सर्पिणी व अवसर्पिणी काल मानला गेला आहे. उत्सर्पिणी व अवसर्पिणी मिळून एक कल्प होते. प्रत्येक कल्पामध्ये ९ वासुदेव व ९ बलदेव समकालीन असतात. वासुदेव प्रतिवासुदेवांशी युद्ध करतात आणि अंती दीक्षा ग्रहण करतात.

जैन कथासाहित्यामध्ये जे ६३ शलाकापुरुषांची चरित्रे मिळतात, त्यांचा ग्रांथिक आधार 'महापुराण', 'पद्मपुराण' (रामायण) व 'हरिवंशपुराण' ही प्रमुख पुराणे आहेत. परंतु यांचेही मूल आधार 'समवायांग सूत्र' व 'प्रश्नव्याकरण सूत्र' हे आगम ग्रंथ आहेत. यातून कथाबीजे घेऊन विदग्ध आचार्यांनी उपर्युक्त पुराण ग्रंथांची रचना केली आहे.

जैन रामकथेचा विचार करीत असता ग्रंथबद्ध स्वरूपातील व्यापक रामकथा विमलसूरीकृत 'पउमचरियं' ही आहे. महाराष्ट्री प्राकृतातील या रामायणाचा रचनाकाल इसवी सनाचे ३ रे शतक असा आहे. अभ्यासकांच्या मतानुसार हे रामायण जैन परंपरेत पूर्वाचार्यांकडून मौखिक परंपरेने चालत आले असावे. जैन प्रथमानुयोगाच्या सर्वच कथांचे निरूपण महावीर तीर्थंकरांच्या समवसरणातून गणधरांकरवी कथन केल्या जातात.

समवसरणामध्ये राजा श्रेणिक भगवंतांकडे प्रश्नरूपाने जिज्ञासा व्यक्त करतो आणि त्याच्या उत्तरादाखल महावीरांच्या ॐकार ध्वनीच्या स्पष्टीकरण रूपाने गणधर त्या जिज्ञासापूर्तीदाखल कथा वा तत्त्वज्ञान निरूपण करतात. जैन रामायणाचा आरंभही अशाच प्रकारे होतो. वैदिक रामायणातील अनेक चमत्कारिक व अद्भुत गोष्टींनी संभ्रमित झालेला श्रेणिक राजा प्रश्न करतो. सीतेचा जन्म, हनुमानाचे अमानवी पशुरूप, रावणाची दहा मुखे, शंबूकाचा व वालीचा वध, सेतुबंध अशा अविश्वसनीय प्रश्नांनी संभ्रमित झालेल्या श्रेणिकाला गौतम गणधर रामायणाचे वास्तव कथन करू लागतात. पउमचरियं ची कथाही अशाच पद्धतीने सुरू होते. पउमचरियं हा ग्रंथ सहा विभागांमध्ये विभागला गेला आहे. रावणचरित्र, राम-सीता जन्म व विवाह, वनपर्व, सीताहरण व सीताशोध, युद्ध व उत्तरचरित्र असे हे सहा विभाग आहेत. जैन रामायणात राक्षस वंश, वानरवंश, विद्याधर वंश यांच्या वंशावळींचे विस्तृत वर्णन प्रारंभीच केले गेले आहे. राम इक्ष्वाकु वंशीय -सूर्यवंशीय आहे. जैन रामायणातील रावण दहा मुखांचा, डोक्यावर शिंगे, विक्राळ दाढा असलेला प्रचलित कल्पनेतला राक्षस नसून राक्षसवंशीय शूरवीर, पराक्रमी, विद्यासंपन्न, जिनभक्त विद्याधर आहे. हनुमान वानरपशु नसून वानरवंशी विद्याधर आहे. हनुमानाची आई अंजना व पिता पवनंजय यांची कथा जैन रामायणातील एक सुंदर उपकथानक आहे. हनुमानासही अनेक सुंदर राण्या होत्या. तो सुंदर पुरुष -कामदेव होता. या खेरीज वनवासामध्ये लक्ष्मणास अनेक कन्यांची प्राप्ती अशा वैदिक -वाल्मीकिरामायणामध्ये नसलेल्या अनेक उपकथा जैन रामायणात आल्या आहेत.

जैन रामायणातील दुसरी रामकथा संस्कृत भाषेत आचार्य रविषेण विरचित 'पद्मपुराण' ही आहे. ही रामकथा विमलसूरींच्या पउमचरियंचे अनुगमन करीत लिहिली गेली आहे. या रामायणांचा आधार घेऊन पुढे अनेक जैन कवींनी निरनिराळ्या रामकथा लिहिल्या आहेत.

इसवी सनाच्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात स्वयंभूच्या 'पउमचरियची' रचना झाली. रविषेणांनी निःसंशयपणे आपल्या पद्मपुराणाच्या रचनेत पउमचरियं चे अनुगमन केले आहे. पउमचरियं मध्ये राम-रावण युद्धापर्यंतची कथा आलेली आहे. रविषेणांच्या पद्मपुराणाचा रचनाकाल इ. स. ६६० असा सांगितला गेला आहे.

महापुराणांतर्गत उत्तरपुराणाची रचना गुणभद्र आचार्यांनी ९ व्या शतकात केली आहे. यामध्ये रामकथा विस्तारपूर्वक आली आहे. गुणभद्रकृत उत्तरपुराणातील रामकथेचा

प्रभाव पुढे अनेक दिगंबर आचार्यांच्या रामायणावर पडलेला स्पष्ट परिलक्षित होतो, तरीही रविषेणकृत 'पद्मपुराण' जैन धर्मीयांच्या रुचीचा विषय बनलेला आहे. उत्तरपुराणातील रामकथेनुसार सीता जनककन्या नसून ती मंदोदरी व रावण यांची कन्या आहे. जैन रामायणांमध्ये वाल्मीकिरामायणाचा व विमलसूरीकृत पउमचरियंचा प्रचुर परिणाम असला तरी पुढे जैन रामायणांमध्ये वैविध्यपूर्ण कथानकांची रचना होत असलेली दिसते. वसुदेवहिंडी ही पिकारेस्क पद्धतीची कथा महाराष्ट्री प्राकृतामध्ये इसवी सनाच्या पाचव्या शतकात लिहिली गेली आहे. गुणाढ्याच्या बृहत्कथेचे हे रूपांतर असावे. पुढे सोमदेवाने याच कथेचे रूपांतर 'कथासरित्सागर' या नावाने केले आहे. या हिंडी कथेत रावणाच्या कथेच्या संदर्भात रामकथा सुरू झालेली आहे. मंदोदरीची कन्या म्हणून सीतेचा जन्म होतो. कुलनाशिनी म्हणून तिला एका पेटीत घालून जमिनीत पुरले जाते. पुढे ही पेटी जनकाला सापडते व जनक तिचे पालन-पोषण करतो. शेष कथा इतर रामायणांप्रमाणेच आहे. पाचव्या शतकात पारंपरिक रामकथेचा पर्याय म्हणून ही कलाटणी मिळाली आहे.

पुढे रइधूकृत 'पद्मपुराण' पाहावयास मिळते. वीर संवत् १५०० च्या सुमारास म्हणजे पाचव्या-सहाव्या शतकाच्या दरम्यान ही रचना पाहायला मिळते. संक्षिप्त रूपात असलेली ही कथा जैन रामायणाचा नमुना आहे. पुढे नवव्या-दहाव्या शतकात येणाऱ्या रामकथांमध्ये पुष्पदंतकृत 'महापुराण' व 'उत्तर पुराण'मध्ये यात रामायणाच्या कथा आलेल्या आहेत. या कथेनुसार सीता रावण नावाच्या विद्याधराची कन्या आहे. ती जन्मतः कुलक्षणी असल्याने तिला एका पेटीत घालून जमिनीत पुरले जाते. सीताजन्माची ही कथा अशा रीतीने वेगवेगळ्या रूपांमध्ये पाहावयास मिळते. प्रचलित वाल्मीकिकृत रामायणातील अद्‌भुत अतिमानवी घटनांमुळेच श्रेणिक संभ्रमित होऊन प्रश्न विचारतो व गौतम गणधर प्रवचन करतात. त्यानंतर हरिभद्रसूरी यांच्या 'उवएसपद' (उपदेशपद) या ग्रंथामध्ये रामकथा आली आहे. ही कथा पारंपरिक पद्धतीची असली तरी तिचा अंत म्हणजे उत्तररामायणात सीतेची सवत रावणाचे चित्र काढण्यास सांगून सीतेवर आळ घेते आणि सीतेला पुन्हा वनवासात पाठविते असा आहे.

याशिवाय प्रवरसेनकृत 'सेतुबंध' मध्येही रामकथा आली आहे, तर हरिभद्रकृत 'धूर्ताख्यान' मध्ये रामायणाचे व रामकथेचे विडंबन आले आहे. यांपैकी धूर्ताख्यानाची रचना ८ व्या शतकातील असावी.

प्राकृत, अपभ्रंश व संस्कृतमधील रामायणांशिवाय कन्नड भाषेतील पंप रामायण हे

११ व्या शतकात लिहिले गेले आहे. हळेकन्नड भाषेतील रामायणाच्या आधारे पुढे अनेक भाषांतील कवींनी आपली रामायणे लिहिली असावीत. यांमध्ये कुमुदेंदु कृत रामायण (१६ वे शतक), देवध्यकृत 'रामविजयचरित्र' (१६ वे शतक), देवचंदकृत 'रामकथावतार' (१८ वे शतक), चंद्रसार वर्णीकृत 'जिनरामायण' (१९ वे शतक) अशा रामायणाच्या कथा पाहावयास मिळतात.

गुजराथी भाषेतील ब्रह्मगुणदास कृत 'रामायणरास' (१५ वे शतक) व त्यावरून मराठीत लिहिलेले गुणकीर्तीकृत रामायण (१५ वे शतक) या रामायणांवरही पूर्वसूरींच्या रामायणांचा प्रभाव दिसतो. विशेषतः आचार्य रविषेणकृत पद्मपुराणाचा प्रभाव या गुजराथी व मराठी रामायणांवर दिसतो. रविषेणांच्या रामायणाचे अध्याय व कथानक यात मिळतेजुळतेपणा दिसून येतो. मात्र रविषेणांच्या रामायणाच्या इतका विस्तार गुणकीर्तीच्या रामायणाचा नाही. रविषेण आचार्यांच्या रामायणातील १२३ पर्वांतील कथा गुणकीर्तीकृत मराठी रामायणात केवळ ४४ अध्यायांमध्ये उरकली गेली आहे. कदाचित् गुणकीर्तीनंतर ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागर यांनी हा ग्रंथ पूर्ण करण्याच्या हेतूने हे रामायण उरकले असावे.

## गुणकीर्तीकृत रामायणाचा सामान्य परिचय

मराठी जैन साहित्याच्या इतिहासामध्ये जैन साहित्याच्या प्रारंभकाळीच गुणकीर्तीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी जैन साहित्य समृद्ध करण्यामध्ये आचार्य परंपरा व भट्टारक परंपरा यांचे योगदान महत्त्वाचे आहे. गुणकीर्ती हे स्वतः नंतरच्या काळात आचार्य झाले असावेत. प्रारंभी ब्रह्मगुणदास अशा नावाने लेखन करणारा हा कवी आचार्य बनल्यानंतर गुणकीर्ती या नावाने लेखन करीत असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. अभ्यासकांच्या मतमतांतरानुसार ब्रह्मगुणदास व गुणकीर्ती हे दोघे एकच आहेत असे स्वीकारल्यास मराठी साहित्यातील श्रेणिकचरित्रासह इतर रचना यांची बेरीज बरीच मोठी होते आणि इतक्या सर्व रचना एकाच कवीने त्या काळात करणे शक्य आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे गुणकीर्ती हे ब्रह्मगुणदासापेक्षा वेगळे असावेत असे गृहीत धरून त्या कवीचा परिचय करून घेता येईल.

मराठी जैन साहित्यातील कालानुक्रमे हा दुसऱ्या क्रमांकाचा कवी आहे आणि या

कवीच्या रामायणासह त्याच्या इतर रचनांचा परिचय आपण आधीच करून घेतला आहे. हा कवी स्वतःस जैसवाल कुळातील असल्याचे नमूद करतो. गुजराथमध्ये या कुळाची परंपरा प्राचीन काळापासून दिसते. जैसवाल कुळातील लोक दिगंबर व श्वेतांबर संप्रदायामध्ये दिसून येतात. मात्र हा कवी आपल्या समस्त रचनांमध्ये दिगंबर साधूंचा उल्लेख करतो, त्यामुळे हा कवी दिगंबर परंपरेतील असावा असे अनुमान सहज करता येणे शक्य आहे. गुजराथमधून महाराष्ट्रात विस्तारित झालेली ईडर शाखेची भट्टारक परंपरा विकसित झाली आहे. या परंपरेचे भट्टारक भुवनकीर्ती हे गुणकीर्ती यांचे गुरू होते. या भुवनकीर्ती यांचे शिष्य ब्रह्मजिनदास यांनी गुजराथी भाषेत 'रामायणरास' नावाची रचना केली आहे. रामायणरास ग्रंथाच्या आधारे गुणकीर्तींनी मराठीत ही रचना केली असावी. गुणकीर्तींनी पहिल्याच अध्यायाच्या अंती पुष्पिकेत

इति श्री रामचंद्र चरित्र भट्टारक श्री भुवनकिर्ती देवानं।

तत्पटे आचार्येगुणकीर्ति विरचिते।।

असा आपल्या गुरूचा उल्लेख केला आहे. काही ठिकाणी 'भट्टारक भुवनकीर्तिविरचिते' असेही म्हटले आहे.तर या हस्तलिखित प्रतीत २६ वा अध्याय

इति श्री रामचरित्रे भट्टारक श्रीगुरु रत्नकीर्तिविरचिते अनंतवीर्य तपमूलो

वर्णनोनामा षष्टमीविंशतीमोध्याया संपूर्ण

असे म्हणून संपविला आहे. त्यामुळे कदाचित् हा अध्याय रत्नकीर्तीने लिहिला असावा, तर २७ व्या अध्यायापासून गुणकीर्ती यांनी पुन्हा रचना केल्याचे दिसते. २९ वा अध्याय म्हणजेच या रामायणाचा उत्तरार्ध भट्टारक महीचंद्र यांचा शिष्य ब्रह्मचिंतामणी यांनी लिहिला आहे.

## ब्रह्मचिंतामणी : व्यक्ती व काळ

१५ व्या शतकानंतर २०० वर्षांनी गुणकीर्तिविरचित रामायणाचा उत्तरार्ध रचला गेला आहे. महीचंद्रशिष्य ब्रह्मचिंतामणी यांनी या रामायणाचे काही भाग लिहिल्याचे निदर्शनास आले आहे. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात कारंजा येथील बलात्कारगणाच्या भट्टारकपीठाची शाखा लातूर येथे सुरू झाली. सैतवाळ शाखेचे पीठ म्हणून ती पुढे नावारूपास आली. या पीठावरील भट्टारक महीचंद्र आचार्य यांनीही मराठीत बरीचशी ग्रंथरचना केली आहे. त्यांमध्ये 'आदिपुराण', 'सम्यक्त्वकौमुदी', 'नंदीश्वरकथा',

'गरुडपंचमीकथा', 'नेमिनाथ भवांतर', 'नेमिनाथ गीत', 'शांतिनाथ स्तोत्र', 'महावीर पाळणा', 'चूडचिंतामणी आरती', 'अरिहंत आरती' आणि याखेरीज काही हिंदी रचनाही महीचंद्रांनी केल्या आहेत. महीचंद्राच्या नंतर त्यांनी आपल्या शिष्यपरंपरेसही लिहिते केले आहे. यांमध्ये महाकीर्ती, ब्रह्मचिंतामणी व रामकीर्ती या त्यांच्या तीन शिष्यांनी मराठीत विविध रचना केलेल्या आढळतात. या तीन शिष्यांपैकी ब्रह्मचिंतामणी यांनी गुणकीर्तिरचित रामायणाचा उत्तरार्धाचा भाग लिहिला असून या उत्तरार्धातील अध्याय क्रमांक २९ ते ३५ हे ७ अध्याय लिहिले आहेत. या उत्तरार्धाच्या पहिल्या (२९ व्या) अध्यायात कवी म्हणतो की -

रामायणकथा अपार। वक्ता श्रोतियाचे उद्धार।।
महिचंद्र दान दातार। स्वामी माझा।।१०५।।
तत्सीष्ये ब्रह्मचिंतामणी। सांगे महाराष्ट्र भासेची ठेवणी।।
वोवी साधावी सज्ञानी। तरी पुण्य होये।।१०६।।

असे सांगून रामायणाची ही कथा खंडित होती म्हणून आपण ही कथा पूर्ण केल्याचे म्हणतो-

ऐसी कथा रामायण। खंडित होती म्हणोन।।
म्हणे ब्रह्मचिंतामणी। केली गुरुअज्ञा।।१०५०।।

याप्रमाणे ब्रह्मचिंतामणी यानी ७ अध्याय लिहिले असून उरलेले अध्याय पुढे ब्रह्मपुण्यसागर यांनी लिहिले आहेत.

## ब्रह्मपुण्यसागर : व्यक्ती व काळ

३५ व्या अध्यायानंतर पुन्हा अपूर्ण राहिलेले हे राहिलेले हे रामायण पुढे ब्रह्मपुण्यसागर यांनी पूर्ण केल्याचे दिसते. पुढे ३६ व्या अध्यायात कवी म्हणतो की -

महाराष्ट्र ग्रंथ रामायण। खंडित होता जाण।।
गुरुआज्ञा झाली म्हणोन। वोवी केली।।
कवी म्हणे सज्ञान। मी तरी आहे अज्ञान।।
जे असती गुणज्ञान। वोवी शोधा।।५०।।

असे आम्हाला उपलब्ध झालेल्या हस्तलिखित प्रतीत उल्लेखिले आहे, पण डॉ.

अक्कोळे यांना उपलब्ध झालेल्या प्रतीत

कवी म्हणे पुण्यसागर। मी तर आहे अज्ञान।।
श्रोते असती सज्ञान। त्यांनी शोधावे।।५३।।

असे म्हटले असल्याने ३६ व्या अध्यायापासून पुढचे अध्याय ब्रह्मपुण्यसागराने लिहून हे काव्य पूर्ण केले असल्याच्या मतास दुजोरा मिळतो. पुढच्या ३७ व्या अध्यायात मात्र

मऱ्हाष्ट वोवी रामायणी। खंडित होती म्हणोनि।।
पुण्यसागरे केली ठेवणी। गुरु आज्ञे।।

अशी ही खंडित रामायण कथा पुण्यसागराने पूर्ण केली आहे. पुण्यसागराचा काळ सतराव्या शतकातील असून १६१० ते १६५० या कालावधीत ग्रंथ पूर्ण झाला असावा. पुण्यसागरांची गुरुपरंपरा प्रस्तुत हस्तलिखितात पूर्णतः मिळत नाही. हस्तलिखिताच्या प्रतिलिपिकर्त्यालाही ती उपलब्ध झाली नसावी. कारण शेवटी लिपिकर्त्याने फलश्रुती सांगितल्यानंतर

श्री मूळसंघ निर्मळ जयवंत। सरस्वती गच्छ गुणवंत।।
श्री देवेंद्रकीर्ती गुरु विख्यात। जिनशासनी।।

अशी अर्धीमुर्धीच गुरुपरंपरा सांगितली आहे. त्यामुळे ब्रह्मपुण्यसागराच्या गुरुपरंपरेविषयी प्रश्नचिह्न निर्माण होते, मात्र डॉ. अक्कोळे यांना उपलब्ध झालेल्या प्रतिलिपीत ब्रह्मपुण्यसागराने आपली गुरुपरंपरा याप्रमाणे सांगितली आहे -

श्री वृषभसेनादि जाण। पट्टावली प्रमाण।।
श्री भट्टारक भानुकीर्ति जाण। शिष्य दयाभूषण पै।।
तत्पटी भट्टारक विजयकीर्ती। भवतारक।।
तत्पटी भट्टारक भुवनकीर्ति। पै।।
त्या स्वामीच्या प्रसादे। ग्रंथ रामायण आनंदे।।
संपूर्ण केला प्रमोदे। रामचरित्र।।
रामचरित्र महापुराण। खंडित ग्रंथ होता म्हणोन।।
आनंदसागर गुरुला स्मरुन। प्रबंध केला।।
पुण्यसागर अज्ञान जती। रामचरित्र केले अल्पमति।।
महाराष्ट्र भाषा कथायुक्ती। कवित्व केले पै।।

या ओव्यांच्या आधारे ब्रह्मपुण्यसागर हा आनंदसागर यांचा शिष्य असावा असे दिसते. पुण्यसागराने एकूण ८ अध्याय पूर्ण केले असून ग्रंथाच्या शेवटी फलश्रुती कथन केली आहे.

अशा प्रकारे प्रस्तुत रामायण हा ग्रंथ सुमारे दोनशे वर्षांहून अधिक काळापर्यंत लिहिला जात होता. या रामकथेमध्ये व एकनाथांच्या रामकथेमध्ये (भावार्थरामायण) अपूर्णत्वाचे एक साम्य आढळून येते. एकनाथांचे रामायणही त्यांनी लिहिलेल्या पाच अध्यायांनंतर अपूर्ण राहिले आणि उरलेली दोन कांडे त्यांचा शिष्य गावबा याने पुढे पूर्ण केल्याचे सांगितले जाते. त्याचप्रमाणे हे जैन रामायणही गुणकीर्ती, ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागर अशा तीन विद्वाना  कवींनी नी मिळून पूर्ण केले आहे.

## पद्मपुराण अथवा रामायणाचे स्वरूप

संस्कृत वैदिक रामकथा, बौद्धांची रामकथा आणि जैनांची रामकथा यांच्या निर्मितीच्या हेतूंमध्ये निश्चितच फार मोठा फरक आहे. जैन रामायणातील राम, रावण, लक्ष्मण, सीता, हनुमान ही पात्रे जैन धर्मीय आहेत. राम भ. आदिनाथांच्या इक्ष्वाकु कुळातील असल्याने ते जैन धर्माचे पालन करणारे आहेत. त्याचप्रमाणे रावणही वैदिक मान्यतेनुसार क्रूरकर्मा नसून राक्षस वंशातील जैन धर्मानुयायी विद्याधर आहे. तो धर्मनिष्ठ, व्रतपालक, संयम, तप आचरणारा आणि जिनपूजक पापभीरू आहे. त्यामुळे जैन रामायणे रावणचरित्रापासून सुरू होतात. त्याखेरीज हनुमानादी राजेही पशुयोनीतील वानर नसून वानरवंशीय धर्माचरणी विद्याधर आहेत. त्यामुळे पारंपरिक वैदिक समस्यांच्या निराकरणाच्या श्रेणिकाच्या प्रश्नापासून जैन रामकथा सुरू होते. श्रेणिक गौतमस्वामींना विचारतो की, दशरथ प्राणिसंयमाचे पालन करणारा कनवाळू राजा आणि त्याचा पुत्र तद्भव मोक्षगामी असल्याने तो सुवर्णमृगाची हत्या करण्यास कसा काय प्रवृत्त झाला? लवण व अंकुश या रामपुत्रांतील लवणाचा लव कसा बनला? सुग्रीव व वाली हे परस्परांविषयी आत्यंतिक प्रेमभाव बाळगणारे असले तरी त्यांच्यामध्ये स्त्रीसाठी युद्ध कसे काय झाले? हनुमंत वानर कसा? समुद्र अपार खोल असला तरी त्यावर दगडांचा सेतू बांधून वानरसैन्य कसे काय लंकेस पोहोचले? असे अनेक तर्कदुष्ट श्रेणिकाच्या मनात उद्‌भवतात आणि गौतम गणधरांनी त्यांचे निरसन करावे अशी विनंती श्रेणिक गणधरांकडे करतो. त्यांचे निरसन करण्यासाठी गणधरांनी प्रस्तुत रामायण कथन केले आहे.

प्रारंभीच राक्षसवंशाच्या उत्पत्तीची कथा विस्तारपूर्वक सांगितली असून

तिच्यामध्ये रावणाचे चरित्र सांगितले आहे. रावण वस्तुतः अत्यंत धार्मिक व संयमी होता, पण तो अहंकार, क्रोध आणि मोहाच्या अधीन झाल्याने त्याच्यावर संकट ओढवले. रावण दहा तोंडे असलेला राक्षस नव्हता, तर जन्मतःच त्याच्या गळ्यात घातलेल्या नवरत्नहारातील रत्नामध्ये त्याच्या मुखाची प्रतिबिंबे पडली, त्यामुळे त्यास दशानन, दशमुख, दशवदन अशी नावे प्राप्त झाली. रावणाचे व त्याच्या कुलाच्या वर्णनात रावण व त्याची पत्नी मंदोदरी परमजिनभक्त व व्रतपालक श्रावक होते. या रामायणात आलेल्या वाली व सुग्रीव यांच्या कथेतही जैन धर्माच्या तत्त्वांना अनुकूल असेच कथानक गुंफण्यात आले आहे. वैदिक रामकथेमध्ये वाली व सुग्रीव यांच्यामध्ये स्त्रीच्या निमित्ताने शत्रुत्व आल्याचे चित्रित झाले आहे, परंतु जैन रामकथेतील वाली परम जिनभक्त व जिनदेवांखेरीज अन्य कुणासमोरही नतमस्तक होणारा नाही, त्यामुळेच तर त्याच्यामध्ये व रावणामध्ये वितुष्ट येते आणि रावण त्याच्याविरुद्ध युद्धच आरंभतो. पण युद्धात वालीचा जय होतो आणि त्याच क्षणी वालीच्या मनात वैराग्य उत्पन्न होऊन तो जिनदीक्षा ग्रहण करतो.

जैन रामकथेत रावणाचा मृत्यू जनकपुत्री सीतेच्या निमित्ताने दशरथपुत्र रामाकरवी होणार असल्याचे नैमित्तिकाने सांगितल्याने रावण दशरथास व जनकास मारण्यासाठी विभीषणास पाठवितो. पण प्रधानाच्या चातुर्यामुळे दशरथ व जनकांच्या पुतळ्यांचाच शिरच्छेद होतो. त्यामुळे विभीषण स्वतःस विजयी समजून लंकेस परततो. परंतु पुढे रावणास सीताहरण करण्याची दुर्बुद्धी होते आणि त्यामुळे परिणामतः राम-लक्ष्मणांशी युद्ध होऊन रावणाचा मृत्यू होतो.

जैन रामकथेत हनुमानाची कथा हे स्वतंत्र व सुंदर दालन आहे. हनुमानाची आई अंजना व पिता पवनंजय यांची कथा एक सुंदर प्रेमकथा आहे. जैन रामायणातील हनुमान तिर्यंच -पशुयोनीतील वानर नसून तो वानरवंशीय विद्याधर असून तो अत्यंत सुंदर, पराक्रमी व जिनभक्त आहे. हनुमानास अनंगकुसुमा, जितपद्मा व लंकासुंदरी अशा तीन व अन्य अनेक स्त्रिया असल्याचे निरूपण जैन रामायणात आहे. त्यांच्यापैकी जितपद्मा ही सुग्रीवाची कन्या असते. रावणाच्या दुष्ट नीतीमुळे हनुमान रामाच्या पक्षास मिळतो.

वाली व सुग्रीव यांच्या कथेत वाली जिनदीक्षा ग्रहण करतो. वाली तपश्चर्या करीत कैलास पर्वतावर ध्यानस्थ असताना वर आकाशात रावणाच्या विमानाची गती खुंटते. त्यामुळे क्रुद्ध होऊन रावण कैलास पर्वतासह वालीस उखडून टाकण्याचा प्रयत्न करतो. मात्र वाली आपल्या पायाच्या अंगठ्याने पर्वत दाबून ठेवतो, त्यामुळे रावणाचे हात पर्वताखाली

दबून जातात आणि वेदनेने विह्वळून रावण -रोदन करू लागतो, त्यामुळे त्यास रावण हे नाव प्राप्त होते. रावणाच्या स्त्रियांच्या विनंतीवरून वालीमुनी रावणास अभय देतात. वालीच्याच प्रसंगात सुग्रीव व त्याची पत्नी तारामती यांचीही उपकथा येते. साहसगती नावाचा विद्याधर तारामतीवर लुब्ध होऊन सुग्रीवाचे रूप घेऊन तारामतीस वश करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा वाली राम-लक्ष्मणांच्या साहाय्याने साहसगतीचा पराभव करतो.

जैन रामकथेमध्ये सीतेचा बंधू भामंडल याचीही उपकथा येते. जनक राजाच्या पोटी सीता व भामंडल यांचा युगल (जुळे)रूपाने जन्म होतो, पण पूर्व जन्मातील वैरी भामंडलाचे जन्मतःच अपहरण करून घेऊन जातो आणि दया उत्पन्न होऊन त्यास वनात सोडून देतो. एक निपुत्रिक विद्याधर राजा त्यास आपल्या सोबत घेऊन जातो आणि त्याचे पालनपोषण करतो. त्यास विद्याधरांच्या अनेक विद्याही प्रदान करतो. नारदाच्या खोडसाळपणामुळे भामंडल सीतेवर मोहित होतो, पण पुढे कालांतराने सीता आपली बहीण असल्याचे त्यास समजते आणि त्यामुळे तो पश्चात्तापदग्ध बनतो.

अशी अनेक उपकथानके जैन रामायणात आली आहेत. राम-लक्ष्मणांच्या वनवास प्रसंगात लक्ष्मणास अनेक कन्यांची प्राप्ती होते, या सर्व कथा रोचक आणि शृंगाररसपूर्ण आहे. लक्ष्मणाचे विवाह, कुलभूषण-देशभूषणकथा, शंबूकवध या व अन्य अनेक उपकथांनी हे रामायण अत्यंत रोचक बनले आहे.

जैन रामायण पारंपरिक वैदिक रामायणापेक्षा अनेक अर्थांनी वेगळे आहे. या कथेत आलेल्या प्रत्येक पात्राच्या भवांतराच्या कथाही या रामायणात आल्या आहेत. जैन रामायणातील प्रत्येक पात्र पूर्वभवात कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळे इतर पात्रांशी संबद्ध आहे. या ग्रंथातील पात्रे पूर्वभवातील सत्कृत्यांमुळे पुढील भवात सुख भोगतात तर दुष्कृत्यांमुळे त्यांना दुःखपरंपरा भोगावी लागते. कधीतरी सत्पात्राच्या सहवासात आल्याने त्याच्या वृत्तीत परिवर्तन होऊन ते सन्मार्गावर प्रवृत्त होतात आणि सद्गतीस पात्र ठरतात. अशा रीतीने अनेक दृष्टांतकथांच्या माध्यमातून पुण्य व पापकृत्यांची फले दाखवून रामायणकारांनी सत्प्रवृत्तीचा संदेश दिला आहे. तसेच जन्मांतरांच्या कथांच्या माध्यमातून पुनर्जन्माचा व कर्मफलाचा सिद्धांतही पुष्ट केला आहे. अशा रीतीने ही रामकथा जैन तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी, कर्मसिद्धांताचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अनेक लेखकांनी पुन्हा पुन्हा लिहिली आहे.

## रामायणाच्या हस्तलिखित प्रतीविषयी

गुणकीर्ती, ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागर या तीन लेखकांनी लिहिलेल्या रामायणाच्या हस्तलिखित प्रतींविषयी माहिती घेताना प्रत्यक्षतः दोन प्रतींचा व अप्रत्यक्ष रीतीने दोन प्रतींचा संदर्भ पाहावयास मिळाला. यांपैकी बाहुबली येथील सरस्वती ग्रंथ भांडारात एक प्रत सुस्थितीत पाहावयास मिळाली. दुसरी प्रत भोसे ता. मिरज, जि. सांगली येथील १००८ श्री पार्श्वनाथ ग्रंथ भांडार येथे मिळाली. या दोन्ही प्रती सुस्थितीत असून भोसे येथील प्रतीच्या बाडामध्ये पहिला ग्रंथ 'पुण्यास्रव पुराण' व याच प्रतीतील दुसऱ्या भागातील निम्मा भाग रामायणाचा आहे.

बाहुबली येथे सरस्वती मंदिर ग्रंथालय, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली असा शिक्का असून त्याची एकूण पृष्ठसंख्या १०४१ इतकी आहे. अंतिम दोन पृष्ठांवर प्रतिलिपिकाराने लेखनाच्या मेहनतान्याचा हिशेब लिहिला असून कागदाचे व लिहिण्याचे हिशेब लिहिले आहेत. या ग्रंथाचा समारोप कदाचित् अपूर्ण असावा असे वाटल्याने डॉ. अक्कोळे यांनी वापरलेल्या प्रतीच्या शेवटी ब्रह्मपुण्यसागराने सांगितलेली आपली गुरुपरंपरा अंकित झालेली नाही. ही प्रत लिपिकर्त्याने आपली माहिती लिहिण्याचे स्थान सांगून समाप्त केली आहे. लिपिकर्त्याने अमरपूर (अमरावती?)येथील मूलनायक आदिजिनेश्वरांच्या इंदापूर (इंद्रपुर -अमरावती किंवा कदाचित् वर्तमान इंदला हे गाव) नगरीमध्ये पूर्ण केल्याचे नोंदविले आहे.

भरत क्षेत्रामध्ये। जसे इंद्राचे अमरपुर।।
मूलनायक आदिजिनेश्वर। इंद्रपुर मध्ये।।१।।
हे ग्रंथ रामायण। हस्ताक्षर देवेंद्र जाण।।
नसेल कान्हा मात्र व्यंजन। ते शोधावे।।२।।
सके सत्रासे च वरर्पणौहारी। अंगीरस नाम संम्व(त्स)र शुक्रवारी।।
चैत्र शुद्ध येकादसी दोन प्रहरी। रामायण ग्रंथ समाप्त।।

या निर्देशानुसार अमरपुर म्हणजे अमरावती येथील इंद्रपुर आदिनाथ मंदिरात शके १७५० म्हणजे इ. स. १८२८ ला ही हस्तलिखित प्रत लिहिली गेली आहे. प्रतिलिपिकाराने या लेखनामध्ये अनेक ओव्या गाळल्या असून अनेक ठिकाणी ओव्यांचे क्रमांक गाळले आहेत. १०४१ पृष्ठांपैकी अनेक पृष्ठे गहाळ झाली असून पत्र क्र. १२१ ते १२९ व पत्र क्र.

१५७ गहाळ झाले असल्याने उपलब्ध नाही. काही ठिकाणी एखादे चरण किंवा एखादी ओळ सोडून दिली आहे. लिपिकर्त्याची अक्षरे सुरेख व सुवाच्य असून काही ठिकाणी अक्षरे लिहिण्याचा कंटाळा केल्याचे जाणवते. तसेच मूळ प्रतीतील शब्द नीट समजून न घेता लिहिले असल्याने त्यांचे संदर्भ वा अर्थ लावणे अवघड बनते. काही ठिकाणी अक्षरांच्या वर आडवी रेघ देऊन अक्षरे रद्द केली आहेतह्नत्यामुळे या प्रतीचे मुद्रण करताना बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या. परिणामतः रामायणाच्या उत्तरार्धातील काही पृष्ठांचे मुद्रण सदोष झाले आहे. देवेंद्र नावाचा हा लिपिकर्ता व त्याची अक्षरांची ठेवण पाहता तो व्यावसायिक लिपिकार असावा असे लक्षात येते.

अध्यायाच्या शेवटी पत्र अर्धेसोडले असून रिकाम्या जागी चौकोनी, वर्तुळाकार, पाने-फुले, वेलबुट्ट्या असे नक्षीकाम केले आहे. नवीन अध्याय नवीन पृष्ठावर आरंभ केला आहे.

रामायणाच्या दुसऱ्या भोसे येथील प्रतीत ६६५ इतकी पत्रे असून त्यांची एकूण पृष्ठसंख्या १३३० इतकी आहे. भोसे येथील प्रतही सुवाच्य असून या प्रतीचा कागद, शाई व अक्षरे बरीच आधुनिक असल्याचे जाणवते. या प्रतीतील शेवटचे पृष्ठ खराब झाले असल्याने लिपिकर्त्याची पुरेशी माहिती मिळू शकत नाही, पण ही प्रत शके १८१० म्हणजेच इ. स. १८८८ मध्ये अंकित झाली असल्याचा उल्लेख आहे. भोसे येथील प्रतीची रचना वरील पहिल्या प्रतीप्रमाणेच आहे. अध्याय संपल्यावर लिपिकर्त्याने नक्षीकाम केले आहे. या प्रतीतील ओवीसंख्याही विस्कळीत असल्याचे दिसते.

हस्तलिखिताची तिसरी प्रत डॉ. अक्कोळे यांनी संशोधन केलेली असून ती नागपूर येथील सेनगण मंदिरातील आहे. डॉ. जोहरापूरकर यानी गुणकीर्तीविरचित धर्मामृत ग्रंथाच्या संशोधनाबरोबरच शोधलेली ही प्रत असावी ही प्रत सर्व प्रतींमध्ये आधीची असावी. या प्रतीवरून ग्रंथलेखनाचा काल, ब्रह्मपुण्यसागराची गुरुपरंपरा व लिपिकर्त्याची माहिती मिळते.

चौथी प्रत डॉ. नयना धनपाल पाटील यांनी शोधलेली असून त्यांनी या प्रतीच्या आधारे आपला पीएच्. डी. चा प्रबंध सादर केला आहे. तिचे संपादन मात्र त्यांनी केले नाही. प्रस्तुत प्रत त्यांना सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मिळाल्याचे त्यांनी नमूद केले आहे, पण सध्या मात्र ही प्रत तिथे नाही. ही प्रत मूळ प्रत नसून ती नकललेली असल्याचेही नयना पाटील यांनी नमूद करून ठेवले आहे. या

प्रतीवरही प्रतिलिपिकर्त्याचे नाव, परिचय वा कालनिर्देश नसल्याचे त्यांनी नोंदवले आहे.

या ग्रंथाची मुद्रित प्रतही उपलब्ध असल्याचे नयना पाटील यांनी म्हटले आहे. इ. स. १९०२ मध्ये जयचंद श्रावणे यांनी 'प्राचीन मराठी पद्मपुराण' मुंबई येथे पूर्ण केले. त्यांनी पद्मपुराणाच्या तीन प्रती मिळवून त्यामध्ये योग्य वाटले ते ठेवून व असंबद्ध वा दुर्बोध वाटले ते सोडून तसेच हवे तेथे स्वतः ओव्या रचून मुद्रित प्रत तयार केल्याचे श्रावणे यांनी नमूद केले आहे. त्यामुळे ही मुद्रित प्रत बरीच प्रक्षिप्त असल्याने ती संशोधनासाठी योग्य व सत्य नसल्याचे नमूद करून नयना पाटील यांनी आपल्या संशोधनासाठी सांगली येथील हस्तलिखित प्रत वापरली आहे.

## हस्तलिखित प्रतीमधील भाषाविषयक नोंदी

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या प्रतीमध्ये बऱ्याच ठिकाणी लिंग-वचनप्रयोग चुकीचे केले गेले आहेत. प्रायः सर्वच ठिकाणी अघोष वर्णांऐवजी सघोष वर्णांचा प्रयोग केला आहे. सर्वच ठिकाणी ट ऐवजी ठ वापरला आहे. उदा - त्रिकूठ, भेठली, निकठ, सुभठ, भठारक, तत्पठे, लुठले, सुठला, भेठ इ. तसेच सुंदर, अफार, जाहला इ.

या प्रतीतील लेखनावर उर्दू-फारसीचा अल्पसा प्रभावही दिसून येतो. गुणकीर्ती, ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागराचा काळ ऐन इस्लामी राजवटीचा काळ असल्याने या लेखनावर उर्दू-फारसीचा प्रभाव काहीसा स्वाभाविक आहे, तरीही या ग्रंथाचा मूळ आधारग्रंथ संस्कृत असल्याने त्यामानाने अरबी फारसा फारसा नसला, तरी उर्दू-फारसीचा किरकोळ प्रभाव दिसतो. उदा. -जाब, जबाब, खबर, नवाजणे, सल्ला, दमामा, दिमाक, फर्ज, दरारा, फौज, अंदेश, नफेर, बजउर इ.

लिपिकर्त्याने ग्रंथात प्रायः सर्वत्र ऋ ऐवजी र चा उपयोग केला आहे. उदा. -घ्रत, क्रपा, उत्क्रुष्ट, प्रथ्वी, द्रष्टि, द्रुष्ट, क्रष्ण. या उलट काही ठिकाणी र ऐवजी ऋ चा उपयोग केला आहे. उदा. -पृकार, पृती, पृबळ, अशृपात, पृधान, वृत, वजृकर्ण इ.

अनेक स्थानी त्त ऐवजी त्क वापरला आहे. उदा. -फुत्तार, टणत्तार, तात्त्काळ इ.

प्राचीन मराठीतील उकारांत शब्दांची विपुलता या ग्रंथातही दिसून येते. उदा. -
शुन्ये बोलु बोले भामंडलु। जैसा चेष्टा करी पिशाळु। तो तैसा देखा।
वेगु, निघालु, भातु, तनु, कुवरु, मनोहरु, सुंदरु इ.

ए ऐवजी य चा वापर प्रायः सर्वत्र आढळून येतो. उदा. -यवढ्या, येह, येक, येकयेका, येके इ.

अनेक स्थानी मध्य ह चा लोप केलेला दिसतो. उदा. अरनाथ (अरहनाथ).

काही ठिकाणी ट ऐवजी ड चा उपयोग केला आहे. उदा. षडकाय (षटकाय), षडरस (षटरस), षडकर्णी (षटकर्णी).

* * *

## जैन रामायणाचा अध्यायानुसार कथासार

भट्टारक भुवनकीर्ती यांचे शिष्य गुणकीर्ती विरचित रामायणाचे ४४ अध्याय आहेत. हे रामायण गुणकीर्ती, ब्रह्मचिंतामणी व ब्रह्मपुण्यसागर या तीन कवींनी मिळून पूर्ण केले आहे. जैन रामायणाची रचना कथावस्तूच्या बाबतीत बरीचशी वाल्मीकीच्या वैदिक रामायणासारखीच असली तरी तिचा उद्देश व रचना पूर्णतः भिन्न आहे. जैन प्रथमानुयोगातील सर्वच कथासाहित्य जंबूद्वीपामधील भरत क्षेत्रात राजा श्रेणिकाच्या मगध देशातील राजगृह नगरीबाहेरील विपुलाचलावर जिथे भ. महावीरांचे समवसरण आलेले असते तिथे घडतात.

**प्रथम अध्यायामध्ये** ग्रंथाच्या प्रारंभी वीतराग, आदिनाथ, सरस्वती, पद्मावती यांना नमन करून त्यानंतर महावीर स्वामी व गौतम गणधरांना वंदून गुणकीर्तींनी पुढे कथा सांगण्यास आरंभ केला आहे. राजा श्रेणिक समस्त दरबारी मंडळीसह वैभवपूर्वक राजसभेत बसला असताना तिथे वनपाल प्रवेश करतो आणि विपुलाचलावर महावीर स्वामींचे आगमन झाल्याचे वर्तमान निवेदन करतो. तेव्हा राजा श्रेणिक समस्त परिवारासह त्यांना वंदन करण्यासाठी समवसरणात जातो. श्रावकाचार, मुनि आचार, जैन शास्त्र श्रवण केल्यानंतर श्रेणिक राजाचा अन्य मतावरचा विश्वास दूर होतो. पूर्वी श्रवण केलेल्या रामचरित्राविषयी त्याच्या मनात काही प्रश्न निर्माण होतात. दशरथ राजा भगवान आदिनाथांच्या इक्ष्वाकू वंशातील होता, श्रावक होता. राम तद्भव मोक्षगामी होता, मग तो मृग वधून हिंसा कशी काय करील? रामाच्या दोन पुत्रांपैकी लवणाचा लव कसा झाला? हनुमंत पशुयोनीतील वानर कसा? सुग्रीव व वाली स्त्रीसाठी कसे काय भांडले? रामाच्या सैन्याने समुद्र सेतू बांधून कसा काय पार केला? श्रेणिक आपल्या मनातील प्रश्न गौतम

गणधरांसमोर मांडतो. तेव्हा महावीर भगवंतांच्या वाणीस अनुसरून गौतम गणधर श्रेणिकास सांगू लागतात. आदीश्वरांपासून म्हणजेच आदिनाथ भगवंतांपासून हा सूर्यवंश विस्तारला असून त्यामध्ये अनेक तीर्थंकर व पुण्यात्मे होऊन गेले. त्यानंतर अनेक देवकुळे व राजकुळे या सूर्यवंशात झाली. त्यानंतर राक्षस कुळ कसे उत्पन्न झाले? वानरवंशाची निर्मिती कशी झाली? या सर्वांची परंपरा गणधरांनी श्रेणिकास कथन केली आहे. वस्तुतः राक्षस व वानर वंशातही काही पुण्यात्मे मुनी बनून स्वर्ग-मोक्षाची प्राप्ती करून घेते झाले. राक्षस कुळातील मेघवाहन राजा राक्षसद्वीपावर -लंकेवर आल्यावर त्याने तिथे राज्य केले. या मेघवाहनास भीम-महाभीम या राक्षसांनी नऊ रत्नांचा एक मौल्यवान हार दिला. हा मेघवाहन अर्थातच जैन मार्गी होता.

**द्वितीय अध्यायामध्ये** श्रेणिकाने राक्षस वंशाची तसेच वानर वंशाची उत्पत्ती सांगावी अशी गणधरांकडे विनंती केली. तिला अनुसरून या अध्यायात राक्षस वंशाच्या उत्पत्तीची व रावण जन्माची कथा सांगितली गेली आहे. दक्षिण देशात भीमपुर राज्यात इंद्रगती विद्याधराची कन्या चर्या व रत्नपुर नगरातील पुष्पोत्तर राजा पद्मोत्तर याने चर्येस मागणी घातली. तेव्हा चर्येचा भाऊ श्रीकंठ याने आपली बहीण लंकेचा राजा धवलकीर्ती यास दिली. तेव्हा पुष्पोत्तर राजाला क्रोध आला. एके दिवशी श्रीकंठ आयुधशाळेत गेला असताना तिथे पद्मावतीस पाहून उतावीळ बनला व विमानमार्गेलंकेस येऊन धवलकीर्तीस भेटला. तेथे त्याची बहीण चर्या त्यास भेटली. पुष्पोत्तर त्याचा पाठलाग करीत लंकेपर्यंत गेला. लंकेत धवलकीर्ती श्रीकंठाच्या पक्ष घेऊन पुष्पोत्तराशी युद्धास तयार झाला. तेव्हा पद्मावतीने आपल्या जावयाशी युद्ध करून मला विधवा बनवू नये अशी विनंती केली. तेव्हा आपल्या कन्येची विनंती मान्य करून पुष्पोत्तर स्वनगरास परतला. त्यानंतर श्रीकंठ व पद्मावती यांना एका द्वीपाचे राज्य दिले. या द्वीपावर असताना श्रीकंठाने नंदीश्वर द्वीपास जात असलेले देवविमान पाहिले व आपणही त्यामागे जाण्याचे ठरवून त्याप्रमाणे तो निघाला. नंदीश्वर द्वीपाच्या अलीकडे मानुषोत्तर पर्वताच्या पलीकडे मानव जाऊ शकत नाहीत हे लक्षात आल्यावर तो परतून तप-ध्यान करून विमानातून नंदीश्वर द्वीपाकडे निघाला. त्याचा पुत्र वज्रकंठ, वज्रकंठाचा इंद्रकंठ, मेरुकंठ, पवनगती, सूर्यप्रभ, देवप्रभ, कपिलध्वज अशा रीतीने वानरवंशीय राजे झाले. त्यांच्या ध्वजावर वानराचे चिह्न अंकित होते म्हणून त्यांना वानर म्हणून संबोधले जाऊ लागले. देवप्रभ हे मनुष्य विद्याधर असल्याने त्यांना वा नर असे म्हटले जाऊ लागले. वानर म्हणजे वानरवंशी जिनधर्मी विद्याधर. पुढे देवप्रभाला कपिध्वज नावाचा मुलगा झाला. याच वंशात पुढे किष्किंध व अंगद झाले.

त्याच वेळी राक्षसद्वीपावर सुकेश राजा व तेथे अशनिवेग नावाचा दुसरा एक राजा राज्य करीत होता. स्वयंवर मंडपामध्ये त्यांच्यात युद्ध होऊन कपी राक्षसद्वीपास -लंकेस पळून गेला. त्यानंतर किष्किंध मेरुगिरीस गेला. त्यानंतर दोघांचा वंशविस्तार सांगितला गेला आहे. पुढे किष्किंधाच्या पत्नीने -श्रीमालिनीने आपल्या पुत्रांना दक्षिणेकडे न जाण्याविषयी सूचना केल्या. कारण तिथे दक्षिण दिशेस आमच्या वैऱ्याने आमचे लंकेचे राज्य जिंकून घेतले आहे. तेव्हा किष्किंधपुत्र कोपायमान झाले व त्यांनी लंकानिवासी राक्षसांशी युद्ध करून ते द्वीप जिंकून घेतले. त्यानंतर रत्नपुर राजाची कथा सांगून इंद्रपुरीमध्ये त्याचे जे राज्य होते तेथे इंद्रसभा भरवून त्याने सर्व राजांना वश करून घेतले. यावेळी इंद्र राजाने लंकेतील सर्व राजांना वश केल्याने लंकेतील माली, सुमाली या राक्षस राजांना क्रोध येऊन त्यांनी इंद्राशी संग्राम केला. त्यात इंद्राचा विजय झाला. मालीचा भाऊ सुमाली पाताळलंकेत राज्य करीत होता. ही कथा येथेच ठेवून पुढे मालीचा पुत्र रत्नश्रवा याची कथा अर्धी ठेवून विनोदमंगला नगरीचा राजा व्योमबिंदू याच्या दोन कन्यांपैकी कैकसीला जक्षपुरीचे राज्य दिले. तिला प्रनंद झाला. या प्रनंदाला इंद्राने लंकेचा राजा बनविला. तेव्हा केकसी हिचा सुमालीचा मुलगा रत्नश्रवा याच्याशी विवाह झाला. रत्नश्रवाने एक नगर वसवून त्याचे नाव पुष्पनगर असे ठेवले. तिथे रत्नश्रवा व केकसी सुखपूर्वक राज्यभोग करू लागले. केकसी गर्भवती झाली आणि तिला सोळा स्वप्ने पडली. पुढे कालक्रमानुसार तिला रावण हा पुत्र झाला.

**तिसऱ्या अध्यायामध्ये** विराधितकुमर मुनींना प्रश्न विचारतात, इथपर्यंतची कथा आली आहे.

रावणाची वृद्धी व रावण दशानन का? याचा रामायणातील उल्लेख आला आहे. रावण मोठा होत असताना तो एके दिवशी भांडारगृहात जातो आणि तिथे ठेवलेला नवरत्नाचा हार आपल्या गळ्यात घालतो. त्या हारातील टपोऱ्या रत्नांमध्ये त्याच्या मुखाची प्रतिबिंबे पडतात, तेव्हापासून रावण दशानन म्हटला जाऊ लागला. रावणाला वस्तुतः दहा मस्तके नव्हती, तर त्याच्या गळ्यात असलेल्या नवरत्नांच्या हारांमध्ये त्याच्या एकाच मस्तकाची नऊ प्रतिबिंबे पडल्याने तो दशानन म्हटला गेला, हे वास्तव आहे. रावणानंतर कुंभकर्ण, चंद्रनखा व विभीषण यांचा जन्म झाला. त्यानंतर एके दिवशी रावणास आकाशातून जात असलेले एक विमान दिसते. ते मातेस हे कोणाचे विमान आहे? असे विचारतो. तेव्हा आपल्या बहिणीचा नवरा लोकपाल यास इंद्राने राज्य स्थापून दिल्याचे केकसी रावणास सांगते. त्यापूर्वी त्रिकूटाचलावर -लंकेवर आपलेच राज्य होते

असेही सांगते. हे ऐकून रावणास मोठा क्रोध येतो आणि आपल्या बंधूंसह भीमवनात जाऊन आपले राज्य परत मिळविण्यासाठी विद्यासाधना करू लागतो. त्यावेळी एक यक्षिणी त्यांना तुम्ही अजून बालके आहात असे सांगून परत जाण्यास सांगते. परंतु विद्या प्राप्त करण्यासाठी स्वीकारलेले ध्यान सोडीत नाहीत, तेव्हा यक्षिणी अनेक भीषण व विकृत रूपे धारण करून त्यांना भिवविण्याचा प्रयत्न करते. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. तेव्हा अन्य एक व्यंतर वाघ, सिंह, भूत, वेताळ यांची रूपे घेऊन त्यांना भिववू लागतो. आपल्या विद्येच्या साहाय्याने अनेक प्रकार भिववूनही विद्यासाधनेत निश्चलपणे मग्न असलेल्या पुत्रांचे धैर्य पाहून अनेक विद्या त्यांच्यापुढे उपस्थित होतात. अशा रीतीने रावण, विभीषण व चंद्रनखा यांना अनेक विद्या प्राप्त होतात. त्यानंतर रावण आपल्या भावंडांसह स्वगृही परतून तिथे राज्य करू लागतो. त्याचवेळी सुरगिरी येथील राजा विद्याधर मय दैत्य व हेमवंत यांची सुंदर कन्या मंदोदरी हिच्याशी रावणाचा विवाह होतो. इंद्राच्या धाकाने हा विवाह गुप्त पद्धतीने होतो. त्यानंतर रावण एक हजार विवाह करतो. त्या सर्व स्त्रियांमध्ये मंदोदरी पट्टराणी बनते. ही मंदोदरी जैन धर्मीय होती. तिला इंद्रजीत हा पहिला व जयकुमार हा दुसरा पुत्र होतो. तेवढ्यात कुंभकर्ण धनदाचे -कुबेराचे नगर लुटतो. धनद यक्षास जिंकून तो किष्किंधा नगरी जिंकतो. त्यानंतर रावण लंकेवर चाल करून जातो व लंकेवर विजय प्राप्त करतो. रावण लंकाधीश बनतो. इकडे किष्किंधा नगरीत सूर्यप्रभ व इंद्रमालिनी यांना वाली व सुग्रीव हे दोन पुत्र व सूर्यप्रभा नावाची कन्या होते. याचवेळी शिक्षापुरी येथे ऋषी राजा व मेघमालिनी राणी राज्य करीत असतात. त्यांना नील व महानील हे दोन पुत्र होतात. त्यावेळी तेथे ज्ञानसागर नावाचे मुनी येतात, ते मुनिधर्माचे व श्रावकधर्माचे निरूपण करतात. तो ऐकून ऋषी राजा दीक्षा ग्रहण करतो. त्याचाच सोबत सूर्य राजाही दीक्षा घेतो. दोघेही वाली-सुग्रीव व नील-महानील यांच्यावर राज्यभार सोपवून दीक्षा ग्रहण करतात. वाली श्रावकाचार स्वीकारतो. हे सर्वजण सुखपूर्वक राज्य करू लागतात. तेवढ्यात तिकडे खरदूषण लंकेस येऊन चंद्रनखेची मागणी करू लागतो. रावणाने या विवाहास नकार दिल्याने खरदूषण कुमार राहण्याची -विवाह न करण्याची प्रतिज्ञा करतो. तो चंद्रोदयाच्या मदतीने पाताळलंका जिंकून घेतो, त्यामुळे रावण कोपतो. परंतु मंदोदरी त्याची समजूत घालते. चौदा हजार विद्याधर पदरी असलेल्या पाताळलंकेच्या राजाशी -खरदूषणाशी सोयरीक करावी अशी विनंती करते. रावण व खरदूषण एक होतात. चंद्रोदय मरण पावतो. त्याला पुत्र होतो. खरदूषण चंद्रोदयाची राणी अनुंधरा हिचे राज्य बळकावतो. पुढे अनुंधरेचा पुत्र विराधित मोठा होतो. तो एके दिवशी वनामध्ये श्रुतसागर नामक मुनींकडे येतो. त्याला

मुनी सांगतात की, 'राम, सीता व लक्ष्मण वनात येतील व तुझे राज्य तुला परत मिळवून देतील'.

**चतुर्थ अध्यायात** रावण लंकेवर राज्य करीत असताना किष्किंधापुरीचा राजा वाली आपली सेवा करीत नाही हे पाहून रावण वालीवर चाल करून जातो. रावण वालीस आपल्याला शरण येऊन नमस्कार करण्यास सांगतो, पण 'आपण जिनेश्वरांखेरीज अन्य कुणासमोर नतमस्तक होत नाही' असे वाली निर्धारपूर्वक सांगतो. तेव्हा रावण त्याच्याशी युद्ध आरंभतो, पण वालीही रावणाइतकाच पराक्रमी असल्याने तो युद्धात अढळ राहतो. दोघेही तुल्यबळ असल्याने, युद्ध झाले तर प्रचंड मनुष्यहानी होईल या भयाने दोघांमध्ये मल्लयुद्ध पुकारले जातो. त्यात वाली रावणावर विजय प्राप्त करतो. रावणाचा अपमान होतो, परंतु रावणाच्या पराभवाने वाली उदास बनतो आणि राज्यधुरा सुग्रीवावर सोपवून स्वतः जिनदीक्षा ग्रहण करतो. काही दिवसांनंतर रावण नित्यपुरी नगरीचा राजा श्रीधर व राणी श्रीमती यांची कन्या रत्नावली हिच्याशी विवाह करून विमानमार्गेअष्टापदावरून जात असता अचानक त्याच्या विमानाची गती कुंठित होते. दशानन खाली पाहतो, खाली मुनी असल्याचे दिसते. पूर्वी अपमान करून मुनी बनलेल्या वालीचा आपल्यावरचा क्रोध अजूनही दूर झाला नसल्याचे दशानन समजतो आणि कैलास पर्वतासह वालीस उखडून फेकून देण्याच्या उद्देशाने कैलास पर्वत उचलण्यासाठी खाली हात खालून संपूर्ण शक्तिनिशी पर्वत उचलण्याचा प्रयत्न करू लागतो. तेव्हा दशाननाच्या ह्या धाडसामुळे कैलास पर्वतावर भरतेश्वरानी निर्माण केलेली जिनमंदिरे नाश पावतील या विचाराने वाली मुनी आपल्या पायाच्या अंगठ्याने पर्वत दाबून ठेवतात. दशानन पर्वताखाली दबून ओरडू लागतो, (रु - रौति) रावण (ओरडणे) करू लागते, त्यामुळे त्यास 'रावण' हे नाव प्राप्त होते. तेव्हा मंदोदरी अन्य राण्यांसह मुनींपाशी येऊन त्यांना आपल्या पतीस अभयदान व आपल्याला चुडेदान द्यावे अशी विनंती करते. तेव्हा मुनी दयाभावनेने रावणाची सुटका करतात, रावण त्यांना शरण येतो. भक्तिपूर्वक जिनवंदना करून अत्यंत भक्तिभावाने तल्लीन होऊन जिनस्तुती करू लागतो. त्याच्या ह्या जिनभक्तीमुळे प्रसन्न होऊन नागराजा त्यास वर देतो. त्याच वेळी आपण रावणास कष्टविले या भावनेने पश्चात्तापदग्ध होऊन वाली मुनी धर्मध्यानात मग्न होऊन शुक्लध्यान आरंभतात. त्यामुळे कर्मक्षय होऊन त्यांना केवलज्ञानाची प्राप्ती होते.

त्यानंतर ही कथा इथेच थांबून तिकडे किष्किंधापुरीत सुग्रीव-तारेची कथा सुरू होते. ज्योतिपुर नगरात राजा अग्निशिख व राणी हीयामती यांना तारामती नावाची कन्या

होते. तिचा सुग्रीवाशी विवाह होतो. त्याचवेळी साहसगती नावाचा एक अन्य विद्याधर तारेसाठी झुरत असतो.

ही कथा इथेच सोडून तिकडे लंकेची वार्ता सुरू होते. त्याचा पराक्रम नित्य वाढतच असतो. खरदूषणास सोबतीस घेऊन रावण इंद्रावर चाल करून जातो. राक्षस व वानर मिळून उत्तरेस जातात. जाताना वाटेत नर्मदेमध्ये जलक्रीडा करू लागतात. त्याचवेळी तेथे महिष्मती नगरीचा राजा सहस्रकिरण आपल्या एक हजार स्त्रियांसह नदीवर बांध बांधून त्या जलाशयात जलक्रीडा करू लागतो. सहस्र नारी एकदम जलाशयात उतरल्याने पाणी ओसंडून वाहू लागते. खालच्या बाजून नदीकाठी रावण जिनमूर्तीची पूजा करीत असतो. पुरामुळे त्याची पूजा वाहून जाऊ लागते. क्रोधित होऊन तो सहस्रकिरणावर आक्रमण करतो. पण नगराभोवतालचा तट अभेद्य असल्याने रावण नगरात प्रवेश करतो. तेव्हा रावण सहस्रकिरणाच्या पत्नीच्या मदतीने तट भेदून नगरात प्रवेश करतो आणि सहस्रकिरणाचा पराभव करतो आणि परत येऊन पुन्हा पूजा बांधतो. दुसऱ्या दिवशी सकाळी सत्यबाहू नामक मुनी येऊन रावणास सहस्रकिरण आपला पुत्र असल्याचे सांगून त्यास मुक्त करण्यास सांगतात. रावण त्यास आपला चौथा बंधू मानण्यास तयार होतो, पण सहस्रकिरण राज्यत्याग करून दीक्षा ग्रहण करतो. त्यानंतर राज्यावर दशरथास बसविले जाते.

पुढे उत्तरेत आर्य देशात राजपूर नगरात पवन नामक राजा मिथ्यामार्गी हिंसाकर्मयुक्त यज्ञ करीत असतो. यज्ञात वध करण्यासाठी पशू आणले जातात. नारद हे सर्व पाहतो आणि दयाधर्म आचरण्याचा उपदेश देतो. तेव्हा तिथे पशुयज्ञ करणारे ब्राह्मण त्याच्यावर कोपतात आणि वेद-पुराणांत यज्ञात पशुबळी दिल्याने पुण्य मिळते असे सांगितल्याचे सांगतात. तेव्हा नारद समजावतो की, असे असेल तर मग खाटीकही साधूच असले असते. त्यामुळे हिंसा पाप आहे असे सांगतो. तेव्हा तिथे असलेला एक ब्राह्मण चिडून नारदास लाथ मारतो. त्याचवेळी रावणाचे सैन्य तिथे येते आणि पवनराजाशी युद्ध करते. पवन राजा रावणास शरण येऊन त्यास आपली कन्या देऊ करतो. नंतर श्रावक यज्ञासाठी आणलेल्या सर्व पशूंना व नारदासही मुक्त करतो. नारद ब्राह्मणांना ठार मारण्याची प्रतिज्ञा करतो, पण रावण आपणांस दयेचे निधान आहे असे सांगून ब्राह्मणांना सोडून देण्यास सांगतो. हा आदेश भरताने शीतलनाथांच्या काळात स्थापला आहे असे सांगतो. अशा रीतीने नारदाने ब्राह्मणांची मुक्तता केली तसेच रावणाने पवनराजाची कन्या परणिली. पुढे तिला चित्रलेखा नावाची कन्या झाली. त्यानंतर अनेक देश-विदेशांत विहार करीत रावण राज्य करीत राहिला.

**पाचव्या अध्यायात** राजा श्रेणिक गौतमांना नारदाची कथा विचारतो. नारदाचे मातापिता कोण? त्याचे कुळ कोणते? असे विचारले असता गणधर सांगतात की, वांखपुरी नावाच्या नगरीत ब्राह्मण आपल्या कुरंगी नामक पत्नीसह राहात होता. कारणपरत्वे ब्रह्मरुचीस वैराग्य प्राप्त झाल्याने तो गृहस्थाश्रमात राहूनच तो संन्यास घेऊन आपल्या पत्नीसह वनात निवास करू लागतो. स्त्रीचा मोह न सुटल्याने तो वनात राहात असला तरी स्त्रीशी रममाण होत राहातो, परिणामतः कुरंगीस गर्भ राहतो. त्याच वेळी समाधिगुप्त नामक मुनी वनातून जात असतात. त्यांचा धर्मरुची हा शिष्य ब्रह्मरुचीने संन्यास घेतला असला तरी शीलव्रताचे पालन केलेले नाही असे सांगतो. मुनी म्हणतात की, 'अरेरे, गृहत्याग केला तरी स्त्रीचा संग काही सुटला नाही'. मुनींचे हे वचन ऐकून ब्राह्मणास पश्चात्ताप होतो व तो दिगंबरी दीक्षा घेतो. पुढे ब्राह्मणीस पुत्र होईल असे मुनी सांगतात, तेव्हा त्या पुत्राचा त्याग करून ब्राह्मणीनेही आर्यिका दीक्षा घ्यावी असे मुनी सांगतात. त्याचे नाव नारद असेल तसेच तो जिनधर्मी होईल असे सांगून मुनी पुढे वनात निघून जातात. पुढे यथाकाल ब्राह्मणीस पुत्र होतो, तेव्हा त्यास वनात सोडून देऊन कुरंगी ब्राह्मणी इंद्रमालिनी नामक आर्यिकेपाशी जिनदीक्षा धारण करते. जंबिक (जृंभक देव) तिथे येतो. त्यास बालकाची दया येते आणि तो त्या बालकाचा प्रतिपाळ करतो. पुढे मोठा झाल्यावर माता-पित्यांचा वियोग आठवून त्यासही वैराग्य प्राप्त होते आणि तो दीक्षा ग्रहण करतो.

त्यानंतर पूर्वीची कथा पुढे सुरू होते. रावण यज्ञाचा विध्वंस करतो, नारद तिथून निघून जातो. रावण आपल्या कटकात आल्यावर तिथे त्यास मधुकुंवर नावाचा मुलगा दिसतो. चौकशी केली असता प्रधान तो हरिवंशी असल्याचे सांगतो. मथुरेचा राजा हरिब्रह्म व त्याची भार्या माधवा यांचा हा पुत्र. रावणाच्या मनात त्याच्याविषयी ममत्वभाव निर्माण होतो, तेव्हा प्रधान मुनींनी सांगितलेली मधुकुवराची त्याची भवांतर कथा रावणास निवेदन करतो. शतदूर्वा राज्यात राजा प्रजापाळ व राणी प्रजावती यांचा सुमित्र नावाचा मुलगा असतो. त्याला एका ब्राह्मणाकरवी शिक्षण दिले जाते. ब्राह्मणपुत्र राजकुवर आणि सुमित्र यांची मैत्री जडते. सुमित्र शिक्षण संपवून आपल्या घरी येतो आणि यथाक्रम त्यास राज्यावर स्थापित केले जाते. तेव्हा सुमित्र ब्राह्मणपुत्रास आपला प्रधान म्हणून नियुक्त करतो. एकदा सुमित्र अश्वावर स्वार झाला असतो घोडा उडतो आणि सुमित्र खाली पडतो. पडता पडतो तो नवकार मंत्राचे स्मरण करतो. त्यास वनात पडलेला पाहून एक भिल्ल त्यास आपल्या घरी घेऊन येतो. तिथे त्या भिल्लाची कन्या त्याची शुश्रूषा करते. तेव्हा सुमित्र तिला म्हणतो की, 'मी जैन धर्मी आहे, त्यामुळे मी तुझी सेवा कशी काय स्वीकारू?' तेव्हा भिल्लकन्या त्यास

सांगते की, 'मी एका जैन साधूपाशी श्रावकत्व स्वीकारून श्रावकाची व्रते ग्रहण केली आहेत', भिल्लकन्येने असे सांगितल्यावर सुमित्र तिच्याकडून सेवा स्वीकारतो. त्यानंतर सुमित्र भिल्लकन्या वनमाला हिला आपल्या सोबत आपल्या घरी घेऊन जातो. तिथे प्रधानमित्राशी तिचा परिचय करून दिला असता प्रधानास तिच्याविषयी आसक्ती उत्पन्न होते आणि तो कामविह्वल बनतो. त्यामुळे क्षीण बनू लागतो. मित्राची ही अशी अवस्था पाहून सुमित्र वनमालेस त्याच्याकडे पाठवितो. आपल्या पतीचे वचन पाळण्यासाठी वनमाला प्रधानाकडे जाते. पतीचे वचन व शील या द्विधावस्थेतून कसे बाहेर पडायचे या विचाराने ती व्याकुळ बनतो. तेव्हा चातुर्यपूर्वक ती प्रधानास म्हणते की, 'तुम्ही उच्चकुलीन ब्राह्मण, तर मी नीचकुलीन भिल्लीण. तेव्हा आपला संयोग कसा बरे योग्य असेल? तसेच मी मुनींपाशी शीलव्रत ग्रहण केले आहे. त्याचा भंग झाला तर मला फार मोठा पापबंध घडेल'. वनमालेचे हे चातुर्यपूर्ण बोल ऐकून आणि आपल्या मित्राने -राजाने आपल्या इच्छेखातर आपली पत्नीही माझ्याकडे पाठविली असा विचार करून प्रधान मनातून अत्यंत खजील होतो आणि आत्महत्याच करण्याचा प्रयत्न करतो. पण राजा सुमित्र त्याची समजूत काढतो, तेव्हा प्रधानमित्र वैराग्य उत्पन्न होऊन मुनी बनतो आणि आयुष्यांती असुरकुमार देव बनतो. त्यानंतर सुमित्रही वैराग्य उत्पन्न होऊन मुनिधर्म स्वीकारतो. स्वर्गात उत्पन्न होऊन व तिथले आयुष्य संपल्यावर दोघेही मथुरेत राजा हरिवाहन व राणी माधवी बनून राज्यसुख भोगू लागतात. त्यांचा हा पुत्र मधुकुंवर होय. अशा प्रकारे मधुकुंवराचे पूर्वभव ऐकून रावण आपली कन्या चित्रलेखा त्यास देतो. असा हा मधुवाहन पुण्यप्रभावे मथुरेचे राज्य भोगीत आहे.

त्यानंतर उरलेली कथा पुढे सांगताना गौतम गणधर श्रेणिकास सांगतात की, रावण देश-विदेश जिंकीत दुर्तधन(?) नगराजवळ नळ राजावर चाल करून जातो. नळ इंद्राकडे मदतीची याचना करतो, तेव्हा रावण मजसमोर तृणवत् आहे असे सांगतो आणि मेरुगिरीच्या यात्रेस निघतो. इकडे इंद्राची मदत न मिळाल्याने नळ स्वतःच रावणावर चाल करून जातो आणि त्याच्याशी युद्ध सुरू करतो. आपल्या बलाने रावणाचे कटक उद्ध्वस्त करतो. आता काय करावे? असा विचार करीत असतानाच नलाची पत्नी रूपरंभा रावणास पाहून मोहित होते. आपली सखी चित्ररेखेस घेऊन ती रावणाकडे जाते. तेव्हा रावण चातुर्याने रूपरंभेकडून तटभेदिनी विद्या प्राप्त करून व इथे कटकामध्ये सुख भोगण्यापेक्षा दुर्गामध्ये परस्पर सुख भोगू असे रूपरंभेस सांगून तिला पाठवून देतो. विद्येच्या साहाय्याने रावणाच्या मदतीने दुर्गात प्रवेश करून विभीषण नलास पकडून रावणासमोर उपस्थित

करतो. रावण रूपरंभेस समजावून व विद्या दिल्याने तिला आपल्या गुरुस्थानी मानून व नलास अभय देऊन त्याचे राज्य त्यास देऊन व खरदूषणासमान नातलग समजून पुढे निघतो. ही कथा इथे थांबते. त्यानंतर पुढच्या अध्यायात रूपरंभेच्या मनात रावणाविषयी मोह का उत्पन्न झाला याची कथा आली आहे.

**सहाव्या अध्यायात** रावण दहोत्र नगरी जिंकतो. या बातमीने इंद्र हडबडून जातो. इंद्र व रावण यांच्यात घनघोर युद्ध होते. त्यात रावण इंद्राचा ऐरावत जिंकून घेतो. वानर राक्षसांना आनंद होतो. इंद्र पराजित झाला ही वार्ता इंद्राचा पिता सहस्ररश्मी यास कळते, तो लंकेस जातो आणि इंद्रास अभय देण्याची रावणास विनंती करतो. रावण इंद्रास अभय देतो आणि आपल्या चौथ्या भावाप्रमाणे त्यास स्थान देतो. इंद्र कृतज्ञता व्यक्त करतो आणि ही बुद्धी आपणांस केवळ जैन धर्मामुळे प्राप्त झाली हे मान्य करतो. इंद्रास या संसाराविषयी विरक्ती उत्पन्न होते. सर्व संपत्ती व वैभव काय कामाचे? असे म्हणून तो संसारातून मुक्त होण्याचा निश्चय करतो. त्याला जिननामाचा रंग दिसू लागतो. याच काळात वनात एक मुनिसंघ येतो. वनपालाकडून इंद्रास वनवैभवाची वार्ता मिळते, तेव्हा इंद्र परिवारासह वनात जाऊन मुनींना वंदनपूर्वक आपले पूर्व भवांतर विचारतो. मुनी सांगतात की, अरिंजय नगरात वह्निवेग राजा व वेगावती राणी यांना अहिल्या नावाची कन्या असते. तिच्या स्वयंवरात गेला असता ती अन्य एका विद्याधरास वरमाला घालते. त्यामुळे उद्विग्न होऊन तो सप्तव्यसनांत बुडतो. त्याच वेळी गुणसागर नामक मुनींचे आगमन होते व अहिल्येचा पती आनंदमाली त्यांच्याकडून दीक्षा ग्रहण करतो. एके दिवशी मुनी बनलेला आनंदमाली कायोत्सर्ग तप करीत असताना इंद्र त्यांच्यावर उपसर्ग करतो. तो मुनीस झाडास बांधून ठेवतो, पण मुनी मात्र पर्वतासमान निश्चल व ध्यानमग्न असतात. मुनींना झाडास बांधून गेल्याच्या पापफलामुळे रावणाने इंद्रास बांधून नेले. हा वृत्तांत ऐकून इंद्रास पश्चात्ताप होतो आणि तो दीक्षा ग्रहण करतो. याप्रमाणे ही इंद्रकथा इथे समाप्त होते. इंद्रराज वशीकरण हा अध्याय इथे संपतो.

पुढे **सातव्या अध्यायात** अंजना-पवनंजयाचे व हनुमंताचे जन्माख्यान आरंभ होते. तत्पूर्वी रावण आपल्या सैन्यासह नवकाराचा उच्चार करीत वनामध्ये मारीचाला अनंतवीर्य मुनी भेटतात. रावण मारीच्यासह मुनींकडून श्रावकाचारासह त्रेपन्न क्रिया, जीवदया, पंच व्रते, रात्रिभोजनत्याग इत्यादींचा उपदेश श्रवण करून गृहस्थाश्रमात या समस्त व्रतांचे पालन शक्य नसल्याने आपण मला केवळ शीलव्रत द्यावे. रावण शीलव्रत, कुंभकर्ण नित्य देवपूजाव्रत व मुनिआहार इ. व्रते घेऊन धर्मफले भोगत राहतात.

या पुढे श्रेणिकाच्या प्रश्नास अनुसरून हनुमंताची जन्मकथा आरंभ होते. विजयार्ध पर्वतामध्ये विद्याधरांची पन्नास नगरे असतात. त्यांमध्ये आदित्यपुरामध्ये राजा प्रह्लाद व राणी केतुमती सुखपूर्वक राज्य करीत असतात. त्यांना पवन नावाचा पुत्र होतो. पवन मोठा होतो. इकडे महिंद्रपुरात राजा महेंद्र व राणी मनोवेगा यांना अंजना नामक कन्या होतो. अंजना उपवर झाली हे पाहून राजा अंजनेसाठी वरसंशोधनाचे उत्तरदायित्व प्रधानावर सोपवितो. अंजनेला रावण, इंद्रजित, मेघकुमार इ. वररूपाने सुचविले जातात, परंतु मतिसागर व ज्ञानसागर यांनी अंजनेचे भविष्य सांगून श्रुतसागरांनी सांगितल्याप्रमाणे स्वयंवरमंडप घालण्याचे सांगतात. याचवेळी विद्युत्कुमाराचेही स्थळ सुचविले जाते. अनेक वरांचा विचार केल्यानंतर पवनंजयास अंजनेचा वर म्हणून मान्यता दिली जाते. महेंद्र राजा सिद्धक्षेत्रावर पूजा, अष्टाह्निक व्रत, पंचामृताभिषेक इ. करीत असता प्रह्लादराजाही पवनंजयासह तिथे येतो. या दोघांच्या भेटीतून अंजना-पवनंजय यांचा विवाह निश्चित होतो. अंजनेच्या सौंदर्याची स्तुती ऐकून पवनंजय कामविह्वल बनून तिच्या भेटण्यासाठी अत्यंत आतुर बनतो आणि आपला मित्र प्रहसित याच्यापाशी आपली ती इच्छा व्यक्त करतो. सूर्य मावळल्यावर पवनंजय प्रहसितासह अंजनेच्या महाली जातो. महालात अंजना व वसंतमाला पवनाच्या सौंदर्याविषयी बोलत असतात. वसंतमाला बत्तीसलक्षणी पवनाची स्तुती करते. वसंतमाला स्तुती करता करता अंजनेने पवनामध्ये असा कोणता गुण पाहून त्यास वरले? असे विचारते. हेही सांगते की, 'त्याच्यापेक्षा विद्युत्प्रभ अधिक बरा होता'. एकमेकींची थट्टामस्करी करता करता अंजना पवनाची मस्करी करते. ही चर्चा पवनाच्या व प्रहसिताच्या कानावर पडते आणि पवन कुपित होतो. अंजनेचा वध करण्याचा विचार करतो पण प्रहसित स्त्रीहत्येच्या पातकाचे भय दाखवून त्यास परावृत्त करतो. दोघेजण परत येतात. विवाहाचा विचार सोडून पवन परतीचा निर्णय जाहीर करतो. तेव्हा जनांमध्ये पवनाच्या अप्रसन्नतेची चर्चा सुरू होते. प्रह्लाद पवनाची क्षमा मागून त्यास आपल्या निर्णयापासून परावृत्त करतो. पवन विवाहास तयार होतो, पण विवाहानंतर अंजनेचा द्वेष करू लागतो. लग्नानंतर तिला आपल्यापासून अलग ठेवतो. वसंतमाला व अंजना १२ वर्षेपवनापासून अलग राहतात, पण अंजना पवनाचे चित्र पाहूनच समाधान मानते. मध्यंतरी अंजनेचा भाऊ येतो आणि अंजनेची अवस्था पाहून तो दुःखी होतो. अनेकजण पवनाची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात, पण पवन आपल्या निर्णयापासून ढळत नाही, कुणाचे काहीही मान्य करीत नाही.

एवढ्यात लंकेचा अधिपती रावण सर्व देश जिंकून येतो. समस्त राजे रावण्याच्या

सेवेसाठी उपस्थित राहतात, मात्र वरुणराजा अंकित होत नाही. त्याची खबर घेण्यासाठी रावण दूत पाठवितो, पण वरुण दूताचा अपमान करतो. दूतास गवार व रावणास झुंडतर म्हणतो. रावण कोपतो व युद्धाचा निरोप पाठवितो. दोघांत युद्ध होते व रावणाचा रथ मोडतो. रावणाचा गौरव कमी होतो, तेव्हा खरदूषण वरुणावर चाल करून जातो, पण वरुण खरदूषणासह रावणास बांधून नेतो. रावण अपमानित होतो आणि प्रह्लादास अर्जदास लिहितो. प्रह्लादपुत्र पवनंजय रावणाच्या मदतीस जात असताना अंजनेच्या महालावरून जातो. अंजना पुन्हा त्यास विनवितो, पण तिला न जुमानता तो तसाच पुढे निघून जातो. पुढे सूर्य अस्तास गेल्यावर पवनाच्या सैन्याचा तळ एका सरोवराच्या किनाऱ्यावर थांबतो. तिथे पवनंजयाच्या दृष्टीस एक चमत्कार पडतो. पवन तिथे एका चक्रवाकीस -चकवीस प्रियाच्या वियोग तडफडत असलेली पाहतो. अज्ञान पक्षिणीची एवढी तगमग पाहून पवनाचे मन विचलित होते. त्यास अंजनेची तीव्र आठवण होते आणि आपला प्रधानमित्र प्रहसित यास सोबत घेऊन तो कुणासही न कळता तो गुप्तपणे अंजनेच्या महाली जातो. अंजनेची क्षमायाचना करून तो तीन दिवस तिच्याशी रममाण होतो. नंतर तो रावणाची मदत करण्यासाठी निघतो. अंजना त्यावेळी ऋतुस्नाता असल्याने तिला गर्भधारणा होते. त्यामुळे ती चिंतित होते. तेव्हा पवत तिला मी लवकरच परत येईन असे आश्वासन देतो. रावणाकडे जाऊन व वरुणाशी युद्ध करून त्यास जिंकून घेतो. रावण बरेच दिवस पवनाचे आदरातिथ्य करतो. भिडेपोटी पवनास तिथे राहावे लागते. इकडे अंजनेचा गर्भ वाढत जातो, सर्वत्र त्याची चर्चा सुरू होते. अंजना सासूचे समाधान करण्याचा प्रयत्न करते, पण ती तिचे काहीही ऐकत नाही. त्यानंतर तिच्या आदेश अंजना व वसंतमाला यांना वनात सोडून दिले जाते.

काही दिवस वनामध्ये व्यतीत करीत असताना पुण्ययोगाने त्यांना एका गुफेमध्ये मुनींचे दर्शन घडते. मुनी त्यांना भवांतर सांगतात. विजयार्ध पर्वतावर अरुणपुर नगरात राजा सुकंठ आपल्या कनकोदरी राणीसह राज्य करीत असताना त्यांना सिंहरथ नामक पुत्र होतो. त्याची कनकावती नामक पट्टराणी असते. ती अधर्म करते. एकदा ती सर्व नारीजनांना पानविड्यासाठी बोलावते. त्यावेळी राणी लक्ष्मीमती जिनपूजेत मग्न असते. दासीने बोलाविले तरी ती जिनपूजा सोडून पानविड्यासाठी जात नाही. तेव्हा कनकावती तिच्यावर कुपित होते आणि पूजनसाहित्यासह, जिनमूर्तीसह त्यांना बाहेर फेकून देते. त्याचवेळी संयममती आर्यिका आहारासाठी आलेली असते. लक्ष्मीमतीस आनंद होतो, पण कनकमती त्यांना आहारार्थ आपल्याकडे येण्याची विनंती करते. संयममती तिला उपदेश

करते की, तू जिनमूर्ती बाहेर टाकलीस हे काही बरे केले नाही, यामुळे तुला पापबंध व परिणामतः भयंकर दुःख भोगावे लागेल. तेव्हा कनकमतीस पश्चात्ताप होतो. जिनमूर्ती पुन्हा आपल्या स्थानी स्थापन करते आणि जिनदीक्षा ग्रहण करते. पण बारा वर्षेजिनमतीस त्रास दिल्याचे व जिनमूर्ती बाहेर टाकल्याचे फळ म्हणून अंजनेच्या भवात तिला १२ वर्षेपतिविरहाचे दुःख भोगावे लागले आहे. गत जन्मीची ही वार्ता ऐकून अंजनेस पश्चात्ताप होतो. वनमालेसह ती त्याच वनात राहते.

एके दिवशी एक सिंह त्यांच्या समोर येतो, पण नवकार मंत्राच्या स्मरणाच्या प्रभावाने हे संकट दूर होते. पुढे कालानुक्रमे हनुमानाचा जन्म होतो.

**आठव्या अध्यायात** अंजनी व वसंतमाला पुत्रासह वनात राहात अत्यंत विपन्नावस्थेत कालक्रमणा करीत असतात. पण पराक्रमी आणि सुंदर बाळाकडे पाहून त्यांना धैर्य प्राप्त होत असते. अंजनेचे चपळ बालक वनात खेळत असते. याच वेळी त्यांना त्या वनामध्ये ध्यानस्थ अमितगती मुनींचे दर्शन घडते. त्याच वेळी विद्याधराचे एक विमान आकाशमार्गाने जात असताना बालकाच्या प्रभावामुळे त्याची गती अवरुद्ध होते. प्रतिसूर्य नावाचा हा विद्याधर अंजनेची चौकशी करतो आणि ओळख पटून तो तिला आपण तिचा मामा असल्याचे सांगतो. तो अंजनेस आपल्या सोबत घेऊन जातो. जाता जाता बालक विमानातून निसटून खाली पडते आणि एका मोठ्या शिलाखंडावर पडते. अंजनेस अपार दुःख होते. त्याचवेळी आकाशवाणी होते की तुझा पुत्र सुरक्षित असून तो तुला भेटेल. बालक खाली खंड खंड शिलाखंडावर खेळत असलेले दिसते. शिळेवर पडले म्हणून त्याचे नाव शीलकुमार असे ठेवले जाते. तेथून प्रतिसूर्य त्यास आपल्या हनुरपट्टणास घेऊन जाते. त्यामुळे त्याचे नाव हनुमान असे ठेवले जाते.

ही कथा सांगत असतानाच लंकेत राहात असलेला पवन रावणाचा निरोप घेऊन आपल्या नगरास जाण्यास निघतो. स्वनगरीत अंजनेची चौकशी करता अंजनेस गरोदर अवस्थेत नगरातून घालवून दिल्याचे समजते. पवनास अत्यंत दुःख होते आणि तिच्या शोधात वणवण फिरत राहतो. विरहव्याकुळ बनून आपल्या हत्तीसह वनात जाऊन राहतो. हत्ती पवनाचे रक्षण करीत सतत त्याच्या निकट राहात असतो. पवन नदीकाठी ध्यान करीत असतो. इकडे प्रह्लाद व केतुमती पवनाच्या निघून जाण्याने दुःखी होतात. शेजारच्या हनुरपुर पट्टणाच्या राजाची मदत घेतात. मौन धारण केलेल्या पवनास भानुराजा घेऊन येतो. पवन व अंजना यांचे मिलन होते. हनुमंत मोठा होतो. वनात जाऊन विद्या शिकतो. इतक्यात वरुण राजा रावणाचे रोवण (उच्छेद) करण्यासाठी युद्ध पुकारतो. रावण आपल्या अंकित सर्व

राजांना मदतीस येण्याचे आवाहन करतो. तेव्हा पवनाची अनुमती घेऊन हनुमान लंकेस रावणाच्या मदतीस जातो.

**नवव्या अध्यायात** रावण व वरुण यांच्या युद्धाची कथा येते.रावणाच्या वतीने हनुमान अतुल्य पराक्रम दाखवितो व लंकेत वरुणाचे १०० पुत्र ठार मारतो. वरुणाचा पराभव व रावणाचा विजय होतो. वरुणाच्या स्त्रियांना रावण यथोचित आदर देतो. वरुणास अभय देऊन रावण त्याच्या कन्येशी विवाह करतो. हनुमानाच्या पराक्रमाने प्रसन्न झालेला रावण त्याचा गौरव करतो. त्यास आपली कन्या द्यावी असे त्याच्या मनात येते, पण त्यास कन्या नसल्यामुळे तो आपली बहीण चंद्रनखा हिची कन्या अनंगकुसुमेचा हनुमानाशी विवाह करून देतो. अनंगकुसुमा, हरिमाला ही नील राजाची कन्या, किनूर राजाची कन्या चंद्रभागा व सुग्रीवाची कन्या पद्मरागा अशा चार कन्यांशी हनुमंताचा विवाह होतो. त्यानंतर काही दिवस भोग भोगीत हनुमान राहतो. जिनमंदिरे निर्माण करतो. आपल्या अनेक राण्यांसह हनुरपट्टणास येतो. तेथे माता अंजना व वसंतमाला यांच्याशी त्याचा संवाद होतो. सर्वजण संतोष पावतात. इकडे रावण त्रिखंडाधीश बनतो. आपल्या अनेक राण्यांसह राज्यभोग भोगत राहतो. जैन धर्माचे पालन करीत लंकेची प्रजा सुख पावते.

अशा प्रकारे वानर व राक्षस वंशाची कथा ऐकल्यावर श्रेणिक गौतम गणधरांकडे हरिवंशाची उत्पत्ती व कुलकथा ऐकण्याची इच्छा व्यक्त करतो. तदनुसार **दहाव्या अध्यायात** हरिवंशाची कथा सांगितली गेली आहे. भ. शीतलनाथांच्या मोक्षस्थानी म्हणजे कौशांबी नगरात सन्मुख नगरात वीरसेठी व कनकमाला राहात असतात. वनमाला अप्रतिम सौंदर्याची खाण असते. एकदा वसंतोत्सवास जात असताना राजाची नजर वसंतमालेवर पडते, तो तिच्यावर आसक्त होतो. तिकडे वसंतमालेचीही तशीच अवस्था होते. दूतीकरवी राजा वसंतमालेस आपल्या घरी आणवितो व तिच्यासह भोग भोगतो. तिकडे वणिक वीरसेठी पत्नीचा शोध घेत असता ती राजाकडे गेल्याचे त्यास समजते. वीरसेठी राजाकडे जाऊन न्यायाची याचना करतो, पण राजा त्यास घालवून देतो. तो क्रुद्ध तर होतो, पण बलवान राजासमोर त्याचे काहीच चालत नाही. त्यामुळे तो वनात जातो आणि तपश्चर्या करू लागतो.

इकडे वनमालेसह सुख भोगत असताना राजाकडे एका मुनींचे आगमन होते. मुनी त्यास उपदेश करतात आणि परस्त्रीउपभोगाचे दुष्परिणाम कथन करतात. त्यामुळे राजा व वनमाला दोघेही पश्चात्ताप पावतात आणि प्रायश्चित्त घेतात. व्रते पाळतात. तपसाधना करतात, मुनिधर्म स्वीकारतात, त्यामुळे त्यांना सद्‌गती प्राप्त होते. पुढे वनगिरी राजाची

कथा सुरू होते. वनगिरी व मृगावती यांचा पुत्र आणि मेघपुरचा राजा वायुवेग याची पत्नी रतिमाला यांची कन्या मनोरमा म्हणून पूर्वभवीची वनमाला जन्म घेते. हरिविभ्रम–मनोरमा यांचा विवाह होतो, ते सुखी बनतात. एके दिवशी वनक्रीडेस जात असताना ते पूर्वभवी वीरसेठी असलेल्या व आता स्वर्गस्थ असलेल्या वणिकास ते दिसतात. पूर्वभवीची वार्ता आठवून वणिक देव क्रुद्ध होतो व हरिविभ्रम–मनोरमा यांना शिक्षा देण्याचा विचार करतो, पण संयमाची आठवण होऊन तो त्यांना माफ करतो आणि त्यांचे अपहरण करून चंपावती नगरानजीकच्या वनात सोडून देतो.

नेमका त्याच वेळी चंपावतीचा राजा निपुत्रिक अवस्थेत मृत्यू पावतो. त्यामुळे राज्याचा उत्तराधिकारी शोधण्यासाठी एका हत्तीच्या मस्तकावर जलकुंभ देऊन हत्ती ज्याच्या मस्तकावर जल ढाळेल तो राजा असेल असे ठरविले जाते. हत्ती सर्वत्र भ्रमण करून राजोद्यानात असलेला हरिविभ्रम व वनमाला यांच्या मस्तकावर जलकुंभ रिता करतो. हरिपुर नगरीचा राजा हरिविभ्रम राजा सिद्धक्षेत्र पाहायला जात असताना चंपापुरास आला, म्हणून हा वंश हरिवंश म्हणून गणला गेला. हरिविभ्रमाचा महागिरी, महागिरीचा हेमगिरी, हेमगिरीचा प्रजापालक. त्याची राणी पद्मावती गर्भवती होते आणि तिच्या उदरी मुनिसुव्रताचा जन्म होतो. तीर्थंकर जन्मास येण्याची सूचना देणारी १६ स्वप्ने पद्मावती पाहाते. गर्भ पद्मावतीच्या उदरात उतरताच देव गर्भकल्याणक करतात. पुढे कालानुक्रमे मुनिसुव्रताचा जन्म होतो आणि देव जन्मकल्याणक करून मेरुगिरीवर बाळाचा अभिषेक करतात. पुढे त्यास वैराग्य उत्पन्न होते आणि देव तपकल्याणक साजरे करतात. नंतर मुनिसुव्रत विपुलाचलावर तप करतात. एके दिवशी षष्ठोपवासी तीर्थंकर पारण्यानिमित्त राजगृह नगरीचा राजा वृषदत्ताच्या घरी येतात. नंतर तप–ध्यानाच्या प्रभावाने त्यांना केवलज्ञान उत्पन्न होते. देव केवलज्ञान कल्याणक साजरे करतात. त्यांच्या समवसरणात धर्मोपदेश श्रवण करून अनेकजण श्रावक वा मुनिदीक्षा ग्रहण करतात. पुढे आठही कर्मांचा क्षय करून मुनिसुव्रत तीर्थंकर मोक्षपद प्राप्त करतात. पुढे या वंशात सुव्रत, दक्ष, इलावर्धन, श्रीवर्धन, वासवकेतू, महाबली असे अनेक राजे झाले. पुढे महाबलीस जनक आणि कनक यांच्यापर्यंत हरिवंश कथन करून, इक्ष्वाकु वंशात काश्यप कुळात अतुर्बळी व हेमचूल यांच्या पोटी सुइंद्र व त्याची पट्टराणी कीर्ती यांना वज्रबाहू व पुरंदर व त्यापासून सार्थक झाला. यानंतर नाग नगरीत हस्तिवान राजा व चूडामणी राणी यांची पट्टमहिषा वज्रबाहूची राणी बनते. वज्रबाहू स्वनगरीस जात असताना एका शिळेवर ध्यानस्थ असलेले मुनी पाहतो व त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न होते. तो रथातून उडी मारतो आणि दीक्षा ग्रहण करतो.

त्याच्यामागे पुरंदर व पृथ्वीमती राज्यभार सांभाळतात. त्यांचा पुत्र कीर्तिधर यास राज्य देऊन ते दीक्षा घेतात. पुढे कीर्तिधरही विरक्त होतो, त्याच्याकडून वंश चालविण्यासाठी पुत्राची अपेक्षा केली जाते. पुढे त्यास पुत्रप्राप्ती होते आणि तो त्याच्यावर राज्यकारभार सोपवून दीक्षा घेतो.

**अकराव्या अध्यायात** मुनी कीर्तिधर ईर्यापथ गमन करीत आहारासाठी नगरात येतात. तेव्हा त्यांची पत्नी सहदेवी त्यांना नगरातून घालवून देते. त्यामुळे पुत्र सुकोशल यास खूप वाईट वाटते आणि तो आपल्या पित्यापाशी दीक्षा ग्रहण करतो. इकडे त्याची माता पुत्रशोकाने मरण पावते आणि वाघीण बनते. जंगलात मुनी बनलले पिता-पुत्र विहार करीत असताना त्यांना पाहते आणि आपला पूर्वभव आठवून दुष्टपणाने आपला पुत्र सुकोशल यास खाऊन टाकते. कीर्तिधर मुनी वाघिणीस आपल्या पूर्वभवाचे स्मरण करून देतात. इकडे चित्रमालेस हिरण्यगर्भ नावाचा पुत्र होतो. हिरण्यगर्भ आपली पत्नी अमृतमतीसह सुखपूर्वक राज्य करीत राहतो. एके दिवशी सिंहासनावर बसला असता आपल्या मिशीमध्ये पांढरा केस पाहून त्यास वैराग्य उत्पन्न होते, तेव्हा तो आपला पुत्र नघु(हु)षकुमारास राज्य देऊन दीक्षा घेतो. नघु(हु)ष आपले दळ घेऊन उत्तरेस गेला असता दक्षिणेकडून त्याच्या राज्यावर परचक्र येते. सिंहक राज्यावर चालून आला असता त्याचा पराभव होतो. नघुष आपले राज्य परत घेतो. राजा सिंहरथ अयोध्येस जातो. तेथे आपले राज्य स्थापन करतो. सिंहरथास शतरथ, शतरथास सदारथ, काकुत्स्थ, विद्युत्पती व त्याचा पुत्र दशरथ त्याची भार्या अपराजिता, सुमित्र. अशा रीतीने या अध्यायात दशरथाच्या उत्पत्तीपर्यंतची कथा आली आहे.

**बाराव्या अध्यायात** विभीषणाला पश्चात्ताप होण्याची कथा आली आहे. एके दिवशी दशरथ राजसभेत बसला असता नारद तिथे येतो आणि विदेह क्षेत्रातील दीक्षाकल्याण विधीचे वर्णन करतो. सभा समाप्त झाल्यावर एकांतात दशरथास लंकेचे वर्णन करतो. तो सांगतो की, लंकेच्या सभेत सागरदत्त मुनींनी रावणाच्या मृत्यूचे भविष्य कथन केले आहे. त्यानुसार जनकाच्या कन्येच्या निमित्ताने दशरथपुत्राकडून रावणाचा वध होणार असतो. हे ऐकून विभीषण रामाचे बीजच नष्ट करण्याच्या उद्देशाने जनक व दशरथ यांना मारावयास निघतो. नारदाने अशी विभीषणाच्या आगमनाची पूर्वसूचना दिल्याने प्रधान चातुर्यपूर्वक जनक व दशरथ यांचे हुबेहूब पुतळे तयार करवून व त्यांमध्ये द्रवरूप लाक्षारस भरून राजप्रासादाच्या गच्चीवर गवाक्षात स्थापन करतो आणि दशरथ व जनक यांना वनात दडवून ठेवतो. विभीषण अयोध्येवर चाल करून येतो आणि पुतळ्यांना सत्य समजून त्यांची

मस्तके कापून ती आपल्यासोबत घेऊन लंकेस रावणाकडे परत जातो. काही दिवसांनी विभीषणास ती मस्तके कृतक (नकली) पुरुषाचे असल्याचे लक्षात येते आणि आपल्या हातून नकळत हिंसा घडली असे समजून पश्चात्ताप होतो.

**तेराव्या अध्यायात** दशरथ आणि जनक विकट वेश धारण करून भटकंती करू लागतात. जैन धर्माचे पालन करीत दोघेही अमरावतीस येतात. तेथे शुभमती राजा व पृथ्वीमती राणी यांच्या कैकयी व केगामती या दोन कन्या लग्नासाठी येतात. दशरथ व जनक त्यांच्या स्वयंवरात जातात. अनेक राजांच्या राजकुमारांना डावलून कावड्याच्या वेशात असलेल्या दशरथास कैगामती वरते. कावडीस वरल्यामुळे राजे क्षुब्ध होतात आणि दशरथाशी युद्ध पुकारतात. दशरथ एकाकी असतो, तेव्हा केगामती सारथ्य करते. दोघे मिळून समस्त विरोधी राजांचा पराभव करतात. त्यानंतर दशरथ अयोध्येस व जनक मथुरेस निघून जातात. दशरथाचा विजयोत्सव होतो. राजसभेत दशरथ केतमतीस इच्छित वर मागण्यास सांगतो. तेव्हा केतमती मी योग्य समयी ते वर मागून घेईन असे सांगते.

**चौदाव्या अध्यायात** आठवा बलदेव रामाचे वर्णन आले आहे. रामाचा जन्म, त्याचे बालपण, त्याचे कोडकौतुक यांचे वर्णन करता करता कवीची प्रतिभा चांगलीच बहरली आहे. त्यानंतर केगाईस भरत, सुप्रभेस शत्रुघ्न व सुमित्रेस लक्ष्मण असे पुत्र होतात. या पुत्रांना शिक्षण देण्यासाठी उपाध्यायाचा शोध सुरू असतो. त्याचवेळी भार्गव व शेषमती यांचा पुत्र येरु हा वैसख्य उपाध्यायाकडे विद्या शिकण्यासाठी जातो. हा येरु विद्या शिकतो, तेव्हा तेथील राजास त्याचा हेवा वाटतो. प्रधानास सांगून त्याची परीक्षा घेतली जाते. तेव्हा येरु राजाचा दुर्भाव जाणून आपली वास्तविक विद्याक्षमता दाखवीतच नाही. तेव्हा गुरूच्या आदेशावरून तो गुपचूप तिथून निघून जातो आणि अयोध्येय येतो. दशरथ त्याची आपल्या मुलांसाठी गुरू म्हणून नियुक्ती करतो. येथे कवीने गुरु-शिष्य संबंधाचे मार्मिक वर्णन केले आहे. चारही कुमारांचे अध्ययन पूर्ण झाल्यावर त्यांची विधिवत् परीक्षा केली जाते.

**पंधराव्या अध्यायात** एक असुर जनकाच्या पत्नीच्या गर्भाचे रक्षण करीत प्रतीक्षा का करीत असतो? या श्रेणिकाच्या प्रश्नास अनुसरून गौतमस्वामी सांगतात की, चक्रपुरी नगरीचा राजा चक्रेश्वर व त्याची पत्नी मनश्चिती यांना चित्रोत्सवा नावाची कन्या होते. त्याच राज्यात धूमकेतू पुरोहिताचा पुत्र पिंगल याचा व चित्रोत्सवेचा प्रेमविवाह होतो. ते दोघे पळून जातात. नगरापासून दूर राहून पिंगल काबाडकष्ट करू लागतो. मोळी विकून झोपडीत राहून कसाबसा उदरनिर्वाह करीत असतात. नगरात वसंतोत्सवाच्या निमित्ताने राजोद्यानात जात असताना चित्रोत्सवा राजाच्या नजरेस पडते आणि तो चित्रोत्सवेस

पळवून नेतो. तिच्यासह राजसुख व काम-प्रेमसुख भोगत राहतो. पिंगल पत्नीच्या विरहाने व्याकुळ होतो. तो राजाकडे दाद मागण्यासाठी येतो व राजाकडे आपल्या पत्नीची मागणी करतो, पण राजाचा धूर्त प्रधान तुझी पत्नी तर वनमार्गाने दुसऱ्या देशास गेल्याचे सांगतो. पिंगल निराश होऊन वनात जातो, तिथे त्यास मुनींचे दर्शन घडते. मुनी त्यास उपदेश करतात. पिंगल दीक्षा घेतो, शरीर कष्टवितो. तपाग्नीने व चित्रोत्सवेच्या विरहाने दग्ध झालेला पिंगल मुनी मदांध बनतो. इकडे कुंडलमंडित राजा प्रधानाच्या साहाय्याने आपण पिंगलाशी कपटाचार केला म्हणून दुःखी बनतो. तेव्हा प्रधान त्यास सांगतो की, पिंगलाची स्त्री दारिद्र्याने गांजली होती म्हणून तुमच्याशी सुखोपभोग घेत आहे. राजा दुःखी बनून पिंगलास बोलावून घेतो, पण तो आल्यावर त्यास पुन्हा नगराबाहेर घालवून देतो. प्रियेच्या विरहाने अंतःकरणातून दुःखी झालेला पिंगल चरफडत जीवन व्यतीत करतो.

याच वेळी कौसल देशाचा राजा अनय कुंडलमंडितावर आक्रमण करतो व त्यास पराभूत करतो. पराभूत झाल्याने कुंडलमंडित खिन्नमनस्क व चिंतित होतो. त्याच वेळी बालचंद्र नावाचा सेनापती अनय राजास राज्य जिंकून देतो. इकडे कुंडलमंडित पराभूत होऊन एकाकी भ्रमण करीत असता त्याची पुण्योदयाने एका मुनिराजांशी भेट होते. मुनी त्यास पाच अणुव्रते, दशधर्म व सत्प व्यसनांचे अर्थ उलगडून सांगतात. सप्त व्यसनांचा परिणाम म्हणून भयंकर नरकदुःख भोगावे लागते असे सांगतात. मुनींकडून उपदेश श्रवण करून कुंडलमंडित प्रतिमा धारण करतो. त्यानंतर आपला मामा महाबल याच्याकडे जात असताना वाटेत दुर्धर आजाराने मरण पावतो व धर्माचरणाचे फल म्हणून जनक व विदेही राजाच्या उदरी अमृतावती देवकन्या म्हणून जन्मास येते. कुंडलमती व चित्रोत्सवा जनक राजाच्या राणीच्या गर्भात अवतरतात. इकडे पिंगल ब्राह्मणास जातिस्मरण होते. आपली पूर्वपत्नी चित्रोत्सवा कुंडलमती राजाने पळविल्याचा क्रोध मनामध्ये धरून तो कुंडलमती आता जनकाच्या राणीच्या उदरात आहे तोपर्यंतच त्याचा वध करण्याचा विचार करतो, पण त्याच्याच बरोबर आणखी एका जीवाचा घात होईल या विचाराने तो राणीच्या प्रसूतीची प्रतीक्षा करीत राहतो. राणीची प्रसूती होऊन तिला जुळे होते, त्यांपैकी कुंडलमंडिताचा जीव असलेल्या बालकाचे तो अपहरण करतो आणि त्याचा वध करण्याचा विचार करतो, पण त्याच्या कोमल पायाचा मृदू स्पर्श होताच त्याचा वध करण्यापासून तो परावृत्त होतो आणि पूर्व भवातील तपस्वी जीवन आठवून प्राणिहत्येचे पाप नको म्हणून तो त्या बालकाच्या कानात कुंडले घालून पर्णलघ्वी विद्येच्या साहाय्याने रत्नपूर नगराबाहेरच्या आमराईत सोडतो. त्याच वेळी इंद्रमती राजा तिथे तपस्थ असताना

बालकास त्याच्या पुढ्यात टाकतो. त्याची पत्नी महादेवी हिला पुत्र नसल्याने ती दुःखी असायची तेव्हा इंद्रमती राजा त्या बालकास आपला पुत्र समजून त्याचे पालन करण्यास सांगतो. इकडे पुत्रहरण झाल्याने जनक व विदेही शोक-दुःख करीत राहतात. जनक दशरथाची मदत घेऊन पुत्राचा शोध घेत राहतो, पण पुत्र सापडत नाही. पुढे जानकीची वृद्धी होऊ लागते. कवीने तिच्या सौंदर्याचे वर्णन मोठ्या बहारीने खुमासदारपणे केले आहे. अशा रीतीन सीता-भामंडलोत्पत्ती अधिकार समाप्त होतो.

**सोळाव्या अध्यायात** रामाकरवी म्लेच्छ राजाचा पराभव होतो. जनकाच्या मथुरेवर एक म्लेच्छ राजा आक्रमण करतो व जनकाचे राज्य जर्जर करतो. जनक भयभीत होऊन दशरथास मदतीसाठी पाचारण करतो. पत्रातून तो दशरथास विनंती करतो की, माझा पराभव अटळ असून माझ्या पश्चात आपण माझ्या राज्याचे व प्रजेचे रक्षण करावे. दशरथ युद्धास जाण्यास तयार होतो आणि रामास राज्याधिकार सोपविण्याचा विचार करतो, पण राम दशरथास न जाऊ देता स्वतः युद्धास तयार होतो. रामासोबत लक्ष्मणही निघतो. मथुरेस जाऊन राम आपल्या सैन्यानिशी म्लेच्छाशी युद्ध करतो व त्याचा पराभव करतो. पण म्लेच्छ तयारीनिशी पुन्हा आक्रमण करतो, तेव्हा लक्ष्मण त्याच्याशी झुंजतो आणि त्याचा पराभव करतो. जनकनगरीत राम-लक्ष्मणांचे मोठ्या जल्लोषात स्वागत होते. रामाच्या उपकारातून उऋण होण्याचा विचार करीत असता जनक-विदेही यांच्या मनात आपली कन्या जानकी रामास देण्याचा विचार बळावतो. हा विचार रामास कळतो व तो अयोध्येस परततो. येथे श्रेणिकास प्रश्न पडतो की, मग सीतेचे स्वयंवर कसे काय झाले?

**सतराव्या अध्यायात** रामाची कीर्ती आणि सीतेच्या सौंदर्याचे वर्णन ऐकून नारद सीतेचे सौंदर्य पाहण्याच्य जिज्ञासेपोटी मथुरेस येतो. तिथे नारदाचे विरूप पाहून सीता भयभीत होते. तेव्हा सीतेच्या परिचारिका नारदास पकडून त्यास चोप देतात. त्याचे जानवे-कडदोरा तोडून टाकतात. नारद वनात पळून जातो. थोडासा निवांत झाल्यावर तो सीतेच्या विवाहात कलह उत्पन्न करण्याचा निश्चय करतो. सीतेचा चित्रपट तयार करवून विजयार्ध पर्वतावर चंद्रगतीच्या नगरात जाऊन तेथील जिनमंदिरात तो पट ठेवतो. भामंडल राजाचा मुलगा भामंडल तो पट पाहून सीतेच्या रूपावर मोहित होतो. कामविह्वल बनून मूर्च्छित होतो. पुत्र मूर्च्छित झाल्याचे पाहून माता-पिताही मूर्च्छित होतात. पट कोणी आणला याचा शोध घेता नारदाचा शोध लागतो. नारद ते चित्र सीतेचे असल्याचे सांगतो. भामंडलाच्या सीताविरहाने दुःखी बनून चंद्रगती एका विद्याधराकरवी अश्वरूप धारण करून जनकास आणवितो. जनक व चंद्रगती यांच्या संभाषणात खेचर-भूचर यांचा

विचारांचा संघर्ष होतो. चंद्रगती जानकीची मागणी करतो, पण जानकीसाठी राम वर म्हणून निश्चित झाल्याचे जनक सांगतो. चंद्रगती जनकास सांगतो की, 'त्याने सीता नाही दिली तर त्यास बंदी बनविले जाईल.' रामाचे बल पाहण्यासाठी चंद्रगती जनकास वज्रावर्त धनुष्य देतो आणि रामाने या धनुष्यास बाण लावून संधान केले तरच जानकी त्यास द्यावी अन्यथा ती भामंडलाची होईन असे सांगतो. तेव्हा सीतेचे स्वयंवर मांडले जाते आणि बलवान राजांच्या समक्ष राम धनुष्यास बाण जोडून ते इतक्या बलपूर्वक ताणतो की ते मोडूनच जाते.

पुढच्या **अठराव्या अध्यायात** भामंडल सीतेचे काय झाले? असे विचारतो स्वयंवरात सीता रामाने वरली हे समजताच भामंडल आपले बल दाखविण्यासाठी अयोध्येवर आक्रमण करून सीतेस घेऊन येण्यासाठी निघतो. वाटेत अरण्यावरून जात असताना त्यास जातिस्मरण होते. पूर्वजन्मीचे कुंडलमंडित व चित्तोत्सवा म्हणजे आपण व सीता आहोत. पूर्वजन्मीचा पिंगल आता देव बनला व त्याने जन्मतःच आपले अपहरण केले. आपण उपवर झालो असता आपणांस ही अशी दुर्बुद्धी सुचल्याचे भामंडलास जाणवते.

**एकोणिसाव्या दीर्घ अध्यायात** भामंडल सीतेसाठी व्याकुळ झाला आहे. कवीने भामंडलाची विरहव्याकुल अवस्था अत्यंत मार्मिकपणे चित्रित केली आहे. भामंडल सीतेसाठी मनोरुग्ण बनतो. प्रधान व मंत्री विचार-विनिमय करतात. भामंडलासाठी सीता कशी आणावी याचा विचार करतात. कुणी म्हणतो, जनकाचे हरण करावे. कुणी जानकीचे हरण करण्याचा उपाय सुचवितो. शेवटी चारही प्रधान एकत्र येऊन उपाय सुचवितात की, आपल्या शस्त्रागारामध्ये जे शरासन -धनुष्य आहे ते जो उचलील व त्यावर जो शीत -बाण चढवील, तो सीतेचा पती होईल. असा उपाय सुचवून कुणीही विद्याधर हे धनुष्य उचलू शकणार नाही, म्हणून सीतेचे स्वयंवर मांडले जाते. अशा विचाराने जनकास सोडून दिले जाते. सीतेचे स्वयंवर मांडले जाते, त्यासाठी अनेक राजे येतात. तेथे राम भामंडलासमोर डाव्या हातात धनुष्य धरून उजव्या हाताने त्यावर बाण चढवितो. त्यानंतर लक्ष्मण सागरावर्त धनुष्यास बाण चढवितो. भरत-शत्रुघ्न यांच्यासह अनेक विद्याधरकन्या वरल्या जातात. सीता रामास वरते. तेव्हा भामंडलास आपल्या विद्येच्या व बलाच्या साहाय्याने उचलून आणण्याचे सुचविले जाते. सीता आपल्याला प्राप्त झाली नाही याचे दुःख होऊन भामंडलास आपले जीवन व्यर्थ गेल्याचे वाटू लागते. प्रधान भामंडलाची समजूत काढतात, पण आपण भूचरास घाबरलो की काय असे वाटू नये म्हणून भामंडल आपले शौर्य दाखविण्याचे आह्वान देतो. भामंडल विमानात आरूढ होऊन रामावर आक्रमण करून येतो.

आपल्या विद्येच्या बलाने तो नगराबाहेर एका वनात युद्धाची तयारी करतो. ते वन पाहून त्यास आपला पूर्वभव आठवतो आणि जातिस्मरण होऊन तो मूर्च्छित होतो. सगळ्या सैन्यात हाहाकार माजतो. कुणी 'भामंडलास रामाच्या भीतीने मूर्च्छा आली काय?' असे विचारतो. परंतु भामंडल अनेकांच्या अनेक गोष्टी ऐकून स्वतःचा धिक्कार करू लागतो. त्याला आपला पूर्वभव आठवतो आणि आता सीता आपली बहीण असल्याने तिची अशी अभिलाषा करणे चुकीचे असल्याची जाणीव होते. तो आपल्या पित्यास आपल्याला पूर्वभवाची स्मृती झाल्याचे सांगतो. मी पूर्वभवीचा कुंडलमंडित व सीता चित्तोत्सवा होती आणि ती कपिल ब्राह्मणाची पत्नी होती. आपण तिचा अपहार केला आणि तिच्याशी भोग भोगले. हे कपिलास सहन न होऊन आता या भवात मी व सीतेने जनकपत्नीच्या –एकाच मातेच्या उदरात जन्म घेतल्यावर कपिलचर देवाने माझे अपहरण केले आहे. आपल्याकडून प्रमादाने रामास काही अपाय घडला असता आणि भगिनीगमन झाले असते, तर किती मोठा अनर्थ घडला असता आणि आपणास सातव्या नरकात जावे लागले असते. भामंडलाची ही वार्ता ऐकून त्याचा पालक पिता चंद्रगतीस संसाराची असारता व विचित्रता जाणवते आणि विरक्तीचे भाव उत्पन्न होऊन तो गुरूंपाशी दीक्षा ग्रहण करतो. भामंडल जनकाचा पुत्र असल्याचे संपूर्ण अयोध्येस कळते. पहाटेच्या समयी जवळच असलेल्या अयोध्या नगरीतील भाट भामंडलाचे गीत गाऊ लागतात. हरिवंशातील  जनकाचा पुत्र व जानकीचा भाऊ म्हणून भामंडलाचे स्तुतिगीत गायले जात असताना सीतेस आश्चर्य वाटते. बंधूविषयी स्नेहभाव उत्पन्न होऊन तिच्या नेत्रांतून अश्रूंचा पूर वाहू लागतो. सीतेचे दुःख पाहून राम तिची समजूत काढतो आणि आपण गुरूंकडे जाऊन याविषयी पृच्छा करू असे म्हणून तिचे सांत्वन करतो. सकाळी वनात विद्याधरांचे विशाल सैन्य दिसते. वनात वसविलेले सुंदर आम्रनगर दिसते. तिथे अयोध्यावासी नवदीक्षित निर्ग्रंथ गुरूंशी चर्चा करतात. मुनी उपदेश करतात. द्वादश व्रते, नऊ पदार्थ, सात तत्त्वे यांचा उपदेश ऐकून सीतेचा प्रश्न विचारतात. मुनी कर्माचा प्रभाव आणि दुर्योनीतील जीवांच्या स्थितीचे निरूपण करतात. चंद्रगतीच्या राणीच्या कुशीत वाढलेला भामंडल, सीतेकडून नारदाचा अपमान, सीतास्वयंवराची कथा, पूर्वभवातील पिंगल ब्राह्मणाची कथा या सर्वांचे निरूपण करतात. चंद्रगतीचे वैराग्य, चंद्रगती व पुष्पावती यांचे माता–पिता व पुत्र यांचे पूर्वभवातील संबंधही सांगतात. याच वेळी मुनींचा उपदेश ऐकण्यासाठी भामंडलही उपस्थित असतो. तो आपले भवांतर विचारतो. तेव्हा दारुग्रामी विमुची व अनुशोका या ब्राह्मण दांपत्याच्या पोटी अतिभूती पुत्र व त्याची पत्नी सारसा यांच्या घरी कयान हा पाहुणा म्हणून आला असता

त्याचा यथोचित आदर केला जातो, पण कयान कपटपूर्ण व्यवहार करून अतिभूतीची पत्नी सारसा हिला पळवून घेऊन जातो. तेव्हा विमुची शोकग्रस्त बनून फिरत असताना त्यास पुण्ययोगाने मुनिदर्शन घडते. विमुची दीक्षा ग्रहण करतो. त्याची पत्नीही दीक्षा ग्रहण करते. पुढच्या जन्मी त्यांना शुभ कर्माचे उचित फल मिळते. अतिभूती, सरसा व कयान हे संसारात भ्रमण करीत असताना मिथ्यामती बनतात. पुढे सरसेचा जीव हरिणी बनते. तिथे केलेल्या पापाचे फळ भोगते. पुढे चक्रध्वज राजाची चित्तोत्सवा कन्या म्हणून जन्मते. तो कयान ब्राह्मण भिल्ल बनतो. पुढे धूमकेतू ब्राह्मणाच्या घरी पिंगळ ब्राह्मण म्हणून जन्मतो. पुढे अतिभूती हंस बनतो. तो हंस जिनमंदिरासमोर पडतो. तेथे त्यास यशोधर मुनींचा उपदेश आणि त्यांच्याकडून व्रते प्राप्त होतात. पुढे तो कुंडलमंडित राजा बनतो. तो पिंगल ब्राह्मणाच्या पत्नीचे अपहरण करतो. विमुची चंद्रगतीची राणी बनते. असा हा भामंडलाचा पूर्वसंबंध सागितला जात असताना भामंडल आपल्या भगिनीसमोर -जानकीसमोर गहिवरून जातो. तो राम, लक्ष्मण, शत्रुघ्नाला आलिंगन देतो. दशरथ त्याचा सन्मान करतो. अयोध्यानगरीत त्याचे महोत्सवपूर्वक स्वागत केले जाते. त्यासाठी सगळी अयोध्या नगरी शृंगारली जाते. भामंडलास अयोध्या नगरीचे दर्शन घडविले जाते. जनकास पत्र पाठवून भामंडलाची वार्ता कळविली जाते. जनक व विदेहा अयोध्येस येतात. तिथे भामंडल व माता-पित्याच्या मिलनाचे अत्यंत हृद्य वर्णन कवीने केले आहे. भामंडलाची दृष्ट काढून कवी प्रसंगाचे वर्णन करतो. भामंडलाच्या बालपणाचे वर्णन करताना कवीने इथे वात्सल्य रसाचा उत्तम परिपोष केला आहे. जनक मथुरेचे राज्य भामंडलाच्या स्वाधीन करतो. भामंडल दशरथ, जनक आदी सर्वांना घेऊन रत्नपूर नगरीस घेऊन जातो. रत्नपुरात सर्वांचे अगदी उत्सवपूर्वक स्वागत केले जाते. यथोचित आदर-सत्कार होतो. रामाचाही सत्कार होतो. नंतर पुन्हा सर्वजण अयोध्येस परततात. भामंडल आपली बहीण सीता हिच्या पायी लागून तिला नमस्कार करतो. अशा रीतीने प्रस्तुत अध्यायामध्ये भामंडल व माता-पिता, भगिनी, राम, लक्ष्मण यांच्या मिलाफाचे हृद्य वर्णन करण्यात आले आहे.

**विसाव्या अध्यायात** श्रेणिक राजा दशरथाचे व राम-सीता यांच्या पूर्वभवांचे वर्णन विचारतो. राजा दशरथाचे राज्य कसे होते हे आपणांस सांगावे असे श्रेणिकाने विज्ञापन केल्यावर दशरथाची कथा पुढे सुरू होते. दशरथ एकदा महेंद्र वनात आला असता त्यास मुनींचे दर्शन घडते. त्यांच्या निकट बसून तो त्यांच्याकडे आपल्या अनेक भवांचे वर्णन विचारतो. मुनी सांगतात की, हा संसार काकतालीय न्यायासमान आहे. यात आपल्याला मोठ्या योगायोगानेच मनुष्यजन्म प्राप्त होतो. सूत्रधार ज्याप्रमाणे बाहुल्या

नाचवतो त्याचप्रमाणे आपल्या समस्त क्रिया कर्मांच्या अधीन आहेत. त्यामुळे आपले कल्याण करून घ्यायचे असेल तर या संसारात काय करायला हवे याचा मुनी दशरथास उपदेश देतात. या अध्यायात अनेक दृष्टांताच्या साहाय्याने जैन धर्माचा व क्रियांचा परिचय करून देण्यात आला आहे. दशरथाच्या पुण्याचा उदय झाल्याने त्यामुळे त्यास मुनींकडून आपले पूर्वभव जाणून घेता येत आहेत.

इंद्रवेग नगरीचा राजा समुद्र यास नंदन व धरण हे पुत्र व राजकन्या तपनकुमारी हे मुनींना आहारदान देऊन पुण्यसंचय करतात. दानाचे पुण्य म्हणून त्यांचा भोगभूमीत ज जन्म होतो. पुष्कलावती नगरीत नंदिघोष राजा व त्याचा पुत्र नंदिवर्धन असतात. पुत्रावर राज्यभार सोपवून नंदिघोष राजा दीक्षा ग्रहण करतो व तपाच्या प्रभावाने स्वर्गात देव बनतो. तिथले आयुष्य संपल्यावर विदेह क्षेत्रातील शशिपुर नगरीत विद्याधर म्हणून जन्म घेतो. रत्नमाल व विद्युल्लता राजाराणी असतात. त्यांच्या पोटी नंदिवर्धन सूर्योजय नावाने जन्म घेतो. पुढे सिंहपुर येथे वज्रमाली हा त्याचा वैरी असतो. पुढे अमरनाथ त्यांच्यामध्ये मध्यस्थी करून पूर्वभवातील वैर सोडण्यास प्रवृत्त करतो. पुढे गंधार नगरीत अतिभूत राजाचा महाभूती नावाचा पुत्र होतो. अतिभूती व्रते स्वीकारतो. उपमन्यु ब्राह्मण त्यास व्रतभंग करण्यास प्रवृत्त करतो. पुढे तो उपमती अरिचक्राशी युद्ध करता करता मरण पावतो आणि वनात हत्ती बनतो. अन्य हत्तींशी झुंजता झुंजता तो मरण पावतो. मरणसमयी त्यास मुनींकडून पंचनमस्कार मंत्राची लब्धी होते. त्याच्या प्रभावाने तो महाभूतीचा पुत्र अरिसूदन बनतो. अतिभूती राजाला कमलगर्भ मुनी भेटतात. पुरोहित पुढे वनामध्ये आगीमध्ये दग्ध होतो. तो पुढे राजपुत्र बनतो. मुनी पुढे सांगतात की, रत्नमाली पूर्वीचा अतिभूती होता. रत्नमाली व त्याचा पुत्र सूर्यजय म्हणजेच आता उपदेश करणारे मुनी असून अनरण्य राजाचा पुत्र दशरथ होय. पुढे अनुभूती व पुरोहित जैनधर्मी बनतात. ते पुढे जनक व कनक हे दोन भाऊ राजे बनतात. दशरथास अशा प्रकारे त्याच्या पूर्वभवाची कथा सांगून आता आपला पुण्योदय झाल्याने आपण आपला राज्यभार रामावर सोपवून राज्यकारभारातून निवृत्त व्हावे. सर्व भाऊ रामाच्या आज्ञेत असल्याने त्यात काही प्रत्यवाय नाही. दशरथ याप्रमाणे विचार करीत असता हेमंतकाळ येतो. हेमंतात सर्वत्र हिमवृष्टी होऊ लागते. त्यामुळे अनेक लोक दुःखीकष्टी होतात, काही मृत्यूही पावतात. पण अशा काळात पुण्यवंत लोक मात्र सुख उपभोगतात. दशरथाच्या कुळात अशा तीव्र हेमंतातही भोग भोगायला मिळतात. अशा भोगकाळी दशरथ मुक्तीची इच्छा करतो. जिनदीक्षा घेण्याचा निश्चय करतो आणि त्याप्रमाणे सर्वांना सूचित करतो. दुर्धर संसाराची भीषणता व असारता सांगतो. दशरथाच्या

वैराग्यभावनेमुळे प्रजाजन शोकमग्न बनतात. दशरथपुत्र भरताच्या मनातही वैराग्य उत्पन्न होते. अशा समयी भरतमाता केगामती आपल्या पुत्रास वैराग्यविचारापासून परावृत्त करण्यासाठी दशरथापाशी राखून ठेवलेला वर मागते. गृहस्थधर्माचे पालन करीत जप-तप करीत धर्मपालन करण्याचा परामर्श देते. तपाचरण किती कठोर व कठीण आहे हे सांगते. दशरथ तपाचे महत्त्व सांगतो व आपल्या वैराग्यावर दृढ राहतो. केगामती पूर्ववराचे स्मरण करून देऊन राज्य माझ्या पुत्रास -भरतास द्यावे, त्यामुळे तो वैराग्यापासून परावृत्त होईल असे सांगून भरतास वैराग्यापासून परावृत्त करण्यासाठी त्यास राज्य द्यावे असे सांगते. दशरथ सर्वांना केगामती वराची कथा सांगतो. पूर्वी माझा पिता अनरण्य याने संयम व दिगंबरी दीक्षा घेऊन मला राज्य दिले असता नारदाने एकांतात मला माझ्या पुत्राकरवी जनककन्येच्या निमित्ताने रावणाचा मृत्यू होणार असल्याचे सांगितले होते. आपले मरण ऐकून रावणाने दशरथाशी वैर मांडले. त्यानिमित्ताने वनात भ्रमण करीत असता केगामतीच्या स्वयंवरात पोहोचतो. केगामतीने दशरथास वरले. तेव्हा सर्व राजे त्याच्या विरोधात उभे राहिले. तेव्हा केगामतीचा पिता दशरथास रथ देऊन राजांचा विरोध मोडून काढण्यास सांगतो. रथासाठी सारथी नसल्याने केगामतीने रथाचे सारथ्य केले व दशरथाचा विजय झाला. त्यामुळे तिला वर मागण्यास सांगितले. तिने त्यावेळी तो वर माझ्याकडे ठेव म्हणून ठेवण्यास व योग्य वेळ येईल तेव्हा आपण तो वर मागू असे सांगितले. आता ती त्या वरानुसार भरतास राज्य मागत आहे. रामास राज्य देऊन वैराग्य ग्रहण करीत असताना आपण संकटात सापडल्याचे दशरथ सांगतो. तेव्हा राम अत्यंत विनयपूर्वक वचन पाळावे असे सांगतो. आपल्या वंशात सर्वच राजे सत्यवादी होते, त्यामुळे आपणही सत्य व्रताचे पालन करून निःसंकोच भरताकडे राज्य सोपवावे असे राम सांगतो. तेव्हा भरत क्रोधित होऊन दशरथाकडे जातो. राम त्यास आलिंगन देऊन समजावतो. भरतास गृहस्थाश्रम पाळावयास सांगून त्यास राज्य करण्याचा उपदेश करतो. आपण केगामतीस दिलेले वचन पाळण्यासाठी तिचे सत्त्व राखावे म्हणून राज्य देत आहोत असे सांगतो. भरत विरागी बनून तपाचरणास प्रवृत्त झाला आहे, त्यामुळे राम त्याचा हात पकडून पित्याने जसा आदेश दिला आहे त्याप्रमाणे आचरण करावे असे सांगतो. मी राज्यावर बसलो तर अपकीर्ती होईल, म्हणून रामानेच राज्य सांभाळावे असे भरत म्हणतो. राम मात्र आपण जर राज्यात राहिलो तर भरतावर दडपण येईल असा विचार करून राम वनात जाण्याचा निर्णय करतो. हे ऐकून भरत दुःखी बनतो. दशरथही दुःखी बनून निघू लागतो, तेव्हा सर्वजण विलाप करू लागतात. राम वनवासात जाता जाता मातेस भेटतो. तसेच सुमित्रा, सुप्रजा यांनाही भेटतो.

केगामतीस भेटण्यासाठी गेला असता आपण भरतास वैराग्यापासून परावृत्त करण्यासाठी राज्य मागितले असे रामास सांगते. राम पित्याचे वचन पाळणे हे माझे कर्तव्यच असल्याचे सांगतो. नंतर तो सीतेच्या सदनी येतो. सीतेस समजावतो. इथे कवीने सीतेच्या दुःखाचे उत्कट वर्णन केले आहे. सीता रामासह निघण्याचा निश्चय सांगते. तिच्याच सोबत लक्ष्मणही निघतो. सीता व लक्ष्मणास समजावण्याच्या प्रसंगात कवी अगदीच भावोत्कट बनला आहे. राम लक्ष्मणास सुमित्रेची अनुमती घेण्यास सांगतो. समस्त प्रजाजन रामास दशरथाने तुझ्यावर अन्याय केला आहे असे समजावतात. सर्वचजण रामाच्या विरहाच्या कल्पनेने व्याकुळ होऊन भरतास व केगामतीस दूषणे देतात. राम वनवासात निघाला असता प्रजाजनांची कशी दीन व व्याकुळ अवस्था झाली होती याचे वर्णन इथे कवीने अगदी मार्मिकपणे केले आहे. राम अरनाथांसमानच वनात निघाला असे वर्णन कवीने केले आहे. राम–लक्ष्मण–सीता समस्त वैभवाचा त्याग करून वनात निघाला हे पाहून प्रजाजन त्याचे अनुगमन करू लागतात, पण रामाने सर्वांची समजूत काढून त्यांना परत पाठवून दिले. त्यानंतर मात्र दशरथ दीक्षा घेण्याचा निश्चय करतो. अशा प्रकारे प्रस्तुत प्रसंगात केगामतीचा वर, राम–लक्ष्मण–सीता यांचे वनप्रस्थान यांचे वर्णन केले गेले आहे.

**एकविसाव्या अध्यायात** दशरथाची दीक्षा, रामलक्ष्मणांचे वनगमन यांचे वर्णन आले आहे. राम–लक्ष्मण–सीता वनवासात जात असताना अरनाथांच्या मंदिरात थांबतात. नंतर प्रजाजनांस सोडून जात असताना प्रजाजन अत्यंत दुःख व्यक्त करतात. पण सोबत आलेल्या प्रजाजनांस सोडून ते तिघेही पुढे एका वनात येतात. वाटेत अनेक लोक त्यांना सुखसोयी देतात. अनेकजण हळहळतात. पुढे ते एका भयंकर वनात प्रवेश करतात. येथे कवीने वनाच्या भीषणतेचे व गहनतेचे स्वाभाविक व यथार्थ वर्णन केले आहे. वनवासी जन त्यांना थांबण्याचा आग्रह करतात. आमचे राज्य तुम्ही ग्रहण करा असाही आग्रह करतात. असेही आग्रहपूर्वक सांगतात की, यापुढे भद्रभीष्म गहन वन असून तेथे अन्न–जलही उपलब्ध होणे दुरापास्त आहे, त्यामुळे आपण तिथे जाऊ नये. या जंगलाचे वर्णन करून पुढे नदी पार करण्याच्या प्रसंगात नदीकाठचे वनवासी जन रामलक्ष्मणांच्या जाण्याने विलाप करू लागतात, परंतु आपली मने कठोर करून ते तिघेही भद्रभीष्म वनात प्रवेश करतात. आपणांस या असार संसाराची मुळीच भीती नाही असे सांगून राम पुढेच चालत राहतो. वनात त्यास तापस भेटतात. एका जिनभवनात त्यांना सत्यकेतू मुनींचे दर्शन घडते. तिथे रामासोबत आलेले अनेक जण दीक्षा ग्रहण करतात. काही लोक परतून भरतास मार्गाचा वृत्तांत कथन करतात. रामवियोगाने दुःखी बनून दशरथ दीक्षा ग्रहण करतो.

दशरथाच्या दीक्षाग्रहणसमयी कवीने संसाराच्या असारतेचे हृद्य वर्णन केले आहे. अनेक सुखे षट्काय जीवांना भोगल्याचे दुःख करून जिथे राज्य भोगले-जिंकले अशा शत्रुराज्यांतून दशरथ निर्भयपणे विहार करतो. जीवनाचा सारासार विचार करून आपण जीवनात अयशस्वी झाल्याने राम-लक्ष्मण-सीता यांच्यावर वनवास भोगण्याची ही अशी पाळी आली असा पश्चात्ताप दशरथ करतो. त्यानंतर रामाचा शोध घेत भरत वनात येतो. एक भिल्ल भरतास रामाकडे जाण्याची वाट दाखवितो. त्यानंतर इथे भरतभेटीचे वर्णन आले आहे. राम-भरत भेट हा रामायणातील एक हृद्य प्रसंग आहे. कवी या प्रसंगात अगदी रंगून गेला आहे. रामाच्या वनगमनामुळे आपले सर्व लोकांमध्ये हसे झाले, म्हणून स्वतः केगामतीही भरतासोबत रामाकडे येऊन त्याची क्षमा मागते. तेव्हा राम केगामतीस सत्यवचनाचे महत्त्व सांगून वनातच समस्त उपस्थितासमक्ष भरताचा अयोध्येचा राजा म्हणून अभिषेक करतो. भरत अयोध्येस माघारी परतून सिंहासनास नमस्कार करून राज्यकारभार चालवितो. श्रुतसागर मुनींपाशी व्रते ग्रहण करतो. अयोध्येत पुन्हा रामदर्शन होताच आपण जिनदीक्षा ग्रहण करण्याचा निश्चय करतो. श्रुतसागर मुनिराजही त्यास गृहस्थाची व्रते देऊन उपदेश करतात. जिनधर्माचे महत्त्व निरूपण करतात. तेव्हा भरत मुनिराजांना आपले भविष्य विचारतो.

पुढच्या **२२ व्या अध्यायात** राम पुढे वनात अग्रसर होत राहतो. तिथे एका नदीतीरावर त्यांना एक तापसी ऋषी व ऋषिपत्नी भेटतात. ते राम-सीता-लक्ष्मण यांना फळे खाण्यासाठी देतात. तेथील फळांचे, वनाचे वर्णन करून या निसर्गसंपन्न वनावर आपण राज्य करावे अशी विनंती करतात, तसेच आपल्या कन्येशी विवाह करावा अशीही विनंती करतात. तेव्हा राम त्या तापसास जैन धर्माचे व आचाराचे महत्त्व व स्वरूप निरूपण करून पुढे निघतो. पुढे आणखी घनदाट अरण्य असल्याने सीतेने तिथेच तापसापाशी राहावे अशी विनंती आश्रमातील सर्वजण करतात. पण त्यांचे म्हणणे न ऐकता रामत्रिकूट तसेच पुढे निघते. त्यानंतर पुढे निम्नगा नदी व चित्रकूट वनाचे वर्णन आले आहे. वनात त्यांच्यासमोर अचानकच भुकेला सिंह, हत्ती व अजगर येतात. पण रामाचे दर्शन होताच हे सर्व प्राणी आपापला क्रूर स्वभाव त्यागतात. वनवासी त्रिकूट वनातील फळे व वनमहिषींचे दूध पिऊन आपली उपजीविका करतात. अशा रीतीने त्या वनात चार महिने व्यतीत करतात. पुढे अवंती देशात सुंदर पाटण -नगर दिसते. पण त्या सुंदर नगरात कुणीही माणसे नसतात. त्या मनुष्यरहित नगरात राजाही नाही, याचे सर्वांना आश्चर्य वाटते. त्यानंतर काही काळ विश्राम करून सीतेस भूक लागली म्हणून लक्ष्मण फळे आणण्यासाठी निघतो. तिथे नगरोद्यानात

फळे तर विपुल असतात, पण अचौर्याणुव्रताचे पालन करणारा लक्ष्मण ती कुणाच्या अनुमतीविना कशी घ्यायची या विचारात आसपास कुणी दिसते का हे पाहण्यासाठी एका झाडावर उंच चढतो. तेव्हा तिथे एक कुणबी दिसतो. लक्ष्मण त्याच्याकडे पोहोचतो, तेव्हा लक्ष्मणास घाबरून तो कुणबी मूर्च्छितच होतो. लक्ष्मण त्याच्यावर शीतोपचार करून त्याची मूर्च्छा दूर सारतो आणि त्यास रामाकडे घेऊन जाऊ लागतो, पण कुणबी रामासमोर जाण्यास घाबरतो. लक्ष्मण त्यास अभय देऊन रामाकडे घेऊन जातो. तेव्हा रामाने विचारल्यावरून तो शिरगुप्ती कुणबी त्या ओसाड नगराचा वृत्तांत कथन करतो. अवंती देशातील उज्जयिनी नगरीचा राजा सिंहोदर व त्याचा मांडलीक राजा वज्रकर्ण यांचे राज्य तिथे होते. वज्रकर्ण व्यसनी, मांसाहारी व इंद्रियलंपट होता. एके दिवशी मृगयेच्च्या निमित्ताने वनात आला असता त्यास मुनिदर्शन घडते. पारध करण्यासाठी आलेल्या वज्रकर्णाचे सगळे शिकारी कुत्रे शिकार शोधण्याचे सोडून त्या मुनींभोवती खेळत राहतात. हे पाहून राजा क्रोधित होतो व त्यांची निंदा करतो, पण मुनी शमभाव धारण करून ध्यानस्थ राहिलेले पाहून राजाचा क्रूर भाव शमतो व तो त्या मुनींना शरण जातो. त्यानंतर त्यास भव्य जाणून मुनी तप, ब्रह्मचर्य, धर्मभाव यांचे महत्त्व व भोगांची, संसारता असारता कथन करतात. सप्त व्यसनांचे, भोगासक्ततेचे दुष्परिणाम कथन करतात. तृणचर अनाथ पशूंना भयभीत करणे, त्यांची हत्या करणे भावी भवांमध्ये कसे अनर्थकारक आहे हे समजावून सांगतात. तेव्हा वज्रकर्ण आपला मिथ्याभाव व मिथ्याचरणाचा त्याग करून मुनींकडून अणुव्रते ग्रहण करतो. मुनींची स्तुती करून जिनदेव व जिनगुरू यांच्याखेरीज अन्य कुणासमोरही मस्तक नम्र न करण्याचे व्रत ग्रहण करतो. परंतु त्याची पत्नी त्यास सिंहोदराचे भय असल्याचे सांगते. तेव्हा वज्रकर्ण आपल्या अंगठीत जिनबिंब कोरून घेऊन ती आपल्या हाताच्या अंगठ्यात घालून सिंहोदरास भेटतो. सिंहोदरास हात जोडून नमस्कार करण्यापूवी आपोआपच जिनेश्वरांना नमस्कार होतो. पण कुणीतरी वज्रकर्णाची कागाळी करतो, त्यामुळे सिंहोदर चिडून प्रधानाच्या सल्ल्याने वज्रकर्णाचा वध करण्यासाठी त्याच्यावर आक्रमण करण्याची तयारी करतो. वज्रकर्ण सिंहोदराच्या आक्रमणाची वार्ता ऐकून निराश होऊन मंदिरात गेला असता एक अनोळखी व्यक्ती तिथे येऊन त्यास पळून जाण्याचा सल्ला देतो. सिंहोदराचे गुपित आपण ऐकल्याचे सांगणारा हा अनोळखी पुरुष कुंद नगरीतील समुद्रसंघ श्रेष्ठीचा विद्युदंग नावाचा पुत्र असतो. व्यापाराच्या निमित्ताने उज्जयिनीस गेला असता विपुल धन प्राप्त करतो, पण तिथे एका गणिकेच्या मोहफाशात अडकतो आणि आपले संपूर्ण धन गमावून बसतो. एके दिवशी सिंहोदर राजाची पट्टराणी

विहार करीत असताना तिच्या कानातील रत्नकुंडले पाहून गणिका आपल्याला ती कुंडले हवीत असा विद्युदंगाकडे हट्ट करते. तेव्हा विद्युदंग तस्कर बनून राणीच्या शयनकक्षात पलंगाखाली लपून राणी निजल्याची प्रतीक्षा करीत राहतो. राजा शयनकक्षात येतो आणि तो चिंतामग्न असतो. राणी त्यास त्याच्या चिंतामग्नतेचे कारण विचारते, तेव्हा तो वज्रकर्णाच्या उद्धटपणामुळे आपल्याला निद्रा येत नसल्याचे सांगतो. त्यामुळे आपण वज्रकर्णाचा वध करण्याचा निश्चय केला आहे असे सांगतो. हे ऐकून विद्युदंगास वज्रकर्णाविषयी आत्मीयता व कणव उत्पन्न होते. वज्रकर्ण धर्मवंत असूनही सिंहोदर त्यास मारण्याचा विचार करीत आहे हे ऐकून तो वृत्तांत वज्रकर्णास सावध करण्यासाठी त्याच्याकडे येतो. सिंहोदर वज्रकर्णाभोवती वेढा घालून त्यास दूताकरवी शरण येण्यास सांगतो. आपण जिनदेव, जिनगुरूंखेरीज अन्य कुणासही नमस्कार न करण्याचे व्रत घेतले असून सिंहरथाने आपल्यावर उपकार केले असले तरी आपण त्यास नमस्कार करून व्रतभंग करणार नाही असा निश्चय करतो. तेव्हा सिंहरथ त्याच्या देशाचा विध्वंस करतो. त्याच्या भयाने सर्व लोक नगरातून जिवाच्या भीतीने पळून जातात. त्यामुळे हे राज्य असे निर्मनुष्य बनले असल्याचे कुणबी सांगतो. राम कुणब्यास रत्नहार देतो. कुणबी लक्ष्मणास चंद्रप्रभ मंदिरात घेऊन जातो. लक्ष्मण अन्न-फळांसाठी सिंहोदराच्या कटकात जातो. तेथे द्वारपाल लक्ष्मणास अडवितो, लक्ष्मण क्रोधित होतो, पण कलह नको म्हणून दशांगपूर येथे वज्रकर्णाच्या राज्यात येतो. वज्रकर्णाचा द्वारपाल त्याचे स्वागत करून राजाकडे घेऊन जातो. वज्रकर्णही त्याचे स्वागत करून त्यास भोजनाचा आग्रह करतो. पण आपला भाऊ व भावजय आपल्यासोबत असल्याचे सांगतो. तेव्हा वज्रकर्ण विविध प्रकारचे भोज्य पदार्थ घेऊन रामाकडे जातो व रामसीतेसही संतुष्ट करतो. आपण जिनदेव-जिनगुरूंखेरीज अन्य कुणास नमस्कार न करण्याचे व्रत घेतले असल्याने सिंहोदरास नमस्कार न केल्याने त्याने आपल्यावर उपद्रव निर्माण केला असल्याचे रामास सांगतो.

इकडे सिंहोदर बलदंड बनून भरताच्या आज्ञेचेही उल्लंघन करीत असतो. त्यामुळे लक्ष्मण त्याचे पारिपत्य करण्याच्या उद्देशाने सिंहोदराकडे येतो आणि त्यास आपण भरताचे दूत असून भरताने वज्रकर्णाशी विरोध न करण्याचे व त्याचे राज्य त्यास परत देण्याचा आदेश दिला असल्याचे सांगतो. त्यामुळे आपण वज्रकर्णाशी केलेला विरोध सोडून द्यावा. रामाच्या आज्ञेवरून आपण हा निरोप घेऊन आलो असल्याचे द्वारपालाकरवी कळवितो. त्यानंतर लक्ष्मण सिंहोदराच्या निवासस्थानी जाऊन त्यास समजावून सांगतो. वज्रकर्णाशी विरोध केला तर तुमचेच नुकसान होईल, त्यामुळे आपल्या हिताचा विचार करावा असे

सांगतो. एखाद्या किंकराने आपणास असा शहाणपणा शिकवावा शिवाय वज्रकर्ण आमचा किंकर असल्याने त्याने आमच्याशी विरोध मांडू नये आणि मुकाट्याने नमस्कार करावा अशी दर्पोक्ती सिंहोदर करतो. त्यावर लक्ष्मणाने निर्वाणीचा इशारा दिल्यावर सिंहोदर कोपतो आणि लक्ष्मणास पकडून आणण्याचा सैनिकांना आदेश देतो. पण लक्ष्मण सिंहरथाच्या निवासस्थानीच सर्वांना पुरून उरतो. तेव्हा लक्ष्मणाचा रुद्र अवतार पाहून सगळेचजण भयभीत होतात. सिंहोदर व लक्ष्मण यांच्यात घनघोर युद्ध होते. या युद्धाचे वर्णन करीत असताना कवीने वीर रसाचा उत्कृष्ट परिपोष केला आहे. शेवटी लक्ष्मणाने सिंहरथाचा पराभव केल्यावर सिंहरथाच्या स्त्रिया लक्ष्मणाकडे पतिभिक्षा मागू लागतात. लक्ष्मण सिंहोदरास रामाकडे घेऊन जातो तेव्हा राम सिंहोदर व वज्रकर्ण यांच्यात समेट घडवून आणतो आणि राज्य दोघांमध्ये अर्धेअर्धेवाटून देतो. लक्ष्मणास वज्रकर्णाच्या आठ व सिंहोदराच्या तीनशे कन्या दिल्या जातात. त्यानंतर राम, लक्ष्मण व सीता पंथक्रमण करीत एका गहन वनात प्रवेश करतात. अशा रीतीने बावीसावा अध्याय संपतो.

**तेवीसाव्या अध्यायात** घनदाट वनात लक्ष्मण सरोवर पाहावयास म्हणून जातो. तेथे कल्याणराव (पुढे कल्याणमाला) क्रीडेनिमित्त आला असता अर्धनारी नटेश्वर पाहून विचलित होतो. कल्याणराव लक्ष्मणास भोजनासाठी पाचारण करतो. पण आपला भाऊ-भावजय यांच्याविना आपण भोजन घेऊ शकत नसल्याचे लक्ष्मण सांगतो. तेव्हा कल्याणराव राम-सीतेसही आदरपूर्वक भोजन देतो. नंतर कल्याणमाला आपला वेश पालटून (कल्याणमाला बनून) पहुडला असता राम-सीतेच्या दृष्टीस पडतो. तेव्हा राम त्यास वस्तुस्थिती विचारतो. तेव्हा ती सांगते की, आपला पिता वालिखिल्य व माता पृथ्वीमती. दोघे सुखपूर्वक राज्य करीत असता पृथ्वीमती गर्भवती होते. त्याच वेळी एक म्लेच्छ राजा वालिखिल्याशी युद्ध करून त्यास जिंकून बंदी बनवितो. राज्य निर्नायकी बनण्याचा प्रसंग आला असता सर्व प्रधान पृथ्वीमतीच्या गर्भात असलेले बालक जन्मास आल्यावर त्यास राज्यपदावर आरूढ करावे असा निर्णय करतात. पण पुत्राऐवजी कन्येचा जन्म होतो. पण पुत्रजन्म झाल्याचे जाहीर करून त्यास पुरुषरूपाने राज्यावर स्थापित केले जाते. आणि त्यानंतर कल्याणमाला कल्याणरावाच्या रूपानेच वावरत आहे असे सांगते. ही करुण कहाणी ऐकल्यावर लक्ष्मण तिच्या पित्यास सोडवून आणण्याचे ठरवितो. त्यानंतर कल्याणमालेचा लक्ष्मणाशी विवाह होईल असे ठरवून रामत्रिकूट पुढे वनात निघून जाते. आपल्या विश्वासास तडा गेल्याचे पृथ्वीमतीस वाटू लागते. पुढे तिघेजण नर्मदेतीरी महावनात आले असता सीतेस अपशकुन होऊ लागतात. परिणामतः भिल्लांची सेना

त्यांच्यावर चाल करून येते. भिल्ल व लक्ष्मण यांच्यात भीषण युद्ध होते. शेवटी लक्ष्मणाचे अतुलनीय शौर्य पाहून भिल्ल त्यास शरण येतो व आपला पूर्ववृत्तांत कथन करतो. कोसंबी नगरीतील विश्वानळ ब्राह्मणाची पत्नी गर्भवती बनून योग्य काळी रौद्रभूतीस जन्म देते. पण कुव्यसनाधीन होऊन त्या नगरीच्या धरणीश्वराच्या -राजाच्या घरी चोरी करीत असताना तो तराळाकडून पकडला जातो. त्याचा वध करण्याची शिक्षा दिली जाते, पण एक जैन व्यापारी त्याची सुटका करतो. त्यानंतर या गहन वनात येऊन मी अनेक राजांना जिंकले, पण आज लक्ष्मणाकडून पराजित झालो आहे. तो रामाच्या चरणी मस्तक टेकवून जीवदान मागतो. त्याच भिल्लराजाने कल्याणमालेचा पिता वालिखिल्य यास बंदी बनविलेले असते. राम बालिखिल्यास सोडून देण्यास सांगतो आणि त्या रौद्रभूती भिल्लास जिनपूजनाचा उपदेश देतो. कल्याणमाला व वालिखिल्याची भेट घडवून आणली जाते. रौद्रभूती कल्याणमालेच्या चरणावर मस्तक ठेवतो. सिंहोदर राजास विनंती करून वालिखिल्यास त्याचे राज्य दिले जाते. याप्रमाणे लक्ष्मणाचा पराक्रम, वालिखिल्याची सुटका व कल्याणमाला परिणय या रोचक घटनांनी भरलेला हा २३ अध्याय संपविला आहे.

**चोविसाव्या अध्यायात** राम-सीता-लक्ष्मण नंदनवनासमान सुंदर पण गहन वनात प्रवेश करतात. तिथे एक सुंदर नदी असते. तिचे पाणी नितळ व रोगनिवारक असते. या महावनात सीतेला तहान लागते. सीतेस विश्रांती मिळावी यासाठी तिघेही एका वृक्षाखाली सावलीत बसतात. तिथून एक गाव दिसते. त्या गावात जाऊन विहिरीचे पाणी प्यावे या हेतूने गावात विहिरीजवळ पोहोचतात, तर तिथे खोलवरचे पाणी काढण्यासाठी चामड्याची मोट चालत असलेली दिसते. चामड्यातून आलेले पाणी अपेय आहे, ते पाणी आपल्याला पिता येणार नाही. त्यापेक्षा जिनउच्चार हेच शीतल जल आहे, असे म्हणून सीता मोटेचे पाणी पिण्याचे नाकारते. हे संपूर्ण गाव कुणब्यांचे आहे, तिथे एकमेव कपिल ब्राह्मण आहे असे त्यांना समजते. ते तिघे पाणी मिळण्याच्या अपेक्षेने ब्राह्मणाच्या घरी पोहोचतात. ब्राह्मणपत्नी त्यांच्यासाठी भांड्यातून पाणी आणते, तेवढ्यात कपिल ब्राह्मण येतो आणि आपण तापीचे पाणी देखील गाळून पीत आहात म्हणून लक्ष्मणावर कोप करतो आणि त्याचा अपमान करतो. राम-लक्ष्मण-सीता यांना यज्ञशाळेत का राहू दिले? म्हणून ब्राह्मणीवर कोप करतो आणि तिला मारझोडही करतो. तेव्हा लक्ष्मण त्या ब्राह्मणाच्या अंगावर धावून जातो. त्याला डोक्यावर उचलून गरगर फिरवून जमिनीवर आपटण्याच्या तयारीत असतो, तेव्हा राम त्याला अडवतो. ब्राह्मण घरात पळून जातो आणि लपून बसतो. अशा भांडखोर ब्राह्मणाच्या घरी राहण्यापेक्षा वनात झाडाखाली राहणे बरे, असे म्हणून

तिघेही वनात निघून जातात आणि वडाच्या झाडाखाली मुक्काम करतात. त्यानंतर रामत्रिकूट दक्षिणेस निघून जाते. तेथे वृक्षावर एका यक्षाचा अधिवास असतो. तहानेने जीव व्याकुळ झाला असला तरी चामड्याचा स्पर्श झालेले पाणी प्याले नाहीत, हे जाणून यक्ष त्यांना धर्मनिष्ठ समजून रात्रीतून त्यांच्यासाठी अमरावतीसमान एक सुंदर नगर वसवितो आणि त्यांना झाडाखालून उचलून नगरातील महालयात त्यांना आणून सोडतो. सकाळी निद्रा समाप्त होता होता त्यांना जाणवते की रात्री तर आपण वृक्षातळी झोपलो होतो, मग आता महालयात कसे काय आलो? म्हणून तिघेही आश्चर्यचकित होतात. तेवढ्यात तो यक्षनायक तिथे उपस्थित होऊन हे मंदिर आपणच बनविले असून आपण इथे सुखपूर्वक जिनशासन पालन करीत वास करावा अशी विनंती करतो. आपल्या वास्तव्याने इथे सर्वांचा उद्धार होईल असेही त्यांना सांगतो. त्यानंतर जिनशासनामध्ये रंगलेला यक्ष त्या नगरीमध्ये आसपासच्या श्रावकांना व पंडितांना बोलावून तिथे त्यांना वसवितो.

इथे श्रेणिक गौतमस्वामींना प्रश्न विचारतो की कपिलाच्या घरी रामलक्ष्मणांचा अपमान झाल्यावर ते तिथे निघून गेल्यावर तिथे काय घडले. कपिल ब्राह्मण एके दिवशी बायकोवर कोप करून लाकडे आणण्यासाठी वनात गेला, तर तिथे अचानकच एक अप्रतिम नगरी पाहून तो अचंभित झाला. हे अचानकच कसे काय घडले? याचा विचार करीत असता एक मायाविनी यक्षिणी त्याच्यासमोर येऊन हे रामाचे नगर आहे असे त्यास सांगते. कपिल रामदेवास भेटण्यास उत्सुक होतो, तेव्हा ती यक्षिणी त्यास सांगते की, रामदेव जिनधर्मी व्रती श्रावकांशिवाय अन्य कुणासही भेटत नाहीत. शिवाय रामदेवास भेटण्याच्या मार्गामध्ये अनेक दरवाजे, तिथे दरबानांबरोबरच वाघ, सिंह आदि प्राणी असून अणुव्रतधारी, शीलव्रती, सदाचारी, सम्यक्त्वी श्रावकांखेरीज अन्य कुणालाही ते आत जाऊ देत नाहीत, असे सांगते. कोणत्या तरी उपायाने रामदेवांस भेटून त्याच्या कृपेने काही धन कसे प्राप्त करावे? या विचारात असतानाच त्यास वनामध्ये एका मुनींचे दर्शन घडते. कपिलांनी मुनींना नमस्कार केला असता मुनी त्यास जैन धर्म, व्रते यांविषयी आणि त्यांच्या प्रभावाविषयी ब्राह्मणास सांगतात. तेव्हा ब्राह्मण मिथ्याधर्माचा त्याग करून जैनधर्मी बनतो आणि श्रावकाची व्रते ग्रहण करतो. घरी परतून आपल्या पत्नीस हे आश्चर्य सांगतो. तेव्हा त्याची पत्नीही जैन धर्म व व्रते स्वीकारते. त्यानंतर मुनींनी सांगितलेल्या उपदेशानुसार ब्राह्मण–ब्राह्मणी जैन व्रतांचे काटेकोरपणे पालन करू लागतात. त्यानंतर एकदा ते दोघेही आपल्या मुलांसह रामदेवांच्या दर्शनासाठी निघतात. राजप्रासादात प्रवेश करीत असताना लक्ष्मण व सीता त्यांना ओळखतात. दीर–भावजय त्यांच्याविषयी चर्चा करीत असताना

कपिल त्यांना ओळखतो आणि आपण ज्यांना घरातून पाणी न देता अपमान करून घालवून दिले तेच हे आहेत हे ओळखून आणि लक्ष्मणाने आपल्याला कसे उचलून आपटण्याचा प्रयत्न केला होता हे आठवून ब्राह्मण पत्नीसह तिथून पळून जाऊ लागतो. राम लोकांना मोठे दान देतो, आपणांसही दान मिळेल या आशेने राममंदिराकडे आलो, पण लक्ष्मण त्यांना पकडून रामापाशी आणतो. राम त्याला अभय देतो त्यामुळे त्यास धीर येतो. आपण यांचा अपमान केला याचा ब्राह्मणास पश्चात्ताप होतो. आपण मिथ्याभाव व मिथ्याचरण केले यामुळे ब्राह्मण पश्चात्तापदग्ध होतो. पण राम त्याच्यावर कृपेचा वर्षाव करतो, त्याचे दारिद्र्य दूर करतो. त्याच्या झोपडीच्या ठिकाणी सुंदर प्रासाद बनवून देतो. ब्राह्मण यापुढे निष्ठापूर्वक जैन धर्माचे पालन करू लागतो. रामामुळे व जैन धर्माच्या प्रभावामुळे आपल्याला हे वैभव प्राप्त झाले. राम-सीता यांचा अपमान केल्याचा सल त्यास निरंतर बोचू लागतो. त्यामुळे त्याच्या मनात वैराग्याचे विचार घोळू लागतात. शेवटी तो गृहत्याग करून दीक्षा ग्रहण करतो. अशा रीतीने राम-सीता यांच्या अपमानाची, वनात त्यांना वैभव प्राप्त झाल्याची, कपिल ब्राह्मणाच्या दीक्षेची कथा या अध्यायात वर्णिली गेली आहे.

येथे गुणकीर्तींची रचना संपते. यापुढचा पंचविसावा एक अध्याय भुवनकीर्ती यांनी लिहिला आहे.

**पंचविसाव्या अध्यायात** लक्ष्मण व वनमाला यांच्या विवाहाची मधुर कथा आली आहे. यक्षाचा निरोप घेऊन व यक्षनगरी सोडून राम-लक्ष्मण-सीता पुढे वनात जातात. यक्ष त्यांच्या वियोगाने दुःखी बनतो, त्यास वैधव्य (दुःख) प्राप्त होते. रामाशिवाय यक्षनगरी उदास बनते.

रामत्रिकूट पुढे विजयपुर येथे एका वडाखाली थांबते. तिकडे राजा पृथ्वीधर आणि राणी इंद्राणी यांची कन्या वनमाला कोणास द्यावी असे नैमित्तिकास विचारले असता वनमालेच्या मनात लक्ष्मणाचे वर्णन ऐकून त्याच्याविषयी आकर्षण उत्पन्न होते. पण लक्ष्मण वनवासास निघून गेला असल्याने इंद्रपुरीचा राजा बालमित्र याच्याशी वनमालेने विवाह करावा असे सुचविले जाते. पण वनमाला मात्र लक्ष्मणाच्या विरहामुळे व्याकुळ होत असते. या ठिकाणी वनमालेचे विरहदुःख वर्णन करीत असताना कवीने वियोग शृंगार रसाचा उत्कृष्ट परिपोष केला आहे. वनमाला लक्ष्मणासाठी उपोषण करते आणि आपल्या सख्यांसह रात्री पूजनासाठी म्हणून नगराबाहेरील जिनमंदिरात जाते. रात्री वनमाला सख्यांना सोडून एकटीच आत्महत्येच्या विचाराने वनात निघते. त्यावेळी रामलक्ष्मणसीता नेमके त्याच वनामध्ये मुक्काम करून असतात. वनमाला पद्मिनी जातीची उत्तम स्त्री असते,

त्यामुळे तिच्या शरीराचा सुगंध आसमंतात पसरत असतो. त्या सुगंधाने धुंद बनून लक्ष्मण त्या सुगंधाच्या शोधात बाहेर पडतो. तिथे वडाच्या झाडाखाली त्यास वनमाला दिसते. झाडाआडून लक्ष्मण तिच्या सर्व क्रिया पाहात असतो. लक्ष्मणाशी आपले मिळन होऊ शकले नाही म्हणून आपल्या कर्माला दोष देत वनमाला आपले अर्धेवस्त्र फाडून व त्याचा फास बनवून वडाच्या फांदीला फाशी लावून आत्महत्येचा प्रयत्न करीत असते. दगडावर दगड रचून व त्यावर चढून आपल्या गळ्यात फास अडकवून पायाखालचा दगड ढकलून देणार तेवढ्यात लक्ष्मण तिला वरचेवर पकडतो आणि ज्या लक्ष्मणासाठी तू फाशी घेत आहेस तो लक्ष्मण मीच असल्याचे तो तिला सांगतो आणि वनमालेस सोबत घेऊन रामाकडे येतो. इकडे राम-सीता लक्ष्मण कुटीमध्ये नसल्याचे पाहून त्यास हाकारू लागतात. लक्ष्मण वनमालेसह यतो आणि सर्वांची भेट होते. तिकडे मंदिरात सख्यांना वनमाला नसल्याचे समजल्यावर त्या सर्वत्र तिला शोधत फिरतात. पृथ्वीधर राजास दूतांकरवी वनमाला राम-लक्ष्मणांपाशी असल्याचे समजते. त्यास आनंद होतो आणि वनमाला लक्ष्मणास देऊ करतो. नंतर सर्वांना घेऊन उत्सवपूर्वक नगरात प्रवेश करतो. सर्वांचा यथोचित आदर-सत्कार करून वनमालेचा लक्ष्मणाशी विवाह करवून दिला जातो आणि त्यांच्यासाठी भ्रमरपुरनगर वसविले जाते. इथे गुणकीर्तींनी रचलेली रामकथा संपते आणि ग्रंथ अपूर्णच रचतो.

पुढे **सव्वीसाव्या अध्यायाची** रचना रत्नकीर्ती यांनी केली आहे. गुणकीर्तींचा अपूर्ण राहिलेला ग्रंथ रत्नकीर्तींनी पुढे रचण्याचा प्रयत्न अवश्य केला, एकमात्र अध्यायाची रचना करून तेही तो ग्रंथ पुरा करू शकले नाहीत.

या अध्यायात अनंतवीर्य किंवा अतिवीर्य राजाची कथा येते. पृथ्वीधर व राम राजसभेत सुखपूर्वक बसले असता एक दूत लखोटा घेऊन येतो. आपल्या इंद्रासमान पराक्रमी राजाची स्तुती करून सर्व म्लेच्छ राजे, विजयशार्दूल, अंग, पांचाल, पौंड्र, सुभद्र, मणिभद्र, साधुभद्र, सिंहरथ, सिंहवीर्य आदी सर्व राजे त्याच्या अंकित असून मी त्यांचाच संदेश घेऊन आलो आहे. त्यानुसार भरताने आपले सेवकत्व स्वीकारावे असे सांगून भरत यास नाकारल्याने त्याच्याशी लढण्यासाठी पृथ्वीधर राजानेही आपल्याला साहाय्य करावे यासाठी आपण हे पत्र घेऊन आलो असल्याचे दूत निवेदन करतो. त्यावेळी त्यास भरताने नेमके काय उत्तर दिले? असे पृथ्वीधराने विचारले असता भरत व शत्रुघ्नाने अनंतवीर्यास गाढवाची, कोल्ह्याची उपमा देऊन त्याच्या सेवकास -दूतास फरफटत नेऊन अपमानित केल्याने क्रोधित झालेला अनंतवीर्य आता भरतावर चाल करून जात आहे. अशा रीतीने

भरताविषयीची अपमानजनक वाक्ये ऐकून लक्ष्मण अनंतवीर्याशी लढाई करण्यासाठी जाण्यास सिद्ध होतो. पृथ्वीधराचे पुत्रही अनंतवीर्यावर कुपित होतात, परंतु अनंतवीर्याचे सैन्यबल प्रचंड असल्याने त्याच्या प्रत्यक्ष समर न करता कूटनीतीचा वापर करून युद्ध करावे आणि प्राणिसंहार व नरसंहार टाळावा. असे म्हणून पृथ्वीधराच्या पुत्रांसह स्वतः राम व लक्ष्मण नर्तकीच्या रूपाने अनंतवीर्याच्या सभेत प्रवेश करतात. अनंतवीर्य नर्तकीवर लुब्ध होतो. नर्तकी मोठ्या चातुर्याने अनंतवीर्यास सांगते की, भरतासारख्या बलाढ्य राजाशी लढून आत्मघात करू नये, असा सूचक संदेश गीतातून देतात व कौशल्याने अनंतवीर्याचे केस पकडून त्यास बंदी बनवितात आणि सभेतील सर्व राजांना आह्वान देऊन भयभीत करतात. अनंतवीर्यास पकडून लक्ष्मणापाशी आणले असता तो त्याचा शिरच्छेद करण्यासाठी तलवार उचलतो, पण राम अनंतवीर्यास अभय देतो आणि त्याचे राज्य त्यास परत देतो. परंतु अभय मिळालेल्या अनंतवीर्याच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न होते आणि तो श्रुतिधर मुनींपाशी दीक्षा ग्रहण करतो. अशा प्रकारे अनंतवीर्याच्या दीक्षेचा प्रसंग या अध्यायात वर्णिला आहे.

पुढे **सत्तावीसाव्या अध्याय** गुणकीर्तींच्या नावेच आला आहे. जितपद्मेशी लक्ष्मणाच्या विवाहप्रसंगाचे वर्णन करणारा हा अध्याय वीर व अद्‌भुत रसाने परिप्लुत आहे. अनंतवीर्याने दीक्षा घेतल्यानंतर राम त्याचे राज्य त्याचा पुत्र विजयसेन यास देतो. तेव्हा विजयसेनाच्या दोन बहिणी अरविंदा व रतिमाला यांचा लक्ष्मणाशी विवाह करवून दिला जातो. इकडे अयोध्येत अनंतवीर्यास दोन नर्तकींनी पकडल्याची वार्ता पोहोचते आणि लक्ष्मण त्याची थट्टा करतो, परंतु अनंतवीर्य आपला शत्रू असला तरी आता तो मुनी बनला असल्याने तो पूजनीय बनला आहे असे शत्रुघ्नास समजावून भरत आपल्या परिवारासह अनंतवीर्य मुनींच्या दर्शनासाठी निघतो. त्यास वंदन करून अत्यंत विनयपूर्वक मुनींविषयी पूज्यभाव व्यक्त करतो  आपल्या सैन्यानिशी परत जातो. ज्या कुणा नर्तकींनी अनंतवीर्याचा पराभव केला त्या नक्कीच कुणीतरी शासनदेवता असल्या पाहिजेत असे भरत समजतो.

इकडे राम-सीता-लक्ष्मण विजयपुर नगरातून बाहेर पडून पुढे वनगमन करू लागतात. इथे कवीने वनमालेच्या लक्ष्मणाच्या वियोगाचा प्रसंग वर्णन केला आहे आणि त्यात वियोग शृंगार रसाचा उत्तम परिपोष झाला आहे. वनातून मार्गक्रमण करीत ते त्रिकूट क्षेमांजली नगराजवळच्या सौमनस नामक उद्यानात येते. लक्ष्मण कौतुकाने ते नगर पाहण्यास निघतो. नगरात चौकाचौकात लोक अरिंदम राजाची कन्या जितपद्मा हिच्या असामान्य सौंदर्याची चर्चा करीत असतात. ती ऐकून लक्ष्मणाच्या मनात तिच्याविषयी

कुतूहल आणि आसक्ती निर्माण होते. पण अरिंदम राजाची शक्ती सहन करू शकणारा वीर पुरुषच तिच्याशी विवाह करू शकेल, अशी तिची अटही त्यास समजते. जितपद्मेची इच्छा करणारे अनेक राजकुमार अरिंदमाची शक्ती सहन न करू शकल्याने निराश होऊन परत गेल्याचेही लक्ष्मणास समजते. हे ऐकून लक्ष्मण अरिंदमाच्या राजसभेत जातो. तेथे तो आपण भरताचा सेवक असून जितपद्मेचा मानभंग करण्यासाठी आलो असल्याचे सांगतो. अरिंदम आपल्या शक्ती लक्ष्मणावर फेकतो, पण लक्ष्मण त्या अगदी लीलया पकडतो आणि जितपद्मेस घेऊन रामाकडे जातो. नंतर राम-सीतेच्या अनुमतीने लक्ष्मणाचा जितपद्मेशी विवाह होतो.

**अट्ठावीसाव्या अध्यायात** कुलभूषण-देशभूषण मुनींवरील उपसर्ग निवारणाची कथा येते. या प्रसंगात कवीने रौद्र व भयानक रसांचा उत्कृष्ट आविष्कार केला आहे. राम, लक्ष्मण व सीता वनक्रीडा करीत पुढे पशु-पक्षी, लता-वृक्ष, नद्या-निर्झर, पर्वत-टेकड्या पाहात वनविहार करीत पुढे जात असताना त्यांना वंशधर नावाचा पर्वत दिसतो. तिथे ते अत्यंत दाट अशा बांबूच्या वनापाशी पोहोचतात. तिथे संध्याकाळच्या समयी तेथील लोक गावाबाहेर पलायन करीत असतात. चौकशी करता त्यांना असे समजते की, गेले तीन दिवस तिथे पर्वतावर रात्रीच्या समयी भयंकर आवाज निघत असतात. त्यामुळे समस्त भूमी कंपित होत असते. त्यामुळे भयभीत होऊन लोक पळून जात असतात. तेव्हा राम-लक्ष्मण हा काय प्रकार आहे, हे पाहण्यासाठी पुढे जाण्याचा विचार करतात. सीता भयभीत होऊन राम-लक्ष्मणांना पर्वतावर जाण्यापासून परावृत्त करते आणि आपणही या सर्व लोकांसमवेत इथून दूर जाऊ असे सुचविते. पण हा उपसर्ग कशामुळे होत आहे, हे पाहण्यासाठी राम-लक्ष्मण त्या घनदाट अरण्यातून पर्वतशिखरापर्यंत जातात, तर तिथे दोन मुनी ध्यानस्थ असलेले दिसतात. त्या कुलभूषण व देशभूषण या मुनींवर तेथे घोर उपसर्ग होत असतो. मुनींची शरीरे मुंग्या, साप, विंचू अशा अनेक त्रासदायक कीटकांनी वेढलेली असतात. राम-लक्ष्मण आपल्या बाणांच्या टोकांनी त्या प्राण्याना दूर सारता. मुंग्यांना झटकून बाजूला सारतात. अशा रीतीने मुनींना उपद्रव देणाऱ्या प्राण्यांना दूर सारून तिघेही मुनींना वंदन करून त्यांच्यासमोर गीतगायन करू लागतात. सीता विलासपूर्ण नृत्य करते. जसजसा अंधार पडू लागतो, तसतसे घोर-भयानक रूपे असलेले राक्षस अक्राळ-विक्राळ विद्रूप धारण करून तेथे भयंकर आवाज करू लागतात. तेव्हा राम-लक्ष्मण आपल्या बाणांनी त्यांना पळवून लावतात. उपसर्ग दूर झाल्याने दोन्ही मुनींना तत्काळ केवलज्ञान प्राप्त होते. मुनींना केवलज्ञान प्राप्त झाल्याच्या निमित्ताने इंद्रांकरवी तेथे महान आनंदोत्सव होऊ लागतो.

त्यानंतर दिवस उगवल्यावर मुनी ध्यान विसर्जन करतात आणि उपदेश देऊ लागतात. राम-लक्ष्मणांच्या जिज्ञासा-प्रश्नास अनुसरून मुनी आपल्यावरील उपसर्गाची व आपल्या पूर्वभवांची कथा कथन करू लागतात.

पद्मिनी नामक नगरात विजयपर्वत राजा आपली पत्नी धारिणी हिच्यासह सुखपूर्वक राज्य करीत असतो. त्यांचा अमृतस्वर नावाचा अत्यंत चतुर दूत असतो. त्याला उदित व मुदित नावाचे दोन पुत्र असतात. एकदा दूतकर्म करण्यासाठी अमृतस्वर नामक आपल्या मित्रासमवेत प्रवासास जातो. अमृतस्वराच्या अन्नावर जगणारा वसुभूती दुष्टभाव धारण करून त्याच्या पत्नीवर आसक्त बनलेला असतो. अमृतस्वराची पत्नीही वसुभूतीवर आसक्त असते. त्यामुळे तिच्या संमतीने प्रवासात असताना वसुभूती अमृतस्वरास रात्रीच्या समयी संधी साधून ठार मारतो. इकडे उदिताच्या पत्नीस ही वार्ता समजल्याने ती उदितास कथन करते. उदित वसुभूतीस ठार करतो. पुढच्या भवात तो म्लेच्छ जातीत उत्पन्न होतो.

त्यानंतर मतिवर्धन नावाचे एक तपस्वी आचार्य विहार करीत पद्मिनी नगरास येतात. त्यांच्यासोबत अनुद्धरा नावाची एक ज्येष्ठ आर्यिका असते. मुनिआगमनाची वार्ता दूत राजास सांगतो, तेव्हा राजा हत्तीवरून सपरिवार मुनिदर्शनासाठी निघतो. मुनींकडून धर्मोपदेश श्रवण करून विजयपर्वत राजा मुनिदीक्षा ग्रहण करतो. अमृतस्वराचे उदित व मुदित हे दोघे पुत्रही जिनोपदेश श्रवण करून दीक्षा ग्रहण करतात. त्याचवेळी पूर्वजन्मीचा वसुभूती वैरभाव धारण करून त्यांना वधण्यासाठी येतो. मुनी आपल्या शरीराचा त्याग करतात. सुदैवाने तेथे एक कुणबी भिल्ल सेनापती त्या म्लेच्छास मुनिहत्या करण्यापासून परावृत्त करतो. भिल्ल सेनापतीने त्यास का परावृत्त केले अशी रामाने पृच्छा केल्यावरून मुनी सांगू लागतात की,

पूर्वीच्या एका भवात पद्मखेट नामक नगरात वसुकांत व त्याची पत्नी सुकांता यांना जिनदास व अर्हद्दास अशी दोन मुले असतात. एकदा तेथे गुणसागर नामक मुनींचे आगमन होते. दोन्ही भाऊ मुनींना वंदन करण्यासाठी निघाले असता वाटेत एक पारधी सारस पक्ष्याच्या जोडप्यास पिंजऱ्यात घालून घेऊन जात असतो. जिनदास-अर्हद्दास यांना त्या पक्ष्यांची कणव येऊन दोघे पारध्यास पक्ष्यांना न मारण्यासाठी त्यांचे मूल्य म्हणून सात दीनार देऊ करतात. पण तो पारधी पक्षी देण्यास तयार होत नाही. तुंगभद्रा नावाची कुणब्याची बायको आपल्या नवऱ्यास ही बातमी सांगते. तेव्हा तो जिनदास नावाचा कुणबी मध्यस्थी करून त्या सारसाच्या जोडप्यास सोडवितो. पुढे तो कुणबी पुण्य जोडून मरण पावून एका राज्यात राजाचा प्रधान बनतो. पारधी तेथेच ब्राह्मण पुरोहित होतो. यमुना

त्याची पत्नी होते. कुणब्याची पत्नी तुंगभद्रा ब्राह्मणी होते. सारस पक्षी त्याच नगरात महाबल नावाचा सेनापती होतो. तो जयवंती नामक कन्येस वरतो. त्याच नगरात ब्राह्मणी मंत्र्याची यमुना नार होते. ती मिथ्यामती असते. यमुना जयवंतीचा द्वेष करीत असते. ती आपल्या नवऱ्यास जयवंती आपली वैरीण असून ती सतत आपला तिरस्कार करीत असते, त्यामुळे आपण तिचा वधच करावा असे सुचविते. पुढे तो ब्राह्मण पलाशकूट नगरीत मंत्र्याला भेटतो आणि तिला वाचवितो. त्यामुळे ब्राह्मणाचा द्वेष संपतो. तो गुपचूप येऊन राहतो. इकडे यमुनेला आनंद होतो. ती राजास आणखी काही स्त्रियांचा वध करण्यास सांगते. दोन्ही पुत्रांनाही मारून टाकण्यास सांगते. तेव्हा ब्राह्मण घाबरतो. एवढे मोठे पाप करण्यापेक्षा, आपला मृत्यू ओढवून घेण्यापेक्षा तो देवपालास बोलावून वार्ता कथन करतो. त्या ब्राह्मणीस बंदी बनविले जाते. ब्राह्मण जैनधर्म स्वीकारून समृद्ध बनतो. त्यानंतर एके दिवशी त्यास वनामध्ये पिहितास्रव नामक मुनींचे दर्शन घडते. तेथे दोघेही दीक्षा ग्रहण करतात. दोघे मुनी सम्मेद पर्वतावर तपसाधन करीत असतात. तेथे पुरोहित भिल्ल बनलेला असतो. मुनींना पाहून त्यास पूर्ववैराचे स्मरण होते. शस्त्र घेऊन तो मुनींवर वार करण्याच्या तयारीत असताना पूर्वभवीचा सारस, जो मरून मंत्री झाला होता, तेथे येतो व भिल्लाशी युद्ध करून त्यास पकडतो. ब्राह्मणास आपण मुनीस त्रास दिल्याचा पश्चात्ताप होतो आणि इथून पुढे पाप न करण्याचे चिंतन करीत मरण पावतो. पुढे मिथ्या तप करून ज्योतिष्क देव बनून सुख भोगतो. अरिष्टपुर नगरीत प्रियदत्त राजा व त्याच्या कनकावती व पद्मावती अशा दोन स्त्रिया असतात. हा ज्योतिष्क देव कनकावतीच्या कुशीत अनुंधर म्हणून जन्म घेतो. दुसरा रत्नचूल हा स्वर्गातील देव पद्मावतीच्या उदरी जन्म घेतो. प्रियदत्त अनुंधरास राज्य देऊन दीक्षा ग्रहण करतो. तो रत्नचूलाशी वैर घेऊन राज्य करतो.

इकडे नागपुर नगरीत नगरपती राजा व त्याची रूपी राणी सुप्रभा रत्नचूलास दिली जाते. अनुंधर कुपित होतो, तो रत्नचूलावर आक्रमण करून त्याचे राज्य जिंकून घेतो. तेव्हा विचित्रशूल त्याच्या मदतीस येतो. अनुंधराचा पाठलाग करून त्यास पकडतो. रत्नचूल उत्तम प्रकारे राज्य चालवितो. विचित्रशूलास दया येऊन तो अनुंधरास सोडून देतो. पुढे तो जटाधारी साधू बनून मिथ्या तप करीत राहतो. तो अनेक शिष्य गोळा करतो. कुरंग नगरात नृपचंग व त्याची पत्नी राणी सुरंगा, कन्या नागश्री या मिथ्या साधूस पाहतात. हा तापसी त्या नगरात मिथ्यामताचा प्रसार करतो. नगरराज्ञीची मात्र जिनधर्म व जिनगुरूंवर दृढतम श्रद्धा असते. राजा तिला आपण तापसी गुरूस भेटू या असे सांगतो त्याचा धर्म ऐकून मात्र राजा वनात जातो. सुरंगा आपली मुलगी नागश्रीस त्या तापसाकडे जाण्यास सांगते. नागश्री

आपल्या दासीस त्या तापसाकडे पाठविते, पण तो तुमच्या कन्येस माझ्याकडे पाठव असे सांगतो. हे ऐकून राणी राजास आपला गुरू विषयलंपट असल्याचे सांगते. शेवटी त्या तापसास पकडून गाढवावरून त्याची धिंड काढून त्यास देशातून बाहेर घालवून दिले जाते. राजा दिगंबर गुरूपाशी आणि तापस वाराणसीस जातो. इकडे रत्नचूल पूर्वपुण्याने राज्य भोगतो आणि अंती त्यास वैराग्य प्राप्त होऊन तो दीक्षा ग्रहण करतो. पुढच्या जन्मामध्ये सिद्धार्थपुरी नगरीत राजा क्षेमंकर आणि विमला राणीच्या उदरी कुलभूषण-देशभूषण हे पुत्र होऊन जन्मतात. त्यांना योग्य समयी विद्याभ्यासासाठी जैन गुरूंकडे पाठविले जाते. पुढे बारा वर्षेगुरुगृही राहून व विद्याभ्यास पूर्ण करून, समस्त कला व शास्त्रांमध्ये पारंगत बनून गृही परततात. त्यावेळी त्यांची बहीण कमलावती गवाक्षात (खिडकीत) बसून कौतुकाने त्यांच्याकडे पाहात असते. दोन्ही भावांची दृष्टी एकाच वेळी तिच्यावर पडते आणि दोघांच्याही मनांमध्ये तिच्याविषयी आसक्ती उत्पन्न होते आणि ते तिच्याशी विवाह करण्याचा भाव धरतात. त्याचवेळी भाट स्तुतिगीत गाताना म्हणतात की, या दोन पुत्रांची भगिनी धन्य आहे की जी यावेळी गवाक्षात बसून दोघांचे निरीक्षण करीत आहे. हे ऐकताच दोघांच्याही मनाच आपल्या विचाराबद्दल पश्चात्ताप होऊन विरक्तीचे भाव उत्पन्न होतात. दोघेही अनंतवीर्य मुनींपाशी येऊन त्यांच्याकडून दीक्षा ग्रहण करतात. इथे या वंशगिरीवर तप, ध्यान करीत असताना पूर्वजन्मीचा तो तापसी व्यंतर देव बनून इथे आला आणि त्याने आमच्यावर उपसर्ग केला आहे. बलभद्र राम व वसुदेव लक्ष्मण असलेल्या आपण हा उपसर्ग दूर केला आहे. त्यानंतर राम-लक्ष्मण तिथेच राहून तिथे जिनमंदिरे बनवितात, पुढे त्या पर्वतास रामगिरी हे नाव प्राप्त होते. त्यानंतर ते रामत्रिकूट दंडक अरण्यात निघून जाते.

इथपर्यंत गुणकीर्ती यांनी लिहिलेले २८ प्रसंग पूर्वार्धामध्ये पूर्ण झाले आहेत. त्यानंतर गुणकीर्ती यांच्या अपूर्ण राहिलेल्या रामायणाचा उत्तरार्ध भट्टारक महीचंद्र यांचे शिष्य ब्रह्मचिंतामणीसागर यांनी पूर्ण केला आहे. हा रामायण ग्रंथ पूर्वी संस्कृत भाषेत होता, तो आपण गुरुकृपेने महाराष्ट्रीमध्ये पूर्ण केला आहे, असे ब्रह्मचिंतामणी यांनी म्हटले आहे.

पुढे **एकोणतिसाव्या अध्यायात** जटायूची कथा आली आहे. राम, लक्ष्मण व सीता कुलभूषण-देशभूषण मुनींना वंदन करून कर्णरवा नदीच्या पलीकडे असलेल्या दंडकारण्यात प्रवेश करतात. तेथे एका वृक्षाखाली पाकसिद्धी करून थांबले असता आकाशमार्गाने दोन चारण मुनी तेथे येतात. त्यांचे यथोक्त रीतीने पडगाहन व जयजयकार करून तिघेजण मोठ्या भक्तिभावाने त्यांना आहारदान देतात. त्याचवेळी त्या वृक्षावर एक गृद्ध (गिधाड) बसलेले असते. गृद्धास पाहून सीता भयभीत होते, पण मुनींचे दर्शन होताच

पक्ष्यास जातिस्मरण होते आणि तो झेपावून मुनिचरणी पडतो. रामास त्या पक्ष्यांविषयी कुतूहल उत्पन्न होऊन तो त्या पक्ष्याविषयी मुनींना विचारतो. तेव्हा मुनी त्या पक्ष्याच्या पूर्वभवाच्या निमित्ताने दंडक राजाची कथा निरूपण करतात.

पूर्व भवामध्ये हा गृद्ध याच वनात दंडक नावाचा राजा होता. तो कुदेव, कुगुरु, कुशास्त्र यांची भक्ती करण्यात तत्पर होता. एके दिवशी श्रुतसागर नावाचे एक जिनमुनी ह्या वनात येऊन ध्यान-तपमग्न झाले. जिनमुनीस पाहून दंडक राजास क्रोध आला आणि त्याने एक मेलेला साप त्या ध्यानस्थ मुनींच्या गळ्यात टाकला. मुनी उपसर्ग सहन करीत कित्येक दिवस तसेच ध्यान-तपमग्न राहिले. त्यानंतर एके दिवशी महाजनांनी राजास विनंती केल्यावरून त्याच्या मनात उपशमभाव उत्पन्न झाला आणि त्याने तो सर्प बाजूला काढला. त्यास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन त्याने जैन धर्म स्वीकारला. इकडे तापसी राजाचा द्वेष करून त्यास सद्धर्मापासून -जैन धर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करू लागला. मोठ्या गोडीगुलाबीने राजाच्या राणीशी संधान बांधून तो तिच्याशी कुकर्म करू लागला. त्याने राणीचा शीलभंग केला आणि मुनीची पिंछी व कमंडलू चोरून ते राणीच्या महाली टाकले आणि निर्ग्रंथ बनून राणीशी इंद्रियसुख भोगू लागला. त्याचे हे कृत्य एके दिवशी राजाने पाहिले आणि मुनींविषयी त्याच्या मनात अपार क्रोध उत्पन्न झाला. त्यानंतर तो मुनींचा द्वेषच करू लागला आणि वनामध्ये तप-ध्यानमग्न असलेल्या अनेक मुनींचा त्याने वधच केला. त्या मुनींपैकी वाचलेल्या तपसागर मुनींनी  समुद्घात करून दंडक राजा, त्याचे प्रजाजन व संपूर्ण दंडकारण्य जाळून टाकले. दंडक राजा अग्नीत भस्म होऊन निगोदयोनीत महान दुःख भोगू लागला. अशा रीतीने तो पुढे हा गिधाड बनला आणि आता त्याला जातिस्मरण होऊन तो इथे आला आहे. राम-लक्ष्मण-सीता यांच्यासह जटायूसही धर्मलाभ झाल्याने त्याने श्रावकाची व्रते ग्रहण केली आणि राम-सीतेपाशी राहू लागला. सीतेस व रामलक्ष्मणांसही पक्ष्याचा लळा लागला . अशा रीतीने सर्वजण त्या दंडकारण्यात सुखपूर्वक वास करू लागले व इथे हा एकोणतिसावा अध्याय संपला. रविषेणकृत पद्मपुराणात विस्तारपूर्वक आलेली ही जटायूची कथा ब्रह्मचिंतामणीने संक्षिप्त रूपाने इथे वर्णिली आहे.

पुढे **तिसाव्या अध्यायात** शंभुकुमार वध व चंद्रनखेचा कपटाचार हा प्रसंग आला आहे. दंडकारण्यात चार महिने वास्तव्य केल्यानंतर एके दिवशी लक्ष्मण वनवनस्पतींची शोभा पाहण्यासाठी म्हणून बाहेर पडतो. दक्षिण दिशेकडून कसला तरी सुगंध येत होता, त्यावर आकर्षित होऊन लक्ष्मण कुतूहलापोटी तिकडे गेला, तर तिथे एका बांबूच्या

बेटामध्ये विजेसमान एक तलवार तळपत असलेली त्याच्या दृष्टीस पडतो. ती तलवार हस्तगत करून तिची धार पाहण्यासाठी लक्ष्मण त्याच तलवारीने त्या बांबूच्या बेटावर जोराने वार करतो. जाळी तुटल्यावर तलवारीस लागलेले रक्त पाहून त्यास मोठे आश्चर्य वाटते. लक्ष्मण बांबूच्या जाळीत डोकावून पाहतो तो त्यास तिथे एका तरुणाचे शीर तुटलेले दिसते. लक्ष्मणास अनर्थदंडाचा पश्चात्ताप होतो. इकडे गृद्ध लक्ष्मणास शोधू लागते. लक्ष्मण रामापाशी येऊन आपल्या हातून मोठा प्रमाद घडल्याचे सांगतो. खरदूषणाचा पुत्र चंद्रहास खड्गाच्या साधनेसाठी येथे वनात बारा वर्षांपासून तप करीत असताना त्याच्याच त्या खड्गाने आपल्या हातून अनवधानाने त्याची हत्या झाला असल्याचे सांगतो. आज आपल्या पुत्राची बारा वर्षांची साधना पूर्ण झाली, आता त्यास विद्या व चंद्रहास खड्ग प्राप्त झाले असेल असा विचार करीत रावणाची बहीण व खरदूषणाची पत्नी असलेली शंभुकाची माता चंद्रनखा मोठ्या आनंदाने वनात येते. तेथे येऊन पाहते तो तेथे बांबूचे बेट तुटून पडलेले दिसते. ती आपला हात पसरते, तर तिच्या हातात आपल्या पुत्राचे मस्तक येते. आपल्या पुत्राचा कुणीतरी वध केल्याचे पाहून ती पुत्रशोकाने विह्वल होऊन विलाप करू लागते. शंभुकास कुणी मारले असावे याचा शोध घेत वनात भ्रमण करीत असताना तिला वनात राम-लक्ष्मण दिसतात. राम-लक्ष्मणांचे सौंदर्य पाहून ती पुत्रशोकाचे दुःख विसरून लक्ष्मणावर मोहित होते. एका सुंदर स्त्रीचे रूप घेऊन ती लक्ष्मणास मोहित करण्याचा प्रयत्न करते. आपण चंद्रसेन राजाची कन्या असून पवनवेग नामक विद्याधराने आपले अपहरण करून इथे या वनात टाकले असल्याचे सांगते. आपले कौमार्य व्यर्थ गेले असून आपण माझा स्वीकार करावा अशी विनंती ती लक्ष्मणास करते. पण राम तिचे अंतरंग ओळखतो व तिला शीलपालनाचा उपदेश करतो. तेव्हा मात्र ती चिडून लक्ष्मणाने आपल्या पुत्राचा वध केला असल्याचे आपला पती खरदूषण यास सांगते. तसेच लक्ष्मणाने आपल्याशी लगट करून आपली कंचुकी फाडली खोटेच सांगते. आपला शीलभंग करण्याचाही प्रयत्न केला असल्याचे सांगते. त्यामुळे खरदूषण अत्यंत कुपित होऊन राम-लक्ष्मणांवर चाल करून येतो. लक्ष्मण खरदूषणाशी लढण्यासाठी जाताना रामास आपण संकटात पडलो तर सिंहध्वनी करू तेव्हा आपण माझ्या मदतीसाठी यावे असे सांगतो.

**एकतिसाव्या अध्यायात** चंद्रनखा आपला भाऊ रावणाकडे जाऊन त्यास अपमानाची खोटी कहाणी सांगते आणि त्याच्यासमोर सीतेच्या अप्रतिम लावण्याची स्तुती करते आणि आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी सांगते. सीतेच्या लावण्याचे वर्णन ऐकून रावण दंडकारण्यात येतो. सीतेस पाहून मायावी रूप धारण करून सिंहनाद करतो. तो

सिंहनाद ऐकून लक्ष्मणावर काहीतरी संकट आले आहे असे समजून सीतेस फुला-पानांमध्ये लपवून व जटायूस सीतेचे रक्षण करण्यास सांगून लक्ष्मणाच्या मदतीसाठी जातो. आपण सीतेस सोडून इथे कशासाठी आलात? असे लक्ष्मणाने विचारल्यावर कोणीतरी कपट केले आहे असे समजून रामास सीतेच्या रक्षणासाठी परत पाठवून देतो. इकडे रावण सीतेचे अपहरण करतो आणि सीतेस आपल्या विमानात घालून लंकेकडे निघतो. जटायू त्यास अडविण्याच्या प्रयत्न करतो तेव्हा रावण त्यास घायाळ करून निघून जातो. नंतर वाटेमध्ये रत्नजटी नावाचा विद्याधर सीतेचा आक्रोश ऐकून तिच्या मदतीस येतो. त्याचे व रावणाचे युद्ध होते. रावण त्याचा पराभव करून व त्याच्या सगळ्या विद्या हरण करून घेतो. सीता णमोकार मंत्राचा जप करीत मौन धारण करते. रावण सीतेस आपला स्वीकार करण्याची विनंती करतो, परंतु सीता आपण शीलव्रती असल्याने रामाखेरीज अन्य कुणाचा विचारही करू शकत नाही असे सांगते. रावण सीतेस लंकेतील प्रमोदवनात अशोक वृक्षाखाली ठेवतो. सीता आपला स्वीकार करीत नाही या विचाराने तो अत्यंत खिन्न होतो. आपण गुरूंकडून कुणा अन्य स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी संबंध न ठेवण्याचे व्रत घेतले असल्याने तो वारंवार सीतेची मनधरणी करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी आपली पत्नी मंदोदरी हिला पाठवितो. मंदोदरी सीतेसमोर रावणाचे बल, ऐश्वर्य, प्रभुत्व यांचे वर्णन करून त्याचा स्वीकार करण्याची विनंती करते. इथे हा एकतिसावा प्रसंग संपला आहे.

**बत्तीसाव्या अध्यायात** राम वनात येऊन पाहतो तो फुलांमध्ये सीता नाही हे त्या निदर्शनास येते. त्यामुळे तो निराश व विह्वळ होतो. इकडे तिकडे पाहिल्यावर त्यास जटायू मारला गेला आहे असे दिसते. तो निराश होऊन एका वृक्षाखाली बसला असता तिकडे लक्ष्मण युद्ध करीत असलेल्या ठिकाणी विराधित नावाचा खरदूषणाचा शत्रू तेथे असतो. खरदूषणाने विराधिताचे पाताळलंकेचे राज्य हिरावून घेतलेले असते. लक्ष्मणाकरवी खरदूषणाचा वध करून आपले राज्य परत मिळवावे या हेतूने विराधित लक्ष्मणास मदतीचा हात पुढे करतो. लक्ष्मणही त्यास मदतीचे आश्वासन देऊन त्याच्या मदतीने खरदूषणाचा पराजय करतो. त्यानंतर विराधित लक्ष्मणासह रामाकडे येतो. राम सीतेचा शोध घेण्याच्या प्रयत्न असतो. लक्ष्मण व विराधितही सीतेचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात, पण सीता काही सापडत नाही. विराधिताच्या काही सैनिकांना सीतेचे अलंकार सापडतात. त्यावरून कुणीतरी सीतेस दक्षिणेकडे घेऊन गेला असल्याचे समजते. त्यानंतर रावणास खरदूषणाचा वध झाल्याचे समजते. राम-लक्ष्मणांसहित विराधित पाताळलंकेत पोहोचतो. तिथे राम-लक्ष्मण चंद्रप्रभ मंदिरात निवास करतात. इकडे लंकेत रावण सीतेची समजूत काढून तिला

आपल्याला वश करून घेण्याचा प्रयत्न करतो. आपल्या अठरा हजार राण्या असून त्या सर्वांमध्ये तुलाच पट्टराणीपद देईन असे तो सीतेस सांगतो. सीतेस वश करण्यासाठी तो मंदोदरीस पाठवितो, पण सीतेस वश करण्याचे मंदोदरीचे प्रयत्न असफल होतात. नंतर रावण पुन्हा सीतेस सांगतो, की आपण त्रिखंडाधिपती असून गुण-रूपानेही श्रेष्ठ आहोत. सीता मात्र रावणास शीलाचे महत्त्व सांगते. नंतर रावण भूत-प्रेते, शाकिनी-डाकिनी, वाघ-सिंह आदी रूपे धारण करून सीतेस भिवविण्याचा प्रयत्न करतो, पण सीता त्यासही भीक न घालता आपल्या शील व्रतामध्ये दृढ राहते. सीतेचे रुदन ऐकून विभीषण तिच्याकडे जातो, तेव्हा सीता आपला समस्त वृत्तांत त्यास कथन करून आपली व रामाची भेट घडवून आणावी अशी विनंती करते. त्यानंतर विभीषण भर सभेत रावणाची समजूत काढण्याचा प्रयत्न करतो व सीतेस वश करण्यामध्ये तुला अपयशच येईल असे सांगतो. पण रावण मदोद्धत बनून या पृथ्वीवरील सर्व रत्नांचा आपणच स्वामी असून सीतारत्नही आपलेच असून तिच्यावर आपलाच अधिकार आहे, अशी दर्पोक्ती करतो. त्यानंतर एके दिवशी विभीषण वनात गेला असता सीतेस दुरूनच पाहतो आणि त्याच्या मनात तिच्याविषयी कणव उत्पन्न होते. असे कथन करून ब्रह्मचिंतामणीने इथे ३२ वा अध्याय संपविला आहे.

पुढे **तेहतिसाव्या अध्यायात** सुग्रीवाची कथा आली आहे. सुग्रीवाची पत्नी तारामती हिच्यावर साहसगती नावाचा एक विद्याधर आसक्त होतो आणि तिला आपलीशी बनविण्यासाठी सुग्रीव बाहेर गेला असता सुग्रीवाचे हुबेहूब रूप धारण करून तारामतीकडे येतो. पण हात धुण्यासाठी त्याच्या हातावर पाणी घालीत असताना त्याच्या हातावर पद्म चिह्न न दिसल्यामुळे हा सुग्रीव नसून वेगळाच कुणीतरी आहे आणि हा त्याचा कपटाचार आहे हे ओळखते. पण इतर कुणासही त्याचे वास्तव रूप समजत नसल्याने आपणच सुग्रीव असल्याचे भासवून तो सिंहासनावर बसतो. तारामती सुग्रीवास बाहेर घालवून आपल्या महालात राहू लागते. नंतर वालीचा पुत्र तारामतीकडे आला असता तारामती त्यास हा तुझा काका नसल्याचे सांगते. सुग्रीवाच्या मुलांनाही साहसगतीचे रूप ओळखू न आल्याने जोपर्यंत ओळख पटत नाही तोपर्यंत त्याचा वध करू नये असा निर्णय करतात. त्यानंतर सत्य सुग्रीव येतो, पण दोघेही आपणच सुग्रीव असल्याचे आग्रहपूर्वक सांगतात. ते दोघे परस्परांशी भिडतात, पण कुणीही पराजित होत नाही. तेव्हा हनुमंतास पाचारण केले जाते. हनुमंतासही भ्रांत पडते, मग चौदा हजार विद्यांचा अधिपती असलेल्या खरदूषणाकडे जाण्याचे ठरते. पण लक्ष्मणाने त्याचा वध केला असल्याने ते लक्ष्मणाकडे जातात. तिथे रावणाने सीताहरण केल्याने रामास सीतावियोग झाला असल्याचे समजते. तेव्हा आपण

समदुःखी आहोत अशा विचाराने सुग्रीव रामाकडे जाऊन मायासुग्रीवाचे पारिपत्य करून आपल्याला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती करतो. रामास आपला समग्र वृत्तांत कथन करून सात दिवसांमध्ये सीतेचा शोध लावण्याचे वचन देतो. असे सांगून लक्ष्मणास सोबतीस घेऊन किष्किंधापुरीस जातो, पण मायासुग्रीव साहसगती त्याचा पराभव करतो. त्यामुळे ते रामाकडे परत येतात. रामास सुग्रीवाची दया येते. शेवटी राम व मायासुग्रीव - साहसगती यांच्यामध्ये युद्ध होते आणि राम साहसगतीचा पराभव करतो. अशा रीतीने तारामती व सत्यसुग्रीवांचे मिलन होते. त्यानंतर सुग्रीवाची कन्या रामास वरमाला घालते, परंतु रामाच्या मनात सीतेशिवाय अन्य कुणीही स्थान प्राप्त करू शकत नाही. तारामतीसह विलास करता करता सुग्रीवास सीतेचा शोध घेण्याच्या आपल्या वचनाचे विस्मरण होते, त्यामुळे क्रोधित होऊन लक्ष्मण त्याच्यावर आक्रमण करतो. तारामती त्यास चुडेदान देण्याची विनंती करते. सुग्रीवही क्षमा मागून सीतेच्या शोधार्थ आपले दूत -सैनिक पाठवितो. काही सैनिकांना एका बेटावर रावण सीतेस पळवून नेताना पाहिला असल्याचे सांगणारा रत्नजटी नावाचा विद्याधर भेटतो. रावणाने त्याच्या सर्व विद्या हरण करून त्यास विकलांग करून टाकलेले असते. सैनिक त्यास रामाजवळ घेऊन येतात आणि रत्नजटी रामास समग्र वृत्तांत कथन करतो.

त्यानंतर राम-लक्ष्मण लंकेस जाऊन रावणास जिंकून सीतेस परत आणण्याच्या तयारीस लागतात. पण रत्नजटी लंका अत्यंत दुरूह असून तिथे पोहोचणे अत्यंत कठीण आहे. शिवाय रावण अत्यंत बलवान असून त्याचे विभीषण व कुंभकर्ण हे दोन अत्यंत पराक्रमी भाऊ आहेत. तसेच इंद्रजित, मेघनाद हे पराक्रमी पुत्र व अनेक पराक्रमी सैनिक आहेत. त्यामुळे त्यास जिंकणे अत्यंत दुरापास्त आहे. तेव्हा रामाने सीतेचा विचार सोडून द्यावा आणि विद्याधरांच्या अनेक सुंदर, गुणवती, विद्यावंत कन्या परणाव्यात. पण राम सीतेखेरीज अन्य कुणाचाही विचार करीत नसल्याने लंकेवर आक्रमण करण्याचा हट्ट सोडीत नाही हे पाहून सुग्रीवाचा मंत्री जांबूनद (जांबुवंत) त्यास एक कथा कथन करू लागतो.

बोरणानट नगरात धर्मरुची आणि गुणवंती यांचा पुत्र विनयदत्त आणि विनयवंती हे दोघे खूप धन कमावतात. त्यांच्या घरी विशालभूती नावाचा एक व्यापारी असतो. तो विनयवंतीस वश करतो. कपटभावाने तो विनयदत्तास घेऊन वनात जातो आणि तिथे आंब्याच्या झाडाशी बांधून ठेवतो. बऱ्याच दिवसांनतर एक लाकूडतोड्या विनयदत्तास पाहतो व त्यास नगरात परत घेऊन जातो. विनयदत्तास पाहून विशाखभूती घाबरून पळून

जातो. विनयदत्त लाकूडतोड्यास त्यास हवे ते मागून घेण्याचे वचन देतो. पण लाकूडतोड्या वर राखून ठेवतो. एके दिवशी लाकूडतोड्याचा मोर राजगृहाच्या गच्चीवर जाऊन बसतो. राजकुमार त्यास पकडतो आणि आपल्यापाशी ठेवून घेतो. तेव्हा कबाडी - लाकूडतोड्या विनयदत्तास आपला तो मोर आणून द्यावा असे सांगतो. पण राजकुमाराकडून मोर आणणे शक्य नसल्याने विनयदत्त त्या मोराच्या बदल्यात अनेक रत्ने, सोने-नाणे देण्यास तयार होतो, पण राजकुमाराकडून मोर परत आणणे अत्यंत दुरापास्त आहे असे सांगतो. त्याचप्रमाणे रामाने सीतेचा हट्ट सोडून द्यावा असे सांगतो.

जांबवंताची ही कथा ऐकून लक्ष्मण कोपतो आणि सीतेस आणण्याचा आपला निश्चय व्यक्त करून त्यास आणखी एक कथा सांगतो.

कुसुमपुर नगरात प्रभव नावाचा एक प्रसिद्ध सावकार आणि त्याची यमुना नावाची पत्नी यांचे आठ पुत्र आपल्या शेतात काम करीत असतात. त्यांपैकी ज्येष्ठ पुत्र धर्म करीत राहतो आणि काही कामधंदा करीत नाही म्हणून त्याची निंदा करीत असतो. धर्मपाल त्यामुळे वनात जातो. तेथे त्यास वसुभूती नावाचा राजपुत्र भेटतो. वसुभूती धार्मिक प्रवृत्तीचा असतो, त्यामुळे तो कुणालाही शासन -दंड करीत नसतो. त्यामुळे प्रधान त्यास राज्यपदासाठी पात्र नाही असे समजून त्याच्या सावत्र भावास राजपदावर स्थापन करतो. वसुभूती निराश होऊन वनात जातो. तेथे त्यास अंबिका प्रसन्न होते व कडे देते. या कड्याच्या साहाय्याने हव्या त्या गोष्टी साध्य होत होतात. रोग नाहीसे होतात, असे ती त्यास सांगतात. त्यानंतर एकदा राज्यातून एक दूत येऊन व आपल्या अनुपस्थितीत राज्यामध्ये अनागोंदी माजली आहे, त्यामुळे आपण राज्यात परतावे असे सांगून त्यास राज्यात परत घेऊन जातो. राज्यात परत जाताना वसुभूती आपले कडे धर्मपालास देतो. इकडे नगरात राणीस सर्पदंश होतो. वसुभूतीने दिलेल्या कड्याच्या प्रभावाने धर्मपाल राणीचे विष उतरवितो. अनेक लोकांना अनेक प्रकारची दाने देत राहतो. त्याचे यश पाहून ईर्ष्या करणारा एक दुष्ट व्यंतर घोरपडीचे रूप घेऊन ते कडे चोरतो. धर्मपालास हे समजताच तो नवकार मंत्राच्या साहाय्याने घोरपडीचे बीळ खणून काढतो. तेव्हा व्यंतर देव भयभीत होऊन पळून जातो. या कथेप्रमाणे सीता म्हणजे आमचे कडे असून तिला प्राप्त करण्यासाठी आम्ही लंका खणून काढू.

लक्ष्मणाची ही कथा ऐकून एक ज्ञानी विद्याधर रावणास जिंकण्यासाठी अनंतवीर्य मुनींनी सांगितलेली एक कथा सांगतो. जो कुणी कोटिशिला उचलील त्याच्या हस्ते रावणाचा वध होईल. सर्वजण मिळून कोटिशिलेपाशी जातात आणि लक्ष्मण ती कोटिशिला

अगदी सहज उचलतो. तेव्हा सर्वांनाच आता रावणवध निश्चित होणार याची खात्री वाटते आणि लंकेस जाण्याच्या योजनेचा विनिमय सुरू होतो. जांबुवंत हनुमतास साहाय्यास बोलावण्याचा सल्ला देतो. त्यानुसार हनुमंत आपल्या सैन्यासह किष्किंधेस येतो व राम यांची भेट होते. ओळख पटविण्यासाठी रामाची मुद्रिका देऊन हनुमंतास लंकेकडे पाठविले जाते. लंकेस जाण्याचा मार्ग अंजनीच्या माहेरावरून –महेंद्रपुराहून जात असतो. हनुमंताचे विमान महेंद्रपुराहून जात असताना त्यास आपल्या मातेचे दुःख आठवतो आणि तो आपल्या आजोबाशी युद्ध करून त्यास जिंकून घेतो आणि रामाकडे त्याच्या मदतीसाठी पाठवून पुढे लंकेकडे निघतो. पुढे दधिमुख द्वीपावर हनुमंत मुनींवर होत असलेला उपसर्ग दूर करतो. मुनींचा उपदेश ऐकून जात असताना तिथे गंधर्वसेन राजा व राणी गंधर्वसेना यांची कन्या चंद्ररेखा हिचा वृत्तांत समजतो. चंद्ररेखा मुनींना आहार देते. तिचा पती कोण होणार? असे विचारले असता जो साहसगती विद्याधरास मारील तो हिचा वर असेल असे मुनी सांगतात. हनुमान त्यांना रामाचा ठावठिकाणा सांगतात आणि त्यांना रामाकडे पाठवून देतो. पुढे हनुमान लंकेस पोहोचतो. तिथे तो हिडिंबा नामक राक्षसिणीवर विजय प्राप्त करतो. त्यानंतर हनुमान व वज्रमुख यांच्यात युद्ध होऊन हनुमानास पराभूत व्हावे लागते. वज्रमुखाची कन्या लंकासुंदरी हिच्याशी हनुमंताचे युद्ध होते. लंकासुंदरीचे रूप पाहून हनुमान मदनाचे रूप धारण करून तिच्याकडे बाणास जोडून चिठ्ठी पाठवितो आणि तिला जिंकतो. नंतर लंकासुंदरी हनुमानाची विभीषणाशी भेट घडवितो आणि विभीषण त्याची सीतेशी भेट घडवून आणतो. हनुमान वानररूपाने सीता असलेल्या अशोक वृक्षावर चढून रामाने दिलेली अंगठी सीतेसमोर टाकतो. रामाची मुद्रिका पाहून सीतेस आनंद होतो. सीता आनंदित झाल्याचे मंदोदरीस समजते आणि ती सीतेला पुन्हा एकदा रावणास वरण्यास सांगते. पण सीतेस झालेला आनंद हनुमानाच्या भेटीमुळे झालेला असतो. हनुमान सीतेस सुग्रीवाची व आपली कथा सांगतो. हनुमान सीतेला नेण्यासाठी आला असल्याचे मंदोदरीस समजते. हे समजताच मंदोदरी क्रुद्ध होते आणि माझा पती रावण महाबलाढ्य त्रिखंडाधिपती विद्याधर असताना तू भूमिचर राम–लक्ष्मणांचा पक्षधर कसा काय बनलास असे विचारते. त्यानंतर विभीषण सीतेसाठी स्वादिष्ट व पुष्टिकर भोजन घेऊन जातो. हनुमंत रावणास समजावणीच्या सुरात सीतेस सोडून देण्यास सांगतो, पण रावण हनुमंतास बंदी बनवितो. तेव्हा हनुमंत सर्व बंधने तोडून निघून जातो. जाताना राणीवनास आग लावून विध्वंस करीत जातो. तेव्ह रावण इंद्रजितास हनुमंतावर आक्रमण करून जाण्यास सांगतो. इंद्रजित हनुमंतास बंदी बनवून रथावर बांधून घेऊन येतो. हनुमंताचे व राक्षसांचे युद्ध होते. हनुमंत अचानकच

सीतेपाशी येतो. आपण रामास काही खूण सांगावी असे विनवितो. हनुमंत किष्किंधेस येऊन रामास लंकेत घडलेला समग्र वृत्तांत कथन करतो. राम सुग्रीवाला सैन्य गोळा करायला सांगून वालीपुत्रासह लंकेस जातो. जाताना त्यांना अनेक द्वीपांचे राजे भेटतात. पुढे सेतुबंध राजा भेटतो व रामास त्याच्या सैन्यासह सेतूवरून नव्हे, तर विमानातून लंकेस घेऊन जातो. रामाचे सैन्य लंकेस पोहोचल्यावर विभीषण मध्यस्थी करतो, पण विभीषणाचे व रावणाचे भांडण होते. तेव्हा विभीषण रामाला सम्यक्त्व सांगतो. त्यासाठी एक कथा सांगतो.

वेळवल नगरातील कनक राजा. तेथे असलेल्या धनपाल व धनवंती यांना सुमती नावाची कन्या होते. तेथेच अर्हद्दास व जिनदास या दोघांना व्यापारासाठी गेले असता रत्नद्वीपावर एक रत्न मिळते. अर्हद्दास ते रत्न आपल्यालाच मिळावे म्हणून कपट करतो, जिनदासाच्या बंधुप्रेमामुळे त्यास आपल्या विचाराचा पश्चात्ताप होतो. घरी आल्यावर ते रत्न आईच्या हाती दिले असता आईच्याही मनामध्ये कपटभावना उत्पन्न होते आणि ती दोन्ही पुत्रांवर विषप्रयोग करण्याचे ठरविते आणि त्यानुसार अन्नात विष कालवते. पण पुत्रांचे आईवरील प्रेम पाहून तिला पश्चात्ताप होतो. ती ते रत्न नदीत फेकून देते. तिथे एक मासा ते रत्न गिळतो. एक कोळी तो मासा पकडतो आणि अर्हद्दासाच्या घरी ते रत्न येते. अर्हद्दास ते रत्न सुमतीकडे देतो. तेव्हा सुमतीच्या मनात कपट उत्पन्न होते. ती आईला व भावांना विष घालून मारण्याचा विचार करते. तिच्या मनातील धनासक्ती पाहून बंधू तिला सोनसाखळ्या व हिऱ्याचे दागिने देतात. बंधूंचे आपल्यावरील प्रेम पाहून तिला पश्चात्ताप होतो. असे कुलक्षणी रत्न घरी नको म्हणून ती त्या रत्नाचा चुरा करून वनात फेकून देते. राजा पुन्हा त्या रत्नाचा चुरा पाहण्यासाठी जातो तेव्हा त्यास मनुष्य जन्म सोज्ज्वळ असल्याचे कळते. असे हे दुःख देणारे रत्न म्हणजे सीता आहे, असे विभीषण रावणास सांगतो. तरीही रावण ते समजून घेत नाही. तो समस्त सैन्य जमा करतो आणि राम–रावणयुद्ध आरंभ होते. हनुमंतास इंद्रजित बंदी बनवितो. भामंडल–मेघकुमार, इंद्रजित, सुग्रीव, कुंभकर्ण असे युद्ध सुरू होते. लक्ष्मण कुलभूषण–देशभूषण यांचे स्मरण करतो. पुन्हा युद्ध सुरू होते. अनेक राक्षस मारले जातात. रावण, विभीषण युद्ध होते. इंद्रजित, कुंभकर्ण, मेघकुमार यांची युद्धे होतात. लक्ष्मण व रावण यांच्यात झालेल्या युद्धात रावणाच्या शक्तीच्या आघाताने लक्ष्मण मूर्च्छित होऊन पडतो. त्याच्या वियोगाने रामास अपार दुःख होते. रामास आश्वस्त करीत जांबुवंत सांगतो की, सूर्योदय होईपर्यंत तरी लक्ष्मणाचे निधन होऊ शकत नाही. तेव्हा एक विद्याधर तिथे येतो आण द्रोणमेघ राजाची

कन्या विशल्या हिचे स्नानजल शिंपडले तर लक्ष्मणावरचे मृत्युसंकट दूर होऊ शकते. तेव्हा भरताच्या मदतीने विशल्येस तिच्या सख्यांसह आणविले जाते. विशल्या लक्ष्मणास आलिंगन देते, त्यामुळे लक्ष्मणाची मूर्च्छा दूर होते.

या प्रसंगात पुढे विशल्येच्या पूर्वभवाची कथा आली आहे. चक्रवर्ती नंदाराणीसह मंदिरात गेले असता पुनर्वसू नामक विद्याधर नंदाराणीचे अपहरण करतो. चक्रवर्ती त्याचा पाठलाग करीत असलेला पाहून तो नंदाराणीस वनात सोडून देतो. वनात निराधार अवस्थेत जगत असताना नंदा अणुव्रतांचे पालन करीत शेवटी दिगंबरी आर्यिका दीक्षा ग्रहण करण्याचा विचार करते. राजा तिला शोधीत आला असता एक अजगर तिला गिळत असलेला दिसतो. नंदा मनोमन आर्यिका दीक्षा ग्रहण करून मरण पावते आणि स्वर्गसुख भोगून नंतर द्रोणमेघ राजाची कन्या विशल्या बनते. एक कुशास्त्री मरण प्राप्त करून रेडा बनतो आणि चिखलात रुतून मरण पावतो. त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरल्याने रोगराई पसरते. तेव्हा विशल्या नवकारमंत्र अभिमंत्रित जल शिंपडून रोगराई दूर करते. तिचे स्नानजल रोगहारक असते. विशल्येस रात्रीतून लंकेत आणले जाते आणि तिथे तिच्या आलिंगनाने लक्ष्मणास रावणाच्या शक्तिप्रयोगाने उत्पन्न झालेला व्याधी दूर होतो. इथे ३३ वा अध्याय समाप्त होतो.

या पुढे **चौतीसाव्या अध्यायात** रामाचा महिमा ऐकवून प्रधान रावणास समजावण्याचा प्रयत्न करतो. रावण दूताकरवी रामास त्याच्या तीन हजार कन्या आणि गजांत लक्ष्मी देऊ करतो, पण रामाने सीतेची इच्छा सोडावी अन्यथा लंकेतून निघून जावे असे सुचवितो. राम लक्ष्मणाने बंदी बनविलेल्या कुंभकर्ण, इंद्रजित, मेघनाद यांना मुक्त करतो आणि रावणाने सीतेस सोडून द्यावे असे सुचवितो. तेव्हा सुग्रीव या रावणास झोटिंगाने झपाटले असून आपण त्याच्यावर उपचार करू, त्याला धडा शिकवू असे म्हणतो. भामंडलही त्याच्यावर कोपतो. रावणाच्या दूतास विराधित आपण युद्धास सज्ज आहोत असा रावणास निरोप देण्यास सांगतो. रावण मनातून घाबरतो आणि विमनस्क बनतो आणि युद्ध करण्याचा विचार करू लागतो. आता बहुरूपी विद्या साध्य करून वैऱ्यास जिंकले पाहिजे असा विचार करून बहुरूपिणी विद्या सिद्ध करण्यासाठी साधना करू लागतो. विभीषण रामास रावणाच्या बळाची कल्पना देतो. विभीषण, सुग्रीव, हनुमंत व अंगद हे सर्व आपापल्या सैन्यानिशी युद्धासाठी सज्ज होतात. काही तरी राजनीती करून रावणास हरवू असा विचार करतात. विद्या साध्य करण्यासाठी रावण करीत असलेली साधना भंग करण्यासाठी अंगदकुमारास पाठविले जाते. अंगद नगरात हलकल्लोळ

माजवितो, तेव्हा रावणाचा सासरा मय त्याच्यावर कोपतो आणि त्याच्याशी युद्ध आरंभतो. लोक रावणास विनंती करण्यासाठी जिनभुवनात जातात. तेव्हा यक्ष सिंहरूप धारण करून लोकांना भयभीत करतो. रावण ध्यानस्थ बसलेल्या स्थानी अंगद उपसर्ग मांडतो. यक्ष त्याचा विरोध करतो. यक्षाची वाणी ऐकून लक्ष्मण कोपतो आणि शीलहीन रावणास जिनभुवनात कसा काय प्रवेश देऊन त्याचे रक्षण करीत आहात असा प्रश्न विचारतो. लोकांना कसलाही उपसर्ग न करता रावणास आठ दिवस अभयदान दिले जाते. लंकेमध्ये आठ दिवसांसाठी मुनींचे आगमन झालेले असल्याने रावणास अभयदान मिळते. त्यानंतर अंगद व रावण यांच्यात युद्ध सुरू होते. अंगद रावणास मूर्ख व पाखंडी म्हणून खिजवितो, पण रावण निश्चलतापूर्वक ध्यानस्थ राहतो. अंगद रावणाच्या सगळ्या राण्यांना बाधून त्यांच्यावर उपसर्ग करतो. मंदोदरीचे अपहरण करीत असल्याचेही भासवितो, तरीही रावण ध्यान सोडीत नाही. शेवटी तो विद्या सिद्ध करून घेतो. तेव्हा सीता मनातून घाबरते. त्यानंतर रावण सीतेकडे जाऊन तिची मनधरणी करून आपली पट्टराणी बनण्याची विनंती करतो. ती सांगेल त्याप्रमाणे आचरण करण्याचे आश्वासन देतो. रामास राज्य देण्याचीही तयारी दर्शवितो, परंतु सीता निःकांक्षित रूपाने शीलव्रतात दृढ राहते. रामाच्या वियोगामुळे सीता मूर्च्छित होते. रावणास अशा विचाराने दुःख होते की, आपण सीतेचे अपहरण केले, त्यामुळे रामास पीडा उत्पन्न झाली, त्यामुळे लोकांमध्ये आपली निंदा होईल असे लोकनिंदेचे भयही त्यास वाटते. परंतु आता जर आपण माघार घेतली तर आपण भ्याड म्हणून लोकनिंदा होईल असे भय वाटल्याने तो राम–लक्ष्मणांशी युद्ध सुरू ठेवण्याचा आणि कसेही करून जिंकण्याचा निश्चय करतो. रावण अनेक राजांना पाचारण करतो, त्याप्रमाणे अनेक राजे रावणाच्या रणसभेत येतात. मात्र इथे आपला बंधू कुंभकर्ण, मेघनाद, इंद्रजित नाहीत यामुळे तो कोपतो. रावण युद्धास निघाला असताना अनेक अपशकुन होतात. मांजर आडवे जाते. कुत्री भुंकू लागतात. गाढवे रेकू लागतात. काटेरी झाडावर कावळा कर्कश आवाजात कावकाव करू लागतो. छत्रदंड मोडते. वस्त्र फाटते. या अपशकुनांमुळे मंदोदरी दुःखी होते. तुझा पती मदोन्मत्त बनला आहे, त्यामुळे त्याचा विनाशच होणार आहे असे रावणास सांगण्यास मंदोदरीस सुचवितात. तेव्हा मंदोदरी रावणास विनंती करून सौभाग्यदान मागते. युद्धास न जाण्याची विनवणी करते. आपणही विभीषणासमान रामाकडे जावे. प्रतिनारायणाचा नारायणाकडून वध होणार असल्याची जिनवाणी आपण ऐकली आहे आणि लक्ष्मण नारायण आहे. त्यामुळे त्याची क्षमा मागावी अशी विनवणी करते, पण परोपरीने विनवण्या करूनही रावण आपला युद्ध करण्याचा हट्ट सोडीत नाही. उलट तो

दर्पोक्तीपूर्वक मंदोदरीस असे सांगतो की, आपल्या अनेक अनेक राण्या आहेत, मी युद्धास गेल्यावर तू त्यांच्याशी क्रीडा करीत राहा. आपण महाबलवान असून देवांनाही बंदी केले आहे, मग भूमिचर रामाचा काय पाड? अशी दर्पोक्ती करतो. मंदोदरीस असे सांगून तो युद्धासाठी आपला रथ सज्ज करतो. तो युद्धास निघाला असताना पुन्हा अनेक अपशकुन होतात. युद्धात रणधुमाळी सुरू होते. अनेक राजे युद्धात सहभागी होतात. आधी तर रावण रामाचे सैन्य मोडतो, अनेक बाण सोडले जातात. मेघ, पवन, नाग, वज्र, सर्प, अग्नी, आदित्य, रोगमारी अशा अनेक बाणांचा वर्षाव होऊ लागतो. लक्ष्मणाचे सैन्यही पराभूत होऊ लागते. पापबाणावर धर्मबाण सोडला जातो. लक्ष्मण गळाठून जातो. अचानक त्यास विघ्नविनाशक असलेल्या अष्टकुमारींचे स्मरण होते. त्या लक्ष्मणाच्या रक्षणासाठी धावून येतात. रावणाचा मस्तकच्छेद केला जातो, पण मायावी विद्येच्या साहाय्याने तो द्विगुणित बलवान बनतो. शेवटी रावण विद्याधरींना शरण येतो, परंतु तरीही युद्ध करीत राहतो. शेवटी रावण लक्ष्मणावर चक्र सोडतो, पण लक्ष्मण नारायण असल्याने त्याच्यावर चक्राचा काहीही परिणाम होत नाही, उलट ते लक्ष्मणास तीन प्रदक्षिणा घालून त्याच्या उजव्या हातामध्ये स्थिर होते. लक्ष्मण विजयी होतो. आठवा नारायण होतो. रावणाचे वक्षस्थळ भेदून चक्र लक्ष्मणाकडे परत येते.

पुढच्या **पस्तीसाव्या अध्यायात** लक्ष्मणाने रावणाचा वध केल्यावर रावणाच्या अठरा हजार स्त्रिया विलाप करू लागतात. स्त्रियांच्या या विलापाच्या वर्णनात कवीने करुण रसाचा उत्कृष्ट परिपोष केला आहे. पुढे रावणाच्या मोहकर्माचा इतिहास वर्णिला गेला आहे. अरिदमन राजा, त्याची श्रीमती राणी, त्यांचा पुत्र सुकांत व त्याची पत्नी वसुकांता यांची कथा सांगताना श्रीमती आपल्या पतीस धर्माचरण करण्यास प्रवृत्त करते, मात्र शत्रूस जिंकून आल्यावर धर्माचरणाचा विचार करता येईल असे सांगून राजा प्रवासास निघतो. त्यानंतर एकदा एक मुनी भावरीसाठी श्रीमतीच्या घरी येतात आणि ते तिला तुझा पती सकाळी परत येईल असे सांगतात. राजाच्या आगमनाची जय्यत तयारी केली जाते, ती पाहून राजाला आश्चर्य वाटते. पत्नीस घेऊन राजा मुनिदर्शनासाठी जातो. मुनींचा उपदेश ऐकल्यावर मुनी त्यास त्याचे आयुष्य आता केवळ सात दिवसांचेच उरले असल्याचे सांगतात. भविष्यामध्ये लोकपाल व त्यानंतर गुणधाम असे भवांतर सांगतात. त्यानंतर मुनींनी सांगितल्याप्रमाणे सात दिवसांनी वीज पडून वीज पडून राजाचा मृत्यू होतो. पुढे लोकपाल एका पालीस किडा खाताना पाहतो. तो किडा पुढे वसुकांता होते. लोकपाल वनात जातो असे सांगून विभीषणाला झालेले दुःख रावणाचा पूर्वभव सांगून दूर केले जाते.

रावणास अग्नी देऊन ययोचित रीतीने अंत्यसंस्कार केल्यानंतर इंद्रजित दीक्षा ग्रहण करतो.

एवढ्यात तिथे अभय नामक एका मुनींचे आगमन होते. रामासहित सर्वजण त्यांना प्रणाम करतात. ते सर्वांना धर्माचा उपदेश देतात. त्यानंतर इंद्रजित त्यांना आपले भवांतर विचारतो. त्यावर मुनी कथन करतात की, कौशांबीचा राजा चंद्रवाहन व त्याची पत्नी यांच्या नगरात नंदिवर्धन व नंदाराणी असे वणिक् युगल होते. तिथेच धनपाल व त्याची पत्नी धनवंती असे दुसरे एक युगल असते. त्यांना नय व विनय असे दोन पुत्र होतात. धनपाल दुर्धर रोगाने मरण पावतो. दोघे बंधू सुखपूर्वक संसार करीत असताना ज्ञानसागर नामक एका मुनींचे आगमन होते. त्यांच्या उपदेशाने दोघा भावांना वैराग्य उत्पन्न होते व दीक्षा ग्रहण करून पुढे ते कौशांबी नगरीत येतात. लोक त्यांचा जयजयकार करतात. राजा ते वणिक्पुत्र असल्याचे ओळखतो व त्यांची चेष्टा करतो. चंद्र राजा त्याची टर उडवीत असला तरी त्याचा नंदिवर्धन श्रेष्ठी राजास मुनिनिंदा नरकाचे कारण आहे असे सांगून त्यास समजावतो. नंतर ते मुनींना वंदन करतात. तेव्हा मुनी तपोबलाने राजाचे गर्वहरण करण्याचा विचार करतात. त्यानंतर ते तप करून नंदेच्या उदरी जन्म घेतात आणि धनवंत या नावाने मोठे होऊन राज्य प्राप्त करतात. राज्य भोगून आपण व्यर्थच इंद्रियसुखाच्या मागे लागलो अशा विचाराने पश्चात्तापदग्ध बनून पुन्हा तप स्वीकार करतात. आपल्या बंधूचा अवतार समजून घेतला. ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन तेथे आला. तेव्हा तो रतिवर्धन राजा असतो. त्याला उपदेश केल्यानंतर त्याने आपल्या पुत्रास राज्याधिकार देऊन आणि आपले गुरू गुणसागर यांच्यापाशी दीक्षा ग्रहण करतो. पुढे अन्य अनेक जन्मांनंतर ते रावणपत्नी मंदोदरीच्या उदरी इंद्रजित व मेघवाहन असे दोन पुत्र म्हणून आपला जन्म झाला असल्याचे मुनी सांगतात. नंदिवर्धन श्रेष्ठीची जी पत्नी श्रावकी होती, तीच पुढे मंदोदरी झाली. हे भवांतर ऐकून कुंभकर्ण, जांबुवंती, मरीच सर्वजण तप ग्रहण करतात. मंदोदरीही आर्यिका बनून तपाचरणात मग्न होते. चंद्रनखेसह अन्य अनेक स्त्रियाही आर्यिकादीक्षा ग्रहण करतात.

यानंतर सर्वजण अशोकवनात सीतेस भेटण्यासाठी जातात. लंकेत आनंदोत्सव होतो. राम दुरूनच सीतेस पाहतो. लक्ष्मण सीतेस आलिंगन देतो. लक्ष्मण चक्रधर नारायण बनल्याने सीतेस मोठा आनंद होतो. राम-सीता सिंहासनावर बसतात. राम, लक्ष्मण, सीता, विशल्या या सर्वांना आनंद होतो. विभीषण रामासाठी मंदिर -भवन बनवितो. विराधितास पाठवून लक्ष्मणाच्या सर्व राण्यांना आणविले जाते. सर्वजण लंकेस सुखोपभोग करीत राहतात. त्यानंतर राम-लक्ष्मण सर्वांना वनवासाची कथा कथन करतात. माता-पित्यांनी केलेल्या अशुभ कर्माचे फल म्हणून त्यांना पुत्रवियोगाचे दुःख सहन करावे लागले

असे कथन कवी करतो. त्यानंतर एके दिवशी अयोध्येत कौसल्या व सुमित्रा प्रासादाच्या गच्चीवर उभ्या असताना ध्वजदंडावर बसून एक पक्षीण आपल्या पिलांचे चुंबन घेत असल्याचे पाहतात. हे पाहून पुत्रस्मृतीमुळे व्याकुळ बनून त्या दोघी दुःख करू लागतात. चौदा वर्षेही वनवासाची अवधी संपली तरी आपले पुत्र अजूनही आले नाहीत या विचाराने दोघी गहिवरून जातात. एवढ्यात तिथे नारदाचे आगमन होत असलेले दिसते. आपण धातकी खंडामध्ये दोन कल्याणके व बालक्रीडा पाहण्यात मग्न राहिल्याने चौदा वर्षेइकडे येऊ न शकल्याचे सांगून आता लवकरच राम-लक्ष्मणांचे आगमन होणार असल्याचे सांगतो. त्यानुसार राम-लक्ष्मण संपूर्ण परिवारासह अयोध्येत प्रवेश करतात. सर्वजण अत्यानंदित होतात. अशी ही रावणवधाची व अयोध्याप्रवेशाची कथा या अध्यायात आली आहे.

**छत्तीसाव्या प्रसंगात** अयोध्येमध्ये सर्वजण सभास्थानी बसून सुखालाप करीत असतात. राम-लक्ष्मण वनवासास गेल्यानंतर भरत आपणांस वैराग्य उत्पन्न झाले असल्याचे सांगतो. आपण द्युती नामक मुनींपाशी दीक्षा मागितली असता त्यांनी राम-लक्ष्मणांच्या अनुपस्थितीत भरताने दीक्षा घेतली तर अयोध्येत अनागोंदी माजेल, धर्माचा नाश होईल, मुनींना आहार-विहार करता येणार नाही, सबब राम-लक्ष्मणांचे आगमन होईपर्यंत भरताने राज्य करीत असावे न त्यांच्या आगमनानंतर दीक्षा ग्रहण करावी असे सांगितले असल्याचे सांगतो. तेव्हा आता आपण राज्याचे अधिकार स्वीकारावेत व मला दीक्षेसाठी अनुमती द्यावी. तेव्हा राम त्यास आता आपण चौघे बंधू चार खांबाप्रमाणे राज्यभार पेलू असे सांगतो.

त्यानंतर भरत सर्वांसह जलक्रीडेस जातो. सर्व राण्या आपापल्या दास्यांसह जलक्रीडा करीत पण भरत मात्र मनात वैराग्याचेच भाव धरून असतो. घरी परतत असताना वाटेत एक हत्ती मोकाट सुटतो. साखळ्या तोडून सैरावैरा धावत असलेला हत्ती पाहून सर्वजण घाबरतात. तेव्हा भरत आडवा जाऊन हत्तीस रोखतो. हत्तीस जातिस्मरण होते. तो निश्चळ बनतो. अन्न-पाणी सोडून मौन राहतो. रामास हे समजल्यावर तो मुनीकडे जाऊन हत्तीचा वृत्तांत विचारतो. तेव्हा मुनी हत्तीचे भवांतर सांगू लागतात की, अनेक भवांमध्ये भ्रमण करीत ह्या हत्तीचा जीव नागपुर नगरीतील हरिवर्मा राजाच्या हरिकांता पत्नीपासून चंद्रोदय नावाचा पुत्र झाला. त्याच ठिकाणी सूर्योदय श्रुतकीर्ती रोहित ब्राह्मणाच्या घरी जन्मतो. हरिवर्मा राजा उदयोदय या आपल्या पुत्रास राज्य देऊन दीक्षा ग्रहण करून तापस बनतो. उदयोदय कीर्ती संपादून आपल्या तापस पित्यास भेटण्यासाठी निघाला असता

वाटेत त्यास जिनमुनींचे दर्शन घडते. त्यांनी उदयोदयास उपदेश देऊन जिनधर्माचे नियम दिले व तुझा पिता मरून सर्पयोनीत जन्मून वृक्षाच्या ढोलीत भुजंग झाला असल्याचे सांगतात. तिथे वृक्षाजवळ जाऊन मुनींनी सांगितल्याप्रमाणे वृक्षाच्या ढोलीत भुजंग पाहतो आणि त्याची जिनमुनींवर दृढ श्रद्धा उत्पन्न होते. राजकुमार जैन बनला म्हणून पुरोहित कोपतो व जैनमुनींने तुला भुलविले असे सांगून जिनधर्म सोडण्यास सांगतो. राजाची पत्नी शीलभ्रष्ट बनून परपुरुषाशी रत होते. तेव्हा पुरोहित राजावर विषप्रयोग करून ठार मारतो. त्यामुळे त्यास महान पातक लागते. नियमाचा त्याग केल्यामुळे राजा नंतर दुःख भोगत बेडूक, उंदीर, मांजर अशा योनींमध्ये भ्रमण करीत मानव जन्म प्राप्त करतो. राजगृह नगरात ब्राह्मणास विनोद व रमण असे दोन पुत्र होतात. रमण देशांतरास जाऊन शिक्षण घेतो. तो रात्रीच्या समयी राजगृहाजवळ पोहोचतो, पण तोपर्यंत नगरद्वार बंद झालेले असते, म्हणून तो यक्षाच्या मठात जातो. तिथे विनोदाची पत्नी यक्षाकडे जात असते. कामांध बनलेल्या यक्षाला व बंधूला अशा दोघांनाही तो ठार मारतो आणि पत्नीला तिची वेणी पकडून फरफटत घरी आणतो. नंतर तोही मरण पावतो. ते दोघे भाऊ नंतर रेडे बनतात. आपापसात लढून मरण पावतात आणि मांजर, कुत्रा, बैल, हरिण अशा भवांमध्ये परस्परांशी युद्ध करीत राहतात.

एके दिवशी कौशांबी नगरीचा राजा स्वयंभू जिनमंदिरात जाऊन परतत असताना पारध्यापाशी हरणाचे एक पाडस पाहतो. त्यास मृगाविषयी दयाभाव उत्पन्न होतो त्यामुळे पारध्यास पुरेसे धन देऊन ते पाडस विकत घेऊन तो राजभवनत येतो. त्या बाल हरिणाशी राजकुमार खेळत असतो. तो चंद्रोदयाचा जीव असतो. नंतर तो स्वर्गात देव बनतो. त्याचवेळी अनेक भव भोगून सूर्योदय कपिला नगरीत धनद व धनवंती याचा भूषण नावाचा पुत्र म्हणून जन्म घेतो. धनद पुत्रासाठी सातमजली महाल बांधवून देतो. तो मुलगा भूषण गुरुवाणी न ऐकता इंद्रियसुख भोगत राहतो. एके दिवशी ज्ञानसागर नामक मुनी त्याच्या गृही येतात. त्यांचा उपदेश ऐकून तो दीक्षा ग्रहण करण्यास निघतो, पण हा दीक्षामार्ग अत्यंत कठीण असल्याने वाटेत तो एके ठिकाणी झोपला असता त्यास अजगर झोंबतो. त्यामुळे मरण पावून दीक्षेचे भाव बाळगल्याने स्वर्गात देव बनतो.

स्वर्गातले आयुष्य संपल्यावर तो पुष्कर द्वीपामध्ये चंद्रपुरी नामक नगरीत प्रकाश राजाची पत्नी मध्यची हिच्या उदरी गजतेज नावाचा पुत्र बनतो. तो सम्यक्त्वाचे पालन करून स्वर्गात जन्म प्राप्त करतो. तेथून रत्नपुरीत अभिराम नावाने जन्म प्राप्त करून व व्रते पालन करून जीवनयापन करीत असता तेथे ज्ञानसागर गुरू येतात. त्यांची गुरुवाणी ऐकून

दीक्षा ग्रहण करतो. पुढे ब्रह्मोत्तर स्वर्गात सुख भोगतो.

त्यानंतर सूर्योदयाची कथा सुरू होते. पोदनपुर नगरीत वाडसुख व शकुनी या ब्राह्मणदांपत्याच्या घरी धनदत्त असा मृदुमती नावाचा पुत्र होतो. मृदुमती देशांतरास जाऊन अनेक विद्या संपादन करून विद्वान बनतो आणि संन्यास घेतो. संन्यासी बनून आला असता माता त्यास ओळखते. मग तो घरी राहू लागतो. जुगार, चोरी आदी सप्त व्यसनांमध्ये आसक्त बनतो. एके दिवशी सुशांत नगरीचा राजा नंदिवर्धन याच्या घरी चोर बनून जातो. राणीच्या शयनगृहात लपून बसला असता तिथे राजा राणीस गुरुवाणी कथन करतो. त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न होऊन दीक्षा ग्रहण करतो. राणीही आर्यिकादीक्षा ग्रहण करते. चोरही राजाचे बोलणे ऐकून दीक्षा घेतो. पलाशकूट नगरामध्ये गुणभान नामक श्रावक नित्य शास्त्र-पुराण श्रवण करीत असता मेघकूट पर्वतावर गुणसागर मुनींचे आगमन होते. तेथे हा मुनी बनलेला चोर ओळखला जातो, पण तो मौन पाळून राहतो. आपली निंदा झाली म्हणून मनातून खजील होतो. तिथून तो ब्रह्मोत्तर स्वर्गात देव बनतो. अभिराम मृदुमती देव बनून सुख भोगतात व हाच अभिराम भरत होऊन जन्मतो आणि मृदुमती गजराज होऊन जन्मतो. मृदुमतीस पराभव आठवतो तेव्हा तो गज असतो. मुनिउपदेश ऐकून भरत दीक्षा घेतो. त्याच्याच सोबत एक हजार राजे, तीनशे स्त्रिया  व केगामती दीक्षा घेतात. गज ब्रह्मचर्य व्रत स्वीकारून वनात निघून जातो. तिथे तो ध्यान करीत राहतो. त्याचे नाव गणेश असे ठेवले जाते. तिथूनच हे मिथ्यामत सुरू झाले आहे. भरताचा दीक्षामहोत्सव होतो. भरत रामास राज्यपद द्यावे असे सुचवितो, पण राम लक्ष्मणास राज्यपद देतो. सीतेस पट्टराणीपद दिले जाते. राम विभीषणास लंकेचे राज्य देतो. असा हा भरताचा दीक्षाप्रसंग या अध्यायात वर्णिला आहे.

यानंतर **सदोतीसाव्या अध्यायात** रामास साहाय्य करणारे विभीषण,विराधित आदींना राज्ये दिली जातात. मथुरेच्या मधु राजास शत्रुघ्न वेढा घालतो. मधुराजा वनक्रीडेस जात असतानाच तो शत्रुघ्नावर चाल करून येतो. मधुराजा संग्रामी पडतो आणि तो पश्चात्ताप करीत दीक्षा ग्रहण करतो. मधुराजाचे राज्य गेल्याने चमरेंद्र क्रोधित होतो आणि मथुरेत महामारी उत्पन्न करतो. लोक रोगग्रस्त बनतात. शत्रुघ्न रामाकडे येतो, तेवढ्यात राज्यात मुनी येतात.  अयोध्येत आल्यानंतर अर्हद्दासाच्या घरी भावरीसाठी येतात. अर्हद्दासाची धाकटी सून त्यांना पडघावते. मात्र हा मुनी भ्रष्ट असून चातुर्मासातही विहार करीत आहे असे बोलले जाते. तेव्हा या मुनीस चारण विद्या प्राप्त झाली आहे असे सांगितले जाते. मुनी पुढे मथुरेस येतात. अर्हद्दासास आपण मुनिनिंदा केल्याचा पश्चात्ताप

होतो. सून मात्र आहारदान देऊन पुण्य जोडते. मुनिदर्शनाशिवाय आहार घ्यायचा नाही, म्हणून मथुरेस येतो. मथुरेत शत्रुघ्न सात मुनींचे दर्शन घेतो. आपण कोण असे विचारतो. तेव्हा नंदिवर्धन राजाला आठ पुत्र असून राजा नंदिवर्धन आपल्या आठव्या पुत्रास राज्यभार देऊन वनास गेल्याचे सांगतो. आम्ही सात मुनींनी तप केल्याचे सांगतो. त्यांच्या प्रभावाने मथुरेतली महामारी दूर होते. त्यानंतर शत्रुघ्न आपले भव कथन करण्याची विनंती करतो. याच मथुरा नगरीत वणिक-यमुना मिथ्यात्वी जोडपे असते. ते मरून काकयुगल बनतात. मग सूकर बनून सात वेळा महिष -रेडा बनतो. तेथे जिनदास नामक व्यक्तीकडून पाणी वाहण्याचे काम लावले जाते. पण आपण पोटासाठी काम लावतो या पश्चात्तापाने तप साधून मरण पावतो. पुढील जन्मी ब्राह्मण होतो. तेव्हा मथुरेत अकंपन राजाची सुंदर पत्नी ललिता राजा युद्धासाठी गेला असता ब्राह्मणाशी रत होते. राजा शत्रूस जिंकून येतो. ब्राह्मणाचे कुकर्म जाणून त्यास प्राणदंड देतो. वध करण्यासाठी नेला जात असता मार्गात त्यास मुनिदर्शन घडते. दयाभाव उत्पन्न होऊन त्यास सोडून दिले जाते. त्यानंतर ब्राह्मण दीक्षा घेऊन देव बनतो. पुढे मथुरा नगरीत चंद्रसेन व कनका यांच्या पोटी अचल नावाचा पुत्र बनतो. चंद्रसेनाची पहिली पत्नी धरणा हिचे पाच पुत्र राज्यप्राप्ती कनकाच्या वध करण्याच्या इच्छेने त्याच्या पाठी लागतात. तेव्हा रानावनातून भटकत असताना एक शेतकरी त्याच्या पायातील काटे काढतो. अचल धावत धावत कौशांबी नगरात येतो. तेथे इंद्र-इंद्राणी यांची कन्या इंद्रदत्ती हिचे स्वयंवर जिंकतो. त्याची प्रशंसा होते. नंतर अचल पुऱ्या ताकतीनिशी अयोध्येवर चाल करून जातो आणि पाच भावांना पळवून लावतो. ज्या काबाड्याने -शेतकऱ्याने वनामध्ये पायातले काटे काढले होते त्यास प्रधानपद देतो. त्यानंतर तेथे ज्ञानसागर नामक मुनींचे आगमन होते. त्यांच्या उपदेशाने अचलास वैराग्य उत्पन्न होते आणि तो तपध्यान करीत समाधिमरण साधतो आणि पंचम -ब्रह्म स्वर्गात देव होतो. हा अचल म्हणजेच दशरथ राजा आणि सुप्रभा राणीचा पुत्र शत्रुघ्न होय. अशी शत्रुघ्नाच्या भवांतराची कथा इथे निरूपण केली गेली आहे. मुनि निघून जाताना अर्हद्दासास शंका येते की मुनी निघून गेल्यानंतर मुरकी (महामारी) पुन्हा तर येणार नाही ना? तेव्हा नित्य जिनपूजन केल्याने मुरकी येणारच नाही असे मुनी सांगतात. अशा रीतीने शत्रुघ्नाचे भवांतर कथन करून येथे हा अध्याय संपविला आहे.

**अडतीसाव्या अध्यायात** अयोध्येत रामराज्य सुरू होते. काही दिवस गेल्यानंतर सीतेला स्वप्न पडते. त्यामध्ये ती दोन सिंह पाहते, त्यानंतर जिनवर यात्रेला जात असताना विमान मोडून पडते. अशा स्वप्नांचे फलित म्हणून सीतेस दोन पुत्र होतात व तिचा

रामापासून वियोग होणार असे सांगितले जाते. सीता गर्भवती होते. तिचे डोहाळे पुरविण्यासाठी राम-सीता चार दिवस वनातील मंदिरात विहारासाठी येतात. इकडे राज्यात एक व्यक्ती आपली पत्नी गेली म्हणून शंका घेतो. पत्नी परत आल्यावर तो तिला जाब विचारतो, तेव्हा ती त्यास प्रतिप्रश्न करते की, सीता जर सहा महिने रावणाकडे राहूनही पवित्र आहे, तर मग मी का नाही? अशा रीतीने अनेक स्त्रिया सीतेच्या शीलाविषयी संशय व्यक्त करू लागतात. नगरात घरोघरी याच प्रकारची कुजबूज सुरू होते. तेव्हा रामाच्या मनात सीतेविषयी असा प्रवाद होत असेल तर मग तिला इथे अयोध्येत ठेवणे योग्य नव्हे असा विचार उत्पन्न होतो. अशा रीतीने सीतेच्या शीलाविषयी चर्चा करणारा हा अडोतीसावा अध्याय समाप्त होतो.

**३९ व्या अध्यायात** सीतेचा उजवा डोळा लवू लागतो. नगरातील लोक मौन धरून राहतात. अनेक घर सोडून जाऊ लागतात आणि कलंकित होऊन परत आल्यावर आम्हाला आमच्या कलंकासहित स्वीकारा असा आग्रह करू लागतात. रामाकडे अशी तक्रार आल्यानंतर राम-लक्ष्मण एकांतात विचारविनिमय करू लागतात. सीतेच्या शीलाविषयी कलंक लावल्याचे ऐकून लक्ष्मण क्रुद्ध होतो आणि जो कुणी असा प्रवाद करीत असेल त्याचा संहार करण्याचे बोलतो. पण राम म्हणतो की, अशा प्रकारे बलाचा प्रयोग केल्याने प्रवाद दूर होणार नाही, यासाठी सीतेचा परित्याग करावा हेच श्रेयस्कर. असा विचार करून गर्भवती सीतेस वनात सोडण्याच्या उद्देशाने वक्रसेन सेनापतीस बोलावून त्यास सीतेला वनात नेऊन सोडण्याचा आदेश दिला जातो. यात्रेच्या निमित्ताने सेनापती सीतेस वनात सोडून देतो. इथे कवीने त्या वनाच्या भयंकरतेचे यथार्थ वर्णन केले आहे आणि यामध्ये भयानक रसाचा परिपोष झाला आहे. तिथे एका गिरिखंडाजवळ सीतेस सोडून दिले जाते. सीतेविषयी रामाच्या मनात वितृष्णा निर्माण झाली आहे हे सांगणारे अनेक अपशकुन होतात. तिथे भयानक वनात गर्भवती सीतेस एकटीलाच सोडून सेनापती परत निघतो. त्यानंतर एकाकिनी सीता रोदन-आक्रंदन करू लागते. तिच्याविषयी करुणा उत्पन्न झाल्याने आसपासचे प्राणीही रुदन करू लागतात.

त्यानंतर एके दिवशी त्या वनालगतच्या पुंडरीक नगरीचा राजा वज्रजंघ हत्ती पकडण्यासाठी त्या वनात येतो. हत्तीस पकडल्यानंतर विश्रांतीसाठी म्हणून वृक्षातळी बसले असता तिथे त्यास बालकाच्या रडण्याचा आवाज येतो. आवाजाच्या रोखाने गेला असता एका झाडाखाली त्यास सीता दिसते. तो तिची विचारपूस करतो, तेव्हा सीता आपली कर्मकथा निरूपण करते. अगदी आदिनाथांपासून ते रामापर्यंतची इक्ष्वाकु कुळाची कथा

सांगते. तेव्हा सीतेविषयी करुणा उत्पन्न होऊन वज्रजंघ सीतेस आपली बहीण मानतो. सीतेस वनात सोडून सेनापती अयोध्येस परत येतो आणि आज्ञेचे पालन केल्याचे रामास निवेदन करतो. तेव्हा राम दुःखी होतो. त्यानंतर सर्वजण सीतेचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात, पण सीता सापडत नाही. इकडे पुंडरीक नगरात वज्रजंघाच्या घरी सीतेस दोन पुत्र होतात. कालक्रमानुसार सीतापुत्र लवण व अंकुश मोठे होतात. त्याचवेळी नगरात एक ब्रह्मचारी येतो. तो हे दोन पुत्र संपूर्ण पृथ्वी जिंकून घेतील असे भविष्य कथन करतो. त्या ब्रह्मचाऱ्यापाशी लवणांकुशांचे शस्त्र-शास्त्र अध्ययन सुरू होतात. उपजत प्रतिभाशक्तीमुळे दोघेही लवकरच शस्त्र-शास्त्र व समस्त कलाप्रवीण बनतात. त्यानंतर वज्रजंघ लवास आपली कन्या प्रदान करतो. अंकुशासाठी पृथ्वी नामक राजाची कन्या मागितली जाते, पण पृथ्वी राजा अहंकारी असल्याने तो वज्रजंघाशी युद्धच आरंभतो. त्यात पृथ्वी राजाचा विजय होतो. वज्रजंघाचा पुत्र पृथ्वीशी पुन्हा युद्ध करतो. पृथ्वी राजास जिंकून अंकुशाचा त्याच्या कन्येशी विवाह करवून दिला जातो. सर्वत्र लवणांकुशांची कीर्ती पसरते. अशा रीतीन लवणांकुशाची उत्पत्ती व त्यांच्या पराक्रमाच्या गाथेसह हा ३९ वा अध्याय इथे संपतो.

**चाळीसाव्या अध्यायात** नारद अयोध्येस येतो. तो रामास सीतेचा समाचार सांगतो आणि सीतेचा परित्याग केल्याबद्दल त्यास दूषणे देतो. राम नारदावर क्रोधित होतो तेव्हा रामाचा अहंकार मोडून टाकण्याचे ठरवून नारद सीतेकडे येतो. तिथे तो लवणांकुशांच्या सभेत जातो व तुम्हाला राम-लक्ष्मणांसारखे पद प्राप्त होवो असा आशीर्वाद देतो. त्यावर लवणांकुश हे राम-लक्ष्मण कोण? व तुम्ही आमच्यासमोर त्यांचे कौतुक कशासाठी करीत आहात? असे विचारतात. तेव्हा नारद रामाची ख्याती सांगून त्याने सीतत्याग करून तिच्यावर कसा अन्याय केला? हे कथन करतो. तेव्हा आपण हा अन्याय सहन करू शकत नाही असे म्हणून लवण व अंकुश राम-लक्ष्मणांना जिंकण्यासाठी सैन्य तयार करतात. सीता त्यांना आपल्या पित्यासोबत युद्ध करीत आहात असे सांगते. त्यामुळे जगामध्ये आपले हसे होईल असे सांगून आपले शिक्षागुरू सिद्धार्थ यांचा सल्ला घ्यावा असे सांगते. रामाच्या मनात सीतेविषयी दया उरली नाही, त्यामुळे त्याने तुझ्यावर कलंक लावून वनात घालवून दिले. सिद्धार्थ लवणांकुशांना रामाशी युद्ध करून सीतेवरील अन्याय दूर करण्याचा सल्ला देतो. त्यानंतर लवणांकुश अयोध्येवर चाल करून राम-लक्ष्मणांस जाब विचारण्यासाठी जातात. ते आक्रमण करून राम-लक्ष्मणांचे कटक मोडून काढतात. त्या घनघोर युद्धातही रामास लवणांकुशांविषयी स्नेहभाव उत्पन्न होतो. राम युद्ध करीत असताना त्याचा रथ मोडतो. रामास बाण लागून तो विह्वळ होतो. लक्ष्मणाचे व

कुशाचे युद्ध होते, त्यात लक्ष्मण मूर्च्छित होतो. अंकुशासमोर कुणाचे काहीही चालत नाही, हे पाहून लक्ष्मण त्याच्यावर सुदर्शन चक्र सोडतो, पण चक्र स्वकीयांचा नाश करीत नसल्यामुळे ते परतून लक्ष्मणाकडे येते. राम-लक्ष्मणांचा मानभंग होऊन लवणांकुशांचा विजय होतो. युद्ध करीत असलेल्या लवणांकुशांकडे पाहून रामास युद्धज्वर चढण्यापेक्षा त्याच्या मनात वात्सल्यभावनाच उत्पन्न होते. लक्ष्मणही त्यांचे शौर्य पाहातच राहतो. ते आपलेच पुत्र आहेत हे समजल्यावर राम त्यांचे मोठ्या उत्साहाने व उत्सवपूर्वक नगरात प्रवेश करवितो. सीतेस परत आणण्याविषयी रामास सुचविले असता तिने दिव्य करून यावे असे सांगतो. अयोध्येत घरोघरी शीलहीन नारी असल्याने असल्या शीलभ्रष्ट नगरात आपण कसा व कशासाठी प्रवेश करायचा? असा परखड प्रश्न सीता विचारते. सीतेचे शीलच तिचे रक्षण करील असे तिला सांगितले जाते, न्याय-अन्यायाचा विचार न करता मी वनात राहिले आणि तरीही आपण पुन्हा मला दिव्य करायला सांगता! त्यासही आपली तयारी आहे, असे सांगून सीता दिव्य करण्यास सिद्ध होते. बेलदाराकरवी अग्निकुंड तयार करविले जाते. तिची अग्निपरीक्षा केली जाते. नवकार मंत्राचा जप करीत सीता अग्नीत प्रवेश करते.

येथे एक अन्य कथा सांगितली जाते. भूमंडलावर फुई राणी व तिचा पुत्र जैन धर्माचे पालन करीत असतात. हेमशिखर व त्याचा भाऊ हे किन्नर असतात. तो राणीस जैन धर्म शिकवितो. एके दिवशी राजा हेमशिखरास युद्धावर पाठवितो, तेव्हा राणी दुःखी होते. त्याचे चित्र आपल्यासमोर ठेवून टक लावून त्याकडे पाहात राहाते. राजाने विचारल्यावर तो आपल्याला बंधूसमान असल्याचे सांगते. सर्वांनाच ते पटते, मात्र एके दिवशी राजास तिच्या प्रेमाविषयी शंका येते. राजास वैराग्य उत्पन्न होते आणि पुत्रावर राज्यभार सोपवून तो ज्ञानसागर मुनींपाशी ज्ञानवंत मुनी बनतो. ही कथा इथेच राहते. पुढे राणी आपल्या नात्याबद्दल शंका घेतली म्हणून राजाची निंदा करते आणि कुतप करून मरणांती व्यंतरी बनते. व्यंतरी बनून राजाने दीक्षा घेण्यापूर्वी आपल्या शीलाबद्दल संशय घेतला म्हणून मुनींवर उपसर्ग करू लागते. भावरील निघाले असता निरनिराळ्या प्रकारे अंतराय घडवून आणते. त्यानंतर एके दिवशी राणी स्नान करीत असताना तिने काढून ठेवलेला रत्नहार चोरते आणि आणून मुनींच्या कंठात टाकते. मुनीने हार चोरला असा कलंक लावला जातो. त्याच नगरात असलेल्या जिनदास व जिनमती या श्रावकयुगलास कुणीतरी मिथ्या देवी मुनींना अंतराय करीत असल्याचे लक्षात येते आणि ते मुनींच्या आसपास उच्च रवात नवकार मंत्राचा घोष सुरू ठेवतात, त्यामुळे व्यंतर देवी तिथून पळून जाते आणि मुनींचा निरंतराय आहार होतो. पुढे मुनी वनाकडे जात असताना व्यंतरी त्यांच्या मार्गात लोखंडाचे

तीक्ष्ण काटे पसरून ठेवते. मुनी तपास बसले असता ती ती तपात विघ्ने उत्पन्न करते आणि तऱ्हेतऱ्हेचे उपसर्ग करते, पण मुनी मात्र तपाचरणात स्थिर राहतात. ध्यान धरून केवलज्ञान प्राप्त करून घेतात. व्यंतरीस पश्चात्ताप होतो. सकलभूषण मुनींना वंदन केले जाते.

ही कथा इथेच राहते. एके दिवशी स्वर्गातील इंद्र आपल्या विमानातून अयोध्येवरून निघाला असता तिथे सीतेच्या शीलाच्या प्रभावाने त्याचे विमान आकाशात कुंठित होते. सर्वजण सीतेचे दिव्य पाहण्यासाठी सर्वजण उभे असतात. ब्रह्मसिद्धार्थ मुनी सांगतात की, कदाचित् सूर्य पश्चिमेस उगवेल, समुद्र मर्यादाभंग करील, पण सीतेचे शील भंग पावणार नाही. अयोध्येतील सर्व लोक दिव्य पाहण्यासाठी येतात. राम कोपतो. सीता 'माझ्या मनात यत्किंचितही शीलभंगाची भावना आली असेल तर हा अग्नी मला भस्मसात् करो' असे म्हणून अग्नीत प्रवेश करते. अग्निप्रवेशाचा हा प्रसंग कवीने मोठ्या करुणापूर्ण रीतीने वर्णन केला आहे. सीता अग्निज्वाळांमध्ये लोपली असे म्हणता म्हणता एका स्फटिकासारख्या कमलासनावर प्रकट होते. अग्नी शमून ते संपूर्ण स्थान जलमय होऊन जाते. समस्त जन आनंदित होऊन मोठ्या कौतुकाने सीतेकडे टक लावून पाहू लागतात. राम सीतेची क्षमा मागतो आणि सीतेस स्वमंदिरी येऊन सुख भोगण्याची विनंती करतो. पण सीता संसाराची विचित्रता पाहून दीक्षा ग्रहण करण्याची इच्छा व्यक्त करते. राम तिला आलिंगन देण्यासाठी सरसावतो आणि मूर्च्छित होतो. सीता देवासहित आकाशमार्गाने निघून जाते व वनात प्रवेश करून आर्यिका दीक्षा ग्रहण करते. शीतोपचारांनी शुद्ध प्राप्त झाल्यावर राम सीता न दिसल्याने पश्चात्ताप करू लागतो. सीतेने दीक्षा घेतल्याची वार्ता समजल्यावर आपण जीवंत असता कोण सीतेस दीक्षा देऊ शकतो असे म्हणून कुपित होतो. पण सकलभूषण मुनींचे दर्शन होताच त्याचा क्रोधभाव गळून पडतो. सर्वजण मुनींपाशी बसून आपापले पूर्वभव विचारतात. मुनींसमोर हात जोडून विभीषण राम व सौमित्र कोणत्या पुण्याच्या प्रभावाने बलराम-नारायण बनले? असे विचारतो. त्यांना कोण्या कारणामुळे वनवास भोगावा लागला? लोकांनी सीतेवर कशासाठी आळ घेतला? असे विचारून हे रामायण का घडले? याचा खुलासा विचारतो. इथे चाळीसावा अध्याय संपतो.

पुढे **एक्केचाळीसाव्या अध्यायात** राम-लक्ष्मणांचे पूर्वभव सांगितले गेले आहेत. क्षेत्रपुर नामक नगरात राजा प्रजापती व राणी प्रजावती राज्य करीत असतात. त्याच नगरात नयनद व सुनंदा या श्रावक दांपत्यास धनदत्त व वसुकांत हे दोन पुत्र होतात. त्याच नगरात त्यांचा यज्ञदत्त नावाचा मित्र असतो. अन्य एक श्रावकयुगल सागर व रत्नप्रभा यांना गुणदत्त पुत्र आणि नयनंदा कन्या असतात. रत्नप्रभा मिथ्यात्वी असते आणि कुधर्माचरण करीत

असते. जिनसागर धर्मपालन करीत असतो, तर रत्नप्रभा मिथ्या धर्माचरण करीत असते. जिनसागराची कन्या धनदत्तास दिली जाते. त्यामुळे रत्नप्रभा कोपते व श्रीकांत नामक दुसऱ्या श्रावकाच्या घरी कन्या देऊ करते. त्यामुळे वसुकांतास कोप चढतो. मध्यरात्री तो श्रीकांतास मारण्यासाठी जातो. तेव्हा ते दोघेही मरण पावतात. मरणसमयी धनदत्ताच्या मनात वैराग्यभाव उत्पन्न होतात. दोघे मरून पुढे अनेक भवांमध्ये रणमृग, सूकर, महिष, बैल होतात. पुढे धनदत्त पैठण येथे येतो. तेथे रात्री मंदिरात गुरूंपाशी पाणी पिण्यास मागतो. तेव्हा मुनी त्यास रात्री पाणी पिऊ नये असा उपदेश देतात. धनदत्त सम्यक्त्वाचे पालन करीत जिनपूजन करीत करीत मरण पावतो आणि स्वर्गात देव होतो. तिथले आयू पूर्ण करून तो मेघपुर नगरात मेरुदत्त व धरणा या श्रावकदांपत्याच्या घरी पद्मरुची म्हणून जन्म घेतो. एकदा तो बैलांची झुंज पाहात असताना एक बैल जोराचा धक्का लागून पडतो व मरणासन्न बनतो. पद्मरुची त्यास नवकार मंत्राचा जप देतो. नवकाराच्या प्रभावाने तो बैल राजाच्या घरी लक्ष्मी मातेच्या गर्भात अवतरतो. राणीस बैलावरून जिनमंदिरात जाण्याचे डोहाळे लागतात. त्यानंतर योग्य समयी तिला पुत्रप्राप्ती होते, त्याचे नाव वृषभध्वज असे ठेवले जाते. एके दिवशी बैलास पाहून त्यास जातिस्मरण होते. मागील जन्मी आपल्याशी झुंजणारा बैल कोण होता? हे ओळखण्यासाठी तो चित्रशाळेत बैलाच्या झुंजीचे चित्र काढतो. तेव्हा पद्मरुची तिथे येऊन आपली खूण सांगतो. वृषभध्वज पद्मरुचीस मंत्रिपद प्रदान करतो. अशा प्रकारे पद्मरुची जिनधर्म पालन करून व वैराग्य मनी धरून समाधिमरण साधतो आणि स्वर्गात देव होतो. पुढे विजयार्ध पर्वतावरील नंद्यावर्त नगरात नंदेश्वर व कनकावती याच्या उदरी पद्मरुची नयनंदा नावाने जन्म घेतो. वृषभध्वज त्याच नगरात प्रधानपुत्र सुमती होतो. विमलवाहन व पद्मावती यांच्या पोटी पद्मरुची श्रीचंद्र बनतो. वृषभध्वज पुरोहितापोटी सुखसागर बनतो. एके दिवशी समाधिगुप्त नामक मुनींचे दर्शन घडते. पद्मरुची पुढे राम बनतो. पुरोहित सुग्रीव बनतो. असा हा पूर्वभवीचा संबंध सांगून पुढे राम-लक्ष्मणांची कथा सांगितली गेली आहे. मृणालपुर नगरात वज्रकंठ व हेमवंती यांच्या उदरी स्वयंभूकुमार जन्मतो. तेथे विश्वभद्र व सोमारी हे ब्राह्मण जोडपे असते. त्यांच्या पोटी वसुदत्त त्याची राणी सरस्वती त्या नगरात गुणवंती ही श्रावकाची कन्या जिनधर्माविना फिरते. पुढे ती हत्तीण बनून पाणी पिण्यासाठी नदीवर गेली असता चिखलात रुतून बसते. बराच काळ लोटल्यावर एक विद्याधर तिथून आकाशमार्गाने जात असताना खाली त्या हत्तिणीस मरणासन्न अवस्थेत पाहून त्यास दया येते आणि तिला नवकार मंत्र देतो. मंत्राच्या प्रभावाने ती हत्तीण पुढे ब्राह्मणी होते. एके दिवशी ज्ञानसागर नावाचे मुनी

भावरीसाठी येतात. ती ब्राह्मणकन्या त्यांना पाहून हसते. तिने गुरुनिंदा केली म्हणून तिचा पिता तिच्यावर अप्रसन्न होतो, तिलाही पश्चात्ताप होऊन ती श्राविकेची व्रते ग्रहण करते. त्यानंतर ती देववंती कन्या मंदिरात गेली असता तेथे सुमती नामक श्राविका असते. तिला मुनीजवळ बसलेली पाहून देववंती मुनिनिंदा करते. मुनींवर कलंक लावते. पण मुनी मात्र निष्कलंक असतात. मुनिनिंदेच्या पापामुळे ती रोगिणी बनते. देववंतीचे शरीर रोगग्रस्त बनून तिची खूपच दुर्गंधी सुटते. तिचा पिता तिचे पापफल जाणतो आणि ज्ञानसागर मुनींना वंदन करून देववंती रोगमुक्त होण्याचा उपाय विचारतो. तेव्हा मुनींवर आळ चढविला तिला असल्याने हत्तीवर बसवून तिने मुनींवर आळ घेतला असा डांगोरा पिटा असे मुनी सांगतात. गावातील सर्व लोक मुनींकडे क्षमायाचना करतात. परिणामी तत्काळ देववंती रोगमुक्त बनते. देववंतीस पश्चात्ताप होऊन ती धार्मिक बनते. तिला पुन्हा सौंदर्य प्राप्त होते.

त्यानंतर एकदा राजा वनक्रीडेस निघाला असता देववंतीचे रूपसौंदर्य पाहून तिच्यावर भाळतो. तेव्हा पुरोहित सांगतो की, आपण मिथ्यामती असल्याने देववंती काही आपणांस वरणार नाही. त्यावर राजा कुपित होऊन श्रीभूती पुरोहिताचा वध करून देववंतीस घेऊन जातो आणि बलपूर्वक तिच्याशी रममाण होतो. तिथून सुटून देववंती दीक्षा ग्रहण करते आणि कुपित होऊन पित्याच्या वैऱ्याचा सूड घेईन असे ठरवून आयुष्यांती स्वर्गात देव बनते. तिथून च्यवून ती सीता बनली आहे.

स्वयंभू राजा पुढे ब्राह्मण कुळात जन्म घेतो. त्याचे नाव मृगंगा. एके दिवशी ज्ञानसागर त्याच्या घरी येतात, त्यांच्याकडून उपदेश प्राप्त करून तो दीक्षा घेऊन तप करतो. एके दिवशी एक विद्याधर व त्याची पत्नी कनकप्रभा यांना विमानातून जाताना पाहून तो निदान करतो आणि त्या तपाच्या प्रभावाने तो आता लंकेचा राजा झाला. तिथून पुढे तो हा लक्ष्मण बनला आहे. अशा रीतीने मुनी धनदेवाचा जीव म्हणजे राम, वसुदेवाचा जीव म्हणजे लक्ष्मण, गुणवंतीचा जीव सीता, सोनपालाचा जीव भामंडल, श्रीकांताचा जीव रावण, वृषभध्वजाचा जीव सुग्रीव अशी सर्वांची भवांतरे सांगतात. सीतेन पूर्वी मुनींना कलंक लावला म्हणून तिच्यावर या भवात शीलहीन असण्याचा आळ घेतला गेला.

पुढे जिनशासनाची प्रशंसा करून लवण-अंकुशांचे भवकथन केले गेले आहे. काकुत्स्थ नगरीत गुणभद्र नावाचा ब्राह्मण होता. त्यास वसुदेव व वामदेव असे दोन पुत्र झाले. त्यांना कनकवती दिली जाते. ती मुनींना आहार देऊन पुण्य जोडते. पुढच्या जन्मी काकुत्स्थ नगरीचा राजा रतिवर्धन व सुदर्शना यांच्या पोटी दोन्ही पुत्र वामदेव व सुरदेव जन्म घेतात. त्याची नावे प्रियंकर व हितंकर अशी होती.

त्या नगरीमध्ये एक मंत्री होता. त्याची पत्नी विजया राजांचे रूप पाहून त्यांच्यावर मोहित होते. एके दिवशी खूप कारस्थान करून राजाला अंकित करून घेते व राजाला पेटवून देण्याची धमकी देते. रतिवर्धन आपली पत्नी सुदर्शना हिला घेऊन आपली सुटका करून घेते. रामप्रासादातून सुरुंग काढून तो राजा पसार होतो. इकडे मंत्री आनंदित होऊन सर्वगुप्ती नामक प्रधान राज्यावर आरूढ होतो. पळून गेलेल राज वाराणसीत काश्यपी राजाकडे जाऊन गुप्तपणे राहू लागतो. तिथे सर्वगुप्ती प्रधानाचा दूत येतो. त्यामुळे काश्यप राजा चिडतो. रतिवर्धन व काश्यप एकत्र होऊन सर्वगुप्तीविरुद्ध युद्ध करतात व रतिवर्धनास पुन्हा राज्यावर स्थापित केले जाते. यावेळी सर्वगुप्ती काश्यप राजाला वेढा घालतो, ही बातमी एक वणिक्पुत्र रतिवर्धनास सांगतो. रतिवर्धन व काश्यप एकत्र येतात आणि विजय प्राप्त करतात. इकडे विजयासुंदरी मरण पावून व्यंतरी बनते. पुढे रतिवर्धनास वैराग्य येऊन तो भानुचंद्र मुनींपाशी दीक्षा ग्रहण करतो. तेव्हा विजयसुंदरी नारीरूप धारण करून मुनींवर उपसर्ग करते. पण ध्यानबलाने मुनी तो उपसर्ग सहन करीत त्याचा प्रतीकार करतात. नंतर प्रियंकर व हितंकर तप-ध्यानाच्या प्रभावाने स्वर्गात इंद्र बनतात. तेच आता हे लवण व अंकुश झाले आहेत. त्यांच्या तपामध्ये कर्म निर्माण झाल्यामुळे त्यांना पितृवियोग सहन करावा लागला आहे असे मुनी सांगतात.

अग्निदिव्य करून सीता आर्यिका दीक्षा ग्रहण करते आणि कठोर तप व शुभ ध्यान करून स्त्रीलिंग छेदून स्वर्गात इंद्र बनणार आहे. पुढे कर्मभूमीमध्ये जन्म घेऊन तप-ध्यान करून मोक्षास जाणार आहे. त्यानंतर सर्वजण सीतेस वंदन करतात. पुढे ६२ वर्षेसीता कठोर तपाचरण करते आणि सोळाव्या अच्युत स्वर्गात इंद्रपद प्राप्त करते. अशा रीतीने सर्वांच्या भवांतराच्या कथा सांगून हा अध्याय समाप्त होतो.

पुढे **बेचाळीसाव्या अध्यायात** लवण व अंकुशांच्या विवाहाचा प्रसंग वर्णिला आहे. लक्ष्मणाचे आठ पुत्र व रामाचे लवण-अंकुशांसह एकशे पंचवीस पुत्र, सर्वजन सुखांचा उपभोग करीत असतात. त्याचवेळी विजयार्ध पर्वतावर कांचनस्थान नामक नगरामध्ये राजा कांचनरथ व त्याची राणी कांचनमाला यांच्या उदरी गुणवती व शीलवती नावाच्या दोन कन्या झाल्या. कालक्रमाने त्या उपवर झाल्या तेव्हा त्यांचे स्वयंवर मांडले जाते. त्यामध्ये गुणवती लवणास व शीलवती अंकुशास वरतात. त्यामुळे लक्ष्मणाचे आठ पुत्र आपण सुंदर व सर्वार्थाने योग्य असूनही या कन्यांना या दोघांनाच कसे वरले म्हणून कुपित होतात. तेव्हा धरण राजा आपण अन्य कन्यांचे वरण करावे अशी विनंती करतो. पण लक्ष्मणाचे पुत्र विवाहाचा विचार त्यागून संयम धारण करतात. वनात एका ठिकाणी मुनींना

पाहून त्यांच्याकडून दीक्षा ग्रहण करतात. त्यांच्याच सोबत गुणमालही अन्य अनेक जणांसह साधना स्वीकारतो. भामंडलासही वैराग्य उत्पन्न होते, पण त्याचे पुत्र दीक्षा घेण्यापासून त्यास परावृत्त करतात. पुत्रमोहामुळे दीक्षा न घेता सुख भोगत असताना त्याच्यावर वीज कोसळते आणि त्याचा मृत्यू ओढवतो. भामंडलाचा मृत्यू झाल्याचे समजल्याने हनुमंत दुःखी होतो. लक्ष्मणाच्या पुत्रांना वैराग्य झाल्याचे ऐकून हनुमानासही वैराग्य उत्पन्न होते. अनेक स्थानांची यात्रा-वंदना करीत असताना विजयार्ध पर्वतावर आठ दिवस उल्कापात होत राहतो व हा संसार अस्थिर असून तो मोहापासून परावृत्त होतो. नंतर आपल्या नगरीत येऊन व मकरध्वजास राज्यावर स्थापन करून तो दीक्षा घेण्यासाठी निघून जातो. अंजनी माता त्यास अडविते, परंतु मातेची समजावणी करून व आपल्या स्त्रियांची समजूत काढून तो संयम धारण करतो. त्यानंतर तो मुनींपाशी जाऊन दीक्षा ग्रहण करतो. नंतर अंजना व सुकुमाल यांच्यासह अन्य सर्व स्त्रिया दीक्षा ग्रहण करून तुंगी पर्वताच्या शिखरावर कठोर तप करतात व पुढे मोक्षाला जातात. त्यांच्याच सोबत पाचशे राजेही दीक्षा घेतात.

एके दिवशी इंद्र सभेत बसला असता मनुष्य जन्म प्राप्त करून सर्व लोक मोक्षास जात आहेत याविषयी चर्चा करीत असतात. पण राम व लक्ष्मण मात्र परस्परांतील बंधुप्रेमामुळे मोहाविष्ट बनून पुण्यात्मे असूनही दीक्षा काही घेत नाहीत. त्यामुळे त्यांच्यातील बंधुप्रेमाची परीक्षा घेण्यासाठी रत्नचूल व अमृतचूल या दोन देवांना परीक्षा घेण्यासाठी पाठवितात. लक्ष्मण सिंहासनावर बसला असता देव तिथे येऊन राम निवर्तल्याचे वृत्त सांगतो. हे ऐकताक्षणीच लक्ष्मण धरणीतलावर कोसळतो क्षणभरातच गतप्राण होतो. लक्ष्मणपत्नी सुकुमाली दातवन घेण्यासाठी तिथे पोहोचते तेव्हा लक्ष्मण मरण पावल्याचे तिच्या लक्षात येते. सर्व स्त्रिया विलाप करू लागतात. तो आक्रोश ऐकून राम तिथे पोहोचतो व विलाप करू लागतो. लक्ष्मणाच्या मृत्यूमुळे तो भ्रमिष्ट होतो. वैद्य अनेक औषधोपचार करतात, पण लक्ष्मण काही जीवंत होत नाही, त्यामुळे रामास लक्ष्मणाचा मृत्यू झाल्याचे सांगतात, पण रामाचा काही त्यावर विश्वास बसत नाही. त्याच्या अंत्यविधीस नकार देऊन तो लक्ष्मणाचे शव खांद्यावर घेऊन भ्रमिष्टासमान राना-वनात फिरू लागतो. तो त्याच्याशी तऱ्हेतऱ्हेचे वार्तालाप करतो, सुंगंधी तेले लावून त्यास आंघोळ घालतो, जेवण भरवितो. याप्रमाणे सहा महिने तो लक्ष्मणाचे प्रेत खांद्यावर घेऊन भ्रमिष्टासमान वना-पर्वतावर भ्रमण करीत राहतो. एके दिवशी लवण व अंकुश रामाची समजून काढण्यासाठी येतात, पण राम त्यांच्यावर अत्यंत कुपित होतो. लवण-अंकुश मात्र

संसार निःसार समजून विरक्त होतात आणि दीक्षा ग्रहण करतात. त्यांना पावागिरी पर्वतावर निर्वाण पद प्राप्त होते.

**त्रेचाळीसाव्या अध्यायात** रामायणातील अखेरचे प्रसंग वर्णिले आहेत. खरदूषणाचापुत्र शुंडा, इंद्रजिताचा इंद्रगती, मय दैत्याचा मनोदन, राजा रत्नशेखर आदी सर्व राजे मिळून आपला वैरी लक्ष्मण मरण पावल्याने आता आपण अयोध्या नगर सहज जिंकू या उद्देशाने अयोध्येवर आक्रमण करून आले. तेव्हा राम कोपारूढ होऊन लक्ष्मणाचे शव पाठीवर बांधून त्यांच्याशी लढू लागतो. ही सर्व परिस्थिती आपल्या अवधिज्ञानाने जाणून पूर्वभवातील रामाचे समस्त मित्र, की जे आता स्वर्गात देव बनले होते, रामाचे आपल्यावरचे उपकार फेडण्याच्या उद्देशाने त्याच्या मदतीस येतात आणि शत्रूंचे पारिपत्य करतात.

ही कथा इथेच राहते. रामाच्या पाठीवर असलेल्या लक्ष्मणास कसे उतरवावे आणि त्याचा मोह कसा दूर करावा, या विचाराने पूर्वभवातील जटायू एका माळ्याचे रूप घेऊन येतो. एका वैराण शेतामध्ये अनेक वाफे तयार करून त्यांमध्ये शुष्क लाकडे रोवून त्यास पाणी घालू लागतो. राम त्याची ही कृती वेडगळपणाची असून शुष्क लाकडास काय अंकुर थोडेच फुटणार आहेत? असे विचारतो. त्यावर तो माळी -जटायू देव त्यास विचारतो की, प्राणहीन प्रेतास कितीही पुष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी ते जिवंत थोडेच होणार आहे? त्यावर राम त्या माळ्यावर कोपतो आणि त्यास मारावयास धावतो. तेव्हा तो माळी भयभीत होऊन पळून जातो.

त्यानंतर जटायू देव गवळ्याचे रूप घेऊन एका मोठ्या खांबास एक मोठा डेरा बांधून व त्यात पाणी भरून घुसळू लागतो. राम त्याची ही कृती पाहून त्यास पाणी घुसळून त्यातून लोणी थोडेच निघणार आहे? असे विचारतो. त्यावर जटायू प्रेतास थोडाच जिवंतपणा प्राप्त होईल? असे विचारतो. राम गवळी बावळट आहे असे समजून पुढे निघून जातो.

पुढे रामास एक यक्षनगर लागते. तिथे लोक उखळामध्ये भुसा घालून तो कांडत असतात. राम त्यांना विचारतो की, भुसा कांडल्याने तांदूळ कसे बरे प्राप्त होऊ शकतील? त्यावर लोक रामास विचारतात की, तर मग प्रेतास कितीही शृंगार केला तरी ते जीवंत थोडेच होणार आहे? राम त्यांचे हे अशुभ वचन ऐकून तिथून निघून जातो.

तिथून काहीसा पुढे गेल्यावर रामास एके ठिकाणी काही लोक घाणीमध्ये सुकलेली

पेंड घालून घाणा फिरवीत असतात. ते पाहून राम त्यांना विचारतो की, सुकलेली पेंडीवर घाणा फिरविल्याने तेल थोडेच निघणार आहे? त्यावर ते रामास म्हणतात की, निष्प्राण प्रेतावर कितीही संस्कार केले तरी ते जीवंत थोडेच होणार आहे? तेव्हा मात्र रामाचा विवेक जागृत होतो आणि तो पाठीवरील प्रेत एका झाडाखाली ठेवतो. त्यावेळी त्याची अपार दुर्गंधी सुटलेली असते. लोक रामाच्या पाठीमागे जाऊन त्यास समजावतात आणि मग राम लाकडे गोळा करून लक्ष्मणास भडाग्नी देतो. त्यानंतर रामास वैराग्य उत्पन्न होते. रामासह १६ हजार स्त्री–पुरुष दीक्षा ग्रहण करतात. पुढे राममुनी नंदिग्राम येथे येतात. तेथे प्रधान येतो. मुनींस अंतराय होतो. राम मुनी वनात निघून जातात. एके दिवशी राजा वनक्रीडेसाठी गेला असता राजाचा घोडा चिखलात अडकतो. राणी तिथे जाऊन राजास बाहेर काढते. सरोवराजवळ अन्न शिजवले जाते. राममुनी भावरीसाठी येतात. गुणमालही येतो. गुणमाल राज्य उपभोगू लागतो. राम फिरत फिरत कोटिशिलेपाशी पोहोचतात. येथे इंद्र बनलेली सीता राममुनीची परीक्षा पाहण्यासाठी त्यांना मोहित करू पाहते. सीतेचे रूप धारण करून वनात आनंदाने नृत्य–गायन करू लागते, पण राममुनींचे मन ध्यानामध्ये निश्चळ राहते. त्यांना केवलज्ञान प्राप्त होते. राम सीतेंद्रास लक्ष्मणाची भवगती सांगतात. लक्ष्मण तिसऱ्या नरकात जातो. त्यास अशुभ कर्मांची फळे भोगावी लागतात. सीतेंद्र लक्ष्मण व रावण यांच्या जीवांना नरकातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. पण नरकायू पूर्ण झाल्याखेरीज तिथून सुटका होणे शक्य नसल्याने लक्ष्मण व रावणाचे जीव सीतेंद्राकडून सम्यक्त्व धारण करतात. भामंडल पुन्हा भोगभूमीत जन्मतो. अयोध्या नगरी निर्मल बनते. तेथे गुणमाल श्रावक व कमलजा श्राविका यांना अशोक व तिलक हे दोन पुत्र होतात. सीतेचे दुःख पाहून जे दीक्षित झाले होते ते मुनींपाशी येतात व गुणमाल कुठे आहे हे विचारतात. तेव्हा केवलज्ञानी राम ते मुनी झाल्याचे सांगून ते मुनी एकदा सम्मेदशिखराची वंदना करण्यासाठी यात्रेस जात असताना वाटेत एक गहन वन लागते. तेथे वाटेत चातुर्मास पडतो. वर्षाकाळी मुनींवर तेथे घोर उपसर्ग होतात, ते सर्व सहन करीत राहतात. तेव्हा भामंडल विमानातून जात असताना खाली उतरतो. मुनींना गहन वनामध्ये पाहून त्यांच्या सोयीसाठी तेथे एक नगर स्थापण्याचा विचार करतो. मुनींच्या सेवेसाठी श्रावकांनी तिथे यावे म्हणून सर्व सुखसोयींनी युक्त असे नगर वसवितो. आपल्या मायेने तिथे अनेक श्रावक आणवितो. मुनी धर्मप्रभावना करीत असताना अवचित वीज पडून मृत्यु होतो. भामंडल मोह उपजल्याने मायेचे नगर वसवितो, पूर्वस्नेहामुळे नगर वसविल्याने तेथे त्याचा मृत्यू होतो. हे ऐकून भामंडल दीक्षा ग्रहण करतो. सीतेंद्र राम मुनीस लक्ष्मण व रावण नरकातून बाहेर पडल्यानंतर

त्यांची काय गती होईल हे विचारतो. त्यावर राम मुनी सांगतात की, विनयावती नगरामध्ये सुनंद व रोहिणी या राजा-राणीच्या उदरी जिनदास व अर्हद्दास हे पुत्र होतील. तेथून ते सौधर्म स्वर्गात देव होतील. नंतर ते वृषभदत्ताचे पुत्र सुजाण व सुगुण होतील. दीक्षा घेऊन समाधिमरण साधतील. मग कौशांबी नगरीचा राजा कुमारकांत व राणी लक्ष्मी यांच्या उदरी जन्मतील. त्यानंतर पट्टराणी रत्नावली हिच्या उदरी जन्म घेतील. लक्ष्मण विदेह क्षेत्रात तीर्थंकर होईल, रावण त्याचा गणधर होईल. अशा प्रकारे श्रीरामास केवलज्ञानप्राप्तीनंतर समवसरणाची (गंधकुटीची) रचना व उपदेश झाला आहे.

शेवटच्या **चव्वेचाळीसाव्या अध्यायात** सर्व सभा आनंदित होते.स्वामींचा महोत्सव साजरा करून अनेक जण पुण्यराशी जोडतात. सीतेंद्र सोळाव्या अच्युत स्वर्गात जातो. केवलज्ञानप्राप्ती नंतर रामदेव नगर पाटणात उपदेश करतात. तेथून ते अहीर देशात येतात आणि तुंगी गिरीवर जाऊन शुक्लध्यान करतात. शेवटी अयोगकेवली बनून सिद्धगती प्राप्त करतात. त्यांच्याच सोबत सुग्रीव, हनुमंत, नल, नीलही सिद्धगती प्राप्त करतात. या तुंगीगिरीवरून नव्व्याण्णव कोटी मुनी मुक्तीस जातात. अशा रीतीने कवीने आठवे बलभद्र श्रीराम यांचे हे चरित्र लिहिले आहे. शेवटी या रामकथेची फलश्रुती सांगून कवीने आपली गुरुपरंपरा व रचनास्थल-कालाचा निर्देश केला आहे. शेवटच्या दोन अध्यायांत कवी पुण्यसागराचा उल्लेख नसून भुवनकीर्तीने हे रामायण समाप्त केले असल्याचे लिपिकर्त्याने नमूद केले आहे. यामुळे लिपिकर्त्यासही ग्रंथाचे अंतिम पत्र उपलब्ध झाले नसावे हे आहे.

**- प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**

gomteshpt@gmail.com
mob. 9850758207

* * *


## महाकवी गुणकीर्ती विरचित

# रामायण

## भाग १

**मूळ ग्रंथाची यथामूल आवृत्ती –**
**हस्तलिखित**

एच-२७७
७



श्रीवीतरागायेनमाः॥श्रीआदिनाथायेनमः॥श्रीसरस्वत्यैनमः॥श्रीपद्मावत्यैनमः॥श्रीब्रंह्मदेवायेनमः
आथारामायेणग्रंथलिख्यते॥आदिमंगलचरणिस्मरोन॥महावीरस्वामिलागोन॥भावेकरकमलुजो
डोना॥निरेमाझे॥१॥उजेनमनवाग्वादिनि॥मानाशारदाभवानि॥परब्रंह्ममुखोसंन्नी॥मायेमाझी॥२॥चौपेतन
मनभावेसी॥गौतमस्वामीगणधरासी॥तयाचिचरणकमळासी॥भावपूर्वके॥३॥आतानमुश्रीगुरुसमर्था॥
चरणावरीठेवोनिमाथा॥गुरुप्रसादेसांगेनकथा॥रामायेणपैं॥४॥रामायणग्रंथमहाथोर॥श्रवणमात्रेहोयेउधा
र॥रामचरित्रमनोहार॥ग्रंथमाझी॥५॥कविह्मणेमीअज्ञान॥मजवाचानाहीज्ञान॥सकलुकविजनस्मरोन॥
कथाप्रवंदामी॥६॥जंबुद्वीपामध्येसार॥भरतक्षेत्रमहाअपुर्व॥मघदंदेशसुंदर॥तयामध्येपैं॥७॥मघदंदेश
मासारी॥राजग्रहनामनगरी॥राजाश्रेणिकराज्यकरी॥मंडलेश्वर॥८॥चिलनातयाचिराणी॥पतिव्रतासिरोम
णी॥दोघेदंपतिभावधरोनि॥धर्मकरिती॥९॥अभयेकुवरवारिसेना॥दोघेपुत्रआदिकरोना॥अनेकपुत्रमहास


राम
१

गुण पुल्येफळे॥१०॥सेनामीवर्णुकाये॥असंख्यातगजरथअहे॥श्रीगारवर्णिलाजाये॥पाउखियाचे॥११॥राज्यमा
येमार्गिकरिती॥सुकृताचेभंडारभरीती॥कीर्त्तिवाढलेअद्भुत॥त्रिभुवनिपै॥१२॥कोनेयेकेदिवसी॥राजाबैस
लासभेसी॥सोभादिसतसेकैसी॥इंद्रसमान॥१३॥श्रेणिकदिसतसेकैसा॥तारांगणमाजिचंद्रजैसा॥समंता
सेत्रियासरसा॥बैसलासेपै॥१४॥मगइतुकियाअवेस्वरी॥आलासेवनपाळजरी॥तयावचनअवधारी॥स
मोशरणआले॥१५॥वर्धमानाचेसमवशरण॥द्वादशसभासहितजाण॥रचिलाइंद्रयेबोन॥महासंधर॥१६॥वि
पुलाचळसिखरी॥कायेसांगुनवळपरी॥जळेभरिलेवापिविहारी॥फळलेवन॥१७॥कोकिळाकरितिझुंकार॥
भ्रमरकरितिगुंजाकार॥रावेकरितिआनंदथोर॥वनदेखोनि॥१८॥आणिकयेकनवलजाण॥ज्याजिववैरपू
र्विहुन॥त्याहिठाकिलेक्रुरपण॥बैसलेभो॥१९॥ऐसेअतिशयेस्वामिचे॥अवकाळिफळफुलाचे॥गुढीआणि
लेसत्येवाचे॥सेतुह्मासीपै॥२०॥वनपाळाचेवचने॥रायेऐंकिलिश्रवणे॥राजाहर्षलाजाण॥मनामध्येपै॥२१॥

राम
१

मगवनपाळाकारणे॥रायाहीधळावखीभरण॥नयावादरिद्रफेडोन॥सुखिकेळा॥२२॥मगसिंहासनावरोन॥नग
रळोकहकारोनि॥अश्वगजरथपाळखीजाण॥चालिलापैं॥२३॥समपांउपुढेजाउन॥राजाउतरळाजाण॥सर्वळो
कमिळोन नमोस्तुकेला॥२४॥येउनिसकळपरिवार॥सवेंचेळणाराणिसुंदर॥पूजाघेतलिप्रचुर॥अष्टप्रकारी॥२५
राजाहस्तिबैसोन॥चाळळावंदनाळागुन॥मगसमवशरण॥देखोन॥उतरळेपैं॥२६॥मगपादेचालिले भूप॥गेळास
मवशरणासमिप॥देखोनितिर्थंकरस्वरुप॥हर्षळापैं॥२७॥तीनप्रदक्षणादेउनि॥नमोस्तुकेळाकरजोउनि॥बै
सळानरसभायेवोनि॥श्रेणिकराजे॥२८॥अष्टप्रकारकेलिपूजा॥मनिभावधरोनिवोजा॥राजापुसताजाहळास
हजा॥स्वामिनाथा॥२९॥मगवसष्ठिलिदिव्यध्वनि॥बारासभाभावधरोनि॥मगधिभाषाशास्त्रश्रवण॥ऐकतिपैं॥
॥३०॥ऐंकिलिश्रावकाचार॥धर्माधर्मविचार॥धर्मसागरअनागार॥ऐंकिलिपैं॥३१॥षठद्रव्याचेव्याकर्ण॥सप्ततत्वा
चेविवर्णन॥सप्तव्यसनाचेनिरोपण॥केलेअसेपैं॥३२॥मगइत्तुकियाउपरिजाण॥राजाउठलाभावधरोन॥पुसे

करकमळजोडोन॥स्वामिप्रति॥ ३३॥ स्वामिजिनशास्त्रें ऐंकिले॥ ते मासी या मनीं बैसेले॥ अन्येशास्त्र मिपाहिले॥ चि
२ त्तनबैसे॥ ३४॥ विपरित मत्तें ऐंकोनि॥ नयेकाहि साचाखुन॥ तेथे प्रतक्षा स प्रमाण॥ नसे काहि॥ ३५॥ तो ब्राह्मणनी खेळ
डापारधी॥ आणि सांवस्राचीकेला वध॥ हे विपरित अबुध॥ बोलणे पैं॥ ३६॥ इक्ष्वाक कुळविशाल॥ सूर्यवंषि राजामि
र्मळ॥ दशरथ महाद्याळ॥ जिनधर्मि पैं॥ ३७॥ तयाचे पुत्र रामराये॥ तो मोक्षगामि जीव होये॥ त्याने मृग कैसी वधि
लि होये॥ हे विपरीत मत्ते पैं॥ ३८॥ रामाचे पुत्र दोघे जण॥ येक अंकुश येक लव जाण॥ लक्षुचा केला लवण हे केविप
डे॥ ३९॥ सप्तधातु आणिले कोटुन॥ जिवघातला कोटून॥ केसा आले चेतन॥ तयासी पैं॥ ४०॥ सुग्रीव वालि बंदु जाण
कळिके लियेक खी याकारणे ऐंसे हे विपरित जाण॥ ने मा नेमजे॥ ४१॥ मोक्षगामि हो जिवासी॥ कपि म्हणतिहनु
मंतासी॥ मिथ्यामति बोलणे ऐंसी॥ ऐंकलि पैं॥ ४२॥ समुद्र सखोल गहन॥ सीळी बांधिलि कैसे जाण॥ वरून गेले राम
सेन्ये॥ हे किमर्थ घडे॥ ४३॥ ऐंसे कुशास्त्र मिथ्यामतिची॥ ऐंकिलि अन्य दर्शनाची॥ तयासी मज न बैसे रुचि॥ स्वामिना २



था॥४४॥स्वामिकेवळवाणि तुमचि॥साक्षसांगा विसिधांनाची॥संदेह निर्मळमनाचि॥होइलदेखा॥४५॥महावी
राचिअंमृतवाणि॥नसळिलि दिव्य ध्वनी॥तयाचिफळश्रुति करोनि॥सांगे गौतुम॥४६॥देवाचि मगधिवाणि॥
बारासभाऐंकेश्रवणि॥आपुलेले भाषाकरोनि समजतीपैं॥४७॥गौतमम्हणे आहोश्रेणिका॥मगधदेशिचान
यका॥सूर्यवंषाचि उत्पत्तिऐंका॥समूळपैं॥४८॥मूळआदिश्वरापासोन सूर्यवंषाचि मांडणि॥कोणकोण जाहलेयथु
न॥सांगेन आता॥४९॥संभव अभिनंदन॥सुमति पद्मप्रभजाण॥चंद्रप्रभ सुपार्श्वजाण॥सीतळश्रीयांश्रपैं
॥५०॥वासुपूज्य विमळानंत॥त्रिभुवनामध्येजयेवंतु॥सूर्यवंषीमहामहंत॥स्वामिमासे॥५१॥आतासूर्यवंषीसा
ळेरन॥तयाचिसांगेनखुन॥तुह्मीऐंकाचित्तदेवुनी॥रायाश्रेणिका॥५२॥प्रथमविजयराजा जाण॥तयाचेपुत्र
इंद्रसगुण॥वज्रबाहुपुरंधरजिन॥ऐंसेच्यारिपै॥५३॥ताव चौराजियानपरी॥किर्त्तिवजाहलासफपरी॥महदे
वितयाचि अंतुरी॥आहेपैदेखा॥५४॥तयात्तभयेवर्गापासोन॥पुत्रजहलासकोशळजाण॥विचित्रमाळासगु

३

त्ता॥सीळवंतपैं॥५५॥स्कंकोशाउजहला॥मुनिवर॥तपाश्वरणकेलेउर्धरे॥कर्मजें किला घनघोर॥मुक्ती
सगेला॥५६॥राज्ये पाळलें पुतनेन॥मग संजम घेतला जाण॥राज्ये दिधला सुघोषकारणें॥आपुला पु
त्र॥५७॥सुघोषरायाउपरी॥सद्दुदास जाला जरी॥सिंव्हरथ तयाउपरी॥पुत्र जहला॥५८॥तयाउपरी ब्रं
द्रईन॥मग चतुर्मुख जाण॥मेघरथ प्रजापाळोन॥राज्ये केले॥५९॥प्रथ्वीरथ रायेरथ॥इंद्ररथ रायेर
थ॥वीररथ करी पुरुषार्थ॥धर्माचें फळे॥६०॥मग उत्तुकियाउपरी॥राजामानघात राज्ये करी॥म
गकमळबंध स्कंधरी॥सूर्यवंषीचें॥६१॥याउपरी वसंततिळका॥वसंतावरी राज्येधारका॥नरसिंव्ह
धंन्ये धन्ये कुमरा सुजाण। धंन्य धंन्य माता पित्याकारण।।
पुत्राचे द्रढ देखोन मन। विद्या तुष्टल्या।।३६।।
तत्समइ सत्वर। विद्या आलि येक हजार।।
रावणासी दिधला नाभीकार[१]। जहल्या प्रसंन।।३७।।
विद्या साधिल्यावर। मग जहला जये जयेकार।।
तीघे बंधू हर्षनिर्भर। जाले मनी।।३८।।
गौतम म्हणे श्रेणिका। मग देशिचा नायेका।।
विद्या साधिलि ऐंका। रावणा हो।।३९।।
पहिली विद्या अग्नीबाण। मग विद्या मेघ पवन।।
पर्वतानंग वज्रबाण। सातवि नाग।।४०।।
बद्धमोचनि बद्धकारीणी। नव विरुपकारणी।।
रवि शशी दाहा विभामिणी। जाणव्या पैं।।४१।।
या विद्या आदि करोन। प्रसंन् सहस्र जाण।।
पुण्ये फल म्हणोन। प्रसंन् जाहल्या।।४२।।
सर्वाधि सर्वहरणि। गुणवंति दर्शणकरणी।।
पाचवि खगगामिणी। जाण पैं देखा।।४३।।
विद्या कुंभकर्णलागुन। त्यासी पाच विद्या प्रसंन्।।
महा थोर प्रतापि जाण। बंदु रावणाचे।।४४।।
विभीषण राया लागुन। तीन विद्या जाले प्रसंन्।।
नामे तयाचि सांगेन। वेगळि पैं।।४५।।

---

१. अभय.

विद्या नाम सहुदामिनि। दुजि सिधार्थ सुख खाणी।।
तीजी परघातवनी। नाम तीही पैं।।४६।।
अनावृत यक्ष जाण। आला जंबुद्वीप पाहुन।।
हसला कुवर देखोन। मनामाजी।।४७।।
धन्य धन्य दशानन। धन्ये माता सुजाण।।
राक्षास वंशी कुलमंडण। जन्मलासि तु।।४८।।
काये केले अनावृताने। रावण पूजिले वस्त्राभरण।।
महा मोहोत्साव करोन। गेला स्वस्थानका।।४९।।
रावणा सजनाकारणे। वाधावनी पाठवीली जाण।।
आले विमानि बैसोन। सज्जन पैं।।५०।।
राक्षस वान्येर मिळोन। रावण आला ग्रहालागुण।।
महा मोहोत्साव करोन। राजि बैसविले पै।।५१।।
राक्षसवंशी शृंगार। राजा रावण प्रताप सुर।।
त्याने बैसविले येक नगर। सूर्येप्रभा पैं।।५२।।
राजा राज्ये करि रावण। माता पिता हर्षायेमान।।
नित्ये करिति धर्मध्यान। भावपूर्वक।।५३।।
हे कथा राहिली येथे। अणिक कथा वर्त्तलि तेथे।।
सुरगिरि नगर जेथे। राजा विद्याधर पैं।।५४।।
मया दैत्य राया नाम जाण। हेमवंति राणि वखाण।।
कंन्या जाहलिसी दोघे जण। नाम मंदोदरी।।५५।।
रुप सौभाग्ये अगळी। सीलवंति चापेकळी।।
येंवनभरीत जाला बाळा। कुरंगनयनी[१]।।५६।।
मंदोदरि कंन्या देखोन। विचारिले मया दैत्याने।।
प्रधानासी बोलाउन। पुसता जाला।।५७।।

१. हरिणाक्षी, मृगनयनी.

हे कंन्या द्यावे कोण खेचरी[1]। येक म्हण इंद्राचे घरी।।
येक म्हणती लोकपाळ मंदिरी। द्यावि कंन्या।।५८।।
मया दैत्या म्हणे विचारुन।हे कंन्या महा सगुण।।
द्यावि रत्नश्रवालागुन। रावणासी।।५९।।
दशानन सोहजला। सह विने आगळा।।
तया योग्ये हे बाळा। मंदोदरी पैं।।६०।।
मग इतुकिया उपरी। विमान रचिले सुपरी।।
प्रधानसहित झडकरी। चालिला पैं।।६१।।
विमान चालिला वेग त्वरे। तव देखिली धवलारे।।
धवलावरी चंद्रनखा सुंदर। देखिली पैं।।६२।।
चंद्रनखेन केला आदर। तेथे क्षणेक जाला स्थिर।।
म्हणे कोठे गेले दशसिर। सांगा बाइये।।६३।।
चंद्रहास खडग सादोन। यात्रेसी गेला म्हणोन।।
मेरुगिरी वंदना करोन। येतिल आता।।६४।।
तव बैसले समान। आकासि देखिलि विमान।।
सत्वर आले दशानन। जाल्या भेठी।।६५।।
क्षमालिंगण जहलेयावरी। दशानन पुसे जरे।।
कोण कार्या यथेवरी। जहले येणे पैं।।६६।।
अम्हा येथेवरी जाले येणे। तुम्हा पाहावया लागुन।।
अंम्हा घरी कंन्यारत्न। मंदोदरि पैं।।६७।।
हे द्यावि तुम्हाकारण। म्हणोनि येथेवरी जाले येणे।।
मग मंदोदरि आणुन। दाखविलि पैं।।६८।।
मग जाहला जये जयेकार। मंदोदरी देखिला सुंदर।।
रावणा हर्षनिर्भर। जाहला असे पैं।।६९।।

---

१. विद्याधरी.

मंदोदरि देखिलि कसी। की उर्वसि रंभा जैसी।।
स्वर्गिचि अपसरा जैसी तैसी। देखिलि पैं।।७०।।
मग बोलला रावण। मया दैत्या राया कारण।।
हे द्यावि अम्हालागुन। मंदोदरि पैं।।७१।।
इंद्राचे धाके करोन। गुप्त रूपे केले पाणिग्रहण।।
मया दैत्ये आला ग्रहालागुन। आपुले पैं।।७२।।
मग इतुकिया उपरी। रावणे केले सहस्र नारी।।
तयामध्ये वडिल मंदोदरि। पट्टराणी।।७३।।
सहस्र विद्याधरी मिळोन। गेला वनक्रिडेलागुन।।
तव तेथे आला रावण। खेळावयासी।।७४।।
रावणाचे रुप देखोनि। जैसा उगवला भान।।
सकल कुमारी मिळोन। मान दिल्हा।।७५।।
प्रिति उपजलि थोर। मोहो उपजलि फार।।
रावण संगे आले सत्वर। ग्रहासि पैं देखा।।७६।।
खबर गेलि घरोघरि। कोल्हाळ झाला येकसरि।।
तयाचे बाप आले सत्वरे। तये वेळी पैं।।७७।।
आले कठक घेउन। कोपायेमान होउन।।
ते देखिलि दशानन। संन्मुख जाहला।।७८।।
युद्ध प्रवर्तले रावणासी। रावणे गोविले नागफासी।।
बांधूनि पाडिले तयासी। सैन्ये सहित।।७९।।
पुनहा सोडिले रावण। प्रीती वाडीली गहन।।
दिधलि पाणिग्रहण करुन। कंन्या आपुली।।८०।।
रावणाचे आज्ञा घेउन। गेले स्वनगरालागुन।।
रावण जयेवंत होउन। असे ग्रही।।८१।।

मग इतुकिया उपरी। अनंद झाला घरोघरि।।
रावणाचे सज्जन सोयेरी। धर्म करीती।।८२।।
जिनधर्म करिता जाण। मंदोदरिसी जाला नंदन।।
जैसा हिमकर भान। नाम इंद्रजित असे।।८३।।
दुसरा पुत्र जाला सुंधर। नाम त्याचे जयेकुमर।।
देखोनि हर्ष(नि)र्भर। जाला निर्भय रावण पैं।।८४।।
इतुकिया उपरी जाण। रावणाचे बंधू कुंभकर्ण।।
तेणे कठक सज्ज करुन। चाल केली पै।।८५।।
धनंदाचे[1] नगर। लुठले असे महाथोर।।
धन आणिले फार। कुंभकर्ण पैं।।८६।।
धनंदा जाला कोपायेमान। आला सह परिवार घेउन।।
युद्ध जाहले महादारुण। येक्ष राक्षस पैं।।८७।।
युद्ध करिता धनंदासी। रावण जिंकिले तयासी।।
मग चालिला लंकेसी। रावण पैं।।८८।।
मग जहला जये जयेकार। अनंद वर्तला थोर।।
चालिला किस्किंदा पुरिवर। रावण पैं।।८९।।
चाल केलि लंकेवरि। लोकपाल आणिला हारी।।
घेतलि आपुलि लंकापुरी। सत्वरेसी पैं।।९०।।
संग्राम मांडिला दोइळी। येम उभा राहिला स्वमेळी।।
रावण जिंकिले तयेवेळी। यमराज पैं।।९१।।
घेतले किस्किंदा पुर। राजि स्थापिला वानर।।
फिरुनि आला लंकेश्वर। लंकेसी जाण।।९२।।
मग काये केले रावण। आणिले परिवार सज्ज करोन।।
तिघे बंधव मिळोन। राज्ये भोगिति।।९३।।

१. कुबेर.

राक्षस कुळी श्रींगार। रावण राजा महाथोर।।
कुंभकर्ण महा विभीषण वीर। धर्मवंत पैं।।९४।।
हे कथा राहिलि येथे जाण। पुढे वर्त्तलि ते सांगेन।।
ब्रंह्मजिनदास आपण। सांगता झाला।।९५।।
किस्किंदापुर नाम नगर। राजा सुर्यप्रभ राज्य करी।।
इंद्रमालिनि तयाचि अंतुरी। सौभाग्य जाण।।९६।।
तया दोघापासुनी जाण। पुत्र जाले दोघेजण।।
वालि सुग्रीव म्हणउन। असे त्याचे पैं।।९७।।
दोघा पुत्रवरी कुमरी। सूर्येप्रभा जाली सुंदरी।।
काये सांगो रुपाचे परी। जैसी रंभा।।९८।।
इतुकिया उपरी ऐंका। ऋषि राजा राज्य करि निका।।
सीक्षापुरि नाम सुरेखा। नगराचे पैं।।९९।।
मेघमालिणि राणि तयाचि। काये वर्णु रुपा तयाची।।
तये कुसी दोघा पुत्राचि। उत्पती जाहला पैं।।१००।।
नील महानिल जयेवंत। धर्मवंत आणि पुण्येवंत।।
जैसा शशिसूर्येमहंत। दिसति पैं देखा।।१।।
कोणे येके अवेश्वरी। मुनि आले वनांतरी।।
ज्ञानि आले ज्ञानसागर नाम जरी। जैसा भानु पैं।।२।।
मुनि सांगे धर्म विचार। सागर अनागार।।
दशलक्षणिक धर्म थोर। निरोपिला पैं।।३।।
धर्म ऐंकोनिया रायासी। वैराग्ये उपजला दोघासी।।
सूर्येराजा ऋषिरायासी। त्रिशुधि पैं।।४।।
वालि दिधले राज्ये। सुग्रीवासी दिधले युगराज्ये।।
तुम्हि चालवावे धर्मकाजे। जुगराज्ये पैं।।५।।

ऋषिरायाचे नंदन। नील राजा राजी थापुन।।
दिधले महानिलाकारणे। युगराज्ये पैं।।६।।
        सूर्येराजा ऋषिराजा। संजम घेतलि वोजा।।
        प्रवर्त्तले आत्मकाजा। ध्यान धरोनिया पैं।।७।।
वालिने काये केलि भाव धरुनि थोर। वृत घेतले श्रावकाचार।।
दयावरि धरिला निर्धार। गुरुवचने।।८।।
        गुरुसि प्रणिपात करोन। स्वनगरा गेलि जाण।।
        किस्किंदापुरि समाधान। राज्ये करीती।।९।।
हे कथा येथे राहिलि जाण। पुढे वर्तलि कथिन।।
ते ऐंका चित्त देउन। श्रोतेनो।।१०।।
        खरदुषण विद्याधर। लंकेसि आला सत्वर।।
        मागति चंद्रनखा तत्पर। द्यावि अम्हासि।।११।।
रावणे विचारे मनि। उद्धत कुवरालागोनि।।
न देउ आपुल्या भगिनि। या कारणे पैं।।१२।।
        चंद्र नेदि म्हणोन। जालासे लज्जायेमान।।
        खरदुषण लाज धरोन। आले ग्रामासी।।१३।।
खरदुषण बोले वचन। हठे चंद्रनखा पर्णिन।।
नाहितरि कुमार असेन। जन्मपर्येंत।।१४।।
        इतुकिया उपरि जाण। काये केले खरदुषण।।
        चरित्र पैं।।१५।।
पाताळ लंकेहुन। काडिले चंद्रोदयालागुन।।
राज्ये घेतला हिरोन। खरदुषणे पैं।।१६।।
        हे ऐंकिले रावण। महा कोपायेमान होउन।।
        सैन्ये आपुलि पालाणुन। राज्ये जाले।।१७।।

खरदुषणाचे फेडिन ठाये। बोलिला दशानन राये।।
मंदोदरि बोलिलि तव। ऐंका स्वामी।।१८।।
चवदा हजार विद्याधिश। अणि पाताळलंकेचा इश।।
उत्तम कुळी जन्म त्याचे। पराक्रमि पैं।।१९।।
इतुकियाने अनंद जाला। यीचेनि सोयरी जोडिला।।
क्रपा करोनि तयाला। स्वामिनाथा।।२०।।
मंदोदरिचे वचन। ऐंकिले चित्त देउन।।
दशानन समाधान। राहिले असे पैं।।२१।।
मग चंद्रोदयान। पाताळलंकेसी घेउन गेला।।
चिंता थोर केलि भान। मनामाजी।।२२।।
रावण खरदुषण। दोघे येक जाले जाण।।
म्या कोण जावे शरण। काहि न चले।।२३।।
इतुकियावरी जाहले। चंद्रोदयाचे आयुष्य सरले।।
तयाने मरण साधिले। नवकार मंत्रे।।२४।।
तयाचि राणि अनुधरा। अणि ते होति गरोदरा।।
अरंण्येवासि सुंधरा। असे येकलि।।२५।।
मग अनुधरेकारणे। प्रसुति जहलेसी कारणे।।
पुत्र जाला तिज कारण। महासुंधर।।२६।।
पुत्र देखोनि लोचनि। दुख अठविले मनी।।
रोदन करीतसे राणि। चंद्रोदयाचे।।२७।।
आहा पुत्रा अभागि जरी। पिता नाहि याचे शिरी।।
जातमोहोत्सव कोण करी। या पुत्राचे पैं।।२८।।
हा आधानि असति जाण। याचा पिता गेला मरोन।।
राज्ये घेतला हिरोन। खरदुषणे पैं।।२९।।

याने विरोधले थोर। नाम विराधित कुवर।।
मातेने ठेविला सत्वर। पुत्राचे पैं।।३०।।
बीजेपासोनि चंद्र जरी। दिन दिन वृद्धि करी।।
हळु हळु यौवन भरी। जाला असे पैं।।३१।।
रुप लावण्ये आगळा। जाणे बाहत्तरि कळा।।
विज्ञानपणे सोहळा। माहा प्रतापी।।३२।।
मग इतुकिया उपरी। विराधित कुवर जरी।।
मेळविले अश्व करी। अणि रथ पैं।।३३।।
मग जाला बलवंत। विचारि मना स्वहित।।
तव आला वनात। शृतसागरापासी।।३४।।
पुसिले मुनिकारणे। अमुचि राज्ये अम्हाकारणे।।
कदि येइल सांगणे। मुनिराये।।३५।।
मुनि बोलला वचन। विराधिता ऐंका खुन।।
स्थिर करि आपुले मन। निश्चीत पैं।।३६।।
राम सीता लक्ष्मण। या सेल येतिल जाण।।
खरदुषणासी जिंतुन। राज्ये देति तुजे।।३७।।
मग विराधित कुवर। जहला हर्षनिर्भर।।
अपुले मन करोनि स्थीर। राहिला सुखी।।३८।।
हे कथा राहिले येथे जाण। आणिक तुम्हा सांगेन।।
ऐंका चित्त देउन। वालियाचे पैं।।३९।।

**इति रामचरित्र भठारक श्री भुवनकिर्ति तत्पट्टे आचार्येगुणकिर्तिविरचिते विराधित कुवर मुनिप्रछ नाम त्रितियोध्यायाः।।**

**येकुन संख्या २८३।। श्रीरस्तु।।**

* * *

# चतुर्थ अध्याय

**।। श्री वीतरागाये नमः।।**

प्रथम नमू श्री जिनराया। आणि दुजे शारदा माया।।
तीजे नमन श्री गुरुराया। त्रिशुधि पैं।।१।।
लंकेशी राज करि रावण। किस्किंदा पुरि वालि इन।।
सेवा न करि म्हणोन। रावणा कोपे।।२।।
महा कोपायेमान होउन। चतुर्विध सैन्य घेउन।।
चाल केलि किस्किंदापुरा लागोन। आला रावण।।३।।
रावण आला म्हणउन। हे कळले वालि लागुन।।
आला सैन्ये सज्ये करोन। सन्मुख पैं।।४।।
दोन्ही दळे युद्धाकारणे। सन्मुख उभा ठाकुन।।
वाजति ढोल तबेल निशान। गगन गर्जे।।५।।
आकासि झळकति विमान। विद्याधर सज्ज होउन।।
युद्ध मांडिले दारुण। किस्किंदापुरि।।६।।
मंत्रि मिळाले उभयेता। भाव धरुनि समता।।
वालि मोक्षगामि तत्वता। धरेवरि पैं।।७।।
दशानन अति बलवंत। त्रिखंडाधीश जयेवंत।।
वालि धिरविर अद्भुत। न ढळे पैं।।८।।
सैन्य होइल भंग। क्षय पावति सूर गज तुरंग।।
बहुताचि होति मानभंग। रणामध्ये पैं।।९।।

दशानन आणि वहिला। प्रधाने विनविले बळी।।
तुम्हि न करावे कळी। निरार्थक पैं।।१०।।
अम्हि सांगिन तो ते करावे। सैन्ये दोघे सोडुन द्यावे।।
स्वयं तुम्हि युद्ध करणे। दोघे सुभट पैं।।११।।
दोघे हे वचन मानुन। आले रणभूमि लागोन।।
मल्लयुद्ध करावयाकारण। उभे ठाकले।।१२।।
रावण म्हणे वालिसी। जरि तु नमस्कार करिसी।।
तरि तुज राज्य तुजसी। चीरंजीवीत पैं।।१३।।
जरि तु ऐंसे न करिसी। तरि मरण आले तुजसी।।
कुंठल्याविण कामरसी। हस्ते माझे पैं।।१४।।
वालि म्हणे रावणाकारणे। म्या सम्यक्त घेतली जाण।।
येक जिनेश्वरावाचून। न मानि कोन्हा।।१५।।
मि बैसलो गजावर। गज सोडुनिया जर।।
न बैसे खरावर। रावणा पैं।।१६।।
कि ठाकावि रत्नासि। आणि कसिया घ्यावे काजे मणिसी।।
सत्ये ठाकुनि असत्यासी। का वंदावे।।१७।।
अमृत कसिया टााकावे। विष कसीया घ्यावे।।
चंदन सोडुनि खैर साधावे। हे केविं घडे।।१८।।
वालि म्हणे रावणालागुन। तु ऐंका माझी वचन।।
म्या नेम घेतला म्हणोन। क्षमा कीजे।।१९।।
तु नको करु गुमान। मोडिन तुजे अभीमान।।
हारि आणीन तुजकारणे। क्षणामध्ये।।२०।।
मग कोपला दशानन। जोंबी[१] आले दोघेजण।।
भरत बाहुबली जाण। तैसे भिडति।।२१।।

१. झोंबणे, भिडणे.

युद्ध जाले महा दारुण। नाठोपति येकमेकालागुन।।
जिंतिले दशाननकारणे। वालिने पैं।।२२।।
मग जाला जयजयकार। जैत[1] वाद्य वाजती फार।।
पक्षपाति वालिचे सुर। हर्षले पैं।।२३।।
रावणाचे जाला अपमान। हठति घेतलि मान।।
चंद्र गेला उतरोन। दशाननाचा।।२४।।
ऐसे देखोनि वालिने। पश्चताप केला स्वमने।।
धिग्ये या राजि कारणे। त्याजावे पैं।।२५।।
वालि बोलला रावणाकारणे। संताविले तुम्हालागोन।।
क्षमा किजे अम्हाकारण। रावणा पैं।।२६।।
वैराग्य जाहले अंम्हास। अमुचे मन जाहले उदास।।
अंम्हि जातो दीक्षा घ्यांवयास। स्वहीतालागी।।२७।।
राजी बैसवीले सुग्रीवासी। वाली गेलि वनासी।।
गगनचंद्र मुनीपासी। दीक्षा घेतली।।२८।।
अठावीस मूलगुण संयुत। वालि मुनि तप करित।।
रत्नत्रयालंकृत। ध्यान मौन्ये पैं।।२९।।
अष्टापदावरि जाण। कायोत्सर्ग करि ध्यान।।
अचल मेरुसमान। मुनिराज पैं।।३०।।
इतुकिया उपरि श्रेणिका। नित्येपुरि नगरी नीका।।
श्रीधर पैंर्णिमाचंद्र सुरेखा। तैसा सोभे पैं।।३१।।
श्रीमति राणी तयाची। काये वर्णु सोभा रुपाचि।।
तये कुसि उत्पति पुत्राचि। जालि असे पैं।।३२।।
रत्नावळी नाम जाण। सीलवंती महासगुण।।
रुप उर्वसीसमान। चापेकळि पैं।।३३।।

१. विजय.

रावणे पर्णिलि जाण। महा मोहोत्साव करोन।।
चालिला विमानि बैसोन। गगन मार्गे।।३४।।
अष्टापदाहुनि विमान। जाता खुंठले जाण।।
पाहे हठता उतरोन। मुनि देखिला।।३५।।
बोले मुनिलागुन। वाणि कर्कश कठीण।।
पूर्वि केलेसे अपमान। संग्राम माझी।।३६।।
आता झालेती महामुनि। कोप न त्याजेले अझुनि।।
विमान माझे खिळोनि। उभे केले।।३७।।
क्षमा का तुम्हि त्याजिली। कोपवृत्ति का धरिली।।
ध्यानाचि सीमा मोडिली। काये साधिले पैं।।३८।।
कांजि घालुनि दुधासी। तैल घालोनि घृतात।।
तामृ घातले कांचनात। ऐंसे जहले तुम्हा।।३९।।
वैर घेइन अपुले जरी। उचलीन अष्टापद गिरी।।
ठाकिन भूमिकेवरी। ऐंसा चिंतिले।।४०।।
कुंठणि[१] नासिले कामिणि। प्रिति नासिलि लोभान।।
तप नासले अहंकारान। तैसे जाले तुम्हा।।४१।।
मग काय केले मुनिन। पर्वतावरी जिनभुवन।।
स्थापना केलि भरतान। धर्मालागि पैं।।४२।।
हा पापि करिल विनाश। पाय दडपिले पर्वतास।।
कंप सुठला रावणास। भारे दडपिले।।४३।।
देवदेवि हर्षलि जाण। धन्य धन्य मुनिलागुन।।
या रावणाचे अभिमान। उतरीला।।४४।।
रडता देखिला रावण। हसति देवदेवि मिळोन।।
नाम ठेविले रोवण। रावणाचे पैं।।४५।।

१. जार व जारिणी यांचा संयोग घडवून आणणारी स्त्री.

मंदोदरि आदि करोन। सकल नारी आले जाण।।
विनविति कर जोडुन। मुनिप्रति पैं।।४६।।
स्वामि राखावे पतिकारण। अम्हा द्यावे चूडेदान।।
अम्हि आलो शरण दीन। दया कीजे पैं।।४७।।
हा लोभी चुकले वर्म। येणे बुडविले धर्म।।
स्वामि त्रिभुवन तारण। शम दमन मूर्ति।।४८।।
स्वामि जैसे केल्यान। तैसे पावला जाण।।
बहु हडपिले वैरियान। दया करावी।।४९।।
स्वामि तुजपुढे रोकडे। भारे दडपिले माकडे।।
करी आपुले स्वीकोडे। देइ चूडेदान।।५०।।
मुनि दयापालक भला। तव मुनिने पाये उचलिला।।
रावण तेथोनि सुठला। आला शरण।।५१।।
वालि मुनेश्वराकारणे। विनंति करि रावण।।
क्षमा कीजे मज लागुन। स्वामिनाथा।।५२।।
मुनिश्वरासी नमोस्तु करोन। रावण आला जिनभुवन।।
वीणा स्वये करि घेउन। स्तुति करी।।५३।।
अष्ट प्रकारि केलि पूजा। मनी भाव धरोनि वोजा।।
नृत्ये करि रावण राजा। देवापुढे पैं।।५४।।
पक्ष राहिली तेथ दोन। भगति भावे करोन।।
पश्चाताप केले म्हणउन। फेडिले पाप।।५५।।
भक्तीभावे देखोन। नागराजा तुष्टला जाण।।
शक्ति झालि प्रसंन। रावणासी पैं।।५६।।
शक्ति विद्या घेउन। राव आला लंकेलागुन।।
महा मोहोत्साव करोन। गेला ग्रहासी।।५७।।

राज्ये करि समाधान। धर्म करि दशलक्षण।।
देव गुरु वंदना करोन। नित्यशा पैं।।५८।।
वालि मुनि बोलिला जाण। म्या संताविला दशानन।।
दोष घडला म्हणोन। प्रायश्चित्त घेतले।।५९।।
गुरुमुखे बाहेरे दुषण। मुनिचेनि केल्या जाहले मन।।
मग धरीलेसे ध्यान। आत्मतत्वी पैं।।६०।।
मग ध्यानबळे करोन। कर्माचे जाहले क्षळन।।
उपजले केवलज्ञान। वालि मुनिसि।।६१।।
देशोदेसि केलि संबोधन। भव्यजन केले धर्मध्यान।।
मग मुक्तिस्त्रीया वरोन। झाले सिद्ध।।६२।।
हे कथा येथे राहिली जाण। पुढे कथा ऐंकण।।
सुग्रीव तारेचा सांगेन। विवाह पैं।।६३।।
जोतिपुर नाम नगरी। अग्नीसिख राजा राज्ये करी।।
हीयामति राणि सुंदरी। सीलवंति पैं।।६४।।
उभयता दोघापासोन। कंन्यरत्न जाला जाण।।
नाम ठेविले तया लागोन। तारा दुहिता।।६५।।
सीलवंति गुणे आगळी। रुप जैसे चापेकळी।।
सम्येक्त महा निर्मळी। पुण्येवंत।।६६।।
सौंधर्य ऐंकोनि कंन्याचे। मागणे आले सुग्रिवाचे।।
दुसरे सहगतिचे। तारेकारणे।।६७।।
अग्नीसिखी विचारिले मानसी। हा संदेह पुसावा गुरुसी।।
गुरु निरोपेल अम्हासी। तेचे करू पैं।।६८।।
पुसिले गुरुकारणे। स्वामी बोले वचनी।।
सहगति धर्महिन। आयुष्ये थोडे।।६९।।

धर्मवंत अणि पुण्यवंत। रूपवंत अणि श्रीवंत।।
वानरवंषीचे अद्भुत। सुग्रीव पैं।।७०।।
अग्नीसिखरे काये केले जाण। मानिले गुरुवचन।।
दिधले पाणिग्रहण करोन। सुग्रीवासी।।७१।।
विवाह जाला सुरस। मोहोत्साव जाला चारी दिवस।।
घेउनि आला ग्रहास। तारा सुग्रीव पैं।।७२।।
प्रीति उपजलि जाण। दोघे करिति धर्मध्यान।।
देवगुरुप्रति वंदुन। पुण्ये जोडती।।७३।।
सहगतिचे अपमान। थोर जालासे जाण।।
झुरतसे तारेकारण। मनामाझी।।७४।।
कदि रुप देखेन ताराचे। ऐंसे अर्त धरिले तिचे।।
समाधान होइल अमुचे। कवणे परि।।७५।।
अभिमान मनि धरोन। गेला असे वनि लागुन।।
स्मरिले विद्यासाधन। अज्ञानपणे।।७६।।
कथा राहिली येथवर। दिग्वीजयाचा परिकर।।
सांगेन प्रताप थोर। रावणाचा पैं।।७७।।
सैन्ये मिळविले रावणे। राक्षेस वान्र मिळोन।।
दिग्वीजये साधन कारण। चालले पैं।।७८।।
मग खरदुषणे येउन। भेठला रावणालागुन।।
रावणे दिधले आलिंगण। खरदुषणे पैं।।७९।।
रावण म्हणे भाग्ये अमुचे। येणे झाले स्वामि तुमचे।।
परस्परे वाडले प्रितिचे। स्नेह थोर पैं।।८०।।
कठक मिळाले अफार। हये गज रथ प्रचूर।।
पालखिया पायेदळ प्रचूर। गणित नाही।।८१।।

इंद्रावरि धरुनि डाव। निशानि१ घालोनि घाव।।
चालला लंकेचे राव। इंद्रावरि पैं।।८२।।
चालला उत्तरेलागुन। वाजति डो(ढो)ल तबेल निशान।।
विमानि दाठले गगन। आले नरब(म)दे पैं।।८३।।
नर्मदा देखिलि महाथोर। निर्मल निर अफार।।
निघाले राक्षस वानर। जलक्रिडे पैं।।८४।।
अष्टप्रकारे पूजा केली। इछा परिपूर्ण भाविली।।
धर्माचि जोडि जोडिली। रावणे पैं।।८५।।
महिकमति नाम नगरी। तेथ राजा राज्ये करी।।
सहस्रकीर्ण नाम जरी। असे तयाचे।।८६।।
राजा आला खेळावयालागुन। सहस्र नारीया घेउन।।
जंत्र नंदीसी वंदीला जाण। क्रिडा करि पैं।।८७।।
क्रिडा केलिया उपरी। जंत्र काडुन घेतलि जरी।।
पूर आला तये अवेश्वरी। हाहाकार जाला।।८८।।
रावणाचे मोडिले ध्यान। तव पावले सज्जन।।
बिंबे घेतलि उचलोन। झडकरी पैं।।८९।।
राक्षास धाविनवी जण। ठेविलि सहस्रकिर्ण।।
युद्ध जाले असे दारुण। येकमेका।।९०।।
त्वा पूजा भंग केला म्हणोन। तुझे कोपला दशानन।।
तु केवडे सहस्रकीर्ण। अम्हापुढे।।९१।।
उठवला सहस्रकिर्ण। राक्षससैन्ये मोडीले जाण।।
दाहि दिशा गेला पळोन। कळले रावणा।।९२।।
रावणा उठविला बळीवंत। सहस्रकिर्ण त्वरित।।
जूंझ जाला असे अद्भुत। महा दारुण।।९३।।

रावणे ठाकिले बाण। सहस्रकिर्ण चूकउन।।
मग केले संधान। रावणावरी।।९४।।
मग कोपला दशानन। मेळविला दलभार जाण।।
युद्ध जाले दारुण। येकमेका पैं।।९५।।
रावणे जिंतिले जाण। राजा सहस्रकिर्ण।।
रावणे आणिले बांधोन। स्वनगरा पैं।।९६।।
पुनहा मांडिले पूजा। भाव धरोनिया वोजा।।
संतोषला दशानन राजा। मनि मानसी।।९७।।
सूर्योजाहला अस्तमान। राये विसर्जिलि ध्यान।।
आला स्वस्थानालागुन। रात्र क्रमिलि।।९८।।
मग उगवला दिनकर। रावणा उठला सत्वर।।
सामाइक केले तत्पर। भावपूर्वक।।९९।।
मग बैसला सभा करुन। समस्त क्षेत्री बोलाउन।।
जैसा दिसे सूर्येभान। महाप्रतापि।।१००।।
इतुकिया उपरि जाण। मुनि आले वनालागुन।।
सत्यबाहो नाम जाण। चारण मुनि पैं।।१।।
देखिले रावणे जाण। उठला झडकरोन।।
गुरुसमिप जाउन। नमोस्तु केला।।२।।
भले आलेति स्वामिनाथा। तु तारावया समर्था।।
निग्रंथ गुरु समर्था। भवसिंधूचे।।३।।
रावणे पुसे कर जोडोन। कोण कार्या जाहले येणे।।
सांगा स्वामि अम्हालागुन। क्रपा करोनिया।।४।।
मुनि बोलिले वचन। रावणा ऐंका चित्त देउन।।
सहस्रकिर्ण दे सोडुन। पुत्र माझा।।५।।

रावण तु पुण्येवंत जाण। महा सम्येग्दृष्टी जैन।।
समताभाव देखण। दया किजे।।६।।
        रावण म्हणे मुनिस्वरासी। न्याये अंन्याय आणा मानसी।।
        मग दंडावे अम्हासी। स्वामिनाथा।।७।।
रावणा तु पुण्यवंत। सहस्रकिर्ण सोडि त्वरित।।
येश वाडेल बहुत। रावणा पैं।।८।।
        मग काये केले रावण। मुनिवचन सिरी धरोन।।
        सोडिले सहस्रकिर्णलागुन। संनिध आणिला।।९।।
नमोस्तु केला दोघे मिळोन। सहस्रकिर्ण अणि रावण।।
धर्मवृद्धि दिधलि मुनिन। दोघासि पैं।।१०।।
        रावण म्हणे रे सज्जना। बंधवा सहश्रकिर्ण।।
        राज्ये पाळि आपुलि सगुण। क्षमा किजे पैं।।११।।
मग काय केले रावण। सहश्रकिर्ण अलिंगण।।
चवथा बंधु म्हणोन। असावे सुखी।।१२।।
        सहस्रकिर्ण बोले वाणि। हे राज्ये रिद्धि सुखीचि खाणि।।
        निग्रंथाचे पाये सेवोनि। संजम घेइन।।१३।।
सर्व कुठुंब त्याजुन। दिक्षा घेतलि सहस्रकिर्ण।।
रत्नत्रये पालि गुण। महामुनि।।१४।।
        दिक्षा जाली सहश्रकिर्ण। हे मात गेलि अयुध्यासी।।
        वैराग्ये आरंण्ये रायासी। उपजली पैं।।१५।।
वडिल पुत्र सहित। दीक्षा घेतलि त्वरीत।।
साधिली अपुले हित। परत्रासी।।१६।।
        राजि बैसविले दशरथ। बालपण जयेवंत।।
        राज्येभार चालवित। न्याये मार्गि।।१७।।

हे कथा राहिलि येथे जाण। पुढेल कथा सांगेन।।
मग चालिला दशानन। उत्तरे पैं।।१८।।
आर्या देशात सार। राजपुर नाम नगर।।
पवन राजा प्रताप थोर। राज्य करि पैं।।१९।।
मिथ्यामार्गि भुलला पवन। हिंसाधर्म करी जाण।।
गावाबाहिर मंडप घालोन। यज्ञ मांडिला।।२०।।
ब्रांह्मण मिळाले अफार। वेद पठति घनघोर।।
पशुवे आणिले फार। वधावयासी।।२१।।
कुंड खाणिले विशाळ। अग्नी प्रज्वळला प्रबळ।।
रौद्र ध्यानियाचे मेळ। मिळाला पैं।।२२।।
मग तया अवसरी। नारद मुनि आले जरी।।
पाप करिति दुराचारी। म्हणउनि धावला पैं।।२३।।
मग बोलला नारद जाण। पवन ऐंका वचन।।
राया दयाधर्म करणे। घात न किजे पा।।२४।।
पवनराजा बोलला वाणि। ऐंका हो नारद मुनी।।
ब्रांह्मण मज लागोनि। उपदेश केला।।२५।।
यज्ञ होम केलियान। पशु जिव हो मेलीयान।।
फल होये हे पावन। स्वर्ग मोक्ष पैं।।२६।।
तव नारद बोलिला काये वाणी। तया ब्रांह्मणा लागोनि।।
हे बापुडे पशुवध करोनि। कैसे मोक्ष पैं।।२७।।
अभिमान चडला ब्रांह्मण। कोपले जैसा पंचानन।।
नारद तु मुर्ख अज्ञान। बोले नेणसी।।२८।।
ऐंसे बोलति वेद पुराणि। पशु मारिल्या होये पुंण्य पावनी।।
म्हणोनि पशु वधुनि। येज्ञ करितो।।२९।।

नारद म्हणे तुंम्ही गवार। जीवहत्या केलि पाप थोर।।
येजमानासी अघोर। रवरव करितो पैं।।३०।।
उपदेश करिति तयासी। जोडिति पापाचि रासी।।
ते जाति अधो पात नरकासी। पापरुपि पैं।।३१।।
जीवघात केल्या पुण्ये होये। तरि पारदियाचे वंदावि पाये।।
ठी(धी)वर[1] खाठिक साधू होये। त्यासि माना भावे।।३२।।
जे गति होइल त्यासी। ते गति होइल तुम्हासी।।
जे प्रवर्तले हिंसासी। तया हेच गति।।३३।।
जिवहत्या होये पाप। पापे जिव होये संताप।।
न चुके गर्भव्याप। नर्कगतिचा।।३४।।
मंत्रे मारियाला पशु। तरि स्वर्गि होये निवासु।।
तरि पापाचे लवलेशु। कोन्हासी पैं।।३५।।
नारद बोलला ब्रांह्मणासी। पशु बापुडे या जिवासी।।
मारीता काये तुम्हासी। नवल नाही।।३६।।
ब्रांह्मण बोलिली वाणी। ऐंका नारद मुनि।।
वधावे जिवा लागोनी। पाप न देखावे।।३७।।
नारद म्हणे तुम्हा सकलासी। उचलोनि ठाकावे होमासी।।
स्वर्ग होइल सकळासी। अन्यथा नाही।।३८।।
ब्रांह्मण म्हणति नारदासी। तुंम्हि बोलुन काये अम्हासी।।
आम्हि होम या जिवासि। देव तुष्ठले पैं।।३९।।
नारद म्हणे ब्रांह्मणा हो। तुम्हि भुलले मूर्ख हो।।
न करा हो पापसंग्रहो। रवरव होतिल।।४०।।
अंधला पाघाला[2] धनहिन। कोडी भिकारी ज्ञानहिन।।
दयाहिन दिसे हीन। द्विजे हो पैं।।४१।।

१. मासेमार कोळी.   २. पांगळा, अधू, अपंग

कोनाचे न मोडावे संजोग। अपण होइल संजोग।।
पापियाचे जीने धीग। आपदा भोगीती।।४२।।
पुरुष संसारि स्त्रिण। अणि माथा बहु रिण।।
सज्जना विजोन मिळे अंन्न। हत्याचे फळे।।४३।।
पाणि मथिले न मिळे लोणी। तांदुला न निघे तुखातुनी।।
तैसा मिथ्या धर्म म्हणोनी। निस्पल दिसे।।४४।।
द्विजे हो धर्म न सोडणे। तुंम्हि ब्रांह्मण अज्ञाने।।
पापि दुर्गति भोगणे। ऐंसि न किजे पैं।।४५।।
जिनधर्म निःश्कळंक म्हणउनि। ऐंसि जिनेश्वराचि वाणि।।
दयाधर्म सार त्रिभुवनि। दया किजे।।४६।।
तव ब्रांह्मण कोपला भारी। धाविनले नारदावरी।।
पाद्य घातला नारद जरी। ब्रांह्मणी पैं।।४७।।
नारद बांधि वेढुन। केला तयाचे अपमान।।
तव आले तेथे सैन्ये। रावणाचे पैं।।४८।।
पवन राजा समोर आला। रावणाचे पाये पडला।।
कर जोडुनि उभा ठाकला। मी सेवक पैं।।४९।।
नगरांत नेला दशानन। कंन्या आपुलि देउन।।
मोहोत्साव करोन। च्यारि दिवस।।५०।।
मग ब्रांह्मण बोलाउनि। नारद सोडविलि जाण।।
केले येज्ञाचे विध्वंसन। पसु सोडिले।।५१।।
तव रावण कोपला अद्भुत। म्हणे ब्रांह्मणाचे करिन घात।।
नारद बोलिला त्वरित। रावणाप्रति।।५२।।
तुम्हि दयेचे निधान। नवधा द्वीजे लागुन।।
हे दयाहिन जाण। मिथ्यामति पैं।।५३।।

हे थापिले भरतान। सीतलनाथाच्या वस्वात जाण।।
स्थापिती वेद माहात्वालागुन। जिनवाणि ऐंसि।।५४।।
नारदे सोडविले द्वीजासी। सोडविले पशुजिवासी।।
स्थापिले जिनधर्मासी। दया केली।।५५।।
पवनराजा संबोधला। ऐंसा मिथ्या भाव ठाकविला।।
जिनधर्म दिधला भला। तया कारणे।।५६।।
पवनरायाचे कुंवरी। दशानने पर्णिला जरी।।
कंन्या जहली तीचे उदरी। चित्ररेखा पैं।।५७।।
सुखे राज्ये करि बहुत दिवस। साधिले देश विदेश।।
वोळगति दशाननास। मकुठबद्ध राव पैं।।५८।।

**इति श्रीरामचरित्र भठारक त्रिभुवनकिर्ति देवानं।**
**तत्पठे आचार्येश्री गुणकीर्ति विरचिते नारद ब्रांह्मण**
**वाद मिथ्यात विध्वंसनांम चतुर्थमोध्यायाः संपूर्णस्तु।**
**जये जये नमोस्तु। येकंदर संख्या ६८२।।**

* * *

# पंचम अध्याय

**।। श्री वीतरागाये नमः।।**

माझे नमन अरिहंता। दुजि नमिली शारदा माता।।
तीजे नमन गुरु दाता। त्रिशुधिसी।।१।।
श्रेणीक म्हणे गौतुमासी। येक पुसणे स्वामि तुम्हासि।।
नारदाचि आदि अम्हासी। निरोपावे।।२।।
कवन कुळ नारदाचे। काय नाव पितयाचे।।
काय अभिदा(धा)न[१] मातेचे। सांगा स्वामी।।३।।
सद्गुरु बोलिला वाणी। महाअंमृता समानि।।
श्रेणीक ऐके चित देउनि। नारदोत्पती।।४।।
वांखपुर नाम नगर। तेथ वसे विप्र गुणधाम।।
ब्रंह्मरुचि तयाचे नाव। असे श्रेणीका।।५।।
अंतुरि तयाचि सुजाण। महा लावण्येचे खाणी।।
कुरंगि नावे म्हणन। असे तिचे।।६।।
ब्रंह्मरुचिसि जहले वैराग्ये। त्याने घेतला संजोग।।
ग्रहाश्रमी रुषी मार्गे। चालविती।।७।।
मग गंगाकाठी ग्रह बांधोनि। ब्रांह्मण दिक्षा घेतलि जाण।।
न सुठे स्त्रिबंधन। मोहोफाश।।८।।
कुरंगी नारि कारण। गर्भ उपनला जाण।।
डोहले आले दारुण। कुसी जहली।।९।।

१. नाव.

मग इतुकियावरी। समाधिगुप्ति मनि जरी।।
आले असती वनाभीतरी। उपदेशार्थे।।१०।।
धर्मरुचि सिष्य जाण। नवदिक्षीत म्हणोन।।
गुरुसेवेसी ठेविलि मन। असे संगे।।११।।
मुनि देखोनि ब्रांह्मण। नमोस्तु केला कर जोडोन।।
साधु मुनिवर देखोन। भावपूर्वक।।१२।।
धर्मरुचि म्हणे मुनेश्वरासी। काय नाव कोण विचार।।
सील वृत नाहि साचार१। कैसा जोग हा।।१३।।
हे ऐकोनि ब्रांह्मण। लाजिनलि दोघेजण।।
मुनिसी आले शरण। तारा म्हणोन।।१४।।
मुनी म्हणे ब्रांह्मण जाण। ऐंका माझे वचन।।
जेणे पाप होये दारुण। ते सांगेन मी।।१५।।
अस्त्रिसवे निजबंधन। पडले तुजलागुण।।
तुम्हि घरदार सोडुन। काये साधिले।।१६।।
जळता जळता पळालासी। पुनः अग्नींत पडलासी।।
ऐंसी परी जालि तुजसी। ब्रांह्मणा जाणे।।१७।।
उदकांत नाहाणीला हस्ती। बाहिर निघाला मागुती।।
धूळ घाली माथावरोनी। तैसे केले।।१८।।
तैसे जाले तुजलागोन। ब्रांह्मण ग्रहा सोडोन।।
काय संसारसाधन। केले आसे।।१९।।
ऐकोनि मुनिचे वचन। कोपला विप्राचे मन।।
मग आलासे शरण। मुनिवरासी।।२०।।
मग घेतला संजमभार। ब्रांह्मण झाला दिगांबर।।
चारित्र तेरा प्रकार। पाळितसे।।२१।।

ब्रांह्मणी बोलिलि वचन। विनय वात्सले करुनि।।
स्वामि उपा(य) मजलागुन। सांगा देवा।।२२।।
मुनिवर बोले वाणी। पुत्र होइल तुजलागुनि।।
त्या पुत्रावलेश लागुनि। दीक्षा घेणे।।२३।।
पुत्र होइल तुजकारण। महाप्रतापि सगुण।।
नाम नारदा म्हणोन। तयाचे पैं।।२४।।
देव नेइल नारदासी। पूज्ये होइल देवरषी।।
प्रतिपाळी जैन धर्मासी। मान इछीला।।२५।।
मुनीने बोधिले ब्रांह्मणी। जिनधर्म दिधला तिजलागुनी।।
राहिलि समाधान होउनि। वनामध्ये।।२६।।
मुनि प्रतिबोध करोनि। गेले विहार लागोनी।।
भव्य जिव संबोधोनि। संसारतारक पैं।।२७।।
मग इतुकियाउपरी। पुत्र जाला कूर्मि उदरी।।
अनंदलि मनाभितरी। पुत्र देखोनिया।।२८।।
मग पुत्र ठाकीला वनी। अपण चालिली तेथोनि।।
आलि लोकपुरा लागोनि। चैताल्येसी।।२९।।
इंद्रमालिणि अर्जिका जाण। वंदना केलि तिजलागोन।।
बाइ दिक्षा घेउन। तप करिन मी।।३०।।
मग इतुकियावरी। जंबिक आला देव जरी।।
बाळ देखोनिया वनांतरी। मोह आला।।३१।।
बाळ घेतले उचलोनि। नेला स्वस्थानालागोनि।।
सार सुशृका(षा)[1] करोनि। वाढविला पैं।।३२।।
दिवसी दिवसी वाढली येवून। स्वरुप दिसे सगुण।।
विद्या सिकला परिपूर्ण। मनेछा पैं।।३३।।

---

१. योग्य शुश्रूषा, देखभाल

वियोग जाला मायेबापाचि। परस्परे कळले त्यासी।।
वैराग्ये उपनला मानसी। घेतलि दिक्षा।।३४।।
गौतम म्हणे श्रेणिकासी। नारदोत्पति ऐंसी।।
तुम्हि पुसिलि आम्हासी। ते निरोपिले।।३५।।
कथा राहिलि या स्थळी। रावणे येज्ञसाल[१] मोडिलि।।
पशुजिव सोडिलि सकळि। दयाभावे।।३६।।
जिनशासन धर्म स्थापिले। नारद जयवंत जाला।।
मग तेथोनि चालिला। स्वस्थानासी।।३७।।
मग इतुकियावरी। रावण सभेसि आला जरी।।
मधुकुवर देखिला सुपरी। रुपागळा।।३८।।
हा कवनाचा कुवर। प्रधानासी पुसे दशसिर[२]।।
हा हरिवंषि थोर। प्रधान म्हणे।।३९।।
हरिवंषी हरिब्रंह्म राजा। मथुरा राज्ये करि वोजा।।
माधवा तयाचि भाजा। रुपवंति।।४०।।
उभयता दोघापासोन। जन्म मधुकुवरालागोन।।
धर्मवंत म्हणोन। स्वरुपता।।४१।।
पाताळिचा धरणिंद्र जाण। मोह करी मधुकरालागुन।।
त्रिशुल दिधला आणुन। पूर्वस्नेहे।।४२।।
ऐंसा सांगितला प्रधान। प्रधानासि पुसे दशानन।।
स्नेह करावे काय कारण। सांगा मजे।।४३।।
प्रधान म्हणे रावणाकारण। सांगेन भवांतराचे खुण।।
म्या मुनिवरापासोन। ऐंकलि जे।।४४।।
शतदुर्वा नाम नगरी। प्रजापाळ राजा राज्ये करि।।
प्रजावति त्याचि नारी। सीलवंति।।४५।।

१. यज्ञशाला, यज्ञमंडप. २. दहा मुखांचा.

त्या उभयतास जाला पुत्र। नाम त्याचा सुमित्र।।
पढावया घातला सुतंत्र। पंडितापासी।।४६।।
प्रभाव ब्रांह्मणाचे पुत्र। राजकुवर नामे पवित्र।।
दोघाचे चित झाले येकत्र। पढति विद्या।।४७।।
राजकुवर ब्रांह्मण। आणि सुमित्रालागुन।।
प्रीत वाडलि गहन। उभयतासी।।४८।।
विद्या जाहलि संपुर्ण। सुमित्रा आला ग्रहालागुन।।
अनंद मातापित्याकारण। पुत्र देखोनि।।४९।।
पुत्र जहला राज्येयोग्ये। प्रजापाळे घेतला संजोग।।
राजि बैसविला चांग[१]। सुमित्रासुत।।५०।।
सुमित्रा स्थापिला प्रधाने। प्रभाव नामे ब्रांह्मणे।।
बालमित्र म्हणउन। आपुला पैं।।५१।।
राज्ये करि बरव्या परि। क्रपा करि प्रजावरी।।
नवकार स्मरण अभ्यंतरी। नित्यशाहा।।५२।।
मग कोने येके अवेश्वरी। सुमति राजा सुपरी।।
बैसला तुरंगमावरी। हर्षानंदे।।५३।।
अश्व उडाला गगनी। राजा नेला उचलोनी।।
ठाकिला पाळीवडी लागुनी। राजा सुमित्रा।।५४।।
पडता पडता जाण। स्मरला नवकारालागुन।।
जीव वाचलासे जाण। सुमित्रा पैं।।५५।।
भीम नामे भिल्ल भला। तो रायाजवळी आला।।
राज ग्रहासी आणिला। आपुल्या पैं।।५६।।
भिल्लपुत्रि वनमाला। धर्मवंति सकुमाला।।
तव ते बोलिलि व्यल्हाळा। रायाप्रति।।५७।।

१. युक्तियुक्त, यथासांग विधियुक्त.

मी सार सुशृका करीन। पथ सित तुम्हासी देइन।।
राजा म्हणे मी न घेइन। तव हस्ते।।५८।।
तु तव जहलीसी भील्लणि। मी राजा जैन धर्मि जाण।।
तव हस्ते पथ घेणे। केवि घडे।।५९।।
वनमाला म्हणे गुणवंत। म्या मुनि देखिले वनांत।।
तयाने मज दिधले वृत। जैनागमी।।६०।।
मि क्रीया जाणे जैन धर्माचि। सकल श्रावकाचाराची।।
आणि ही जीवदयाची। युक्ती जाणे।।६१।।
मी पाळिते सील संपन्। म्या घेतले बहुते नेम।।
माझी मति झालि उत्तम। ऐंक राये।।६२।।
राया तिचा बोल मानला। मग तीचे हस्ते जेविला।।
संन्री संन्री[१] समाधान होत। राजा सुमित्र पैं।।६३।।
मग राव बोले वाणी। भीम भील्ल लागोनी।
तु अमुचे सज्जन म्हणोनि। सुशृका केली।।६४।।
आता पुरता उपकार करी। वनमाला दे अमुचे घरी।।
नेउनि घाल माज नगरी। दयाळा।।६५।।
भीमे भिल्ल मेळविले आफार। मोहोत्साव केला थोर।।
परणिलि[२] वनमाला सुंधर। नगरा आला।।६६।।
अनंदला सकल नगरी। गुढीया उभारिल्या घरोघरी।।
वाजति अनंद भेरी। समोर आले।।६७।।
वाजति ढोल तंबोल निशान। भेठले सकल सज्जन।।
नगर प्रवेश करुन। भद्रि बैसला।।६८।।
प्रभाव मित्र संतोषला। भीम भिल्ल मोकासा[३] दीधला।।
तुझे थोर उपकार जाहला। अम्हासी पैं।।६९।।

१. शनैः शनैः, हळुहळू. २. विवाह केला. ३. राजकीय सेवेबद्दल बक्षीस म्हणून दिलेला गाव.

मग इतुकियावरी। भिल्ले आज्ञा घेतलि जरी।।
गेले आपुले नगरी। समाधान पैं।।७०।।
मग कोने येके दिवसी। राजा बैसला सिंव्हासनासी।।
वनमाले सिंव्हासनासी। विराजित असे।।७१।।
प्रभाव प्रधानाने। वनमालेचे रुप देखोन।।
पापविव्हळ झाले मन। दुराचारी।।७२।।
काय दिसे दुर्बळ। मनि दिसे वनमाळ।।
गेलि तयाचि कळरुप। प्रछा केलि राजे।।७३।।
प्रभा काये झाले तुजसी। तु कि कळंका[१] दिससी।।
ते सांगावे मजसी। मनकामन।।७४।।
म्या देखिले वनमालेसी। विवळ झाल मजसी।।
अंन्न उदक मानसी। न रुचे राया।।७५।।
ऐंसि जरि घडे राया। तरि वाचेल मम काया।।
नाहि तरि मज मरावया। उसीर नाही।।७६।।
सुमित्र म्हणे रे प्रधाना। स्त्री पाठवितो तुज सदना।।
पूर्वावि तव कामना। स्वमनाचि।।७७।।
मग हर्षला प्रधान। ग्रहासि गेला अज्ञान।।
डोहलारा[२] सीद्ध करुन। निद्रा केलि।।७८।।
मग इतुकिया उपरी राजा। ग्रहासी आला वोजा।।
बोलाविली स्वभाजा। वनमाला पैं।।७९।।
वनमाला आली धावोन। उभी ठाकिली कर जोडोन।।
राजा म्हणे मम वचन। ऐंक प्रिये।।८०।।
मम प्रभाव मित्रापासी। तुवा जावे वेगेसी।।
उसीर न किजे यासी। सीघ्र जाइ।।८१।।

१. काळपट, उदास.   २. डोलारा, (इथे डोली).

वनमाला म्हणे काये करावे। पतिचे वचन न मोडावे।।
सील आपुलि राखावे। कवणे परी।।८२।।
मग चालिले वनमाला। प्रभावग्रहा सकुमाला।।
उभि ठाकिली वेल्हाळा[1]। कर जोडुन।।८३।।
वनमाला द्रिष्टीस देखोन। प्रभाव संतोषला मन।।
पाचारिला या म्हणोन। वनमालेसी।।८४।।
सेजे यावे लवकोनी। सत्वर द्यावि आलिंगण।।
निजवावे माजे मन। वनमाले तुवा।।८५।।
वनमाला बोले वचन। तुंम्हि उत्तम ब्रांह्मण।।
मी नीचयाचि भील्लण। सील लोपो नये।।८६।।
म्या वृत घेतलि गुरुपासी। तुम्ही लोपावे त्या सीलासी।।
अधोपात अम्हा दोघासी। न चुके पैं।।८७।।
तुम्हि ज्ञानवंत विशाल। मन अवरावे ठिसाल[2]।।
जिनवाणि ज्ञान आढळ। मनि धरावे।।८८।।
तुम्हि भृताचे सज्जन। आणि ज्ञानवंत निपुण।।
अम्हावरि मन घालण। कवन पुण्ये हे।।८९।।
ऐंसे ऐंकोनि वचन। तव लाजीनला ब्रांह्मण।।
धिग धिग माजि जिन। निरार्थक हो।।९०।।
धन्य धन्य हे मित्रापण। केव्हडे उदार मन।।
स्त्री दिधले पाठउन। तात्काळिक।।९१।।
धीग धीग माजि जिने। म्या कर्म केले हिन।।
तोंड काळे जहले म्हणोन। दाविता न ये।।९२।।
तव खर्ग घेतले जाण। आत्मघात तव ततक्षण।।
तव करी धरीले वनमालेने। हा हा काये झाले।।९३।।

---

१. सुंदर, प्रिय. २. पोकळ, स्वैर.

कोलाहाल देखोन। सुमित्र आला धावोन।।
तेथ अभिनव देखोन। वीस्मीत जहला।।९४।।
सुमित्र बोले सार। प्रभावा रे ऐंक चित देउन।।
आत्मघात करी तो गवार[1]। पावे दुर्गति।।९५।।
पुर्ष अथवा नारी। कुमरणि मरे जरी।।
तो जिव भृमण करी। चवऱ्यांसी पैं।।९६।।
पाणियात घात केले। अथवा विष घेतले।।
की अग्नीत पात केले। त्यासि अधोगति।।९७।।
सुमित्रासी बोलिला प्रधान। वैराग्ये धरीले ब्रांह्मण।।
मग संजम घेइन। जाहला मुनि।।९८।।
तप केले असे घोर। निधान बांधले थोर।।
जहला असुरकुमार। देव जाहला।।९९।।
मग इतुकिया उपरी। सुमित्र रायान जरी।।
वैराग्ये धरुनि अंतरी। तप घेतले।।१००।।
तप केले तेणे थोर। इशान स्वर्गि जहला अवतार।।
संपूर्ण सीलाचार। सुख भोगी।।१।।
स्वर्गिचा आयु भोगोनि। मग तेथोनि चवोनि।।
मथुरा नगरी येउनि। अवतरला।।२।।
मथुरेचा हरिवाहन। माधवि राणि सुजाण।।
पुत्र जहला तिज लागोन। देव स्वर्गिचा।।३।।
नाव ठेविले मधुकुवर। रुप जैसा दुजे भास्कर।।
हरिवंषी मनोहर। महाप्रतापी।।४।।
अवधिज्ञाने जाणोन। असुरकुवर स्वर्गीहुन।।
आला भेठावयालागुन। मधुकरीसी।।५।।

१. गावंढळ, अज्ञानी.

पूर्वस्नेह मधुकरासी। त्रिशुल रत्न दिधले यासी।।
प्रसंसिले मधुकरासी। असुर देवे।।६।।
तु माझा संज्जन। उपकार केला मज लागोन।।
पावलो मि देवपण। तव प्रसादे।।७।।
ऐंसी प्रसंशा करुनि। देव गेले तेथोनि।।
अपुल्या स्वस्थानालागोनि। असे सुखि।।८।।
ऐंसे मधुचे भवांतर। अइकोनिया दशसिर।।
संतोषला मनि थोर। मयजाकांता[१]।।९।।
मग मधुकरालागुन। दिधलि कंन्या दशानन।।
नाम चित्ररेखा म्हणोन। सुंदर असे पैं।।१०।।
मग चित्ररेखा घेउन। आला मथुरेलागुनि।।
राज्ये भोगितसे जाण। पुण्यप्रभावे।।११।।
हे कथा राहिलि ऐंसी। पुढे वर्त्तलि कैसी।।
गौतुम म्हणे श्रेणिकासी। ऐंका बापा।।१२।।
दिग्वीजये रावणे काये केले। देशविदेश साधिले।।
दंड नृपाज(व)ळी घेतले। प्रचुर पैं।।१३।।
मग इतुकियावरी। कठक रावणाचे जरी।।
आले गंगेचा तीरी। उतरले पैं।।१४।।
कठक दिशे शोभायेमान। विद्याधर शोभति विमान।।
ढोल तबेल निशान। गगन गर्जेपैं।।१५।।
अष्टदश पर्वत देखोनि। रावण गेला वंदनेलागोनि।।
अष्टप्रकारि पूजोनि। पुण्ये जोडिले।।१६।।
यात्रा करोनि रावण। आला स्वनगरालागोन।।
पुण्ये प्रभावे करुन। राज्ये भोगी।।१७।।

१. मयाची पुत्री मंदोदरीचा प्रिय रावण.

मग चाल केलि राव। चतुरंग सैन्ये घेउन।।
दुर्त्तघन (दुर्लंघ्यपुर) नगरालागुन। नळावरी।।१८।।
लोकपाळ ते जाणोन। दुत धाडिला लवकोन[1]।।
दिधले लेखि लिहुन। इंद्र रायासी।।१९।।
मग विमानि बैसोनि। दुत गेल्या त्वरे करुनि।।
भेठला इंद्रालागुनि। लिखित दिधलि।।२०।।
मग दुत बोलिला वाणि। राया ऐंका चित्त देउनि।।
रावण आला चाल करोनि। नळावरी।।२१।।
अंन्याये करि रावण। राया तव आज्ञा भंगोन।।
जिंकिले देशोदेशिचे इन। जाहला बळाढ्ये।।२२।।
स्वामिया कठक लागुनि। तुम्हि थोर दंड करणे।।
नळाचि मदत्त राखणे। सत्वर पैं।।२३।।
दुताचि ऐंकोनि वचन। इंद्र हसीला स्वमने।।
हे रावण त्रुणसमान। मजपुढे पैं।।२४।।
इंद्र बोले दुताकारणे। मी मेरुगीरीस जाइन।।
यात्रा करुन येइन। सत्वर पैं।।२५।।
मग मेरुगिरी यात्रेलागुन। इंद्र गेलासे जाण।।
आला यात्रे करुन। स्वनगरासी।।२६।।
इंद्र राजा मदे भुलला। जाब न दि अम्हाला।।
काहिच पैं।।२७।।
इंद्राचि न धरावि आश। स्वबळासी घालावि काश[2]।।
राखावे अपुण अपुणास। बुधिबळे।।२८।।
मग नळ काय केले। येक दुर्ग उड(ठ)विले[3]।।
शत योजन उंच जहले। मायादुर्ग।।२९।।

१. ताबडतोब. २. आधार, आश्रय. ३. तयार करणे.

सीस सेगाव विस्तार। दुर्ग दिसे महाथोर।।
रिपुदळ आणि[1] हार। ऐंसे केले।।३०।।
रावण जाहला क्रोध भार। दोन सहस्र गज जर।।
पाठविलि तया दुर्गावरी। सकठके।।३१।।
दुर्गभोवते जाण। कोठि वीराचे रक्षण।।
सैन्ये भयेपासोन। फिरोन आले।।३२।।
वीर सांगिती रावणासी। कोटी वीर रक्षण दुर्गासी।।
आसाध्ये दुर्ग अम्हासी। न साधे पैं।।३३।।
रावणे मन केले थीर। म्हणे काये करावे विचार।।
पुढे वर्त्तले अपुर। तेचे ऐंका।।३४।।
नळरायाचि वल्लभा। नाम तयाचि रुप रंभा।।
रावणाचि देखोनि शोभा। मोहिलि पैं।।३५।।
चित्ररेखा सखियाकारणे। सत्वर आणिले बोलाउन।।
तु माझि सखि बहीण। जीवीचा पैं।।३६।।
येक माझी सांगेन तुजे। तुवा राखावे माजे गुजे[2]।।
रावण अणि मज। भेठ करि।।३७।।
मी धाकुठी बाळपणापासुनी। रावण असे माजे मनी।।
इंद्राचे धाके करुनि। पिता नेदी।।३८।।
आता अनुक्रमे करुन। समीप आला रावण।।
काहि स्त्रिचरित्र करुन। भेठवि बाइ।।३९।।
ऐंसे दासी म्हणउन। तीचा पाइ पडला जाण।।
तु माझी सखिया म्हणोन। पूरवि इछा।।४०।।
मग सखि बोले वचन। बाइ समाधान असन।।
तुजलागी चिंता करण। मी असता।।४१।।

१. आणणे.   २. गुपित.

मग रचिले विमान। गेलि चित्ररेखा बैसोन।।
रावण संनिध यउन। भेठलि पैं।।४२।।
        चित्ररेखा येकांति बैसोन। म्हणे रावणालागुन।।
        रूपरंभाचि वेधलि मन। तुम्हावरि।।४३।।
रावण बोले वचन। हे पराचि रमा जाण।।
इसी संघ(ग) केलिया जाण। पातक घडे।।४४।।
        जरि तुम्हि ऐंसी कराल। तुम्हि तरि तिची आस मोडेल।।
        तरी तो प्राणासी मुकेल। तुम्हाविण।।४५।।
रावण विचारी मनी। भेठ घ्यावी पातउनी[1]।।
मावेचे[2] वचन देउनि। बोल मानिला।।४६।।
        रावण म्हणे चित्ररेखेसी। तुवा आणावे भेठेसे।।
        मोह उपजला मानसी। माझीया पैं।।४७।।
तव चित्ररेखा हर्षे। उपरंभजवळी आलि।।
उपारंभा पुसो लागली। कान की डोल।।४८।।
        चित्ररेखा बोले हसोन। कार्येसिध जहले जाण।।
        आता चलावे त्वरेन। विलंब न कीजे।।४९।।
येके विमानि दोघेजण। बैसल्या उतावळ्या होउन।।
आल्या रावणस्थाना। ततक्षणि।।५०।।
        रावण द्रिष्टी देखोन। आदार केला त्याकारण।।
        धन्ये धन्ये आजीचे दिन। सोनियाचा।।५१।।
धन्ये धन्ये भाग्ये आमुचे। येणे जाहले तुमचे।।
तुमच्या रुप समान कोणाचे। अणिक नाही।।५२।।
        येथे राहिजो जोवरी। सीलवृत घेतले तोवरी।।
        अष्टापद[3] यात्रा केलीयावरी। वृत मोकळे।।५३।।

---

१. बोलावून.   २. मायेचे.   ३. कैलास.

विद्या द्यावी मजकारण। मी दुर्ग तुमचे घेइन।।
मग सुखभोग भोगीन। स्वइछेसी।।५४।।
        उपरंभा रिजलि[१] मन। विद्या दिधलि रावणालागुण।।
        असलि[२] विद्या घेउन। संतोषला पैं।।५५।।
मग का करी रावण। सकल सैन्ये पालाणुन।।
दुर्ग घेइन म्हणोन। चालिला पैं।।५६।।
        मग नळराय सैन्ये सज्ज करुन। उभा ठाकला सन्मुख येउन।।
        अनंद भेरी देउन। महाप्रतापे।।५७।।
उभय दळ मांडिले संग्राम। सुभट सारती निज नाम।।
येकमेका अनुक्रम। हकारिती।।५८।।
        युद्ध जहले तुंबळ। थोर जाहला कल्लोळ।।
        मोडले रावणाचे दळ। इक्षीत पैं।।५९।।
मग सैन्ये सज्ज करोन। उठाव केला विभीषण।।
महा क्रोधायेमान होउन। बांधिले नळा।।६०।।
        आणिले रावणाजवळ। जाहला परम लज्जीत नळ।।
        रावण बोलिला जाळ। नळाप्रति।।६१।।
हार जीतसी आहे। याचि चिंता करणि काये।।
मग नवाजिला राये। दिधले वस्त्रे।।६२।।
        उपरंभा अमुचि बहिणि। तु अमुचा मेहुणा जाण।।
        खरदुषणासमान। राज्ये कीजे।।६३।।
मग नळ काये केले। रावण ग्रहासी नेले।।
वस्त्राभरण गौरवीले। आदरेसी।।६४।।
        रावण होता येकांत स्थानी। तेथ उपरंभ येउनि।।
        उभि ठेलि इछा धरोनि। रावणापासी।।६५।।

१. आनंदित होणे.   २. आशालिका.

रावण म्हणे वो बहीणी। त्वा विद्या दीधली मजलागुनि।।
तु गुरुसमानी। स्नेह राखी।।६६।।
        उपरंभा लाजलि मनि। मग बोले वाणि।।
        तु बंधु मि बहीणी। क्रपा कीजे।।६७।।
उपरंभे रावणालागोनि। मोह उपनला[1] कवे गुणी।।
हे चरीत्र कोन्हे नेणे। तेचि नेणे।।६८।।

**इति श्री रामचरित्र भठारक श्री त्रिभुवनकीर्ति देवानां तत्पट्टे आचार्येगुणकीर्तीविरचिते नळ राजवंसी वृतानां पंचमोध्याया संपूर्ण।। वोव्या संख्या १६९।। येकंदर ७००।।६५।। मंगळं जयतु।।**

* * *

१. उत्पन्न झाला.

# षष्ठम अध्याय

**।। श्री वीतरागाये नमः ।।**

प्रणम्य परमपुरुषा। भावे वीतराग जिनेशा।।
नमिलि कोमलवेशा। शारदा माये।।१।।
गुरुचरण स्मरोन। कथा सांगेन रामायेण।।
श्रोतेजनि चित्त देउन। ऐंकिजे पैं।।२।।
दहोत्त नगरीचे थोर। तोहि जिंतिले विद्याधर।।
इंद्र ऐकिला समाचार। हडबडला पैं।।३।।
इंद्र आला पितियापासी। विचार पुसे तयासी।।
वैरि समिप आला यासी। काये कीजे।।४।।
तव पिता बोलिली वचन। पुत्र ऐंका चित्त देउन।।
दशाननासी भेठोन। सल्ला कीजे।।५।।
ऐंकोनि पित्याचे वचन। इंद्र जाला कोपायेमान।।
मोडीन रावणाचे मान। क्षणामध्ये।।६।।
मग निशानि[१] घाव देउन। सकल सैन्ये मेळउन।।
इंद्र राजा चालला जाण। रावणावरी देखा।।७।।
सन्मुख जाले दोघे दळे। युद्ध होतसे दुर्बळे।।
किंकळे[२] होते मयंगळे[३]। रणामध्ये।।८।।
युद्ध जाले निर्वाणिचे। दळ मोडले राक्षसाचे।।
काये रे जहले जीवित्वाचे। मनामाझी।।९।।

१. नगारा, डंका. २. किंकाळ्या, चीत्कार. ३. हत्ती.

कठक मोडिले म्हणोनि। राक्षस उठावले ततक्षणि।।
युद्ध होतसे निर्वाणी। दोहि दळी।।१०।।
उठाव केला राक्षसाचि मोड जाला इंद्रदळासी।।
कठक भेवोनि दाहि दिशि। पळो लागले।।११।।
तव इंद्रजित उठाव केला। सजयंत कुमर कोपला।।
दोहि कठकासी समरंग[1] जाहला। रणामध्ये।।१२।।
संजयंत उठावला। इंद्र उठावला जैसे काळ।।
दोहि दळ रणतुंबळ। जाणे किति।।१३।।
निर्वाणाचे होतसे संग्राम। सुभठ सार तिनि जनास।।
कायेर घेति निज नाम। देवा देवा।।१४।।
डोल दमामे वाजति भेरी। नफेरी गर्जति रणतुरी।।
तबेल निशान लहकती। रणामध्ये।।१५।।
रथासी रथ मोडति। हस्तीसी गज भिडती।।
राउत राउत भीडती। रणामाझी पैं।।१६।।
अश्व त्रिलोकभूषणावरी। रावण स्वार होउनि त्यावरी।।
रणांत होतसे मारी। सुभठावरी पैं।।१७।।
इंद्र स्वार होउनि ऐंरावति। वरि छत्र चामर ढाळती।।
युद्ध देखोनि क्षितिपति। सुठला कंप।।१८।।
सन्मुख मिळाले दोहि दळ। युद्ध होतसे तुंबळ।।
सुभठ मिळतसे महाकाळ। यमाचा पैं।।१९।।
उठावा केलासे रावण। इंद्र मोडिलासे जाण।।
ऐंरावति जिंतिला रावण। संग्रामात पैं।।२०।।
इंद्र धरिलासे रावण। लोकपाल आणिलासे बांधोन।।
अवघे कठके घेउन। पळाले दाहि दिशा।।२१।।

१. भिडणे, झुंज.

कठक पळाले दाहि दिशा। अपेश आलि इंद्र नरेशा।।
ऐंसे आले रावण लंकेशा। रणामाजी पैं।।२२।।
        तव जयेजयेकार जाला। सुरवर पुष्पवृष्टि वर्षला।।
        वानर राक्षास जाला। अनंद मोठा।।२३।।
अभये दिधला सुभठासी। चालिले निजस्थानासी।।
रावण चालिले लवकेसी। कठक घेउनि।।२४।।
        लंकेसी चालिला रावण राजा। सुखे राज्य भोगीतसे वोजा।।
        प्रतापि कैसा उजा। दिसे भानु जैसा।।२५।।
इंद्राचा जो होती परिवार। बंदि घातलासे सत्वर।।
बलकठ करोनि बर्जोर। घातले बंधी।।२६।।
        इंद्र राजा करी सुख। देवाचे नाम ठेविले लोक।।
        ज्याचे नाम त्याचे सेवक। दिधले त्या वाठोनि।।२७।।
लंकेसी वसी राज्ये करि रावण। इंद्रलोक बंधि घालोन।।
प्रतापे वाढले महिमान। या जनामाजी।।२८।।
        इंद्र नेला लंकेसी सत्वर। रावणे केलासे जर्जर।।
        पित्यासी कळला समाचार। इंद्राचा पै।।२९।।
इंद्राचा पिता सहश्र राजा। लंकेसी चालिला पुत्रकाजा।।
संधि करावया वोजा। -- पैं।।३०।।
        रावण बैसे सिंव्हासनावरी। छत्र सोभे मस्तकावरी।।
        चवरे ढाळति तयावरी। प्रताप बळे।।३१।।
-------। --------।।
भेठी घेउनिया समिप। बैसले रावणे।।३२।।
        सहश्र राजा आपण। रावण भेठला भाव धरोन।।
        -------। -------सहोदरे पैं।।३३।।

समंत[१] बैसलासे जरी। वार्ता सांगिति नाना परी।।
रावणे संन्मान बरव्या परी। केला रायाचि।।३४।।
        ---- म्हणे धन्य धन्ये। क्रपा केलि अम्हा लागुन।।
        धन्ये धन्ये आजिचे दिन। आले घरा पैं।।३५।।
सहश्र राजा म्हणे रावणासी। तु पुण्यवंत म्हणवीसी।।
आणिक राव घालोनि बंदिसी। प्रतापाचे बळे।।३६।।
        इंद्र जाला तुमचा बंदिसी। म्हणउनि घातला बंदि।।
        असो घेवोनि आपुले संधि। सोडणे राया।।३७।।
ऐंसी विनंति करि नाना परी। मस्तका ठेवि इंद्राचा सिरी।।
आपुला करोनि बरव्या परी। सोडणे त्यासी।।३८।।
        रावण बोलिला वचन। इंद्र हा द्वीजा ब्रांह्मण।।
        माझे घरी जे येइल कारणे। ते करणे येणे।।३९।।
इंद्र आणि इंद्रायणि। दोघे मिळुनि वाहति पाणी।।
येव्हडा अहंकाराचे मनि। म्हणोनिया पैं।।४०।।
        वायुकुवर नाम जाचे। येणे अंगण जाहडावे अमुचे।।
        हे वचन मानावे साचे। राहावया हो।।४१।।
मेघकुमराचे महिमान। त्याने करावे साडा समार्जन।।
तरीचे सोडिन त्या लागुन। सत्ये जाणा।।४२।।
        यव्हडे वचन ऐंकोनि। सहश्रराव बोले त्या लागुनि।।
        जे अज्ञा करील म्हणोनि। तेचि करू पैं।।४३।।
देवाचे नामे मनुष्यासी। ते द्वारी उभि केलि कैसी।।
देवलोकाचा महिमान त्यासी। काये होये पैं।।४४।
        जे जे तुमचे नावधारी। त्याहि येउनि अमुचे घरी।।
        ज्याचे काम त्याहि बरव्या परी। राहावे सुखे।।४५।।

१. आजूबाजूला.

स्वामि आज्ञा केलि तुम्हि। ते सिरि धरिलि अम्हि।।
सेवा करोनि स्वामि। प्राप्ती होवी।।४६।।
    प्रशंसा करि रावणाचि। उपसम[१] क्षमा जालि तयाचि।।
    क्रोध मान मायाचि। नास्ति[२] झालि।।४७।।
तव क्षमा धरिले रावण। अभयेदान दिधले तया लागुन।।
तुम्हि जहवे स्वस्थानालागुन। आपुलीया पैं।।४८।।
    महिमा कळलि तुमचि। नाम ठेविले देवलोकाचि।।
    विठंबन करुनि तयाचि। ठेविले घरि।।४९।।
ऐंसे न पाहिजे तुम्हासी। माति[३] न कळे ब्रंह्मादिकासी।।
म्हणोनिया तुम्हि संतोषी। आसावे पैं।।५०।।
    रावण म्हणे इंद्रालागुन। काहि हळहळ न करणे।।
    स्थानका[४] जावोनि समाधाने। असावे सुखी।।५१।।
आपूले मनि असो द्यावे क्षमा। चवथा बंधू व्हावेसी अम्हा।।
का पिडिलिया कामा। सांगे न कार्ये।।५२।।
    इंद्र विनवी रावणासी। तु पुण्येवंत म्हणविसि।।
    जोडिल्या पुण्याचि रासी। जैन धर्माचि पैं।।५३।।
इंद्र सोडिला रावणाने। राया सीकविला वर्तमान।।
इंद्र लज्यायेमान होउन। राहिला घरी।।५४।।
    इंद्र आला ग्रहासी। सज्जन आला भेठावयासी।।
    अलिंगण देउन आधरेसी। बैसला देखा।।५५।।
इंद्र बैसला धरुनि ग्रह[५]। कूडा[६] कळला हा संसार।।
असार जाणोनि कळला विचार। राज्य काहि पै।।५६।।
    राव विचारी अपुले मनी। कोणाचा पिता कोणाचे जननी।।
    मजे माझे म्हणोनि। गुंतले बापा।।५७।।

---

१. शांती. २. क्षय. ३. महती. ४. स्थान, ठिकाण ५. धारणा. ६. कपटी, दुष्ट.

यिंद्रासी जहले वैराग्ये। आत्मकार्या करीजे चांग।।
जेणे सांगे मुक्तीचा मार्ग। या जीवासी पैं।।५८।।
जीवासी घडली भ्रांति। संकल्प विकल्प उठती।।
सावध होउनिया वृति। साधिन आता।।५९।।
निवृत्ती साधिजे निजाचि। बेडे[1] तुठे जन्ममरणाचे।।
पाहता संसाराचि। बरी नोहे।।६०।।
हत्ति घोडे सत्ता माजे घरी। कर्म आणिले मज हारी[2]।।
आता वाचूनिया संसारी। काये काजे।।६१।।
लक्ष्मि रथ अणि तुरंगे। देखोनि मनास येते भंग।।
आपुलि म्हणो नये चांग। सत्ये जाण।।६२।।
कोणाचे घर दार संपदा। दुःख दारिद्र करि आपदा।।
माझे माझे म्हणे निफुंदा[3]। पाडीले असे।।६३।।
गड मंदिर देखोन। मोह उपजे त्या लागुन।।
ऐंसा भोगिता महिमान। अंति कोण कोणाचे।।६४।।
दुःख होतसे इंद्राचे मनि। आलि आपदा संपदा भोगिता।।
आता प्रवर्तावे आत्महिता। कारणे देखा।।६५।।
आता हित करावे आपुले। स्वर्गाचे राज्ये भोगिले।।
दुःख दारिद्र्याचे गेले। कोणे पडावे।।६६।।
ऐंसे सुख दुःखाचेया रासी। भोगणे लागेल चौर्यासी।।
आता करांवे या जिवासी। आत्महित देखा।।६७।।
जे जे वस्तु दिसे चांग। ते ते पावति भंग।।
आता जिननामाचा रंग। दिसे जिवा।।६८।।
प्रपंचि उडाले संचिता। आत्मकार्या करावे त्वरिता।।
ज्याने आपुलि होये हिता। तेचि किजे पाहा।।६९।।

१. बेडी, बंधन.   २. हार, पराजय.   ३. बंधन.

इंद्र विचारि मनाभितरी। संज्जमभार घ्यावया झडकरी।।
तव मुनि आले वनाभीतरी। तये समइ।।७०।।
निर्वाणसंघ महामुनि। आले नगरोद्यानि।।
तप जप महा मुनि। शोभत असे।।७१।।
मुनि दिसतसे कैसा। रत्नत्रयेलंक्रत सूर्येजैसा।।
मुनि देखोनि भरवसा। भव्ये जनासि।।७२।।
वनमाली पाहे वनाभीतरी। वनस्पति देखिले नवलपरी।।
देखोनि अश्चर्येकरी। मनामाजी पैं।।७३।।
संन्मुख पाहतसे वनपाल। तव मुनि देखिले निर्मळ।।
तयाचि अतिशये केवळ। पळति दोष पैं।।७४।।
मुनिचे अतिशये करोनि। वनस्पति फळल्या म्हणउनि।।
वनपाल द्रिष्टिस पाहुनि। वेचि फळ फुले।।७५।।
माळी आला गुढी घेउन। इंद्रापुढे ठेविले नेवोनि।।
माली संतोषविलि रायान। तये वेळी देखा।।७६।।
राव पुसे वनपालासि। हे कोठे प्राप्त जाले तुम्हासी।।
घेउनि आलास अम्हापासी। नवि नव्हल पैं।।७७।।
मालि सांगे राया ऐंक गुप्ती[१]। मुनि आले वनाप्रति।।
तयाचे अतिशये वनस्पति फलासी आली।।७८।।
हे वचन श्रवणि ऐंकोनी। राव उठीला झडकरोनी।।
चालिला वंदावया करोनी। वनामाझी पैं।।७९।।
मुनि देखोनि न येति। नमोस्तु केला कर जोडुनी।।
मुनी धर्मवृद्धी तत्क्षणी। बैसला समिप।।८०।।
इंद्र पुसे कर जोडोन। काये कर्म घडले आम्हालागुन।।
बंध झाला कवणे गुणे। स्वामिनाथा।।८१।।

१. रहस्य.

काये कर्म घडले मुनिराया। आपदा सहिलि गेली माया।।
पूर्वी का कर्म केले मुनिराया। सांगा भवांतर।।८२।।
राया सांगतो भवांतर। चित्त करावे स्थिर।।
जे जहली तुमचे भवांतर। ते सांगेन तुम्हा।।८३।।
अरिजये नगराभीतरी। वन्हीवेग राजा राज्ये करी।।
वेगावति तयाचि अंतुरी। संम्येक्तवंति पैं।।८४।।
तया दोघेपासोन। कंन्या जन्मलि रत्न।।
अहिल्या नाव तिजलागोन। सोभतसे।।८५।।
कंन्याचे मांडिले सैंवर। राये राणे मिळाले आफार।।
राया तुम्हि गेलासे सत्वर। सैवरा मंडपी।।८६।।
मनि धरुनि तिची आशा। असेचि जाहलि निराशा।।
अनंदमालि विद्याधरास। माळ घातलि।।८७।।
माळ घातलि विद्याधरासी। द्वेष तुम्हि धरिले मानसी।।
अहिल्याचा द्वेष मानसी। धरीला तुम्हि।।८८।।
आहिल्या परणुन विद्याधर। पावला चंद्रपुर नगर।।
इंद्र द्वेष धरीला अफार। मनामाजी।।८९।।
विद्याधर गेला स्वस्थानकासी। इंद्रे द्वेष धरीला मानसी।।
आहिल्याचे ममत्वा चित्तासी। धरुनि राहिला।।९०।।
मग आले ग्रहासी। अहिल्या ध्यान लागला तुम्हासी।।
व्येसनेचा पातकासी। पडला भृांति।।९१।।
अनंदमालि विद्याधर। राज्ये भोगितसे प्रचुर।।
धर्माचा फले परिवार। करि राज्ये।।९२।।
अनंदमालि विद्याधर। अहिल्या तयाचि भाजे।।
प्रवर्तति धर्मकाजे। पुण्ये फळे।।९३।।

धर्मफळे राज्ये करिति। गुणसागर आले येती।।
राव राणे संतोषति। मनामाजि।।९४।।
मुनि आले म्हणोनि। विनंति केलि कर जोडुनी।।
धर्मफळे अम्हालागुनी। सांगिजो देवा।।९५।।
मुनि सांगे धर्मभेद। ऐंकोनि जालासे अनंद।।
आता छेदु पापकंद। मुनिप्रसादे।।९६।।
वैराग्ये जाले नृपमनी। दीक्षा मागे कर जोडुनि।।
आता सार्थक जन्म येवोनि। कीजे आता।।९७।।
अनंदमालि करि विनंति। संजम दिजे मज प्रति।।
जेणे होये उद्धारगति। या जन्माचि।।९८।।
संजम घेतला रायान। करि जप तप अनुष्ठान।।
करि असतसे आत्मसाधन। देवध्याने।।९९।।
अहिल्या करि रायाचा मोहो। म्यानि मानिला होता दुजा देवो।।
कळला रायाचा भावो। राहिलि स्थिर।।१००।।
हंसावळी नदितीरी मुनि। बैसले कायोत्स्वर्ग ध्यानि।।
तपतेज दुजि दिनमणि। सोभे पैं।।१।।
मुनि ध्यानस्त बैसला कैसा। दुजा अचल मेरु जैसा।।
माये मोहफाशे। वेगळा जाला।।२।।
इंद्रे कोने येके दिवसी। तुम्हि गेले क्रिडेसी।।
कायोत्स्वर्ग देखोनि मुनिसी। केला उपस्वर्ग।।३।।
आनंदमाली माहामुनि। कायोस्वर्ग उभि देखोनि।।
क्रोध उपनला मनि। मुनि देखता।।४।।
आता तापसी जाले मोठे। आहिल्या ठाकोनि जाहले खोटे।।
आता पाहु तुमचा नेठे। तपाचे पैं।।५।।

मग काये केले मुनिसी। उभा बांधिला वृक्षासी।।
जोडु लागला पापरासी। मिथ्या मते।।६।।
अहिल्या पर्णिज सैंवरी। तोडावा होता माझा शरीरी।।
आता सापडला मम वैरी। जासील कोठे।।७।।
विद्या बाहिल्या सत्वरी। उपस्वर्ग करीतसे फार।।
मुनि बैसलेसे धिर। मेरु जैसा।।८।।
अणिक मुनि होता वनी। त्यानि उपस्वर्ग देखिला नयनि।।
धाउनि आला ततक्षणि। तयापासि।।९।।
मुनि उपशम केला त्यासी। का जोडिल्या पापरासी।।
याचिया उपस्वर्गासी। जहले तुम्हा।।१०।।
आता जि हा मुनि कैसा। तप तेज भानु जैसा।।
याचे दर्शन मोहफाशा। उठति पैं।।११।।
हा कोपलिया तुजवरी। ठाव न मिळे या घराची।।
कैसा उपस्वर्ग करिसी। केला त्यास।।१२।।
वाणि ऐंकोनि मुनिची। उपसमना[१] भावना त्यासी।।
क्रोध महामत्सरासी। नास्ती[२] जाली।।१३।।
मग इंद्रे धरिले क्षमा। आता क्रपा करिजे अम्हा।।
मि पडिलोसे पापकर्मा। अधोगति।।१४।।
सोडिलि मुनिचि बंधन। क्षमा कीजे मजलागुन।।
तु सर्व गुणाचे निधान। मम स्वामी।।१५।।
तुम्हि क्षमा किजे आता। तुची माझी माता पिता।।
तुजवाचुनि देवता। अंन्ये नाही।।१६।।
विनंति केली नाना परी। मुनि क्षमा धरी अंतरी।।
मग गेलि स्वमंदिरी। राहिले सुखी।।१७।।

१. उपशम, शांत. २. क्षय.

वनि बांधिले मुनिसी। ते पाप लागले तुम्हासी।।
म्हणोन भोगणे सायासी। सांगितले पैं।।१८।।
मुनि बांधिले तुम्हि चंग। म्हणोनि पावला भंग।।
गेले राज उतंग। पाप फळे।।१९।।
मुनि बांधिले वनासी। भंग पावले रणासी।।
बांधोनि नेले तुम्हासि। लंकेश पैं।।२०।।
गौतम म्हणे श्रेणिकासी। जे नर विचारुनि कार्येकरिसी।।
ते सदा येश पावती। भलते ठाइ।।२१।।
जैसे ज्याने करावे। तैसे त्याने भरावे।।
हे सत्ये मानावे। भव्ये जनि।।२२।।
करा शुभ कर्म ठेवा। तो मान्ये गुरुदेवा।।
अशुभ कर्माचा ठेवा। न किजे पा।।२३।।
मुनिवचन इंद्रे ऐकोन। प्रस्ताव करी स्वमने।।
म्या व्यर्थ घेतली पाप जोडुनि। पापियाने।।२४।।
इंद्रासि घडला प्रस्ताव[1]। अपण संजम घ्यावा।।
जेणे उद्धार होये या जीवा। कारणे पैं।।२५।।
इंद्र लागे गुरुपाया। स्वामि किजे मजवरी दया।।
मी आलोसे पाया। शरणांगत।।२६।।
पाये धरिले मुनिचे। मुखि बोलतसे साचे।।
आता सार्थक या जन्माचे। कीजे देवा।।२७।।
इतुके वचन ऐंकोनि। दया आली मुनिलागुनि।।
मग दिक्षा दिधली तत्क्षणी। इंद्रासि पैं।।२८।।
दीक्षा दिधलि इंद्रासी। अभ्यास करि शास्त्राची।।
बारा भेद तप करी। जोडितसे।।२९।।

१. विचार, सूचना.

जप तप ध्यानाचे बळे। सकल कर्म जिंकिले।।
तव केवलज्ञान जाले। मुनिरायासी।।३०।।
केवलज्ञान झाले इंद्रासी। मोक्षप्राप्ती जालि त्यासी।।
पुण्ये प्रभावे इंद्रासी। फळले।।३१।।
गौतुम म्हणे रे श्रेणिका। सांगितली इंद्र लोका।।
मिथ्यामार्गि कौतुका। कवि करिति।।३२।।
कवि बोलति पुराणी। इंद्रासि काये होति उणि।।
त्यासि आले रावणे। बंधनेसी।।३३।।
स्वर्गिलोकिचा इंद्रदेव। त्यासि अनेक रिद्धि नाव।।
मनुष्य मृत्येलोकिचे ठेवा। कैसे जिंकि।।३४।।
अनेक शास्त्राचि वित्पती। कवि विवेकाविवेके न पाहती।।
लोका पडलि भ्रांति। कालस्वभावे।।३५।।
ऐंसी भ्रांति पडलि लोका। बोलति अनेकाचि अनेका।।
सत्ये केवळिची वाक्या। असत्ये म्हणति।।३६।।
केवळिचे केले विश्वास। क्रत कर्माची होये नाश।।
भव्ये जनि आणावे मनास। आलिया।।३७।।
इंद्रकथा संपिलि येथुनि। भव्ये जनि ऐंकिलि वाणी।।
आता हनुमंत जन्म कथन। आरंभ पैं।।३८।।

**इति श्री रामायण चरित्रे भठारक श्री भुवनकिर्तिदेवानां**
**तत्पठे आचार्येगुणकीर्तिविरचिते।। इंद्रराजे वस्येकरण।।**
**नाम षष्ठमोध्यायाः।।१३९।।**
**प्रसंग साहावा संपूर्ण समाप्त। मंगळ महाशुभं भवतु।।**
**जय जय नमोस्तु।। श्री।।**

* * *

# सप्तम अध्याय

।। श्रीमंन्महावीर जिनाये नमः।।

प्रणम्ये करुनि जिनचरण। रात्रे चालिला राजे रावण।।
परिवार देखोनि मना। संतोष जाला।।१।।
रावण चालिला यात्रेसी। मेरु गिरि देखिलि पर्वतासी।।
अप्रतिमा देखोनि बिंबासी। संतोषला मन।।२।।
अप्रतिमा देखोनि चैतालासी। सुवर्णमये महानिल।।
रत्नमये बिंब केवळ। देखोनिया पैं।।३।।
बिंब देखोनि नयनी। उल्हासलेसे मनि।।
अष्टप्रकारे पूजा करोनि। मांडिलि पूजा।।४।।
पूजा करितसे प्रचुर। मुखि उछारि नवकार।।
अनंदे करि जयजयकार। नरनारि देखा।।५।।
पुण्ये जोडिले अफार। मग जाला विमानावरि स्वार।।
चालिला मागे सत्वर। घरा लागि।।६।।
ते चालिले घरासी। नाद ऐंकिले कर्णेसी।।
रावणे पुसिले वेगेसी। मरिचिप्रती।।७।।
मरिचिने पाहिले सत्वर। वाजंत्राचे ऐंकिला गजर।।
घेउ लागला समाचार। न्याहाळि दिशा।।८।।
मरिचि पाहे न्याहाळुनि। अनंतविर्या आले मुनि।।
तप तेज दिसे दिनमणि। सूर्येजैसा।।९।।

ऐंसे देखिले मुनिराये। सुरनर सेविति पाये।।
तया दर्शणी जाये। सोक संताप।।१०।।
मरिचिनि देखिला मुनि। संतोष वाठला मनि।।
रावणा पै सांगे येउनि। मुनि आले पैं।।११।।
रावण गेला समिप। तु देव गुरु माये बाप।।
तुजे दर्षणे संताप। पळति देखा।।१२।।
सभे बैसले रावणे। प्रछा करिति कर जोडुन।।
तुंम्हि तरणतारण। आम्हासि व्हावे।।१३।।
अनंतविर्या मुनिवरा। सांगे धर्माधर्म विचारा।।
बारा भेद श्रावकाचारा। सांगे मुनि।।१४।।
मुनि सांगे धर्माचा भेद। जेणे पापतरुमूल छेद।।
लागो देवा।।१५।।
भेद सांगितले सिद्धांताचे। त्रिपंन्न क्रिया श्रावकाचे।।
त्याने सार्थक जन्मचे। होये जेणे।।१६।।
ऐंसे भेद ऐंकोनि। वृत मागत कर जोडोनि।।
जेणे चुके अशुभ योनि। स्वामिनाथा।।१७।।
जीवदया वृत पाळिजे। त्रस थावराचा रक्षण की(जे)।।
अनगालि निर न कीजे। अंघोळी पैं।।१८।।
दुजे वृत्त बोलावे सत्ये वाचे। फळ घ्यावे या जन्माचे।।
महिमान वाडेल सत्याचे। देवलोकि पैं।।१९।।
आचोरि वृत जे पाळिति। चोरि वस्तु न घेती।।
अथवा अपण चोरि करिति। महापाप।।२०।।
जे ब्रंह्मचार्येवृत पाळिति। ते नर येष(श) पावति।।
(अ)वस्य परनारि त्यागिति। या जनामाजी।।२१।।

संख्या करावे जेन वस्तुचे। धन कन भांडाराचे।।
गाइ गुर वस्त्र भूषणाचे। किजे संख्या।।२२।।
हे पाचे वृत पाळिति। ते नर नारि पावति।।
स्वर्ग मोक्ष प्राप्त होति। तयासि पैं।।२३।।
दिग्‌दिशाचि किजे संख्या। ज्या देशि होये हिंसा।।
ते दिशा वर्जावे सिस्या। आत्महित।।२४।।
आनार्थ दंड न किजे। व्यर्थ झाडा न मोडिजे।।
वाठा जाता घाव न दिजे। भलत्यासि पैं।।२५।।
पाहुनि करावे व्यापार। जेणे न घडे अतिचार।।
केवळि वाक्ये निर्धार। कारणे राया पैं।।२६।।
लोहाचा न किजे व्यवसा। जेणे पडे कर्मफाशा।।
विकु नये पैं।।२७।।
कंदमुलाचे किजे त्याग। अनगालि उदक सोदोनि अंग।।
निसिभोजनाचा त्याग। किजे देखा।।२८।।
ऐंसा श्रावकाचार। जिनभुवन करा सत्वर।।
बिंब करोनि उद्धार। किजे त्याचा।।२९।।
दान दिजे मुनिसी। लक्ष्मि सफल करावि ऐंसि।।
साधर्मि जाणुनि त्यासी। किजे सन्मान।।३०।।
ऐंसा जाणावे श्रावकाचार। मुनि बोलिला उदार।।
भावे ऐंक चतुर। निज कर्णेसी पैं।।३१।।
धर्म ऐंकता श्रावकाचा। प्रकाश केला यतिमार्गाचा।।
द्रढाव जाला मनाचा। भव्ये जनासी।।३२।।
ऐंसा उपदेश ऐंकोनि। अनंद जाला तयालागुनि।।
नेम पुसति कर जोडोनि। मुनिप्रति।।३३।।

वृत घेतले मुनिपासी। सार्थक किजे या जन्माचि।।
आलिया पै उतम कुलासी। हाचि लाभ।।३४।।
मुनि बोलिलिया वचन। तया दशाननालागुन।।
वृत घ्याव्ये भाव धरुन। तुम्हि राया।।३५।।
मुनिचे ऐंकोनि उत्तर। रावणासि पडिला विचार।।
जिनव्रत महा दुर्धर। चालिला कैसे।।३६।।
हे वृत ज्याने घ्यावे। त्या मेणाचे दंत करावे।।
लोहाचा चणे चावावे। सत्ये जाणा पैं।।३७।।
जन्म घेतला श्रावक वंषि। वृत तारक या जिवासी।।
नातरी भोगणे चौर्यासी। लागे या जिवा।।३८।।
म्हणे मुनिराया तु बापा। नेम द्यावा काहि सोपा।।
म्हणे आता शोक संतापा। वेगळे किजे।।३९।।
रावण बोलिलि मुनि। सोपे वृत सांगिजे अम्हासि।।
जन्मपर्यांत सायासी। प्राप्ति होये।।४०।।
सिलवृत द्यावि आम्हासी। बलात्कार न किजे परनारिसी।।
बलत्कारे दुर्गासी जिवासि। होइल देखा।।४१।।
परनारि देखोनि सुंद्धर। तिसि न किजे बलोत्कार।।
हे वृत निरंतर। द्यावि अम्हासी।।४२।
हे वृत द्यावि आम्हासी। पिंछी ठाकिला मस्तकासी।।
हे वृत प्राप्ति तुम्हासी। होइजो राया।।४३।।
नेम घेतले कुंभकर्ण। देवपूजा नित्ये कर्णे।।
मुनिस अहारदान देणे। मग करावि भोजन।।४४।।
विभीषण नेम घेउन। समकित घेतले रत्न।।
येक जिनेश्वरावाचुन। अवघे वृत।।४५।।

निश्चये केला मनाचा। मार्गि धरिलि ग्रामाचा।।
देव विद्याधर खेचराचा। चालिला मेळ।।४६।।
देव देवांगना मिळोनि। दोनि करकमळ जोडोनि।।
भावे चरणावरि मस्तक ठेवोनि। केलि वंदना।।४७।।
धर्माचेनि बळे। राज्ये भोगितसे निर्मळ सकले।।
धर्माचि फळे निर्मळे। भोगिति राज्ये।।४८।।
श्रेणिक म्हणे गौतुमासी। हे कथा जालि ऐंसी।।
पुढे चालिलि कैसी। ते सांगावि।।४९।।
हे कथा ऐंकि तुमचि। भ्रांति गेलि मानसी।।
वर्त्तलि हे हनुमंताचि। सांगा स्वामि।।५०।।
गौतुम स्वामि आपण। बोलिला श्रेणिका लागुन।।
चित करुनिया सावधान। ऐंके राया।।५१।।
महावीर स्वामि आपण। बोलिला अंमृत समान।।
हनुमंताचि कथा सांगेन। ऐंक राया।।५२।।
विजयार्ध पर्वतावरी। पन्नास नगरे तये असे जरी।।
आदित्येपुर तया भितरी। नगर शोभे।।५३।।
सांगता न ये नगराचे महिमान। इंद्राने घडिलासे जाण।।
ग्रहे देखोनि रंजति मन। मुनि जनाचि।।५४।।
तया नगराभितरि। प्रल्हाद राजा राज्ये करि।।
तयाचि पट्टराणि सुंद्धरी। केतमति नामे।।५५।।
राणिचि वर्णिता शोभा। जैसा कर्दळिचि गाभा।।
तिचि रुप देखोनि रंभा। उभा ठाके पैं।।५६।।
उभयेता दोघापासोन। पुत्र जहला तयालागुनि।।
जैसा आकासि दिनमणि[1]। शोभतसे।।५७।।

१. सूर्य.

जैन उपाध्या पाहोनि। ज्योतिष्ये वर्तले ततक्षणि।।
पवन नाम तयालागुनि। शोभतसे।।५८।।
बीजेपासोनि चंद्रासी। वृद्धी होये दिवसदिवसी।।
तैसी वृद्धी बालकासी। होतसे पैं।।५९।।
तयाचे पाहुनि सामुद्रिक। कौतुक करिति सकल लोक।।
दिवस मासे रुपाधिक। सोभतसे।।६०।।
पुंण्याचे फळ कुमरालागी। यौंवन बाणले अंगी।।
स्वरूपता मिरवे जगी। कुमराचि।।६१।।
राये देखोनि कुमरासी। मनात जाहला संतोषि।।
नवरि पाहोनि यासी। कीजे लग्न।।६२।।
नवरी पाहावि कुमरासी। राव राणे मेदिनीसी[1]।।
योग्ये पाहोनि तयासी। मागणे कंन्या।।६३।।
राये बाहिला[2] प्रधान। आहरे दिधला मान।।
नवरि पाहा सुलक्षण। कुमरायोग्ये।।६४।।
प्रधान बोला ऐंका विनंति। माझी परिसा संन्मती।।
दक्षण देशाप्रति। महिंद्रपुरी।।६५।।
तया महिंद्रपुरीभीतरी। महिंद्र राजा राज्ये करी।।
तयाचि पट्टराणि सुंदरी। मनोवेग पै।।६६।।
ऐंसा तो महिंद्र राजा। जैसा स्वर्गिचा इंद्र दुजा।।
मानोभावेसि करि पुजा। देवाचि पैं।।६७।।
देवधर्माचि मोटि रुचि। जोडि करिति धर्माचि।।
मोड मोडति पापाचि। धर्मफळे पैं।।६८।।
मनोवेग सुंदरि। पतिवृता संम्येक्तधारी।।
तिचे गुण वर्णिता रसभरी। कविश्वराचि पैं।।६९।।

१. पृथ्वीवरील. २. बोलाविला.

ऐंसा तो पुण्याचे रासी। येक शत पुत्र कुशी।।
महा प्रतापाचि रासी। सुक्रत[१] फले।।७०।।
इतुकिया उपरी। कंन्या जालि सुंदरी।।
गुणाचि वर्णिता सरी। उपमा न ये।।७१।।
सुनक्षत्र सुवेळा। कंन्या जालि अंजना बाळा।।
सामुद्रिका वर्णिलि कुशला। पुण्ये फले।।७२।।
कंन्या दिसतसे कैंसि। जैसि देवांगणा तैंसी।।
देखोनिया तै संतोषि। महिंद्र राणा।।७३।।
ऐंसि अंजना बाळा। अंगी बाणलि चंद्रकळा।।
संम्यक्तवंति कुशळ। विद्याधरि पैं।।७४।।
योंवन बाणलि अंगी। सरळ भावे चाले तुरंगी[२]।।
माय बाप सदा रंगी। रंजवितसे।।७५।।
पित्याने कंन्यासि देखोनि। चिंता उपजलि मनि।।
योग्ये पाहोनि नयनी। कीजे लग्न।।७६।।
मग राये बोलाहिले प्रधान। विचार पुसतो तुम्हा लागोन।।
योग्ये पाहोनि लवकुन। सांगेन आता।।७७।।
वर पाहावे अंजनेसी। महा सगुण गुणाचे रासी।।
ज्याने संतोष होये जिवासी। आमुचिया पैं।।७८।।
बुद्धिसागर प्रधान। राये ऐंका माझे वचन।।
इंद्र राजा प्रतापे गहन। देणे त्यासी।।७९।।
आणिक येक सांगतो तुम्हासि। रावण राजा मोठा राक्षेस वंषि।।
तो राज्ये करि लंकेसी। आपुले प्रतापे।।८०।।
वचन ऐंकिले मतिसागरे। रायासि बोलला उत्तरे।।
रावणासी स्त्रिया आहेत फार। तेथे सुख कैचे।।८१।।

१. पुण्य.   २. घोडी.

इंद्रजित आणि मेघकुवर। आणिक राये राणे आफार।।
बरवे गुण पाहोनि सुंद्धर। लक्षणे त्याचे।।८२।।
ज्ञानसागर म्हणे रायासी। गोष्टी माझी परियसी।।
सैवर मंडपि सर्वेरायासी। बाहणे तुम्हि।।८३।।
रावणे[१] येतिल सैवरी। ज्यास माळ घालिल नोवरी।।
तयासि लग्न बरव्या परी। कीजे तुम्हि।।८४।।
शृतसागर म्हणे रायासी। वचन माझे परियसी।
सैवरमंडपि वैर रायासी। होइल देखा।।८५।।
आणि येक सांगतो सहजा। प्रतापे आरंण्ये राजा।।
सुमनसा तयाची भाजा। रुपे सुंदरी।।८६।।
तयेचे रुप देखोनि वोजा। रंभा मेणका आलि वोजा।।
ऐंसि ते महिला सहजा। पुण्ये फळे।।८७।।
ऐंसि दोहि पक्षि सुर। तये कुशि विद्यत्कुमार।।
महाप्रतापि राजा शुर। असे देखा।।८८।।
संदेहपारग प्रधान। बोलला रायालागुन।।
त्याची जन्मपत्रिका वाचुन। चिंता करि।।८९।।
अठरा वर्षेपर्यंत। सुख भोगील जयेवंत।।
मग दिक्षा घेउनि महंत। साधिला पंथ।।९०।।
दिक्षा घेउनि जाइल वनांतरी। त्यास देइल अंजना सौंधरी[२]।।
तिस दुःख होइल संसारि। जन्मपर्येंत।।९१।।
तयेस देइल अंजनाबाळा। तुम्हास दुःख होइल सकळ।।
आणिक वर पाहोनि तिस सबळा। दिजे त्यासी।।९२।।
प्रल्हाद राजा महादंपति। सुक्रत फळे सुख भोगिति।।
त्याचा पुत्र पवनंजय संन्मती। देणे त्यासी।।९३।।

१. राजे. २. सुंदरी.

तयाचे रूप वर्णिता। गुणासि पार नाहि महिनाथा[१]।।
त्यासि दिजे आपुलि दुहिता[२]। स्वामिराया।।९४।।
प्रधानाचि ऐंकोनि वचन। राया संतोषले मन।।
प्रधानाप्रति संन्मान। दिधला राये।।९५।।
ऐंकोनि प्रधानाचि वचन। संतोषलि अवघेचे मन।।
मग हे वचन प्रधान। केला समस्ती[३]।।९६।।
अवघेचे संतोषले मन। प्रधान दिधले वस्त्र भुषणे।।
भले भले तुजे वचन। अमृत समान।।९७।।
हा वर मानला सजनालागोन। गोष्ठ ठेविलि अंतःकर्ण।।
पुण्येप्रभावे करोन। येइल घडुन।।९८।।
मग इतुकिया उपरि। वसंत मास आला शुभकरि।।
वनस्पति फल फुले भारी। महकति[४] पैं।।९९।।
वनस्पति फुलले अफार। कोकिला बोलति मधुर स्वर।
भ्रमर रुणुझुणुंकार। मधुर स्वरे पैं।।१००।।
महिंद्र राजा महा शुर। मेळविला आपला परिवार।।
आत्म सदा पाजावया सत्वर। घेतलि पूजा।।१।।
परिवारेसि चालिला राजा। सिद्धक्षेत्र करावया पूजा।।
अतिवृत घेतले सहजा। पूजने आपण।।२।।
मग बैसलि विमानावरी। अठाइ वृतासी सत्वरी।।
मिळालेति विद्याधरी। पूजिति वीतरागे।।३।।
समोह[५] मिळाला विद्याधराचा। मोहोत्साव करिति अष्टाणिकाचा।।
मोहोत्साव देखोनिया वाचा। उचारति नवकार।।४।।
सुवर्णमये देखोनि चैताल्या। रत्नमये महाउज्वळ।।
नयनि देखोनिया सकळ। केलि काया।।५।।

१. राजा. २. कन्या. ३. सर्वांनी. ४. सुगंध पसरणे. ५. समूह.

पंचामृत केलि न्हवन। अष्टप्रकारि केलि पूजन।।
भवसिंधू तरावया कारणे। जोडिले पुण्ये।।६।।
स्वस्तिक काढिले इंद्रानी। पंचवर्ण रंग भरोनी।।
पंचारत्या घेउनि कामिणि। नाचति रंगी।।७।।
ऐंसे मोहोत्साव जहले तेथे होता। प्रल्हाद राजा आला होता।।
परिवारेसी भाव समता। वंदने लागी।।८।।
दर्षन केले देवाचे। मंत्रोछारीले[1] नवकाराचे।।
त्या फळे करोनि जन्माचे। जोडिले पुण्ये।।९।।
देवाचा देखोनि मोहोत्साव। अनंदला प्रल्हादराव।।
महिंद्र राजा करि हावभाव। परस्परे।।१०।।
दोघे बैसले अनंदेशी[2]। पूजन करीति भावेसी।।
न्हवन करोनि लेपणांगासी। चर्चित देखा।।११।।
दोघे बैसले अनंदेसी। गोष्टि करीति प्रमोदे।।
येकास येक परस्परे छंदे। अनंद करिति।।१२।।
गोष्टी सांगीति महाप्रिति। महेंद्र राजा म्हणे प्रल्हादासी।।
पवनासि अंजना दुहिति। दिल्हि आम्हि।।१३।।
गोष्टी सांगिति बरवे परी। कुवरासी दिजे अंजनासुंद्धरी।।
तिचे गुण वर्णिता सभेभितरी। होइल राया।।१४।।
मग बोलिला प्रल्हादरावो। राया तुमचे मनि ऐंसा भावो।
पवन पुण्याचे नवलावो। घडे ऐंस्ये।।१५।।
ऐंसे प्रितिचे वचने। महा अंमृतसमान।।
अंजना दिजे पवनालागुन। कीजे लग्ने।।१६।।
ऐंसा मिळोनि सज्जन सोयिरी। मोहोत्साव करिति नानापरि।।
तया मंडपाचि कुसरी[3]। काये सांगो।।१७।।

---

१. मंत्र उच्चारिले. २. आनंदासह. ३. कौशल्य.

ऐंसि त्या मंडपाभितरी। मोहोत्साव केला हो कुशरी।।
वाजंत्राचे नादे अंबरी[1]। उठति ध्वनि।।१८।।
मंडपासि बरव्या परी। सोभा केलि नाना कुसरी।।
ध्वजे तोरण्याचि परी। सांगता न ये।।१९।।
पौर्णिमा जालेया तीजेसी। लग्न धरिले तेया दिवसी।।
मंडप उभारिले सायासि। उभयेतानि।।२०।।
होता वाजंत्राचे गजर। मग केला जये जयेकार।।
पंच शब्द वाजे भार। परमानंदे।।२१।।
मग तये अवेश्वरि। गाणे गाति नरनारी।।
तांडव नृत्ये करति सुराचारी। आला येक रिति।।२२
ऐसेया पुण्याचे रासी। संयोग मिळाला दोघासी।।
देखोनिया होति संतोषि। मायेबाप पैं।।२३।।
प्रिति वाडले बरव्या परी। अनंद करति कुसरि।।
ऐंसा नवल बरव्या परी। करिति देखा।।२४।।
मग करिति भोजन। नाना परिचि पक्कांन्।।
ऐंसि परस्परे समाधान। वाडले दोघा।।२५।।
मग इतुकिया उपरी। मग ते अंजनासुंदरी।।
महा स्वरूपता कुसरी। महिंद्रतनयो।।२६।।
ऐंसि अंजनासुंदरि। गुणवंति सील नारी।।
पवन ऐंकोनि अंतरी। जहला विव्हळ।।२७।।
विव्हळ जाला अंतःकर्णि। अंजना कदि देखेन मि नयेनि।।
व्यवस्ता व्यापिले तया लागोनि। पाहु अंजना।।२८।।
अंजना पाहावयाचि मोठि प्रिति। चार दिवस कदि होति।।
रात्र दिवस तयाप्रति। शांतता नाहि।।२९।।

१. आकाशात.

चिंता व्यापिलेसे मनि। जोवरि न देखे नयेनि।।
तोवरि शांति जायेल मनि। नाहि मजे।।३०।।
ऐंसा चिंता करिता। प्रधानपुत्र आला त्वरिता।
तया जाणविलि वार्ता। मनिचे गुजे।।३१।।
मन जालिसे चंचळ। पाहावि अंजना सुकुमाळ।।
नयनि देखिल्याविण निर्मळ। नाहि जिवासी।।३२।।
पवन बोललासे वचन। मित्रा सांगतो तुजलागुन।।
व्यवस्था व्यापिले माझे मन। ते सांगतो तुजे।।३३।।
तु आत्मसखा होसी। वडिल बंदु मानितो तुजसी।।
हितगुज गुह्य कोन्हासी। सांगणे म्या।।३४।।
प्रधानपुत्र बोलला वचन। राया पवनंजयालागुन।।
काहि गुजगोष्टि श्रवण। कीजे देखा।।३५।।
अंजनीचा गुण महासगुण। महा रूपे ते लावण्ये।।
ऐंसे हे बोलति जन। खरे कि लठके[१]।।३६।।
अंजना पाहावी नयनी। मनाचि होइल समाधानि।।
नातरि तलमल जिवालागुनि। शांति नाहि।।३७।।
तरि तु सखा माजी होसी। जरि मज अंजना दाविसी।।
तरि मज संतोष जीवासी। होइल बापा।।३८।।
प्रहसित बोलिला उत्तर। राया चित्त करावे स्थीर।।
सूर्य मावळलावरि विचार। होइल राया।।३९।।
सूर्य जाला अस्तमान। रायाचे व्याकुळ झालि मन।।
आता मज न्यावे झडकोन। मित्रवर्या पैं।।४०।।
मग इतुकिया उपरी। अनंद होतसे घरोघरी।।
प्रधान चपळाइ करोनि झडकरि। बोलिला वेगे।।४१।।

---

१. खोटे.

मग सप्त खणाचे[1] माडिवरी। अंजना बैसलि सुपरी।।
माये रुपे माहलावरी। प्रवेश केले।।४२।।
दोघे प्रवेशले माहलात। येवोनि बो(बै)सले गुप्त।
सखिया सहोदरि करित। गुह्य गोष्टि।।४३।।
दोघे बैसले येकांति। पतिचे गुज गोष्ठ सांगती।।
ऐंसे परस्परे रंजविती। मने आपुले पैं।।४४।।
वसंतमाला बोलिलि वचन। तया अंजनि लागुन।।
तुझा पति इंद्रासमान। देखिला म्या।।४५।।
तुझे भाग्यासी नाही आफार। वर पाललिसि सुंदर।।
जैसा मदनाचे अवतार। सोममूर्ति पैं।।४६।।
त्याचे रुप सांगेन तुजे। तरि मदनासी येइल लाज।।
दुजे नागकुमरा सहजे। देखिला बाई।।४७।।
जैसा कनकाचे पूतळे। अंगि बाणलि सर्व कळे।।
बत्तिस लक्षणे सोभले। देखिल्या म्या।।४८।।
त्याचे देखिल्या म्या वदन। दुजे देखील्या म्या बालभान[2]।।
त्याचे देखोनिया लोचन। लाजे मृग।।४९।।
ऐंसा देखोनिया रुप। उपमेसी नाहि ऐंसा भूपा।।
त्यासी देखोनि विकल्प। गेले माझे।।५०।।
वसंतमालेचा ऐंकिला बोल। अंजना बोलति सखोल।।
वसंतमालेचा बोल सबोल। करि कौतुक।।५१।।
वसंतमालेचे ऐंकोन। अंजना बोललि आपण।।
पवनंजयाचे गुण। वर्णिसि फार।।५२।।
फार वर्णिसि पवनासी। कोठुन कळले तुजसि।।
ते सांग मजसी। सत्वर आता।।५३।।

१. मजला.    २. बालसूर्य.

हे तु बोललिस वाचे। गुण कोठे न कळे त्याचे।।
ऐंसा फोंकला[१] बोलाचे। येतो राग।।५४।।
रागे बोलिलि अंजना। फार वर्णिसि तु पवना।।
काये देखोनि तुजे मना। आला असे।।५५।।
पवन पवन म्हणविसी। वायोचा गुण त्यापासी।।
बहु चपलता त्यासी। बोलति लोक।।५६।।
विद्युतप्रभा पहिला वर। तो का मोडिला सत्वर।।
तेथ काये जाहला विचार। सांगा मजे।।५७।।
त्याचि वाचिली जन्मपत्रिका। विवेक तेथिल ऐंका।।
आठरा वर्ष विवेका। घेइल दिक्षा।।५८।।
अठरा वर्ष नंतर। मग घेइल संजमभार।।
ऐंसा कळोनि निर्धार। दिधले पवना।।५९।।
वसंतमाळा म्हणे अंजनेसि। त्वा निंदिले पवनेसी।।
जोडिले पापाचे रासी। चांडाळिनि त्वा।।६०।।
जो जो रागिजे वसंतमाळा। तो तो खिजवि अंजनाबाळा।।
ऐंसा परस्परे कळला। करिति दोघी।।६१।।
ऐंसि परि दोघाचि उत्तरे। होडि[२] कनाडिकाचि परस्परे।।
गुप्त होति दोघि कुवर। ऐंकिलि त्याहि।।६२।।
निंदेचि उत्तरे ऐंकिलि कर्णि। पवनंजया क्षोभला मनि।।
आता मारोनिया अंजनी। धाडु येमपुरे।।६३।।
धनुष्ये घेतला झडकुनि। बाण लाविलेसे गुणि।।
सिर छेदुनियासी पाडु धरणी। अंजनेसी।।६४।।
निंदा केलि काये देखोन। आणिक बोललि अवगुण।।
हे वैरीन माहा पापिण। वधावे इसी।।६५।।

१. व्यर्थ, निरर्थक. २. स्पर्धा.

मग रागे घेतलि धनुष्ये बाण। सामोरे धरिले संधान[1]।।
झडकरि येउनि प्रधान। धरिले कर।।६६।।
राया गोष्टी माझी अवधारी। दोघे अंम्हि आलो अंधारी।।
अणिक येथे येवोनि वधावे नारी। माहा पाप।।६७।।
राया जरी वधील यिसी। होयिल पापाचे रासी।।
अपकिर्ती जगि कैसी। प्रवर्तेले पैं।।६८।।
अम्हि आलो गुप्त रूपी। अणि येथुनि ऐंसे करावे।।
लोकामुखि बोल न घ्यावे। शुभाशुभ।।६९।।
क्षमा करावे या वेळेस। करुनि जावे गृहास।।
मग होनार असेल। तिचे प्रशस्त।।७०।।
प्रहसित बोलिला वचन। नाना परि द्रष्टांत देउन।
वचन रायाचे संबोधुन मन। नेला ग्रहास।।७१।।
घरा आलिया उपरि। पवने कोप धरिलेसे अंतरी।।
कोन्हासि कळेना घरी। वर्तमान काहि।।७२।।
क्रोधे तापलासे पवन। अंजनिवरुनि उतरले मन।।
तिचे नाम घेता अंतःकर्ण। पोळता माझे।।७३।।
मग इतुकिया उपरी। प्रधान बाहिला झडकरी।।
कठकाचि करांवि तयारी। सत्वर तुम्ही।।७४।।
कठक करुनि संजुत। वर्तमान न कळे ठेउनि गुप्त।।
बाहेर निघाला त्वरित। पवनराव पैं।।७५।।
मग ईतुकिया उपरी। दिनकर उगवला अंबरी।।
कठक मेळविले झडकरी। केला दमाम्या[2] नाद।।७६।।
पवन निघाला बाहेरी। नगरांत जहला अहःकार।।
काये जाला म्हणोनि विचार। करिति लोक।।७७।।

१. वेध, लक्ष्य.   २. नगारा.

राव चालला म्हणोनि। विचार पडिला बहुताजन लागोनि।।
काये अंन्याये कोणाचे म्हणोनि। करिति चालना[1] पैं।।७८।।
लग्न जवळ आले म्हणति। पवनाचि कैचे जाले ऐंसे मती।।
प्रल्हादाप्रति सांगति। वर्तमान पैं।।७९।।
प्रल्हादे ऐंकोनि श्रवणि। दचकला अपुले मनि।।
पुत्रास काये जाले म्हणोनि। ध्यावि खबर।।८०।।
वर्तमान कळले महिंद्रासी। आक्रांत वर्तला त्या दोघासी।।
वर्तमान कळले अंजनेसी। आलि मूर्छना।।८१।।
भुवनि पडिलि बाळा। वायु घातलि वसंतमाळा।।
सावध होउनिया डोळा। लाविजेल।।८२।।
प्रल्हादराव करि विनंति। तया कुमर हो प्रति।।
तुजविण राज संपति। काये करावे।।८३।।
महेंद्रराव ऐंकोनि। अंग ठाकिले धरणि।।
सकळ सज्जन मिळोनि। विनविति कुवरा।।८४।।
सकल सज्जना मिळोनि विनविती। तया पवनंजयाप्रती।।
बापा लग्नाचि जालि आइति[2]। तुझिया पैं।।८५।।
मुळे[3] पाठविले सज्जना। ऐंकोनि संतोष तयाचि मना।।
फिरुनि चालावे सदना। प्रति आपुले।।८६।।
नानापरि विनविति। तया पवनंजयाप्रति।।
लग्न लाऊनि संतोष तृप्ती। कीजे अम्हा।।८७।।
ऐंसे करुनिया विनवनी। क्षमा कीजे आम्हा लागोनि।।
नाना प्रकारे संबोधुनि। केला स्थिर।।८८।।
पवनविजयो केला स्थीर। हा काये जालासे विचार।।
याचा घेति समाचार। परस्परे पै।।८९।।

१. कूच, प्रयाण, गमन. २. सिद्धता, तयारी. ३. निरोप देण्यासाठीचे दूत.

लोका कळले वर्तमान। गुप्तरूप गेला पवन।।
अंजनिवरि मोह धरोन। पाहु रुप दिसे।।९०।।
दोघे गेले गुप्त रुपे करुनि। वसंतमाला अणि अंजनि।।
दोघे गोष्टी सांगति मोकळ्या मनि। सत्ये पै हो।।९१।।
ऐंसि निंदि वचने। पवने ऐंकोनि श्रवणि।।
रायाचा मन गेले उतरोनि। अंजनिसि।।९२।।
महिंद्रराव नानापरी। पवनाचा स्तुति करी।।
रंकावरि क्रपा करी। स्वामिनाथा।।९३।।
बहुतापरि केलि विनंती। पवनाचे मन घेतले हाति।।
मग पवन इतुकि उपरांति। केलि प्रीति।।९४।।
मोहोत्साव केले लग्नाचे। जय जयकारति वाचे।।
गजर होतो वाजंत्रीयाचा। नाना ध्वनि।।९५।।
होता वाजंत्रियाचे गजर। ताल मदल भृंगार भेर।।
सुवासिनि गाति सुस्वर। मनांत रंगे।।९६।।
हस्तिवरि मिरवितो कुवर। दिसतो मदनाचा अवतार।।
मिरवे वऱ्हाडियाचे भार। माहा अनंदे पैं।।९७।।
ऐंसा मोहोत्साव। पवनाचि अंतरि नाहि भाव।।
अंजनि उठविता घाव। लागे भालेचा।।९८।।
मग इतुकिया उपरी। लग्न केले बरव्या परि।।
मग सज्जन सोयरी। करिति अनंदे।।९९।।
मिळाले सखे सज्जन। चोरिचि यापरी केले लग्न।।
पवनाचि नाहि समाधान। उदास मनि।।२००।।
लग्न जालि ऐंसिया परी। सुख नाहि त्याचा अंतरी।।
अंजना अठविता शरिरि। दग्ध होति।।१।।

ऐंसिया परि केले लग्न। स्थीर नाहि त्याचे मन।।
ऐंसे दोन पक्ष क्रमोन। आले घरासि पैं।।२।।
वऱ्हाडि आले ग्रहासि। बाहडे[1] दिलासे त्यासी।।
अवघे गेले संतोषि। जावया घरा।।३।।
मग इतुकिया उपरी। अंजना आणिलिसी घरी।।
पवनाभावना देखे कुमरी। संतोष नाहि।।४।।
अंजनिस जाले दुःख। लोकासि काये दाउ मुख।।
मनात करि विवेक। अठवि मनि।।५।।
वऱ्हाड आले घरास। सोयेरे गेले स्वस्थानकास।।
अंजना घरि असे। पवनाचे पैं।।६।।
पवनास अठवे अंजनि। दुःख होये त्या लागुनि।।
तिचे मुख देखिल्या नयेनि। उठति ज्वाल।।७।।
पवनविजयो सत्वर। वेगळे केले तिस घर।।
ठेविले अंजना सुंधर। मनाचि रागे।।८।।
घर दिल्हीसे बांधोनि। वसंतमाला अंजनि।।
दोघि ठेविले उदास मनि। करुनिया पैं।।९।।
मग इतुकिया उपरी। दोघि ठकिल्या निर्धारि।।
चिंता व्यापिले शरीरी। करिति गोष्ट।।१०।।
गोष्टि करिति दोघिजनि। चूक पडलि अम्हापासोनि।।
कर्म उभि ठाकिलि येउनि। पूर्व समंधे।।११।।
ऐंसा करिति पश्चात्ताप। हसता गोष्टीचे महापाप।।
कर्मसंयोग संतापा। घडला अम्हासी।।१२।।
गोष्टी करिति दोघेजनी। आम्हाजवळ काये म्हणोनि।।
आता सांगा येक वणालागुनि। मुनिचे गुजे[2]।।१३।।

१. निरोपाचे विडे. २. गुपित.

गुज सांगु कवणापासी। मी शरणांगत अहे तुम्हासी।।
तुम्हाविण अम्हासी। नाहि कोणी।।१४।।
ऐंसा ठाकिले निर्धार। व्यर्थ गेले हा संसार।।
आता वाचुनिया भूमिभार। काये काजे पैं।।१५।।
गोष्टि सांगु मि कवणासी। वैरिया परि जातो निशी।।
आता मि शरण जाउ कोणासी। स्वामिनाथा।।१६।।
पठ[१] पवनाचा लिहुनि। समिप बैसलेसे घेउनि।।
लक्ष लाउनि सुमनि। सांगे गोष्टी।।१७।।
चित्राचे पठ पवनाचे लिहुनि रूप। घेउनि बैसले समिप।।
ठाकोनि मनाचे संताप। रंजवि मन।।१८।।
अठविता उपजे दुःख। काहि देखे न तुमचे मुख।।
कृपा करावि तुमचि मि रंक। स्वामिनाथा।।१९।।
दुःख अठविते चित्ति। माये बापे दिधले तुमचे हाति।।
आता मज होइल दुर्गति। तुमचे वियोगे।।२०।।
तुम्हि करावि क्षमा आता। जैन धर्मि तुम्हि पालिता।।
दशलक्षण धर्म त्वरिता। पालक तुम्हि।।२१।।
देवा कैसे कर्म वोढवले। म्हणउनि संतापे तापले।।
तुम्हाविण कोण करिल। सीतल मज।।२२।।
आता क्षमा किजे मजे। तुमचि वरांगणा[२] राखा लाज्ये।।
आता शरणांगता तुजे। आहो देवा।।२३।।
परस्परे तु कर्म। कि मि चूकलो जिनधर्म।।
चूकि पडलि सहश्र नाम। कर्म संयोगे।।२४।।
ऐंसे करितसे कळकळा। कि म्या सतिस दिधलि आळा।।
केलिया कर्माचा फळा। भोगणे लागे।।२५।।

१. पट. २. उत्तम स्त्री.

कि निंदा केलि सादुचि। कि म्या सीमा मोडिलि जैन धर्माचि।।
कि माये बापाची लेकुराचि। तोडिलि आसे।।२६।।
मग करि पश्चताप। कि संतापलि मायेबाप।।
कि परनिंदेचे पाप। लागले मजे।।२७।।
पश्चाताप करि अंजना। पवन काहि देखे न डोळा।।
गेला देवधर्माचि सोहळा। पतिवियोगे।।२८।।
मग इतुकिया उपरी। वर्तमान कळली माहेरी।।
अंजनिस दुःख जाले भारी। पाठवि मूळ[१]।।२९।।
बंधव[२] आलि अंजनिचा। भाव कळला समस्ताचा।।
मग मौन्ये धरोनि वाचा। गेला घरासी।।३०।।
बंदु गेला गृहालागुनि। समस्त आले भेठु अंजनि।।
वर्तमान ऐकोनि जननी। धरि दुःख।।३१।।
ऐंसा कळले विचार। ऐंकोनि जाहला आहाकार।।
येक कंन्या तिचा विचार। जाले कैसा।।३२।।
चिंता करति मायेबापा। ऐंकोनि जाला संतापा[३]।।
दुःखाचे जाले व्यापा। कर्मसंयोगे।।३३।।
पति बोले आपुले वाचे। व्यर्थ जिने त्या नारिचे।।
वियोग ऐंकोनि अंजनिचा। धरिले दुःख।।३४।।
अवघ्या सख्या संगातिनि। दुःख धरिले तिहि मनि।।
आता काहि देखु अंजनि। पतिसंगे।।३५।।
शोक करि अंजना बाळा। कैसे घडले या कपाळा।।
पवनास कंदि देखे न डोळा। आपुलि पैं।।३६।।
शोक करिता दिवस जाये। काहि देखे न तुमचे पाये।।
जेणे सफल होये। जन्म माझा।।३७।।

१. दूत. २. बंधू, भाऊ. ३. मनस्ताप.

दुःख धरि अंजना सुंदरि। व्येर्थ गेला माझे संसार।।
आता तुम्हि तारावे सत्वर। स्वामिनाथा।।३८।।
वसंतमाला अंजनि। वार्ता करिति परस्परे मनि।।
बारा वर्ष गेले क्रमोनि। शोक करिता।।३९।।
मग इतुकिया उपरि। पवनविजया सुखे राज्ये करि।।
अंजना अठवि अंतरी। उपजे दुःख।।४०।
ऐंसीया उभये दोही पक्षासी। दुःखाचा जाले रासी।।
देवावाचोनि कोन्हासी। साक्ष कोन्हा।।४१।।
यासि साक्ष तुचि देवा। भावे भक्ति चुकलो सेवा।।
देवाविणे कोणे करावा। पक्षपात माझे।।४२।।
मग ईतुकिया उपरि। दुःखित असे अंजना घरी।।
पतिवियोगे बाहेरी। निघेचि ना।।४३।।
लोक सिकविति पवनासी। क्षमा करावे तुम्हि मानसी।।
आपणासारिखे पाहोनि त्यासी। कीजे क्रोध।।४४।।
ऐंसे द्रष्टांत नानापरिचे। मन न भिजे पवनाचे।।
मग देव देव सदा वाचा। उचारितसे।।४५।।
हे कथा जालि येथावरी। दशानन राजा राज्ये करि।।
महाप्रतापे लंका नगरी। शोभतु असे।।४६।।
राजी करी पवन राजा। आपुली प्रतापे पालि प्रजा।।
लंकेसि रावण राजा। पुण्ये फळे पैं।।४७।।
राज करि रावण राजा। अनेक राये सेविति पाया।।
त्याचे महिमा सांगु काये। येकि वाचे।।४८।।
तिनि खंडे साधिलि रावणे। जिंतिले अणि रावण।।
त्यासि नाहि कोणाचे गुमान। गर्जेगर्वेतो।।४९।।

सोळा सहश्र जिंकिले देशे। रावणे केले वस्ये।।
ऐंसा रावण लंकेश। करि राज्ये।।५०।।
नवकोठि तुरंग तेखार। बेताळिस लक्ष गइवर[१]।।
सोळा सहश्र नृपवर। करिति सेवा।।५१।।
सिंव्हासनि कैसे शोभे राव। स्वर्गिचा दुजे दिसे देव।।
मनि धरुनि अहंभाव। करि वार्ता।।५२।।
रावण बोलि रायासी। राव राणे आले सेवेसी।।
वरुण राजे राज्ये करि दिमाकेसी[२]। घ्यावे खबर।।५३।।
ऐंसा तो वरुण राज्ये करि। थोर थोर जिंकिले वैरी।।
खबर घेणे झडकरी। पाठवावे स्वार।।५४।।
दुत पाठवा झडकरी। साचि[३] खबर घ्यावि बरव्यापरि।।
निरोप त्याचे आलियावरी। कीजे प्रबंध।।५५।।
तु बाहि[४] सत्वर। त्यासि जाणविलि विचार।।
मेघपुरा जाउनि सत्वर। सांगणे तुम्हि।।५६।।
दुत चालला तेथोनि। आला मेघपुरा लागोनि।।
भेठला वरुणालागोनि। सांगे वार्ता।।५७।।
मग सबेमध्ये बैसोनि। अनंदे निर्भर होउनि।।
अंमृत मुखे वचनि। बोलता झाला।।५८।।
दुत बोलला वरुणाप्रती। राया परिसा विनंति।।
दशानने तुम्हाप्रती। बोहिली वेगी।।५९।।
तुम्हि चलावे झडकरी। क्षण न करावे उसिरी।।
राये राणे भेठले सत्वरे। बोहिलि तुम्हा।।६०।।
दुताचे ऐंकोनि वचन। कोपे खवळला वरुण।।
मग काये बोलला जाण। दुता प्रती।।६१।।

१. गजवर, श्रेष्ठ हत्ती. २. वैभवपूर्वक. ३. सत्य. ४. बोलावणे.

दुता खरा तु गवार। बोलु नेणसि उत्तर।।
तुझा राव काये झुडतर[१]। वरुणापुढे।।६२।।
        दुत बोले अभिमानी। अपुला शब्द स्वसामनि।।
        पडु नका अभिमानि। भृम राखा।।६३।।
त्रिखंडाधीश रावण राये। अनेक राये सेविति पाये।।
तुमचा अभिमान तो काये। रावणापुढे।।६४।।
        मन मोडिला तुमचा। प्रताप मोठा सुदर्शनाचा।।
        भर्वसा सहश्र विद्याचा। दशाननाचि।।६५।।
तुम्हि त्यासि काये भीडेल। अणि कोठावरि झगडाल।।
पाये पडोनि मानिल। तरिचे बरे।।६६।।
        वरुण म्हणे दुताप्रती। तू काये वर्णिसि त्याचे स्थिती।।
        मजवरि आला लंकापति। तरि भिडेन।।६७।।
रावणाचा करिन रोवण। त्याचा मज काये गुमान।।
दुता तु उठ लवकोन। सांगा रावणा।।६८।।
        शत पुत्र वरुणाचे। काये बोलिला वाचे।।
        पुर्जेपुर्जे[२] करिन रावणाचे। सांगा जाये दुता।।६९।।
तव दुत बोललि हसोन। रावणासी कलवी ऐंसा कोण।।
तुम्हि बालके अंजन। निर्लज्ये पैं।।७०।।
        सिंव्ह आणि सस्वासी। गरुड आणि कागासी।।
        रावण आणि तुम्हासी। सरि केवि कीजे।।७१।।
महिधर बोले उत्तर। दुता तु खरा गवार।।
तु अज्ञानि पातला थोर। अखरि आला तुम्हासी।।७२।।
        क्रोधे स्वर्ग काडुन। आता म्हणे तुझे मारिन।।
        तुजा राखेल कोण प्राण। पाहो आता।।७३।।

---

१. तुच्छ.    २. तुकडे तुकडे.

आणिक उठले कुवर। दुता विठंबिले फार।।
भये पळे जैसा चोर। तैसा पळे।।७४।।
दुत पळाला लंकेसी। सांगितला रावणापासी।।
थोर विठंबिले मजसी। न माने तुम्हा।।७५।।
मग कोपला दशानन। सकल सैन्ये पालाणुन।
निशानि घाव देउन। चालिला पैं।।७६।।
लवलाहे आला मेघपुरा। कठकेसि उतरला बाहेरा।।
थोर सुठला दरारा। मेघपुरी।।७७।।
खळबळिले नगर। वरुण ऐंकोनि समाचार।।
सज्जन करोनि परिवार। बाहेर आला।।७८।।
वाजे ढोल तबेल निशाल। वीर आलेसे स्पुरण।।
रावणाचे देखोन। पैंजा बोलति।।७९।।
मिळाले उभये दळ। युद्ध मांडिले प्रबळ।।
किंकळे देति मयेंगळे। रणामध्ये।।८०।।
युद्ध मांडिले निर्वाणिचे[१]। कठक मेळे वरुणाचे।।
भार पळति दळाचे। दाहि दिशा।।८१।।
दशानन झाला अनंद। केला शंक भेरि नाद।।
राक्षस जाला प्रमोद। मनामाझी।।८२।।
कठक मोडले देखोन। वरुणाचे पुत्र लाजिले जाण।।
उठिले फौज घेउन। रावणावरी।।८३।।
मग सुठले महंमारी। कठक आणिले हारी।।
रावणाचा दळावरी। प्रळये केले।।८४।।
मग गेले रावणावर। रथ मोडोनि केले चूर।
रावणा खळबळले सत्वर। लये अला म्हणे पैं।।८५।।

१. टोकाचे, पराकाष्टेचे.

छत्र मोडिले रावणाचे। महिमान गेले त्याचे।।
कोडि पडिला जिवाचा। आपुलिया।।८६।।
मग धावला खरदुषण। युद्ध मांडिले दारुण।।
बांधोनि नेला रावण। खरदुषणे।।८७।।
सर्व कठक गेले पळोन। रावणा हारि आणिले जाण।।
वरुण जयेवंत होउन। राहिला पैं।।८८।।
मग जये जयेकार केला जाण। सर्व नरनारि मिळोन।।
घरोघरि गुडिया तोरण। उभाविले पैं।।८९।।
लोक बोलति वचन। वरुण जयेवंत होउन।।
रावणाचा करोनि रोवण। सोडिला पैं।।९०।।
लंकेसि रावण। थोर जालासे अपमान।।
मग बोलाविला प्रधान। विचारासी।।९१।।
मेळविले आपुले सैन्ये। स्वजना लिखित पाठउन।।
येक प्रल्हादाकारण। पाठविले पैं।।९२।।
लिखित लिहिलि अर्जदास। तुम्हि सज्जन व्हावे अम्हास।।
पाहिजे सेवठ वेळेस। आम्हा लागी।।९३।।
तव प्रल्हाद हर्षला। सर्व दळाचा मेळा केला।।
मग पुत्र काये बोलला। पवन पै।।९४।।
स्वामि उपदेश द्यावि मज। मी करिन रावणाचे काजे।।
वरुण जिंकोनि सहजे। बांधोनि आणितो।।९५।।
पिताचे आज्ञा घेउनि। पवन प्रस्थान केले जाण।।
मग देवपूजा करुन। भोजन केले।।९६।।
सज्जनाचा आज्ञा घेउनि। मग हस्तिवरि बैसोनि।।
चालिलासे पवन। मिरवत पैं।।९७।।

हर्ष जाला अंजनिलागुन। बोले वसंतमाला लागुन।।
आजि मम ग्रहाकारण। स्वामि आले।।९८।।
ऐंसि धरुनि राहिलि आसा। चालिले स्वामि जाहले निरास।।
मग आलि पाहावयास। स्वदृष्टिने।।९९।।
अंजनिचा महलावरुन। तव चालिले पवन।।
अंजनि उभि ठाकिलि येवोन। पाहे पतिसि।।३००।।
पवने पाहिले न्याहाळुन। हे कोणाचे असेल कामिण।।
वोळखोनि अंजनालागुन। नाक मुरडिले।।१।।
अंजनि म्हणे पतिला। अजुनि कोप नाहि गेला।।
तुम्हि जाता असे मला। ठाकुनि पैं।।२।।
मीन न सोभे जलाविण। व्यर्थ गेले माझे जिन।।
संसारात आसोन। पतिविणे।।३।।
आजि यावे मम ग्रहासी। क्रपा करावे गुणरासी।।
नातरि प्राण देतो तुमचे पायापासी। स्वामिनाथा।।४।।
अंजनिचा बोल ऐंकोन। कोप चडला असे पवन।।
तुजेवरि उतरले मन। येणे नाही।।५।।
माझा अंन्याये सांगणे। मग मज दंड करणे।।
नातरि मज मारणे। जिवे देखा।।६।।
पवन बोले वाणी। तु मेलिया मज हाणि।।
लाभ नवा हे वाचुनि। पुन्हा न बोले।।७।।
मग तुठलिसी आशा। अंजनि जालिसि निराशा।।
मुर्छागत पडला धरणिस। अंजनि पैं।।८।।
पुढे चालिला पवन। मन निर्दया करुन।।
मनि डंष धरुन। क्रोध केला।।९।।

तव जहला अहकार[1]। वसंतमाला धाविलि सत्वर।।
नाना परि केला उपचार। उठविलि पैं।।१०।।
मग वसंतमालेन। अंजनि हाति धरुन।।
ग्रहाकारणे नेउन। सुश्रका[2] केलि।।११।।
मग इतुकियावरी। पवन गेली बाहेरी।।
दळ सरोवरातिरी। उतरले पैं।।१२।।
सरोवरा पाळि[3] सुंधर। सप्त खाणी दामोदर[4]।।
तेथे बैसला कुमर। पवन राजे।।१३।।
दिवस जाला अस्तमान। चमत्कार पाहे पवन।।
चकोर पक्षिने वियोग करुन। कळकळ करिति।।१४।।
चकोराचि चरित्र देखोन। दया आलिसे जाण।।
अंजनि अपराधेविण। म्या त्याजिलि।।१५।।
हे अज्ञान पक्षिकुळ। याचे येवडा कळकळ।।
द्वादश वर्षाचि तळमळ। अंजनि साहे।।१६।।
कष्टी जाहलि अंजनि बाळा। पवन जाहला उतावेळा।।
मि केधवा देखेन डोळा। स्वस्त्रियाते।।१७।।
पवने मित्रा बोलाविला। लवलाहे मित्र आला।।
पुसे राया पवनाला। काये आज्ञा।।१८।।
चौ प्रहराचा वियोग जाण। चक्रवाकाचा वियोग जाण।।
कलकलिति दुःखे करुन। महा थोर।।१९।।
बारा वर्षेअंजनिचे। म्या केला वनवास।।
तिचिया कळकळास। जोड नाही।।२०।।
मित्रा अंजनि ग्रहालागुन। चला जाउ दोघेजण।।
तरिचे मज समाधान। होइल पैं।।२१।।

१. हाहाकार.   २. शुश्रूषा, सेवा.   ३. किनाऱ्यावर.   ४. प्रासाद.

मित्र म्हणे पवनालागुनि। अंजनिसि आलो पुसोन।।
आता जातो परतोन। हसे होइल।।२२।।
पवन म्हणे मित्रासी। आजी भेठी नव्हे अंजनेसी।।
तरि माझीया प्राणासी। घात होइल।।२३।।
तव बोल मानिला मित्रान। मग बोलाविला प्रधान।।
यात्रेसि जातो मेरुगिरीलागुन। चवथे दिवसी येउ।।२४।।
तुम्हि राहावे समाधान। कठकाचि खबर घेणे।।
म्हणउनि दिधला मान। प्रधानासि।।२५।।
विमानि बैसले दोघेजण। अंजनि ग्रहालागुन।।
उभे ठाकिले येउन। गुप्तांगणी।।२६।।
अंजनि सुंदरी बाळा। अणिक सवे वसंतमाळा।।
गोष्टि करिति व्यल्हाळा[१]। परस्परे।।२७।।
तु पतिचि चिंता करिसी। अणी पती न विचारी तुसी।।
मोठा निष्ठुर मानसी। म्या देखिला।।२८।।
तुवा अनेक विनंति केलि। परि दया नाहि आलि।।
तुजि विनवि व्येर्थ गेली। सांडी मोह।।२९।।
वसंतमाला म्हणे अंजनी। तु चला माहेरा लागुनि।।
धर्मध्यान करि मनि। निश्चलते।।३०।।
बारा वर्ष संपूर्ण। ध्यान केले पतिचे जाण।।
ते निष्फळ गेले म्हणोन। त्याजि मोह।।३१।।
पतिचा मोह ठाकावा। आणिक देव गुरु पूजावा।।
जेणे उद्धार होये जिवा। तुझीया पैं।।३२।।
अंजनि म्हणे वो माये। भृतारासी बोल काये।।
मत्पापे दया नाहि। पति लागी।।३३।।

१. सुंदर.

माझा पाप जाईल। तेव्हा पतिस दया येइल।।
मन्मन स्थीर होइल। पतिदर्शने।।३४।।
बाइ तेव्हा मजकारणे। धर्मा ठेवल जाण।।
तेव्हा देव गुरु पूजन। करिन मी।।३५।।
ऐंसि तियेचि कोमल वचने। ऐंकिलि गुप्त पवने।।
मग द्रवले मन। पवनाचे पैं।।३६।।
पवन म्हणे मित्रालागुन। विव्हळ झाले मम मन।।
आता विलंब न करणे। भेठि कीजे।।३७।।
प्रहसित बोले वाणि। ऐंका बाइ अंजनी।।
पवन आला आंगणी। द्वार उघडी।।३८।।
अंजनि म्हणे वो देवा। हास्ये विनोद न कराव।।
मोडके काठि पाय न द्यावा। हा कवन धर्म।।३९।।
ऐंसे कैसे होइल। स्वामि मम मंदिरि येतिल।।
ऐंसे कंदि कार्येघडोन येइल। अभाग्यासी।।४०।।
प्रहसित म्हणे वो माये। तव वचन खरे होये।।
तरि पवन आला आहे। भेठावया।।४१।।
येथ आला नेम घेउन। कवाड उघडि लवकुन।।
घे पतिचा दर्षण। बाइये हो।।४२।।
तव केला जये जयेकार। वसंतमाला आलि बाहेर।।
देखोनि स्वभृतार। हर्षलि पैं।।४३।।
मग वसंतमालेन। हाति धरिला पवन।।
गेला ग्रहालागुन। अंजनिचा।।४४।।
बैसविला मंचकावरी। अंजना धाविला झडकरी।।
सिर ठेविला चरणावरी। पतिचा पै।।४५।।

हाति धरिला पवन। आलिंगला ह्दई धरोन।।
अनंद जाहला दोघे लागुन। परस्परे पै।।४६।।
अंजनिस म्हणे पवन। म्या तुझे संताविले जाण।।
क्षमा करावि मजलागुन। प्राणवल्लभे।।४७।।
तुम्हि क्रपा केलि अम्हासी। आजि आलेति आमुचे घरासी।।
अमुचे दुःख गेले दुरी। तव प्रसादे।।४८।।
मग पवन हर्षला। सुखे भोग भोगीता जाला।।
तिन दिवस राहिला। अनंदेसी।।४९।।
मित्र म्हणे पचनासी। मिलाप जाला अंजनेसी।।
पार नाही पुण्यासी। तुम्हा दोघाचा।।५०।।
आता येथुन बिज[1] करावे। आपुले कठकासी जावे।।
कार्येसिद्ध करावे। रावणाचा।।५१।।
पवन म्हणे अंजनासुंदरी। मी जाईन लंका नगरी।।
जिंतिन रावणाचे वैरी। मग येईन।।५२।।
मग अंजना बोले वाणी। स्वामि ऐंका चित देउनि।।
तुम्हि आलिति जि दिनि। चवथा दिवसा।।५३।।
जरि मज राहिले आधन[2]। तरि म्या काये करावे जाण।।
तुम्ही स्वजासी सगुण। जीवे जी।।५४।।
पवन म्हणे अंजनि। वियोग बारा वर्ष सुजाणि।।
जरि आजि जातो भेठोनि। तरि लाज मोठी।।५५।।
मि जाइन लंकेलागुण। वरुणाचि संधि करिन।।
नातरि बांधोनि आणिन। रावणापासी।।५६।।
वरुणासि मि जिंतिन। द्वये मासी ग्रहा येईन।।
वसंतमाले माहा प्रविण। साक्ष आहे।।५७।।

१. गमन, प्रयाण. २. (गर्भवती).

मम मुद्रिका घेउन। बहुत करि जतन।।
मायेबापासि दाख(वि)णे। सकलासि पैं।।५८।।
ऐंसे म्हणोनि पवन। चालिला मग तेथोन।।
सकळ दळ घेवोन। लंकेसी पावला।।५९।।
मग भेठला दशाननासी। देखोनि पवनभारेसी[१]।।
रावण तोषला मानसी। सुखि जाला।।६०।।
रावण पवन मिळोनि। आले मेघपुरालागोनि।।
ऐंकोन क्षोभला वरुण। भानु जैसा।।६१।।
कठक मिळाले आफार। दोहि दळी अंत ना पार।।
फौज बोलति सुभठ वीर। आपुलि प्रहुडी[२]।।६२।।
पवने उठाव केला थोर। वरुण हडपडिले थोर।।
बळ देखिले प्रचूर। पवनाचे पैं।।६३।।
सल्ला केलि पवनासि प्रचुरे। खरदुषण आणुन भेठविले।।
प्रीतिने रावणासी।।६४।।
पवन आणि रावण। खरदुषण आणि पवन।।
मेळा जाला चौघेचा। संधि केलि।।६५।।
मग लंकेसि आला रावण। सवे पवनासि घेउन।।
राहिलि बहुत दिन। प्रीतीने पै।।६६।।
पवनासी म्हणे रावण। तुम जे बंधुसमान।।
दीधला मानदान। पवनासी।।६७।।
पवन म्हणे गावा जाइन। केधवा अंजनि पाहिन।।
ऐसा उतावेळ मन। पवनाचे झाले।।६८।।
पवनाकारणे रावण। जाउ नेदि त्याकारण।।
पवन लाज धरोन। भिडे पडला।।६९।।

१. पवनाचे सैन्य.   २. प्रौढी, मोठेपणा.

हे कथा राहिलि जाण। पवनासि जाहले बहुत दिन।।
अंजनीसी वाडे अधान[1]। दिन दिन।।७०।।
हे वार्ता कळलि जनासी। जन प्रवर्तलि निंदेसी।।
अंजना म्हणे वसंतमालेसी। काये करावे।।७१।।
हे ऐंकिले सासुने। अंजनिस नेले बोलाउने।।
वनमालेसहित जाउन। उभि राहिलि।।७२।।
सासु म्हणे क्रोधे करोनी। तुझे त्यागिले मम पुत्राने।।
आणि कैसी जालासी गर्भिण। सांगा मजे।।७३।।
अंजना म्हणे सासुलागोनि। पवने मम गृहालागुनी।।
तिन दिन राहोनि। हा मान दिधला।।८४।।
तव ति कोपिला पापिण। माहा रौद्र ध्यानि होउन।।
कैसे कवित्व जोडोन। संपादिसी।।७५।।
अंजना म्हणे सासुसी। म्या नाहि भंगिले सीलासी।।
मि निर्मल अहे मानसी। सत्येमेवा।।७६।।
केतमति क्रोध चडली। बोले कर्कश बोली।।
अंजनासी बाहिर घातलि। दुताहाती।।७७।।
तीही रथ आणिलि सुंधर। चपलगति नामे सादर।।
अंजना वनमाला त्यावर। बैसविल्या।।७८।।
रथ चालवावे चपलगती। क्रोधे बोले केतामति।।
न्यावा येथोनि यिजेप्रती। वनामाझी।।७९।।
रथ चाले चपलगती। वायुवेगे आले वनाप्रती।।
अठवले दुःख अंजनाप्रती। अशृो[2] आले।।८०।।
अंजनि म्हणे वनमालेसी। कलंक चडविला मजसी।।
काये मुख दाखउ मायेबापासी। कलंकाचे।।८१।।

१. गर्भ. २. अश्रू.

विद्युतप्रभा बोले वाणी। क्षमा करावि मजलागोनि।
तुम्हि राहावे या वनि। मि जातो।।८२।।
मग रथ उभा करोन। दोघी उतरलि जाण।।
आपण गेला परतोन। स्वनगरासी।।८३।।
तव दिन जाहला अस्तमान। वनमालेने केले अंथरुण।।
निद्रा केलि अंजनिन। दुःखाचि पैं।।८४।।
मग दिन उगवल्यावरि। अंजनि उठलि झडकरोनि।।
सामायिक करोनि सुपरी। चालिले पैं।।८५।।
अंजनि आलि द्वारापासी। दरवाजकर[१] वोळखे तिसी।।
उभि केलि द्वारापासी। जाउ नेदि।।८६।।
मग वसंतमाला त्यालागुन। कथी साकल्या[२] वर्तमान।।
मग द्वारि रक्षण करुन। नफर गेला।।८७।।
सांगे महिंद्ररायासी। कंन्या आलि भेठावयासी।।
हर्षाने म्हणे तयासी। नगर शृंगारा।।८८।।
तव दुत बोले वाणी। ऐंक राया सिरोमणी।।
कळंकित आले अंजनी। वनमालेसी।।८९।।
मग राजा कोपला जाण। हे कंन्या आहे आभागिन।।
आपण कलंक लाउन। आलि येथे।।९०।।
सुमति प्रधान बोले वाणी। राया ऐंका चित्त देउनि।।
अंजनि सीलवंति सगुणी। विचारावे।।९१।।
वसंतमाला सवे शाहणी। ऐंसे न ये पाप घडोनी।।
केतामति दुराचारिणी। आळ घातलि।।९२।।
मग राया बोले वचन। दिव[३] माग कंन्यालागुन।।
कसवठी[४] लागल्या जाण। ठेवा ग्रहि।।९३।।

१. द्वारपाल. २. समग्र. ३. दिव्य, परीक्षा. ४. कसोटी.

महिंद्रराया कोपे करोन। सोडिले कंन्या लागुन।।
अपमान जाले म्हणोन। रडे मारी।।९४।।
मग गेल्या मातेचा घरि। माता उभि राहु नेदी द्वारी।।
राजीयाचे भये धरी। न बोलेचि।।९५।।
अंजना रडो लागलि। मग बंदुचे गृहि गेली।।
त्यासि म्हणो लागलि। मज रक्षी।।९६।।
ऐंसी फिरोनि क्षीण जाली। मग दासिसवे चालिलि।।
आठव्या[१] वना चालिलि। अंजनाचे।।९७।।
मग विस्तिर्ण वृक्ष देखोनि। तळि बैसल्या दोघिजणि।।
अंजनि नवकार मनि। ध्यात आसे।।९८।।
अंजना म्हणे वसंतमालेसी। त्वा सुखे जावे गृहासी।।
मि साधिन मरणासी। या वनि पै।।९९।।
वनमाला म्हणे होठी। गर्भ आहे तुझे पोठी।।
तुझे ठाकोनि संकठी। कैसि जाउ।।४००।।
ऐंसा दोघी चालता। मनामध्ये करि चिंता।।
तव पर्वत देखिला अवचिता। संन्मुख नामे।।१।।
गुंफा देखोनि पर्वतावरी। संतोषलि मनाभितरी।।
विश्रांति करु क्षणभरी। या ठायासी।।२।।
गुंफेत गेलि बाळा। मुनि पाहिल्या डोळा।।
निसैनिःसही पदकमळा। नमिले पैं।।३।।
दोघि बैसलि भाव धरोनि। मुनि बोले मधुर वाणी।।
श्रावकाचार उपदेसुनि। ऐंके भावे।।४।।
दोघे बोलति भावेसी। भवांतर सांगा अम्हासी।।
सुख होइल जिवासी। ऐंकोनिया।।५।।

---

१. अटवी, अरण्य.

मुनि बोले मधुर वाणी। भवांतर ऐंका श्रवणी।।
जेणे होय समाधानि। तुजे बाइ।।६।।
        या विजयार्ध पर्वतावरी। अरुणपुर नामे नगरी।।
        सुकंठ राजा राज्ये करी। पुण्ये फळे।।७।।
कनकोदरि राणि तयाचि। खाणि रूपसौभाग्याची।।
पुत्रोत्पत्ती तिची। सिंव्हरथ नामे।।८।।
        सुकंठाचि सहश्र कामिणी। त्यात कनकावति पट्टराणि।।
        तिचा वडिल पुत्र म्हणउनि। मदे गर्वि।।९।।
धर्म करिल लक्ष्मिमती। निंदा करि पापमती।।
पापे जोडे कनकावती। अधर्मेसी।।१०।।
        येक वेळे कनकावतिने। मोहोत्साव मांडिले प्रितीने।।
        मेळविले नारिजन। तांबुलासी।।११।।
तव शुचिस्मंत लक्ष्मीमती। जिनपूजा करोनि अष्ट रिती।
मौन्ये धरोनि जुगति। ध्यानि बैसलि।।१२।।
        तव कनकावतिचि दासी। तेथ आलि बोलावयासी।।
        चला वेगे ग्रहासी। कनकोदरीचा।।१३।।
लक्ष्मिमति ध्यानि लिन। म्हणउनि बोले जाण।।
दासि गेलि परतोन। सांगावया।।१४।।
        तव सवति ध्यान धरोनि। न बोले दंभे करोनि।।
        मज न बोले म्हणउनि। आले बाइ।।१५।।
कनकोदरी महाकोपसी। आलि सवतिचा गृहासी।।
पुढे उभे क्रोधेसी। कोपे थरथरा।।१६।।
        म्हणउन वडिल तुजहुण। आले तव ग्रहालागुन।।
        तुवा न आदर न करणे। हा कवन धर्म।।१७।।

कवन गुरु कवन धर्म। तु करिसी अभिमान।।
तुजे मानसी मोडिन। क्षणामाझी।।१८।।
लक्ष्मिचे संपले ध्यान। बोले कनकावति लागुन।।
देव गुरुसी निंदा करिसी जाण। पावसी दुःख।।१९।।
सवतिचे ऐंकोनि वचन। हडबडिलेसे जाण।।
कवणे हे पुजा म्हणोन। काये केले।।२०।।
सिंव्हासनासहित जाण। चोविसी[1] घेतलि उचलोन।।
टाकिलि बाहिर जाउन। उष्णामध्ये।।२१।।
तेथे कलहा झालि भारी। सिंव्हरथ आला ते अवेश्वरी।।
लक्ष्मिमतीने जरी। सर्व कथिले।।२२।।
पुत्रे न्याये न पाहिलि। मातेचा पक्षपात धरीली।।
पाप वरपड[2] जाला। पक्षपाते।।२३।।
मग तये अवेश्वरी। अर्जिका आलि तये अवेश्वरी।।
संजमश्री नामधारी। तये पैं।।२४।।
लक्ष्मिमति हर्षला भारी। तेव्हा उठला झडकरी।।
प्रासुकोदक[3] घेउनि करी। पडघाविलि[4]।।२५।।
तव लाजली कनकमाला। भावे उठिलि वेल्हाळा।।
बाइचा चरणकमळा। वंदना केली।।२६।।
पुढे बैसलि हस्त जोडोन। भावे ऐंकिले धर्मश्रवण।।
मग म्हणे बाइ लागुनि। क्रपा किजे।।२७।।
पारणे करावे माझे घरी। प्रासुक आहार घेणे जरी।।
पुण्ये जोडेल अम्हा भारी। बाइये वो।।२८।।
संजमश्री बोले उत्तर। तुमचे कोप आहे भर।।
बाहिर ठाकिल्या जिनवर। न करु भावरी।।२९।।

१. चोवीस तीर्थंकरांच्या मूर्ती असलेले यंत्र. २. दुःखी. ३. शुद्ध, निर्जंतुक जल. ४. स्वागत करणे.

पहिलि भवि त्वा पुण्ये केलि। ते या जन्मी फळले।
पावलिस मन यिछले। पुत्र पौत्रादिके।।३०।।
ऐंसा उपदेश केली। कनकावतिचा गर्व गेली।।
मिथ्याभाव गळाली। पावलि विवेक।।३१।।
बाइ म्हणे कनकमालेसी। तुवा आणावि चोविसी।।
पूजा करिजे भावेसी। त्रिकाल पैं।।३२।।
तव कनकोदरि उठीलि। येउनि लक्ष्मिमतिसि भेठली।।
क्षमा पाहिजे त्वा केली। मजवरि पैं।।३३।।
तव कनकोदरिन। चोविसि भितरी आणुन।।
पूजा केलि भाव धरोन। अष्ठ प्रकारी[1]।।३४।।
अहार घातला बाइसी। दोघि मिळोनि भावेसी।।
निरंतर केलि बाइसी। वंदना केलि।।३५।।
कनकोदरि बाइ लागुनी। तुम्हि मज उपदेशुनि।।
पुंण्यतम केली।।३६।।
बाइन उपदेश करोन। गेलि असे वनालागुन।।
जप तप करि ध्यान। काळ साधी।।३७।।
धर्म केलि महा थोर। पाप पळालि सर्वत्र।।
स्वर्गि लाधलि अवतार। कनकावती।।३८।।
पुर्व कर्मेसि पावलि दुःख। उरल्यासि पावसि सुख।।
धर्माचि पळ प्रतक्ष। ऐंसे अहे।।३९।।
त्वा वैर केला लक्ष्मिसी। ते कामासी आले तुजसी।।
सज्जने मांडवीलासी। वैर जालि।।४०।।
जिनवर पूजा मोडिलि। चोविसे बाहेर ठाकलि।।
त्या पापे रोजना केलि। बारा वर्षे।।४१।।

---

१. अष्ट द्रव्यांनी.

देव गुरु धर्माचि। निंदा केलि सर्वत्राचि।।
कलंक चडला त्या पापाचि। तुझे कारणे।।४२।।
सिंव्हरथ तुजा नंदन। त्याने पक्षपात केला जाण।।
दुःख भोगिले म्हणोन। तुझे सवे।।४३।।
आता कुवर होइल गुणवंत। महा प्रतापवंत।।
तो सिण[१] फेडिल त्वरित। तुझ्या पैं।।४४।।
अणि तुझा कांत येइल। अमुप सौख्य होइल।।
मध्यांतरि विघ्न होइल। जाइल तेही।।४५।।
मुनिवराचि निर्मल वाणि। ऐंकिला भाव धरोनि।।
मग संतोषलि मनि। अंजनाते।।४६।।
धर्मवृद्धि देउनि मुनि। तपाश्चरणे गेले वनि।।
अंजना वनमाला मिळोनि। राहिल्या पैं।।४७।।
तव दिन जाला अस्तमान। तेथे सिंव्ह जाला निर्माण।।
तो भयानक देखोन। भ्यालि मनि।।४८।।
वसंतमाला म्हणे अंजनि। मरण आली गे अम्हालागुनि।।
मग नवकार स्मरोनि। गुरु स्तविले।।४९।।
प्रारंभ केला रोदनासी। पवनंजये कोठा गेलासी।।
धावन धावासी। निष्ठुरा पैं।।५०।।
तव इतुकिया अवेश्वरी। काये नवलाव सुपरी।।
जाहला तोचि विविधापरी। श्रवण करावा।।५१।।
पर्वतावरि येक्षाचि स्थान। रत्नचुल नामाभिदान।।
त्वं द्वारेने सोक काये कोन। म्हणोनि करुणा आलि।।५२।।
मग ते म्हणे प्राणप्रिये। अभये दान द्यावे रात्रि समया।।
अवस्ये म्हणोनि काये। उग्र रुप धरिलि।।५३।।

१. शीण, थकवा, पीडा.

सिंव्हावरि धाविनलि। सिंव्ह धाके पळविला।।
मग परतोनि आश्रम आला। अनंद रुपे।।५४।।
अंजनि ध्यान विसर्जुनि। भये निवारिले हे पाहोनि।।
करिति नवकार चिंतनी। उभयेताहे।।५५।।
मग निसिचे अवसरी। अंजनि जाहलि निंद्रा सुपरी।।
वसंतमाला धरणिवरी। पहुडलि।।५६।।
तव येक्षणि म्हणे स्वामि। जिन गुणगान अम्हि।।
सुखि होतिल साधर्मि। श्राविका पैं।।५७।।
मग देवदेवि मिळोनी। गाति जिनेश्वराचि वाणि।।
अंजना ऐंकोनि श्रवणि। सुखि जालि।।५८।।
अंजनि बोले वाणि। बाइ वसंतमाला सुजाणि।।
म्या ऐंकिले जिनवाणि। देवदेवि मुखे।।५९।।
सिंव्हाचे भये फेडिले याने। हा जिनशासनि देव जाण।।
उपकार केला अम्हालागुन। येक्ष राजे।।६०।।
ऐंसा विनोद करिता जाण। तव उगवला दिनमान[१]।।
प्रभा भरलि संपूर्ण। दिशामाझी।।६१।।
मग इतुकिया उपरी। वसंतमाला काये करि।।
जावोनि नगरा भीतरी। सामुग्री आणिली।।६२।।
नित्ये करिति जिनस्मरण। ऐंसे लोठले बहुत दिन।।
नव मास जाहले संपूर्ण। पूजा करिता।।६३।।
चैत्र शुक्ल अष्टमिसी। श्रवण नक्षत्र ते दिसी।।
जन्म जहला पुत्रासी। पश्चम रात्री।।६४।।
प्रसुत जालियावरी। उद्योत पडला भारी।।
तया गुंफे भीतरी। काये सांगु।।६५।।

१. सूर्य.

**इति श्रीरामचरित्रे भट्टारक गुणकीर्तिविरचिते**

**हनुमंत जन्मकथन सप्तमोध्यायाः।।**

**प्रसंग सातवा।।७ समाप्त। मंगळ माहाशुभं भवतु।।**

**श्री आदिनाथार्पणमस्तु।।६।।६।।६।।६।।**

* * *

# अष्टम अध्याय

**।। श्रीमन्महावीर जिनाये नमः ।।**

प्रथम नमन श्री जिनासी। दुजे नमन शारदेसी।।
तीजे सद्गुरु चरणासी। भावपूर्वक।।१।।
गौतुम म्हणे श्रेणिका। मगद देशिचा नायेका।।
पुढिल कथा ऐंका। हनुमंताचि।।२।।
पुत्र देखोनि अंजनी। थोर संतोषला मनि।।
जये जयेकार करोनि। पुत्र घेतला।।३।।
पुत्र घेतला अंजनिन। मग हृदयि आलिंगिला जाण।।
काये बोलिला वचन। ते ऐंका वो।।४।।
मग बोलिलि वेल्हाळा। ऐंका बाइ वसंतमाला।।
मम पुत्र जन्म जाला। गुंफेभितरी।।५।।
येथे कोन्ही नाहि सज्जना। दोहि पक्षि जालि हिन।।
माझी पुत्रालागुन। कोन्ही नाही।।६।।
मजवरि रुसला देवो। येथे कोण करील मोहोत्सावो।।
कोण करिल दान पात्रा वो। याचकासी।।७।।
कैचे येथे वाद्यमेळ। आणि कोठुनि आणु मादल।।
कच्या सखिया जळ। धवल गाति।।८।।
मि तैल आणु कोठुन। आणि पाणि पाणिता उकै स्थान।।
कैसे न्हानउ नंदना। आपुला पैं।।९।।

तैल नाहि येथे दिपासी। रू[१] नाहि येथे वातिसी।।
पालखीविण पुत्रासी। हिंडोळु[२] कैसे।।१०।।
ऐंसे म्हणोनि रडे सुंदरी। देवा ऐंसे काये केले परी।।
घडि घडि ह्रदइ धरी। बाल सोभे।।११।।
वसंतमाला म्हणे भामिणि। जरी दुःख धरसील मनी।।
तुझे फेडिल अंजनि। पुत्रा तुझा।।१२।।
फुलाचा माथा फुलि भरेल। तव कांत तुझे भेठेल।।
तुझे धर्म साधन होइल। झणि न रडे।।१३।।
जैसा चंद्र बिजेपासोन। तैसा बाळ वृद्धि करि दिन दिन।।१४।।
दिसे नागसुता[३] समान। तेजःपुंज्ये।।१४।।
क्षणे हसे क्षणे रडे। माता पाहुनि पुत्राकडे।।
संतोषे पै।।१५।।
जो जो आळा[४] करि नंदन। तो तो माता तोष जाण।।
दिसे बत्तिस लक्षण। पुत्रा अंगी।।१६।।
रांगु लागले बाळ। महा करि कल्होळ।।
थोर दिसे चपळ। अंजनीचे सुत।।१७।।
अंजनि बाळ देखोनि। दुःख गेले विसरुनि।।
खेळे बाळकासवे लागुनि। संतोषाने।।१८।।
अमितगति तप करी। अणि गुंफे माझारी।।
केवळज्ञान सुपरी। जाहले तया।।१९।।
आसन कंपले इंद्राचे। शशिसहित देवाचे।।
येणे जाहले तयाचे। वंदनेसी।।२०।।
विद्याधर भूमिगोचर। समुदाये करोनि प्रचुर।।
आले पूजावया सुंदर। गुरुप्रती।।२१।।

१. कापूस. २. झोका देणे. ३. नागेंद्र. ४. लळा, लाड.

मग इतुकिया उपरी। मातुला[1] अंजनेचा जरी।।
पूजा करोनि अष्टप्रकारी। मुरडला[2] पै।।२२।।
        पर्वतावरी येउनि। विमान थांबविले जाण।।
        ऐंकिले बाळाचा रोदन। प्रतिसुरिजें।।२३।।
विमान हालते उतरुन। आणिले गुंफेजवळ जाण।।
दोघि सुंदर देखोन। विस्मयो करि।।२४।।
        बाळ देखोनि सौंद्धर[3]। मातुला अश्चर्येकरि थोर।।
        घेउनि कुठुंबा परिवार। गुंफेसि आला।।२५।।
अंजनि भयोभित होउन। विचारि आपुल्या मन।।
कि माझा सज्जन। किं वैरि नेणो।।२६।।
        लवतो माझा डोळा। आणि भुजे स्फुरे वेळोवेळा।।
        ऐंके वसंतमाळा। सज्जनि हो।।२७।।
तव वसंतमाळा उठली। पान बैसो घातलि।।
बैंसा म्हणोनि बोललि। तयाप्रति।।२८।।
        मग विद्याधर बैसोनि। पुसे तयेलागोनि।।
        तुम्हि कवण्यो कवणि। सांगा मजे।।२९।।
दोघा कार्याकारणे। येथे जालि येणे।।
वसंतमाला सांगे कथन। वर्त्तलि जे।।३०।।
        विद्याधर बोले वचन। हे माझि भाचि जाण।।
        अंजनिबाइ मज लागुन। भेठ देइ।।३१।।
तव तिने विश्वास धरुन। मग पाहिले परतोन।।
मातुलासि वोळखोन। भेठले पैं।।३२।।
        त्वा दुःखविलि पवनासी। कालिमा आलि मुखासी।।
        म्या वोळखिले नाहि तुजसी। बाइये वो।।३३।।

---

१. मामा.   २. परतणे.   ३. सुंदर.

मग गहिवरलि अंजनि। दुःख अठविले मनि।।
मग मामा वोळखोनि। गळा धरिला।।३४।।
मग मातुले अंजनिचे। मुख प्रक्षाळिले भाचिचे।।
बोलने जाले कुशलाचे। परस्परे पैं।।३५।।
मग मातुला बोले वचन। चला मम ग्रामालागुन।।
पुत्र मोहोत्साव करोन। तुझीया पैं।।३६।।
बोल मानिला भाचिन। विमान आणिला मामान।।
मग विमानि बैसोन। चालले पैं।।३७।।
रत्नजडित विमान। बैसलि पुत्र घेउन।।
मोतियाचे जुंबक[१] देउन। जोयावे[२] बाळा।।३८।।
बाळाने क्रिडा करीता। उसळला अवचिता।।
पडला विमानि खालता। जुवसासाठी।।३९।।
पडला विमानातुन। कितियेक वृक्ष मोडिलि जाण।।
पर्वता झाहले चूर्ण। बाळकाचेनी।।४०।।
मग लोठता गेला। येके सिळावर पडला।।
तेथे उतान खेळु लागला। बाळक्रिडा।।४१।।
तव तेथे अहाकार जाला। दुःख जाला अंजनिलागुन।।
पुत्र हातिचा गेला। म्हणोनि रडे।।४२।।
आहा देवा केला काये। आता माझी कैसी होये।।
मि वत्साविण निराधार गाये। काये करु।।४३।।
गेलि हरणी पाडस। आता पै तुठलि।।
मम आशा। देवराया।।४४।।
मि मोहो विसरले। सासुरा नाहि आठविले।।
मि सोकाग्निंत पडिले। पुत्राविण।।४५।।

१. गुच्छ. २. जोजावणे, झुलविणे.

मामा भेठला मजकारणे। सकल परिवार घेउन।।
मि संतोषलि स्वमन। ऐंका बाई।।४६।।
दुःख नवे जालि मजे। पुत्राचा जाहला वियोगे।।
आता मामा सांगा मजे। काये करु।।४७।।
अंजनि बोले वचन। गुरुसी जाइन शरण।।
भावे दिक्षा घेइन। साधिन काल।।४८।।
निमित्ये बोले वचन। पुत्रास मृत्य नाहि जाण।।
जन्मपत्रिका म्या वाचुन। पाहिलि पैं।।४९।।
जीवंत अहे तत्सुत। तो आहे महा पुण्येवंत।।
बलवान् होयिल अद्भुत। वज्रदेही।।५०।।
मुकुठबद्ध राजा होइल। वैरियाचे मान मोडेल।।
परोपकार करिल। पुत्र तुझा।।५१।।
चर्मदेहि गुण आगळा। मोक्षगामि निर्मळा।।
विज्ञानपणे सोज्वळा। होइल पैं।।५२।।
ऐंसे जाणोनि (नि)श्चये करि। दुःख न धरि संसारि।।
हा बाळ तुझे सुपरी। भेठेल तुझे।।५३।।
तव मामा हर्षला। मग मामिये अनंद जाला।।
मनि विस्मयो जहला। थोर देखा।।५४।।
तिन प्रदक्षण देउन। वरि भावना भाउन।।
नमन केले चरण। बाळाचे।।५५।।
बालक घेतला उचलोन। आणि ह्रदई आलिंगोन।।
हस्ति दिधला नेउन। अंजनिचे।।५६।।
बालक देखिले आपुले। मन अनंत सुख जाले।।
जैसे अग्निंत वीत आले। ग्रहासि पैं।।५७।।

कर्दळि स्तंभ जैसा कोमळ। तैसा बाळ माझा सकुमार।।
कठिण पाषाण होसिल। चूर्ण जालि।।५८।।
        मम पुत्रानि सिळीवर पडलि जाणोनि। द्रिष्टि लागलि काये म्हणोनि।।
        मिठ मिर्चे[1] बाळावरोनि। ठाकिले पैं।।५९।।
अंजनि मामा निर्मळ होउन। नाम ठेविले सुपुत्रालागुन।।
सिळकुमार म्हणोन। ते ठाई।।६०।।
        जये जयेकार करोन। मुखि नवकार स्मरोन।।
        मग चालिले तेथोन। स्वनगरांत।।६१।।
हनुरपट्टणासि येवोन। अर्जुलाचि भेठलि जाण।।
नेलि महोत्साव करोन। नगरासी पैं।।६२।।
        अंजनि राहिली समाधान। नित्ये करि देवपूजन।।
        बाळ देहे दिसे करुन। वाढे आजुलि।।६३।।
हे कथा राहिलि जाण। पुडिल कथेचि चित देणे।।
लंकेसी गेला पवन। ते परिसा पैं।।६४।।
        लंकेत राहिला रावण। बहु दिवस जाले जाण।।
        रावणाचा आज्ञा घेवोन। चालिलि गावा।।६५।।
मग अंजनिचे चिति धरोन। जाले उतावळे मन।।
नगरसमिप येउन। उतरले पैं।।६६।।
        वधावि[2] दिधला पाठउन। पवने पितियाकारण।।
        प्रल्हाद हर्षला जाण। ऐंकोनिया।।६७।।
अनंदभेरि देउन। सर्व नगर शृंगारुन।।
उभारिलि गुडिया तोरण। घरोघरी।।६८।।
        सर्व परिवार घेउन। समोर गेलासे जाण।।
        स्वपुत्राते भेठउन। आलिंगिला।।६९।।

१. दृष्ट काढणे.   २. निरोप.

पित्याचे धरीले चरण। पिता हर्षला जाण।।
पुत्रानंदे करोन। ग्रहा नेला।।७०।।
मंदिरा गेलियावरी। माता भेठली सुपरी।।
अनंद जालासे भारी। सर्वजन।।७१।।
राजे उठलि सभेतुन। अंजनिचे ग्रहालागुन।।
पवन गेलासे लवकोन। तव देखे ना ते।।७२।।
मग थोर दुखीत जालि जाण। खिंन् जालि अंतःकर्रण।।
पुसले सखियालागोन। अंजनि कोठे।।७३।।
आळ[1] चडविले केतामतिने। बाहेर घातलि नेउन।।
ऐंसे पवन ऐंकोन। व्याकुळ जाला।।७४।।
प्रहसिता मित्राकारणे। बोलाउन आणिले पवन।।
सांगे गुज तया लागुन। जिविचे पैं।।७५।।
मित्रे वाठे माझे मनासी। आता जावे महिंद्रपुरासी।।
भेठावे सासु साश्रयासी। चला वेगि।।७६।।
तेथे जाउ कठकेशी। वैभव दाउ तयासी।।
राहावे ते मनोलठासी। मित्रराया।।७७।।
मग सकल सैन्ये घेवोन। चालिलासे पवन।।
मनि करि चिंतन। अंजनिचे।।७८।।
पवन म्हणे मि जाइन। आणि अंजनिते पाहिन।।
स्वद्रीष्टीने न्याहाळिन। होइल तोष।।७९।।
वाठेसि जाता म्हणे पवन। तेथे दिसतसे जिनभुवन।।
आलि असेल म्हणोन। पाहो चला।।८०।।
मग पाहिले जिनभुवनि। तेथेहि न दिसे अंजनि।।
मग जिनवंदना करोनि। बाहेर आले।।८१।।

---

१. खोटा आरोप.

मग वार्तिकासि[1] पवन। धाडिले स्वसुरालागुन।।
जामाता आलि म्हणोन। हडबडला पैं।।८२।।
सकल सज्जन मेळउन। विचार करि अवघे जन।।
काये जाबा[2] द्यावे म्हणोन। राजा पुसे।।८३।।
अंजनिचि अपराध। तरि कदा येथे येता।।
अंजनि महा पतिवृता। दवडले[3] पैं।।८४।।
दुतासि धाडिले चहुदिसि। तुम्हि पाहा रे अंजनिसी।।
घेउनिया सिलवंतिसी। सत्वर पैं।।८५।।
चहुदिसि हिंडले दुत। अंजनि न दिसे वनांत।।
परतोनि आले त्वरित। रायापासि।।८६।।
आप निंदा केलि रायान। आणि सज्जन मेळउन।।
अम्हि अविचारपणे। मोकळिले[4]।।८७।।
निर्द्रोष लाविला दोष। अमुचे काळे जाहले मुख।।
ऐंकोनि होइल दुःख। पवनालागी।।८८।।
अवघे येक करावे। सकळि मौन्ये धरावे।।
अंजनिचे नाव न घ्यावे। कोंन्ही पैं।।८९।।
सकल शृंगारिले नगर। नृपा आदि करोनि परिवार।।
समोर गेले सत्वर। अमातासी।।९०।।
थोरादरे करुन। महिंद्र भेठले जाण।।
महाप्रीती करोन। जामातासी।।९१।।
क्षमालिंगन करोनि। आणिले ग्रहालागोनि।।
आदर करिति परि नयेनी। न दिसे नारी।।९२।।
येथे न टळे वेल्हाळ। मग थोर जाला विकळ।।
उलो[5] पाहे हृदयेकमळ। पवनाचे पैं।।९३।।

१. निरोप्या, दूत. २. जबाब, स्पष्टीकरण, उत्तर. ३-४. घालवून देणे. ५. तडा जाणे.

मग अंजनि बंधवाचि। रुपिणि कंन्या तयाचि।।
आमर्यादा रुपाचि। तिस पुसे।।९४।।
ऐंक रुपवंतिबाई। कोठे आहे तव फुई[1]।।
तिने सांगितले सोई। अंजनिचि।।९५।।
मम आज्जा पिता दोघेजन। आणिक सकळ मिळोन।।
न पाहिले विचारोन। अन्याये केला।।९६।।
थोर काकुलति आली। परि कोन्ही दया न केलि।।
निष्ठुर मनि दवडीलि। अंजनि।।९७।।
दुःखभरित अंजनि बाळा। अणि सवे वसंतमाळा।।
दोघि चाललि वेल्हाळा। वनाप्रती।।९८।।
ऐंकोनि कंन्याचे वाणि। मग पवन खडतरला मनि।।
धिग धिग संसार म्हणोनि। लाजिनला।।९९।।
मग तेथोनि चालिला। पवन वनाप्रति गेला।।
फिरता फिरता कष्टि जहला। कोठे न दिसे।।१००।।
आहा अंजनि कोठे गेली। कि वनि वाठ चुकलि।।
कि व्याघ्राने भक्षिले। नेणो देखा।।१।।
कि वाग भक्षला। कि मृत्ये जाला।।
किंवा संज्जम घेतला। गुरुपासी।।२।।
म्या त्याजिले अंजनेसी। बारा वर्ष जाली त्यासी।।
ते पाप लागला मजसी। पवन म्हणे।।३।।
म्या खबर नाहि देखिलि। काहि दया न केलि।।
मज काहि न बोलली। अपशब्द पैं।।४।।
जरि आता देखे न डोळा। तरि दाखविन वदनकमळा।।
कदापि नव्हे वेगळ। तिजपासोनि।।५।।

---

१. आत्या.

सिद्धक्षेत्राचे यात्रा करिन। मि संघपति होइन।।
अंजनि करिन संघविन। सत्ये जाण।।६।।
पूजिन जिनेश्वराचे पाये। सकल करिन काये।।
अंजनि भेठी व्हाचाये। गुरु वंदिन।।७।।
बोले मधुरिया वाणि। धर्मवंत कामिणी।।
सिलवंति सगुणी। कधि भेठेल।।८।।
म्हणे प्रहसित मित्रासी। कठक घेउनि जा गावासी।।
आणि सांगा मायेबापासी। पवन न येई।।९।।
जरि अंजनि भेठेल मला। तरि पुत्र भेठेल तुम्हाला।।
ऐंसा सांगा सकळा। मित्रवर्या।।१०।।
मग प्रहसित काये केले। सर्व दळ गावास नेले।।
जे जे वर्तमान जाले। ते सांगितले।।११।।
ऐंसा निरोप ऐकोन। प्रल्हाद दुःखवला मन।।
केतमति ऐंकोन। शोक करि।।१२।।
हे कथा येथे राहिलि जाण। अणिक जेथे होता पवन।।
ते काये जाले वर्त्तमान। परिसा पैं।।१३।।
मग पवन वनि हिंडता। येक देखिलि सरिता।।
उतरला जागा खालता। सत्वर पै।।१४।।
तेथे वृक्षातळि बैसोन। वैराग्ये धरिला मनि।।
बोलिला हस्तीलागोनि। पवन पैं।।१५।।
पवन म्हणे गजराया। तु सोडि मम माया।।
वनात जावे चरावया। निशंक मने।।१६।।
पवन म्हणे गजराया। तु सोडि मम माया।।
वनात जावे चरावया। निशंक मने।।१७।।

रायासि न सोडि मयंगळ[1]। कोन्हा येउ नेदि जवळ।।
चौकि देतसे[2] प्रबळ। भोवे भोवता।।१८।।
मन धृड ते करुन। पवन बैसले ध्यान।।
न विसरे अंतःकर्ण। अंजनिते।।१९।।
मग इतुकिया उपरी। प्रहसित गावास गेलीयावरी।।
प्रल्हाद पडला विचारी। पुत्रा लागी।।२०।।
केतामति करि रोदन। कदि भेठेल मम नंदन।।
म्या स्वहस्ते करुन। गृहा बुडविले।।२१।।
कुलवंति माझी सुन। अंजनिपति वृता जाण।।
म्या तिस आळ चडउन। ग्रहाबाहिर घातलि।।२२।।
मजे थोर येतो कळवळा। मि कंदि देखेन डोळा।।
सिलसंयुक्त वेल्हाळा। अंजनि पैं।।२३।।
म्या पापिणिने पाप केले। आपुले हस्ति ग्रह मोडिले।।
अंन्याय विण मि केले। अंजनिसी।।२४।।
प्रल्हाद म्हणे केतामतिसी। आता तु का रडसी।।
आदि विचार न पाहसी। मिथ्यात्विनि।।२५।।
अंजनिचा दुःखे करोन। पुत्र गेलासे जाण।।
कंदि भेठति दोघिजण। पुत्रवधु।।२६।।
मग प्रल्हाद बुधि केलि। सज्जनासि लिखित पाठविलि।।
सकल सेना मिळविली। सज्जनाचि।।२७।।
हनुरपुर पाठणासी। लिखित प्रतिसुरि जनासी।।
तो आला परिवारेसी। तात्काळेसी पैं।।२८।।
मग विमानि बैसोन। गेले पाहावया लागुन।।
चहुदिशि पाहती सज्जन। परि न दिसे।।२९।।

१. हत्ती.   २. फेऱ्या मारणे.

प्रतिसूर्येने काये केले। भयानक वन शोधिले।।
तव हस्तिने देखिले। पवनासी पैं।।३०।।
तव प्रतिसूर्येराजान। पुढे चालिलेसे जाण।।
हस्तिशुंडा दंड उचलुन। धाविला पैं।।३१।।
पुढे येउ नेदि कोणासी। रिघ[1] नव्हे पाहावयासी।।
प्रतिसूर्येराजे बुद्धि केलि कैसी। ते ऐंका।।३२।।
तेथे आणिलि हस्तिणी। हस्ति देखोनि भुलला जाण।।
हस्तिणीमाघे गेला जाण। विषईक पैं।।३३।।
पुढे आले सज्जन। तव देखिला पवन।।
बैसला ध्यान धरुन। मुनि जैसा।।३४।।
केतामति आलि धाउन। पुत्र आलिंगिला जाण।।
बाप रडे वोसंग[2] धरुन। तरि न बोले।।३५।।
पुत्र बोलिला सुललित वाणि। जेंव्हा देखेन अंजनी।।
तेव्हा मौन्ये सोडोनि। बोलणे पैं।।३६।।
ऐंसि चिठि दिधली लिहुन। अंजनि सवे घेउन।।
अधिक बोलु नका वचन। पुढता पुडती।।३७।।
कोठुनि आणावि अंजनि। निंदिति केतामति लागुनि।।
जोव्हडियाचे करणि। पापीणिचि।।३८।।
बाहिरि न राहे बाळा। महिंद्रा मोठा चांडाळा।।
उपगुव्हे[3] न करी कंन्याला। राखिले नाहि।।३९।।
मग म्हणति भानासी। तुम्हि बुधि सांगा अम्हासी।।
जेणे पुत्र अणि अम्हासी। सुख होये।।४०।।
तुम्हि चिंता न करा काही। तुमचा पुत्र आणि न पाहि।।
भेठविन अंजनिही। तुम्हाप्रती।।४१।।

१. प्रवेश. २. कुशीत. ३. जतन करणे.

हर्षलि बापमाये। भाचे धरिति पाये।।
तु उपकारि होये। सज्जना रे।।४२।।
दया आलि प्रतीसूर्यासी। मग गेला पवनापासी।।
सकल वृत्तांत ऐसी। निरोपिला।।४३।।
तुझी अंजनिसी लागुण। मम ग्रहे आहे जाण।।
भेठवितो तुज लागुन। चला बापा।।४४।।
तव हर्षला पवन। उतावेळ जाला मन।।
भेठावयालागुन। अंजनिसी।।४५।।
माये बाप अणि सज्जन। प्रतिभानुसवे जाण।।
हनुरपट्टणासि येउन। उतरले पैं।।४६।।
मग काये केले भानुराजान। अपण नगरात जाउन।।
म्हणे अंजनिलागुन। पवन आणिला।।४७।।
मग नगर शृंगारुन। सकल सैन्ये मेळउन।।
संघे जयेवाद्ये घेउन। निघाले पैं।।४८।।
थोर मोहोच्छाव करोन। नगरात आणिला पवन।।
मायेबापसहित जाण। ग्रहा नेला।।४९।।
अंजनि आलि धावोनि। सासुचे पाये लागलि जाण।।
सासुने प्रिति करून। आलिंगिली।।५०।।
धन्ये धन्ये तुझे सील। तु गंगा जैसि निर्मळ।।
तव ह्रदइ नाहि मळ। अनुमात्र बाई।।५१।।
मग द्वेष नाहि तुजसी। तुवा न केलि अम्हासी।।
पार नाहि तव गुणासी। क्षमा करि।।५२।।
अंजनि बोले मधुर वाणी। क्षमा संतोष मम मनी।।
जीवामात्र लागुनि। येक भावे।।५३।।

मज कर्म मजलागुनि। आळ दिधलि जाण।।
न सुठे भोगिल्याविण। कर्मभोग।।५४।।
        श्वासुर म्हणे अंजनि बाई। तव गुणासि पार नाहि।।
        उभये उद्धारिले पाहि। पुण्येवंती।।५५।।
पवन आणि अंजनिची। द्रष्टी भेटली साचि।।
इच्छा पूरलि मनाची। दर्शनमात्रे।।५६।।
        सिळकुमरा देखोन। थोर संतोषला पवन।।
        सफल झाले नैन। पुत्र दर्शणे।।५७।।
मग तेथे प्रल्हाद राजे। दोन पक्ष राहिलि वोज[1]।।
पाहुन चारु जाले सहज। प्रीतिने पै।।५८।।
        मग भानुची आज्ञा घेउन। गेले स्वस्थानालागुन।।
        पवन राहिलि जाण। अंजनिसहा।।५९।।
प्रतिदिनि वाडे कुमर। हणुरपाठण गुणधार।।
हणुमंत नाम सार। ठेविले असे।।६०।।
        महिमाने दिसे इंद्र। रूपे जैसा पूर्ण चंद्र।।
        धर्मिक जैसा खगेंद्र। तैसा दिसे।।६१।।
संम्यक्तवंत सांगु काये। नित्ये पूजिति जिनपाये।।
हर्षति बाप माये। देखोनि याचे।।६२।।
        वना जाउनिया कुंवर। विद्या साधिलि अफार।।
        वानरविद्या मनोहार। त्याहि साधिले।।६३।।
सज्जनासह धर्म करी। अणिक सुख भोगे नाना परी।।
हे कथा राहिलि येथवरी। पुढे ऐंका।।६४।।
        वरुण राजा दारुण। रावणाचा नाहि गुमान।।
        रावणाचा करिन रोवण। ऐंसा म्हणे।।६५।।

१. सुखपूर्वक.

हे ऐंकोनि रावण। थोर जाला कोपायेमान।।
हकारिले सकल सजन। जमात केलि।।६६।।
नगर नगरि दुत। पाठविले त्वरित।।
अगणित मिळाले राजसुत। लंकेत पैं।।६७।।
हनुरपाठण आला दुत। पत्र ठाकिला सभेत।।
प्रतिसूर्य राजे वाचिले मनात। सांगे पवना।।६८।।
मेळविले सर्व परिवार। हये रथ आणि गजवर।।
दळ मिळाले अफार। आणि विमान।।६९।।
लंकेशि चालिला राये। हनुमंत धरिला पाये।।
जरि याजवरि क्रपा होये। तरि जाईन मी।।७०।।
भानु म्हणे तु सकुमार। ऐंका माझी विचार।।
युद्ध होइल घोरांधर। रावण वरुणासी।।७१।।
त्वा जुझ नाहि देखिलि। तव मन नाहि धृढ जालि।।
म्हणउनि पाहिजे राहिलि। तुम्हि ग्रही।।७२।।
हनुमंत बोले सुजाण। मातुला ऐंका वचन।।
तैसा तम फेडिन बालभान। ऐंसा करिन मी।।७३।।
ऐंसा म्हणोनि धरिला पाये। घरा येउनि पुसे माये।।
जरि मला आज्ञा होये। लंकेशी जाईन।।७४।।
मग स्नान करुन। केलि देवपूजन।।
भोजनलाभ घेउन। आज्ञा घेतलि।।७५।।
सद्गुरु चरण वंदुन। जय जयेकार म्हणोन।।
मग विमानि बैसोन। चालिले पैं।।७६।।
जैसा पूर चालिला गंगेस। तैसा हनुमंत चालिला लंकेस।।
हनुमंत देखोनि रावणास। हर्ष जाला।।७७।।

सिंव्हासनि रावण। बैसला हनुमान।।
उठिला सिंव्हासनावरुन। अलिंगण दिधले।।७८।।

**ईति श्री रामचरित्र भट्टारक श्री भुवनकिर्ति विरचिते**
**तत्पदाचार्येगुणकिर्ती विरचिते हनुमंत भेठि वर्णनोनां**
**अष्टमोध्याया।।१७८।। प्रसंग आठवा संपूर्ण।।**

* * *

# नवम अध्याय

।। उँ नमो सिध्येभ्यो नमः।।

प्रथम नमन जिनदेवासी। दुजे नमन शारदेशी।।
तिजे नमन गुरुसी। भावपूर्वक।।१।।
गौतुम म्हणे श्रेणिका। मगद देशाचे नायेका।।
रावण वरुणाचे ऐंका। युद्ध कैसे।।२।।
मग उठिला रावण। अनंदभेरी देउन।।
हनुमंत संगे घेउन। बाहेर आले।।३।।
पालणिले[१] अश्व करी। चालिले मेघपुरावरी।।
येउनि उतरला बाहेरी। पातला वे।।४।।
नगर खळबळिले तेथे। व्याकुळ प्रजाचे चित्ते।।
मग ठेवाठेवि समर्थे। मांडिले देखा।।५।।
जैसा सुभूम चक्रवर्ति। आला परशरामाप्रति।।
तैसा रावण आला जुगति[२]। वरुणावरी।।६।।
तव बोंब[३] गेली वरुण। देवा आले रावणाचे शैन्ये।।
नगर वेढीले सुमन। आपुले देखा।।७।।
प्रबल रावण ईये वेळे। अस्माइन मिळे दळ।।
दशानन आला सबळ। अपणावरी।।८।।
मग ऐंकोनि तेणे वरुण। वारुवा[४] घातला पालण।।
करि धरिले क्रपाणे। भयानका देखा।।९।।

१. खोगीर घालून तयार करणे. २. युक्तिपूर्वक. ३. हाकाटी. ४. घोड्याला.

पाखरा[१] घातला मयंगळ। महारथ जुंपूनि पायदळ।।
पार नाहि प्रबळ पायदळ। अणि विमानाते।।१०।।
हळहळ करि जन। भयेचकित जाले मन।।
येक ते निर्भयेपण। अन सरले पैं।।११।।
पाताळ फणेंद्रकुमारने। संग्रामवीर विचक्षणे।।
यिये वेळे साभिमान। धरोनि आला।।१२।।
तेथे रावणाचे वांजांतरी[२]। वाजति संग्राम सुरी।।
तेथे मांडीले शस्त्रे। रावणा वरुणा।।१३।।
तेथे सत्रस्त मृगलोचन। स्वभावे चपल सुलोचन।।
त्यावरी व्याकुळ मन। भये कंपित।।१४।।
मग त्या सैवर धावति बाला। तेथे पार नसे कोल्हाळा।।
माता पुत्र जहले प्रबळा। तेणे देखा।।१५।।
रावण शोकाक्रांत जैसा। ज्यास भुजेचा भरवसा।।
पाहोनि लंकेची देशा। लोहित[३] नेत्रि।।१६।।
मग तेथे वीर अमित मिळाले। माहा पैजा बोलति भले।।
येक म्हणति आला रे आले। रावणाप्रति।।१७।।
वरुणपुत्र आले बळी। धाक पडला रावणा दळी।।
खळबळी सेना सकळी। निशाचरासी।।१८।।
मग दमामे वाजिला साचे। वर्षाव करिति खड्गाचा।।
प्रबल जाला माराचे। वरुणपुत्रे।।१९।।
संग्रामि दळ मिसळिले। येक म्हणति आले आले।।
आता पाहिजे पळाले। रावणातोनि।।२०।।
हाकित ठाकित पाचारित। छेदित भेदित विदारित।।
मारित वारित[४] सारित। येकमेकाते।।२१।।

१. अंबारी. २. वाजंत्री, वाद्यमेळ. ३. लालबुंद. ४. अडविणे.

राहे रे साहे रे सुभठा। मजे सन्मुख होये सुभठा।।
आता रण पाहु रणगाढा। कवतुक पाहु।।२२।।
अम्हापुढे खठपठा। सिर जिलेहा हडोडा।।
झणि पळसि लंकेसीया। वाढा मुरडोनि मागुति।।२३।।
येक पुरुषार्थ पाचारिति। येक पाउले पाउला सरति।।
येक शस्त्रे मारिति। सुभठाते।।२४।।
येक मारिति गजघंठा[1]। येक मारिति अश्वथाठा[2]।।
येक स्वार खेळति पाठा। आनंदेसी।।२५।।
महाबळी वरुणाचे पुत्रे। दळ मोडिले संग्राम सुत्रे।।
दुधड धडे महा क्षेत्रे। पाडिलि देखा।।२६।।
ततक्षणि भंगिले राक्षसा। तिहि भुलविले दाहि दिशा।।
घेउ पळति दाहि दिशा। तैसे पळति।।२७।।
माहा फौज स्या बंधवाची। वेढा पडिला कुमराचा।।
रावण कोंडिला राक्षसाचा। रावो देखा।।२८।।
सघन बाण संधान। राव वर्षेसाभिमान।।
जैसे मेघ संगित गगन। जिवनाधारी।।२९।।
मग पुढे नाहि कोन्ही। दशानन येकला रणी।।
परि जुंझता मनि। दणाणि ना।।३०।।
महा तिक्षण शस्त्रेचे घाये। शत सहस्र घालिति पा राये।।
रावण कळल न जाये। सुभठाचेनि।।३१।।
देखोनि धैर्य रावणाचे। म्हणति धन्ये जीवित्व याचे।।
गणिता नाही बळाचे। पराक्रमा।।३२।।
वरुणपुत्र अणि रावण। संग्राम लोहाचा खणाण।।
येक प्रहर घणाघण। पद घुमती।।३३।।

---

१. हत्तींचा कळप.   २. घोड्यांची गर्दी, जमाव.

इंद्रजीत अणि कुंभकर्ण। महा रणगंभीर विचक्षण।।
हे करुनि महिमान। राक्षसाचे।।३४।।
जाला उठावा प्रबळ। जैसा लोठला प्रळयेकाळ।।
तैसा उठला सबळ। वरुण रावो।।३५।।
मग तेणे बाण संधाने। धनुर्विद्याचे साभिमाने।।
मारिले राक्षस वरुणे। कोण जाणो किति।।३६।।
रुधिराचे पूर सुठले। महोसेना बंद तुठले।।
पाखर घाये फुठले। तेथे देखा।।३७।।
ऐसा जाणोनि अघात। वेगे उठिला हनुमंत।।
प्रवेशला शैनांत। वज्रदेही।।३८।।
शत्रुदळि प्रवेशलि। विकठ मारा करित जालि।।
कि महाप्रळये आला। तैसा भासे।।३९।।
कोठे सुठ न दिसे। रण भारि जाला कैसे।।
भुलले धाविति दश दिशे। वीर देखा।।४०।।
मारिता हनुमंताप्रति। येक ते आड कर धरिति।।
शस्त्र टाकुनि त्रृण दंती। धरिति[१] पैं।।४१।।
येक म्हणति हणुमंता। जिवदान देइ गा आता।।
आम्हा तारि समर्था। जिवित्वेसी।।४२।।
त्रासिले वरुणाचे नंदन। हनुमंते केला क्षिदक्षिण[२]।।
जैसे वसंती फळस वन। फुलले पैं।।४३।।
हनुमंताचि संग्रामक्रिडा। बहुत सुभठ जाहले पिडा।।
पडता पाइ दडदडा[३]। सेवठि पळती।।४४।।
त्या विरांत सुत प्रहुडा[४]। तो घालि पुत्साचे वेढा।।
वानरविद्याचा धुगाढा। गगन गर्जे।।४५।।

१. शरण येणे. २. जर्जर, बेजार. ३. धावताना येणारा पावलांचा आवाज, घपधप. ४. मोठा.

पाइ धरुनि गज गजा। अंदोळी महा गजा वोजा।।
राउते राउत सहजा। त्राहाडित[१] असे।।४६।।
मोडीत रथाचा शाठी[२]। त्यापुढे काये गजघंठी।।
मोडी तुरंग उठाउठी। वज्रदेही।।४८।।
जैसि जिनेश्वराचि वाणि। मिथ्या मताचे कड झणि।।
तैसि वानरविद्या प्रमाणि। अरिकुळ।।४९।।
ऐंसे हनुमंत वानर। जूंझता जैसि घन वानरवीर।।
कवन म्हणे यासि सार[३]। ऐंसा नसे।।५०।।
माजे शत पुत्र याने। क्षिदक्षिण केले बाण।।
ऐंसे म्हणोनि त्या विरे वरुणे। उठाव केला।।५१।।
वरुण उठीला कैसा। महागंगेचा पूर जैसा।।
कि संव्हार प्रळये तैसा। हनुमंतावरी।।५२।।
दुरोनि देखिली रावण। मग आरोळी दिधली त्यान।।
सेना थोपिले सुभठापण। लंकेश्वरे।।५४।।
जैसा सरितेचि पूर आडा। पर्वत महा पडे गाढा।।
तैसा दशानन प्रहुडा। आड राहे।।५५।।

**क्र. ५६ ते ६५ हे क्रमांक लिपिकर्त्याने सोडून दिले आहेत.**

मग म्हणे रे वरुणा। संन्मुख राहे मज रावणा।।
केउता निघालासी निधाना। सींव्ह पा बालकावरि।।६६।।
बोलबलाचा भांडण। उठता लाज नसे वरुण।।
आता राहे दशानन। संन्मूख पैं।।६७।।
तव कोपला वरुण बळी। रावणासवे मांडला कळी।।
मग त्या दोघा सम कळी। जूंझाचि देखा।।६८।।

---

१. उचलून आपटणे. २. दोन समांतर चाकांना जोडणारा दांडा (axle). ३. समानता.

गजे गजा रथ रथे। अश्व अश्वा भिडति तेथे।।
पाइका पाइका समर्थे। विमानी विमाना।।६९।।
छेतिस आयुधाचे प्रवर्ति। प्रति जुंझ होति जुगति।।
खर्गेखणाणे उडति। वढवानळे।।७०।।
तव शत पुत्र हनुमंता। महा संग्राम नित्ये देता।।
अठळे दळ महंता। वरुणाचे पैं।।७१।।
मग हनुमंत सुजाण। वानरविद्याचे प्रमाण।।
शत ही पवननंदन। बांधीता जाला।।७२।।
पुत्र बांधले ऐंकोनी। वरुण दुखवला मनी।।
तो रावण गेला धावोन। तठजावरी।।७३।।
केसी धरुन असडिला[1]। गज प्रथ्वीवरि पाडीला।।
कर्कठोनि बांधिला। मागिला मागे।।७४।।
आणिला स्वगजावरी। वाजिनली[2] जैत भेरी।।
तेथे महा निशानावरी। घाव दिधला।।७५।।
वरुण सांगडा सविता। शतपुत्र किर्णेमहंता।।
रावण सांगडा जयेवंता। राव देखा।।७६।।
जैसा राउ(हु) ग्रासे भानुते। तैसे केले वरुणाते।।
येणे रावणे महंते। रक्षपाल दिधला।।७७।।
राखा रे वरुणाते। येणे रावणे महंते।।
बंधन बांधा समर्थे। सुठला तरि बलीवंते। न अवरे पैं।।७८।।
तव शरपंजरा भीतरी। वरुण राखिला सुपरी।।
तव इतुकिया अवेश्वरी। कुंभकर्ण देखा।।७९।।
लुठिले अर्त(र्थ)भांडार सेने। अणि लुठिले सर्व निधाने।।
धन धान्ये गोधने। बहु साल देखा हो।।८०।।

१. हासडणे, आपटणे.  २.वाजली.

लुठिल्या रमा रमणी। बहु दुःख जाले लोकालागोनि।।
बाहा विवेका धरोनि। प्रवर्तलि पैं।।८१।।
तव विभिषण महावीर। मोडक्या सैन्ये केले संव्हार।।
परि पापपुंण्येचे विचार। नेणेचे पैं।।८२।।
मग त्या रावणाची सेना। युद्ध करिता जालि क्षीण।।
विश्राम हेतु राही कवना। भीतरि देखा।।८३।।
राहिले द्रुम द्रुमाप्रती। माहा सितल स्या(छा)येप्रती।।
क्षेत्रि राहिले विश्रांति। कारणे देखा।।८४।।
मग तेथे वरुणाचे सेना। धुरेविन[1] व्याकुळ जाणा।।
लोक पळोनि गेलि मरण। भेणे पैं।।८५।।
ते रिघाले नगराभीतरी। जीवाची काकुलति सुपरी।।
अकुळ व्याकुळ नारी। होति देखा।।८६।।
ते जीत कठक सेना। धाक पडिला होता रावणा।।
खरदुषण बंदिखाना। घातला होता।।८७।।
ते सुभठ झुरे वाचुन। सर्व सोडिले अभिमान।।
ते क्षेत्रि तृण दशनी। धरिति पैं।।८८।।
पाप पाहा कर्मगति। क्षणे जहले विपरित गति।।
कोण कोणाचे संपति। जालि देखा।।८९।।
उपार्जिता या अर्ति। थोर कष्ठ होति समर्था।।
हे लक्ष्मी वेळ न लगे जाता। कर्मगति।।९०।।
नगर लुठिले कुंभकर्ण। व्याकुळ जाहले जन।।
महाप्रबळ वैरि वरुण। त्याचेनि रागे।।९१।।
त्याने धरिल्या अंगना। त्या जैसा देवांगना।।
विलाप करिति दिनोदिना। करुणा स्वरे।।९२।।

१. आधार.

अर्थ रौद्र व्यापिले मन। जिवन सांडिति लोचन।।
तेथ बालके स्तनपान। करु विसरलि।।९३।।
अरडि दरडि करिता। भेठि आणिले लंकानाथा।।
स्वर्णरत्ने स्त्रीये समस्ता। पुढे ठेविली।।९४।।
तव द्रष्टी देखिले रावण। बालगोपाल कंपायेमान।।
रडताति आधोवदन। सर्वजन पै।।९५।।
देखोनि दशानना। दया उपजलि मना।।
मग म्हणे कुंभकर्णा। बंधुप्रती।।९६।।
आता रे बाला कुंभकर्ण। तुवा अनुचित केले सुजाण।।
ज्याचा धरिले अंगना। हे कठीण पैं।।९७।।
तुम्हि आणिल्या अंगना। बापुड्या प्रजा केल्या निर्धना।।
लुठि केलि परधना। हे अनुचित।।९८।।
निरापराधि बापुडी। वदने बोलति बोबडी।।
सुकल्या कंठी धरती तोंडी। दया कीजे पैं।।९९।।
या कामिणि वराकि आबला। भयाचकित व्याकुळ।।
अंर्तभूत आपुल्या। बलाकारणे।।१००।।
ऐंसे म्हणोनि रावण। प्रजा सोडिला क्रपाळपण।।
मग रावणासी असिर्वचन। स्त्रीया देती।।१।।
ज्याचे त्यासि दिधले धन। सुवर्ण अणिकाभरणे।।
धनकनवार। मागुति दिधले।।२।।
लोक सुखि केले रावण। स्वमंदिरा गेले सुमन।।
हर्ष जये वचन। उचारिति।।३।।
मग तेथे रावण। वरुणा नावया कारणे।।
मग तो दशानन म्हणे। दयाळ चित्ते।।४।।

अणि शरण मजपुढा। जो नर वडे वीरगाडा।।
जेणे केला महापावडा। रणामाजी।।५।।
        रक्षपाल वरुण राजे। शतपुत्रेसी आणिलि वोजा।।
        मग तो आधोमुखी वोजा। उभि ठेला।।६।।
रावण म्हणे गा सुभठा। वरुण राव नृपश्रेष्ठा।।
शोक न करावा हठा। चडोनि पैं।।७।।
        समरि जीत हारी आसे। उणे न धरावा मानसा।।
        या क्षेत्रि धर्मा आशा। चालत असे।।८।।
दोन चारि वेळे वरुणा। तुवा ख्याति केले मज रावणा।।
खरदुषणा। बंदि घातला पै।।९।।
        ते लाज न धरिलि अम्हि। तरि का आज लाजता तुम्हि।।
        आगा हे अपकिर्ति स्वामि। का करावी।।१०।।
हे सकल राज्ये वरुणा। पूर्ववत् पालि सगुणा।।
आगा निशंकपणे स्वजना। मधे वर्तेन।।११।।
        ऐंसि रावणाचे वचन। ऐंकोनि संतोषला मना।।
        मग ते राया वरुण। बोले पैं।।१२।।
कर जोडुनि म्हणे रावणा। तव भाग्ये थोर पंचानना।।
मजे जिंतावया सुमना। न भेसि तु।।१३।।
        थोर भाग्ये तु रावण। जे मजे जिंकिले अंगवना।।
        तुझी प्रतिज्ञा दशानना। पाळीली तुवा।।१४।।
तव मजे जिंकिले समर्थे। तु स्वामि लंकनाथा।।
तु अम्हासि समर्था। रक्षण करी।।१५।।
        मम अपराध गुणवंता। क्रूपा करि महंता।।
        मज सेवकासी।।१६।।

मि संग्रामी तुजकारणे। बोलिले दुर्मळ वचन।।
ते क्षमाजोजि स्वमने। वर्णवि पैं।।१७।।

तुजसी करावि समंधू[1]। विवाहकर्माचा बंधू।।
इ(उ)तराइ होइन विबुधू। सनकादिक।।१८।।

तूवा परणावि[2] मम दुहिता। सत्येवंति नामे पतिवृता।।
मग महोत्साव केला तत्वता। सैवराचा।।१९।।

महोत्साव करोनि समर्थे। विवाह केला विधियुक्ते।।
अंदण दिधला बहुते। दशाननासी।।२०।।

मग कितेक दिन सुखे। राक्षास राहिले कौतुके।।
मग तो दशानन। लंकेप्रति निघाला।।२१।।

यममर्दन[3] आणि वरुणा। प्रीति वाडलि सुमना।।
स्वसु राजा माता येकमना। वर्त्तति पै।।२२।।

**क्र. २५ ते ३३ हे क्रमांक लिपिकर्त्याने सोडून दिले आहेत.**

ते आला त्रिकुठ पर्वता। लंका प्रवेश केला महंता।।
मग तो रावण जयेवंता। जाला देखा।।३४।।

मग तया वरुणा। महा अनंद सन्माना।।
दिधलि नवहि निधान। सालंकृ(त) केलि शके।।३५।।

त्याचा देश त्यासी दिधला। वरुणा स्वनगरासी आला।।
रावण गुणे रंजला। थोर देखा।।३६।।

मग हनुमंताकारणे। थोरादर केला रावण।।
उपकार मानिला मन। पवनाचा पै।।३७।।

रावण थोर चिंता पडली। देवे मज कंन्या नाहि दिधली।।
चंद्रनखेसी कंन्या जाली। ते देइन आता।।३८।।

---

१. संबंध. २. विवाह करावा. ३. रावण.

ऐंसे म्हणोनि रावण। कंन्या दिधले त्या कारणे।।
विवाह जाला सुलग्ने। हनुमंताचे।।३९।।
अनंगकुसुम नाम असे। रूपामरांगणि जैसे।।
की चित्र लिहिली सुरसे। रूप देख।।४०।।
ते अनंगकुसुमा सुंधरी। सर्व गुणे मनोहारी।।
पूर्णचंद्र वदनि सुपरी। रूप जैसे।।४१।।
मग निल राजा ज्ञाता। तेणे कंन्या दिधले महंता।।
हरिमाला नामे देवता। जिंकिल्या रूपे।।४२।।
मग किंन्रपुर नामे नगरी। किंन्र राजा राज्य करी।।
चंद्रभागा सुंदरी। कंन्या त्याची।।४३।।
ते दिधला मारुतिकारणे। विवाह केला सुजाण।।
तेणे वेचिला निधान। महोत्सावे पैं।।४४।।
येणे हणुमंत सुंधरे। पर्णिला कंन्या मनोहार।।
सहस्र येक अंतःपुर। जालि देखा।।४५।।
चराचर राव खेचराते। सुग्रीव स्वामि वानराचे।।
राजा किस्किंद नगरीचे। महाबळी।।४६।।
तयाचि भार्या तारा। ते रति हराव[1] सुंदरा।।
तारामतीसम मनोहरा। अ(आ)नन जिचे।।४७।।
ते मन्मथा गजगामिनि। ते प्रथुविन[2] घनस्तनि[3]।।
संघस्त मृगलोचनि। ते सुंधररिवे।।४८।।
तये ताराचे दुहिता। पद्मराग स्वरुपता।।
महा सुलक्षणि कल्पलता। पद्मलोचनी।।४९।।
चितचोरठि रंजवि जना। हे मदनाचि कामिणा।।
की लावण्याचि सुमना। दिर्घकर पैं।।५०।।

१. हरविणारी. २. विशाल. ३. कठोर, घट्ट स्तन असलेली.

कोमलांगि कमलदळ। ते नवयोंवना प्रबळ।।
सर्व लक्षण सकळ। मंडित पैं।।५१।।
नित्ये निरंतर माता पिता। करिति वराचि चिंता।।
ते दोघे निद्रागत सीनता[१]। शरिर जाले।।५२।।
मग सुवाचे विद्याधर। वर पाहाया मनोहर।।
ते हिंडति पुर नगर। पट्टण देखा।।५३।।
पट लिहिले कुवराचे। ते आनेक विद्याधराचे।।
इंद्रजीत मेघनादाचे। विसेष पैं।।५४।।
ते पठ सुग्रीवाजवळी। विद्याधर आणिले सकळी।।
महास्वरूप सर्वकळी। कुशल देखा।।५५।।
दाविले रायाकारणे। तेणे पाहिले स्वलोचन।।
एकहि न माने मने। वर देखा।।५६।।
मग तेहि विद्याधरी। पठ लिहिला सुपरी।।
अनंगवत[२] विविधा परी। हनुमंताचे।।५७।।
पट्ट दावे पद्मरागे जगबळा। ते स्वरूप महा मंजुळा।।
ते देखोनिया महा सकुमाळा। अवस्ता जालि।।५८।।
तनु कामबाणे भेदिलि। मग सर्वांगे विकळ झाली।।
ऐंसे पाहोनि बोलिलि। सखि देखा।।५९।।
भो भो पद्मरागे विचक्षणे। महा नंदन देवि अंजनी।।
हा संपूर्णा बहुता गुण। मदन दुजा।।६०।।
आता या सवे पद्मरागे। सौख्ये सर्व कामभोगे।।
मनकल्पीत अनुरागे। पतिसवे।।६१।।
आता चिंता सोडी बापाचि। नवरि होये हनुमंताचि।।
ऐंसि वाणि सखियाची। ऐंकोनिया।।६२।।

१. शिणलेले, थकलेले.   २. मदनासमान.

मग ते पद्मरागा शृंगारे चालिली वोजा। वक्र द्रिष्टी पाहोनि वोजा।
मुखि मुरका[१] देउनि सहजा। आपुलिया।।६३।।
अधो पाहे सुंधरा। आडति वेधोनि सुंधरा।।
मनोभावेसी।।६४।।
तो पठ दुत घेवोनि गेला। हनुमंतापुढे उभा ठेला।।
मग तो पठ दाखविला। तयाप्रति।।६५।।
तो पट देखोनि हनुमंत। विस्मयो उपजला चित।।
मना उपजलि अवस्था। रूप देखोनि।।६६।।
कंन्या सुंधर आणि गोमठी। पाहता जगति न ये दिठी।।
मग तो मदने जगजेट्टी। चेतविला।।६७।।
उपनला दाहा अवस्था। मग ते जाला विकळता।।
हे येक व्येसन हनुमंता। पडले देखा।।६८।।
कामबाणे ताडिला। मग तो भवर मंचकि पडिला।।
त्यासि सर्वांगि उपनला। विरहज्वरे।।६९।।
संतोष न लाभे मना। या हनुमंता गुणनिधाना।।
अवस्ता भुलला जाण। हुंकार ठाकी।।७०।।
आलस्ये अंगी येति जांभया। मुर्छनि पडलि तया।।
मग म्हणे स्वरूपया। मुक्तानसी।।७१।।
हे माझे चित्तिचि चोरठी। कोणि आणिले पठी।।
जो मजे दाखविलि दृष्टी। तो मज सज्जना।।७२।।
मज न जव हे रमा। तव जिवित्व न ये कामा।।
येर ते विण अम्हा। जन्म सुन्ये।।७३।।
ऐंसे विचारोनि हनुमंता। सेना सज्ज केलि हनुमंता।।
मग निघाला समर्था। बडिवारेसी।।७४।।

१. नखरा, तोंड मुरडणे.

सुग्रीवाचिया नगरा। आले दल जेवी सागरा।।
ऐंसे चालिले सैरा। गगन मार्गे।।७५।।
येता ऐंकिलि हनुमंता। हा पवनपुत्र जयेवंता।।
सुगिृव म्हणे महंता। उत्साह करावा।।७६।।
उभारे गुडिया मकरे। ध्वजे तोरणे परिकरे।।
हाठ चौहाठ चौबारे शृंगारावे।।७७।।
मग तो सुग्रीव प्रबळ। सामोरा निघाला निर्मळा।।
व्यापिले गगनमंडळ। पार नाही।।७६।।
मग त्या सुग्रीव हनुमंता। भेठी जाहल्या महंता।।
प्रवेशेले तत्वता। नगरामाझी।।७९।।
मग तेणे सुग्रीव कुवर। स्वमंदिरा नेलि सुंधर।।
दिधला बहुमान कर। पवनपुत्र।।८०।।
नगरांगणा[१] करिति गोष्टी। धन्ये धन्ये कंन्ये गोमती।।
पाहे दोघ्या सरसे गाठी। पडिल्या देवा।।८१।।
राउळांगनाचे[२] सुंधरी। त्याचि दोनि मंदिरावरी।।
उघडोनि गवाक्ष द्वारी। पाहति देखा।।८२।।
येक म्हणति शैल्ये राजा। तो मारुति येता वोजा।।
तव तो सुग्रीवाचे देहजा। धावोनि आले।।८३।।
मग उघडिलि गवाक्ष। ते पाहतसे विचक्षे।।
श्रीशैल्ये देखोनि तोषे। मनामाझी।।८४।।
परस्परे म्हणति सुंधरी। धन्ये धन्ये हे राज्ये कुवरी।।
देखा वर जोडिले सुपरी। सुवृताने।।८५।।
मग तेणे सुग्रीव श्रीशैला। दिधली पद्मराग बाळा।।
विवाह रचिला प्रबळा। सुग्रीव राजे।।८६।।

१. नगरातील स्त्रिया.   २. राजमहालाच्या अंगणातील.

बरि नेसविलि पट्टकुळी[1]। ध्वजे पताका प्रबळे।।
मुक्तामाळा झळाळी। कनकस्तंभी।।८७।।
वैभव केले सुग्रीवाने। धन वेचिले मनोभावने।।
महोत्साव अनंदने। केला देखा।।८८।।
सुग्रीव संतोषे अणि स्वजन। बहुता दिधले दान मान।।
मनोरथ पूरले संपूर्ण। पद्मरागाचे।।८९।।
ते प्रेम जोडिले ऐंसे। कनकावरि रत्न जैसे।।
रतिस्वरूप काम तैसे। मिरवले देखा।।९०।।
मग त्या दोघा संजोग। उपनला अनुरागे।।
परमप्रितिचे कंद। केला तेथे।।९१।।
हनुमंत अणि पद्मरागे। झणि हा द्रष्टी देखोनि लागे।।
बोहरासी करा वेगे। निंब लोण।।९२।।
मग सुग्रीवे सुपरी। अंदण दिधले कुमरी।।
धनसंपद सुपरी। विविध देखा।।९३।।
वज नग अणि अलंकार। देश वास कोश परिकर।।
बहु प्रकारे भांडार। सुग्रीवे दिधली।।९४।।
बरवे परि केले सुग्रीवे। हनुमंत संतोषला भावे।।
आता स्वग्रामा तेजावे।। ऐंसे म्हणे।।९५।।
मग विनंति केली सुग्रीवा। आम्हा आज्ञा देणे देवा।।
अम्हि जाउ स्वगावा। तव पुण्ये।।९६।।
मग सुग्रिवे केलि सामग्री। बोलणिचे बहुत परी।।
सर्व रिधीसी कुमरी। पद्मराग ते।।९७।।
संभृमे बोलावण[2] केलि। माये बापे ग्राहा आली।।
मग ते संतोषली। कंन्या गुणे।।९८।।

१. रेशमी वस्त्रे. २. पाठवणी.

गुण घेति जामातासी। सफल जन्म जाले अमुचे।।
हेत जाहले कंन्याचे। संपूर्ण देखा।।९९।।
मग तो हनुमंत विर। लंकेसी आला मनोहार।।
सहस्र कांतासवे कुमर। रावणाजवळी।।१००।।
मग हनुमंताकारणे। बहुमान दिधला रावणे।।
हर्षांतर स्वमने। अंदण दिधले।।१।।
दिधलि कर्णकुंडल नगर। अणि हे सिनर जुन्नरे।।
भीउडिम मनोहरे। पवनेसी।।२।।
हनुमंत तेथोनि निघाला। चतुरंग शौन्यासी आला।।
महा संभृमे प्रवेशला। कर्णकुंडली।।३।।
नेणे अणिक रावराव साधिलि। वरि विषेष गुण लाधलि।।
खेचर भूचर जाले। भृत्ये पै।।४।।
वाडिनलि देशवास। पायदळाचे उल्हास।।
गज रथ सुवास। काये सांगु।।५।।
लक्ष्मी वाडिलि हनुमंता। किर्ति ऐंकोनि माता पिता।।
थोर संतोषलि चिता। मनामाझी।।६।।
ऐंकोनि किर्ति पुत्राची। रासी उपजलि तोषाचि।।
आशा पूरे मायेबापाचि। थोर देखा।।७।।
तो हनुमंत महाराजा। खरि वसुविलि वोजा।।
आपुलियात्मकाजा। धर्म करि।।८।।
मग तेणे हनुमंते। जिनमंदिर केले बहुते।।
ठाइ ठाइ धर्म महंते। स्थापिला पैं।।९।।
मग हणुमंत म्हणे। भेठो मायेबापाकारणे।।
सर्व सैन्येसि निघोन। चालिला पैं।।१०।।

ऐंसे विचारोनि हनुमंते। विमानि रचूनि महंते।।
परिवार सह जयेवंत। येणे केले।।११।।
वाजिनली निशानभेरी। बुरंगी कहला झालरी।।
विमान चालति अंबरी। नादे गगन गर्जे।।१२।।
सहश्र अंतःपुरासवे। हनुमंत येतसे भावे।।
मायेबापासि वंदावे। याहित।।१३।।
तव वधावा आला पुढा। हर्षेसांगावया गाढा।।
पवन गगना यव्हडा। संतोष जाला।।१४।।
तेणे प्रतिसुर्याने। हनुरपाठणा सुमन।।
शिंगारिले निधान। विस्मये करि।।१५।।
गुडिया मकर तोरण। ध्वजा पताका अणि चिदाने।।
पठकुळाचे अछेदने। मंडप भरिला।।१६।।
हाठ चौहाठ चौबारे। बिदि[1] झाडिल्या परिकर।।
रांगुळ भरिले सुंधरे। पंचरंगी।।१७।।
सामोर निघाले हनुमंत। पवन पिता भानु महंत।।
सह परिवारे संत। कारणे पैं।।१८।।
तव तो हनुमंत गगनी। नाना विविध विमानि।।
ध्वजा लहकति पवनि। झळाळेसी।।१९।।
बाप पुत्रा जाले भेठी। जैसि अंमृताचे वृष्टि।।
जये जयकार शृष्टी। केला देखा।।२०।।
विमानि वरोनि उतरले। येकेका सामोरे जाहाले।।
मग पितापुत्र भेठले। क्षेमरूपे।।२१।।
मग तेणे हनुमंत। मुकुठ उतरिले महंत।।
पिताचे चरणि त्वरित। नमन केले।।२२।।

१. वीथी, रस्ते.

सिर मुरळे[1] चरणापासी। पवने धरिला उरेसी।।
हर्षता जिवनि कैसी। अशृवे पडति।।२३।।
        मग मुखि देतसे चुंबन। पुत्र नेहाळिले लोचने।।
        मग म्हणे या नंदने। उद्धरिले।।२४।।
हनुमंत माते। तो येवोनि महानिर्मळ।।
लागला चरणकमळ। तयेवेळी।।२५।।
        मग धरिला ह्रदयेसी। अंजनि पाहतसे कैसी।।
        पाडसा हरणि जैसी। तद्वत पैं।।२६।।
असिर्वचन दिधला मायेबाप। चिरंजिव पुत्र येणेरूप।।
सेवा मनु बहुत भूप। होइल येशे।।२७।।
        मग तो हनुमंत निर्मळा। मायेबापासि भेठला।।
        जो प्रतिभानु प्रबला। परोपकारी।।२८।।
मग हनुमंत येकसरी। तोषला बहुता परी।।
तव पालख्या सहस्रावरी। आल्या तेथे।।२९।।
        पवनांजनि कारण। थोर विस्मयो जाला सुमन।।
        बहु जोडि धाडिला नंदने। दैवगति।।३०।।
अनि भेठीसी त्या बाळा। लागल्या चरणकमळा।।
प्रक्षाल करिति कमला। अंजनिसि।।३१।।
        मग ते अंजना सुंदरी। वोळखि जाहलि सुपरी।।
        या महारायाचे कुवरी। ऐंसी कळले।।३२।।
मग त्या सहस्र सुना। देखोनिया अंजना।।
थोर सुख जाले मना। मायेबापाचे।।३३।।
        देखोनि महा मनोहार। हा पुत्राचे परिवार।।
        मग त्याही[2] केला नमस्कार। मायेबापा।।३४।।

१. मुरडणे, वळणे, झुकणे.   २. त्यांनी.

अणिखे खेचर विद्याधर। अणि वारणिचे कुवर।।
रिधिसवे मनोहार। सेवक जाले।।३५।।
अणिक देश भांडार। उपार्जिलि येणे कुवर।।
यासि दैवासि पूरे। ऐंसा कोन्ही नसे।।३६।।
येक ते दिवसि वसत। हा कुवर जन्मला तेथे।।
बोळिभर[१] तेल नाहि तेथ। नाळ चौपडावया।।३७।।
येके दिवस मज गेले। जे दुःखाचे पडिभार जाले।।
माते या सासूने निंदिले। कवन्या रीती।।३८।।
मग म्या माहेरासि येणे। त्याहि मज ठाव न देणे।।
मग म्या वनवास देणे। तेहि जाले।।३९।।
परि पित्यावरि साजणी। सुख न देखिले बहिणी।।
हा पुत्र जन्मल्यावरी मनि। तोष जाला।।४०।।
आजि देखिले निधाने। आणि सुखाचे निधाने।।
हा तव प्रसाद सुमने। वसंतमाले।।४१।।
आगे तु सांगडी[२] सखि मजे। तरि हे देखे पुत्रराजे।।
आजि सरले माजि काजे। तव प्रसादे।।४२।।
मग ते वसंतमाला म्हणे। स्वामिणी हे काये बोलणे।।
अंम्हि तुमचि सेवा करणे। हाचि धर्म।।४३।।
ऐंसी दासी आणि अंजना। थोर विस्मयो जाली मना।।
जैसी निंद्राभरित स्वप्ने। अदृस्ये होये।।४४।।
ऐंस संभृम सुख सोहळे। पुत्र देखोनि निर्मळ।।
मग निवाले डोळे। मायेबापाचे।।४५।।
मग तेणे हनुमंते। पुरप्रवेश केला महंते।।
मग प्रतिभानु जयेवंत। दिधलि कंन्या।।४६।।

---

१. बोळा भिजेल एवढे.   २. सोबत.

महा मोहोत्साव करोन। जोतिष्ये वेळा वर्तुन।।
मग सुमहुर्त लग्न। लागले पैं।।४७।।
सुखे राज्य करि तेथे। दुःख लेशही जेथे।।
येश जोडीले समर्थ। सुभानु राये।।५०।।
सकल सुखाचे प्राप्ती। महा संपत्ती अणि संतती।।
अष्टांग भोगाचि प्राप्ती। जालि देखा।।५१।।
निर्विघ्न सुख पवनास। अंजना भोगी सुरस।।
त्या मनोरथाचे संतोष। उपजताति।।५२।।
हा प्रसंग राहिला येथे। जो देश साधिला लंकनाथ।।
त्रिखंडेश्वर जाला तेथे। स्वप्रतापे।।५३।।
भरताधिपति दशानन। श्रीशैल्यादिसवे भान।।
निष्कंठ राजा दुर्जन। कोनि नसे।।५४।।
महा सुख विलास। राज्ये करि सुभास।।
अनुपम भोग भोगितसे। रावण देखा।।५५।।
प्रजापालक गुणवंत। अध्वर्येगुण महंत।।
प्रतिदिनि जयेवंत। सुरतरु।।५६।।
देवांगणासि यिंद्र जैसा। अंतःपुरि रावण तैसा।।
अणिक वैभव लंकेशा। प्राप्त जाला पै।।५७।।
मंदोदरि आदि सुंधरी। नव यैवन सुपरी।।
मन ईछा भोग करी। पुरंधर जैसा।।५८।।
इत्यादि सुख महंता। सुख भोगी जयेवंता।।
तृप्त करी जयेवंता। प्रजा सारी।।५९।।
उगवले अस्त लेणे। सौख्येसागरी रावणे।।
करितसे महापुण्ये। विधिपूर्वक।।६०।।

सर्व अंतःपुरामाझारी। येक चडिल्या सुंधरी।।
राव दशाननाचा घरी। देवकंन्या पैं।।६१।।
अष्टदश सहश्र कामिणी। राजे रावणाचे भुवनी।।
मंदोदरि प्रधानी। पट्टराणि।।६२।।
त्या सर्व स्त्री समान लेखा। अणि रिधिचा नसे लेखा।।
राज्ये सुइंद्रासरिखा। रावण पैं।।६३।।
संकलप वेढाचे नायेका। ते जाले स्मशान सेवका।।
सांमृांज्ये पावला सुखा। दुःख नाहि।।६४।।
महातेज वीर्यवंत। अति प्रतापि महंत।।
परिवारेसी जयेवंत। दशानन।।६५।।
चक्र आदि धनुष्ये बाण। सर्व शास्त्राचे संधान।।
सकल कलेचे निधान। रावण जाला।।६६।।
तो अरिनृप मानमर्दन। प्रतापे जैसा भानु।।
प्रयाग तैसा अभिमान। काडिला जेणे।।६७।।
क्रमागत राक्षसाचे। वैभव अणि संततिचे।।
साचार मुनि लंकेचे। राज्ये पावला।।६८।।
चमत्कार विद्याधरा। ऐंसा जाला निशाचरा।।
मग तो धर्मप्रकारा। प्रवर्तला।।६९।।
मग तो रावण त्रिकाल। पूजि जिनेश्वर विशाळ।।
मन वच काया निर्मळ। करुनिया।।७०।।
निग्रंथ गुरुचि भक्ति। दया धर्माचि प्रवर्ती।।
रावण धृड भक्ती। जैन धर्माचि।।७१।।
तो त्रिखंडाधिश राजा। धर्म करि परत्र काजा।।
सुख नांदल्या लंके प्रजा। अति विसेषे।।७२।।

जो वीसवा मुनिसुवृत। तो देवादिदेव महंत।।
तो तिर्थंकर जयेवंत। स्वामि माझा।।७३।।
ते वेळे राक्षस वानर। ते धर्मभार दुरंधर।।
महाराये देखा।।७४।।
देश सांग लक्ष्मि निर्मळ। त्रिभुवनिचा राजे निर्मळ।।
जे काहि पाविजे प्रबळ। ते धर्मप्रबळ।।७५।।

**इति श्री रामायेण चरित्रे महापुराणे भट्टारक श्री भुवनकिर्ति देवानां तत्पट्टाचार्येगुणकिर्ती विरचिते रावणसांमृाज्ये सुजनोनां नवमोध्यायः।।**

* * *

# दशम अध्याय

।। श्री वीतरागाय नमः ।।

इतुका प्रसंग ऐंकोनि। मग श्रेणिक कर जोडुनि।।
करितसे विनवनी। गौतुमाप्रती।।१।।
देवा म्या सर्व वंषाचि भवा(व)ळी। ऐंकिलि महानिर्मळी।।
हरिवंष उत्पति बळी। सांगिजो देवा।।२।।
तव प्रसादे गणपति। असुर वानराचि उत्पति।।
सर्व भेदभाव भक्ती। ऐंकिलि म्या।।३।।
आता मम मनाचे अर्त। पूरवी माझी मनोरथ।।
हा हरिवंष माझी शृत। करावे देवा।।४।।
हरिवंषाचे ऐकावे वाणी। हे इछा असे माझे मनि।।
देवा तु केवळज्ञानी। संदेह फेडीजो।।५।।
या वंषी पुर्षोत्तम। अवतारले देवासम।।
वैराग्ये होउनि परिश्रम। कर्म खंडिले।।६।।
जे निर्वाणपद प्राप्त। अणि सकलगुण संयुक्त।।
बळी नारायेण संत। तिर्थंकर जाले।।७।।
विपरित बोलति पुराणि। लाविति सप्त व्येसनी।।
म्हणति याधव मध्येपानी। मस्त जाले।।८।।
देवा हा संदेह माझे मनि। आता फेडावा स्ववचनी।।
याची कथा तथा श्रवणी। घालि मजे।।९।।

प्रस्नावरी जगदीश्वर। क्रूपा केलि मनोहरे।।
सांगु तुजे उत्तर। म्हणतिले।।१०।।
मग म्हणे गौतमाप्रती। ऐंका हरिवंषाचि उत्पती।।
श्रोता सिरोमणी संन्मती। परियेसी पाहा।।११।।
सत्कथा परिसी श्रवणि। हे महा जैन पुराणी।।
शृत संतोष दाइनी। निर्दोष देखा।।१२।।
मोक्षे गेलिया सितलनाथा। कौंसंबि नगर महंता।।
सन्मुख राजा समर्था। राज्ये करि।।१३।।
तो पूर्व सुक्रत फळे। भोगि सुखाचे सोहळे।।
चतुरंग दळबळे। वलया पै।।१४।।
वीरसेठी त्या नगरी। नांदत विविधा परी।।
वनमाला त्याचे घरी। प्राणप्रिया।।१५।।
ते लावण्ये सौभाग्यनी। स्यामसुंधर लोचनि।।
देवकंन्या स्वमानी। सुंदर पैं।।१६।।
तव वसंत प्रवर्तला। सन्मुखे शृंगार केला।।
वसंतक्रिडे निघाला। परिवारेसी।।१७।।
राव पाहावयालागुन। स्त्रिया धावति सुमन।।
गवाक्ष उघडोनि लोचने। येक पाहति।।१८।।
तव ते वनमाला सुंधरी। देखिलि सोडशालंकारी।।
द्रिष्टि पडलि मनोहारी। रायाचिया।।१९।।
तव ते वनमाला कामिणी। दिसे महा हास्येवदनी।।
राव न्याहाळी कठाक्षबाणी। तयेकडे।।२०।।
तव ते रांजीला सुमना। वसंत खेळु गेला वना।।
खेळोनि आला सदना। आपुलिया।।२१।।

मग भवर मंचकावरी। राये अंग सोडिले जरी।।
उस्वास घालि शरिरी। कामज्वरे।।२२।।
आसनि शयेनि भोजनी। संतोष न पावे मनि।।
आवस्ताभूत कामिणि। कारणे पैं।।२३।।
वनमाला वसे कैसी। जैसि मुक्ति मानसी।।
चिंता पडली रायासी। वनमालेचि।।२४।।
दुश्चीत देखोनि राजा। प्रधान पुसे वोजा।।
देवा हे अंतर सहजा। का पडले।।२५।।
काये कारण दुश्चितपणे। राजा म्हणे प्रधानाने।।
हे वनमाला मम मने। चोरठि जालि।।२६।।
मनामाझी जालि व्याकुळ। तिचा साभिलास कुळ।।
या कारणे दुःखमूळ। पावलो देखा।।२७।।
ऐंकोनि रायाचे वचनि। माथा तुकिला[१] प्रधानि।।
कर्णि गुळेसुनि[२] दशनि[३]। रसना धरीली।।२८।।
मग प्रधान म्हणे देवा। हे अनुचित तुझीया जीवा।।
परस्त्रिचि कारणे सेवा। कु(बु)डे राज्ये।।२९।।
परस्त्रि वांछा ये पातका। पार नाहि सुरेखा।।
हे तो कर्मपापि मूर्खा। घडे देवा।।३०।।
पररमासंगे दुषण। बहु राव गेले येणे।।
नाश पावले जिवने। कुकर्मेसि।।३१।।
परि जे महापराक्रमि। तयाने जालि धर्मि।।
पचिजेचि पापकर्मि। रवरव पै।।३२।।
इहलोकि अपकिर्ति। अणियासि घडे अवगति।।
या लागि ऐंसी दुर्मति। न धरावी।।३३।।

१. झाकणे.

वृत्ति स्थीरा करावे आपुलि। परस्त्री म्हणे माउली।।
उत्तमे याचे साडली। पडो न द्यावी।।३४।।
ऐंकोनि प्रधानाचि वचन। मग संन्मुख राव म्हणे।।
काम हा ग्रासित मने। व्याकुळ देखा।।३५।।
आगा प्रधाना सिरोमणि। जव ते न लाभे कामिणि।।
तव हा जीव कामाग्नीदग्ध होये।।३६।।
मग प्रधान म्हणे नरेशा। चिंता न करि महेशा।।
मि पूरविन तव आशा। सत्ये जाणा।।३७।।
मग दुति म्हणे परियसा। वनमालि आणि नरेशा।।
पूरवावी लौकिकाशा। दुति तुवा।।३८।।
मग त्या दुति सत्वर। पावलि वनमालेचा घर।।
अस्तवेळे सुंधर। मालिणि रूपे।।३९।।
येउनि बैसले अंगणि। फळे घ्यावि म्हणहुनि।।
वनमाला सामोर येउनी। बैसले पैं।।४०।।
तो ते स्वासोस्वास घाली। मुखकमल कोमायिली[१]।।
ते आष्टांगे वोसविली। वनमाला पै।।४१।।
ऐंसे देखोनि सन्मति। दुति म्हणे वनमालाप्रती।।
हे काये दुश्चित चित्ति। कवण कार्ये।।४२।।
तू पूर्णचंद्रवदनि। जैसे रति साजे मदना।।
त्यावत् विरसेठी सदना। वससि तु।।४३।।
की भांडण जाले पतिसी। कि काये अवस्ता मानसी।।
कि कवने व्याधिसी। संयोग जाला।।४४।।
आता गुज सांगिजो मनाचे। मि चिंतिलि करीन तुमचे।।
हे काज तव अमुचे। परोपकारी।।४५।।

१. कोमेजणे, मलूल बनणे.

ऐंकोनि दुतिचे वचन। मग ते वनमाला म्हणे।।
तुज मनाचे गुज[१] सांगणे। ऐंसे केवि घडे।।४६।।
जे जे मनाची भावना। उपजे क्षणेक्षणा।।
शुभाशुभ सांगते कवणा। सुरिजनापुढे।।४७।।
गौप्पे गोष्टी का न करी। मनि गंभिरपण धरी।।
पुढीलाचे दुःख हे हारी। ऐंसि को।।४८।।
दुति म्हणे ऐंसि कैसी। अणि रायाचे मानसा।।
आमुचि आले मानसा। केवि घडे काजे।।४९।।
अम्हि थोर बाइका। सहजे गुण सखा।।
करावे स्त्री येक नीका। करु कोन्ही।।५०।।
आता सांगिजो आपुले गुजे। जे मनाचे साचे निजे।।
ते पूरविन सहजे। चिंतिले तुजे।।५१।।
मग ते बोले वनमाला। सीस सुरी तुझीया खोला।।
शडकर्णि निमला। नकारावे।।५२।।
तव दुति म्हणे मुग्धे। सांगने तरी सांग शुधे।।
कथा काये लावि मि विबुधे। मन करुनि।।५३।।

**क्रमांक ५३ दोनदा आला आहे. त्यानंतर प्रतिलिपिकाराने क्रमांक ५४ ते ६४ लिहावयाचे सोडून दिले आहेत.**

आगा बाइ तु आपुलि मनि। म्हणसि हे परद्वारिणी।।
मजे सुज्ञा म्हणसिल कामिणी। आणिक नाही।।६५।।
कि काये जांणे कर्माचे गति। सन्मुख राव बैसला चिति।।
तेणे मि जाले दुश्चिति। अवस्ताभूत।।६६।।
जधि सेजावरु भो(भे)ठला साचा। तो निर्धार जिवाचा।।
नातरि मरण साचे। भरवसा पैं।।६७।।

१. गुपित.

ऐंसे ऐकोनि दुतिका। गदगद हसिलि सुरेखा।।
वनमालेसी करतालिका[1]। देवोनि म्हणे।।६८।।
बाप दैवरेखा पारखी। दोघे मिळाले सारखी।।
आता अर्तभूत विवेकी। मेळवावी।।६९।।
दुति म्हणे गे वनमालि। परियसि पा कमले।।
तुजविण रायाचे डावे। पुडे पाहती।।७०।।
थोर वेधलि अर्ते[2]। मग तेणे पाठविले अमते।।
मि न्याहावया आले तुते। परिसि माये।।७१।।
आता चला मासरसी[3]। दुजि भावना धरि मानसी।।
अनुपम्ये सुख रायासी। तु भोगी पैं।।७२।।
अवो वनमाले तु दैवाचि। रासी सर्व सौभाग्याचि।।
संन्मुख नृप सांगडा[4] तुजसी। आस करी।।७३।।
तुवा सुवृत केलि होते। मग राये बोलाविला तुते।।
वेळ न लावी समर्थे। चला आता।।७४।।
मग वनमाला सुंदरी। प्रमोदे जाले निर्भर।।
मग ते निघाले कामातुर। दासि सवे।।७५।।
प्रसंन् रूपे अंधार वेळे। सत्व सांडिले वनमाले।।
मंदिर पावले निर्मळे। रायाचे पैं।।७६।।
मग राजमंदिरा भितरी। रायाजवळ नेलि सुंदरी।।
दोघा समद्रिष्टी सुपरी। जालि देखा।।७७।।
प्रेमामृत द्रिष्टि जाली। परस्परे ते निवाली।।
स्वद्रष्टी नेहाळीली। राजियाने।।७८।।
मग ते राये सुंदरी। करि धरोनि मनोहारी।।
कंपायेमान शरीरी। वेडोन घेतलि।।७९।।

१. टाळी. २. पीडा. ३. माझ्यासोबत. ४. सोबत.

भृमरमंचकी हंसतुळीका[१]। वरि सुमने सुरेखा।।
विस्तारिले विवेका। त्यावरि पैं।।८०।।
वरि बैसली वनमाला। तनंगी[२] अणि सकुमाळा।।
घन स्तन कठिण स्थळा। येव्वनाची।।८१।।
संयोग प्रहुड[३] योवनाचे। विनोद काम कौतुकाचे।।
तेथ उदये चंद्राचे। जाहला पैं।।८२।।
प्रकाश लाख किर्णे। निरभृ जाला चांदणे।।
करस्परशे कुमुद तेणे। विकाशली।।८३।।
संन्मुख अणि वनमाले। तैसे प्रेम निर्मळे।।
दोघात उपनला प्रबळे। तेथे देखा।।८४।।
मग ते दोघे समरसे। नवयेव्वन सुरसे।।
उभयेताचे मनरसे। येकवडली।।८५।।
मग त्या दोघाकारणे। मैथुनकर्म होते सुमने।।
रमति नाना येत्ने। उभयेता पैं।।८६।।
येकमेका न्याहाळीती। येव्वनि वन देखती।।
परस्परे चुंबन देती। अधरांमृते।।८७।।
धिजे[४] झोंबती कपोळी[५]। अधरामृताचे गरळी।।
वोढती सने प्रबळी। दोघेजणी।।८८।।
कामोन्मथ मातली[६]। रममान रमती येकली।।
येथावकाश प्रवर्तली। निशंकपणे।।८९।।
मध्ये मध्ये मधुर वचने। करति महा सुंधरपणे।।
सुललित वाचा मने। गोष्टी करति।।९०।।
वस्त्ररहित दोघेजण। सांगोपांग पाहती लोचन।।
परि त्रप्त नव्हे लोचन मन। उभयेताचि।।९१।।

१. हंसाचे पंख. २. तन्वंगी, कृशशरीरी. ३. प्रौढ. ४. धीटपणे. ५. गालाशी. ६. मत्त होणे.

तो प्रभात जालि। प्रभा भानुचि फाकलि।।
किंन्र गांधर्व बळी। सुस्वर गाति।।९२।।
तव इतुकिया अवेश्वरी। ते वनमाला सुंधरी।।
कर जोडोनि विनंति करी। रायाप्रती।।९३।।
अमुच्या जुहारु राजेश्वरा। अम्हावरि क्रपा करा।।
आता जाइन स्वमंदिरा। तव प्रसादे।।९४।।
तव सन्मुख राव म्हणे। हे कवन तुमचे बोलणे।।
आता अम्हा तुम्हा सख्यापणे। जन्मवरी।।९५।।
ते नृपवचने वनमाला। कामलुब्द राहिला बाळा।।
मनासि न ये कंठाळा। परद्वारी।।९६।।
हा प्रसंग येते राहिला। मग विरसेठी ग्रहा गेला।।
सुन्ये देखोनि जाला। उदास पैं।।९७।।
रात्र समये हे कामिणि। कोठे गेले सिरोमणी।।
आता कै देखेन नैनि। प्रिये माझी।।९८।।
द्वार ठाकोनि उघडे। भार्या गेलि कोनिकडे।।
मग तो पाहे चहुकडे। वीर सेठी।।९९।।
पुसो लागला घरोघरी। पुसले सेजारि पाजारी।।
कोठे गेलि माजि सुंदरी। वनमाला।।१००।।
मिळोनि सोयरी धायरी। शोध करिति बहुता परी।।
ठाइ न पडे सुंदरी। कोनिकडे।।१।।
भृतारे शुद्धि लाविला। रायाने स्त्रि नेला।।
मज वैरवृति मांडिला। संन्मुखाने।।२।।
मग मेळविले महाजन। करावया नृपदर्शण।।
सज्जनि वंदिला चरण। रायाचे।।३।।

केलि विनंति बहुता परी। परि राव चित्ति न धरी।।
भेठ तिन दिवसावरी। केलि कोके[१]।।४।।
मग तो विरसेठी येकांगे। आपुलि भार्यामागे।।
रायाप्रति म्हणे लागे। हे धन घेई।।५।।
परस्त्रि हे देवा। हासाभिलासे[२] न करावा।।
वैरबंध न धरावा। जिवालागी।।६।।
अम्हि प्रजा देवा। तू बाप अमुचा जिवा।।
हे कर्म महानुभावा। योग्य नसे।।७।।
आता कणव कीजे अंम्हा। महापुण्ये घडेल तुम्हा।।
या महा जैन धर्मा। भजा तुम्ही।।८।।
ऐसे उत्तरे मधुर। ऐंकोनि कोपला नरेश्वर।।
दशनि रगडोनि अधर[३]। बोलतसे।।९।।
आज्ञापिले दुताला। यासी बाहिर घाला।।
मग वनिक काडीला। नगराबाहेरी।।१०।।
मग तो अपमान। करि प्रथ्वि पालेठण[४]।।
प्रतिबोधिले मुनिजन। दिक्षा दिधलि।।११।।
मग तो सन्मुख नरेश्वर। अष्टांगे भोग पुरंधर।।
वनमालेसी मनोहार। भोग भोगी।।१२।।
दिवा नोक्त[५] कामक्रिडा करी। राजमद अहंकारी।।
कवनाकारणे सुपरी। न माने पैं।।१३।।
तव इतुकिया अवसरी। त्या सन्मुख राया मंदिरी।।
पुष्प फळे सुपरी। मुनि आले।।१४।।

१. चक्रवाक पक्षी. २. हास्याभिलाष. ३. दात-ओठ चावणे. ४. लोळण.
५. दिवा-नक्त, दिवस-रात्र.

चारण मुनि महा ज्ञानी। मासांत येक पारणी।।
शरिर आधार कारणे। म्हणोनि पैं।।१५।।
अंगनि देखिला मुनिवर। धाविला पुढे नृपवर।।
प्रदक्षण करोनि सुंदर। उभा ठाके।।१६।।
नव प्रकारे पुण्योपार्जन। मनि धरिला सत्व गुण।।
शुद्ध करोनि त्रिकर्ण। दान दिधले।।१७।।
निरंतर[1] जाले महामुनि। नमस्कार केला दोघाजनि।।
सिंहासन घातला अंगणी। बैसविली।।१८।।
प्रार्थुनि मुनि बैसविला। रायासि धर्म उपदेशिला।।
मग राव पुसता जाला। मुनिलागी।।१९।।
देवा पाप पुण्याचे निवाडा। ज्ञाने करि पसाधडा[2]।।
आता सांगिजे मजे पुढा। परद्वारे द्वेषे।।२०।।
परद्वार केलिया जिवा। कवन गति घडे या जिवा।।
कैसा त्यागिजो रवरवा[3]। सांगा पा।।२१।।
मग तो मुनिवर म्हणे। परिसि राया सुमने।।
छेदन भेदन त्राडणे। सुळावरी।।२२।।
विदारण अणि वैतरण। महामुहे रतिचूर्ण।।
कर्वति खंड खंड करण। माहा दुःख पैं।।२३।।
ऐंसा दुःखाचे कोडी। आयु सागराचे कोडी।।
तेथ दुःखाचे प्रहुडी[4]। लाभेना पैं।।२४।।
जे नर पापि परद्वारी। ते पचती[5] अघोरी[6]।।
चौर्यांसी लक्ष संसारी। भवति देखा।।२५।।

**लिपिकर्त्याने क्रमांक २८ ते ३७ लिहावयाचे सोडून दिले आहेत.**

१. निरंतराय, निराबाध. २. थोडे-बहुत. ३. रौरव, सर्वात खालचा नरक.
४. प्रौढी, अधिकता. ५. अत्यंत आसक्त होणे. ६. महाभयंकर.

जो पररमागमन[१] करी। संग लालसी परद्वारी।।
तो नरकि की संसारी। भृमण पावे।।३८।।
अग्नीवर्ण लोहाची नारी। रवेव देखति परनारी।।
तो नर घोराघोरी। पतन पावे।।३९।।
अस्त्रि ऐंसि लंपठपणे। अणि पतिसि अंतर देणे।।
अनुचित अंतर देणे। ते नर पापी।।४०।।
जे पतिवृत धर्म सांडी। परपुरुषा रंग मांडी[२]।।
ते पडे नरककुंडी। दुःख भोगी।।४१।।
जो महायोंवन माते। आणि परपुरुषाची रती।।
ते नरकाचिये गती। पडतील पैं।।४२।।
जो परपुरुषा अभिलासी। ते जन्मोजन्मि होये दुखी।।
कुयोनि भोगि सेकी। सीलहिन।।४३।।
मनुष्ये जन्मी आलिया जीवा। ऐंसा मार्ग करावा।।
संसाराचि उरेरी[३]। येहि त्याने।।४४।।
जरि करणे स्वहित। तरि न द्यावे कर्म चित्त।।
स्वप्न परि या निभृांत। होउ न द्यावे।।४५।।
ऐंसि मुनिचि वाणी। ऐंकिली त्या दोघेजणी।।
कंठाळ उपजला मनि। कुकर्माचे।।४६।।
मग ते दोघे दंपती। अनुतापे थोर कंपती।।
मग ते रोदन करिती। दीन वदने।।४७।।
चरण धरिले गुरुचे। म्हणे पाप फेडा अमुचे।।
आता शरण तुमचे। पाये आलो।।४८।।
परद्वारि आम्हि दोघे। थोर लिप्त जालो वेगे।।
पापे वेगळे करि संगे। आता स्वामी।।४९।।

१. परस्त्रीगमन. २. विलास करणे. ३. सीमा.

अम्हि पडलो पाप वलसा[१]। तुझा चरणाचा भरवसा।।
आता होये कुवासा[२]। अमुचा पैं।।५०।।
ऐंसे बोलोनि वचन। प्रायेश्चित घेतला दोघेजन।।
समाधान साचे मन। जाले पैं।।५१।।
दशविध धर्म ग्रहण। श्री जिनेश्वराचे वचन।।
ग्रहस्तपणाचे मार्ग जाण। आचारताती।।५२।।
विरक्ति संशृतिचा भाव। महा तप करिति हाव।।
करिति कर्माचा धुव। त्रीकर्णेसी।।५३।।
केलि महा दुर्धर तपे। वरि महा नवकार जपे।।
दुश्चित कर्म खंडिले नृपे। सन्मुख राये।।५४।।
मुनिसि दिधले अंन्नदान। ज्याचे त्रिभुवनी महिमान।।
तेणे जाले खंडण। अष्ट कर्माचे।।५५।।
गुरुगुण बोलति वाचा। सक(फ) ल जन्म केला अमुचा।।
सुकृत जोडिले साचा। अम्हा लागी।।५६।।
त्याहि तपे सोसिलि काया। तुठलि संसाराचि माया।।
आजवरी जन्म गेलिया। धर्मविण।।५७।।
ते दोघे महानिर्मळ। सिल पालिति सोहज्वळ।।
वृतविधान सकळ। पालिति पैं।।५८।।
चौषष्टी सहश्र वर्ष। महा तप केला सुरस।।
अतिचार रहित विवेक। साधिति पैं।।५९।।
तेणे तपे अंन्नदाने। उपार्जिले महापुंण्ये।।
मग ते दोघे एकमने। वर्तति पैं।।६०।।
थारा[३] तुठला सप्त धातुचे। पंजर उरला अस्तीचे[४]।।
दंत उन्मळीला समस्ताचे। अष्ट प्रकारी।।६१।।

१. बंधन, वेढा. २. आश्रय, आधार. ३. आधार. ४. अस्थी, हाडे.

मग त्या दोघा येक वेळ। उवारा जा(ला) प्रबळ।।
निर्बळ शरिर विकळ। भजिनलो।।६२।।
तव इतुकिया अवेश्वरी। वज्रपात जाला त्यावरी।।
अंन्नदान अणि नवकारी। सद्गति जालि।।६३।।
मग ते दोघे करिति तप। येके ठाइ करिति जप।।
नवकार मंत्र स्वरुप। निर्धारिले।।६४।।
विजयार्ध पर्वतावरी। दक्षणोतर श्रेणि सुपरी।।
अरि नामे तेथे असे।।६५।।
तेथे वनगिरी राजा। त्याचि मृगावति भाजा।।
तयेसि पुत्र जाला वोजा। सन्मुखाचे जिवे।।६६।।
उत्तर श्रेणि मेघपुरी। वायुवेग राजा राज्ये करी।।
रतिमाला तयेचे नारी। पट्टराणी।।६७।।
वनमाला तयेचे उदरी। कंन्या जालि सुपरी।।
मनोरमा नामे सुंदरी। लावण्ये खाणी।।६८।।
विविधापरि त्या दोघेजन। विवाह जाले सुमने।।
सुमुहुर्त जाला सुलग्ने। उभयेताचे।।६९।।
हरिविभृम मनोरमा। संयोग जाला सुकर्मा।।
पूर्वश्नेहे जैन धर्मा। सुख भोगिति।।७०।।
ते दोघे पुढत पुढती। महा दान पुण्ये करिति।।
सुक्रत फल भोगिती। अहर्णिसी।।७१।।
येक वेळे विमानि बैसोनि। दोघे निघाले गगनी।।
वनक्रिडार्थ सुपरी। सिद्धक्षेत्रे।।७२।।
तेथिल शोभे देखोनि। सदानंद होति मनी।।
पूजार्चन करोनि। बैसले पैं।।७३।।

तदनंतर पूर्व वणिका। जो सेठि होता विरक्ता।।
तप बळे स्वर्गलोका। पावला होता।।७४।।
तयाने अवधिज्ञानी। स्वप्न जाणितला मनि।।
सन्मुख रायाचे कारणी। सर्व कळली।।७५।।
जे अंतर दिधला वनमाले। ते दुख मनि अठवले।।
वैर साधिला कस्मळे[१]। संसारा वर्द्धन।।७६।।
ज्ञाने देखोनि स्ववैर। अणि त्या जवळी सुंधर।।
मग अपुलि मनि विचार करी। वैर भावे।।७७।।
येणे सन्मुखे कुद्रिष्टी। अणि वनमाले द्रुष्टी।।
माते केले कष्टी। या दोघी।।७८।।
तदि मि होतो निर्बळपणे। माते सां(गां)जिलि येणे।।
आता आपुलि उसणे। घेइन देखा।।७९।।
हा राजमदे मातला। प्रीया हारिली वनमाला।।
येणे खादलि माजे कळा। बहुतामध्ये।।८०।।
येणे राखिले मम सुंधरी। माते घातलि ग्रामबाहेरी।।
वनमाला रायाचे घरी। राहिलि पैं।।८१।।
हे तव द्रुष्ट दुराचारीणी। सीलहीन परद्वारिणी।।
माते सोडोनि पापिणि। परग्रहा गेली।।८२।।
आता या दोघाप्रती। पाठविन दुखाचे संपती।।
अंति घालिन अवगती। जिव याचे।।८३।।
ऐंसे म्हणोनि तो कोपला। विमानरूढ जाला।।
जेथे वैरी तेथे आला। क्षणामाजी।।८४।।
दोघे देखोनि निशंकपणे। कामकौतुक हालरपणे।।
मग तो संतुष्टपणे। क्रिडा करती।।८५।।

१. पापयुक्त.

मग हाकिलि तेणे अमर। भयाभित जालि सुंधर।।
षडफोडोनि मनोहर। उभि ठेली।।८६।।
मग वर्मवचन बाणे। खडतरले अंतकर्णे।।
त्या विद्या स्मरिलि तेणे। अमर पैं।।८७।।
म्हणे रे द्रुष्टा संन्मुखा। तु मज जाणसी मुर्खा।।
पुर्व भवि दुःखदायेका। जालिसी मजे।।८८।।
रे रे वनमालीके। परद्वारिणि पापात्मिके।।
माते सांडोनि अविवेके। परद्वार केला।।८९।।
मग ते धरोनि दोघाते। विमानि घालोनि समर्थे।।
निघाला व्योमपंथे[१]। अत्यादरे पैं।।९०।।
चिंतन करि रौद्र मानसे। यासी दुख देउ कैसे।।
चिमुठेवरी[२] वेचु मांसे। उभयेताचे।।९१।।
नातरि खर्ग घाव जैसे। निवठिन येणे मिसे।।
ना तरी बली देइन विषेष। आगाचि मी।।९२।।
मग तो चंपापुरीचे वनी। सिळि अपठावे दोन्ही।।
तव क्रपा उपजलि मनि। देवालागि।।९३।।
मग म्हणे धिग्ये जिन। जे वैरत्व वाढवणे।।
पूर्वि म्या शुध करणे। केलि होती।।९४।।
सुक्ष्म बाध(द)र जिवावरी। मम क्रपा होति भारी।।
तेणे पुण्ये सद्गती बरी। मी पावले।।९५।।
आता जरी हिंसा कीजे। तरि परत्राते पाप दिजे।।
मागुते वैर वाढवणे। निश्कारणे।।९६।।
जे प्राणियासी जैसा वर्तेभाव। तो तैसाचे फल पावे।।
तरी या कारणे जिवे। वैर न करु।।९७।।

१. आकाशमार्गाने.    २. चिमटे घेऊन.

ऐंसे म्हणोनि ते अमर। सुबुद्धि विचारिले सुंधर।।
साक्षमात्र मनोहार। केले दुःख।।९८।।
मग वनि त्याते सोडोनि। अपण गेला स्वार्ग भुवनी।।
येक वृक्षातळी बैसोनि। विचारती पै।।९९।।
निराधार अणि प्रदेशी। मन लाविले बीजे मंत्राची।।
मी आपुले मन निरासे। होउन ठेली।।१००।।
तव इतुकिया अवसरी। चंपावति नाव नगरी।।
धाडिवाहन राजा सुपरी। मरण पावला।।१।।
तो निपुत्री म्हणोनि प्रधानी। विचारिले आपुले मनि।।
राज्ये कारणि हस्तीणि। सज्ज केली।।२।।
मग हस्तिणिचे कुंभस्थळी। कलश ठेविला महा बळी।।
हे ज्याच्या सिरी ढाळी। तोचि राज्ये।।३।।
ऐंसे विचारोनि प्रधान। मस्तकि घातलि श्रवणी।।
मग ते चालिली हस्तिणी। उभये श्रेणि।।४।।
सांडोनिया राजकुवर। ते हस्तिणि सुंधर।।
त्या वनात मनोहार। जाउनिया।।५।।
त्या उभयेताचे मस्तकि। कलश ढाळिले सुरेखी।।
हरिविभृम विवेकी। देखोनिया।।६।।
महा अनंदे हस्तीणी। वरी आरुढ होउनि।।
हरिविभृमा सुमनी। कांतासवे।।७।।
मग दोघे कैसे दिसती। जैसे इंद्रासवेचि संगती।।
भेरि निशान गर्जेती। तेथे देखा।।८।।
अनंद जाला प्रधाना। परिवार अणि जना।।
गुडिया मकरे तोरणा। पार नाही।।९।।

मग केला नगरप्रवेश। चंपापुरी थापिला नरेश।।
भोगितसे अनेक देश। अरिविभृम।।१०।।
हरिपुरी नगरीचे रावे[१]। करुन वनक्रिडाचे भाव।।
विदेह क्षेत्र पाहाव। आला तेथे।।११।।
तेथुनि हारुनि आणिला। चंपापुरी राव वर्णिला।।
या कारणे हरिवंष जाला। चराचरी।।१२।।
मग ते अनुक्रमे वंषे। विस्तारला सुरस।।
त्या मागे नरेश। महा गिरी।।१३।।
महागिरी जाला प्रबळ। अरिराया दावानळ।।
त्याचे कुशी सबळ। हेमगिरी।।१४।।
ऐंसे जाले नृप कोडी। वंष चालत प्रवडी।।
सदा सुभ कर्माचि जोडि। सादिति पै।।१५।।
सकल भूपा मकुठमणि। कुसाग्र नगरिचा धणी।।
प्रजापालक जनी। भला देखा।।१६।।
पद्मावति प्रिया सुमना। पद्म पद्मलोचना।।
ते सर्व स्त्रीरत्न। चंद्रवदनी।।१७।।
मग चतुर्थ स्नानांती। सुमन सेजे घालोनि पति।।
मग ते दोघे दंपती। शयेन केली।।१८।।
सुख संभोगिता निशा। इंद्रियाचि पूरलि आशा।।
मग वीरामाली[२] मनसा[३]। इंद्रे कारणे।।१९।।
तव सुखनिद्रा आलि। पश्चम निशा जालि।।
सोडश स्वप्न देखीली। महा उत्तम।।२०।।
वाजंत्रे वाजिले प्रभाते। जागी जालि पद्मावती।।
ध्यान मौन्ये सारती। करोनिया।।२१।।

१. राजा.   २. शांत झाली.   ३. मनीषा, इच्छा.

मग स्वप्नाचे अठवण। पद्मा करित सुमन।।
मग त्या शरिर मांडण। करुनिया पैं।।२२।।
स्वप्न पुसावया कारणे। सभेसि आलि सुमने।।
तव पतिवृता लोचन। देखे राया।।२३।।
सामोरे येउनि ते वेळे। विस्मित वदन कमळे।।
पतिते न्याहाळुनि। डोळे हसिनली।।२४।।
मग ते म्हणे प्राणनाथा। सोडश स्वप्ने समर्था।।
म्या देखिले समर्था। प्रकाश किजे।।२५।।
विस्मयांकित पद्मा(व)ती। स्वप्न सांगे पतिप्रति।।
त्या अर्थाचा जुगती। परिसो लागे।।२६।।
राव म्हणे वो अवधिज्ञानि। तुज पुत्र होइल सुमनि।।
जे वंदनिक त्रिभुवनी। प्रीये देखा।।२७।।
सोडश स्वप्नाचे निर्मळ। अर्थ केले वेगळ।।
नृप संगे प्रबळ। राणि प्रति।।२८।।
स्वप्नार्थेऐंकोनि राणी। थोर संतोषलि मनि।।
स्वग्रहा आलि कामिणी। अनंदेसी।।२९।।
तव इंद्र धनंदाप्रती। निरोपिले महाभक्ती।।
अवठ[1] कोठी जुगती। प्रतिदिनि न्या।।३०।।
वर्षाव कीजे राजांगणी। शडमास होइजो सुमनी।।
पंचाश्चार्येगगनी। करावे पैं।।३१।।
मग त्या धनंदे हरिखे। पंचाश्चार्येकेला निके।।
तेणे नगर केले सुरेखे। सुवर्णाचे।।३२।।
केलि रत्नवृष्टि धारा। गर्भ शोधिले सुंधरा।।
गर्भोत्पत्ती सर्वेश्वरा। जालि देखा।।३३।।

---

१. साडेतीन.

इंद्र गर्भकल्याण केले। तेणे सर्व पाप गेले।।
इंद्र म्हणे निके जाले। क्रतज्ञ माझे।।३४।।
हकारिले छप्पन्न कुमारी। ज्या देवता मनोहारी।।
जननिचे सेवा करी। सदा काळ।।३५।।
त्यासी इंद्राज्ञा (जा)ली। तुम्ही सेवा करा भली।।
हे तिर्थंकराचे मावली[१]। म्हणोनि पैं।।३६।।
मग इंद्र गेला स्वर्गलोका। रत्नवर्षाव जाला नीका।।
छप्पन्न कूमारी सुश्रुका। करि पैं।।३७।।
पुरले नव मास तेथे। जन्मोत्सव केला समर्थे।।
चतुर्निकाये देव तेथे। मिळोनिया।।३८।।
या मेरुगिरीचा सिखरे। त्या पांडुक सिळेवरी।।
क्षिरसागरोदक सुपरी। अभिसेक केले पैं।।३९।।
मग तेणे जगधीशे। शृंगारुनि आणि महेश।।
बैसविलि पैं।।४०।।
पुत्र देउनि त्याचे हाती। पूजिले दोघे दंपती।।
अनंदे साठक[२] शचिपति। खेळला पै।।४१।।
मुनिसुवृत नाम ठेउनि। इंद्र नमस्कार करोनि।।
महापुण्ये उपार्जुनि। स्वर्गासी गेले।।४२।।
शामवर्ण सुवृत। जैसा भानुतेज जयेवंत।।
शरिर दिशे कांतिवंत। तेजमान।।४३।।
महा उत्कृष्ट भोग भोगिति। अशुभ कर्म ते जोगविती।।
ते वर्ति उदारा भाविती। राजयोगी।।४४।।
दहा तुंबरादि सुर। गंधर्व अणि किंन्नर।।
अपसरसवे मनोहार। सर्व देखा।।४५।।

१. माता. २. (सट्टक) नाटकाचा एक प्रकार.

विणा वेणु वाजतो। नाचति देवांगणा तो।।
श्रवण लोचनि पवित्रे। सुखदायेक।।४६।।
प्रतिदिनि देवाजवळ। सेवा करिति निर्मळ।।
महोत्सावे देवाजवळ। रंजविति।।४७।।
तव तुके अवसा। सप्त खाणा माडिवरि।।
मुनिसुवृतासवे सुंदरी। वेधल्या देखा।।४८।।
नवयोंवन संपन्न बाळा। पतिसवे काम कैतुक (जा)हाला।।
प्रवर्तति स्वलिला। दाखविती।।४९।।
उन्मळला गगनि जलधार[१]। पंचवर्ण अवदंबर[२]।।
देवे देखिले मनोहार। विविधा परी।।५०।।
देव पाहतसे सुमने। तव येणे माहा पवने।।
या जिवनाचे अधाने। विघटलि पैं।।५१।।
देखोनि सुवृतराव। चिंति मनि वैराग्ये भाव।।
मग म्हणे हो पाव। सर्व गुणि।।५२।।
जैसि क्षणांत सकळे। विघठले अभ्रपठले।।
धन यौंवन निर्मळे। तैसी जीवा।।५३।।
गगन गर्जि कल्याना। तैसा संग याचे जाणा।।
सुत शरीर योवन। संपालउ जैसा।।५४।।
तव लांछिक(लौकांतिक) देव आले। मुनिसुवृत नमस्कारिले।।
मग स्तुति करिते जाले। देवाप्रती।।५५।।
स्वयंबुद्धि तु महादेवा। अखंड घडो तव सेवा।।
तुज उपदेश द्यावा। हे केवी घेडी।।५६।।
देवा अम्हि जे केवडी। तुझी तव सेव रेपुडी।।
तुझे पुढे बोलु प्रहुडी[३]। हे व्यर्थ देवा।।५७।।

१. मेघ. २. छत. ३. प्रौढी, मोठेपणा.

तव आले इंद्रादि सुर। सिबिका[१] आणिलि मनोहार।।
होतसे दुंदुभि गजर। वाजिति पैं।।५८।।
इंद्रादि करिति विनंति। मुनिसुवृत देवाप्रती।।
सिबिकारूढ संन्मती। होइजो देवा।।५९।।
देव पालखी बैसवोन। इंद्राच्या करि धरोन।।
सुरासुर मानव मिळोन। उत्साव करिति।।६०।।
देव गेला विपुलाचळा। जयेनंदि वृक्ष कल्होळा।।
सुस्वर गगन मंडळा। उमठति पैं।।६१।।
बहुराये सहस्र आघा। पार नसे या विबुधा[२]।।
देवा संयेम सुधा। घेतला पैं।।६२।।
ऐंसा हरिवंष राजे। सिद्धसादक सहजे।।
परमार्थ आत्मकाजे। तात्पर्येदेखा।।६३।।
मुनिसुवृत तिर्थंकर। षष्ठोपवासी मनोहार।।
पारण्यानिमित्ये सुंधर। उतरले पैं।।६४।।
राजग्रह नाम नगरी। वृषदत्त रायाचे घरी।।
क्षिरांन्न पारणे सुपरी। जाले देखा।।६५।।
निरंतर जाले जगदिशे। पंचाश्चार्येजाले वर्षा।।
अंगनि होतसे नरेशा। जये जयेकार।।६६।।
मग देववना भीतरी। सुक्लध्यानि बैसलि सुपरी।।
रोधीले अशृंवांतरी। महादेव।।६७।।
तेणे वसंत उद्वस। उदास वसविले सुरस।।
तेणे का मत निरस। सांडिले पैं।।६८।।
शुक्लध्यानि परिपूर्ण। कर्माचे केले चूर्ण।।
लोकालोक प्रकाशन। ज्ञान जाले।।६९।।

१. पालखी. २. देव.

तेथे येउनि अमरादिक। समोशरण केले सुरेख।।
द्वादश सभेच निक[१]। बैसलि पैं।।७०।।
तेथ अनुहत ध्वनि नाद। मग प्रकाशलि चार वेद[२]।।
सकल शास्त्र निबद्ध। तेथे रचिले।।७१।।
धर्मोपदेश भविकजन। ऐंकोनिया श्रवणे।।
मग ते द्विधा कर्मण[३]। रत जाले।।७२।।
मानवि अमर खेचर[४]। देवचरण मनोहार।।
नमन करोनि सुर। स्थान गेला।।७३।।
धर्मतिर्थादिपति। मुनिसुवृत येती।।
देव नर मानव क्षिति। आधार पैं।।७४।।
मुनिसुवृत तिर्थंकराचे। चरित्र गाइले वाचे।।
अस्तंगताचे किल्मीषे। भस्म होती।।७५।।
जो पठे ऐंके। त्यासि फल होये निके।।
तो भोगि अनंत सौख्ये। मुक्ति रमा।।७६।।
या मागे बहुत जाले। महा राजेश्वर भले।।
मोक्ष पावले। अगणित पैं।।७७।।
अनुक्रमे जाले सुव्रत। त्याचा पुत्र दक्ष जयेवंत।।
राज्येभार महंत। दिधल्या त्या।।७८।।
दिक्षा ग्रहण केले सुव्रत। तप साधिले निरुत।।
दक्ष राजा करि महंत। मागे पैं।।७९।।
तयाचा पुत्र वर्धन। तेणे त्यासी राज देउन।।
अपण दिक्षा घेउन। तप साधी।।८८०।।

**प्रतिलिपिकाराने क्रमांक ८२ ते ९१ हे क्रमांक गाळले आहेत.**

---

१. युक्तिपूर्वक, उत्तम. २. प्रथम, चरण, करण, द्रव्य हे चार अनुयोग.
३. श्रमण व श्रावक क्रिया. ४. विद्याधर.

मग इळावर्धन सबळ। राजे केले।।
येथे राजे धर्मफळ। प्रवीण जाले।।९२।।
लोठल्या युगाचे परवडी[1]। नृप जाले कोडाकोडी।।
जोडोनि धर्म जोडी। पद पावले।।९३।।
मग त्या हरिवंषी भला। श्रीवर्धन उपनला।।
तोही सभोगुनि गेला। मुक्तिपदा।।९४।।
ऐंसे राज्ये करोनि सुंधर। गेले मुक्तिचा मंदिरी।।
धनलक्ष्मि भांडार। सिवपदाते।।९५।।
यावरि जाले वासवकेतु। मिथुळा नगरी जयेवंत।।
विपुळ वल्लभेचा कांत। महा बळी।।९६।।
त्याचा पुत्र जनक कनक। सवेची अणी विवेक।।
इंद्र प्रति इंद्र सुरेख। तैसे दोघे।।९७।।
विदेहि राणि जनका। राज पाळविति निका।।
आता अणिक कथा। श्रेणीक।।९८।।
इक्षांक वंसी कास्येप कुळ। जुगादि देव आले बळी।।
तेणे साधिले मुक्ती बाळी। तपे करोनि।।९९।।
मग त्या पासोनि। मनोहार। भरथ जाले चक्रधर।।
इक्षांकु कुळि श्रींगार। माहाबळी।।१००।।
संख्या तिर्थंकर चतुर्थ काळी। बहुत राये गेले बळी।।
निर्वाण पद सकळी। साधिले पैं।।१।।
सत्व येति अनुमनंति। अवमंन्ये येक महंति।।
आक्रोशवंती विल्पंति। पास्वंति पै।।२।।
ऐंसिया परि संसार संभृमे। नेणति धर्माधर्म वर्मे।।
या विषयाचे भृमे। भुलले पैं।।३।।

१. स्तर, प्रकार.

मी मी करिति वृद्धता। खाटकि सेर द्रुधरिता।।
तैंसा या माजी वार्तेनेति। माया गुणे।।४।।
ये विध हा काल जाणता। नानाविध चेष्टा करिता।।
सर्प सर्पिणि वार्तता। अनंत युगे।।५।।
विषत्ये वर्तमान काळ। चवथे जुगळ निर्मळ।।
भो भो गंथे निर्मळ। ऐसे देखा।।६।।
भो भो गंधेश जिव तारे। काळ गेला जुगांतरे।।
अवधि जाणोनि सुंधर। इंद्र आले।।७।।
तेथ जाले विनितापुरी। जेणे जिंकिले अखिळ वैरी।।
तो महा अतुर्बळी। स्वप्रतापे।।८।।
तो न्याये मार्ग्गि राज्य करी। हेमचुल नामे अंतोरी।।
सुइंद्र त्याचे घरी। पुत्र जाला।।९।।
शुभ लक्षण लक्षीत काया। सर्व गुणे देव तया।।
धर्माविण जिवित्व वाया। घडि न वचे।।१०।।
कीर्ति नामे पट्टराणि। रूप सौभाग्याचे खाणि।।
ते प्रथविन घनस्तनि। चंद्रवदनि।।११।।

**प्रतिलिपिकर्त्याने क्रमांक १२ ते २१ गाळले आहेत.**

त्या उभयेताकारणे। दोन पुत्र जाले सगुणे।।
वज्रबाहो पुरंदर पुण्ये। आगळा पैं।।२२।।
सार्थक नाम त्या सुताचे। रूप जैसा चंद्राचे।।
भरती जाले योवनाचे। तदांगि पैं।।२३।।
ते क्रिडा कौतुक। कुमर खेळति तळी।।
सुखदुःखातीत बळी। भोगिति पैं।।२४।।

आपुलेनि रूपे मन्मथा[1]। लाज आणिलि समर्था।।
धर्म आणि विवेकता। साद्यंत पैं।।२५।।
यानंतरे नाग नगरी। हस्तिवान रायाचे घरी।।
चूडामणि नाम अंतोरी[2]। पट्टमहिषा।।२६।।
मानसौंदर्य कंन्या त्याचि। अमर्यादा स्वरूपाचि।।
नारि जालि वज्रबाहुचि। पूर्वसमंधे।।२७।।
पुना वज्रबाहु राजा। निघाला स्वनगरा वोजा।।
सवे घेउनिया वोजा। रूपवंती।।२८।।
रथि बैसोनि तिघे जेण। मार्गेक्रमति सुमने।।
महा विकसित लोचन। पाहति दिशा।।२९।।
सर्व स्त्रिगुण बाले। ते विख्यात वसुधातळे।।
स्वसुरिया जातकमले। प्रमोदेशी।।३०।।
ते मनि चिंति मनोरथ। माझे दैव समर्थे।।
सुखाचे सर्व अर्थ। प्राप्त जाले।।३१।।
ऐंसे मनोरमा मानसी। धरोनि जात अनंदेसी।।
त्या तिघे शोभे कैसी। दिसतसे पै।।३२।।
मार्गि जेतुली वनोपवनी। अवलोकिति सुलोचने।।
मयोर किंकार श्रवणे। ऐंकति पैं।।३३।।
तेथे वसंत रुतुचे आला। अनंद वज्रबाहु कुमरा।।
गोष्टी करिति मनोहारा। येकमेका।।३४।।
तव देखिला वसंतगीरि। मंडितांग सुपरि।।
मनश्रि मनिता सुंदरी। विराजमान।।३५।।
जव जव देखे वन। तो तो अनंदे मन।।
विस्फुरित लोचन। वजृबाहुचे।।३६।।

१. कामदेव. २. स्त्री, पत्नी.

महा शोभा ये पर्वता। लक्ष्मि पाहावया समर्था।।
त्रप्ती नाहि या लोचना। तयासी।।३७।।
मंद मंद मारुत झळके। कुसुम स्पर्शन महके।।
फल पुष्पे लहके। शाखोपशाखा।।३८।।
वज्रबाहो पाहे वनि। तव देखिला महामुनि।।
निर्मल सिलेवरि ध्यानि। बैसलासे।।३९।।
ऐंसा देखोनि मुनि। वैराग्ये उपजले मनि।।
मग मुनिपासि जाउनि। दिक्षा मागे।।४०।।
ऐंसे पाहोनि कांतारीं[१]। उडि ठाकोनिया नारी।।
विनवित विविधा परी। नका मजे सोडु।।४१।।
मग अनेक परि संबोधोनि। उभयेता जाला मुनि।।
ऐंसा अनेक नृपतिसुत घेउनि। तप साधिति।।४२।।
ऐंसे ऐकोनि सुतवार्ता। विजयेराव संकल्प अतौता।।
होउनि सर्व सौख्ये परता। घेतलि दिक्षा।।४३।।
मागे पुरंधर राजा राज्ये करि। प्रथ्विमति सवे अंतुरी।।
पुत्र जाले त्याचे वरी। किर्तिधरु।।४४।।
तेणे पुत्रासि राज देउनि। आपण केले दिक्षा ग्रहण।।
येके दिवसि किर्तिधर सुजाण। विरक्त झाला।।४५।।
तव म्हणति प्रधान। पोठि नाहि पुत्र संतान।।
अजुनि न गेले यौंव्वन। विरक्त का।।४६।।
आर्या सुर्येवंषाचि राहठी। पुत्र जालेया सेवठी।।
दिक्षा घेणे सेवठी। तुम्हि राया।।४७।।
मग अवस्ये म्हणे किर्तिधर। पाहे राज्येचि विचार।।
कदि होईल कुवर। इछा करि।।४८।।

१. वनामध्ये.

तव पूर्वि पुण्याचे अवेश्वरी। गर्भ राहिला सुपरी।।
जन्मला परि गुप्त करी। दिक्षा भया।।४९।।
तव येक वेळे नरेश्वर। महलासि आला सुंधर।।
मंचकि बैसला सुंधर। तो रोदन ऐंकिली।।५०।।
मग उठोनि स्थानका। राव गेलेसि निका।।
पुत्र पाहोनि कौतुका। करितसे पैं।।५१।।
मग वैराग्ये चिंतिविले। पुत्रासि राजि स्थापिले।।
स्वकार्या तो साधिले। घेउनि दिक्षा।।५२।।

**इति श्री रामचरित्रे वज्रबाहो दिक्षावर्णोनां दशमोध्याया।।५३।।**

**प्रसंग दाहा।।१०।।**

* * *

# एकादशम अध्याय

।। उँ नमो सिद्धेभ्यो नमः।।

तो महामुनि किर्तीधर। तपभारे दुरंधर।।
परम वैराग्याचा आगर। स्वामि माझा।।१।।
विगत मछर मलाधारी। अनंगरंग भंग धारी।।
क्षमा क्षम समाधारी। तेथुनि यावा।।२।।
आजानुबाहु बलवंत। नाशाग्र द्रष्टी जयेवंत।।
सर्व संगविरहित। तो स्वामी।।३।।
विर्येजैसा पंचानन[1]। वावीस (परीस)ह सहनु।
मासोपवासी गहनु। मुनिश्वराते।।४।।
येवंविध तो महामुनि। सोधित विर्यापथ चालणी।।
रक्तवर्ण लोचनि। रौद्र देखा।।५।।
स्वपतिवरि क्रोध धरिला। म्हणे कसियासि आला।।
आता तो तव बाहिर घाला। सीघ्र पै।।६।।
मग पडि(वा)राप्रति म्हणे। अधर धरोनि दशने।।
मग ते निष्ठुर वचने। बोलति जालि।।७।।
मग धाविनला पडिवार[2]। जैसा यमाचा किंकर[3]।।
मुनिवरप्रति कठोर। वाणि बोलति।।८।।
मग तो म्हणति ऋषेश्वरा। तुम्हि जावा गिरिकंदरा।।
सर्वथा न यावे नगरा। भीतर देखा।।९।।

१. सिंह.  २. प्रतीहार, द्वारपाल.  ३. सेवक.

नगरांत करत करावा विचा(हा)र। जेथे देखिला मुनिवर।।
तिर्थ निर्णावा दिगांबर। सर्वथा।।१०।।
मग नगरामध्ये भविकजन। थोर दुःखि जालि मन।।
आता या नगरी धर्माविण। केवि राहावे।।११।।
स्वामिप्रभाव देखोनि द्रष्टी। असमाइ झाली पोठी।।
मग विलापला मुक्ती कंठी। करिति जाले।।१२।।
मग ते देखिले सुकोशले। तेणे हिवाया मोकळिले।।
स्थुल सुपाति भरले डोळा। जिवने।।१३।।
मग ते लक्ष्मणमति म्हणे। काये सांगु लाजिरवाणे।।
बरे अनुचित करणे। तव मातेन केले।।१४।।
जो प्रथ्विपति महाराजे। जो पिता सावध धर्मकाजे।।
भावरिस[1] आला वोजे। तो फिरविला।।१५।।
ऐंसि ऐंकोनि सुकोशले। विवेक धरिला प्रबळ।।
धिग हा संसार कस्मळ। कुश्चळ पैं।।१६।।
या नगरि विषेष जाला। मुनिचा प्रवेश वर्जिला।।
वडिल नाहि वर्जिला। धर्म देखा।।१७।।
तुझे त्रकुळीची रिती। पुत्र जाली दिक्षा घेती।।
म्हणोनि तुजला राखती। तुझी माता।।१८।।
ऐंसे वचन निरुत्ति। सुकोशल धरि चित्ति।।
प्रवर्त्तला अत्महित। धर्मकाजे।।१९।।
सोडोनि प्रपंच बुद्धी। धरिला धर्माची शुधि।।
पित्याजवळ गेला त्रिशुद्धी। वंदन केली।।२०।।
मग कर जोडोनि म्हणे मुनि। तुम्हि आला आहारालागुन।।
अंबेचे उपस्वर्ग देखोन। आला येथे।।२१।।

१. आहारचर्या.

तरि बरवे केले तुम्ही। येणे मिरवे चेतालो अम्हि।।
आता दिक्षा देणे स्वामी। सेवकाला।।२२।।
ऐंसे विनविला मुनिला। तव मागुनि परिवार आला।।
रायाप्रति विनवीत जाला। कवण्या रिती।।२३।।
राया तु तव दिक्षा घेसी। अम्हि कवनाते निरविसी।।
तुजविण निराधारेसी। कैसे राहावे।।२४।।
रोदन करि समस्त। करुण स्वरे महंत।।
सकल प्रजासहित। अंतःपुरे।।२५।।
मग तो सुकौसला म्हणे। चित्रमालेचे आधने१।।
पुत्र होइल गुरुवचने। त्यासि राज्ये दिजे।।२६।।
ऐंसे म्हणोनि सुकौसले। आशापाश तोडी(ले)।।
पद्मासन घातलि। मुनिजवळी।।२७।।
संज्जम घेउनि प्रबळे। अनसन तेव्हा घेतली।।
कर्म खंडिले ध्यानबळे। जाहला मुनि।।२८।।
व्याहार कर्म श्री गुरुसवे। करितसे महानुभावे।।
काळक्षपण सहस्र नावे। जपतसे पैं।।२९।।
मग तो सहदेवि माता। पुत्र मोहो व्याकुलता।।
अंति स्मरोनि अर्ता। मरोनि गेलि।।३०।।
मग तो जाहला वाघिणि। पापफळे गहन वनी।।
भयानक विहावणी। हिंसा करी।।३१।।
तव ते दोघे महामुनि। अवचित आला त्या वनी।।
तव तो महापापात्मी। हिंसक पैं।।३२।।
र्गुर्गुरिति मुनिवराप्रती। भयानक हुंकार कारिति।।
सुकौसल्या मुनिवराप्रति धावलि पैं।।३३।।

ऐंसे देखोनि मुनिवर बळे। शुक्ल ध्यानासी आरंभीले।।
नखे करुनि विदारिले। पोठ पैं।।३४।।
ऋषि पडि लाथा पहाणोनि। मौंळि पादपर्यंत दशने।।
मात्या काडीली वेचोनि। निर्दय पैं।।३५।।
गौतुम म्हणे गा श्रेणिका। सहदेवी पुर्विचि माता।।
या मोहोनि कर्मार्ता। पाहे पा।।३६।।
शृणु श्रेणिका भुपाळा। पुर्वि माता पुत्र मोहो जाला।।
आता परस्परे महाकाळ। प्रवर्त्तले देखा।।३७।।
ईतुकियावरी काये कष्ट। माता पुत्रासी जाला द्रुष्टा।।
वाघवते तव कष्टा। वरपड देती।।३८।।
ऐंसि सहदेवि जननि। मोहार्तेजाहले वाघिणि।।
मग ते पुत्रवरि बैसोनि। भक्षण केलि।।३९।।
तव तो सुकौसल्या मुनि। द्रढ जालि शुल्क(क्ल)ध्यानि।।
मग तो जाहला केवलज्ञानि। स्वामि माझा।।४०।।
आत्म पावला सिवपद। अनंत सौख्ये भोगी सदा।।
तेथ नाहि कर्मबाधा। सर्वथा पैं।।४१।।
मग देव प्रमोद जाला। सहपरिवारे इंद्र आला।।
मग पूजा करोनि गेला। स्वर्गप्राप्ती।।४२।।
मग किर्तिधर महामुनि। उपदेसी त्या वाघीणी।।
बारा अनुप्रेक्षा सुमनि। उपदेसिल्या।।४३।।
मग ते वाघिणिकारणे। उपजले जातिस्मरणे।।
मग ते कळवळी मन। आपुले पैं।।४४।।
मग ते वैराग्ये धरिलि मनि। अनुसन घेतले वाघिणि।।
शुभ ध्याने मरोनि। स्वर्ग पावले।।४५।।

ईकडे चित्रमालेचे अधनि[१]। पुत्र जाला सुलक्षणि।।
हिरण्येगर्भ नामाभिदानि। सोभतसे।।४६।।
हरिरायाचि कुमारि। अमृतमति सुंधरी।।
हिरण्येगर्भ ते सुपरी। भार्या जालि।।४७।।
सभार्यासि राज्ये करि। न्याये मार्गि सुपरी।।
येके दिवसि नवल परी। जालि त्याचि ऐंका।।४८।।
राव बैसला सिंव्हासनि। मग तो मुख पाहे दर्पणि।।
तव मीसीवरि देखोनि। सुभृ[२] केश।।४९।।
मग राव करि विचारा। आता समिप आले जरा।।
यमरायाचा हकारा। गर्जेत पैं।।५०।।
मग परम वैराग्ये धरोनि। मग विचारितसे मनि।।
हे राज्ये सुतास देउनि। तपा जावे।।५१।।
नद्यु(हु)शाकुमारा कारणे। राज्ये दिधले सुमने।।
विमलमुनि पासी जाउन। दिक्षा मागे।।५२।।
मग मुनिवरा त्या कारणे। केलि महावृत निरोपण।।
लुंचे केला ततक्षण। हेळामात्रे।।५३।।
मग तो नद्युशा महाराजा। लेकुरा ऐंसि पाळि प्रजा।।
सौंधर्येपणे सहजा। इंद्र जैसा।।५४।।
तो दळ घेउनि समस्ता। निघाला उतरेसि महंता।।
अरिकुळ रायासि साधिता। दुरि गेला।।५५।।
ऐंसा दुरि गेला जाणोन। दक्षणराव सर्व मिळोन।।
आले या नगरालागुन। नद्युशाचे।।५६।।
संग्राम भेरि नादे। सिनाद करिति छंदे।।
ऐंका फौजा बोलति वाद्ये। पुर्षार्थेसी।।५७।।

---

१. गर्भात. २. शुभ्र.

सुभठ प्रति म्हणे सिंव्हका। राजेश्वरु गेला कठका।।
सैन्ये ग्रामि आले देखा। दक्षण राये।।५८।।
आता राज्ये रक्षिजे सुपरी। हे विघ्न ठाळावे जरि।।
येश जोडा अवसरि। प्रधाना हो।।५९।।
ऐंकोनि स्वामिचे बोलणे। परिवारा आले स्फुरणे।।
करि असिलता घेउनि। उठावले पैं।।६०।।
अंगि उठलि सिंव्हकारणि। सैन्ये मोडिले ततक्षणि।।
राव पडिला धरणि। देखा।।६१।।
मग आपुले प्रतापेसी। जे जे होति दक्षिण दिसी।।
ते ते लाविला सेवेसी। दंड घेउनि।।६२।।
मग ते सिंव्हका सुंधरी। आलि आयोध्या नगरी।।
प्रवेश केला सुपरी। महोत्सावेसी।।६३।।
तव इतुकिया अवसरी। नद्युशे नृपे साधिले वैरी।।
चतुरंगेसी सुपरी। आला नगरा।।६४।।
नृप नद्युशा प्रबळ। सिंव्हासनावरी बैसला।।
गांधर्व गाति लिला। भगवंताचि।।६५।।
भाठ राणिचा प्रताप बोलति। आगण्या धरणि साधिलि जुगति।।
ऐंकोनि कोपला नृपति। मनामाझी।।६६।।
कठक मिसे ते राणि। बहुता नरमाझी कामिणि।।
येकलि राहिलि सुमनि। कैस्या परि।।६७।।
येव्हडे धिठपणे कामिणि। हे तव न चुके सिलहीनि।।
ऐंसे विचारिले मनि। नद्युशा राये।।६८।।
मग त्यागिलि सिंव्हका कारणे। उदास जाला नृप मनि।।
दुःखित जाला मने। सिंव्हका पैं।।६९।।

दुर्भाग्याचा उदयो आला। मग तो पति विरक्त जाला।।
आपमान थोर केला। सिंव्हकेचा।।७०।।
ऐंसे लोठले बहु दिवस। तव ज्वर उपजला रायास।।
जो क्षीणे प्राणनाश। करणार पैं।।७१।।
बहु वैद्य मिळाले तेथे। महामहा मात्री देति नृपते।।
ते सेविले महिनाथे। नद्युशाने।।७२।।
तव आला येक निमित्ये। निमित्ये पाहिले जुगते।।
मग तो म्हणे जुगते। ऐंक राया।।७३।।
आगा ज्वर नव्हे व्याधिचा। हा उपस्वर्ग पापाचा।।
हा तव जिव जन्माचा। मला वाठे।।७४।।
निमित्ये बोले वाणी। जे पतिवृता कामिणि।।
त्याचा करि गंदोदक आणोनि। सिंपिजे पैं।।७५।।
मग ते प्रधान म्हणति। निका निका हा निमिती।।
बोलवावे सिंव्हका सति। गंदोदकासि।।७६।।
मग कनकाचे कंचोळा। भरोनि गंदोदक निर्मळा।।
मग तो सिंव्हक कमळा। घेउनि आलि।।७७।।
उभि ठाकोनि बोल बोलि। जरि माझा सिल असेल।।
जरि पतिचा रोग निरसेल। म्हणोनि सिंपिले।।७८।।
उँ नमो अरिहंता नाम उचार। परस्पर केला गजर।।
शांतिले नृप शरिर। ततक्षणि।।७९।।
तेथे जाले जयेजयेकार। निर्झर वर्षति सुकुमार।।
राव अनंदला थोर। मनामाझी।।८०।।
राव प्रसंन्नमुख जाला। सिंव्हकेसि पूर्वपद दिधला।।
पूर्वसुख भोगो लागला। नद्युशा रावो।।८१।।

तव सिंव्हकेसी जाला पुत्र। सौदश नाम पवित्र।।
आपुले प्रतापे शत्रु। निर्दाळिले।।८२।।
नह्युशराये निर्मळ। राजि बैसले प्रबळ।।
आपण गेले बापाजवळ। सय्येमालागी।।८३।।
सय्येमे घेतले नह्युशे। दिक्षा पाळितसे सुखे।।
मग सोदशराव निके। राज्ये पाळि।।८४।।
द्रुष्टासंगे नरेश्वर। भृष्टाला सौदशकुमार।।
प्रछींन्नवृत्ति[१] मछर अहंकार। करि पाप।।८५।।
मग ठावो जाला सर्व लोका। ऐंकोनि कोपला सिंव्हका।।
सौदश निर्णाला निका। सर्व मिळोनि।।८६।।
सौदश रायाचे कुमार। कनकप्रभेचा मलहार।।
सिंव्हरथ नामे सुंधर। राजि बैसविला।।८७।।
मधुमांसाचे लालुचि। सौदश भृष्टि महापापी।।
भ्रमण करी दुःखी। होउनिया।।८८।।
ऐंसा भृमण करिता वनी। तव अवचित देखिला मुनि।।
नमिले भाव धरोनि। पश्चतापे।।८९।।
पश्चताप करोनि मना। जालि धर्म्माचि वासना।।
मग म्हणोनि तारणा। उपाये सांगा।।९०।।
उपदेश दिधला मुनिवर। तो जाला अनुवृतधार।।
सप्त व्यसनाचे त्यागकर। सौदशे राउ।।९१।।
तव इतुकिया अवसरी। तेथे महापुर नामे नगरी।।
महासेन राजा राज्ये करी। निपुत्रिक।।९२।।
तो परलोकासि पावला। राज्येभार सुंन्ये जाला।।
हाईजि झगड केला। राज्ये लागि।।९३।।

१. गुप्तपणे.

मग विचारिले प्रधान। तेथे आणिलि हस्तिणि।।
कलश देउनि चालीला। ति करिणि।।९४।।
अहो कर्मगति पाहा हो। तेथ होता सौदश रावो।।
ढाळिता जाला रावो। महापुरिचा।।९५।।
वाढे चतुरंग सेना। आणी पार नाहि धना।।
मग दुत धाडिले जाण। पुत्राकडे।।९६।।
दुत येउनि विनवित। पित्र भेठ घ्यावि त्वरित।।
पुत्र म्हणे महानष्ट। न येउ अम्हि।।९७।।
मग मागुता येउनि दुत। सांगितला सर्व वृत्तांत।।
राव कोपोनि निघाला त्वरित। स्वभारेसी।।९८।।
हे ऐंकोनि सिंव्हरथ राजा। चतुरंग दळेसि वोजा।।
बाहेर निघे सहजा। स्वभारेसी।।९९।।
मग मिळाला उभये रणी। बाप पुत्र समरंगणी।।
जालि युद्धाची मांडणी। ते समई।।२००।।
जेत वहि सौदश जाला। पुत्र आपुला जिंकिला।।
पुनः राजि स्थापिला। दयाभावे।।२०१।।
मग सौदश महाभाग्ये। मनि उपजलि वैराग्ये।।
आता करावा संगत्याग। ऐंसा म्हणे।।२०२।।
मग जाउनि श्रीगुरुजवळ। संजमभार घेतला।।
निपुणपणे चारि कळा। पाळितसे।।२०३।।
आता आयोध्यापुरि। सिंव्हरथ राजा राज्ये करी।।
पुत्र जाला त्याचा उदरी। ब्रंह्मरथ नामे।।२०४।।
मग राज्ये देउनि पुत्राते। तप घेतला सिंव्हरथे।।
परलोक साधिला तेथे। महानुभावे।।२०५।।

या सुर्येवंषाचि अनुक्रमि। शतरथ जाला साद्धर्मि।।
कमलबंद्ध सुभ कर्मि। सदारथ जाला।।२०६।।
त्यामागे नृप काकुस्ति। तो महाबळिया महिपति।।
त्यामागे विद्युत्पती। वंशमांडनु।।२०७।।
मग कितेयेक राया उपरी। आयोध्या नगराभितरी।।
अनुरण राजा राज्ये करी। सुर्येवंसी।।२०८।।
त्याचा पुत्र दशरथ। सद्गुण रूपे जयेवंत।।
राजे देउनि महंत। तपा गेलि।।२०९।।
मग आयोध्यांत दशरथ राजा। लेकुरा ऐंसि पाळि प्रजा।।
अपराजित नामे भाजा। जालि तया।।२१०।।
दुजि सुमित्र वेल्हाळी। रूप चतुर्येमराळी।।
सकुमारा चापेकळी। शचि जैसा।।२११।।
उभये भार्यासि दशरथे। राज्ये करि महंते।।
पुढे कथा श्रेणिक तु। ऐंक राया।।२१२।।

**ईति श्री रामचरित्रे महापुराणे भठारक**
**श्री भुवनकिर्ति विरचिते सुकौशल्ये युक्त**
**दशरथोत्पत्ती कथनोनां येकादशमो ध्यायाः।।११।।**
**प्रसंग आकरावा संपूर्णः।।**

* * *

# द्वादशम अध्याय

।। उँ नमो सिध्येभ्यो नमाः ।।

येक वेळे दशरथ राजा। सभे बैसला वोजा।।
सिंव्हासनावरि सोभे दुजा। इंद्र जैसा।।१।।
जिनमुनि जिनवचन। ऐंकतसे पुराण।।
सदा चोखळे[१] अंतःकर्ण। दशरथ राजा।।२।।
सिरि ढळति कनकदंड। चवरे महाप्रचंड।।
शुभ्र जैसा हेमदंड। कल्होळ करिति।।३।।
कांति जैसा सितकर[२]। वीर्येप्रतापे जैसा भास्कर।।
धनसंपद कुभेर। समान देखा।।४।।
पात्रे[३] नृत्ये कडोनि विकठी। गातसे देहुडे[४] पाखडी[५]।।
सप्त स्वरावरि फुडी। पात्र नाचति।।५।।
गांधर्व गाति गायेन करति। तान मान मूर्छन गाती।।
ताल मादल घोष शृती। आळविति पैं।।६।।
तव ईतुकिया अवेश्वरी। नारद मुनि ब्रंह्मचारी।।
तो आला सभेभितरी। दशरथाचे।।७।।
नारदासि देखोनि राजा। सिंव्हासन सोडोनि वोजा।।
उभा राहिला सहजा। कर जोडोनि।।८।।
राये केला ईछाकार[६]। असिर्वाद दिधला सुंधर।।
मग सिंव्हासनि बैसकर[७]। राये दिधला।।९।।

१. पवित्र. २. चंद्र. ३. नर्तक. ४. देवडी. ५. चिरेबंदी अरुंद वाट.
६. इच्छामि म्हणून प्रणाम करणे. ७. आसन.

संन्मान देउनि नारदा। मनि उपजलि प्रमोदा।।
तयाते ते देखोनि अनंदा। थोर जाला।।१०।।
मग तो राजा म्हणे। देवा परिस सुमने।।
शरिरधर्म सामान्ये। वर्तति स्वामी।।११।।
मग तो विस्मितवदन। रायाप्रति नारद म्हणे।।
राजेश्वरा धन्य हो धन्ये। तुम्हि भूपाला।।१२।।
कुशळ तुम्हि नरेश्वरा। पाळिति अखिळ मरेश्वरा।।
सर्व क्षेम सुंधरा। तुम्हा लागलि पैं।।१३।।
राजा म्हणे देवरुषी। तुम्हि सर्वांग सर्व सुखि।।
कवणे ठायाहुनि विवेकी। आले जी।।१४।।
जाईल कवणे ठाई। मजवरि करावे दया।।
काहि अपुर्व सांगाया। करुनि पैं।।१५।।
काये कवणिये भूमिके। जे जे तुझी द्रष्टी जालि निके।।
जे ऐंकिले असे विवेके। हे सांगिजो देवा।।१६।।
मग त्या नारदाकारणे। प्रछाचा[१] संतोष जाला मने।।
मग तो रायाप्रति म्हणे। गगनगामि।।१७।।
परियेसी दशरथा। येक मनि ऐंका समर्था।।
सांगेन धर्माद्भव कथा। शृतवषृजे।।१८।।
मि गेलो होतो विदेह क्षेत्रा। ते महा धर्मक्षेत्रा।।
जिनमंदिरे जिनसुत्रा। प्रणिदा देखा।।१९।।
शैल शैल वनोपवनी। नरपूर पाठणि।।
जिनमंदिराचे मांडणी। अनुपम्ये देखा।।२०।।
तेथे श्रीमंदर सुंधर। घेतला संजम भार।।
निष्कर्म कल्याण मनोहार। जाले तेथे।।२१।।

१. पृच्छा, विचारणा.

महा दिक्षाकल्याणिक जाले। ते म्या डोळा देखिले।।
मग म्या भावे नमन केले। महापुरुषासी।।२२।।
सुंदर पूंडरिक पुर। जे महा नववारि नगर।।
ते देखिले मनोहार। दशरथ राये।।२३।।
ते देवागंम्ये देखिलि। नानाविध विमानि आलि।।
हिरंण्येमये देखिले। महा अपुर्व।।२४।।
ध्वजा पताका किंकिणी[१]। देव देवांगण सुमनी।।
जगदिश्वरासी स्तवनी। पूजीले पैं।।२५।।
ते म्या कौतुक देखिले। श्रीमंदर स्वामि वंदिले।।
तेणे सर्व पाप गेले। आझी माझे।।२६।।
त्या पुंडरिक नगरा। उपमा नाहि मनोहारा।।
विदेहा क्षेत्रा सुंदरा। मानवि शरिर।।२७।।
धनुष्ये पाचसे उचेपण। सर्वांगि स्वरूप शोहण।।
सकल भव्येत्व गुण। मुक्तिगामी।।२८।।
दशरथ म्हणे पवित्रा। कथा सांगा दिर्घसुत्रा।।
मुनिसुवृताचे चरित्रा। निर्मल देखा।।२९।।
ते श्रुत करावे मजप्रती। जेणे धर्म कर्म घडती।।
सद्गतीचि प्राप्ती। होईल देखा।।३०।।
मग तो नारद मुनि म्हणे। चैत्याल्ये देखिलि सुमने।।
महा उत्तम तोरणे। बहुविध पैं।।३१।।
भूमि रत्नमये प्रभा। सदा सर्वदा पूजाचि शोभा।।
रयेन[२] मणिमये स्वयंभा। तेथे मूर्ति पैं।।३२।।
अनेक नंदनवनि। जिनभूवनाचि मांडणि।।
अति रंम्ये लोचनि। देखिल्या म्या।।३३।।

१. घुंगरू, घुंगरमाळा. २. रत्न.

देखिले हेममये पीठे। महा विविध विचित्र तेथे।।
मणिमये तेजाचि नेठ। नठले देखा।।३४।।
देवारण्ये भूतारण्ये वन। तेथे उत्तंग जिनभुवन।।
म्या केले पूजन स्तवन। नमन देखा।।३५।।
तेथे दिव्ये स्त्रि कुरु संगीत। रमणिक चारु चेष्टित।।
गाति जिनगुण मिश्रीत। कीर्तन करति पैं।।३६।।
ऐंसे म्या कौतुक देखिले। आपुले जन्म सुक्रुत केले।।
सर्व कालशे गेले। माझे राया।।३७।।
म्या केलि प्रदक्षण। या महामेरु सुदर्शण।।
सोळावे जिनभुवन। वंदना केलि।।३८।।
मग मि बैसलो विमानि। विचारितसे गगनि।।
जलपठल उलंघोनी। जात असे पैं।।३९।।
तव म्या देखिले अष्टकुळे। पर्वत माहा निर्मळे।।
तेथे जिनभुवने सकळे। सोमकांति।।४०।।
सिद्धकुठे चैताली। सर्व उपकर्ण निर्मळी।।
म्या पूजिलि सहश्र वेळी। कमल ते।।४१।।
जे जे अंतर्वासि पर्वति। सिद्धकुठे चैताल्ये होति।।
तेहि म्या वंदिले भक्ति। भावे स्वरूप।।४२।।
सकल परिसाचे प्रतिमा। वंदने पुण्ये घडले आम्हा।।
अनादि सिद्ध स्वरूप तुम्हा। सांगितले पैं।।४३।।
ऐंकोनिया महिनाथे। कर जोडुनि दशरथे।।
वंदना केलि समर्थे। चैतालयाप्रती।।४४।।
नारद म्हणे राया दशरथा। अणिक ऐंसा सांगेन कथा।।
अडिच द्विपा समर्था। पंचेमेरु पै।।४५।।

येकसे सत्तरी क्षेत्रे। महा धर्मकर्म पवित्रे।।
अक्रत्रिम प्रतिमा पवित्रे। वंदिले अंम्हि।।४६।।
जेथे वीर जिनशासनि। तेथवरि केलि म्या वंदनि।।
दशरथ म्हणे नमन। माझे तया।।४७।।
थोर संतोष ऐंसा गोष्टी। नारद खुन दाविला द्रिष्टी।।
येकांत वार्ता उत्कंठी। सांगावया पैं।।४८।।
राया नेत्रपालवि केलि। मग तो सभा उठोनि गेलि।।
येकांत गोष्ट अरंभिली। नारद मुनिसी।।४९।।
मग म्हणे राया दशरथा। स्वभावे सांगेन समर्था।।
ते परियेसि पा महंता। येकचित्ते पैं।।५०।।
मि गेलो त्रिकुठावरी। तेथे वसे लंका नगरी।।
शांतिभुवन त्या भितरी। उत्तुंग देखा।।५१।।
वंदना केलि शांतिनाथा। ते परमा पदाचे दाता।।
तो देव तुम्हा शांतिनाथा। शांतिकर।।५२।।
मग मि गेला राउळांगण। समाधान वाडे रावण।।
मज देखोनि रावण। वंदना केलि।।५३।।
मजे दिधला बैसकर। बहुत मान सत्कार।।
सिंव्हासनारूढ सुंधर। रावण जाला।।५४।।
सिरि ढळति मनोहार। कनक दंड चामर।।
लिलाविलसित कामिकर। विजयमान देखा।।५५।।
मुगुठवर्धन भुपती। रावणसभा सोभा सोभति।।
सोळा सहश्र राव करती। चरण सेवे।।५६।।
इंद्रजीत कुंभकर्णे। मेघनाद विभिषणे।।
सभेमध्ये बैसले प्रसादे। मरिचि देखा।।५७।।

जैसि देवसभा मिरवली। कि स्वर्गलक्ष्मि अवतारली।।
कि त्रिभुवनीचे शोभा आली। रावणसभेसी।।५८।।
तव इतुकिया अवेसरी। त्या सभेभीतरी।।
सागरबुधि निमित सुरि। येउनि बैसला।।५९।।
सभा देखोनि दशानन। थोर संतोष जाला मन।।
पाहे विस्फुरित लोचन। अनंदभरित।।६०।।
मग चिंता उपनली मना। हे नांदणुक मजेकारणा।।
कितेक दिवस सुमना। मि भोगित अता।।६१।।
किति आयुष्याचे प्रमाण। काये मजे स्वभावे मरण।।
कोणाचेनि हाते मरण। होइल मजे।।६२।।
ऐंसा संदेह पुसता। निमित्ये मनि मानिता।।
मग जे बोलिले शास्त्रवोक्ता। ते पाहे पा।।६३।।
ऐंसे विचारोनि मानसी। दशानन करितसे पुसि।।
निमित्ये मनि मानिता। तया प्रति पैं।।६४।।
रावण म्हणे बुधिसागरा। माझा प्रस्नाचा विचारु करा।।
निमित सुत्र मनोहरा। पाहा पाहा जी।।६५।।
मग तेणे पाहिले निमित्ये। वेळा वर्त्तलि चरित्रे।।
करुनि सांगे।।६६।।
राया परियेसी दशानन। चित्त देइ निमित्ये वचन।।
निर्धार आपुले मन। निमित्याचा।।६७।।
निमित बोलि तो परिसा। येथुनिया उत्तर दिशा।।
आयोध्या नगरि नरेशा। सूर्येवंषी पैं।।६८।।
तेथिल दशरथ राजा। बाळकापरि पाळि प्रजा।।
अपराजित सुमित्र भाजा। त्याचे घरि।।६९।।

दशरथ राजाचे पुत्र। दोघेजणे होतिल पवित्र।।
तुमचे आयुष्याचे सुत्र। त्याचे हस्ती।।७०।।
जनक रायाचे दुहिता। तिज निमित्ये लंकनाथा।।
मरणकारणे समर्था। परांगण देखा।।७१।।
तुम्हा मरण येणे निमित्ये। दशरथ पुत्राचे हाते।।
लंकेचि तळवठि[१] शस्त्रे। पांतु[२] होइल।।७२।।
ऐंसा वचनि लंकनाथा। वज्रपातु बैसले माथा।।
सकल सभे गोळा होता। देउनि बैसले।।७३।।
विशादला[३] कुंभकर्ण। उगाचि जाला विभीषणे।।
चिंतावला रावण। सकल सभा।।७४।।
इंद्रजीत मेघनाद। मन व्याकुळले विशाद।।
मरिचादिक प्रधान मंद। वंदन केली।।७५।।
नारद म्हणे राया दशरथा। काये सांगु तेथिल अवस्था।।
तव विभिषण बोलता। जाले तेथे।।७६।।
पुसतसे निमित्याप्रती। आता सोमजे नीगुती।।
दशरथपुत्राचे उत्पत्ती। जालि कि नाही।।७७।।
मग बुधिसागर म्हणे। आता उत्पंन्ये येथुनि होणे।।
ऐंसे निमित्ये लक्षणे। दिसतसे।।७८।।
मग तेथे तेणे विभीषणे। फौज सारिले विचक्षणे।।
देवा आता माझे कारणे। पाहिजे सुख।।७९।।
जव पुत्राचि नाहि उत्पती। तव दोघे सांगती।।
दशरथ जनक भूपती। मारीन दोघे।।८०।।
छेदिल्या तरुवराचे मूळ। मग कैचे त्यासि डाहळ[४]।।
मग केउते लागे फळ। त्या तरुवरा पै।।८१।।

१. खाली २. पतन. ३. विषण्ण -खिन्न होणे. ४. डहाळ्या, फांद्या.

उपडिन वेळा[१] समूळ। त्यासि कैसे लागति फळ।।
या कारणे नयति जळ। बळ न बांधिजे।।८२।।
ऐंसा केला निर्धार मन। मग पुसिले विभीषणे।।
विनये करुनि विचक्षण। पुसि केलि पैं।।८३।।
आता सांगीजो पाहा मुनि। तुम्हि गगनगामिनि।।
कोण दशरथ राजा करि कवनी। त्याचा वृत्तांत सांगिजो।।८४।।
मथुरा कवणे दिशे। तेथे राया जनकाचे राज्ये कैसे।।
हे सांगिजो भरवसे। मजप्रति।।८५।।
ऐंसि विभिषणाचि वचने। मजे ऐंकता श्रवणे।।
अंतःकर्णि तिक्षण बाणे। खडतरले पैं।।८६।।
म्या उत्तर दिधले जुगति। दशरथ कोण जाणे जुगति।।
प्रथवि वरि भुपति। उदंड देखा।।८७।।
परियसि गा भूपती। परिऐंसि गा विभिषण।।
जनक नामे किति जाणा। आयोध्या मथुरा प्रमाणा।। गणित नाहि।।८८।।
जरि तुम्हासि हे अर्थ। तरि मि करिन येकचित्त।।
ठाया घालुनिया त्वरित। येइन आता।।८९।।
मग मि धावोनि आलो येथे। सावध करावे या युते।।
तुम्हा आम्हा स्वर्गनाथे। तारक वेगळी म्हणोनिया।।९०।।
ऐंसा बोल त्जात्मा तेथे। दशरथ पुत्रानि हाते।।
मरण राव निमित्ये। सांगितले पैं।।९१।।
आगा दशरथ राया। जतन करि आपुलि काया।।
तुम्हा अणि जनकराया। मरण आले।।९२।।

---

१. वेल.

ऐंसे नारदाचे वचन। ऐंकोनि आपुल्या श्रवणे।।
भयाचकित जालि मन। दशरथ रायाचे।।९३।।
जरि येणे तुम्हा विभिषण। काहि येक वोकठ[1] करणे।।
ते आलोपु[2] तुम्हि राहणे। दशरथ राया।।९४।।
तुम्हि काहि चिंता न करावि। भविष्य तव होइल स्वभावि।।
जे निमले ज्या नावे। केवि ढळेल।।९५।।
या पुण्येवंत जीवाकारणे। असम्यता निर्धार मन।।
त्यासि सर्व नासतातित विघ्ने। क्षणामाझी।।९६।।
मज थोर प्रीति तुझी। हे गोष्ट निर्धाराचि माझी।।
सावधान राहिजे वोजि[3]। नरेश्वरा जी।।९७।।
विचार करावे प्रधानासी। प्रयेत्न करावे भरवसी।।
विचार करावे आपुले मानसी। उपावो किजे।।९८।।
आता म्या विमानि बैसोनि। मथुरेसि जाउनि।।
सकल व्येवस्ता सांगोनि। जनक पुढे।।९९।।
मग दशरथ म्हणे मुनि। जनका घालावे वनि।।
तुवा अमुचे जिवदानि। दाखविले देखा।।१००।।
मग प्रणम्ये नारदा। नारद वदला आसिर्वादा।।
मग तो निघाला अनंदा। भरित देखा।।१।।
मग तो मथुरेसि गेला। नारद येता देखिला।।
मग उभा ठाकला। कर जोडोनिया।।२।।
जनके केला नमस्कार। आसिर्वाद दिधला मनोहार।।
मग सिंव्हासना बैसकर। केला नारदा।।३।।
जनक म्हणे नारदाप्रती। तुम्ही गमन गगनाप्रती।।
तुंम्हि हिंडता ये क्षिती। थोडि जाली।।४।।

१. वोखटे, वेडेवाकडे. २. लपून. ३. निवांत, निर्भ्रांत.

तरि सांगीजो रुषेश्वरा। अपुर्व कथा मनोहरा।।
द्रस्ये[१] करा शृत समर्था। सुचविला।।५।।
भयचकित जाले जनका। आयोध्यासि आला सुरेखा।।
दशरथ जाला हरषे। मित्र गमे।।६।।
मग बैसविले चारि मंत्रि। वाचा करति दिर्घसुत्रि[२]।।
आपुलालि बुधि पवित्रि। धांडोळिति[३] पैं।।७।।
बैसले दशरथ जनक। मग तेथे करिती विवेक।।
जीवित्वाचार सुरेख। करिति देखा।।८।।
आता कैसा करावे उपावो। हा दशरथ जन करावो।।
जिवे वाचति ऐंसा उपावो। विचार येत।।९।।
मग मतिसागर म्हणे। स्वामियाप्रति हितवचन।।
दशरथ रायाप्रति सुमन। परियसि पा।।१०।।
आजि स्वामि समर्था। सर्व कार्येकिजे जिवित्वार्था[४]।।
सखा रावो जिवित्वा समर्था। भलत्या परि।।११।।
जिवित्वाविण संपदा। नवहि निधान केविदा।।
या जिवित्वाविण संपदा। सुन्ये देखा।।१२।।
कीजेति आवृ भोगविधान। या जिविताकारण।।
जितुका धंदाकारणे। या जिवालागी।।१३।।
आजि जिवित्वाचे आशे। तोडिति संसार फाश।।
शरण किजे जिनेश। जीवित्वाकारणे।।१४।।
या जीविताकारणे महेशा। रक्षण करिले जिनेशा।।
परि मरण येइल ऐंसा। भाव न ये मना।।१५।।
या कारणे जिव राखावे। रूपप्रवर्तन करावे।।
आणिक देशात राहणे। मोहो देखा।।१६।।

१. दृश्य, पाहिलेले. २. बरीच लांब. ३. शोधणे. ४. जीवितासाठी, जगण्यासाठी.

तरि मि करिन उपाव। ठाळिन विघ्नाचे भाव।।
मग सूर्येवंसिचे राव। राजि बैसविन।।१७।।
ऐंसि प्रधानाचि वचने। राये ऐंकोनि सुमन।।
मग तयाप्रति म्हणे। साधु साधु पैं।।१८।।
सांभाळिजे देश कोषे। निके परि प्रजा पाळीजे।।
भले परि राखावे विसेष। राज्ये माझे।।१९।।
ऐंसे म्हणोनि दशरथे। राजि स्थापिले प्रधानाते।।
रूप प्रवर्तन[१] समर्थे। करुनिया पैं।।२०।।
जनकासवे राजा। जिवित्वा राखावया काजा।।
धर्मध्यान साधिति वोजा। ते दोघे मैत्र पै।।२१।।
राव निघाल्यावरि प्रधान। उपाव मांडिला सुमन।।
चितारि[२] बोलाविला विदन[३]। क्षणमात्रे।।२२।।
निरोप दिधला प्रधाने। लेपाचे दोनि मुर्ति करावे।।
सर्वांगि सुलक्षण। संपूर्ण देखा।।२३।।
ओळखि न पडो द्यावि जना। सजिव कळा चेतना।।
ऐंसा रुपडे करि सुमना। या उचितावरी।।२४।।
येक रुपडिया जाणवी। दशरथाचि कळा येउ द्यावी।।
येक रूप जनक भावी। येउ द्यावे।।२५।।
ऐंसे ऐकोनि चितारी। रूप चिंतिले मनोहारी।।
दशरथ रायाचे सुंधरी। लेपमये पैं।।२६।।
दुसरे जनकाचे। रूप चिंतिले त्याचे।।
हे सजिव के निर्जिवाचे। वर्णन पैं।।२७।।
ऐंसि दोघाचे रूप। करुनि महा श्वरूपे।।
कळलि नवचि भूपे। सर्वथा देखा।।२८।।

१. परिवर्तन. २. चित्रकार, मूर्तिकार. ३. चतुर.

मग ते देखोनि प्रधान। संतोषला चितारा दाने।।
स्वभावे सिंव्हासना। मांडुनिया।।२९।।
भीतरि भरुनि बगलु। आणिला परसु प्रबळु।।
दशानन राव निर्मळु। लेपाचा देखा।।३०।।
ते रूप सिंव्हासनावरी। प्रधान बैसविले सुपरी।।
जनक दुसरे विष्टरावरी। बैसविला पैं।।३१।।
लाविला बंबाळ दिपिका। चवरे ढाळति सुरेखा।।
भोवता परिवार निका। उभा असे पैं।।३२।।
राव राणि उभे अंगणी। हा प्रपंच नेणति कवनि।।
येक प्रधानावाचुनि। दुजा नेणे।।३३।।
स्वस्थानहि नरेश्वरा। निरोपु जालि परिवारा।।
तेथोनि नमस्कार करा। रायाप्रति।।३४।।
ऐंसे प्रपंच राज्ये चालवी। मंत्री आपुले मनोभावी।।
लोकाप्रति दावी। ते रु(प)डे पैं।।३५।।
इतुकिया अवेश्वरी। कथा सांगेन दुसरी।।
राज्ये सांडिले नरेश्वर। मरणभयाने पैं।।३६।।
मग ते दोघे भुपती। माहा पावले विपत्ती।।
पादचारी होउनि क्षिति। भृमताति।।३७।।
आकाल पयोदाचे[५] पठले[६]। शशि सुर्येबिंब झाकोळले।।
तैसे दोघे नृपकुळे। सांडवले पै।।३८।।
जगे माडे विपरित काळ। तिघि प्राणिया होय विकळ।।
कलपा वेगळा निल। निवाडले जैसा।।३९।।
दशरथ आपुल्या सदनि। अणिक जनकराव सुमनि।।
राज्ये करति लोकाचा मनि। ऐंसे वाठतसे।।४०।।

१. दृश्य, पाहिलेले. २. बरीच लांब. ३. शोधणे. ४. जीवितासाठी, जगण्यासाठी.

बैसले दोघे सप्त खाणा। लोक अवलोकित स्वलोचना।।
ऐंसे प्रधाने विचक्षणा। मगधरायाचे।।४१।।
मग ते दोघे नरेश्वर। सामान्ये रूप सुंधर।।
महि विचार करिति मनोहर। साहित्येविण।।४२।।
पादचारि जालि महिपती। कळा प्रगट न करिति।।
मरणाचा भया नेणति। दुःख ऐंसे पैं।।४३।।
जैंसा द्विपा[१] भय सिंव्हाचे। तैसा भुपा भय रावणाचे।।
धिगस्तु मानव जिवित्वाचे। जे सत्वहिन[२]।।४४।।
धिगस्तु महा संशृतिच्या भाव। जिवित्वाचा किजे अनुराव।।
परि या मरणाचा उपाव। ढळेचि ना।।४५।।
ऐंसे जाणुनि प्राणिया। जीवितासी राण्या।।
अभयदान दातिया[३]। विरळा जि देखां।।४६।।
जरि अभयेदान दिजे। तरि भया पद पाविजे।।
या कारणे दया पालिजे। सर्वथा देखा।।४७।।
दशरथ आणि जनक। मनि धरोनि विवेक।।
राजमुद्राचा साभिनेक। तोहि मांडिला पैं।।४८।।
तव इतुकिया अवसरि। अयोध्या महानगरी।।
जाणोनि विभिषणाचारी। दुर्घट देखिलि।।४९।।
देशोदेशि पाठविलि स्वार। विभिषण विद्याधर।।
दशरथ गवसिता मरमर[४]। त्यासि जालि।।५०।।
दशरथ मारावया कारणे। विडा उचलिला विभिषण।।
ते खवळला महा विचक्षणे। खेचर पैं।।५१।।
ते पैज घेउनि निघाले। पाहता आयोध्यासि आले।।
प्रवेश न देखता केले। मागुता देखा।।५२।।

१. हत्तीस. २. निःसत्त्व, निःसार, निर्बळ. ३. दाता. ४. अपार कष्ट.

त्या पैज जाल्या निर्फला। पडे खेचराचे कळा।।
विभिषण भर लाभला। तेथे देखा।।५३।।
मग विभिषण म्हणे। अम्हा न साधे कवणे गुणे।।
तुम्हि अमरावतिचा धने। घेतले होते।।५४।।
काये त्यापरिस अवघडा। कि लंके सांगडा गडगाडा।।
कि सागर जैसा अवघडा। असति अयोध्या।।५५।।
कि धनंदाचि लंका। कि ते यमपुरिचे दुखा।।
कि ते पाताळलंका। सांगिजो पा।।५६।।
ऐंसे म्हणोनि सर्वांगि। विभिषण उठिला चांगे[१]।।
अपण निघाला मनरंगे[२]। आयोध्याप्रती।।५७।।
प्रछंन् वृत्ति विद्यावकांसवे। मि विभिषण आपुल्या नावे।।
ऐंसा पैजा घेउनि हावे[३]। आयोध्यासि आला।।५८।।
प्रवेशु न देखे त्या नगरी। जाउ न शके विडायाभितरी।।
संदेह पडला विद्याधरी। विभिषणादिका।।५९।।
बुद्धि विचारिला बहुतापरी। परि अवका[४] न ये नगरी।।
जेथे तेथे रक्षणाचे परी। दुर्घठ देखा।।६०।।
मग तेणे विभिषणे। नठव्याचे[५] रूप विचक्षणे।
नगरप्रवेशु केला तेणे। प्रपंचे बुद्धी।।६१।।
मग भेठला प्रधान। बोल लाविला सुमन।।
मग अश्वरूप नृत्यंगण। मांडला पैं।।६२।।
दशरथ रायाचे रुपडे। सिंव्हासनि मांडिले पुढे।।
जवळि जनकापुढे। तिहि मांडिली।।६३।।
सोळा अळंकार मिरविति। ते दोघा महाभूपती।।
परि ते गगनि गुप्त विचारती। कोणि नेणे।।६४।।

१. निश्चयपूर्वक. २. इच्छानुसार. ३. बलपूर्वक. ४. आवाका, सामर्थ्य. ५. बहुरूपी.

सिरि धरति चंवर। कनकदंड परिकर।।
अंगरक्षण परिवार। वेष्टित देखा।।६५।।
भोवते सुभठ रक्षपाळ। करि कृपा कृतांत काळ।।
महा भयानक विशाळ। रौद्र मुर्ति।।६६।।
ते महाविचक्षणे। देखिला त्याचे दर्शने।।
भये उपयमाकारणे। येकले देखा।।६७।।
ऐंसि शस्त्रीचि परवडी। रायाभोवते महाकोडी।।
केहा येइल काल घडी। ते नेणवे पैं।।६८।।
प्रथम निशि चार प्रहरी। दिवट्या पाजलिल्या सुपरी।।
सभा दाटली विविधा परि। देवाचि जैंसी।।६९।।
मग ते आले तेथे। राजसभा देखोनि चित।।
मनि क्षोभोनि विस्मयो ते। पावले देखा।।७०।।
मग येर भुमंडिला। नृत्ये कळ दाविता जाला।।
देखोनि प्रमोद पावला। प्रधान तेथे।।७१।।
कडोविकडि तांडव नाचे। भेद दाविले साचे।।
मग गायेन सप्त स्वराचे। दावितसे।।७२।।
सकल सभा जालि रुकाचि। जैसि लिहिला चित्राचि।।
प्रवर्ति खुंठलि मनाचि। तेथे देखा।।७३।।
येक मनोभावे पाहती। काम्यांधे होति किति।।
नृत्य करिता भृमती। क्षणे क्षण पैं।।७४।।
तव विद्युत्प्रभा। विभिषणाचा विद्याधर।।
लघु लाघव मनोहर। निमिक्षामाझी।।७५।।
भृमरि करिता प्रबळ। ते आला रायाजवळ।।
छेदोनि दोनि कमळ। क्षणामाजि पैं।।७६।।

तो निघाला गगनवाठा। हर्षेचढला त्रिकुटा।।
अनंद मानिला मोठा। मनामाझी।।७७।।
अयोध्यात जाला आहाकार। सुर्येवंषीचा सुंधर।।
हा दशरथ नरेश्वर। मारिलि विद्यादिकि।।७८।।
या जनकरायासवे तेथे। घात केला महिनाथे।।
सिरकमळ समर्थे। नेलि देखा।।७९।।
सज्जना रोजना करिति। अंतःपुरे दुःख धरिति।।
संस्कारक्रिया आदरती। प्रधान देखा।।८०।।
झलि रचलि चंदनाचि। परि केलि विमानाचि।।
दहनक्रिया जालि रायाचि। तेथे गेली।।८१।।
अंतःपुरि प्रधान। भेद सांगीतला सुमने।।
दशरथ रायाचे विघ्ने। दुरि केली पैं।।८२।।
मग त्या शांत जाल्या मने। लोकिक राखावया कारणे।।
लठके लोचन वचन। विलाप करिति।।८३।।
मग इतुकि अवसरि प्रबळ। लंकेसि सिरकमल।।
ते दाविता रावणाजवळ। विभिषण।।८४।।
हे सिर दशरथाचे। दुजे जनकाचे।।
मूळ पडिले वैरिचे। तरि उत्पति केवी।।८५।।
ऐंसि विभिषणाचे वचने। ऐंकोनि रावण म्हणे।।
हे अनुचित करणे। तुमचे बंधु।।८६।।
अपण उत्तम वैं(वौं)षाचे। हे कारण नव्हे तुमुचे।।
जे विश्वासघात क्षेत्रियाचे। बल मोडिजे पैं।।८७।।
माझीया हितकारणे। बरवे केले विचक्षणे विभिषणे।।
या कारणे पाठिराख होणे। भलत्या पुर्षा।।८८।।

आता मि निकंठक जालो। ऐंसा बलि बंधु संतोषलो।।
विभिषण मान दिधलो। बहुता परि।।८९।।
मग विभिषण प्रबळा। घरा नेलि सिर कमळा।।
आपुला निज द्वारा जवळा। बांधिले तेणे।।९०।।
मग तेणे विभिषण हर्षे। बंधुचे हित केले निके।।
ऐंसा सुख मानुनि निके। गर्वासि पावला।।९१।।
कृतार्थ जन्म मानिला आपुला। म्या बंधू निकंठ[1] केला।।
भयामात्राचा भाव गेला। सर्वथा देखा।।९२।।
ऐंसा तो आपुल्या प्रमोदे। निश्चींत राहिला अनंदे।।
धर्म करिति प्रमोदे। विभिषण पैं।।९३।।
तव कितियेक दिवसी। सिरकमल देखिलि कैसी।।
विकसित राजिव तैसी। ठवठवित पैं।।९४।।
सोडुनि आणिले विभिषणे। मग पाहिले विचक्षणे।।
लेपमय जाणुनि मने। पस्तवला।।९५।।
मग तो विष्मयो पावला। निमित्याचि भाव मना आला।।
तो म्हणे हा जीव सम्येक्त चुकला। सर्वथा देखा।।९६।।
या मारुनि कर्माचा भावे। माझे मन झाले बले भावे।।
सम्येक्तविणे येके जीवे। जावे निर्यासी[2]।।९७।।
चुक पडलि माझी मनि। केवि टळे निमित्या वाणी।।
हा निर्धार जिनशासनी। सम्येक्ताचा।।९८।।
सुखासाठि पाप केले। माझे कारणे निरार्थक गेले।।
वरति विषेष सुकृत गेले। अनुचित कर्म।।९९।।
ऐंसा जाणोनि विभिषण। पाप करि पुर्वाचरण।।
शांतिक पुजा न्हवन। प्रतिष्टा करि पैं।२००।।

१. निष्कंटक, आपत्तिरहित. २. निरयास, नरकास.

करि नाना विधान। सप्त क्षेत्रि वेचि धन।।
महामंत्राचे स्मरण। करितसे पैं।।१।।
तथापि अठव मनाची। वेळकि विठळे निमित्याची।।
म्या संधि केली बंधवाची। आज्ञानपणे।।२।।
धीर सागर मेरु ढळे। तापेल जे चंद्रमंडले।।
पतन सविता कले। होये जधी।।३।।
भानु पश्चिम दिसि। तदि उगवला दिसे।।
तदि कर्मरेखा नासे। लल्हाठपठिचि।।४।।
लल्हाठपठिचे अक्षारे। ते न ठळति हरिहर।।
तेतिस कोठि सुरवर। ठळति ना पै।।५।।
परि येक विस्मयो कर्माचे। राया अवतार रंकाचे।।
रंका अवतार रायाचे। भाव देखा।।६।।
इंद्र सांगडा[१] विर्येवंता। हा दशानन जयेवंता।।
कोणिकडे भूतंता। शक्तिहिन पैं।।७।।
आहा रे कर्म दुर्जना। भुचरे मरण रावणा।।
हे ऐंसि रचना। वाये केलि।।८।।
गजे पंचानन सरावा। जिवे येम मारावा।।
पंन्नगे गरुड मोठावा। ऐंसा कर्मभावे।।९।।
दुःख पाळवि सुख ऐंसी। सुख पाळवि दुःख ऐंसी।।
ऐंसा जाणोनि भरवसे। कीजे आत्महित।।१०।।
जाणुनि ज्ञानाचा लवलेशे। त्याप्रति काये लवलेशे।।
श्रीगुरुचा उपदेशे। त्यासि केवि घडे।।११।।
प्राणिया निमित्ये जाणिजे। संम्येक्तासी धर्म का न दिजे।।
ऐंसे जाणोनि हित भजत। मोक्षगामी।।१२।।

---

१. सोबती.

कैसे विवेकविकळ प्राणी। महा दुर्मति घेतलि प्राणी।।
अकार्या वर्तति मनि अज्ञानि। मज सांगडे।।१३।।
अहो महा दुर्लभा। देवा भयानक अभंगा।।
त्रिकुठा सांगडे उतुंगा। दुर्ग देखा।।१४।।
हा सिंधू तरोन बाहेन। भूमिचर येतील केवि जण।।
त्याचेनि हाते रावणमरण। हे सत्ये जाणा।।१५।।
कर्मगति न कळे जिवा। कर्म दुर्घठ या जिवा।।
म्हणोनि धर्म करावा। परत्राकारणे।।१६।।
म्या अनुचित करणि केली। मन आपुलि बुधि आली।।
येणे गुणे अपकिर्ति जाली। मजे देखा।।१७।।
ऐंसे अविचारि कर्म सहजा। कार्या न करि हा भर्वसा।।
विचारेविण कर्मफाशा। पडो पाहे।।१८।।
ऐंसा निर्धारु जाले मन। सम्येक्त आचारे सुमन।।
मग तो अष्टभोग निधाने। भोगी झाले।।१९।।
पूर्व सुकृताचे फळे। विभिषण भोगि आचळे।।
संसाराचि सोहळे। निरंतर।।२०।।
काव्या प्रजायेते धर्म तयोवबुद्धि
शृणंसुभा सौख्ये विधाये तिचे।।
महिपति सद्गतीदाये दक्षा
धर्मांतति कार्येमहिस्तिमीषं।।२१।।

ईति श्री रामचरित्र भठारक श्री भुवनकिर्ति
तत्पठे आचार्येगुणकिर्ति विरचिते विभिषण पश्चताप द्वादशमोध्यायाः।।
मंगळ महाशुभं भवतु जयेतु।।

* * *

# त्रयोदशम अध्याय

।। उँ नमो सिध्येभ्या नमाः।।

आता परियसा गा समर्था। श्रेणिक महिनाथा।।
पुढे दशरथाचे कथा। सांगेन ते।।१।।
दशरथ अणि जनक। धरुनि निकठ[1] वेषे।।
परि धर्मिक मनाचा विवेक। सुठला नाही।।२।।
प्रथवि हिंडता दोघेजणे। यात्रा घडलि पंचकल्याण।।
तिर्थक्षेत्र धर्मकर्मण। सादरत्व पैं।।३।।
त्रिकाल सामाईक न चुके। प्रतिक्रमण सवे सुरेखे।।
पर्वणि तिथि पठ विवेके। करि सदा।।४।।
चैतालेचि वंदना। अष्टप्रकारे पुजना।।
नित्ये निरंतर स्मरणा। करिति देखा।।५।।
जिवदया पाळिति साचे। असत्ये न बोलति वो वाचा।।
आचार पाळति आचार्याचि। ब्रंह्मचार्येसवे।।६।।
पाळिति परिग्रह प्रमाण। तेहि वृताचे निधाने।।
चारि सिक्षावृत सुजाण। पाळिति देखा।।७।।
ते त्रिपंन्न क्रिया पाळिति। वृत चारित्र सांभाळिती।।
श्रावकाचार निरुति। पाळिति पैं।।८।।
ते न चुकति नितिधर्म। पाहति देशाचार धर्म।।
परि सावधान हे धर्म। कारणे देखा।।९।।

---

१. जवळ.

आगम सिधांत पुराणे। नानाविध भाषा प्रमाणे।।
ऐंकति आपुले श्रवणे। शास्त्र।।१०।।
ऐंसियापरि नरेश्वरा। हिंडति नगरो नगरा।।
भृमण करिता मनोहरा। उत्तरेसि आले।।११।।
कौतुकमंगल नगर। तेथे वसे मनोहार।।
ते अमरावति सुंदर। सारिखे देखा।।१२।।
शुभमति राजा राज्ये करी। प्रथ्वीश्री वल्लभाचा घरी।।
ते सर्व वनितेवरी। वरिष्ट देखा।।१३।।
चित्तानुगामिनि भृतारा। ते पतिवृता मनोहारा।।
सर्वथा पै।।१४।।
दोघि कंन्या जालि त्याचे घरी। कैकै धूर्त दमन सुंदरी।।
त्यावरि जालि सुंदरी। केगामति पै।।१५।।
महारंम्ये रमणिक रामा। गुणाचे निधान वरि शामा।।
अवस्ति हेतुवे कामा। भूपतिप्रती।।१६।।
सर्व लक्षणलक्षित गात्रे। सर्व कळाकुशळ पवित्रे।।
कि हि सामुद्रिकाचे चरित्रे। लिहिले धात्रिणे।।१७।।
नृत्ये गीत दिसे कळा। नानाविध जाणे विचित्र कळा।।
परि चित्तहारी कमळा। रूप देखा।।१८।।
ते भेदबुद्धिचा तर्क। ज्ञानविज्ञान जाणे विवेक।।
तीक्षण मतिविवेक। केगामतिचि।।१९।।
कोविदार दुरास वाकी। कुशळत्व चौषष्ठ साकी।।
अनुमात्र पारखिनी कि। सर्व वस्तुप्रती।।२०।।
सारासार जाणे बाळ। योग्यायोग्य जाणे निर्मळ।।
खाद्याखाद्ये जाणे प्रबळ। प्रमाण ते पैं।।२१।।

मंत्र अवषध ते जाणे। सर्व शास्त्रार्थ गाणे।।
घन सुश्वर[1] तंत वितंत सगुण। जाणे ते बाळ।।२२।।
ईत्यादि बहतरि कळा। जाणे उपकळा ते बाळा।।
कोविदपणे प्रबळा। ऐंसि नाही।।२३।।
गुण लावण्ये वेल्हाळा। किर्ति व्यापिले महितळे।।
आपुले भाग्ये कमळे। जिंकिल देखा।।२४।।
बहु युक्तिने राजेश्वरा। तेति वर्णिता कवेश्वरा।।
शक्ति नाहि मनोहरा। सर्वथा देखा।।२५।।
ऐंसि केगामति बाळा। योंवन अस्तेचा बाळा।।
खेळता देखिला डोळा। शुभमतिने।।२६।।
चिंता उपजलि नरेश्वरा। हे कंन्या द्यावि कवने वरा।।
कोण भूपति सोयरा। करावा पैं।।२७।।
कंन्या वर पाहा हो। मग अंम्हि येश किर्ति लाहो।।
कंन्या पाहो पर्णुनि सुखि राहा हो। आपुले ग्रही।।२८।।
मग तो शुभमति राजा। सभे बैसलि वोजा।।
हकारिले प्रधान काजा। आपुलिया।।२९।।
मग तो पुसे प्रधानाप्रती। कवना द्यावि केगामति।।
वर पाहा जुगति। ईज सांगडा पै।।३०।।
मग प्रधान म्हणे देवा। सैवर मंडप रचावा।।
मग कंन्या आपुले भावा। वरिल देखा।।३१।।
कळ कुशळ केगामति। जाणे गति जुंगति।।
इचा कर्मानुसार पती। जोडेल पैं।।३२।।
तरि अन काये चिंता। तुम्हि सैवर मांडा आता।।
भुपति बोलावा समर्था। देशोदेसिचे पैं।।३३।।

१. सुषिर, फुंकून वाजविण्याचे वाद्य, बासरी, सनई इ.

प्रधानाचे वचन ऐंकोनि। थोर संतोषला मने।।
सैवर मंडप रचन। चरचु आदरीले।।३४।।
घातले पुढे मंडप नीके। मांडिलि सिंव्हासन सुरेखे।।
पत्रिका लिहिला सुरेखे। सर्व रायासी।।३५।।
मग आले सकल भूपती। राये मान दिधला जुगती।।
मग वेचि संपति। उदारपणे।।३६।।
मिळाला रायाचा कोडी। वाजंत्रि वाजति परवडी।।
येक येति लवडसवडी। कौतुक देखा।।३७।।
तव ते अवेश्वरी। दशरथ जनक सुपरी।।
कौतुके का पडलि स्वयं करी। आले देखा।।३८।।
उभा राहिले येकिकडे। दोघि कापडिहीन बापुडे।।
कोन्ही नेणति कुडे। राजकुवर।।३९।।
हरिवाहनादिक नरेश्वरा। तेथे बैसले राजकुमरा।।
आपुलाले डंबे[1] सुंदर। राजकुळिचे।।४०।।
आपुलाले डंबे सुंधर। सिंव्हासनि बैसलि राजकुवर।।
छत्रे ढळति सिरवर। कनकदंड चामरे।।४१।।
तव इतुकिया अवेश्वरी। ते केगामति सुंधरी।।
आलंकारे सुपरी। शृंगारिले देखा।।४२।।
मंद मंदर गजगामिनी। महास्वरूप कामिणी।।
मग ते रथावरी बैसोनि। धात्रिसवे।।४३।।
करि घेउनि सुमन समाल। मधुकर रुळे परिमळ।।
सैवराभीतरी ते बाळ। आलि देखा।।४४।।
ते चंद्रवदनि सोमकांति। विसेष पद्मिणि जाती।।
देखोनि सकल भूपति। विस्मयो पावले।।४५।।

१. दंभ, अभिमान.

हे तव भार्या हातवे रूपाचि। ईने मन हारिलि अमुचि।।
चितचोरठि शुभमतिची। हे कंन्या देखा।।४६।।
होति कनकाचि कष्टिंक। पुढ दाई राहिलि सुरेख।।
मग राजकुवरिचि विवेक। विकळ जालि।।४७।।
राजकंन्याकडे पाहोनि। विकार भरले लोचनि।।
राजकुमराचा मनि। अर्थ जाले पैं।।४८।।
येक करि धरोनि विण। वाजविति संगित खुन।।
ऐंसे परि जाणोन। धाविति कंन्यासि।।४९।।
येक मुरडिति मीशिया। कर मुरडति केशिया।।
दाविति पुरुषार्थया। भावप्रमाण।।५०।।
येक दाविति चूडामणि। नवरत्नाचि खेवणि।।
येक दाविति ठेवनी। कठिमेकळिचे।।५१।।
येक दाविति बाहुठे। येक दाविति हार गोमठे।।
कर्णाभरण दाविति नेठे। येक राव पैं।।५२।।
येक दशांगुळे दाविति। येक भावना भाविति।।
येक वक्रद्रष्टि पाहती। कठाक्ष देखा।।५३।।
येक वडिल्या अर्ध दाते। घेता धरिति कराते।।
दर्पणि वदन पाहते। दंत पसरोनि।।५४।।
येक दाविति वाकडे तोंडर। बिद्रे बोलति सुंधर।।
विविध कळा मनोहरा। दाविति देखा।।५५।।
येक नव समनिति मनी। प्रसंन् कराවि भवानी।।
मज वराल हे कामिणि। त्रये रात्र पैं।।५६।।
येक म्हणति या अवसरी। माते चुकलिले सुंदरी।।
तरि दिक्षा घेईन दिगांबरी। सर्वथा देखा।।५७।।

येक म्हणति पूर्व सुक्रत। जरि केलि असति बहुत।।
जरि पाविजेल निरुत[१]। मनवांछित।।५८।।
ऐंसे नानाविध कल्पना। करिति राणे भूप।।
देखोनि कंन्याचे स्वरूपे। अति सुंधर पैं।।५९।।
इतुकिया अवसरी ते बाला। करि धरुनि वरमाला।।
चालिली पै।।६०।।
सकल रायामध्ये सुंधरी। दाई वोळखोवि सुंदरी।।
पस्ये पश गे राजकुंवरी। त्यावरि वेगि पैं।।६१।।
पाहे पा गुजर राजा। हा सिंगळ द्वीपाचे वोजा।।
हा अवंतिचे राजा। महा बळिया।।६२।।
अंग वंग तेलंग त्रिकुळ। भोठ महागोठ गौड स्थुल।।
चिंन महाचिंन प्रबळ। ऐंसे महारावो।।६३।।
शाहणव कुळिचे भुपती। इतुके मध्ये पाहे निरुति।।
जो येइल तुझिया चिति। तो वरि वाहिल।।६४।।
पैले ते याधवरावो। पाहे सामुद्रिक लक्षणे।।
जरि येईल तुझिया मने। तरि बरि वेगी।।६५।।
मग ते केगामति सुंदरी। सर्व पाहिलि ते सुरी।।
येक न ये चित्ताभीतरी। राजकुमरा।।६६।।
बहुत रायामध्ये सुंधरी। उभि राहिलि मनोहारी।
राजहंस बागाभीतरी। तैसे दिसे पैं।।६७।।
सर्व लक्षाचे परवडी। ती दुरुनि पाहिला कापडी[२]।।
कैसि आलि शुभ घडी। तये अवेश्वरी।।६८।।
केगाई म्हणे दाईप्रती। तो गे कापडि माझे पती।।
रथ पेलिला सुमती। तयेजवळी।।६९।।

१. खात्रीने, निश्चितपणे. २. खांद्यावर कावड घेऊन फिरणारा यात्रेकरू.

कापडि देखोनि दाइ म्हणे। धन्ये धन्ये गे सुलक्षणे।।
वर वावरु विचक्षणे। पाहिलि तुम्ही।।७०।।
ऐंसे देखोनि रथ मुरडिला। दशरथासमिप आला।।
मग सकळिके विस्मयो जाला। तेथे देखा।।७१।।
मग ते केगामति बाळा। करि होति वरमाळा।।
ते कंठि घालोनि बाळा। दशरथाचे पैं।।७२।।
आपण राहिला वामांगी। जैसि हंस हंसाचे अंगि।।
कि चंद्र जवळी सुरंगी। रोहिणि जैंसी।।७३।।
राणादेवि भानुजवळी। कि इंद्राणि इंद्रजवळी।।
कि पद्मिणिसि कल्होळि। सेषासवे।।७४।।
तैसि ते देता उपमा। दुजा नाहि दशरथ समा।।
केगामति सांगाडि१ शामा। अधिचेना।।७५।।
बाप दैवा सांगडा। सारिका मिळविले जोडा।।
पूर्व सुक्रत धर्म प्रवडा२। उदयासि आले।।७६।।
ऐंसे देखोनिया धंपती। धन्ये धन्ये राया म्हणति।।
येकाचे निरास मती। तेथ जालि पैं।।७७।।
येक म्हणचि या कुमारी। वरु निवारिला सुपरी।।
अपण योग्ये मनोहारी। कार्येकेले।८।।
वर रत्न येक म्हणति। कैसे वोळखिले निगुति।।
तव जाणितला जगति। अपणा योग्ये।।७९।।
येक म्हणते बुद्धमल्ला। त्याचि पोठि उपजलि सळा।।
रागद्वेष कळकळा। लाई निज करति।।८०।।
येक म्हणति कुवरिने कुडे३ केले। बहुताचे मान दवडिले।।
बापुडे कापडि वरिले। हे द्रुष्ट कंन्या।।८१।।

आता विचार ऐंसा किजे। सकळि राया मिळिजे।।
हे कंन्ये हिरोनि घेयिजे। येक राजकुमरा।।८२।।
ऐंसा विचार केला दुर्जन। मग येकवठले सर्व सैन्ये।।
शुभमति राया मने। वोळखिले त्याचे।।८३।।
मग सावध मन केले। वधुवरा घरा आणिले।।
मग दळ सज्ज केले। अपुले देखा।।८४।।
मग तो शुभमति राजा। म्हणतसे जामाताप्रति।।
तुम्हि कापडि क्षितिपति। हे अम्हि नेणो।।८५।।
ऐंसि सैवरिती तव ऐंसी। कंन्यावरु तोची वर तीसी।।
कुलाल मति ऐंसी। विचारु नये।।८६।।
हे या विपरित जाले। हे तव अंन्याये व्यापले।।
हे दुर्जन नव्हति भले। सर्वथा देखा।।८७।।
शास्त्रार्थेविज्ञानाचा। आणि आपुले कुलाचा।।
हे धरति गर्व साचा। अहंकार वर्ते।।८८।।
म्हणति हे का विन जाती। या कंन्याचा द्रुष्ट मति।।
कंन्या हारु पाहति। आपुलिया बळे।।८९।।
आहो जामाता अणि वचन। हे कंन्या घेउनि जाण।।
जरि सुठेल धावणे। तरि सावरी।।९०।।
तुम्हि या रथावरि बैसोनि। जावे आपुलिया जीव घेउनि।।
मागिल चिंता न करणे। तुम्हि देका।।९१।।
ऐंसे वचने दशरथा। हसोनि म्हणे जयवंता।।
मामा मज द्यावा रथा। तो सबळ द्यावा।।९२।।
अणिक छतिस आयुध। अंगिचेस नाद शुद्ध।।
मम जवळ युद्धे। टाकवे ना।।९३।।

तुमचा रथ द्यावा माथे। तरि मि न टळे समर्थे।।
पळोन जाइल भल तेथे। मम परियसा।।९४।।
मग शुभमति तव म्हणे। जे मागेल ते मि देइन।।
परि येके वेळे जीन[१]। राखावे आपुले।।९५।।
ऐंसे म्हणोनि रथ दिधला। दशरथ वरि आरूढला।
केगामति सवे भला। बलवंत पैं।।९६।।
येउन सन्मुख जाला दशरथ। रोजना करि समर्थ।।
केगामति देखोन प्राणनाथ। विनविला पैं।।९७।।
कर जोडुनि म्हणे कामिणि। अशृवे ढळताति लोचनि।।
काय वसे तुमचे मनि। ते सांगिजो जी।।९८।।
मग तो दशरथ म्हणे। प्रिय धिगस्तु माझि जिने।।
माझी वंसि कुलसंपन्ने। आजि लाधिलि पैं।।९९।।
वैरियासि पाटि नाहि दिधला। ऐंसि सूर्येवंषाचि बोली।।
तरित मजपासुनि गेलि। आजि देखा।।१००।।
मि सुर्येवंषि समर्थ। माझि नाम दशरथ।।
वैरिया पाटि देवोनि जात। ऐंसि आजि।।१।।
ऐंकोनि पतिचे वचन। थोर अनंद जाला मन।।
मग विस्फुरित लोचन। वदन न्याहाळी।।२।।
मग ते केगामति म्हणे। तरि संग्राम का न करणे।।
यउ न द्यावे उणे। सुर्येवंषाचि।।३।।
मग तो दशरथ म्हणे। सारथि नाहि मज कारणे।।
आता म्या संग्रामा करणे। येकांग देखा।।४।।
मग म्हणे केगामति। तुम्हा मज सांगडा सारथी।।
आता तुम्हा मुरडा[२] मागुति। संग्रामा कारणे।।५।।

१. जीवन. २. परत फिरणे.

मी जाणे सकळ कळा। रथ वाजिविन[१] प्रबळा।।
तुम्हि मारु करा सकळा। या दुर्जनासी।।६।।
मग दाखवि कळा निर्मळा। केगाइ पति जवळा।।
मग दशरथ म्हणे बळ। व्हावे तुम्हि पैं।।७।।
दोघे दंपति कारणे वाणि। जालि युद्धाचि बोलणि।।
मग सेला कसिला सुमनि। केगामतिने।।८।।
सर्वालंकार दिसे कैसि। गगन विजु चमके जैसि।।
तैसि मिरवला पैं।।९।।
रथ वागविन बरवा। वारु नाचविन तुरंगा।।
मग भृतारा म्हणे केगा। आता कैसे देवा।।१०।।
सनादे(हे)[२] अंगि घाला। छेतिस आयुधे सबळा।।
अता अंदेश[३] न घ्यावा निर्मळा। मुरुडावयाचा।।११।।
दशरथ आपुलि। स्त्रियेचा सहास देखोनि।।
मग आपुल्या साभिमानि। राव म्हणे पैं।।१२।।
प्रिये आता जाहला भरवसा। पार नाहि पुसे साहसा।।
रथ मुरडावे दिशा। वैरियाचे।।१३।।
रथ चालिलि वैरियावरि। थांबविला दोहि दळाचि सिरि[४]।।
पतिप्रति म्हणे सुंधरी। केगामति।।१४।।
देवा ईतुकिया परी। मिळाले अहंकारी।।
हा रथ घालु कवणावरी। ते सांगिजो पा।।१५।।
मग तो दशरथ म्हणे। रंके मारणे कसे कारणे।।
याचा मुख्ये असेल जेणे। कुडि चाला केलि।।१६।।
तो गे पैला[५] सित छत्रेसी। जेणे वैर मांडिलि आम्हासी।
त्यावरि रथ घाला समरसी। चंद्रवदने।।१७।।

१. घोड्याशिवाय. २. चिलखत. ३. भय, संशय, संकोच. ४. अग्रभागी, समोर. ५. पलीकडे.

प्राणेश्वराचि वाणि बाळा। ऐकोनिया र्‍हदये कमळा।।
स्फुरण आले सकळा। वीरस्त्रीचे।।१८।।
ते रोमांच जाले सर्वांगी। रथ कल्लोळि भूत तरंगे।।
सफतु ध्वजा तरंगे। पवन लहके।।१९।।
मग ते केगाइ कळावले। वारुथा पठिले सबळे।।
बबकारिले निर्मळे। निशंकपणे।।२०।।
उठावया शस्त्रघाते। दशरथ राजे शस्त्रनि घते।।
पाडिले कितिक ध्वजा छत्रे। हेमरथाची।।२१।।
अरणि[१] फेडोनि दशरथ। पैलिकडे गेलि समर्थे।।
जेथ शुभमति महिनाथ। होता देखा।।२२।।
संग्राम माहिला देखता। फळि फोडोनि हेमरथा।।
कडतरा गेला मागुता। पैलीकडे पैं।।२३।।
तेथे हहाकार जाला। येकदा म्हणति आला रे आला।।
पै तो गा कापडि भला। बलवंत देखा।।२४।।
खळबळलि सर्व सैन्ये। क्षेत्रि सांडविलि अभिमान।।
सैराट[२] भरले रण। माझी देखा।।२५।।
मग तो हेमरथ राजा। पुरुषार्थाचिया लाजा।।
सैन्ये थांबविताचि वोजा। सर्वांगे देखा।।२६।।
मग तो ना भि ना भि म्हणे। सावरा रे साभिमाने।।
थिर थिर गाढा म्हणे। बाप माझे।।२७।।
ऐंसे म्हणोनि हेमरथे। सैना सावरि समर्थे।।
संग्रामाचि रचना तेथे। मांडिले तेथे।।२८।।
अनिवार देखोनि कापडि। मोडिल्या फौजाचा प्रवडि[३]।।
गज रथ वाजि दवडि। पायिकाचि पैं।।२९।।

१. सीमा, मर्यादा. २. वेडेवाकडे भरकटणे. ३. प्रौढी, अभिमान.

पुढ जुंझता पापि दळ। मछ पाखरिया[१] सबळ।।
त्या माझि प्रचंड मयंगळ[२]। पर्वतमये जैसा।।३०।।
त्या माघे सनादले[३] रथ। राव बैसले समर्थ।।
महा साभिमान समर्थे। जुंझताति।।३१।।
यितुकिया अवसरि। ते केगामति सुंधरि।।
पतिप्रति म्हणे मनोहारी। सावधान देखा।।३२।।
तव दशरथ म्हणे। च्यारि फौजा फेडोनि जाणे।।
पैलिकडे मुरडोन। मागुते देखा।।३३।।
मागेते रथ पेलिला। चारि फौजा फेडोनि निर्मळा।।
महा साभिमाने बला। गेलि पैलिकडे।।३४।।
दशरथ मारिता प्रवडि। पाडि त्या गजाचा पाकरवडी[४]।।
निवारिले दुर्धर थडि। महाराया पैं।।३५।।
मुरडता रथ दशरथा। वेढिला घाला भोवता।।
त्या चारि फौजा निरुता। वेढिल्या देखा।।३६।।
मग त्या म्हणे प्राणवल्लभे। रथ फेरि घालि शुभे।।
क्षेत्रि कैसा दिसताति उभे। तरु जैसे।।३७।।
मग केगायिने जैसा। रथ फेला जैसा।।
माहाचक्र वेगु तैसा। भवत असे।।३८।।
दशरथाचे सिंव्हनादे। सुभठ जुंझति सवादे।।
फौज सारति अनंदे। विरश्री देखा।।३९।।
येक म्हणति मारा मारा। येक म्हणति जिचि धरा।।
येक म्हणति हारा हारा। कंन्ये रत्न।।४०।।
ऐंसे दुर्वचने बोलति। दशरथ ऐंकोनि वो गत्री।।
मग मारु शुभठा प्रति। करितसे पैं।।४१।।

---

१. माशांचे छत. २. हत्ती. ३. घरघर आवाज करणे. ४. अंबारी.

येकला दशरथ राजा। येकिकडे सर्व भूप वोजा।।
महा रौद्रध्यानि जूंझा। प्रवर्तले देखा।।४२।।
बाण चक्र फाशा तोमर। छत्तिस आयुधाचे भार।।
येकवठले परिचार। पडति देखा।।४३।।
ईतुकेचे दशरथ राजा। घाये जोगवितु वोजा।।
मग अपण सहजा। संग्राम करि पैं।।४४।।
विधि साचि सिर छेदना। करितसे क्षणोक्षणा।।
वेग त्वरे मरणा। वरपडि करि।।४५।।
कर्क कुंतळ कार्मुख बाण। मारितसे अचुक संधान।।
घाये बांबाळ बंधन। जालि शुभठाचि।।४६।
विभंजिले दळ पराक्रमे। यणे क्षेत्रियाचे धमे।।
बहुत राव संग्रामे। निर्बळे देखा।।४७।।
जैसा येकला महामुनि। अंत कर्म येकरी लाधुनि।।
तैसा दशरथ निर्वाणी। बलिया पैं।।४८।।
मोडिले दळ कनकप्रभा। भरले दाहि दिशा ककुभा।।४९।।
मनि वै सुवडा। पाडपाडि करि झगडा।।
तो दशरथ पुढा। उभा ठाकला।।५०।।
मग परिले दशरथ। कापड्या मांडि मन्मथ।।
कामरसी त्वरीत। माझे परिहारे।।५१।।
हे कंन्येरत्न सांडी वहिला। नातरि न पाहिला।।
दशरथ राव भला। उत्तम वंषाचा।।५२।।
जरि तु संग्रामि समर्था। तरि साहे माझी निघातु।।
पइल्याइ माहारथ। मोडिल्या त्याचा।।५३।।

तव दुजा रथि बैसता। दशरथ ढाणिला निघाता।।
मग ते राव हेमरथा। पळसुतला[1]।।५४।।
मग तो तिजे रथ बैसोनि। पळतसे जीव घेउनि।।
मग दशरथे धावोनि। आडोरा केला[2]।।५५।।
राहे साहे हेमप्रभा। त्या दवडिलि सूरप्रभा।।
मग दशरथापुढे उभा। राहे क्षणेक।।५५।।
मागुता निष्टला मुहेरे। रथ मोडिले सुंदर।।
दुजा घाइ पुरे पुरे। करविलि देखा।।५७।।
मग तो हेमप्रभा राजा। शरणांगत राखिला वोजा।।
चरणावरी रूळतसे सहजा। अणिक राये।।५८।।
मग माहारणि दशरथे। नाम सारिले समर्थे।।
मग सकळ राव आक्रांते। शरण आले।।५९।।
येक पळाला दाहि दिशा। येक भरले खास खासा।।
येक पडोनि राहिला मीशा[3]। मेले म्हणोनि।।६०।।
पळता सुभठाचे परवडि। चरणि पळते रैंगडी।।
येक घालिति उडि। जंजाळ देखोनि।।६१।।
पंचानन पुढे गजघंठ। जैसे पळति बारा वाठा।।
तैसे जालिया सुभठा। दशरथापुढे।।६२।।
येकला मल्ल साहसी धिरा। मारु केला बहुता सुरा।।
येक म्हणति बापुडे विरा। कारणे देखा।।६३।।
येक म्हणति देखा हे रमा। पाहुनि हीच्या पराक्रमा।।
रथ वागविला महाधर्मा। कुशल देखा।।६४।।
सुर्येवंषि दशरथ राजे। म्हणोनि राव आले वोजे।।
कर जोडोनि आपुला काजे। चरणि लागलि।।६५।।

१. पळाला. २. आडवा जाणे. ३. ढोंग करून.

मग निशानि घाव वळले। गाजे ढोल वाजिनले।।
जैत भेरिचे१ नाद जाले। तेथ देखा।।६६।।
बंदिवृंदे२ केला कल्होळ। महाशक्ति महाबळ।।
उपमारहित प्रबळ। दशरथ राये।।६७।।
वर्णितातित पराक्रम। महाक्षेत्रियाचे धर्म।।
नितिमार्गाचे अनुक्रम। दशरथ जाणे।।६८।।
शुभमति रायाकारणे। थोर अनंद जाला मन।।
मिळोनि सकळ स्वजन। उत्साह मांडिला।।६९।।
जैसे वर आला होता परवडी। तोचि राव जाले निव्हडी हर्षडी।।
मग मंडप काडोविकडी। घातला देखा।।७०।।
महा मोहोत्सावो पाणिग्रहण। वेचुनि अर्थ भंडार धन।।
शुद्ध करोनि अंतःकर्ण। शुभमतिने पै।।७१।।
तेथे पाहिला पाणिग्रहण केले। विवाहमंगलिक जाले।।
दशरथ राये भले। महिमान देखा।।७२।।
मग कंन्याकारणे। दिधली अर्थभंडार धने।।
त्यावरी सोडशाभूषणे। वराहि दिधली।।७३।।
मग सकळ राव सुमन। दशरथ रायाकारणे।।
आपुल्या शक्तिनिधाना। दिधलि देखा।।७४।।
मग जन कराया कारणे। दिधले सोडशाभरणे।।
मग तो बहुत सन्मान। मानिला देखा।।७५।।
गजे वाजि रत्नभंडार। आणोनि पुढे सार।।
मग ते करि जुहार। दशरथ राया।।७६।।
सिद्धिवृद्धिचा सुरंग सैन्ये। अयोध्या निघाला सैन्ये सुमने।।
दशरथ प्रथम केले प्रयाण। केले शकुनेसी।।७७।।

ढोल निशान नादे। राव अयोध्याचे अनंदे।।
केगामति सहित प्रमोदे। तेथे देखा।।७८।।
उभारिले गुडिया मकर। लाविले त्वारण परिकर।।
प्रवेश केला नरेश्वर। आयोध्यामाझी।।७९।।
त्याच रिति जनकराया। मथुरे प्रवेशला वोजा।।
आपुले राज्याचे काजा। प्रवर्त्तले देखा।।८०।।
जीताने केले दशरथ। राज्येपद बांधिले समर्थ।।
विघ्न लोठले पुण्येवंत। म्हणोनिया पैं।।८१।।
मग तो राज्ये करित जाला। परिवारेसी राव भला।।
अनंद चित्त महिपाला। मान देत पैं।।८२।।
आता सौभाग्य विनिर्मुक्त राव। दशरथ राव दृढ भाव।।
धर्मकर्माचा उपाव। कर जाणे पैं।।८३।।
तो अष्टभोग पुरंधर। आणि पुण्याचे आगर।।
उदारपणे सुरतरु। ठेवणी केली।।८४।।
अनेक रावे येति शरण। भावे सेविति चरण।।
पुरंधर विराजमान। दिव्ये चामरेसी।।८५।।
सोभा भुजबल वेष्टिता। पाळिले अखिल जन संत।।
भूपतिमध्ये जयेवंत। दशरथ राजा।।८६।।
सकल राणियामाझारी। बहुत प्रिति कैकेवरी।।
पूर्णेचंद्र मनोहारि। रूप रंभा जैंसी।।८७।।
तेव राव येकेवेळे। सभेसि होता बैसले।।
सिंव्हासनावरि निर्मळे। शोभिवंत पै।।८८।।
राव विस्फुरित लोचने। रूप न्याहाळिले सुमने।।
म्हणे धन्य धन्य जन्मोनि। अमुचा देखा।।८९।।

१. विजयवाद्ये.  २. भाटांचे समूह.

राये दिधले अर्धसिंव्हासन। वामभागे स्त्रिरत्न।।
बैसविलि रूपनिधान। ते केगामति।।९०।।
उठोनि राये राणे सकळ। नमन केले निर्मळ।।
मग मात काडिलि सबळ। संग्रामाची।।९१।।
दशरथ म्हणे सैवरी। बहुत राव मिळाले सुपरी।।
वरमाळा घातली सुंदरी। माझा कंठि पैं।।९२।।
मि होतो कापडि रूप। क्रोध धरिला सकळ भूप।।
संग्राम मांडिला रौद्र रूप। तेथे देखा।।९३।।
मागिला सांगुनि कथेचि उत्पती। तेथे मज नव्हता सारथी।।
प्राणवल्लभे हे केगामति। मजेप्रति म्हणे।।९४।।
देवि म्हणे मि जाणे रथकळा। रथ वागवीनला प्रबळा।।
या अरिराया सकळा। त्यामाझी देखा।।९५।।
मग माझा मनि झाला भरवसा। ईने रथ वागविनला कैसा।।
उदकामाझी मीन जैसा। तळपे देखा।।९६।।
मग मज जालि प्रचिति। मग हे जालि सारथी।।
मी बैसलो महारथी। छत्तिसायुधी।।९७।।
वैरि निर्दाळिले प्रचंड। साष्टांग केले खंड खंड।।
महा संग्राम जाला वितंड। तेथे देखा।।९८।।
साभिमान सूर्येवंषिचा। ज्याच लोभ धर्म केगायिचा।।
नातरि तेथ आमुचा। ठाव न उरता।।९९।।
तव प्रधान म्हणे समर्थे। ईज वरे द्यावे उचिता।।
आला अवसर चुकता। तो कवणे गुणे।।२००।।
सत्य सत्य गा प्रधाना। राजा म्हणे गुणनिधाना।।
जरि आता होयिजे प्रसंन्। केगायि लागुन।।१।।

तरि प्रधान म्हणे निके। प्रसाद करि वरि विषेष।।
केगामचि प्रती म्हणे सुरेख। दशरथ राजा।।२।।
प्रसंन् जालो तुजकारणे। जे अवडे तुझीया मने।।
ऐंकोनि केगाई म्हणे। प्राणवल्लभे।।३।।
वरदान राखावे भांडारि। मागेन येके अवेश्वरी।।
तधी क्रपा करा मजवरी। दशरथ राये।।४।।
मनोरथ पूरला माझा। देवा हा प्रसाद तुझा।।
आता वडंबरी काजा। अठवन कीजे।।५।।
मग दशरथ राव म्हणे। प्रिये ततक्षणि मागणे।।
वोडविले या कार्याकारणे। विळंब देखा।।६।।
प्रिये अभिलासिता मनाचे। ते मि देईन तुमचे।।
जाणिजे पैं।।७।।
मि तव जाले तुष्ट। मागणे मनाचे अभिष्ट।।
जे तु का मागसि अभिष्ट। ते म्या देणे।।८।।
तुझा उपकार थोर जाला। तुवा रथ महा वागिविला।।
तेणे बळे संव्हार केला। अरिकुळाचा।।९।।
जरि सुर्याचिनी रथी। अरुण जाला सारथी।।
तरि प्रकाश जाला सुगती। व्यापक देखा।।१०।।
तया सारथीयाचेनि बळे। फेडि अंधःकाराचि पठले।।
विचारु लागला निर्मळे। गगनमंडळी।।११।।
यापरि सुर्येवंषाकारणे। प्रकाश जाला तुजे गुणे।।
आता मनकल्पित मागणे। झडकरि पै।।१२।।
मग कर जोडोनि म्हणे। केगामति सुभ वचने।।
माझे वर भांडारि राखणे। सर्वथा देखा।।१३।।

ऐंसि केगायिचे वचने। राव ऐंकोनि तोषला मने।।
मग संतोषला सर्वजने। बरे होय पै।।१४।।
आहो असे मति रत्यंते। कुशळपणे जयेवंत।।
न ढळति रुषि संत। क्वापि न द्रस्येते।।१५।।
म्या दिधले वरदान। यिने राखिले गुढ गहन।।
देखा गंभिरपणे। मृगलोचनी।।१६।।
ऐंसे म्हणोनि संतुष्ट जाला। दशरथ राव मानवला।।
केगामतिने नमस्कार केला। चरणकमळी।।१७।।
आज्ञा घेउनि सुंदरी। आली आपुलि मंदिरी।।
राव प्रसंन् जाला सुपरी। काये मागे।।१८।।
ऐंसि मनेसि करि विचार। मज मानवले प्राणेश्वर।।
तेव्हा मजे जाला भरवसा थोर। जेव्हा मागेन।।१९।।
ऐंसे म्हणोनि केगामति। धर्मध्यान करि जुगति।।
प्रसंन् जाला पति। म्हणोनिया।।२०।।
रूपसौभाग्याचा पडिभार। सर्व कळेचा शृंगार।।
वरि लावण्याचा अहंकार। व्यापला केगाई।।२१।।
धर्मध्याने दशरथ। राज्ये करि समर्थ।।
नितिमार्गेजयवंत। सदाचर पैं।।२२।।
गौतम म्हणे श्रेणिका। तुवा पुसि केलि सुरेखा।।
केगाइ करु सुदलि वाखा। ऐंसि केवि घडे।।२३।।
हे प्रछेचे उत्तर महंता। केगाइ सारथि दशरथा।।
त्यात बैसोनि महंत। वागविला देखा।।२४।।
या कारणे प्रसंन् जाला। वर भंडारि राखिला।।
तो पुढा येईल भला। केगाई कामा।।२५।।

ऐंसि वृत्ति सुर्येवंषाचि। विधि पाळी दया धर्माचि।।
लक्ष्मि उपार्जिलि साचि। याचा वंषी।।२६५।।

**।। केगायि वरदाने प्रसंग तेरा।।१३।।**

* * *

# चतुर्दशम अध्याय

**।। उँ नमो सिध्येभ्यो नमाः।।**

आगा ये श्रेणिक नरेश्वरा। आता सांगेन मनोहरा।।
श्रीरामाचि उत्पत्ति सुंधरा। परिऐंसि पाहा।।१।।
जो त्रिखंडिचा अधिपति। ज्याचा सेवकु सुरपती।।
त्रिभुवनवल्लभ सन्मती। रामाभिराम।।२।।
जो आठवा अवतारी। स्वामी अवतारला सुपरी।।
सुर्येवंषि भितरी। भानु जैसा।।३।
राम नाम रमणिक जना। रसे रंगिलि हे रसना।।
थोर गोढ वाठे मना। अंमृत जैसा।।४।।
उपमा नाहि या रामनामा। सोये वाठे हे अम्हा।।
काये म्हणोनिया सहस्रनामा। तुकेल[१] देखा।।५।।
कनकाते आणि खद्योता[२]। सिरगोळ्या[३] आणि रत्न महंता।।
वोढवीली अग्नि आणि संता। रिकेवि घडे।।६।।
कास्मीर कुंकुमाचि उपमा। म्हणे चंद्र सिंपीया[४] समा।।
हे केवि घडे परमा। राये देखा।।७।।
मरगज[५] मणि अनि काचा। मेरु सरि डोंगराचा।।
भाउ अनु नये।।८।।
क्षिरसागर लवण वर्णावा। सरि केवि घडे मनोभावा।।
दोघे आणि महा तरुवा। सरि करु नये।।९।।

१. तुलना होणे. २. काजवा. ३. गारगोटी. ४. शिंपला. ५. पाचू.

कुसुंबा[१] कुंकुम केशरा। बावंन् चंदन रूप सरा।।
सरि केवि घडे मनोहारा। साजो पा।।१०।।
    जाई जूई मल्लि मुचूकुंदा। यित्यादि पुष्पे सुगंधा।।
    तरवडासि विबुद्धा। केवि किजे।।११।।
चिंतामणि अ(णि) पथरा[२]। सरि केवि किजे मनोहारा।।
देवद्वार अणि सुरतरा। सरि केवि किजे।।१२।।
    इंद्र अणि इंद्रगोपा[३]। किंकरा अणि भूपा।।
    कुरूपा अणि रूपा। सरि केवि घडे।।१३।।
कूप अणि मानसरोवरा। रत्नाकरा अणि थिल्लरा[५]।।
पयोदधि अणि सरोवरा। सरे केवि ते पै।।१४।।
    गंगोदक अणि मृगजळ। सारमया[६] अणि शार्दूल[७]।।
    सिखि अणि कमळ। सरि केवि घडे।।१५।।
त्रिषष्टी सलाखपुरुष[८]। उपमा केवि दिजे सुरेख।।
अगा ये महाराया श्रेणिका। परियसि पा।।१६।।
    या श्री रामचंद्राकारणे। उपमा द्यावि कवणे।।
    उपमा योजिता दुषणे। कविश्वरा पैं।।१७।।
या धरणेंद्र सहस्रफणि। दोनि सहस्र रसनि।।
आयुष्याचे सागर प्रमाणि। गुण वर्णविता।।१८।।
    तरि पार न ठाके सेष। यिंद्रादिक नाहि भरवस।।
    तरि कविश्वर कैसे। बोलु पाहे।।१९।।
येवं चवदा भुवने वसुंधरा। कागद किजे मनोहरा।।
वन लेखणि दवत सागरा। सांगडि[९] किजे।।२०।।

---

१. करडईच्या फुलापासून काढलेला रंग.  २. प्रस्तर, खडक, दगड.
३. एक पावसाळी किडा.  ५. डबके.  ६. कुत्रा.  ७. वाघ.  ८. शलाकापुरुष.
९. संगत, मेळ.

विधाता ल्याहावया बैसे। या श्रीरामाचि गुण कैसे।।
समुद्राचा तरंग ऐंसे। मविलि नवताती।।२१।।
अनंत गुण रामचंद्राचि। आता स्थळ सांगेन जन्माचि।।
सूचनामात्र गुण त्याचि। ऐंका श्रेणिका।।२२।।
लिहिता न पुरे वसुंधरा। मसि रिलिया सागरा।।
लेखणिया तरूवरा।

**इथून पुढे काही ओव्या नाहीत. हस्तलिखितातील पत्र क्र. १२१ त १२९ ही पत्रे दिसत नाहीत**

त वदना। होताति देखा।।३४।।
सवे जि अपण हसे कैसी। विकसिले सोमकांति जैसै।।
मग पूरवितसे आशा। मायेबापाचि।।३५।।
मग अपराजित म्हणे। बा रे टाळिया काणे बाणे।।
देवा पोळि कोणि खाणे। रामचंद्रा।।३६।।
मग तो करनळि पावया। मग हसति बापमाया।।
देखता सर्व दुःख जाया। क्षणामाझी।।३७।।
मग बोबडा बोल बोलिति। जैसि हे बोबडि सरस्वति।।
जनक जननि त्याचे रिति। बालकासि बोलति।।३८।।
मग मुखि चुंबन देउनि। जननि कडिवरी घेउनि।।
मग ते लिंबलोण करोनि। घरांत नेला।।३९।।
चापेल[१] चोपडी लाविलि। नाहाणिति चंदनाचा खालि।।
बळि महानिर्मळ जालि। स्नान करावी।।४०।।
देवांग[२] वस्त्र पूसिले अंग। कज्जल खोपा लेयिला चंग।।
बाल लेणियाचि[३] अनुराग। प्रगठले देखा।।४१।।

१. चाफ्याचे तेल. २. रेशमी वस्त्र. ३. लेणे, अलंकार.

नवरत्न खचित पालखि। वरि घातलि हंस पुतळि।।
आबळिल्या सकळ कनक। ताडपत्रियाचा।।४२।।
बाळ निजविला समर्था। वोविया गाये अपराजिता।।
निज निज बा रे रघुनाथा। परमात्मया रामा।।४३।।
हलु कुलु लुलु आईला। अरे तान्हिया बाळा।।
तुझीया भुजबळा। रक्षण किजे हा।।४४।।
हलु रामचंद्र देवा। करिति सुर नर सेवा।।
राम नाम भावा। हा आत्मपूतळा रामा।।४५।।
हलउ तान्हीया बाळा। निज लाविजे डोळा।।
सुखाचे सोहळा। हा रामचंद्र।।४६।।
हलउ मदनाचे पुतळा। रामचंद्र बाळा।।
मिळोनि सकळा। लिंबलोण किजे।।४७।।
हलउ राम लक्ष्मण। जैसे शशि भानु।।
परब्रंह्मा तनु। अवतारले।।४८।।
हलउ हे बांधवाचे जालि। राम लक्ष्मण बळी।।
मागे गूळ पोळी। थिजले तूपा।।४९।।
हलउ रामचंद्र देवा। निद्रा केलि मावा।।
हसोनिया भावा। बैस ठले।।५०।।
भाषा पालखाचि श्रीराम राणा बैसोनि।
बैसला देखोनि साहे द्रिष्टी पाहे जननी।।
झोपा घालि कंठियाचे कारणे।
तव उचलोनि घेतला अनंद मने।।
जो जो जो जो रे रामा।।
विगठ आलि निज दाधीसी अम्हा।।५१।।

तव रामचंद्र अलि[1] घेतलि कैसी। चंद्रबिंब मागे जननियपासी।।
तया कारणे रोदना करी। जननियाचा पालव[2] तो धृड धरी जो जो।।५२।।
सुर्याचे बिंब खेळावया मागे। नारि देखोनि उतावेळ ते मागे।
पद्मराग रत्न मग दिधले। मग मुखी घालुनि स्वाद पाहे।।५३।।
मग त सांडुनि घातलि लोळी। रामे मांडिलि नाथिलि आळी।।
जननिये धरीता नागवे बळी। निर्मळ तनुते भरले धूळी जो जो।।५४।।
मग ते जननि कडिये घेउनि। आपुले पालले तनु ते पुसुनि।।
नानाविध बुझावि मालिनि। अळी सांडि बापा रघुनाथा।।५५।।
आता घेइ बापा मोदक। नाना परिचे सुरेख।।
अमृतमये देखा। रामचंद्रा।।५६।।
तीळलाडू अणि सेवलाडू। मोतिरंग अणि गुजलाडू।।
वाजने अणि मुद्गलाडू। घेइ लाडू।।५७।।
नातरि देउ अमृतलाडू। नातरि देउ क्षिरलाडू।।
घेइ बापा बिजलाडू। माझिया पैं।।५८।।
नातरि देउ पुष्टि लाडू। नातरि देउ तुष्टिलाडू।।
तानुलिया रामा।।५९।।
नातरि घे मनलापसी। संत सुस्निग्ध मनलापसि।।
नातरि बरवि खिसमिसी। द्राक्ष घेई।।६०।।
नातरि घे मांडि मुरकी। नातरि घेवर फेणि निकी।।
तव राज साखरेसी की। बाप माझीया।।६१।।
नातरि दहितरे सुहाळी। बतासे फेणिया निर्मळि।।
साखरे खांडमि कोवळी। घेइ रामा।।६२।।
नातरि घेइ साकरमांड। नातरि घेइ अमृत उंड।।
असेल मिरि रुचि गोड। तरि देइन।।६३।।

१. हट्ट. २. पदर.

नातरि संजोरि घारिया। नातरि घे गुळपोळिया।।
अथवा घे मांडि पूरिया। माझीया विसाविया।।६५।।
मि देइन अमृतफळे। घेइ दुधेसि साकर केळे।।
नातरि घेई कोहळेपाक देखा।।६६।।
नातरि बापा श्रीरामा। नारेळपाक देइन तुम्हा।।
इतुके घे परी अम्हा। दग्धु[१] नको।।६७।।
मि देइन साकरंगे। नातरि देइन नारंगे।।
नातरि घे मातुलिंगे[२]। नावदेसी।।६८।।
मि तुज देइन सिकरण। कि पीकलि बरवि रापण।।
नातरि देइन कारण। सपक्क देखा।।६९।।
अथवा उततियाचे फडरू। घेइ पिकले सुरसे।।
नातरि रसाळ सुरसे। घेइ द्राक्षघड।।७०।।
दे(इ)न पिकले जंबिर[३]। नातरि डंडि मनोहर।।
कमाघ खेघे सुंदर। जांबुलवर्ण।।७१।।
देइन साकरकविठे। अणि बोलि खोबर गरिष्ट।।
श्रीफळाचि क्षिर स्वादिष्ट। साखरेसी घेइ।।७२।।
नातरि बरवे सोळे। अति रसाळ कोवळे।।
नातरि सिंगाडे निर्मळे। सिघोल देइन।।७३।।
राघोबा कनकाचे ताठी। मि घालिन क्षिर गोमठी।।
ते जिभेचि कसवठि[४]। लाउनि देखा।।७४।।
अहो श्रीरामा अळिकरा[५]। वाया रडसि मनोहरा।।
तांदुलासि क्षीर सुंधरा। घेई रामा।।७५।।
नातरि लाडू इलाचि। अथवा सेवयाचि।।
नातरि नारियेळ खंडाचि। क्षीर देइन रामा।।७६।।

१. दाह-ताप, पीडा देणे. २. सुपारी. ३. ईडलिंबू, महाळुंग. ४. कसोटी. ५. हट्टी.

नातरि म्हणसी त्यापरी। वळवाठाचा[1] घालिन क्षिरी।।
सेवया सरवळि सुपरी। वेळिन आता।।७७।।
मालत्या नकुले वोदुळे। सणोले चिंचुळे पणौले।।
निंबे दाळिंबे मागरूळे। वेळिन आता मि।।७८।।
मि देइन माझिया वासुरा। नातरि मि घेइन सुंदरा।।
बापा रामचंद्रा।।७९।।
चारंबे गोडंबे भातुके। दुग्धासि पोहे निके।।
देइन पुत्रा सुरेखे। पिकले दाळिंब।।८०।।
नातरी सुवर्णाचि कंचोळी[2]। इक्षुरस भरोनि निर्मळि।।
नातरि पियुषाचि गळाळा। स्विकरितु।।८१।।
खडिये खडिये केळे निळे। हे उस घेइ निर्मळे।।
नातरि गुळाचे सदाफळे। घेइ रामचंद्रा।।८२।।
पाहे पा शास्त्राचे जुगति। वेडनि निपजले किति।।
घृत शर्करेसी हाती। देईन देवा।।८३।।
घारडे पूरवडे धईवडे। अणि चारणवडे घोळवडे।।
चिंचवडे बिंबवडे। अंबवडे देइन।।८४।।
पुढवेष्टन पाठि इरी। शाल्योदन सुपरी।।
दधि करु चिवा घेउनि बरि। सुखि राहे।।८५।।
ऐंसि शडुरष पक्कांने्। वरि चौसष्ट व्यंजन।।
माता अपराजिता सुमन। दाखवितसे।।८६।।
तो न समजे कवणे परी। मग झींपुरेठी[3] धरोनि।।
भये दाखवि मनोहारि। त्या पुत्राप्रती।।८७।।
मग ते बाळक कैसे। अंबे वदन पाहोनि हसे।।
तेथे प्रमोदे भानुचिसे प्रकाशिलि।।८८।।

१. बोटवे. २. द्रोण, वाटी. ३. छडी, वेत.

धावोनि धरिले अंबिकेशी[१]। कुमर लागला कंठासी।।
गाढा ह्रदये कमळासी। धरोनि अंबा।।८९।।
वदनि चुंबन करोनि प्रेमे। मन संतोषलि पुत्र रामे।।
अगे बाइ राम नामे। उधरलो देखा।।९०।।
रामचंद्राचि बाललिला। ते थोर दुर्लभ देवकुळा।।
सेष वर्णिता देव सकळा अयु प्रबळा। पुरेचि ना।।९१।।
ऐंसे रामचंद्राकारणे। अंगी नित्य नवि आभरणे।।
घनघठित नवरत्ने। जडित देखा।।९२।।
मनकल्पित कल्पना। सदा पुरति सुमना।।
वर्णिता श्री रामा गुणा। पार नाहि पा।।९३।।
कुमरपद प्राप्त जाले। दोघे बंधव रव नव्हळे।।
चंद्र सुर्या लोपले। गेले देहकांति।।९४।।
कुंकुम चंदनाचे उठी। अंगि बाणलि सघठी।।
गंगोयेरस संपुठी। रजत्पंजर नो इव।।९५।।
पूर्वजन्म सुक्रत अत्यंत। परस्परे श्नेह महंत।।
सदा अनंद भरित। दोघे दोघा।।९६।।
स्वजन परजनाकारणे। दोघे प्रमोदाचे भजन।।
प्रेमात्यांत व्हाव येणे गुणे। विधाते रचिलि।।९७।।
रामलक्ष्मणा दानगुणे। दारिद्र विभाडिले सुमने।।
सर्व संतोषा कारणे। या मुक्ति जन्मला।।९८।।
ते तव सदा अनंदमये। लोक करति जयेजयेकार।।
श्रीराम अवतारि निर्भये। सर्वत्र जाले।।९९।।
दोघे भानु पुष्टि कैसी। महाभद्र हस्ति जैसी।।
नातरि पर्वत ऐंसी। उतुंग देखा।।१००।।

---

१. मातेस.

महा वीर्येवंत पराक्रमि। महा धृड जैन धर्मि।।
आगम सिद्धांताचे वर्मि। तात्पर्येदेखा।।१।।
पूर्वि जाले नारायेण बळी। महाख्याति प्रथ्वीतळी।।
तैसी हे बंधवाचे जाली। मूर्ति देखा।।२।।
राम लक्ष्मण मनोहार। सुर्येवंषाचा श्रींगार।।
अतिस्वरूप सुंधर। गुणज्ञान देखा।।३।।
इतुके अवेश्वरि सुंधरी। केगामति मनोहारी।।
शुभ स्वप्ने देखे मनोहारी। परोपरिचि।।४।।
पुर्ववत् स्वप्न सुचना। पुत्र उपजला आधाना[1]।।
मग केगाइ नव महिना। प्रसुत जाली।।५।।
पुत्र जाला केगाइकारणे। मग रावो दशरथ म्हणे।।
भरत नाम धारणे। या पुत्राचे देखा।।६।।
महा उत्साह जाला सुपरी। यिये केगामतिचा घरी।।
बाळक्रिडा विविधापरी। भरत खेळे।।७।।
तव सुप्रभा राणिकारणे। पुत्र जाला सुलक्षणे।।
शत्रुंघ्ने नाम सुमने। ठेविले देखा।।८।।
तेणे आपुल्या तेजे भास्कर। लोपला महामनोहार।।
कांति लोपले शशिकर। शत्रुघ्ने देखा।।९।।
सौभाग्ये गुणाचे सागर। पुत्र जाला गुणाचे आगर।।
मयेंकु[2] जैसा मनोहार। अढळ जैसा।।१०।।
बळि म्हणोनि अपराजिता। पय नाम अळवि माता।।
या रामचंद्रा जयेवंता। प्रति देखा।।११।।
मग ते सुमित्रा सुंदरि। लक्ष्मण प्रतिहारी।।
माता ऐसे नामे पाचारि। सर्वदा देखा।।१२।।

---

१. गर्भामध्ये. २.मृगांक, चंद्र.

केगाइ म्हणे भरतेश्वरा। होई पुत्र नरेश्वरा।।
म्हणोनि भरतकुमरा। नाम आळवी।।१३।।

शत्रुघ्नाचे मानमर्धन। म्हणोनि नाम धरिले शत्रुघ्ने।।
येणे नामे माता गुण। आळवि देखा।।१४।।

स्व स्व पुत्राजननी। आळवि पूरवीती सुमनी।।
आसनि शयेनि भोजनि। सदा सावधान।।१५।।

सांगे समाचारी पुत्र। उत्तम पदार्थाचे सुत्रा।।
गुणरत्नाचि रासी पवित्र। च्यारि बंधव।।१६।।

आता पाठावयास वयास। बाळ कधि पडे प्रकाश।।
सर्व शास्त्राचि विश्वास। मन भेदे देखा।।१७।।

ऐंसे चारि पुत्र दशरथा। देखोनि विचारिले समर्था।।
आता हे पुत्र शास्त्रार्था। बळि करावे।।१८।।

ऐंसि चिंता पडलि जनका। आता उपाद्या पाहु निका[1]।।
बहुश्रुत शास्त्र व्यक्त सिका। अनुग्रह करि।।१९।।

ऐंसे चिंते अवसरी। सांगेन उपाध्याचे परी।।
कपिला नाम नगरी। अति सुंधर पैं।।२०।।

मग विद्वीजनाचे स्थानका। माहा शास्त्राचे मानका।।
आणिक विद्वांसाचे निका। तेथे देखा।।२१।।

भार्गवाक्ष उपाध्ये तेथे। तो महाबळि शास्त्रार्थे।।
शेषमति भार्या तयाते। सुंधर देखा।।२२।।

तया पुत्र येरु कुमरा। मायबापाचा लाड करा।।
दुर्विनई अणि दुर्धरा। प्रचंड देखा।।२३।।

नगरामध्ये झुठ झगडे। लोकासवे करि गाढे।।
अवघड येउनि पडे। माये बापा।।२४।।

---

१. उत्तम, निष्णात.

यति गऱ्हाणि यावरि गऱ्हाणी। उबगला जनक जननि।।
मग उबगवाणा मनि। जाये देखा।।२५।।
        मायेबाप बहुतापरी। सिकविति सज्जन सोयिरि।।
        परि तो म्हणतले न करि। कवणाचे देखा।।२६।।
मग तो येरु निघाला बापा। पूर्ववत् महापापा।।
वस्त्रहिन दारिद्र रूपा। प्रयाण करि।।२७।।
        मायेबापाचे साभिमान। म्हणे करि द्रव्योपार्जन।।
        नातरि  विद्यासाधन। करिन देखा।।२८।।
ऐंसे म्हणोनि देशा उरे। हिंडतसे पुर नगरे।।
आथ निधाने वसुंधरे। वरि हिंडे।।२९।।
        भृमत भृमत पावला। राजग्रह नगरासि आला।।
        त्या नगरि स्थिरावला। येरु देखा।।३०।।
तत्र वैसख्ये उपाध्या। ते जाणे धनुवेद विद्या।।
बाहातरि कळा शुद्धा। तो जाणे देखा।।३१।।
        येरु गेला त्या जवळा। दंडवत केला निर्मळा।।
        मग म्हणे सकळा। मज कृपा करि।।३२।।
मि सिष्ये होइन तुमचा। अम्हा उद्धारि साचा।।
देव विद्यादानाचा। प्रसाद करी।।३३।।
        मग तो गुरु वैवस्वत। येरु देखिला जयेवंत।।
        सहस्त्र शिष्ये मध्य पठता। जाला देखा।।३४।।
मग तेणे पर शुभगे। धनुर्विद्या सिकले सुसंगे।।
सहस्त्र सिष्यावरि चांग। अधिक जाले पैं।।३५।।
        शस्त्र शस्त्रविद्या कुशळ। झाला विज्ञाने प्रबळ।।
        सर्व गुणे निर्मळ। येरु प्राप्त जाला।।३६।।

कुशाग्र भूप ऐंकोनि। स्वपुत्रापरि सविज्ञानि।।
मग येरा देखोनि नयेनि। कोप धरिला।।३७।।
मग म्हणे प्रधानाप्रति। देखाचा शास्त्राचार्याचि गति।।
माझा पुत्रावरि मति। उदास धरिला।।३८।।
ग्रास आदाये[१] खाये अमुचे। निवाहो किजे आमुचे कुमराचे।।
आणि उदास भाव याचे। अम्हावरि।।३९।।
नेणे कोण प्रदेशि आला। तो शास्त्रे निपुण जाला।।
माझीये पुत्राउनि आगळा। पंडित पै।।४०।।
ऐंसियासि काय किजे। प्रधान म्हणे दंडिजे।।
पहिला पारखि किजे। मग देशवठु[२]।।४१।।
ऐंसि राजपुत्र ऐंकोनि। शास्त्राचार्येविचारिले मनी।।
आचार्येप्रती म्हणे कवनि। बुद्धि निस्तारावे।।४२।।
मग येरु म्हणे श्रीगुरु। तु चिंता काहि नको करु।।
आलि विघ्न निस्तारु। बुधिबळे देखा।।४३।।
तव रायाचे बोलवणे। आला शास्त्राचार्या कारणे।
मग ते गेला सभेकारणे। तात्काळि पैं।।४४।।
आसिर्वाद दिधला राजेश्वरा। मग राव म्हणे मनोहरा।।
तुमचे सिष्ये अणि सुंधरा। सर्वहि।।४५।।
कवन किति अनुभव जाला। ऐंसा विचार केला भला।।
पंडित बोलाविला। सहस्र सिष्यासी।।४६।।
सकला मिळोनि तेथे। सभा भरले समर्थे।।
राव राणे मिळाले तेथे। प्रचुर देखा।।४७।।
कुवर आपुल्याले परी। धनुर्विद्या विति सारी।।
मग येकयेकावरी। चडते ते देखा।।४८।।

१. दिलेला. २.देशातून घालवून देणे.

मग उठले राजकुवर। मग ठाकिले संधान शर।।
अवघे परिस सुंधर। निवठले पैं।।४९।।
मग येरु उठिला कैसा। जाणितला प्रभुचे मानस।।
सुखाचे सिरोमणि तैसे। बळे जाला।।५०।।
करि घेउनि शरासन। कुमर करि सम संधान।।
भलते उति जाति बाण। येराचे देखोनि।।५१।।
मग राव गदगद हसे। भला मूर्ख म्हणोनि संतोषे।।
राव म्हणे साक्ष ऐंसे। हा गुरू वर्जे।।५२।।
म्हणवोनि शास्त्राचार्याकारणे। राये पसाउ[1] केले सुमने।।
मग संतोषविला दानमाने। उपाध्यासि देखा।।५३।।
मग तो वैवस्वता भला। हरिखे मन आपुले घरा आला।।
शास्त्राचार्यानि विज्ञ जाला। येराचे बुद्धि।।५४।।
मग तेणे वैवस्वत। घराकारणे जयवंत।।
आपुलि कंन्या दिधली जयवंत। विवाह मंगले।।५५।।
मग तो येरु प्रसंन्मूर्ति। निघाला मोठीया राति।।
मग आला आयोध्याप्रती। राजेभयाने।।५६।।
मग येरु म्हणे मामा। आता आज्ञा द्यावि अम्हा।।
मी राहता हरावो तुंम्हा। बरवे न करी।।५७।।
जाउनि भेठला समर्थे। महाराया दशरथा।।
आपुलि कला दावि संता। महंता प्रती।।५८।।
दशरथ राया त्या कारणे। दिधलि वस्त्राभरणे।।
थोर मानिला विद्याकारणे। येरुते देखा।।५९।।
मग दिधला दयापराय अवस। मग त्यासि केलि ग्रास।।
सकळ कळेचे प्रकाश। दाविता जाला।।६०।।

१. प्रसाद, कृपा.

मग दशरथ राये भले। पुत्राचेने सालग केले।।
मग ते चारि पडो घातले[१]। हे राजबाळ पैं।।६१।।
        मोहोत्साव केला भल्यापरी। नानाविध वाजंत्राचे गजरी।।
        धवल मंगल राजनारी। सम शुभा।।६१।।
राम लक्ष्मण भरथ। चवथा शत्रुघ्ने महंत।।
यामध्ये महा बुद्धिवंत। रामचंद्र देखा।।६२।।
        यापरि देत सिकवण। बुधिबळे या लक्ष्मण।।
        भरथ अणि शत्रुघ्ने। काहि येक उने।।६३।।
मग चवघे बंधवाकारणे। प्राज्ञा वालिलि सुमने।।
मग साधिति कळा विधाने। आपुले बुद्धि।।६४।।
        शस्त्रास्त्र कळा प्रविणता। वृधि होउ लागलि महंता।।
        बीजेपासोनि (नि)सिकांता[२]। तैसि प्राज्ञ वाटे।।६५।।
दिन दिन कळा चडे। चवघे कुवर पठति गाढे।।
सांगितलेहुनि पुढे पुढे। धावति देखा।।६६।।
        जो गुरुउपदेशी सज्ञानि। प्राज्ञावंत होय विज्ञानि।।
        तव तव श्री गुरुचा मनि। अनंद उपजे।।६७।।
जय कांति संत त्या कन्यका। तैसा प्राज्ञ होये सुरेखा।।
तव त्या गुरुचा विवेका। बुधि घडे।।६८।।
        जैसा महारत्नाचे प्रकाश। तैसा शिष्ये होये शुभाषे।।
        तरि गुरुचि पडे उल्हासे। उपदेश बापा।।६९।।
जरि शिष्ये होये अज्ञानि। ते महागुरुचे कष्ट मनि।।
न भेदे उपदेश मानि। क्रष्टण पाषाणवत।।७०।।
        जरि सिष्य होये मुर्खता। तरि मरणे पंडिता।।
        नातरि दुषणे सर्वथा। कुसिष्यसंगे।।७१।।

१. शिकण्यास दिले.   २. चंद्र.

कुसिष्या पठकिता पंडता। उपदेश जाय वेर्था।।
तो पठिता प्रति उत्पता। भजो पाहे पैं।।७२।।
ऐंसि जाणोनिया कारणे। कुसिष्या न करावे सुमने।।
भूमि पाहोनि पेरणे। सुबिज देखा।।७३।।
सुगुरु सुशिष्याचे भावे। विद्या विज्ञान लब्दी पावो।।
ऐंसा परि पारांग न तद्भावो। शास्त्रसिंधू देखा।।७४।।
आता आसोक बाळकपण। पुढील कथेचा व्याख्यान।।
सांगेन श्रोतीया लागुन। यथानुगती।।७५।।
सकल शास्त्री निपुणता। करूनि दिधला दशरथा।।
म्हणे गा राया समर्था। परिक्षा पाहि।।७६।।
मग चहु नंदनि निके। पारखि दाविले सुरेखे।।
दशरथ राजा हरिखे। चिंतामाजी।।७७।।
दशरथ येरा कारणे। दिधले बहु दान माने।।
पंडित संतोषलि दाने। दाने। दाउनि विद्या।।७८।।
विनयवंत आणि विवेकी। बहु गुणाढ्ये अणि संतोषी।।
चारि सिष्ये खेळ खेळति निके। मनोज्ञा देखा।।७९।।
आपुले नंदन देखोन। संतोषति जनक जननि।।
तेथे सकल जन मनी। आनंद देखा।।८०।।
काव्या प्राप्तौवपुत्ररत्नान। निरोपम गुणवीर्यादि प्रविण।।
तनुदिन परम प्राप्यौख्यारासिंन्
रेजायोध्यादिनाथो दशरथनृपति माहाम्येसोत्रं।।३८५।।

**ईति श्रीरामचरित्रे आचार्येगुणकीर्ति विरचिते चतुर्बंधू**
**विद्याभ्यासनोनां चतुर्थदशमोध्यायाः।। प्रसंग १४।।**
**श्री आदिनाथार्पणमस्तु। जयजये नमोस्तु नमोस्तु।**
**श्री गुरुनाथ नमोस्तु। शुभं मं।।**

* * *

# पंचदशम अध्याय

**।। ॐ नमो सिध्येभ्यो नमः।।**

आगा श्रेणिक नरेश्वरा। आता सांगेन कथा मनोहारा।।
परिस पा चतुरा। जनक रायाचि।।१।।
चित्त सावधान करि। हे कथा विस्म्येकरी।।
जनक मथुरा नगरी। राज्ये करि पैं।।२।।
विदेहि रमा पट्टराणि। परिपूर्ण सर्व लक्षणि।।
पतिचित्तानुसार गामिनि। ते चंद्रवदना।।३।।
गर्भोत्पति जाले तया बाळे। गर्भचिंन् बाणलि तये वेळे।।
रक्षण पडले निर्मळे। गर्भाकारणे।।४।।
जव तिहि होये प्रसुति। तव ते असुर राखिति।।
ऐंसे ऐंकोनि बहुमति। श्रेणिक म्हणे।।५।।
देवा सांगिजो कारण। का पडले असुराचे रक्षण।
कवणे गुणे जतन। करिति देखा।।६।।
हा विस्मयो अमुचे मनि। संदेह फेडा शुभ वचनि।।
हा प्रसंग माझे श्रवणि। अलंकार किजे।।७।।
तव गौतुम म्हने श्रेणिका। प्रस्न केले सुरेखा।।
विवेकि श्रोता तुजसारिखा। दुजा नाहि।।८।।
मग गौतुम सांगे सुपरी। चक्रध्वज राजा चक्रपुरी।।
मनश्चिति भार्या त्याचे घरी। प्राणवल्लभा।।९।।

चित्रोत्सवा नामे कंन्या जालि। योंवन अवस्था पावलि।।
मग माये बापे पडो घातलि। आचार्यापासी।।१०।।
        रूपवंति चित्रोत्सवा। परिवर्तना चपलभावा।।
        इतुकेवरी व्हावा। ऐंसिया भावि भजे।।११।।
तव तेथे रायाचे पुरोहित। धूमकेतु नामे महंत।।
तो स्वहा प्रियेचे कांत। संत देखा।।१२।।
        त्याचे पुत्र नामे पिंगल। तो पडो घातला निर्मळ।।
        चित्रोत्सवा अणि पिंगळ। दोघे पठति।।१३।।
त्या दोघा पडता पडता। मनोभावे भेद केले मन्मथा।।
मग अन्योन्ये कामकथा। करिति देखा।।१४।।
        अन्योन्ये कठाक्ष लोचन। येकमेकाचे वदन।।
        परस्परे हारिलि मन। पाहति जालि।।१५।।
दुश्चित जाले दोघेजण। उपनलिया प्रेमाचे वचन।।
दोघा बांधले मोहने। धृड देखा।।१६।।
        पंडित सांगे परम वाचे। मग त्या न ये मुखि साचे।।
        मग देवो पाहति लालुचे। पंडिता प्रति।।१७।।
मग पंडिता हाति चढती। दोघे द्यावया झडती।।
मग काकुलति रडती। दोघे जण।।१८।।
        मग हाति पाठि दोघाने। वरात्र घोष करिति वचनी।।
        परि त्या दोघाचा मन। अक्षार न ये।।१९।।
विद्या साधावे साभिमान। विद्या साधावे शुभ मने।।
सर्वथा देखा।।२०।।
        विद्या साधावे येक चिते। विद्या साधावे आत्महित।।
        तरि चित झाले दुश्चित। तरि विद्या न ये।।२१।।

येक चिते विद्या साधिजे। विद्या विनाची बाधिजे।।
येणे गुणे लाहिजे। सर्वथा देखा।।२२।।
संसारभावे सुंन्ये धरावे। मग ध्यान करावे।।
चपलपण हरावे। मनाचे पैं।।२३।।
संकल्प विकल्प सर्व। चित अभ्यासनि मांडावे।।
या प्रमादाचे सांडावे। तरिच विद्या घडे।।२४।।
या प्रकारे विद्याबळे। पाविजति अमृत फळ।।
सर्व मनोरथ अवलिले। पुरति देखा।।२५।।
विद्या म्हणिजे दुजे निधान। विद्या चिंतामणि रत्न।।
विद्या सुरतरु समान। सुखदायेनि।।२६।।
विद्यासिधि नव्हे दुर्जना। विद्यासिधि नव्हे दुर्मना।।
विद्यासिधि नव्हे पुण्या। जीवाकारणे।।२७।।
विद्या साधि तया मना। विवस या उठति जाण।।
त्या निराकाराचे सुरिजना। तरि विद्यासिधी।।२८।।
विद्यासिधि कामिका। विद्यासिधि नव्हे रामिका।।
विद्यासिधि नव्हे भृमिका। कारणे पैं।।२९।।
सावधान मनेविण। न पाविजे विद्यासाधन।।
असे सुक्रत जोडिले पूर्ण। तरि विद्यालाभे।।३०।।
आता असो काहि बोलणे। पुढिल प्रसंग चालवणे।।
चित्रोत्सवा पिंगलु गुणे। हीन देखा।।३१।।
ते कर्मबिन बापुडे। नाहि सुक्रताचि जोडि।।
मग पढल्या वेगडि। मोहकर्माचा।।३२।।
पूर्व भवांतराचे समंध। स्नेह निपजती निबंधे।।
मग ज्ञानेविण अंधे। जाले देखा।।३३।।

चित जाहले काळमुखि। बहु प्रकारे जाले दुःखि।।
मग चित्रोत्सवा म्हणे देखि। पिंगल मैत्रा।।३४।।
आपण केले प्रेमकळा। राहे न शके पिंगळा।।
घडिया घडि चित व्याकुळा। वावत असे।।३५।।
जरि तुझेनि अंगवे। आपण दोघिजणि भावे।।
तरि मि घेइन सवे। जाउ देशांतरा।।३६।।
मि जालो विवाह वयास। माते देति येकदा नरेशे।।
मग तुझि माझी आश। मोडेल देखा।।३७।।
म्हणोनि सिघ्र कार्या किजे। माते घेउनि निघिजे।।
मग आपण सुखि राहिजे। धरित्रिवरि।।३८।।
जेत नेणति माता पिता। तेथे जाइजे प्राणनाथा।।
वेळु न लागे आता। या कार्या देखा।।३९।।
ऐंसि उपनलि दुर्मति। इये चित्रोत्सवा प्रति।।
पिंगळु म्हणे जुगति। विचारु देखा।।४०।।
मग ते पिंगळु प्रमोदला। कंन्याते घेउनि निघाला।।
विदग्ध नगरा आला। नष्ट राजामाझी।।४१।।
या पूर्व दुक्रताचे फळ। मदने केले व्याकुळ।।
ते गुंतले मोहजाळ। दोघे निर्धन।।४२।।
तेथ वसति कबाडी[१]। तेथ होति येक झोपडी।।
तेथे होती परवडी। पापफळे देखा।।४३।।
मग दोघे विचारिति ऐंसा। आता आपण करावे कैसा।।
निघालो दोघे भरवसा। कवनाचेनि।।४४।।
मग ते राजकंन्या म्हणे। मी तव रांधू नेणे।।
तव पिंगळु म्हणे। उदिम नेणे मी।।४५।।

१. भारवाहक, हलकी कामे करणारे मजूर.

मग चित्रोत्सवा म्हणे। तुम्हि कबाडे सर्व जाणे।।
मोळि आणोनि विकणे। पोठ भरावे।।४६।।
        ज्ञान विज्ञान विवर्जित। ते दोघे राहिले तेथे।।
        महा दारिद्र भोगित। पाप फळे देखा।।४७।।
कांडिता दळिता रांधिता। सीणे झाडिता फोडिता।।
चित्रोत्सवा कष्ट करिता। दुखि जालि।।४८।।
        अंन्न नास्ति पान नास्ती। नास्ती रजुगंधरं।।
        शाके शुलवणं नास्ति। नास्ति जदि भुंजेते।।४९।।
कष्टावर पडलि बाळा। मग प्रस्तावा करि प्रबळा।।
अश्रु ढळति डोळा। सर्वदा देखा।।५०।।
        कोरडा क्रुर गुंते गळा। वरि उदकाच गरळा।।
        घोठिता न गोळे बाळा। व्याकुळ होये।।५१।।
मग म्हणे मि पापिणी। सांडिली आणि जनकजननी।।
महा दुर्मति माझा मनि। उपजलि देखा।।५२।।
        सदा झुरतसे बाळा। जैसि क्रपणग्रहि कमळा।।
        वसंतेविण कोकिळा। निश्चळे पै जैंसी।।५३।।
तैसि ते राजकंन्या बापुडि। जालि दुःख परवडि।।
तिये सुखाचे येक घडि। न ये देखा।।५४।।
        दरिद्र भोगवे ऐंसे परी। कष्ट पावला राजकुवरी।।
        तव वसंत सुपरी। आला देखा।।५५।।
कुंडलमंडित राव तेथे। वसंत खेळावा समर्थे।।
आज्ञा दिधले महिनाथे। लोकाप्रती।।५६।।
        आपुले प्रतापे भुपति। खेळावया निघे तिजे।।
        चतुरंग सैन्ये संपति। सहित देखा।।५७।।

ढोल तबेल निशान भेरी। वाजंत्र वाजति नानापरी।।
राव निघता नर नारी। पाहो आल्या पै।।५८।।
राहिला पत्की रूपे बाळा। मग न्याहाळित राजकमळा।।
राजा बैसला मयंगळा। वरि देखा।।५९।।
धावत आलि कबाडिनि। त्यामध्ये चित्रोत्सवा कामिणी।।
जैसी बगीनि[१] मध्ये हंसीनि। तैसि दिसतसे।।६०।।
तव राजा अवलोकि दिशा। आपुल्यालि लिला कैसा।
कामिजन जीवन तैसा। दिसतसे।।६१।।
तव चित्रोत्सवा वरि। द्रिष्टी पडलि सुपरी।।
देखोनि रायाचे जिव्हरि। घाव लागले।।६२।।
मग आपुले मनि विचारी। हे तव राजकुवरी।।
हे स्त्रिरत्न माझिये न घरी। केउते आली।।६३।।
कि कळपा चुकलि हरणि। कि हंस चुकलि हंसिनि।।
कि मन्मथ चुकलि राणि। तैसि देखा।।६४।।
ऐंसि हे मृगलोचनि बाळा। श्रीपति चुकला कमळा।।
हे सर्व रूपाचे कळा। प्रतिभासिली।।६५।।
तव चित्रोत्सवाचि द्रिष्टी। रायावरि जाले प्रेमद्रिष्टी।।
मग दोघाचि संतुष्टी। उपनलि देखा।।६६।।
येकमेकाचे मने हारिलि। कामसायके[२] भेदिलि।।
दोघे व्याकुळ जालि। आपुलेले ठायि।।६७।।
वसंत खेळोनि आला वोजे। न रुचे घराचि घरभाजे।।
मग तो राउ राजकाजे। सावधान नव्हे।।६८।।
मग पुसो लागलि प्रधान। कवने गुणे दुश्चित मन।।
ते सांगिजो स्वामि मना। करुनि शा पैं।।६९।।

१. बगळिनी, बकिणी.   २. कामबाणाने.

मग राजा म्हणे प्रधाना। येक स्त्रि देखिले सज्जना।।
अति रूप लावण्ये। विराजमान पैं।।७०।।
सर्व खुण सांगितले तेणे। दुजि पाठविलि प्रधान।।
मग ते बळि ततक्षण। रायाजवळी।।७१।।
चित्रोत्सवा देखोनि राया। मग रांचि[1] जालि काया।।
जेथे डुर्मगळलि[2] माया। प्रेमरसाचे।।७२।।
शरमलि अंतरपणे। हे स्थळ वर्णवे कवणे।।
जे कामतत्वी सिंहासन। ते जाणति देखा।।७३।।
मग निवालि दोघेजणे। महा प्रेमरसाचे गुण।।
कुंडलमंडित राव तेणे। पट्टराणि केलि।।७४।।
मिळोनिया गेलि होति पिंगळा। ते विश्रांतिला आला प्रबळा।।
चित्रोत्सवेविन व्याकुळा। जाला देखा।।७५।।
तो पुसो लागला घरोघरी। कोठे गेले प्रिये सुंधरी।।
पाह शुधि न लागे परी। व्याकुळा जाला।।७६।।
सुन्य मत्त जाले त्याचे। दुस्वप्नावले वियोगाचे।।
जैसे तिवृत्त नरकाचे। भोगिजे देखा।।७७।।
मग पिंगळ जाला व्याकुळ। तो गेला रायाजवळ।।
धाव करितसे प्रबळ। रायाप्रति।।७८।।
दीन वदन करुणा भाकी। देवा मि थोर जालो दुःखी।।
माझी स्त्रि नेलि सुरेखी। रूपाचे निधान।।७९।।
ठायि घाला वेगी सत्वर। माझी स्त्रि झडकरि आण।।
मरण भेने प्राण। आला तो तारावा।।८०।।
राये कुंडलमंडित जाण। जे माझे स्त्रि मनोहरा।।
तो महा सुंधर। गुणवंती।।८१।।

१. रोमांचित. २. डळमळणे, घालमेल होणे.

आगा जि दुःखिया कारणे। आणि दारिद्रिया कारणे।।
कि भयाभित जाणे। शरणांगत रक्षी।।८२।।
अगा जि निर्बळाकारणे।अथवा अबळाकारणे।।
अथवा अनाथासि रक्षणे। शरण राया।।८३।।
या कारणे नरेश्वरा। शरणांगत वज्रपंजरा।।
आनाथावरि क्रपा करा। माझि स्त्रि द्यावि।।८४।।
ऐंकोनि कुंडलमंडित। वरि वरि प्रीत जयेवंते।।
तो बोलिला महंत। बोलवा रे मंत्री।।८५।।
मग जे धूर्त होते प्रधान। ते महा निष्ठुर दयाहिन।।
मन पाषाण समान। ते बोलविला।।८६।।
तो कानकोचा तरिशा। येकुर्पाडिया फोसा[1]।।
येक तो महा निराशा। ऐंसि मंत्रि आले।।८७।।
झडकरि करा विचार। कोठ बाल करु मार।।
ऐंसि बोलिला नरेश्वर। तयासि देखा।।८८।।
मग त्यामध्ये धूर्त मंत्रि। माथा तुकवि कुजंत्रि।।
म्हणे म्या देखिलि तुझे स्त्रि। मार्गेजाता।।८९।।
अरे पिंगला ब्रांह्मणा। तुझे सांगेन मी खुणा।।
ते स्वरूप महा निलखणा। तुझे योग्ये नव्हे।।९०।।
चित्रोत्सवा देखोनि राया। मग रोमांचे जालि काये।।
तेथे दुर्मगलि माया। प्रेमरसाचे।।९१।।
ते तव रूपे आगळी। डोळस गौर सावळी।।
कि रत्नाचि खाणि उघडिलि। तैसि होये की।।९२।।
सर्व स्त्रियामाझीया बाळा। बहुत रूपाचे कुशळा।।
ऐंसे रूपा या भूतळा। माझी नसे।।९३।।

१. फोल, पोकळ, ढोंगी.

महा कोमल कमलवदन। सपस्पति वदन दहन।।
सरोवरि सीतळ जिवन। लागे वंन्ही समान।।९४।।
ऐंसे विरहाग्नी दग्धमान। जाला तो पिंगळ ब्राह्मण।।
जैसे पुरागाहरण। बाण सिंपिला।।९५।।
तो बाण तयाकारणे। वेळोवेळा अंतःकरण।।
महा दुःखे वनोपवन। परिभृमे देखा।।९६।।
त्यरित जालि पिंगळा। मुनिदर्षण जाले निर्मळा।।
त्रिगुप्ताचार्येपदकमळा। अनुसरला तो।।९७।।
मग करकमल जोडोनि। तीन प्रदक्षण देउनि।।
मग तो वंदना करोनि। जवळि बैसला।।९८।।
मग तो महामुनेश्वर। धर्मोपदेश सांगे मनोहार।
पिगळ ब्रांह्मण सुंधर ऐंकतसे।।९९।।
द्विविध धर्माचे श्रवण। सागर आनागर श्रवण।।
ऐंकोनि वैराग्ये मन। जाले देखा।।१००।।
मग स(ं)वेग भावि भावना। धर्मस्वरूप आले मना।।
म्हणे धंन्ये धंन्ये जिनशासना। लोण कीजे।।१।।
वैराग्ये भावे पिंगळ। गुरु विनविला मंगल।।
दीक्षा मागीतले निर्मळ। भावे देखा।।२।।
गुरुक्रपे ते ब्रांह्मणे। संग केले सुजाण।।
दिक्षा घेउनि सुमन। दिगांबर जाला।।३।।
महा घोरांधर तप करि। तथापी स्वप्रिये मन धरी।।
सदा सर्वदा वार्त्तेये परी। तो पिंगळ मुनि।।४।।
मग गाढातर तप करि। धातु सुकविल्या[१] शरिरी।।
परिग्रहा साहे सुपरी। नानाविध देखा।।५।।

---

१. सप्तधातूंचे बल कमी करणे.

अंतरगत विरहाग्नी जळ। त्यावरी तपाग्नी प्रज्वळ।।
मग ते शरिर दुर्बळ। दिसे विशेष।।६।।
चित्रोत्सवेचा स्नेहे प्रबळा। त्याजि नवे तो दावानळा।।
सदगद वृक्ष सबळा। तैसा दिशे पैं।।७।।
तपाग्नी समाराग्नी। या सदा प्रज्वळति मनि।।
व्याघ्रचित्ते पिंगळ मुनि। प्रवर्तेदेखा।।८।।
तप करिता क्रोधाग्नी तापला। परि नव्हे त्रिसला[1] वेगळा।।
तैसा तो मदांध जाला। पिंगळ मुनि।।९।।
आता हे स्थळ राहिले येथे। अंन्ये प्रसंग सांगेन कथे।।
चित्रोत्सवा कुंडलमंडिते। राखिले देखा।।१०।।
कुंडलमंडित पालि[2] प्रति। माहा दुर्गति दुर्मति।।
त्या दुर्गि राहोनि लुठति। कौसा[3] नाही।।११।।
आगा ऐंसे निधाने रूपाचे। चित्रोछवा नाव तियेचे।।
हा गा वचन अमुचे। साच कि लठके।।१२।।
हे सत्ये गा प्रधाना। अन्याय नव्हे तुझीया वचन।।
त्वा सांगितले अवघे खुन। त्या मनि मानिल्या।।१३।।
तव प्रधान मागुता म्हणे। विप्रा परिऐंसि तिचे वचने।।
मग ते आर्जिकेपासि म्हणे। परिऐंसि बाई।।१४।।
अम्हि रायाचि महा लेकुरे। लिहित होते शाले भितरे।।
तेणे पिंगळे द्विजाचे पोरे। माते चालविले।।१५।।
मी तव निघाले तयासवे। वाहाविले मि कामभावे।।
थोर दुःख जाले या सवे। मोहे झळंबिळी।।१६।।
खावया नाहि पिंगळाचे घरी। तो मोल मंजुरि करि।।
विळाचे वरु माझे घरी। देउन जाये।।१७।।

१. मिथ्यात्व, माया व निदान. २. तट, किनारा. ३. रक्षक, वाली.

मग वोडो दो हाते। महा कष्टि मोडि जातो।।
रांधिता कांडिता म्हातो। सिणुवाडिले।।१८।।
        न आशन शयेन अंन्न। तेथे घर असे दारिद्रपण।।
        त्या कबाड्येचा अंगण। सेवितसे।।१९।।
नेनेसेणे प्रावर्णि[1]। हे पाप भोगावे कवनि।।
यापरिस सीक्षाग्रहण। ते भले देखा।।२०।।
        ऐंसे गोष्ट करिता निघाली। पोयेनपुरी मार्गि लागली।।
        द्रुष्ट श्रेष्ठ सांगितला वार्ता। विप्रा तुझे।।२१।।
आता धावा रे पिंगळा। माझे वचनी निर्मळा।।
झगड करि जाये प्रबळा। ते घेउनि येई।।२२।।
        पिंगळ प्रधानाचे वचने। थोर क्षोभला निज मन।।
        माझिया दिक्षा देणे। ऐंसा कोण हो।।२३।।
मग धोत्र कासिले कासे। धावता भरे स्वासोस्वासो।।
आलिया पंथे जनासी पुसे। सुधि वल्लभेची।।२४।।
        मग तो पोयेनपुरा गेला। गाव अवघा धांडोळिला।।
        शुधिविन मागुता गेला। तो पिंगळ देखा।।२५।।
मागुता गेला रायाजवळ। पुकार करितसे प्रबळ।।
तयाते म्हणे पिंगळ। माझी प्रिया दीजे।।२६।।
        कुंडलराव मनि कोपला। मग त्याने भृत्या बोलाविला।।
        मग राजा भृत्ये बोला। तोंडकेवरी।।२७।।
तो नगराबाहेर घातला। पिंगळाचा अपमान केला।।
मग तो मारोनि घातला। देशबाहेर।।२८।।
        ते अपमाने भृष्ट जाला। तो महा दुःख पावला।।
        स्त्रीवियोगे लागला। प्रथ्वी हिंडे।।२९।।

---

१. प्रावरण, पांघरूण.

प्रियावियोगे ब्रांह्मण। संतोष न पडे मन।।
सुख नाहि निशिदिन। मध्ये देखा।।३०।।
जैसी अग्नी दग्ध प्राणि। चरपडित असे मनि।।
तैसा पिंगळ अंतःकर्णी। दुःखवला।।३१।।
त्या कौसल्या देशाचे भूपति। आयोध्यासी राज्ये करी सन्मति।।
अनय राजा क्षितिपति। सूर्येवंषी देखा।।३२।।
मग तेणे कुंडलमंडिते। देश विध्वंसिला समर्थे।।
प्रजा पिडिला प्राणार्थे। तेथे देखा।।३३।।
जैसे दुर्जन सद्गुणापासी। सगुण विध्वंष करि दुर्मती।।
तैसा कुंडलमंडिता चिति। द्रुष्ट देखा।।३४।।
त्याचे अपराध ऐंकोनि। अनय नृप क्षोभला मनी।।
चतुरंग दळ मिळउनि। पाठविले देखा।।३५।।
मग तो कुंडलमंडित। ते दळ मोडिले समर्थे।।
पळालि बापुडि भयाभीत। तेथुनि शाह।।३६।।
अनय नृप रायाजवळ। बोंबि आली प्रबळ।।
मागुते चतुरंग दळ। पाठविलि देखा।।३७।।
त्या दुर्गाचे बळ मोठे। तेथे काय करि शुभठे।।
मुषकापरि विकठे। सिंव्ह काय चाले।।३८।।
तदापि अनय बळी। परि त्यासि न मांडे कळी।।
यद्यापि बळि कुंडळी। मंडित देखा।।३९।।
तैसे अनये नफा(नृपा)चे बळ। संदेह पडिला प्रबळ।।
हा कुंडल कुनिकला। जिंकिला जाये।।४०।।
येका लागलि पालिवन। येकाचि कापति अहंकारणे।।
येकाचि हबडलि दशने। खडखडिति पैं।।४१।।

सेना पिडायेमान जालि। ते मागुतु उठोनि आलि।।
अनय नृप राया पडलि। थोर चिंता।।४२।।
मग तो राव दुर्बळ जाला। दुश्चित चिते सभेसि बैसला।।
सुखाचा लवलेशु आला। दिवस नाहि।।४३।।
तव बालचंद्र सेनापती। सभेसि आला शुभमती।।
रायाचे चरणि सन्मती। जुहार केला।।४४।।
द्रिष्टी न्याहाळी रायाते। दुर्बळ देखिले समर्थे।।
पुसतसे नरेश्वराते। बाळचंद्र देखा।।४५।।
म्हणे आजि नरेश्वरा। आमुचि विनंति अवधारा।।
अगा क्रपासागर। अनयेनफ राजा।।४६।।
तुम्हि दुर्बळ कवणे गुणे। कोमाइले दिसे वदने।।
काये चिंता तुमचे मने। घेतलि असे।।४७।।
ते सांगिजो नरेश्वरा। कवन उपजलि ईछा।।
ते पूरवीन मानसा। तुमचे देखा।।४८।।
ऐंकोनि प्रधानाचे वचनि। मग अनयनफ राजा म्हणे।।
माझे दुःख प्रमाण जाणे। तो देख ना।।४९।।
राव म्हणे बालचंद्राप्रति। अमुचे जीने व्यर्थ संन्मति।।
अम्हि देखता देसु लुठीती। आमुचा देखा।।५०।।
अम्हि येवडि नरेश्वर। अम्हा प्रचुर परिवार।।
चातुरंग सेना दळभार। सर्व व्यर्थ देखा।।५१।।
हे येक क्षुद्र भिल्लठे। आजि जिंकिले कुलठे।।
जे अंन्य राव मोठे मोठे। ते कोण जिंकावे।।५२।।
हा कुंडलमंडित चोरठा। माझा प्रजा केलि बारा वाठा[1]।।
देश लुठिला तुम्हा सुभठा। देखता पैं।।५३।।

१. दाणादाण करणे.

येणे दुःखे मज बहुत चिंता। मजे राजेसभे बैसता।।
सुभठामध्ये सुखदायिका। मजला थोर।।५४।।
येणे दुःख मजेकारणे। सुखि नाहि अंतःकरणे।।
त्व पुसिले तरि येणे गुणे। मि दुश्चित देखा।।५५।।
ऐंकोनि रायाचे वचने। मग बालचंद्र म्हणे।।
देवा ऐंसि हिन वचने। का बोलसी।।५६।।
ऐंसे म्हणोनि उठिला। मुकुठ चरणि ठेविला।।
मग प्रतिज्ञा बोलु लागला। बालचंद्र मंत्रि।।५७।।
देवा मि प्रतिज्ञा मागेन अति। कुंडल जिणावा अरि महात्वी।।
त्याहि दिवसी माझे प्रतिती। जाणा त्वा देखा।।५८।।
नातरि तुम्ही मजे कारणे। सर्वथा नाहि मुख दाखवणे।।
हेचे भेठी तुम्हा कारणे। जाणिजे सुख।।५९।।
ऐंसि प्रतिज्ञा घेतलि तेणे। महा क्रोध धरिला मन।।
मग म्हणे चतुरंग सेने। मेळउ निशा।।६०।।
तो बाळचंद्र सेनापति। निघाला आपुला अहंमति।।
कुंडलमंडिता प्रती। संन्मुख जाला।।६१।।
मग तो कुंडलमंडित। दलभारेसि जयवंत।।
संग्राम मांडिला महंत। तेथे देखा।।६२।।
मारोनि घातला दुर्गावरी। भोवता वेडिला परिवारि।।
काडि कोठे भरोनि सुपरी। येणे बालचंद्रे।।६३।।
तो कोंडिला बहुतापरी। मग राहिल्या आपुल्या घरि।।
थोर प्रिति चित्रोत्सवावरि। कामे भुलविला।।६४।।
इंद्रियाचे लंपठपणे। चित्रोत्सवा जवळ हो।।
परि वारचित देखोन। हे अथिच ना।।६५।।

कोंडिला परिवार बापुडा। लोक भूका मरे पुढा।।
मग कुंडलमंडित कूडा। जाणितला देखा।।६६।।
मग हळुहळु येक। बालचंद्रासि मिळाले सुरेख।।
भेद सांगिति विवेक। दुर्ग घ्यावायाचा।।६७।।
जो बालचंद्र येउनि मिळे। त्यासि दान मान देवीले।।
ऐंसे प्रपंच आपुले केले। वैस्ये केले पैं।।६८।।
बालचंद्र म्हणे त्याप्रति। कुंडल बांधोनि माझे हाति।।
जरि घालाल तरी क्षितिपति। करिन तुमचे।।६९।।
मग परिवारे त्यांत। कुंडल बांधोनि स्वहस्ते।।
वोपिला[१] सर्व समर्थे। बालचंद्रा हाती।।७०।।
मग लोक दिधला दान माने। दुर्गि घातला आपुले बाणे।।
देशवाठ कुंडलाकारणे। दिधला देखा।।७१।।
बालचंद्र सेनापति महंत। तो जाला जयवंत।।
येवोनि भेठला संत। अनयेनफ राये।।७२।।
मग राये देखोनि त्याते। थोर मानिले समर्थे।।
देश कोष मान अर्थे। अमर केला।।७३।।
निस्कंठक अनयेनफ राजा। नीसले पाळि आपुले प्रजा।।
सुखे राजे करि वोजा। साधि धर्मार्थे।।७४।।
त्या कुंडलमंडिता कारणे। परतलि सर्वजन।।
करि प्रथ्वी पालाठण। हे मात्र देखा।।७५।।
तो येकांगि पादचारि जाला। वसुंधरा हिंडे येकला।।
मग तो महा दुःखि जाला। कुंडलमंडित।।७६।।
मग त्या कुंडलमंडित। पुण्ये उदय जाला महंत।।
जिनमंदिरा जाउनि संत। जवळ आला।।७७।।

१. अर्पण –स्वाधीन करणे.

मग तेणे कर जोडोनि। वंदना केलि मुनिचरणि।।
मग मुनिश्वरा वंदे वाणी। धर्मबुधि लागे।।७८।।
मग कुंडलमंडित म्हणे। देवा धर्मबुधि कैसा होणे।।
उपदेशविणे कवणे जाणावि देखा।।७९।।
हे धर्म म्हणिजे तो कैसा। धर्माचे फळे उपदेशा।।
जेणे मन होये भरवसा। साधावया पै।।८०।।
मग तो मुनिश्वर म्हणे। परी सांगा येकमने।।
धर्म म्हणिजे दशलक्षणे। ते सांगेन आता।।८१।।
क्षमा दया अर्जव  सत्ये। शौच सैयेम तप महंते।।
त्याग किंचन ब्रंह्मवृत। हे धर्मलक्षण।।८२।।
जे महाप्राज्ञवंत प्राणि। धर्म वसे त्याचे मनि।।
ते वर्तति धर्माचे गुणी। सदा सुखि।।८३।।
धर्म स्वामि अतुर्बळता। धर्म स्वामि जाये दरिद्रता।।
अबंधव  धर्मबंधू सहिता। कारणे देखा।।८४।।
अल्पनां कुक्षि पुत्राणां दुखिनां योगिना।।
दोभागीनां अनाथानां नायु धर्म देखा।।८५।।
पिंगल म्हणे भगवंता। दिक्षा न घडे अशक्ता।।
महिचर परिग्रहान्वीता। धर्म केवि घडे।।८६।।
ते पाप केवि सांडावे देवा। अणि सुखाचा करि हेवा।।
तरि सुख कैचे त्या जिवा। घडे स्वामी।।८७।।
सकल पदार्थ पाळिजति। धर्म सांगिजो त्या जुगति।।
धर्मेआम्हा सद्गती। होईल देखा।।८८।।
मग तो मुनेश्वर म्हणे। धर्म तो जिवाचे रक्षणे।।
जीवदया प्रतिपालणा। तरि धर्म घडे।।८९।।

स्वनिंदाग्रहा न करावे। वर्तिजे करुणभावी।।
यापरि पाप फेडावि। शुद्ध भावे।।९०।।
हिंसा म्हणिजे पापाचे कारणे। दुजे पाप अक्षक्षभक्षण।।
नर्का जावया धोरण। अणिक नाही।।९१।।
आता तु मांसभक्षण सांडि। करुणेसी चित मांडि।।
धर्म वांछता अहे तरी खा(स्वा)ही। अशुभ कर्म।।९२।।
जो प्राणी मांस वेसनी। त्यासि नर्कि होय जाचनी।।
त्याचे लोळे तोंडि वदनी। घालिति देखा।।९३।।
जे महामध्ये प्राणी। त्यासि अघोर होये जाचनी।।
तामृरस त्याचे वदनी। वोतिती देखा।।९४।।
जे दुत वेसनिचे प्राणि। त्यासि आघोर होये जाचनि।।
त्याते पीळीता घडलोनि। निरये कुंडि।।९५।।
असिपत्राचि तीक्षण बाण। छिन्न भिन्न झाले शरिर।।
तरित्मारकियाचे मार। मुद्गर वाजती।।९६।।
मग ते वैतरीणियामधी। जालि जति असे महाक्रोधी।।
ऐंसिया पापाचे बुधिफळे। भोगिति पैं।।९७।।
महा संतप्त लोहोगण। त्यासी सवाजति अलिंगण।।
पाचारित वर्म वचन। कर्मवचन।।९८।।
चौर्येकर्म चोराकारणे। छेदनभेदन सुळारोहण।।
तेथ स्वंसुळ घालोनि वदने। वोढि देखा।।९९।।
पारधिया निरयेगती। स्वानरूपे फेडोनि खाती।।
आमेदामध्ये कीडा होती। त्या मुग्या झोंबती।।१००।।
इत्यादि केले पापे। त्या भोगिति नरकि रूपे।।
परस्परे विदारिति तुखे। घालुनिया।।१।।

जीवघाति अभक्ष भक्षी। तो जन्मोजन्मी होये दुःखी।।
छेद भेद तळी ताप रोखी। सुळा रोपिती।।२।।
ऐसे महा दारुण दुख। अनंत मूर्त नाहि सुख।।
न पाते लवे विषेष। त्या विषवा नाही।।३।।
व्याकुळ भयाग्रस्त प्राणि। यत्र तत्र यांति१ अज्ञानी।।
तत्र तत्र दुःख स्वखाणी। चुकेचि ना।।४।।
हिंसक पचिजति आघोरी। दुःख केवि वा आगोचरि।।
कल्पकयंत्रि घोरांतरी। खिजति देखा।।५।।
मारण सारण विदारण। तेथे खंड खंड करणे।।
छेदन भेदन दहन। ताडण करिति।।६।।
मुद्गरे डोइ ठेसती। चिमुठे मांस वेचति।।
गदा चक्रे खडे हाणिति। घायावरि घाये।।७।।
संतप्त तैल कडाइमाजी। घालोनिया त्वापिया काजी।।
पवन करिति त्यामाजी। त्या दुर्जनाचे।।८।।
येवं वह्निमध्ये उभिजति। येका तामृरसा पाजिती।।
जठर पिठरे पीडिती। बाहेर देखा।।९।।
येकाचे उदरे विदारिति। येकाचे अंतडे तोडिजती।।
येकाचे काळिज काडिति। तेथे देखा।।१०।।
येकाचे हृदयेकमळ। ते विदारिति प्रबळ।।
येक कर्वति प्रबळ। घालिति देखा।।११।।
मोहोरे प्रमाण खंड। सिराचे करिति उदंड।।
वैतरणि क्षीराचे कुंड। भरलि देखा।।१२।।
आयुष्ये पुरले वाचुन। न मरति ते नरकि प्राणि।।
ते खंडे येकत्र करोनि। पिंड उभा राहे।।१३।।

येक स्वानाचे रूपे झोंबती। येकाचे अंतडे लोंबती।।
येक सिंव्हाचे रूपे खाति। कडकडाड पैं।।१४।।
शार्दुळाचे रूपे येउनि। नगेनग वेंकळे करोनि।।
कडकडे हाडे फोडोनि। उरि बैसति।।१५।।
महा घोरांध अंधःकारी। येकयेकाते विदारी।।
येकयेकाते संव्हारी। तेथे देखा।।१६।।
रागे रागे उदकांत। येका भावे महासीत।।
त्यासी महादुःखाचे चिते। प्रबळ देखा।।१७।।
क्षुदेचा दुःखा त्या कारणे। त्रप्ती नाहि सर्वान्न्।।
सर्व सागराचे जीवन। त्रशा शांत नाही।।१८।।
**प्रतिलिपिकर्त्याने १९ ते ३७ हे क्रमांक गाळले आहेत.**
जितुके नाहि अनिष्ट फळ। तितुके जडे सकळ।।
जव आयुष्याचे बळ। तव भोगावी।।३८।।
मग भोवंडे चारि गती। चौर्यासि लक्ष योनि दुर्मती।।
ऐंसिया पापाचे संगति। दुःखदायेक पैं।।३९।।
जे जे दुःख नरक्याकारणे। ते ते वर्णावे कवणे।।
कवेश्वर येक रसने। केवि बोलावे।।४०।।
ऐंसे नर्कदुःख जाणोनि। मना कंठाळ आणोनि।।
निवृति स्वप्त वेसनी। करावे देखा।।४१।।
द्यूत मांस सुरा वेस्या हिंसा। चोरि आणि परदारवेस्या।।
न सांडिया पाप फाशा। सर्वता पडे।।४२।।
या कारणे द्रुष्ट मने। न करावे मांस भक्षणे।।
महा पाप सप्त व्यसन। उपजति देखा।।४३।।

हे ते अवघे सुख कारणे। पाप सांडावे विचक्षणे।।
आपुल्या परत्राकारणे। आचार पाळावा।।४४।।
ऐंसि मुनिश्वराचि वचने। ऐंकोनि आपुले श्रवणे।।
मग कुंडलमंडित म्हणे। कंठाळलो देवा।।४५।।
मग कुंडलमंडित म्हणे। हे क्रपा करोनि सांगणे।।
सांडिलि मांस भक्षणे। त्याचे कवन फळ।।४६।।
मग तो मुनिश्वर म्हणे। ऐंका सावधानपणे।।
न किजे मांसभक्षणे। तरि सद्गति घडे।।४७।।
जे प्राणि मांस परिहारी। अणि मनि धृड वृत धरी।।
त्यासि सद्गति सैवरी। येति देखा।।४८।।
जो बोलिजो धर्माचे मूळ। ते पाविजे जिवाचे कुळ।।
जेणे ढळति जीवाचे मूळ। क्षणामाझी।।४९।।
मांसाचा त्याग केला जेणे। त्यासि दयाधर्म अंतःकरेर्णे।।
प्राणवया मुनिश्वर म्हणे। कुंडलमंडित।।५०।।
या मांसि किजे निवृती। तरि पाविजे निर्मल गती।।
स्वर्गामोक्षाचि संपत्ती। पाविजे देखा।।५१।।
मधुमांसादि वर्जिजे। येणे गुणे पाप वर्जिजे।।
मग पुण्यानुबंध उपजे। या जिवाकारणे।।५२।।
पुण्यानुबंध जीवाकारणे। लाभे भोगोपभोग निधान।।
परमपद शुभ ध्यान। पाविजे देखा।।५३।।
शक्र शक्र चक्र तीर्थंकराचे। पद पाविजे महंताचे।।
संप्रति सिद्धिचे। हे फल पुण्याचे।।५४।।
रुषिचे वचन ऐंकोनि। कुंडलमंडित शुद्ध मनि।।
मुनिश्वरा प्रणंम्ये करोनि। कर जोडिले।।५५।।

मग तो भावे म्हणे देवा। मधु मांसाचे नेम द्यावा।।
तेणे तरनुक[१] होये जीवा। माझीया देखा।।५६।।
दर्शन प्रतिमा तेणे। अंगिकार केला शुद्ध मने।।
निर्धार केला सम्येक्त गुणे। जाला देखा।।५७।।
दीक्षा ग्रहणचि नाही लब्धी। मंदभाग्या केवि घडे शुद्धी।।
दीक्षा ग्रहणाचे बुद्धी। भाग्ये घडिजे।।५८।।
मग तेणे कुंडलमंडिते। देव गुरु वंदिला महंते।।
परत्रा सकळ सुकृते। जोडोनिशा।।५९।।
तेथुनि निघाला पुढारा। चिंतातुर भावे वसूंधरा।।
संकल्प विकल्पाचे डोंगरा। जटा देत देखा।।६०।।
मग विचारि आपुले मनि। माझे मामा असे दक्षणे।।
तो महाबल धनधान्ये। नांदत असे।।६१।।
मि जाइन त्या जवळा। तो राखेल माझे कळा।।
चतुरंग शैन्येचा मेळा। मागेन तेथे।।६२।।
मागुता येउनि शत्रुप्रती। महायुद्ध करिन जुगती।।
मारुन घेइन प्रथवी। आपुली देखा।।६३।।
ऐंसा चिंतवि मनाच्या आशा। मग निघाला दक्षण दिशा।।
मनि धरोनि भरवसा। शरिराचा पैं।।६४।।
राज्येभृष्टाचे दुःख व्यापला। थोर पीडायमान जाला।।
तव अंगि रोग संचरला। बहुविध देखा।।६५।।
त्या व्याधि शरिर क्षीण जाले। आणि आयुष्ये जवळ अठपले।।
मग ते मरण घडले। तेथे देखा।।६६।।
अष्ट मूलगुणाचेने। मग संम्येक्ताचे बळे तेणे।।
मरण साधिले सुमने। त्या कुंडलमंडिते।।६७।।

---

१. तारण, रक्षण.

पाचव्या स्वर्गि अवतारला। अमर पद पावला।।
स्वर्गि भोगिता जाला। धर्माचि रुचि।।६८।।
मग तो आयुष्याचे अंती। मरण प्राप्त जाला तेथे।।
त्या समइ अमृतवती। देवकंन्या जाली।।६९।।
ते दोघा उपनलि संसारी। या जनक रायाचा घरी।।
विदेहि राणिचा उदरी। संभवले।।७०।।
ते दिनि दिनि प्रति वाढती। देखावया संसाराचे गती।।
मग स्नेहे करावया संन्मती। परिऐंसि पा।।७१।।
मग पिंगळ ब्रांह्मण होता। तेणे स्वल्प तप केले महंता।।
तेणे फल जाले देवता। महा तेजरूपे।।७२।।
तेणे स्वभावे अवधिज्ञाने। पूर्व भव पाहिले ज्ञाने।।
मि स्वर्गि अवतरलो कवने गुणे। पुण्ये देखा।।७३।।
तव ते जातिस्मरण जाले। मी ब्रांह्मण ऐंसा मना आले।।
चित्रोत्सवाचे हरण केले। म्या पिंगळ देखा।।७४।।
ते राजकंन्या महा सुंधर। घेउनि आलो विदग्दपुर।।
काष्ठ कबाडिया उदर। पोषण करि।।७५।।
तेथे कुंडलमंडित राजा। घेउनि गेला वोजा भाजा[१]।।
माते मारोनि गेला वोजा। तेणे चांडाळ पैं।।७६।।
तिये चित्रोत्सवेचे वियोगे। थोर दुःखि जालो संजोगे।।
म्या तप केले अनुरागे। संकल्प मने।।७७।।
आता मज स्वर्गि जन्म जाले। तयाचा बलेसे जाले।।
आता वैर साधिन आपुले। सीघृ देखा।।७८।।
नातरि रांड[२] चित्रोत्सवा। भजिनलि[३] कुसिल भावा।।
दुःख दिधलि माझिया जीवा। दुराचरणि।।७९।।

१. भार्या. २. कुशीला, वेश्या. ३. भजणे, स्वीकारणे.

कुंडलमंडित माझे वैरि। तो उपजला जनकाचा घरि।।
विदेहि राणिचा उदरी। ऐंसा वाढत असे।।८०।।
जरि काडिन गर्भिहुनि। तरि जीव मरतिल तीनी।।
आता नवमास अवधानी। भरु देउ।।८१।।
मग जन्मलियावरि द्रुष्टा। दंड घेयिन या पापिष्टा।।
वरपडि तया कष्टा। माझि देखा।।८२।।
पाहोनि घेयिनया दावा। ते महापापिनि चित्रोत्सवा।।
दुःख देइन चित्रोत्सवा। आपुले सळे।।८३।।
त्या कुंडलाचे अवतार। जाणोनि कोपला सुर।।
मग तो रागे करकर। घासितसे।।८४।।
कधि जन्मेल दुराचारी। तेधवा हाता येइल वैरी।।
ऐंसि म्हणोनि राखण परी। राहिला तेथे।।८५।।
ऐंसी जाणोनिया वैरियेणे जीवे। कवनासि वैर न करावे।।
सदा सर्वदा समता भाव। आसावे पैं।।८६।।
पुढिल जीव दुःख न दीजे। पावल्या भरवसा न कीजे।।
दुःख वरपडा होइजे। पुढल्या जन्मी।।८७।।
राजमदाचि मजवने। जा प्राण जिरउ जाणे।।
संसार जिंतिले तेणे। सर्वथा देखा।।८८।।
मग यितुका अवसरी। देवि विदेह सुंदरी।।
सुप्रसुती जालि सुपरी। जुगुळे देखा।।८९।।
मग ते दुःखि केले येणे नरे। पूर्व भवांतराच्या वैर।।
आता हे कवणेपरि मरे। ऐंसे वीचारि पैं।।९०।।
जरि मी घालीन सागरी। तरि हा गिळावा मगरी।।
बहु दुःख व्हाव्व यापरी। या पापिया देखा।।९१।।

पायि धरोनि अपठावे। तरि सीघृ जाणिजे।।
वरि दुःख भोगावे। कवणे देखा।।९२।।
नातरि ऐंसे करु या जीवा। हा चिमुठेवरि चोचावा।।
दुःखाचा परिभार करावा। या कारणे पैं।।९३।।
नातरि भूमिसि अपठावे। यापरी मारु हा प्राणी।।
ऐंसे म्हणोनि बल चरणि। धरिला पैं।।९४।।
तरि खंडण करिन याचे। ना तरी कापीन उभा।।
ऐंसा परि वैर अमुचि। सादु आता।।९५।।
करकमल पदकमला। लागले अति कोमल।।
बाळक देखोनि नीर्मळ। मनि दया आलि।।९६।।
मग तेणे असुरे मगधेशा। करुणाभाव आणिला कैसा।।
कोमल वचनि ते जैसा। परिणाम जाला।।९७।।
मग पूर्वस्मरण केले। येणे मजे दुःख दाविले।।
तेणे गुणे वैराग्य जाले। मजकारणे पैं।।९८।।
म्या दिक्षा घेतलि सबळ। दया पाळि निर्मळ।।
पींछि धरिलि होति कमळ। म्या आपुल्या करि।।९९।।
पूर्वि पाळिलि होति दया। तेणे फळे झाले दिव्ये काया।।
आता वैर वाठावया। या विन देखा।।२००।।
धिगस्तु माझिया जिवाकारणे। द्रुष्ट भाव जाला अंतःकर्णे।।
उचित चिंता केलि मने। दुर्जन देखा।।१।।
या संसारावर्धनि। म्या चिंतिले आपुले मनि।।
अनयासे घडे या गुणे। मजेकारणे देखा।।२।।
पापे लिप्त होति शरिर। ते रिति ज्ञानि केवि करि।।
मि देवता अणि अहे वारी। ते मजे केउते।।३।।

पूर्वि मि या श्रव(म)नवेशे। त्रणमात्र दिधला नाहि दुःख।।
आरंभ प्रारंभ विशेष। सांडिलि होति पैं।।४।।
केलि होति तपे उतमा। श्री गुरुचा उपदेशक्रमे।।
या मनि मम सैयम। धर्म जोडला।।५।।
तेणे चुकल्या अवगती। गुरुप्रसादे जाले संन्मती।।
मागुते किजे दुर्मती। मूढ भावे देखा।।६।।
तुछ परि हे पाप कैसे। की काजिबुंदे दुग्ध नाशे।।
सर्व कर्म धर्म तइसे। नासे देखा।।७।।
धर्मकर्म नाशलिया जिवा। संसाराचि पडे उदरे रेखा।।
चुके जिनचरणि सेवा। प्राणियाकारणे।।८।।
पुनरपि भृमण करि। झाकोळल्या दुःखाचे शरिरी।।
महा घोरांधर संसारी। निरंतर पैं।।९।।
जो दया चतुर शुद्ध भावी। परोपकार करवी।।
धृड संम्येक्त वरी धरावी। त्याचेन हातिन मुक्ति।।१०।।
ऐंसे विचारोनि क्रपावंत। तो देव जाला जयेवंत।।
मग ते बाळकाते महांते। शृंगारितसे।।११।।
श्रवणि घातले कुंडले। महा तेजःपुंज्ये निर्मळे।।
मग तो शोभिनला सकळे। शृंगारे देखा।।१२।।
मग पूर्ण लब्दी विद्ये होती। ते बाळे सोपिले जुगती।।
निरोप दिधला तियेप्रती। देवराये।।१३।।
हे बाळक शुभप्रदेसी। बरव्या वसंत देशी।।
कोनी येक उत्तमासी। देउनि यावे।।१४।।
ऐंसे म्हणोनि तो अमर। निजस्थाना गेला सुंधर।।
मग ते विद्या मनोहार। बालक देखोनि।।१५।।

क्रपा उपजलि मनि। विजयार्ध पर्वत राजोध्यानि।।
रत्नपुर नामे सुजाणि। नगर वसे।।१६।।
त्या नगराबाहेर आमृवनि। चंद्रप्रभ देवाचे भुवनि।।
यिंदुगति राजा उपोषणी। ध्यानि बैसला।।१७।।
जव तो मंत्रस्मरण करी। तव ते विद्या आमरी।।
रायाते देखोनि खोलेवरी। बाळ सोडिला।।१८।।
तो अकस्मात काये जाले। हे सजिव रत्न कैसे आले।।
की वाहे नक्षत्र पाडिले। गगन साउ।।१९।।
कि हे वज्राचे झळकले। येवोनि माझा अंकि पडले।।
कि माझा ध्यानाचे फळ जाले। तत्काळि पैं।।२०।।
की कवन देवाचे माये। बाळकाचि घेवोनि काये।।
आले माते छळावये। कारणे पैं।।२१।।
कि हा मदनाचे अवतार। कि सुरतरुचे अंकुर।।
कि महा देवकुवर। ते नेणो बापा।।२२।।
कि शुभ लक्षणाचे बिंबडे। कि हे सर्व रूपाचे चांगडे।।
कि हे तेजे रत्नाचे बंडे। मज प्राप्त जालि।।२३।।
ऐंसे म्हणोनि ते इंद्रगती। बालक घेवोनि सन्मती।।
आपुले मंदिराप्रती। आला देखा।।२४।।
बाळके पल्लवाने झाकोनि। आला पट्टराणिचे सदनि।।
पुष्पवंति ते देखोनि नयेनि। संतोषलि देखा।।२५।।
मग ते बाळक सुपरि। ठेविले संद्यास्थळी अंतरी।।
मग राजा म्हणे झडकरी। उठ उठ प्रिये।।२६।।
कैसा येकयेका मनुष्ये। निद्राशुधी निरसे।।
चवल्या न चेतन तविरस। निधन पैं।।२७।।

मग रायाचे वचनि। चेवलि पुष्पावति राणि।।
पुढा बाल देखोनि। विस्मयो पावलि।।२८।।
पाहिलि प्राणवल्लभाकडे। मग मुरके मुख मुरडे।।
मग पुसति जालि कोडे। भृताराप्रती।।२९।।
आहो जि बाल कवनाचे। मग रावो म्हणे तुमचे।।
राणि म्हणे येव्हडे अमुचे। भाग्ये कोठे।।३०।।
स्वामीस दैवाकारणे। हा सुपुत्र जाला सुमने।।
कवण भाग्येवंताचे पुंण्ये। उदये आले।।३१।।
मग राजा म्हणे सुंदर। पुत्र तुज जाला मनोहार।।
तुझे भाग्येचि वसुंधर। तुकिता[१] न ये।।३२।।
माझे बोल संदेह न किजे। आपुलि मनि निर्धारिजे।।
राणि म्हणे कोणे परि भजे। मन माझे।।३३।।
देवा आकाशा फळे लागली। आणि ससिया शृंगे निघालि।।
कैसा धीर करावाया बोलि। प्राणवल्लभा।।३४।।
मि तव मूळी आभागिनि। अंतःकर्ण जाले कर्माग्नी।।
त्यावरि तुम्हि ऐंसा वनि। का जाळिता।।३५।।
मग राजा म्हणे महादेवी। शंका झनि करि ऐंसा भावी।।
हे दैवगति न कळे देवी। दानवि देखा।।३६।।
या स्त्रियाकारणे सुंदर। प्रंछीन[२] गर्भि अवतार।।
प्रसुत वेळा मनोहार। ठाउके न पडे।।३७।।
भाग्ये स्त्रि गर्भ जालिया। न दिसे गर्भचिंन् या।।
जैसि दर्पणि माया। बिंब दिसे।।३८।।
इयापरि तुजे कारणे। पुत्र जाला विचक्षणे।।
यापरि माझे वचने। साच[३] मानि।।३९।।

१. तुलना.   २. गुप्त.   ३.सत्य.

येवंमस्तु आगा प्राणेश्वरा। राणि म्हणे मनोहारा।।
राव म्हणे सत्ये सुंदरा। न कोणे म्हणावे।।४०।।
तुंम्हि प्रछींन्नगर्भि म्हणितले। ते वचन प्रमाण केले।।
अलंकारेसी बालक जन्मले। पूर्वि ऐंसि होति कि।।४१।।
हा पुत्र जाला मजकारणे। कर्णि कुंडल घातले कोणी।।
कुंडलाचा विचार सांगणे। प्राणवल्लभा।।४२।।
मग तो राव हसोनि म्हणे। आता म्या सत्ये सांगणे।।
कूडे पाप या नाहि म्हणे। नरेश्वरा।।४३।।
परियसि पा प्राणेश्वरी। मि गेलो होतो वनाभितरि।।
चंद्रप्रभ देवाचे मंदिरी। सामाईक काजे।।४४।।
तव सामाईक आरंभिले। तव हे बाळक खाले पडले।।
अकस्मात म्या देखिले। आपुल्या लोचनी।।४५।।
मग विस्मयो पावले मने। याते प्रसवले गगनि।।
कि हे आम्हा पुत्ररत्ने। स्वप्ने आले पैं।।४६।।
ऐसे देखोनि मनामाजी। म्या विचारिले पुण्ये काजि।।
पुष्पावति प्रियाकाजि। आजि पुत्र नाहि पैं।।४७।।
म्या आणिले तुजे कारणे। त्वा अंन्या विचार न करणे।।
या बाळा ममत्वाकारणे। सर्वदा देखा।।४८।।
गर्भि उपनलि या जिवे। गर्भिभाराचे दुःख साहावे।।
नव मास पथ्या असावे। रोगिया परि।।४९।।
येंव्हडे कष्टे पुत्र व्हावा। त्या परि संध्या लाभे जिवा।।
तरि सुखाचि का न द्यावा। प्राणवल्लभे।।५१।।
ज्या फळाचि इछा कीजे। ते तरि अकस्मात पाविजे।।
तरि का अंगिकार न किजे। चंद्रवदने।।५१।।

देवि तुझे पुण्ये समर्थे। जे तुझा मनाचा मनोरथे।।
ततक्षणि सकळार्थे। फळासि आले।।५२।।
आता प्रपंच येक करिजे। पुत्र जन्मला ऐंसा म्हणिजे।।
बाळांतीपण राहिजे। लौकिक प्रचिति।।५३।।
निपुत्र्याचा नाव दुरि किजे। लौकिकि सपुत्री होइजे।।
आणि अरिवर्णाच्या मनि कीजे। महा स्वल्प देखा।।५४।।
आता ऐंसा गुडा(ढा)र्थ विचारी। लौकिक न पडे बाहेरी।।
ऐंसा येक प्रकार निर्धारी। आपुला मनि।।५५।।
मग राणि म्हणे प्राणेश्वरा। बरवे होये जी नरेश्वरा।।
तुमचा अमचा विचारा। भेदु न पडावा।।५६।।
मग रायाचे संवादे राणि। अपण जाला बाळांतिणी।।
बोलाविला सुइनी। डोकरि[1] येकि।।५७।।
डोइस चोळि बांधोनि सुंधरी। गेलि प्रसुतघरा भितरी।।
बाळ पुढे घेवोनि मनोहारी। पहुडली।।५८।।
पुष्पवंतिये पुत्र जाला। वाधावा रायाजवळी आला।।
ऐंकोनि राव संतोषला। मनामाझी।।५९।।
विस्मयो जला लोकाचे मनि। मग राये भंडारे फोडोनि।।
महा दान रत्न देवोनि। याचक सुखि केले।।६०।।
संतोषलि स्वजनाचे मनि। याचकासि दिधले दाने।।
धवळ मंगळ गाति गायेणे। करि प्रमोदे।।६१।।
गुढिया मकर तोरण। घरोघरि उभाविले सुमन।।
ते उत्साह सर्व जन। मांडिले देखा।।६२।।
मग त्या कुवराकारणे। मायेबाप नाव ठेवणे।।
मिळोनि सकळ स्वजन। विचार केला।।६३।।

१. वृद्ध.

अंगिचि प्रभा प्रकाशीली। तेणे सर्व दिशा व्यापिलि।।
कुंडला किरणे फाकली। रत्नाचि देखा।।६४।।
ऐंसा पुत्र महा निर्मळ। नाम ठेविले भामंडळ।।
तो वाढतसे अतुर्बळ। महा मनोज्ञा पैं।।६५।।
तो कुवर धात्रीचा हाति। पाळावया दिधले समर्थे।।
मग ते दोघे दंपते। खेळविति जालि।।६६।।
करा बावरि खेळे सुंधर। जैसा कमलावरी भृमर।।
बाळलिला रंजवि कुवर। माये बाप ते।।६७।।
आता मागिल कथा सुरेखा। परियेसि राया श्रेणिका।।
विदेहि राणि अणि जनक। जे दुःख जाले।।६८।।
पुत्राचे जाले हरण। मग विदेहि करि रोदन।।
डोळिया सांडि जीवन। महा उत्पात देखा।।६९।।
सर्व बंधूवर्ग समान्वीत। शोकसागरि पडिले चित।।
मरमरा कर्महित। काहि नव्हे जी।।७०।।
चक्रवाकि करि विलापी। म्हणे माझे पाठ आले पाप।।
पुत्रवियोगे दुःख संताप। येउनि पडले।।७१।।
हे वत्सा कोमलांगि निर्मळ। वरपडासि[१] जाला काळ।।
वरि कोणाचि बाळ। द्रिष्टी पडली।।७२।।
कवण पापि गृहण केले। मजे महादुःख दिधले।।
शोकसागरि पतन जाले। मजे कारणे पैं।।७३।।
जात मात कोणे दुर्जन। पुत्र नेला दुर्जनपण।।
कि शुभाशुभ कारणे। ते नेणे बापा।।७४।।
अगे बाइ ये माझा नंदन। तो कोणे नेला हरण।।
ठाव[२] करा गे जडकुन[३]। विसावा माझा।।७५।।

१. दुःख. २. शोध घ्या. २. झटकन, ताबडतोब.

म्या पूर्वि दुष्कृत केले। कवणाचे बाळ हारिली।।
ते कर्मेफळासी आले। आजि देखा।।७६।।
कीसो अंन्या चेपिलि काडिली। कि संत महंता संताविले।।
ते कर्मेउदयासि आली। ते नेणे देखा।।७७।।
मजे मारिता तरि भले। परि माझा बाळ का मारिले।।
मरण पर्स्यंति दुःख दिधले। माझिया जिवा।।७८।।
ऐसा विलाप देखोनि राजा। जनक भूपति म्हणे वोजा।।
कर्मगति प्राप्ती जाला। काइ करावे।।७९।।
शोक नको धरू मनोहारे। पुत्र मरण नाहि सुंधरे।।
ऐसे निमित्ये निधारि। जाणवते मना।।८०।।
पूर्वप्रभावे देवी। ऐंसेचे दुःख धरावी।।
हे होति जातिस्वभावी। हे मूढ भावा।।८१।।
वल्लभे वस्तुचे हाणी। जालिया आलिया मनि।।
दुःख न धरावि कामिणि। सर्वथा देखा।।८२।।
शोक केलिया दुःख वाढे। आणि कही न दिसे पुढे।।
ऐंसे होय कुकोडे। निरार्थक देखा।।८३।।
तुझ्याने दुःखे मि दुश्चित। आता चित करावे स्वस्त।।
लिखित देइन दशरथा। शुद्धि करावया।।८४।।
या बंधूवर्गा मैत्राप्रती। निरोप देयिन जुगति।।
पुत्राचे शुद्धि करावे निरुति। या कारणे।।८५।।
सत्वरे पाठवीन सुजाणे। करविन पुत्र वसेण।।
हे वसुंधरा प्रजन्ये। करुनिशा।।८६।।
शुधि आनविन पुत्राची। आशा पूरविन तुमची।।
हे सत्य वाचा आमुची। जाणिजे।।८७।।

मग पतिचे वचने। विदेहि शांत जालि सुमने।।
लिखित पाठविले सजने। दशरथाप्रती।।८८।।
　　लिखित वाचले दशरथे। दुःख धरिले समर्थे।।
　　मग संगे आला तेथे। पडतळावया[१]।।८९।।
या मैत्राचे कार्याकारणे। सावधान हे अंतःकरणे।।
तो मैत्रा अजा कंठि स्तन[२]। तैसा तो निस्फळ।।९०।।
　　दशरथ अणिक जनके। सर्वत्र शुद्धि केले सुख।।
　　प्रथ्वि धाडोळिलि विवेके। परि सुद्धी नाही।।९१।।
मग स्वजन जाले निराशा। ठाकिति स्वासोस्वासा।।
तुठलि मनाचे आशा। म्हणोनिशा।।९२।।
　　कैसे शोक दुःखे नीके धावे। कैसे मन द्रढ करावे।।
　　या पुत्राचे वियोगे जावे। कवनि कडे।।९३।।
स्वजना जनाचे वियोगे। मन रंगले अनुरागे।।
हा होति करतीला वेगे। स्वजन देखा।।९४।।
　　कितेक दिन दशरथा। तेथे राहिला समर्था।।
　　संसारसागर स्वरूपाचे समर्था। उपदेशेनिशा।।९५।।
मग तो आपुला गावा आला। महा मैत्रभाव वाढविला।।
जनकराव संतोषला। दशरथ गुणे।।९६।।
　　गौतमु म्हणे नरेश्वरा। राया श्रेणिका रणरंग धीरा।।
　　हरण जाले कुवरा। त्या उपरांतिक३ पैं।।९७।।
जनकरायाचे मंदिरी। राहिलि जांन्नकि सुंधरी।।
त्या विस्मजि  सुपरी। दुःखाचे पैं।।९८।।
　　आपुले बाळलिले करूनि। संतोष उपजलि मनि।।
　　रंम्ये चेष्टा करोनी। शोभत असे पैं।।९९।।

१. सांत्वन करण्यासाठी.  २. बोकडाच्या गळ्याखाली लोंबत असलेली लाळी.  ३. नंतर.

दिनि दिनि वाढतसे बाळ। निववि[१] जनने तीचे सोहळ[२]।।
तेथ सर्व सुखाचे सोहळ। परिपूर्ण पैं।।३००।।
जैसि त्या चंद्राचि कळा। वाढति दिसे प्रबळा।।
तैसि ते जांन्नकी बाळा। वाढत असे।।१।।
ते तव चंद्रवदना। वरी विषेष मृगलोचन।।
लावण्ये सुरस सुमन। सुंधर पैं।।२।।
अशोक पल्लवाप्रमाणे। ऐंसे पाद पाणि अरक्तवर्णा।।
ते अमरांगण कि सदन। मदनरायाचे।।३।।
तौसा मोद वदन बाळ। संत्रस्त लोचन विशाळ।।
आपुले कीर्ति दिग्मंडळ। लेपण केले।।४।।
कैसे कोमळ मधुर वाणि। बोबडि बोले शाहणि।।
बाळलक्ष्मि परि सर्व गुणी। मनरंजेक पैं।।५।।
प्रत्यग्र[३] मालति माला। तुल्या हस्तकोमला।।
तनु उदरि नाभीकमळा। निरोपमा।।६।।
रंभस्तंभासमान[४] सरूवा[५]। अरक्त करसंभवा।।
विशाल धन वक्षोज[६] देवा। ध्यान लागे।।७।।
स्तनयुग्म कंबु[७] कंधर[८]। पक्वबिंबफलाधर[९]।।
निरविला[१०] कोकिलाचे श्वर। लाज आणिलि।।८।।
ते भृंगालिनि लंधमिला। सर्व स्त्रिगुणेचि कमळा।।
रूपाचा मर्यादा कमला बाळा। कवणे वर्णावे।।९।।
अमुचि तव जीती वृती। रामा वर्णिता न ये जुगती।।
लौकिक हे महासन्मती। नव्हे ते देखा।।१०।।

---

१. शांत करणे, पुरविणे. २. कौतुक. ३. ताजा. ४. सोललेल्या केळीच्या खुंटासमान.
५. सुंदर. ६. स्तन. ७. शंख. ८. मान, गळा.
९. पिकलेल्या तोंडल्यासारखे लालचुटुक ओठ. १०. मागे सारणे, पराभूत करणे.

आता थोडकेत बहु सांगेन। विधाता होता रिकामपणे।।
हे त्रिभुवनिचे रूप तेणे। रचिले देखा।।११।।
लक्ष्मि अवतारले सुपरी। कि हे सुरतरुचि मंजर[1]।।
देवकंन्या म्हणे जर। तरि तेहि नव्हे।।१२।।
जरि म्हणे रतिचे रूपडे। कि म्हणे प्रतिबींबडे।।
कि हे प्रेमाचे जुंबडे[2]। अवतरले देखा।।१३।।
कि पद्मिणि जातिचि कोपली। कि हे कल्पवेळीचि कळी।।
के हे लावण्याचे पुतळी। अवतरलि पैं।।१४।।
कि हे मदनाचे मंदिर। कि हे सुदर्शनाचे सिखर।।
कि हे मंदाकिनिचे[3] नीर। अडखळले देखा।।१५।।
कि हे क्षिरसागराचे वेळी[4]। कि हे सीतकराचे[5] कळी।।
पारिजातकाचि परिमळी[6]। काये मूर्ति जाला।।१६।।
सामुद्रिके लक्षण सुरेखे। किंवा हे त्याचे पुस्तके।।
कि हे परम जोतिस्त्रियेक। रूप देखा।।१७।।
उपमा नाहि मज योजिता। ऐंसि ते अवतरलि सिता।।
बाप बाप रे विधाता। तुज मोल नाही।।१८।।
सर्व गुणाचे सुक्षेत्र। हे जान्हकि नामे पवित्र।।
जैसे वर्णिता गहन सुत्र। शारदे देखा।।१९।।
जानकि ते पर्णिता सुंधर। आगा मघद नरेश्वर।।
पार न केले कवेश्वर। अमरादिके।।२०।।
सातसे कंन्येसवे तिये बाळा। खेळति आपुले मनोभावे।।
नित्ये निरंतर मोहोत्सावे। विराजमान।।२१।।

---

१. कल्पवृक्षाची मंजिरी –मोहोर. २. दाटी, गर्दी, मेळ. ३. स्वर्गातील गंगा.
४. क्षीरसमुद्राचा किनारा. ५. चंद्र. ६. सुगंध.

ते रंजवि मायबापाते। बापे पाठविलि समर्थे।।
अनुभविलि सकळ शास्त्रे। बुधिवंति देखा।।२२।।
ते सर्वजना मनोहारी। मिरवे सकळ शृंगारी।।
जे वर्णिजे सहस्र प्रकारि। कविवदने।।।२३।।
काव्या धर्मतो हित कुल मप्पुते शुभं। रूप मतमगुणा महितळे।।
सस्वदत्र सुखिचित्ये धीवनै। कार्येमार्येजन सेवितनृपां।।३२४।।

**इति श्री रामचरित्रे विरचिते श्री आचार्येगुणकिर्ति**
**सीताभामंडलोत्पत्तिवर्णनो नाम पंचदशमोध्यायाः।।**

* * *

महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश पासून मध्ययुगीन मराठी ते आधुनिक मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध करण्यामध्ये मराठी जैन साहित्याचे महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील शेकडो हस्तलिखित जैनग्रंथांचे संशोधन आणि संकलन केले आहे. त्यापैकी त्यांनी संशोधित आणि संपादित केलेल्या १७ हस्तलिखित ग्रंथांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने होत आहे. **'मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील दुर्मीळ हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन आणि संपादन'** या प्रकल्पामुळे मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाला नवे वळण प्राप्त होणार आहे. अभिजात अशी परंपरागत मराठी यानिमित्ताने वाचकांसमोर येत आहे.

**- डॉ. महावीर प्र. शास्त्री**, सोलापूर




**डॉ. गोमटेश्वर सातगोंडा पाटील**
प्राध्यापक-मराठी विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
Email - gomteshpt@gmail.com


**लेखन व संपादन**

१. मराठी कादंबरी तत्त्व आणि सिद्धान्त, दर्या प्रकाशन-पुणे, २०१२

२. मराठी कादंबरीची उपयोजित समीक्षा, दर्या प्रकाशन-पुणे, २०१४

३. मराठी भाषा सर्जन आणि उपयोजन-(सहलेखक), दर्या प्रकाशन-पुणे, २०१४

४. मराठी जैन साहित्याचे स्वरूप (१८५०-२०००), भारतीय ज्ञानपीठ -नवीदिल्ली, २०१८

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे प्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संपादन**

| | | |
|---|---|---|
| ०१. रामायण (४-भाग) | - आचार्य गुणकीर्ती | (इ.स.१४७०) |
| ०२. हरिवंशपुराण (३-भाग) | - महाकवी जिनदासनामा | (इ.स.१४९३) |
| ०३. सुमतिप्रकाश | - कवींद्रसेवक | (इ.स.१५६८) |
| ०४. यशोधरचरित्र | - गुणनंदी | (इ.स.१५८१) |
| ०५. सुदर्शनचरित्र | - वीरदास | (इ.स.१६२७) |
| ०६. श्री आदिनाथ पुराण | - महीचंद्र | (इ.स.१६९६) |
| ०७. शीलपताका | - महाकीर्ती | (इ.स.१६९८) |
| ०८. धर्मपरीक्षा | - विशालकीर्ती | (इ.स.१६८८) |
| ०९. अष्टकर्मप्रकृती | - यादवसुत | (इ.स.१७१८) |
| १०. उपदेशरत्नमाला (२ भाग) | - भट्टारक रत्नकीर्ती | (इ.स.१८१२) |
| ११. धर्मामृतकथा | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १२. हनुमंतपुराण | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १३. हरिलीळाप्रकाश (२ भाग) | - महाकवी गिरिसुत | (इ.स.१८५०) |
| १४. श्रीपाल चरित्र | - गिरिसुत | (इ.स.१८४८) |
| १५. कर्णामृत पुराण | - नेमाप्पा उर्फ दामोदरसुत | (इ.स.१८०२) |
| १६. सुक्तिमुक्तावली | - मधुकराया | (इ.स.१८१२) |
| १७. पंच पांडवांचे आदिमूल चरित्र | - जैनसुत उर्फ आदिनाथ पंडित | (इ.स.१८४८) |

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.